# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ : इतिहास

सत्र ५ : पेपर १०

# मराठा साम्राज्याचा उदय आणि दृढीकरण

(Rise and Consolidation of Maratha Empire)

सत्र–६ : पेपर–१५

# मराठा साम्राज्याचा विस्तार आणि ऱ्हास

(Expansion and Decline of Maratha Empire)

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२४–२५ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२५
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-48427-17-5

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### सल्लागार समिती


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. के. बी पाटील** (सदस्य सचिव)
प्र. संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ अभ्यासमंडळ : इतिहास ■


अध्यक्ष – **प्रोफेसर (डॉ.) चंद्रवदन मोहनराव नाईक**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. अवनिश आर. पाटील**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. अभयकुमार जगन्नाथ पाटील**
  सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड,
  ता. कराड, जि. सातारा

- **डॉ. श्रीमती आरती बळवंत नाडगौडा**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती कविता अशोक गगराणी**
  द न्यू कॉलेज, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती उर्मिला एन. क्षिरसागर**
  मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

- **डॉ. जयपाल चंद्रकांत सावंत**
  शंकरराव जगताप आर्टस कॉलेज, वाघोली, ता. सातारा

- **डॉ. संभाजी आनंदा मोरे**
  एम. एच. शिंदे महाविद्यालय, तिसंगी, ता. गगनबावडा,
  जि. कोल्हापूर

- **डॉ. प्रमोदकुमार अंकुश ओलेकर**
  आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा, ता. वाळवा,
  जि. सांगली

- **प्रोफेसर (डॉ.) चंद्रकांत संदिपान चव्हाण**
  इतिहास अधिविभाग, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲण्ड
  सायन्स, अशोक चौक, सोलापूर

- **डॉ. तेजस मदन गर्गे**
  डायरेक्टोरेट ऑफ आर्किओलॉजी ॲण्ड म्युझियम, संत
  गोर्गे फोर्ट, संत गोर्गे हॉस्पिटल प्रिमाईसेस, फोर्ट, मुंबई

- **डॉ. नंदा पारेकर**
  एव्हरग्रीन होम, टॉवर डी, फेज ४, फ्टॅट नं. २०८,
  राजहंस प्रिंटींग प्रेस समोर, प्रभू हॉस्पिटल रोड,
  नागाळापार्क, कोल्हापूर

- **प्रोफेसर (डॉ.) निरंजन कुलकर्णी**
  इतिहास अधिविभाग, मा. श्री. आण्णासाहेब डांगे, आर्टस,
  कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, हातकणंगले, जि. कोल्हापूर

- **श्री. सदानंद कदम**
  शिवराज, १०८२, दक्षिण वसंत नगर, छत्रपती शिवाजीराजे
  मार्ग, सांगली.

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूर शिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक बी. ए. भाग तीन च्या इतिहास विषयाच्या पेपर क्रमांक १० सत्र पाच साठी 'मराठा साम्राज्याचा उदय आणि दृढीकरण' आणि पेपर क्रमांक १६ सत्र सहा साठी 'मराठा साम्राज्याचा विस्तार आणि ऱ्हास' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

सत्र ५ साठी पेपर क्रमांक १० मराठा साम्राज्याचा उदय आणि दृढीकरण यामध्ये छत्रपती शाहू, पहिले बाजीराव, बाळाजी बाजीराव व पानिपतचे तिसरे युद्ध (१७६१), मराठा साम्राज्याचा उदय आणि दृढीकरण तर सत्र ६ साठी पेपर क्रमांक १५ मराठा साम्राज्याचा विस्तार आणि ऱ्हास यामध्ये करवीर राज्य, मराठा मंडळ-०१, मराठा मंडळ-०२, मराठी सत्तेचा अस्त या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. तसेच सदरच्या पुस्तकाच्या लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

शिवाजी विद्यापीठ, दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या अंतर्गत स्वयं अध्ययन निर्मिती करण्यासाठी मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रोत्साहन आणि मार्गदर्शन मोलाचे ठरले. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. डॉ. सी. एस. नाईक, शिवाजी विद्यापीठ, इतिहास विभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांचे सहकार्य लाभले. तसेच सर्व घटक लेखकांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. दूर शिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. सतीश चौगुले**
क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा,
ता. वाळवा, जि. सांगली

**डॉ. सुरेश चव्हाण**
आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज,
सरस्वतीनगर, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. धीरज शिंदे**<br>श्रीमती आक्काताई रामगौडा पाटील कन्या महाविद्यालय,<br>इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ | – |
| **डॉ. सुरेश चव्हाण**<br>आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, सरस्वतीनगर, गडहिंग्लज<br>ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | २, ३ | ४ |
| **प्रा. सतीश चौगुले**<br>क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा, ता. वाळवा,<br>जि. सांगली | ४ | १ |
| **डॉ. तानाजी हवालदार**<br>विश्वासराव नाईक आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज ॲण्ड<br>बाबा नाईक सायन्स कॉलेज, शिराळा, जि. सांगली | – | २, ३ |

**■ संपादक ■**

**प्रा. सतीश चौगुले**
क्रांतिसिंह नाना पाटील कॉलेज, वाळवा,
ता. वाळवा, जि. सांगली

**डॉ. सुरेश चव्हाण**
आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज,
सरस्वतीनगर, गडहिंग्लज, ता. गडहिंग्लज,
जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–१०**<br>**मराठा साम्राज्याचा उदय आणि दृढीकरण** | |
| १. | छत्रपती शाहू | १ |
| २. | पहिले बाजीराव | ३२ |
| ३. | बाळाजी बाजीराव व पानिपतचे तिसरे युद्ध (१७६१) | ५७ |
| ४. | पानिपतनंतरचे पुनरुज्जीवन | ९२ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१५**<br>**मराठा साम्राज्याचा विस्तार आणि ऱ्हास** | |
| १. | करवीर राज्य | १११ |
| २. | मराठा मंडळ–०१ | १४३ |
| ३. | मराठा मंडळ–०२ | १६७ |
| ४. | मराठी सत्तेचा अस्त | १८५ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२४-२५ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक १

# छत्रपती शाहू

(Chhatrapati Shahu)

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ शाहूंची सुटका आणि महाराष्ट्रातील यादवी युद्ध

१.२.२ बाळाजी विश्वनाथ यांचे मराठा साम्राज्याप्रती योगदान

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द

१.५ सरावासाठी स्वाध्याय

१.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास,

- मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धावेळची परिस्थिती अवगत होईल.
- मुगल कैदेतून शाहू महाराजांची सुटकेची माहिती व त्यानंतर झालेल्या शाहू महाराज आणि ताराराणी यांच्यातील यादवी युद्धाची माहिती ज्ञात होईल.
- मराठी सत्तेच्या निर्माण झालेल्या दोन छत्रपतींच्या गाद्यांची (सातारा व कोल्हापूर) माहिती घेता येईल.
- बाळाजी विश्वनाथ यांनी छत्रपती शाहू महाराजांसाठी केलेल्या कामगिरीची माहिती घेणे.
- कोल्हापूर व सातारा या दोन छत्रपतींच्या गाद्यांमधील संघर्ष आणि वारणा तहाचा वृत्तांत समजून घेणे.
- एक वसुली कारकून ते पेशवा हा बाळाजी विश्वनाथ यांचा जीवनवृत्तांत अभ्यासणे.
- शाहू महाराजांचे छत्रपती म्हणून स्थान भक्कम करण्यासाठी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी केलेली कामगिरी अभ्यासणे.
- मराठा राज्याचे साम्राज्यात रुपांतर करण्यात पेशवा बाळाजी विश्वनाथ यांची भूमिका अभ्यासणे.

## १.१ प्रास्ताविक :

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य म्हणजे महाराष्ट्राच्या नव्हे तर देशाच्या इतिहासामधील एक सुवर्णपान होते. १७ व्या शतकाच्या मध्यावर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी स्वराज्याची स्थापना केली. अनेक बलाढ्य शत्रूंचे अडथळे पार करत स्वराज्य पूर्णत्वास आले. भारतामधील नव्हे तर आशिया खंडामधील क्षेत्रफळाने सर्वात मोठे मुगल साम्राज्य, आदिलशाही, सिध्दी, पोर्तुगीज, इंग्रज, कोकणामधील छोटे संस्थानिक तसेच स्वकीय या सर्वावर मात करून ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर राज्याभिषेक करून नवीन लोककल्याणकारी राजवट निर्माण केली. येथील प्रजेस राजा मिळाला. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी राजवटीचा आदर्श निर्माण करून स्वराज्याचे सुराज्य केले. संपर्कात आलेल्या प्रत्येकास स्वातंत्र्याच्या विचाराने भारावून टाकले. महाराजांनी आपले असामान्य कौशल्य, बुद्धीसामर्थ्य, मुत्सद्देगिरीच्या जोरावर स्वराज्याचे रक्षण करतानाच त्यात वाढ केली. या स्वतंत्र्य,सार्वभौम राज्याचे संरक्षण करण्यासाठी प्रसंगी प्राणाची आहुती देणारे मराठी वीर निर्माण झाले. एक विलक्षण प्रेरणा त्यांनी निर्माण केली. शिवकाळात स्वधर्म, स्वराज्य, स्वातंत्र्य रक्षणाची प्रेरणा इतकी विलक्षण होती कि, शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर खुद्द औरंगजेब सर्व सामर्थ्याने दक्षिणेत उतरला असताना अवघ्या २३ वर्षाच्या छत्रपती संभाजी महाराजांनी तडफेने सलग ९ वर्षे औरंगजेबाशी झुंज दिली. इ.स १६८१ मध्ये संभाजी महाराजांचा पराभव करण्यासाठी सलग तीन वर्षे लाखोंच्या फौजेने स्वराज्यावर चोहोबाजूंनी हल्ला केला. परंतु संभाजी महाराजांनी तडफेने हे हल्ले परतवून लावले. निराश होवून औंरगजेबाने दक्षिणेतील आदिलशाही, कुतुबशाही या राजवटीचा पराभव केला. व पुन्हा नव्या दमाने स्वराज्यावर हल्ले सुरू केले. दुर्दैवाने फितुरी, कारस्थानामुळे छत्रपती संभाजी महाराज पकडले गेले. आणि प्रचंड हाल-हाल करून त्यांना ठार केले. संभाजी महाराजांच्या हौतात्म्यामुळे स्वराज्य रक्षणासाठी छत्रपती राजाराम, महाराणी ताराराणी यांनी मुगलांना प्रचंड विरोध केला. सर्वसामान्य मराठी माणसांनी मुगलांसोबत लोकयुद्ध, स्वातंत्र्ययुद्ध पुकारले. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध भारताच्या इतिहासामधील एक महत्वाचे पर्व ठरले. महाराष्ट्रात सलग २५ वर्ष राहून स्वराज्य नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न औरंगजेबाने केला. परंतु स्वराज्य त्याला हस्तगत करता आले नाही. फारसे अनुभवी नेतृत्व नसताना स्वराज्यापुढे त्यास झुकावे लागले. मराठे अनेक लढाया हरले परंतु अंतिम युद्ध जिंकले. विमनस्क अवस्थेत २० फेब्रुवारी १७०७ रोजी तीन दिवसांच्या आजारानंतर औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याच्या इच्छेप्रमाणे दौलताबादनजीक खुल्दाबाद या ठिकाणी अत्यंत साध्या पद्धतीने त्याचा दफनविधी करण्यात आला.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध संपले. प्रचंड आणि सुसज्ज सैन्य, अनुभवी सेनापती, प्रचंड शस्त्रे, दारुगोळा, संपत्ती घेवून मराठ्यांची सत्ता संपवण्यास आलेल्या औरंगजेबास निराश व पराभूत अवस्थेत महाराष्ट्रातच मरण पत्करावे लागले. या घटनेनंतर हिंदुस्थानच्या इतिहासास वेगळे वळण मिळाले. मुगल सत्तेच्या ऱ्हासास सुरवात झाली. या संधीचा फायदा मराठ्यांनी घेतला आणि मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारास आरंभ झाला. परंतु दुर्दैवाने साम्राज्यविस्तारासोबत महाराणी ताराराणी आणि शाहू यांच्यात यादवी युद्धास आरंभ झाला. या यादवी युद्धाची माहिती पाहण्याअगोदर छत्रपती शाहू महाराजांचे पूर्वचरित्र अभ्यासाने महत्वाचे आहे. त्याचप्रमाणे शाहूं महाराजांना छत्रपती करण्यात पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचा मोठा वाटा

आहे. एक महसुली अधिकारी ते सेनाकर्ते, पेशवापर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत महत्वाचा ठरला. स्वतंत्र्यवृत्तीच्या सरदारांचे वर्चस्व मोडून काढून मराठा राज्य एका भक्कम पायावर स्थिर केले. तसेच मुगलांशी करार करून चौथाई आणि देशमुखीचे अधिकार प्राप्त केले व मराठा राज्यास आर्थिक स्थैर्य प्राप्त केले. प्रचंड मोठे लष्कर उभे करून मराठा राज्यमंडळाची स्थापना केली. एकूणच स्वराज्याचा पाया विस्तारीत करतानाच मराठा साम्राज्याचा पाया घातला त्यांचे कार्य ही सदर घटकात अभ्यासणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ शाहूंची सुटका आणि महाराष्ट्रातील यादवी युद्ध

**छत्रपती शाहूंचे पूर्वचरित्र :** मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर मराठ्यांच्या राज्याचे साम्राज्यात रुपांतर करण्याचे महत्वाचे कार्य छत्रपती शाहू महाराज यांनी केले. छत्रपती शाहू महाराज यांचा जन्म छत्रपती संभाजी महाराज यांच्या पत्नी येसूबाई यांच्या पोटी १८ मे १६८५ रोजी कुलाबा जिल्हामधील गंगावली येथे झाला. ते चार वर्षाचे असताना त्यांचे वडील छत्रपती संभाजी महाराजांची हत्त्या झाली आणि २५ मार्च १६८९ रोजी झुल्पिकारखानाने रायगडला वेढा दिला. यादरम्यान येसूबाई आणि इतर मुत्सद्द्यांनी किल्ला लढवण्याचे ठरवले व छत्रपती राजाराम महाराज यांना सुरक्षितपणे रायगडावरून बाहेर काढण्याचे ठरवले. ५ एप्रिल १६८९ रोजी छत्रपती राजाराम महाराज रायगडावरून निसटले. मजल-दरमजल करत गुप्तपणे २ नोव्हेंबर १६८९ रोजी जिंजीच्या किल्ल्यावर सुरक्षित पोहचल्यावर येसूबाईनी रायगड मुगलांच्या ताब्यात दिला. येसूबाई, त्यांचा मुलगा छत्रपती शाहू आणि इतर मंडळींना सोबत घेवून इतकादखान नोव्हेंबर १६८९ रोजी बादशहाच्या कोरेगाव येथील छावणीमध्ये आला. औरंगजेबाने या सर्व राजपरिवारास आपुलकीने वागवले. शाहू महाराजांसोबत मुगल कैदेत असलेले रायभानजी भोसले, मदनसिंह, जोत्याजी केसरकर हेच त्यांचे सल्लागार आणि हितचिंतक होते. शाहू महाराजांना सप्तहजारी मनसबदारी आणि राजा हा किताब दिला. आपली लहान मुलगी झेनुत्तीसा उर्फ पातशहा बेगमला हिला त्यांच्याकडे लक्ष ठेवण्यास सांगितले. या काळात जोत्याजी केसरकर यांनी बाल शाहूंना घोड्यावर बसणे, तलवारबाजी, भाला चालवणे याचे शिक्षण दिले परंतु शाहू महाराज कैदेत असलेने त्यांना प्रत्यक्ष युद्ध अथवा युद्ध मोहिमांमध्ये भाग घेता आला नसलेने त्यांना त्याबाबत विशेष शिक्षण आणि अनुभव फारसा मिळाला नाही. तसेच प्रत्यक्ष व्यवहार आणि राजकारणाचे धडे मिळाले नाहीत. परंतु यावेळी बाळाजी विश्वनाथ सातत्याने शाहू महाराजांच्या संपर्कात राहून सर्वतोपरी मदत करत होते. मुगल कैदेत असताना त्यांची दोन लग्ने झाली. पहिली पत्नी सकवारबाई ही लखुजी जाधव यांच्या घराण्यामधील रुस्तमराव जाधव यांची मुलगी होती तर दुसरी पत्नी अंबिकाबाई कन्हेरखेड येथील शिंदे घराण्यामधील होती. मुगल कैदेत असताना येसूबाई अत्यंत हुशारीने, चाणाक्षपणे वागल्याचे दिसते. बेगम झेनुत्तीसासोबत असलेल्या जिव्हाळ्याच्या संबंधामुळे येसूबाई आणि शाहू महाराजांवरील अनेक संकटे टळली. बादशहा औरंगजेब आपल्या सोबतच या राजपरिवारास नजरकैदेत ठेवून प्रत्येक ठिकाणी जात असे. जवळपास सतरा-अठरा वर्ष हा संपूर्ण राजपरिवार मुगलांच्या कैदेत होता.

**मुगल कैदेतून शाहूंची सुटका :** शाहु महाराज व येसूबाईच्या अटकेनंतर छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांनी मुगलांशी झुंज दिली. अखेरीस २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेब मरण पावल्यानंतर मुगल साम्राज्यात अस्वस्थता निर्माण झाली. हिंदुस्थानच्या इतिहासात नवीन पर्व निर्माण झाले. दिल्लीचे तख्त प्राप्तीसाठी औरंगजेबाचे पुत्र आजमशहा आणि शहाआलम उर्फ मुअज्जम यांच्यात संघर्ष निर्माण झाला. औरंगजेबाच्या मृत्यूवेळी शहाआलम हा उत्तरेत अफगाणिस्तानच्या बाजूस होता तर आजमशहा माळव्याच्या आपल्या सुभेदारीवर निघाला होता. त्यावेळी तो खानदेशात होता. आपल्या पित्याच्या मृत्यूची बातमी समजताच घाईने अहमदनगरला आला. आपल्या पित्याचे दफन त्यांच्या इच्छेप्रमाणे औरंगाबादनजीक खुल्दाबाद येथे त्याचा गुरु शेखजैनुद्दिन यांच्या कबरीशेजारी करण्यात आले. १४ मार्च १७०७ रोजी आजमशहाने स्वतास बादशहा म्हणून घोषित केले. यावेळी अफगाणिस्तानच्या जवळ असलेल्या शहजादा शहाआलम याच्या हाती दिल्ली मिळू नये म्हणून मराठ्यांसोबतचे दीर्घकाळ सुरू असलेले युद्ध थांबवून वजीर आसदखान आणि झुल्फिकारखान यांच्यासोबत उत्तरेच्या दिशेने निघाले. उत्तरेकडे जात असताना राणी येसूबाई, शाहू महाराज व राज घराण्यामधील इतर कैदी सोबत घेतले. यावेळी शाहू महाराजांनी छावणीमधून सुटकेविषयी झेनुत्तीसा बेगम आणि झुल्फिकारखान यांच्या मार्फत प्रयत्न सुरू केले. यावेळी अनुभवी झुल्फिकारखानने आजमशहास सल्ला दिला कि, शाहूंची सुटका केल्यास मराठ्यांमध्ये भाऊबंदकी निर्माण होईल आणि त्यामुळे दक्षिणेत आपणास दीर्घकाळ लक्ष देण्याची गरज लागणार नाही. झुल्फिकारखानास मराठी प्रदेश, व्यक्ती, येथील मनुष्य स्वभाव याची चांगली जाण होती. त्यामुळे शाहूंना कैदी करून ठेवण्यापेक्षा मुक्त करणे जास्त फायद्याचे ठरेल असा महत्वाचा सल्ला दिला. आजमशहास हा सल्ला पटलेने शेवटी भोपाळनजीक वायव्येस २० मैलावर दोराह येथे ८ मे १७०७ रोजी शाहूंची सुटका करण्यात आली. यावेळी ठरल्याप्रमाणे राजमाता येसूबाई, मदनसिंग, शाहूंची पत्नी सावित्रीबाई इत्यादींना मुगलांनी आपल्या कैदेतच ठेवले. आणि मोरोपंत सबनीस, गंगाधर भट्ट यांच्यासह शाहू महाराज दक्षिणेत आले. सुटकेपूर्वी शाहू महाराज व आजमशहा यांच्यात करार झाला यानुसार असे ठरले कि, अ) मुगल साम्राज्याचा जहागीरदार म्हणून शाहू महाराजांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्यावर राज्य करावे. ब) मुगल बादशहास जेव्हा गरज लागेल तेव्हा फौजेसहीत त्यांनी बादशहास मदत करावी. क) दक्षिणेतील सहा प्रदेशामधून चौथाई आणि सरदेशमुखी शाहुंनी वसूल करावी.

उत्तरेत जाण्याची घाई असलेने शहाआलमने हा करार तोंडी केला. सनदा नंतर तयार करून मिळणार होत्या. आरंभी हा करार पाळण्याचे नैतिक बंधन शाहू महाराजांवर होते. कारण राजपरिवार अजूनही मुगल कैदेत होता.

**शाहू महाराजांचे मराठी मुलखात आगमन:** छत्रपती शाहू महाराजांची सुटका झाली तेव्हा त्यांचे वय २५ वर्षाचे होते. त्यांच्यासोबत अवघे २०० घोडेस्वार होते. शाहू महाराज नर्मदा नदी ओलांडून खानदेशमार्गे महाराष्ट्रात त्यांचे आगमन झाले. तापी नदीच्या दक्षिणेस धुळेपासून वायव्येस लांबकानी या ठिकाणी त्यांनी जवळपास एक महिना मुक्काम केला. येथून स्वराज्यामधील सर्व प्रमुख सरदार, वतनदार, देशमुख, देशपांडे यांना पत्रे पाठवून मराठा सरदारांना आपल्या सेवेत रुजू होण्यास सांगितले. त्याचा अनुकूल परिणाम होवून

परसोजी भोसले, नेमाजी शिंदे, हैबतराव निंबाळकर, रुस्तुमराव जाधव, गणेश सरनाईक, केसो त्रिमल, चिमणाजी मोघे, पंताजी शिवदेव, रखमाजी किन्हळे, हणमंते, पुरंदरे, बोकील, पिंगळे अशी प्रतिष्ठीत सरदार, मुत्सद्दी छत्रपती शाहुंना मिळालेने शाहूंची राजकीय बाजू भक्कम होतानाच लष्करी आणि नैतिक स्थितीही भक्कम झाली. शाहू महाराज लांबकानी येथून ऑगस्टमध्ये अहमदनगरला आले. तेथे दोन महिने मुक्काम केला आणि स्वत: स्वराज्याचा वारसा म्हणून घोषित केले. अहमदनगरला आपली राजधानी स्थापन करावी असा शाहू महाराजांचा विचार होता. परंतु मराठा राज्याची सातारा राजधानी ताब्यात घेतल्याशिवाय इतर मराठा सरदारांची निष्ठा प्राप्त होणार नाही म्हणून सातारा घेण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू केल्या.

शाहू महाराज मुगलांच्या कैदेतून सूटल्याची बातमी महाराणी ताराराणी यांना समजल्यावर त्यांनी शाहू महाराजांना विरोध करण्यास सुरवात केली. सलग सात वर्ष मुगलांशी संघर्ष करून राखलेले राज्य केवळ जेष्ठतेच्या जोरावर वारसा हक्काने शाहूंना देण्यास ताराराणी तयार नव्हत्या. कारण स्वत: स्वराज्याचा कारभार कोणाच्याही हस्तक्षेपाशिवाय करण्याची तीव्र इच्छा त्यांची होती. अहमदनगर येथून शाहू महाराज यांनी कळवले कि, ''आम्ही निघून स्वदेशी परत येत आहोत.आता राज्य आम्ही करू.बादशाही आज्ञाही तशीच आहे. आपण मातोश्री आहात. आपले यथास्थित चालविण्यास आम्ही कमी करणार नाही. पुढचा मार्ग आक्रमण्यास आम्हाला आपला आशीर्वाद आणि अनुभव यांचाच उपयोग विशेष होईल.'' पण ताराबाईनी शाहुंच्या पत्राची विशेष दखल घेतली नाही. त्यांनी शाहू महाराजांना राज्य न देण्याचा आणि त्यांच्याशी संघर्ष करण्याचा पवित्रा घेतला.

**छत्रपती शाहू महाराज व महाराणी ताराबाई यांच्यातील यादवी संघर्ष :** ताराबाईंनी शाहू महाराजांचा छत्रपती पदावरील आणि स्वराज्याच्या गादीवरील कायदेशीर आणि रितसर वारसा हक्क नाकारला. स्वराज्यावरील आपला मुलगा दुसरा शिवाजी यांचा हक्क सोडण्यास त्या तयार झाल्या नाहीत. परिणामी छत्रपती शाहू विरुद्ध महाराणी ताराबाई यांच्यात यादवी संघर्ष सुरू झाला. ताराराणी यांनी शाहू महाराजांना तोतया ठरवण्याचा प्रयत्न केला या तोतयास कोणत्याही सरदार, किल्लेदार यांनी मदत करू नये अशी पत्रे पाठवली परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. त्यावेळी मुत्सद्दी ताराबाईंनी आपली वेगळी भुमिका मांडली. त्यासंबधी १७ सप्टेंबर १७०७ रोजी सैतवडेकर देसाई यांना पाठवलेल्या पत्रात त्यांनी पुढील युक्तिवाद केला अ) छत्रपती संभाजी महाराजांच्या हत्येनंतर स्वराज्याची राजधानी रायगड मुगलांनी जिंकलेने स्वराज्य तेथे संपुष्टात आले. परंतु त्यानंतर छत्रपती राजाराम महाराजांनी स्वपराक्रमाने पुन्हा राज्य निर्माण केले. ब) स्वराज्य संस्थापक शिवाजी महाराजांची इच्छा होती कि, आपल्या पाश्चात राजाराम हेच स्वराज्याचे वारस व्हावेत. क) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर प्रथम राजाराम महाराजांचा राज्याभिषेक झाला होता. नंतर सक्तीने संभाजी महाराजांनी त्यांना राजगादीवरून काढून स्वताचा राज्याभिषेक केला. म्हणून शाहू महाराज मराठा राज्याचे वारस होवू शकत नाहीत. महाराणी ताराराणी यांनी मांडलेले मुद्दे ऐतिहासिक पुरावे, वस्तुनिष्ठता आणि तर्काच्या कसोटीवर टिकू शकत नाहीत.

तात्कालिक सरदार, जहागीरदार, जनता यांनी ताराबाईच्या युक्तिवादास फारशी दाद दिली नाही. तसेच ताराराणीचीही भूमिका योग्य नव्हती. कारण राजाराम महाराजांनी संभाजी महाराजांचा अधिकार कधी अमान्य

केला नाही. शाहू महाराजांच्या पक्षात दिवसेंदिवस अनेक मुत्सद्दी, सरदार सामील होत होते.ताराबाईनी अखेरीस हा प्रश्न शस्त्रबळाने सोडवण्याचा निर्णय घेतला. शाहू महाराज अहमदनगरला दोन महिने थांबून संभाव्य होणारा संघर्ष टाळण्याचा अखेरपर्यंत प्रयत्न करत होते.ताराराणींनी आपणास मानणाऱ्या सरदारांचे संघटन करण्यास आरंभ केला. त्यांनी रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी, शंकराजी नारायण, खंडो बल्लाळ, निळकंठ मोरेश्वर, धनाजी जाधव, शहाजी निंबाळकर, अप्पाजी आणि धनाजी थोरात, उदाजी चव्हाण, खेम सावंत, संताजी पांढरे या प्रमुख सरदार, कारभाऱ्यांना एकत्र बोलावून आपणास एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली. सामोपचाराने राजगादीचा हक्क मिळत नाही हे पाहून शाहू महाराजांनीही युद्धाची तयारी सुरु केली.

**खेडची निर्णायक लढाई :** औरंगजेबासारख्या सामर्थ्यवान बादशहास सतत सात वर्ष झुंज देवून जे राज्य राखले त्या राज्यावरील आपल्या मुलाचा हक्क सोडण्याचे मानी ताराराणीस शक्य नव्हते. त्यामुळे शाहू महाराजांचा मराठा राज्यावरील हक्क अमान्य केला आणि मोठ्या तडफेने ताराराणींनी शाहुंशी संघर्ष करण्याचा निर्णय घेतला. परंतु या दरम्यान रामचंद्रपंत अमात्य आणि परशुरामपंत प्रतिनिधी यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. महाराणी ताराराणी परशुरामपंत प्रतिनिधीच्या सल्ल्याने वागत होत्या. त्यामुळे रामचंद्रपंतांचा कल शाहू महाराजांकडे होवून त्यांनी शाहुंना अनुकूल हालचाली करण्यास सुरवात केली. हे ताराराणीच्या लक्षात येताच त्यांनी रामचंद्रपंत अमात्यांना कराडनजीक वसंतगडावर कैदेत ठेवले त्यांचा प्रतिकूल परिणाम ताराराणीच्या पक्षामधील सरदारांवर झाला आणि त्यांच्यात दुफळी निर्माण झाली. ताराराणीच्या पक्षाचे सेनापती धनाजी जाधव यांचीही संभ्रमावस्था निर्माण झाली. यादरम्यान शाहू महाराज साताऱ्याच्या दिशेने येत आहेत हे पाहून ताराराणीनी हालचाली तीव्र केल्या. सेनापती धनाजी जाधव आणि परशुरामपंत प्रतिनिधी आणि काही सरदारांसोबत ४० हजार फौज देवून शाहू महाराजांचा बिमोड करण्यासाठी पाठवले. ताराराणीचे लष्कर पुणेमार्गे आपणावर चालून येत आहेत हे पाहून शाहुंनी भीमा नदीकाठी खेड येथे आपला लष्करी तळ हलवला. ताराराणीपेक्षा शाहू महाराजांचे लष्कर नगण्य होते. शाहूंना आपल्या लष्करी कमकुवतपणाची जाणीव असलेने भेदनीतीचा त्यांनी अवलंब करण्याचा निर्णय घेतला. ताराबाईकडील खंडो बल्लाळ आणि बाळाजी विश्वनाथ हे यादरम्यान शाहुंच्या पक्षास मिळाले. भीमा नदीच्या दोन्ही काठावर दोघांच्या फौजा समोरासमोर आल्या. शाहू महाराजांविषयी ताराराणीच्या पक्षाकडील सरदारांना सहानुभूती आणि आदर होता. परंतु शाहूंच्या पक्षाकडे एकसंध लष्कर आणि अनुभवी, मुत्सद्दी धनाजी जाधव यांच्यासारखा सेनापती नव्हता. उलट ताराराणींच्या पक्षाकडे धनाजी जाधव यांच्यासारखा सेनापती होता. कारण ज्या पक्षाकडे धनाजी जाधव त्या पक्षाचा विजय ठरलेला होता. यावेळी शाहू महाराजांनी मुत्सद्दी, संयम व दूरदृष्टीने हालचाली सुरु केल्या. बाळाजी विश्वनाथ यांनी शाहूंच्या पक्षाच्या वतीने गुप्तपणे धनाजी जाधव यांची भेट घेतली. बाळाजी विश्वनाथ यांच्या प्रयत्नाने धनाजी जाधव आणि शाहू महाराज यांची गुप्त भेट झाली. शाहूंच्या व्यक्तीमत्वाचा आणि त्यांच्या न्याय्य भूमिकेचा परिणाम धनाजी जाधव यांच्यावर झाला. त्यांनी शाहूंचा पक्ष स्विकारला. या संभाव्य युद्धात आपण निकराने भाग घेणार नाही आणि युद्धानंतर योग्य वेळ येताच आपण शाहूंच्या पक्षास मिळू असे आश्वासन दिले. १२ ऑक्टोंबर १७०७ रोजी ताराराणी आणि

शाहूंच्या पक्षामधील सैन्याचे युद्ध झाले.या युद्धावेळी धनाजी जाधव यांनी आपल्या लष्करासह ताराराणीचा पक्ष सोडून शाहू महाराजांच्या पक्षाकडे गेले आणि रणभूमीवर तटस्थ भूमिका घेतली. परशुराम प्रतिनिधी ताराराणीच्या पक्षाच्या वतीने शाहूंच्या विरोधी निकराने लढले. त्यांचा पराभव झालेने अखेरीस त्यांनी पलायन करून साताऱ्याच्या किल्ल्याचा आश्रय घेतला. या खेडच्या युद्धानंतर शाहूंच्या राजकीय कारकीर्दीस खऱ्या अर्थाने प्रारंभ झाला. त्यांनी धनाजी जाधव यांची सेनापती आणि खंडो बल्लाळ यांची चिटणीस पदावर नियुक्ती केली. इतर सरदारांचाही योग्य मानसन्मान आणि गौरव केला आणि राज्य प्राप्तीच्या दिशेने भक्कम वाटचाल सुरू केली.

**शाहूंचा राजधानी साताऱ्याचा ताबा व राज्याभिषेक :** खेडच्या लढाईनंतर वाढलेल्या आत्मविश्वासाने शाहू महाराजांनी आक्रमक धोरण स्विकारले आणि राजधानी साताऱ्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली. विविध किल्ल्यांचा ताबा घेण्यास सुरवात केली. आळंदी, पुणे, सुपे, खेड, चाकण ही ठाणी आणि त्याखालील प्रदेश हस्तगत करत ते जेजुरीमार्गे शिरवळ या ठिकाणी पोहोचले.शिरवळचा ठाणेदार शंकराजी नारायण सचिव हा रोहिडा किल्ल्यावर होता. शाहूंनी त्यांना भेटीस बोलावले तथापि त्यांनी ताराराणीशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेतली होती. धर्मसंकटात सापडलेले शंकराजी नारायण यांना कोणताही निर्णय घेता येईना म्हणून त्यांनी आत्महत्या केली. रोहिडयाचा किल्ला शाहू महाराजांच्या ताब्यात आला. परंतु स्वराज्यनिष्ठ शंकराजी नारायण यांच्या आत्महत्येमुळे शाहू महाराजांना अतीव दुख झाले. त्यांनी सचिवांच्या पत्नीचे सांत्वन केले आणि त्यांचा एक वर्षाचा मुलगा नारो शंकर याला सचिवपद दिले. त्यानंतर सिंहगड, राजगड, तोरणा, पुरंदर, चंदन-वंदनगड, वैराटगड हे किल्ले ताब्यात घेतले. शाहू महाराज साताऱ्यास पोहोचण्यापूर्वी महाराणी ताराराणींनी साताऱ्याच्या किल्ल्याची जबाबदारी परशुराम प्रतिनिधी यांच्यावर सोपवून त्या पन्हाळा किल्ल्यावर निघून गेल्या. शाहू महाराजांनी साताऱ्याचा किल्ला आपल्या स्वाधीन करण्याचा निरोप परशुराम प्रतिनिधींना दिला. यावेळी साताऱ्याच्या किल्ल्याच्या किल्लेदार शेख मिरा हा होता. शाहू महाराजांनी शेख मिराचे वाई येथील कुटुंब कैद केले आणि आठ दिवसात किल्ला ताब्यात दिला नाही तर त्याच्या पत्नी आणि मुलांना ठार करण्याची धमकी दिली. तेव्हा शेख मिरा याने परशुराम प्रतिनिधींना अटक करून ७ डिसेंबर १७०७ रोजी साताऱ्याचा किल्ला व प्रतिनिधींना शाहूंकडे सोपवले. शाहूंनी प्रतिनिधींना अटकेत ठेवले. साताऱ्याच्या किल्ला ताब्यात आलेने शाहूंचा प्रभाव विलक्षण वाढला. सुटकेनंतर अवघ्या सात-आठ महिन्यात राजधानी ताब्यात घेण्यात यश आले. योग्य मुहूर्त पाहून सोमवार दिनांक १२ जानेवारी १७०८ रोजी शाहू महाराजांनी स्वता:स विधियुक्त राज्याभिषेक करून घेतला. यावेळी त्यांनी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली. त्यामध्ये खालील व्यक्तींचा पदानुसार समावेश करण्यात आला. १) प्रतिनिधी- गदाधर प्रल्हाद २) पेशवा-बहिरोपंत पिंगळे ३) सेनापती-धनाजी जाधव ४) अमात्य-बाळकृष्ण हणमंते ५) सचिव-नारो शंकर ६) सुमंत-महादजी गदाधर ७) मंत्री-रामचंद्र पुंडे ८) न्यायाधीश- मुदगल भट्ट

त्याचप्रमाणे परसोजी भोसले यांना 'सेनासाहेब सुभा', हैबतराव निंबाळकर यांना सरलष्कर हे किताब आणि जहागिरी देण्यात आल्या. मराठ्यांच्या गादीवर खऱ्या वारसदाराची सत्ता प्रस्थापित होवून नव्या राजवटीची सुरवात झाली. अधिकृतपणे शाहू महाराज 'छत्रपती' झाले.

**छत्रपती शाहूंची पन्हाळा-रांगणा मोहिम :** राज्याभिषेक झाल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी गृहकलह टाळण्याचा प्रयत्न केला. मराठा राज्यातील बेबनाव नष्ट करण्याची त्यांची इच्छा होती. १६ जानेवारी १७०८ रोजी छत्रपती शाहुंनी ताराराणीस पत्र पाठवून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. छत्रपती शाहू महाराजांनी वारणा नदीच्या दक्षिणेकडील तुंगभद्रा नदीपर्यंतचे सर्व किल्ले तेथील प्रदेशासह ताराराणीचे पुत्र शिवाजी दुसरा यांच्या ताब्यात देण्याचे ठरवले होते.कारण ताराराणींसोबत दीर्घकाळ संघर्ष सुरू ठेवण्याची शाहू महाराजांची इच्छा नव्हती. शाहूंचा राज्याभिषेक झाला असला तरी त्यांचा स्वराज्याचे प्रमुख म्हणून शाहू महाराजांचा प्रभाव निर्माण झालेला नव्हता. अद्यापही ताराराणींचा पक्ष योग्य आहे असे मानणारे मात्तब्बर सरदार ताराराणीच्या बाजूने होते. राजधानी सातारापासून नजीक पन्हाळा किल्ल्यावर ताराराणीच्या पक्षाचे प्रमुख केंद्र असणे धोकादायक होते. छत्रपती शाहूंचे समजुतीचे सर्व प्रयत्न निष्फळ झाल्यानंतर ताराबाईंनी सैन्याची जमवाजमव करण्यास सुरवात केल्याचे समजताच शाहू महाराजांनी अखेरीस हा प्रश्न शस्त्रास्त्राच्या सहाय्याने सोडवण्याचा निर्णय घेतला.ताराराणी राहत असलेल्या पन्हाळा किल्ल्याकडे शाहूंनी कूच केली आणि मराठ्यांच्या इतिहासामधील यादवी युद्धास सुरवात झाली. यावेळी ताराराणीच्या पक्षामधील महत्वाचे सरदार, विश्वासू सहकारी, मुत्सद्दी शाहुंच्या कैदेत होते. म्हणून ताराबाईंनी वसंतगडावर कैदेत असलेल्या रामचंद्रपंत अमात्य यांच्यासोबत तडजोडीचे धोरण स्विकारले आणि आपले राज्य आणि मुलाचे संरक्षण करावे स्वामीशी एकनिष्ठ रहावे असे आवाहन केले. रामचंद्रपंत अमात्यांना ताराराणीचे धोरण मान्य नव्हते परंतु छत्रपती शाहुंनी आपल्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश न केलेने त्यांनी ताराराणींचा पक्ष स्विकारला. यानंतर वाडीचे खेम सावंत, कान्होजी आंग्रे, पिराजी आणि बहिर्जी घोरपडे हे महत्वाचे मातब्बर सरदार ताराराणींच्या पक्षाकडे होते.

छत्रपती शाहू महाराजांनी ताराबाईंच्या पक्षाची हालचाल पाहून आक्रमक धोरण स्विकारले आणि फेब्रुवारी १७०८ मध्ये पन्हाळ्याची मोहिम काढली. यावेळी अनेक छोटे-मोठे सरदार त्यांना येवून मिळाले. मार्गामधील वसंतगड, पावनगड किल्ले हस्तगत करून पन्हाळा किल्ल्यास वेढा दिला. शाहू महाराज पन्हाळ्यास पोहोचण्यापूर्वी ताराबाईनी पन्हाळा सोडला आणि रांगणा किल्ल्यावर गेल्या. पन्हाळा आणि विशाळगड ताब्यात घेतला व कोल्हापूरला आपले ठाणे वसविले मोहीम न थांबवता मार्च १७०८ मध्ये रांगणा किल्ल्यास वेढा दिला. रांगणा किल्ला लढवण्याची तयारी ताराबाईनी करतानाच खेम सावंत व कान्होजी आंग्रे यांना मदतीस बोलावले. परंतु मोठ्या तयारीने शाहू महाराज रांगण्याच्या दिशेने येत आहेत हे पाहून रामचंद्रपंत अमात्यांच्या सल्ल्याने ताराराणीनी रांगणा किल्ल्याची जबाबदारी रामचंद्रपंत अमात्यांकडे सोपवून त्या आपल्या मुलासह सिंधुदुर्ग किल्ल्यावर आश्रयासाठी गेल्या. ताराबाईंचे सेनापती पिराजी घोरपडे, रामचंद्रपंत अमात्य, नारोपंत यांनी नेटाने रांगणा किल्ला लढवला परिणामी शाहू महाराजांना माघार घ्यावी लागली.पावसाळा सुरु होण्यापूर्वी शाहू महाराजांनी रांगणा किल्ल्याचा वेढा उठवला आणि जून १७०८ मध्ये ते पन्हाळ्याच्या दिशेने गेले. शाहू महाराजांचा हा ताराराणीविरोधी पहिला पराभव झाला. पन्हाळ्यावर असताना शाहू महाराजांना दुसरी धक्कादायक बातमी समजली कि, खानदेश मोहिमेवरून पन्हाळा येथे शाहू महाराजांच्या भेटीस येत असताना सेनापती धनाजी जाधव यांचे अल्पशा आजाराने २७ जून १७०८ रोजी

वारणा नदीच्याकाठी वडगाव येथे निधन झाले. या घटनेने शाहू महाराजांना अतीव दुखः झाले त्यांचा महत्वाचा अनुभवी व मुत्सद्दी सेनापतीस ते मुकलेने शाहू महाराजांची बाजू थोडी कमकुवत झाली.

याचवेळी नवीन बादशहा बहादूरशहा (शहाआलम) हा दक्षिणेत त्याचा बंधू कामबक्ष याचा पराभव करण्यासाठी आला होता. या मुगली राजकारणावर लक्ष ठेवण्यासाठी आणि पूर्वी तहात ठरल्याप्रमाणे बादशहास मदत करणे आवश्यक असलेने तसेच बादशहाने सफौज शाहू महाराजांकडे मदतीची मागणी केलेने रांगणा-पन्हाळा मोहिमेची सूत्रे परसोजी भोसले यांच्याकडे सोपवून शाहू महाराजांनी साताऱ्याकडे प्रयाण केले. शाहू महाराज साताऱ्यास गेल्याचे पाहून ताराराणी सिंधुदुर्गहून रांगण्याकडे आल्या. परसोजी भोसले यांचा पराभव करून पन्हाळा किल्ला ताब्यात घेतला. कोल्हापूरवर पुन्हा आपले वर्चस्व ताराराणींनी स्थापन केले आणि आपला पुत्र शिवाजी दुसराच्या नावाने राज्यकारभार करू लागल्या. अशाप्रकारे सातारा आणि पन्हाळा हि मराठ्यांच्या सत्तेची दोन केंद्रे कायमस्वरूपी निर्माण झाली.

**मुगलांचे दक्षिणेतील राजकारण :** शाहूंची सुटका केल्यानंतर आजमशहा दिल्लीचे तख्त ताब्यात घेण्यासाठी दिल्लीकडे जात असताना शहाआलम याच्या फौजेसोबत त्याचा आग्रा येथे ८ जून १७०७ रोजी आग्र्याजवळ संघर्ष झाला यात आजमशहा मारला गेला आणि शहाआलम विजयी झाला. त्याने दिल्ली ताब्यात घेवून स्वत: बहादूरशहा अशी पदवी लावली. परंतु त्याला अजून औरंगजेब बादशाहचा तिसरा मुलगा कामबक्ष याचे आव्हान होते. कामबक्ष दक्षिणेत हैदराबादजवळ होता. म्हणून बहादूरशहा त्याचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिण भारतात आला. शाहूंशी पूर्वी ठरलेल्या तोंडी करारानुसार मदत मागितली.कामबक्ष यानेही शाहूंकडे पत्र व्यवहार करून मदत मागितली. परंतु छत्रपती शाहू महाराजांनी आपला सरदार नेमाजी शिंदे यास फौजेसह बादशहा बहादूरशहाच्या मदतीस पाठवले ३ जानेवारी १७०९ रोजी कामकक्ष आणि बहादूरशहा यांच्यात हैदराबादजवळ लढाई झाली. त्यात कामबक्ष मारला गेला आता बहादूरशहास कोणीही अंतर्गत शत्रू राहिला नाही. या युद्धात नेमाजी शिंदे यांनी मुगलांची मदत केलेने बहादूरशहाचे शाहू महाराजांविषयी चांगले मत बनले. बहादूरशहा हैद्राबाद या ठिकाणी तीन महिने राहिला आणि दक्षिणेतील प्रदेशाची व्यवस्था लावली.

**दक्षिणेतील चौथाई व देशमुखीचा प्रश्न :** दक्षिणेतील व्यवस्था पाहून बहादूरशहा हैद्राबाद येथून अहमदनगर येथे मे १७०९ मध्ये आला असताना या ठिकाणी छत्रपती शाहूंच्या वतीने त्यांचे प्रतिनिधी गदाधर प्रल्हाद, रायभानजी भोसले, मदनसिंग यांनी बादशहाची भेट घेवून दक्षिणेतील सहा सुभ्यातील चौथाई आणि सरदेशमुखी च्या सनदांची मागणी केली. दक्षिणेचा जाणकार असलेल्या झुल्फिकारखानाने शाहूंना सनद देण्याविषयी सुचवले आणि बादशहाही शाहूंचा यापुढील काळात पाठिंब्यासाठी मदतीस अनुकूल झाला. परंतु याचवेळी ताराबाईच्या वकिलांनीही अहमदनगर येथे बहादूरशहाची भेट घेवून आपला मुलगा शिवाजी दुसराच्या नावाने दक्षिणेतील प्रदेशातून चौथाई आणि सरदेशमुखीची मागणी केली. यावेळी शाहूंचा पक्ष घेणारा झुल्फिकारखानाच्या विरोधी एक गट बादशाही दरबारात कार्यरत होता त्यांचा नेता आणि नवा वजीर मुनीम खान याने बादशहास सल्ला दिला कि, छत्रपती शाहू महाराज आणि महाराणी ताराराणी यांच्या गटातील संघर्षात जो पक्ष विजयी होईल त्या पक्षास बादशहाने सनदा द्याव्यात. बादशहास हा सल्ला मान्य झालेने त्याने

दोन्ही पक्षाच्या वकिलांना तसा सल्ला दिला आणि तो उत्तरेत निघून गेला. त्यामुळे दक्षिणेतील चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदांचा प्रश्न प्रलंबित राहिला. थोडक्यात मराठ्यांच्या सत्तेत दुहीचे बीजारोपण करून मराठ्यातील यादवी धुमसत राहीली आणि मराठी सत्तेचे खच्चीकरण झाले.

**पन्हाळ्यात स्वतंत्र गादीची निर्मिती:** इ.स १७०९ दरम्यान छत्रपती शाहू महाराजांचा पक्ष विविध कारणाने कमकुवत बनत गेला. धनाजी जाधव यांच्या मृत्यूने शाहूंच्या पक्षाची मोठी हानी झाली. दक्षिणेतील सहा सुभ्यातील चौथाई आणि सरदेशमुखीच्या सनदा आपणास प्राप्त होतील त्यातून आपल्या राज्यास भक्कमपणा आणता येईल अशी अपेक्षा शाहूंची होती परंतु बादशहाच्या भूमिकेमुळे तेथेही निराशा झाली. यादरम्यान शाहूंच्या पक्षाचा मातब्बर सरदार परसोजी भोसले याचे निधन झाले.मोगल दरबारात शाहूंची बाजू भक्कमपणे मांडणारे रायभान भोसले यांचाही मृत्यू झाला. तसेच मदनसिंग भोसलेस बादशहाने आपल्या सोबत उत्तरेत नेले. यावेळी ताराबाईनी कोल्हापूर प्रांतातील पन्हाळा, विशालगड किल्ले भक्कम करून आपले कोल्हापूर प्रांतात वर्चस्व निर्माण केले. शाहूंना मिळणाऱ्या सनदांना विरोध करण्यास सुरवात केली. यावेळी ताराराणीनी योजनाबद्धपणे शाहुंच्या विरोधात प्रभावी आघाडी उभारण्यास सुरवात केली.

धनाजी जाधव यांच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव यांना नोव्हेंबर १७०८ मध्ये सेनापतीपद दिले. सेनापती चंद्रसेन जाधव हे आपल्या वडिलांप्रमाणे शूर आणि कर्तबगार होते. परंतु त्यांचा ओढा ताराबाईच्या पक्षाकडे होता. आरंभी छत्रपती शाहूंच्या आज्ञेनुसार चाकण, जुन्नर, वाई हि महत्वाची ठाणी जिंकली. अनेक मोगल किल्लेदार आणि ठाणेदारांचा पराभव केला. परंतु पुढे छत्रपती शाहू महाराजांचा सेनापती चंद्रसेन जाधव यास फितवून आपल्या पक्षात ताराराणीनी घेतले. कारण एका प्रकरणात शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांची बाजू घेतलेने उघडपणे चंद्रसेन जाधव ताराराणीच्या पक्षात सामील झाले. त्यांनी शाहूंची वडगाव, शिराळा ठाणी हस्तगत केली. ताराराणी व चंद्रसेन जाधव यांनी शाहू महाराजांच्या सरदारांना फोडण्याचे आणि आपल्या बाजूस ओढण्याचे व शाहूंचा पक्ष कमकुवत करण्याचे प्रयत्न सुरू केले. यावेळी इ.स १७१० मध्ये ताराराणींनी पन्हाळा येथे शिवाजी दुसरा याच्या नावाने द्वाही फिरवून आपला मुलगा छत्रपती झाल्याचे जाहीर केले. अशाप्रकारे सातारा आणि पन्हाळा (कोल्हापूर) हि कायमची दोन सत्ता केंद्रे निर्माण झाली. दुर्दैवाने एकसंघ छत्रपती घराणे दुभंगले. ताराबाईंनी रामचंद्रपंत अमात्य, परशुरामपंत प्रतिनिधी, संताजी पांढरे, शहाजी निंबाळकर, कान्होजी आंग्रे, दमाजी थोरात यासारख्या मातब्बर सरदारांच्या मदतीने शाहू महाराजांना तिव्र विरोध सुरू केला.

**बाळाजी विश्वनाथ व चंद्रसेन जाधव यांच्यात संघर्ष :** महाराणी ताराराणींनी आपला पक्ष बळकट करण्याचे प्रयत्न सुरू केले. कोल्हापूर आणि सातारा येथून दोन सत्ता केंद्रातून परस्परविरोधी महसूलविषयक हुकुम सुटत. त्यातून मराठा सरदारांमध्ये गोंधळाची परीस्थिती निर्माण होत असे. त्यांची द्विधा मनस्थिती निर्माण झाली. जहागीरदारांनी दुर्दैवाने या संधीचा फायदा घेतला आणि स्वताचा स्वार्थ साधला. यामुळे कोणता सरदार कोणत्या पक्षात आहे किंवा कोणत्या गादीशी एकनिष्ठ आहे हे समजेना. काही सरदार या यादवीस कंटाळून मुगलांच्या छावणीत सामील झाले. यावेळी दमाजी थोरात, उदाजी चव्हाण, कृष्णराव खटावकर यासारख्या सरदारांनी बंडखोरी करून लुटमार करण्यास सुरवात केली. ताराबाईनी या सरदारांना

प्रोत्साहित करण्यास सुरवात केली. ताराबाई व या बंडखोर सरदारांशी संघर्ष करण्यात शाहू महाराजांची बरीच सैन्यशक्ती खर्ची पडत होती.

अशा बिकट परीस्थितीत शाहूंचा बाळाजी विश्वनाथ यांच्यावरील विश्वास दृढ होत गेला. मराठी मुलुखात शाहू महाराजांची सत्ता दृढ होण्यास विविध प्रकारे मदत केली. गोडी-गुलाबीने शाहुंच्या पक्षात अनेक सरदाराना वळवण्यात त्यांनी महत्वाची भूमिका पार पडली. त्यामुळे शाहूंचा विश्वास वाढत जावून ते त्यांच्या सल्ल्याने वागू लागले. परिणामी वर उल्लेख केल्याप्रमाणे चंद्रसेन जाधव, हैबतराव निंबाळकर, रावरंभा निंबाळकर, दामाजी थोरात हे सरदार शाहू महाराज यांच्यावर नाराज झाले. यावेळी बाळाजीस 'सेनाकर्ते' पद शाहुंनी दिलेने चंद्रसेन जाधव हा बाळाजी विश्वनाथचा द्वेष करू लागला.बाळाजीस संघर्ष करण्याचे त्यास निमित्य हवे होते यावेळी कराडजवळ दोघांच्या फौजा असताना शिकारीच्या किरकोळ कारणावरून चंद्रसेन जाधव यांनी बाळाजीच्या तळावर हल्ला केला. तेथून बाळाजी पळाले आणि पुरंदर किल्ल्यावर तेथून पांडव गडावर गेले. शाहू महाराजांनी त्यांची सुटका करून त्यांना आश्रय दिला. यावेळी छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांची बाजू घेतली. यावेळी चंद्रसेन जाधव यांनी शाहू महाराजांकडे बाळाजी विश्वनाथ यास ताब्यात देण्याची मागणी केली. परंतु शाहू महाराजांनी यावेळी बाळाजीची बाजू घेतली. यावेळी उघडपणे चंद्रसेन जाधव ताराबाईच्या पक्षात इ.स १७११ मध्ये सामील झाला. ताराबाईनी त्यास तात्काळ सेनापतीपद दिले. शाहूंनी आपल्या रिक्त झालेल्या पदावर चंद्रसेन जाधवांचा भाऊ संताजी जाधव यांची नियुक्ती केली. शाहू महाराजांना या बिकट परिस्थितीत बाळाजी विश्वनाथ यांची हुशारी व मुत्सद्देगिरी कामी आली. शाहू महाराज यांची सत्ता स्थिर करण्यात त्यांनी विविध प्रयत्न केले सर्व प्रकारे शाहुंच्या पक्षाकडे सरदारांना वळविण्याचा प्रयत्न केला. काही सरदारांबाबत लष्करी सामर्थ्याचा वापर केला. त्यासाठी मराठी मुलुखामधून अनेक तरुणांना लष्करात सामील करून घेतले. मोगल सरदार बनलेल्या कृष्णराव खटावकर यांच्यावर हल्ला करून त्यास ठार केले. तसेच दमाजी थोरात, उदाजी चव्हाण यांच्यावर हल्ला करून त्यांना पराभूत केले. परशुराम पंतप्रतिनिधीची सुटका करून पुन्हा प्रतिनिधी पदावर बसवले.

**पन्हाळा राज्यक्रांती : ताराराणीच्या सत्तेचा शेवट :** चंद्रसेन जाधव यास सेनापतीपद दिलेने ताराराणीच्या पक्षातील जुने मुत्सद्दी नाराज झाले. यादरम्यान ताराराणी व चंद्रसेन जाधव यांच्यातही वितुष्ट निर्माण झालेने चंद्रसेन जाधव निजाम-उल-मुल्ककडे गेले. यादरम्यान ऑगस्ट ते ऑक्टोबर १७१४ दरम्यान कोल्हापुरात राज्यक्रांती घडून आली. छत्रपती राजाराम महाराजांची दुसरी पत्नी कागलकर घाटगे घराण्यातील राजसबाई आणि त्यांचा पुत्र दुसरा संभाजी यांनी गुप्त कट करून काही महत्वाच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून कैदेतून सुटका करून घेतली. आणि ताराबाई आणि त्यांचा मुलगा दुसरा शिवाजी यांना कैद करून पन्हाळा येथे अटकेत ठेवले. राजसबाईनी आपला मुलगा दुसरा संभाजी यांचा राज्याभिषेक केला. रियासतकार सरदेसाई यांच्या मते, राजसबाई यांना रामचंद्रपंत अमात्य यांनी सहकार्य केले असावे. त्यांच्या मदतीशिवाय इतकी मोठी क्रांती घडणे शक्य नव्हते. यानंतर ताराबाईंना आपले उर्वरित आयुष्य कैदेत काढावे लागले. कोल्हापूरचे नवीन दुसरे छत्रपती संभाजी महाराजांनी शाहू महाराजांना विरोध करण्याचे धोरण पुढे चालू

ठेवले. तथापी ताराराणीप्रमाणे राजसबाई अथवा संभाजी दुसरा यांचा प्रभाव नसलेने अनेक मराठा सरदार पुन्हा शाहू महाराजांच्या पक्षास मिळू लागले. त्यामधून शाहू महाराजांचा पक्ष बळकट झाला. संभाजी महाराज दुसरे यांनी विविध प्रकारे शाहूंना विरोध सुरू ठेवला. निजाम-उल-मुल्क आणि शाहुंच्या विविध शत्रूंशी संधान साधले. पण त्यास फारसे यश आले नाही. दरम्यान छत्रपती शाहू महाराजांचे पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी इ.स १७१९ मध्ये दिल्लीच्या बादशहाकडून शाहूंच्या नावाने दक्षिणेतील प्रदेशामधून चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळविल्या. त्यामुळे वारसाहक्क युद्धात शाहूंचे वर्चस्व सिध्द झाले.

पुढे इ.स १७२९ मध्ये बाजीराव पेशवाच्या कारकिर्दीत कोल्हापूरच्या दुसरे संभाजी यांनी उदाजी चव्हाण, भगवंतराव अमात्य यांच्या मदतीने शाहूंच्या प्रदेशावर हल्ला केला. परंतु श्रीपतराव प्रतिनिधी, सेनापती शंभूसिंग जाधव यांनी वडगाव येथील युद्धात दुसरे संभाजी महाराजांचा पराभव केला. पराभूत सरदार पन्हाळा किल्ल्यावर आश्रयास गेले. अखेरीस साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज आणि कोल्हापूरचे छत्रपती दुसरे संभाजी महाराज यांची कृष्णा नदिकाठी कराड येथे भेट झाली. तेथून सातारा येथे दोन्ही छत्रपती गेले आणि तेथे दोघांमध्ये दीर्घकाळ वाटाघाटी होवून १३ एप्रिल १७३१ रोजी ऐतिहासिक वारणेचा तह घडून आला. या तहानुसार वारणा आणि कृष्णेच्या संगमापासून दक्षिणेकडील सर्व प्रदेश कोल्हापूरच्या छत्रपतींकडे राहिल. दोन्ही छत्रपतींनी आपापल्या प्रदेशात राज्यविस्तार करावा. परस्परात शत्रुत्व ठेवू नये. गरजेनुसार परस्परांना सहकार्य करावे. वारणा तहामुळे कोल्हापूर आणि सातारा अशा दोन स्वतंत्र्य छत्रपतींच्या गाद्या निर्माण झाल्या. अनेक वर्षापासून मराठ्यांच्या सत्तेत सुरु असलेले यादवी युद्ध कायमचे थांबले. पुढे रायगडऐवजी शाहू महाराजांच्या काळात साताऱ्यास राजधानीचा मान मिळाला. वारणेच्या तहानंतर राजसबाईच्या कैदेत असलेल्या ताराराणी आणि दुसरा शिवाजी यांनी साताऱ्यास शाहूकडे राहण्याची इच्छा व्यक्त केली. ज्या शाहूंना शेवटपर्यंत विरोध केला त्यांच्याकडे अखेरच्या दिवसात ताराराणीस आश्रयास जावे लागले. एकूणच यादवी युद्धात यशस्वी ठरलेल्या शाहू महाराजांनी पेशव्यांच्या मदतीने अखंड हिंदुस्तानात मराठी सत्तेचा विस्तार करताना तब्बल ४१ वर्ष राज्य केले. त्यांच्या जीवनाची अखेरची ९ वर्ष दुखदः, काळजीची गेली. शाहू महाराजांना मुलगा नव्हता त्यामुळे वारसदाराचा प्रश्न निर्माण झाला. शाहू महाराजांनी दत्तक घेण्याचा निर्णय अमान्य करून ताराबाईंच्या सल्ल्याने दुसरा शिवाजीचा मुलगा रामराजा यास छत्रपती करावे अशा नानासाहेब पेशवा यांना सूचना दिल्या. १५ नोव्हेंबर १७४९ रोजी शाहू महाराजांचे साताऱ्यातील रंगमहाल येथे निधन झाले. त्यांच्या पत्नी सकवारबाई सती गेल्या. छत्रपती शाहू महाराज यांच्यानंतर छत्रपतीपदाचे महत्व कमी होत गेले आणि पेशव्यांचा प्रभाव निर्माण झाला.

**यादवी युद्धाचे परिणाम :** शाहूंच्या सुटकेनंतर ताराराणी आणि त्यांच्यात संघर्ष झाला. या यादवी युद्धाचा मराठी सत्तेवर हानिकारक परिणाम झाला. या यादवी युद्धाचे संक्षिप्त परिणाम पुढीलप्रमाणे:

१) मुगल छावणीमधून सूटकेनंतर शाहू महाराजांचा मराठी राज्यावरील कायदेशीर हक्क व अधिकार महाराणी ताराराणी यांनी डावलला आणि त्यांच्यात संघर्ष सुरु झाला. या अंतर्गत संघर्षात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्याचा विचार, स्वतंत्र्य, सार्वभौमत्व विसरले आणि मोगलांचे चाकर होण्यास तयार झाले.

२) दोन छत्रपतीमधील संघर्षामुळे मराठेशाहीतील सरदारही आपल्या स्वार्थासाठी आणि राजकीय फायद्यासाठी आपापसात संघर्षात गुंतले परिणामी मराठेशाहीच्या ऱ्हासास तेथूनच सुरवात झाली.

३) एकसंघ असलेल्या मराठी राज्याचे दोन भागात विभाजन झालेने मराठ्यांची ताकत दुभंगली परिणामी मराठी राज्याचे अंतर्गत खच्चीकरण झाले.

४) चौथाई आणि सरदेशमुखीवरून कोल्हापूर आणि सातारा गादिमध्ये अंतर्गत संघर्ष झाल्याने या दोन सत्तेत कटुता निर्माण झाली.

५) पेशव्यांनी छत्रपती शाहूंच्या वतीने उत्तर भारतात सत्ताविस्तार केला परंतु त्यांना सतत दक्षिण भारताची चिंता राहिली. कोल्हापूरचे संभाजी दुसरा आणि निजाम-उल-मुल्क यांच्या हल्ल्याची सतत भीती राहिली. त्याचा परिणाम म्हणून उत्तर भारतात मराठ्यांची सत्ता स्थिर होवू शकली नाही.

६) दक्षिण भारतात निजाम-उल-मुल्क यांनी मराठ्यांच्या दोन सत्तेतील संघर्षाचा पुरेपूर फायदा घेतला त्याने मराठ्यांच्यात सतत दुही आणि फुट कशी राहिल यासाठी प्रयत्न करतानाच आपले राज्य दक्षिणेत स्थिर आणि बळकट केले. शेवटपर्यंत त्याने मराठी सत्तेचा विरोध केला अनेक वेळा पराभव होवूनही निजामाची सत्ता मराठे नष्ट करू शकले नाही.

७) मराठी सत्तेतील अंतर्गत दुहीमुळे मराठ्यांचे पारंपारिक शत्रू सिद्धी, पोर्तुगीज यांनी आपल्या सत्ता भक्कम केल्या.सिद्धीने तर या अंतर्गत संघर्षाचा फायदा घेवून रायगड दीर्घकाळ आपल्या ताब्यात ठेवला. मर्यादित ताकद असतानाही त्यांनी अखेरपर्यंत मराठ्यांना त्रास दिला.

**छत्रपती शाहू महाराजांचे भरीव योगदान :** मराठा राज्यात आपल्या अधिकाराचा संपूर्ण उपयोग करणारे अखेरचे छत्रपती म्हणून शाहू महाराज ओळखले जातात. शाहू महाराज न्यायप्रिय, प्रजाहितदक्ष होते. यादवी युद्धात त्यांनी आपल्या मुत्सेगिरीने आपला प्रभाव निर्माण केला. सामोपचाराने कोल्हापूरच्या छत्रपतींसोबतचा वाद कायमचा मिटवला. मराठी राज्याचे साम्राज्यात रुपांतर केले. आपल्या मर्यादा जाणून त्यांनी प्रत्येक सरदारामधील गुणांच्या विकासास प्रोत्साहन दिले. पेशवे, शिंदे, होळकर, पवार, गायकवाड, चव्हाण, आंग्रे, नागपूरचे भोसले या सरदारांमधील अंतर्गत वाद मिटवून त्यांच्या चांगल्या गुणांचा वापर मराठी सत्ता विस्तारास करून घेतलेने हिंदुस्थानच्या उत्तर आणि दक्षिण भागात मराठी सत्ता विस्तारीत झाली. सरदार, जहागीरदार आपल्या सत्तेशी एकनिष्ठ रहावेत म्हणून राजाराम महाराजांनी सुरू केलेली वतन देण्याची पद्धत शाहू महाराजांनी सुरू ठेवली. तसेच राजकीय जीवनामधील महत्वाची पदे वंशपरंपरागत देण्यास सुरवात केली.

शाहू महाराजांची राहणी अत्यंत साधी, शांत, प्रेमळ स्वभाव, मनमिळावू, क्षमाशील होता त्यामुळे मुगलांच्या सुटकेनंतर ज्यांनी आपणास तीव्र, टोकाचा विरोध केला त्या महाराणी ताराराणीना अखेरच्या दिवसात सातारा येथे आणून मातोश्रींचा दर्जा दिला. विलासी शैली असलेल्या शाहू महाराजांना हुक्का ओढण्याचा छंद होता. उत्तम घोडे, श्वान पाळण्याची त्यांना आवड होती. संत पुरुष, धार्मिक अधिकार असलेल्या व्यक्तीबाबत त्यांना आदर होता. त्यामुळे ब्रम्हेश्वर स्वामी, कचेश्वर ब्रह्मे या साधू पुरुषांविषयी

त्यांना आदर होता. आपल्या मर्यादा आणि कर्तृत्वाची पुरेपूर जाणीव असलेने मराठी सत्तेचा कारभार कार्यक्षम पेशव्यांवर सोपविला. बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव यांच्याबद्दल त्यांना आत्मीयता होती. मराठ्यांच्या स्वतंत्र्य संग्रामामुळे आणि अंतर्गत यादवीमुळे उद्ध्वस्त झालेल्या मराठी मुलखात पुन्हा शांतता, सुव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य शाहु महाराजांनी केले. मराठी सत्तेचा संपूर्ण भारतात विस्तार करण्याचे छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वप्न छत्रपती शाहुंनी पूर्ण केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे व प्रेरणेने मराठी साम्राज्याचे संपूर्ण स्वरूप बदलले. मराठ्यांच्या इतिहासात 'पुण्यश्लोक शाहू महाराज' म्हणून त्यांना ओळखतात.

- **स्वयं अध्याय प्रश्न -१**

**अ) खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) छत्रपती शाहूंची मुगलांच्या कैदेतून कोणत्या ठिकाणी सुटका झाली?

२) शाहू महाराजांनी सातारा किल्ल्यावर हल्ला केला त्यावेळी किल्ल्याचा किल्लेदार कोण होता?

३) छत्रपती शाहू महाराजांनी कोणत्या ठिकाणी आपला राज्याभिषेक केला?

४) कोल्हापुरात राज्यक्रांती होऊन कोणाची सत्ता आली.

५) ताराराणींच्या कोणत्या सेनापतींशी बाळाजी विश्वनाथ यांचा संघर्ष झाला.

ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.

१) खेडच्या लढाईत ताराराणीच्या पक्षाचा आरंभी ........ हा सेनापती होता.

अ) परसोजी भोसले ब) अमृतराव कदमबांडे

क) धनाजी जाधव ड) संताजी घोरपडे

२) शाहू महाराजांनी अष्टप्रधान मंडळ निर्माण करताना ........ यांची पेशवा पदावर नियुक्ती केली.

अ) बहिरोपंत पिंगळे ब) बाळकृष्ण हणमंते

क) नारो शंकर ड) महादजी गदाधर

३) कोल्हापूर आणि सातारा छत्रपतींमध्ये १३ एप्रिल १७३१ मध्ये ....... घडून आला.

अ) कृष्णेचा तह ब) वारणेचा तह क) नर्मदेचा तह ड) गोदावरीचा तह

४) पन्हाळा राज्यक्रांतीनंतर राजसबाई यांचा पुत्र ........ हे कोल्हापूरचे छत्रपती झाले.

अ) राजाराम दुसरा ब) शिवाजी दुसरा

क) शाहू दुसरा ड) संभाजी दुसरा

५) १५ डिसेंबर १७४९ रोजी शाहू महाराजांचा मृत्यू ........ या ठिकाणी झाला.

अ) नाशिक ब) सातारा क) पुणे ड) सांगली

## १.२.२ बाळाजी विश्वनाथ यांचे मराठा साम्राज्याप्रती योगदान

इतिहासामधील छत्रपतींचा कालखंड आणि पेशवे कालखंड हे प्रमुख दोन कालखंड आहेत. छत्रपती शाहू महाराजांच्या कालखंडात पेशव्यांचा झाला. पेशवा हे छत्रपतीच्या मंत्रिमंडळामधील महत्वाचे पद असून छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकावेळी अधिकृतपणे अष्टप्रधानमंडळात पेशवा किंवा पंतप्रधान याची नेमणूक करतानाच अष्टप्रधानमंडळाचे नेतृत्व पेशव्याकडे होते. शिवाजी महाराजांच्या काळात कोणतेही पद वंशपरंपरागत दिले नाही. परंतु शाहू महाराजांनी अष्टप्रधान मंडळामधील पदे वंशपरंपरागत एखाद्या घराण्या कडे कायमस्वरूपी दिली. परंतु शाहू महाराजांच्या काळात पेशव्याव्यतिरिक्त इतर पदे ही केवळ सल्लागार मंडळ स्वरुपात राहिल्याने पेशवा हा मराठा राज्याचा प्रत्यक्ष कार्यरत प्रमुख बनला. मोरोपंत आणि निळोपंत पिंगळे यांच्यानंतर या घराण्यात फारसे कर्तबगार आणि छत्रपतींवर छाप सोडणारे वारसा न राहिलेने पेशवे पद शाहू महाराजांनी कोकणामधील 'भट'घराण्याकडे वंशपरंपरागत दिले. या भट घराण्यातील व्यक्ती कर्तबगार निघालेने छत्रपतींचे मुख्य प्रधान म्हणून बदलत्या काळात हळूहळू सर्व राज्याची सूत्रे पेशव्यांकडे आली. छत्रपती शाहू महाराजांनी आदेश देतानाच इतर सरदारांना पेशव्यांच्या हुकुमाने कार्य करण्याचे आदेश दिले. या भट घराण्याकडे इ.स १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांना पेशवेपद प्राप्तीपासून इ.स १८१८ साली मराठेशाहीच्या ऱ्हासापर्यंत भट घराण्यातील व्यक्तीकडे पेशवेपद राहिले. या घराण्यातील पेशव्यांनी मराठी राज्याचा संपूर्ण भारतात विस्तार केला. खऱ्या अर्थाने पेशवे हे मराठी राज्याचे खरे कर्ते बनले. शाहू महाराजांनंतर छत्रपतींची सत्ता कमकुवत बनत गेलेने मराठेशाहीच्या उत्तरकाळास पेशवाई काळ असेही म्हणतात. छत्रपती शाहूंच्या सुटकेनंतर बाळाजी विश्वनाथ आणि पेशवाईचा उदय घडून आला.

**पेशवाईच्या उदयाची कारणे :**

**१) शाहू महाराज–ताराराणी यांच्यातील संघर्ष :** मुगलांच्या कैदेतून सुटकेनंतर शाहू महाराजांनी आपणास छत्रपतीपद द्यावे अशी मागणी केली परंतु ताराराणीनी शाहूंचा हक्क नाकारून मराठी राज्याचा खरा वारसदार आपला पुत्र छत्रपती शिवाजी दुसरा हा आहे असे प्रतिपादन करून शाहूंचा कायदेशीर अधिकार नाकारून त्यांना प्रखर विरोध सुरू केला. चंद्रसेन जाधव, उदाजी चव्हाण, दामाजी थोरात, कान्होजी आंग्रे, परशुराम प्रतिनिधी, रामचंद्रपंत अमात्य या प्रबळ सरदार, कारभाऱ्यांनी शाहू महाराजांच्या विरोधी कारवाया तीव्र केल्या. त्या दरम्यान धनाजी जाधव, परसोजी भोसले, रायभान भोसले यांचे निधन झालेने शाहू महाराजांची राजकीय बाजू कमकुवत झाली. यावेळी अत्यंत विश्वासू म्हणून बाळाजी विश्वनाथ यांनी समर्थ साथ देतानाच शाहूंची बाजू भक्कम करण्यासाठी सर्वप्रकारचे प्रयत्न केलेने आणि आपल्यावरील निष्ठेने बाळाजीस पेशवेपद दिले. या संधीचे सोने करतानाचा अंतर्गत आणि बाह्यसंकटावर मात केली आणि छत्रपती शाहूंचे आसन स्थिर केले. चौथाई व सरदेशमुखी सनदा शाहू महाराजांना बादशहाकडून मिळवून देण्यात बाळाजीने महत्वाचे कार्य केलेने त्यांचा बाळाजीवरील विश्वास वृद्धींगत झाला. त्यातून बाळाजी विश्वनाथ व पेशवाईचा उदय घडून आला.

**२) शाहूंपुढील अडचणींचे निवारण :** सातारा हस्तगत करून शाहू महाराज छत्रपती झाले तरी त्यांच्यापुढे अनेक अडचणी होत्या. महाराष्ट्रातील वातावरण अशांत होते. अराजकसदृश्य परीस्थिती निर्माण झाली होती. मातब्बर सरदारांच्या निष्ठा डळमळीत झाल्या होत्या. सरदारांना केवळ आपला स्वार्थ दिसत होता. खेडच्या युद्धापासून शाहूंना खंबीरपणे साथ देणाऱ्या आणि अनेक अडचणींवर चातुर्याने मात करणाऱ्या बाळाजी विश्वनाथवरील विश्वास बसलेने त्यांनी पेशवाईची सूत्रे त्यांच्याकडे दिली. त्यामुळे पेशवाईचा उदय घडून आला.

**३) मराठा सरदार, जहागीरदारांची स्वार्थी भूमिका :** शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराज, राजाराम महाराज, महाराणी ताराराणीच्या नेतृत्वाखाली २५ वर्ष बलाढ्य मुगल सत्तेशी झुंज देवून मराठ्यांनी स्वातंत्र्ययुद्ध जिंकले. भारताच्या इतिहासामधील हि एक महत्त्वपूर्ण घटना आहे. परंतु परीस्थिती नुरूप छत्रपती राजाराम महाराजांनी सुरू केलेल्या जहागीर देण्याच्या पद्धतीमुळे मराठा सरदार उत्तरोत्तर स्वार्थी बनले. यादवी युद्धामुळे तर मराठ्यांच्या राज्याची मोठी हानी घडून आली. राष्ट्रहीत पाहण्याऐवजी स्वहितास प्राधान्य दिलेने मराठी सरदार आपल्या स्वार्थानुसार छत्रपती शाहूंचा पक्ष, महाराणी ताराबाईंचा पक्ष गरजेनुसार मुगल यांच्याकडे वतन आणि आपल्या स्वार्थासाठी चाकरी करण्यास तयार झाले.या सरदारांच्या या काठावरील भूमिकेमुळे त्यांचा स्वराज्यवाढीस फायदा होत नव्हता. उलट अंतर्गत त्यांच्यातील संघर्षामुळे आपलेच नुकसान होत होते. अशावेळी प्रामाणिक, राजनिष्ठ बाळाजी विश्वनाथवर शाहूंचा प्रचंड विश्वास निर्माण झाला.

**४) छत्रपती शाहूंचा गुणग्राहक स्वभाव :** छत्रपती शाहू महाराज हे अत्यंत साधी राहणीमान असणारे, प्रेमळ, शांत, मनमिळावू, गुणग्राहक होते. त्यांनी नेहमीच आपले सेवक, सरदार, कारभाऱ्यावर विश्वास ठेवला. त्यांच्या कर्तृत्वास वाव दिला.आपल्या सरदार, सेवकांना दिलेल्या कामगिरीत शक्यतो हस्तक्षेप केला नाही. चांगले कार्य करणाऱ्या सेवकांना प्रोत्साहित केले त्यांच्या कार्याचा गौरव केला. गुणग्राहक शाहू महाराजांचा हा स्वभाव कर्तबगार बाळाजी विश्वनाथ आणि त्यांच्यानंतरच्या पेशव्यांना प्रोत्साहन देणारा ठरलेने त्यांच्या कर्तृत्वास वाव देणारा ठरला.

**५) अष्टप्रधान मंडळाचा दुबळेपणा :** छत्रपती शिवाजी महाराजांनी कार्यक्षम कारभार आणि प्रशासनात शिस्त आणण्यासाठी म्हणून अष्टप्रधान मंडळ निर्माण केले. पुढे छत्रपती संभाजी महाराजांनी 'छंदोगमात्य' पद निर्माण केले पुढे राजाराम महाराजांनी 'प्रतिनिधीपद' निर्माण केले आणि त्यांच्या काळात सेनापती, अमात्य आणि प्रतिनिधी हे प्रधान प्रभावी कार्य करणारे ठरले. त्यामुळे सामुहिक जबाबदारी असणारे अष्टप्रधान मंडळ अस्तित्वहीन बनले. पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या काळात पेशवे हेच कर्तबगार असलेने इतर प्रधानमंडळ नाममात्र राहिले.त्यामुळे बाळाजी विश्वनाथ यांच्यानंतर त्यांच्या भट घराण्यातील व्यक्तीचे महत्व वाढत गेले.

**६) दक्षिणेतील राजकारण व पेशव्यांची गरज :** छत्रपती शाहू महाराजांनी इ.स १७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ यास पेशवाईचे अधिकार दिले. त्याच वर्षी निजाम-उल-मुल्क हा दक्षिणेचा मोगलांचा सुभेदार बनल. निजाम हा अत्यंत कर्तबगार, हुशार, चाणाक्ष, महत्त्वकांक्षी होता. तो मराठ्यांना आपला कट्टर शत्रू

मानत असे. दक्षिण भारतात आपले स्वतंत्र्य राज्य निर्माण करण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. बादशहाकडून छत्रपती शाहूंना प्राप्त चौथाई आणि सरदेशमुखीच्या अधिकारास त्याने आक्षेप घेण्यास सुरवात केली. मराठ्यांच्यात निर्माण झालेल्या दुहीचा आणि दोन सत्ता केंद्रे निर्माण झाल्याने निजामाने अनेक मुत्सद्दी मराठा सरदार, उमरावांना आपल्या बाजूस करून घेतले. याचवेळी कोल्हापूरच्या छत्रपतींनी विरोधाची भुमिका कायम ठेवली. त्यामुळे निजाम व कोल्हापूरच्या छत्रपतींसमोर इतर सरदार, उमराव निष्प्रभ ठरले. केवळ पेशवे बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव यांनी त्यांचा यशस्वी सामना केला. त्यातून शाहू महाराजांचा पेशव्यांवरील विश्वास दृढ होत गेला.

**७) कर्तबगार पेशव्यांची सलग परंपरा :** भट घराण्याकडे पेशवेपद देण्यामागील महत्वाचे कारण म्हणजे या घराण्यात निर्माण झालेले एकामागोमाग एक कर्तबगार पेशव्यांची परंपरा होय. पहिले पेशवे बाळाजी विश्वनाथ, पहिला बाजीराव आणि नानासाहेब पेशवे हे कर्तबगार, हुशार, मुत्सद्दी होते. त्यांची योग्यता श्रेष्ठ होती तसेच शाहू महाराजांशी ते एकनिष्ठ होते.

**बाळाजी विश्वनाथ यांचे आरंभीक जीवन :** बाळाजी विश्वनाथ यांचे मूळ घराणे कोकणामधील श्रीवर्धन गावचे चित्पावन ब्राहमण होते. त्यांच्या घराण्याकडे श्रीवर्धन आणि वेळासे येथील सरदेशमुखी होती. या घराण्यात इ.स १६६० च्या दरम्यान बाळाजी विश्वनाथ यांचा जन्म झाला. येथून जवळच असलेल्या सिध्दीचा त्यांच्या घराण्यास त्रास सुरू झालेने विश्वनाथ भानू आपल्या कुटुंबासहित देशावर आले.त्यावेळी संभाजी महाराजांच्या हत्येनंतर मोगल-मराठा संघर्ष तीव्र झाला होता. मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले होते. या काळात महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य यांच्या नेतृत्वाखाली अनेक नवीन घराणी व कर्तबगार व्यक्तीचा उदय घडून आला होता. त्यांच्यापैकी एक बाळाजी विश्वनाथ होते. इ.स १६८९ मध्ये बाळाजी हे रामचंद्रपंत अमात्यांच्या हाताखाली पुरंदर किल्ल्याचे वसुली कारकून म्हणून काम करू लागले. या काळात त्यांचे वास्तव्य पुरंदर तालुक्यातील सासवड येथे होते. यावेळी त्यांचा धनाजी जाधव यांच्याशी संबंध आला. या धामधुमीच्या काळात धनाजी जाधव यांनी अहमदनगर पासून दौलताबाद प्रदेशाचा महसूल गोळा करण्याची जबाबदारी बाळाजी विश्वनाथ याच्याकडे दिली. त्यांनी या भागात मुगलांचा सातत्याने वावर असताना महसूल वसुलीचे काम हुशारीने पार पाडले. ते अधिकृतरीत्या धनाजी जाधव यांचे वसुली कारकून बनले. या दरम्यान मुगल सरदार, मुगल दरबारामधील अधिकारी यांच्याशी त्यांचा संबंध आला.

**पुणे व आसपासच्या प्रदेशाचे सरसुभेदार म्हणून नियुक्ती :** धनाजी जाधव यांच्याशी बाळाजी विश्वनाथ यांचे घनिष्ठ संबंध निर्माण झाले. बाळाजीची कर्तबगारी पाहून त्यांची नेमणूक पुणे, अहमदनगर प्रांतात करण्यात आली. त्यांनी इ.स १६९६ ते इ.स १७०७ दरम्यान या भागाचे सरसुभेदार म्हणून कार्य केले. यावेळी पुणे प्रांत हा मुगलांच्या हालचालींचे मुख्य केंद्र होते. औरंगजेबाचा मुख्य तळ इ.स. १७०३ ते इ.स. १७०७ दरम्यान या भागात होता. अशावेळी पुण्यावर अंमल बसवण्याचा धाडशी प्रयत्न बाळाजी विश्वनाथ यांनी केला. याकाळात कैदेत असलेल्या शाहूंशी त्यांचा संबंध आला. त्यांनी अनेक मुगल सरदारांशी स्नेहाचे संबंध निर्माण करतानाच शाहू महाराजांचे रक्षण केले. औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर इ.स १७०७ मध्ये मुगलांच्या कैदेतून सुटून आलेल्या शाहूंच्या पक्षास ते मिळाले. यानंतर शाहू महाराज आणि ताराराणी

यांच्यात संघर्ष निर्माण झाला. खेड येथे त्यांच्यात संघर्षावेळी बाळाजी विश्वनाथ आणि खंडो बल्लाळ चिटणीस यांनी सेनापती धनाजी जाधव यांना शाहू महाराजांची बाजू कशा पद्धतीने योग्य आणि न्याय्य आहे हे पटवून दिलेने शाहूंचा पक्ष बळकट झाला परिणामी खेडच्या लढाईत शाहूंच्या पक्षाचा विजय होऊन सातारापर्यंतचा प्रदेश शाहू महाराज यांच्या अधिपत्याखाली आला.

**छत्रपती शाहूंच्या पक्षाचा पुरस्कार :** खेड युद्धामधील विजयानंतर शाहूंच्या पक्षाचा आत्मविश्वास वाढला. यानंतर सातारा ताब्यात घेवून १२ जानेवारी १७०८ रोजी शाहू महाराजांनी स्वत:स राज्याभिषेक करून घेतला. या सर्व घडामोडीत बाळाजी विश्वनाथ यांचे मोठे योगदान होते. शाहू महाराजांनी अष्टप्रधान मंडळाची नेमणूक करताना आरंभी अमात्यांचा मुतालिक म्हणून बाळाजी विश्वनाथ यांची नेमणूक केली.खानदेश मोहिमेत धनाजी जाधव यांच्यासोबत त्यांना पाठवले. शाहू महाराज छत्रपती झाले तरी स्वराज्यात अनेक ठिकाणी मुगली अंमल होता. बाळाजीने पुणे, जुन्नर, चाकण, खटाव, इस्लामपूर हि ठाणी मराठी अमलाखाली आणण्यात बाळाजीने महत्वाची भूमिका पार पडली. शाहूंच्या पक्षाचा जोरदार पुरस्कार करताना कठीण काळात शाहू महाराजांना साथ दिली. यादरम्यान शाहू महाराजांनी पन्हाळा-रांगणा मोहीम काढली. यावेळी धनाजी जाधव यांचा मृत्यू झाला. धनाजी जाधव यांच्या मृत्यूनंतर छत्रपती शाहूंनी त्यांचा मुलगा चंद्रसेन जाधव यास सेनापती केले. परंतु त्यांची शाहूंवर निष्ठा नव्हती तर ताराराणीच्या पक्षाकडे त्याचा ओढा होता.

**चंद्रसेन जाधव-बाळाजी विश्वनाथ संघर्ष :** चंद्रसेन जाधव आणि बाळाजी विश्वनाथ यांचे आरंभापासून सख्य नव्हते. शाहूंचा विश्वास बाळाजीवर असलेने त्याच्या सल्ल्याने शाहू महाराज कामकाज करत असत. चंद्रसेन जाधव यांच्यावर पूर्ण विश्वास नसलेने त्यांच्यावर नियंत्रण आणि बाळाजीस योग्य पद देण्यासाठी म्हणून 'सेनाकर्ते'हे नवीन पद शाहूंनी निर्माण केले. त्यामुळे चंद्रसेन जाधव बाळाजीचा द्वोष करत होता. तसेच तो शाहू महाराजांवरही नाराज होता. चंद्रसेन जाधव याच्या समर्थनार्थ अनेक मराठा सरदार होते. तेही शाहू महाराजांवर नाराज होते आणि बाळाजी विश्वनाथ याचा द्वेष करत होते. यावेळी शाहू महाराजांच्या प्रदेशात धुमाकूळ घालणाऱ्या ताराराणीच्या पक्षातील सरदारांचा पराभव करण्यासाठी चंद्रसेन जाधव यांच्यासोबत बाळाजीस शाहुंनी पाठवले. यावेळी कराडजवळ हरणाच्या शिकारीच्या क्षुल्लक कारणावरून चंद्रसेन जाधव-बाळाजी विश्वनाथ यांच्यात संघर्ष निर्माण झाला. यावेळी बाळाजीचा पराभव झाला. त्यावेळी पराभूत बाळाजीने वाईजवळील पावनगडावर आश्रय घेतला. यावेळी शाहू महाराजांनी बाळाजीची बाजू घेवून त्यांना सातारा येथे बोलावले. त्यामुळे चंद्रसेन जाधव संतापले त्यांनी इ.स. १७११ मध्ये शाहूंचा पक्ष सोडला आणि ताराबाईच्या पक्षात सामील झाला. यानंतर शाहूंचा सरलष्कर हैबतराव निंबाळकरही ताराराणीच्या पक्षात सामील झाला. सेनापती आणि सरलष्कर शाहू महाराजांना सोडून गेलेने त्यांची लष्करी व्यवस्था पूर्णपणे कोलमडली. शाहु महाराजांकडे केवळ दोन हजारच्या आसपास फौज शिल्लक राहिली. सर्व मात्तबर सरदार, उमराव, मुत्सद्दी शाहूंविरोधी गेले. अशा बिकट प्रसंगी बाळाजी विश्वनाथ त्यांच्यासोबत होते.

**बाळाजीकडून सैन्य संघटन व व्यवस्थापन :** मनुष्यबळ आणि आर्थिकदृष्ट्याही शाहू महाराजांची बाजू कमकुवत झालेने नव्याने अनेक समस्या निर्माण झाल्या. शाहूंची बाजू भक्कम करण्यासाठी प्रबळ आणि मोठ्या संख्येने लष्कर उभारणे गरजेचे होते कारण लष्करी सामर्थ्याशिवाय बंडखोर सरदार आणि ताराराणीच्या पक्षाचा पराभव करता येणार नव्हता. शाहू महाराजांनी ही  महत्वाची जबाबदारी बाळाजी विश्वनाथ यांच्यावर सोपवली.बाळाजीने लष्कर उभारणीचे कठीण कार्य स्विकारून त्यादृष्टीने प्रयत्न सुरू केले. परंतु शाहू महाराजांची आर्थिक परिस्थितीही बिकट असलेने यावेळी बाळाजी विश्वनाथ यांनी प्रसंगी आपले मित्र पिलाजी जाधव, अंबाजीपंत पुरंदरे यांच्या मदतीने कर्ज काढून फौज उभारली आणि उत्तम लष्करी संघटन केले. अत्यल्प काळात शाहूंचे लष्करी सामर्थ्य वाढवण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. सर्व बाजूने कठीण परिस्थिती असताना बाळाजी विश्वनाथ यांनी शाहू महाराजांना खंबीर साथ दिली.

**बंडखोर सरदारांच्या बंदोबस्ताची भूमिका :** शाहू महाराजांची सत्ता स्थिर करतानाच ताराबाईंच्या प्रोत्साहनाने शाहूंच्या प्रदेशात बंड आणि लुटालूट करणाऱ्या सरदारांचा पराभव करून अंतर्गत शांतता निर्माण करण्यास बाळाजींनी प्रयत्न सुरू केले. सातारा येथे राज्याभिषेकाच्यावेळी केवळ सातारा आणि आसपासच्या पंचवीस-तीस मैलाचा प्रदेशच शाहुंच्या ताब्यात होता. त्यापुढील भागात विविध सरदारांचे वर्चस्व होते ते आपल्या मर्जीप्रमाणे कारभार करत असत. त्यामुळे या बंडखोर सरदार, उमरावांचा धोका मोठा होता. त्यामध्ये कृष्णराव खटावकर, दमाजी थोरात, कान्होजी आंग्रे, रंभाजी निंबाळकर, उदाजी चव्हाण या प्रमुख बंडखोर सरदारांचा बंदोबस्त करतानाच शाहू महाराजांचा दबदबा निर्माण केला. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे:

**कृष्णराव खटावकरचा बंदोबस्त:** सातारापासून पूर्वेस पन्नास-पंचावन्न किलोमीटर अंतरावर खटाव हे महत्वाचे ठाणे असून तेथील नामवंत सरदार कृष्णराव खटावकर हा जहागीरदार मराठ्यांच्या स्वतंत्र्ययुद्धात मुगलांना मिळाला होता. त्याने मुगल लष्कराला रसद पुरवून मुगलांची सेवा केली होती. त्यामुळे औरंगजेबाने खटावची जहागिरी त्यांना दिली होती. तेव्हापासून तो मुगलांचा जहागीरदार बनून स्वतंत्र्यपणे वागत होता. यादवी युद्धावेळी कृष्णरावाने ताराबाईंचा पक्ष घेवून छत्रपती शाहुंच्या प्रदेशात उपद्रव करण्यास सुरवात करून शाहूंच्या प्रदेशात आपला अधिकार निर्माण करण्यास सुरवात केली. दक्षिणेतील मुगलांचा सुभेदार दाऊदखान, ताराराणी, ताराराणीचा सेनापती चंद्रसेन जाधव यांची त्याला अंतर्गत फूस होती. सातारा राजधानीपासून नजिक असलेल्या खटावचा बंडखोर जहागीरदार धोकादायक असलेने खटावकरचा बंदोबस्त करण्याची आज्ञा छत्रपती शाहूंनी बाळाजीस दिली. कृष्णराव खटावकर याच्यावर बाळाजीने अचानक २ डिसेंबर १७११ रोजी हल्ला केला. या संघर्षात कृष्णराव आणि त्याचा एक मुलगा ठार झाला. त्याची दोन मुले शरण आली. क्षमाशील शाहू महाराजांनी त्यांच्या दोन मुलांना क्षमा करून त्यांचे वतन पुन्हा त्यांच्या घराण्याकडे दिले. या लढाईत परशुरामपंत प्रतिनिधी यांच्या मुलाने श्रीपतराव याने शाहूंच्या पक्षावतीने मोठा पराक्रम गाजवलेने छत्रपती शाहूंनी परशुराम यांची सुटका केली.

**दमाजी थोराताचा पाडव :** शाहूंना विरोध करणारा आणखी एक महत्वाचा सरदार दमाजी थोरात यास छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात रामचंद्रपंत अमात्य यांच्या पुढाकाराने सुपे आणि पाटस या दोन परगण्यांची सुभेदारी देवून पुण्याच्या पश्चिमेकडील प्रदेशाच्या बंदोबस्ताची जबाबदारी दिली होती. पुरंदरजवळ

हिंगणगाव येथे मजबूत गढी बांधून दमाजी थोरात राहत होता. चंद्रसेन जाधव याच्यामुळे तो ताराराणींच्या पक्षात सामील झाला आणि शाहू महाराजांच्या प्रदेशात लुटमार करण्यास सुरवात केली. कोल्हापूरमधील पन्हाळा क्रांतीनंतर तो निजामास सामील झाला आणि शाहूंच्या प्रदेशावरील हल्ले तीव्र केले. परिणामी बाळाजीने हिंगणगाव येथील गढीवर हल्ला केला त्यावेळी दमाजीने बाळाजी विश्वनाथ यांच्याशी तहाची बोलणी सुरू करून बाळाजीस अटक केली. अखेर पैशाचे आमिष दाखवून आपली सुटका करून घेतली. तरीही दमाजी आपल्या शाहूंविरोधी हालचाली थांबवत नाही हे पाहून बाळाजीने मुगलांची मदत घेवून त्यांच्याकडून तोफा घेवून हिंगणगाव गढीस मोर्चे लावून उद्वस्त केली आणि दमाजी थोरात याचा पूर्ण पराभव करून पुरंदर किल्ल्यावर त्याला अटकेत ठेवले.

**प्रमुख सरदारांचा पराभव व पाठींबा प्राप्त :** स्वराज्यामधील अनेक मुगल अंमलदार आपला प्रभाव राखून होते.त्यांना काही मराठी सरदारांचा छुपा पाठींबा होता. बाळाजीने लष्करी कारवाई करून जुन्नर, पुणे, चाकण, खटाव, इस्लामपूर हि ठाणी मराठी अमलाखाली आणण्यात महत्वाची भुमिका पार पडली. तसेच पुरंदरे, बोकील, खंडेराव दाभाडे अशा मराठा मुत्सद्दींना शाहूच्या पक्षात वळवण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे उदाजी चव्हाण, रंभाजी निंबाळकर अशा बंडखोर सरदारांचा पराभव केला. तसेच कोल्हापूरचे छत्रपती संभाजी दुसरे यांनाही नियंत्रणात आणले.

**कान्होजी आंग्रेचे संकट :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या आरमाराचा इ.स. १६९८ मध्ये राजाराम महाराजांनी विकास करताना मराठा आरमार प्रमुख म्हणून कान्होजी आंग्रेनी नेमणूक केली. तसेच त्यांचा ‘सरखेल’ हा किताब देवून गौरव केला. अल्पकाळात ताराराणीच्या पाठींब्याने आपले आरमारी आणि लष्करी सामर्थ्य त्यांनी वाढवले. त्यामुळे इंग्रज, सिध्दी यांनाही आंग्रेच्या आरमारी सामर्थ्याची दहशत वाटत होती. स्वातंत्र्ययुद्धकाळात मराठे संकटात असताना मुगलांनी सिद्धीच्या मदतीने रायगड, अंजनवेल हे किल्ले आणि प्रदेश जिंकून सिद्धीच्या ताब्यात दिले होते. हे गेलेले किल्ले व प्रदेश पुन्हा प्राप्त करून तेथे मराठी सत्ता स्थापन करणे हे प्रमुख उद्देश कान्होजीचे होते. त्यानुसार त्यांनी सिद्धीचा पराभव करून गेलेले प्रदेश व किल्ले जिंकून त्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. यामुळे कोकणामधील एक मोठी ताकत म्हणून कान्होजी आंग्रेनी दबदबा निर्माण केला. शाहू महाराज महाराष्ट्रात आल्यानंतर आरंभी त्यांना मदत करण्याची इच्छा कान्होजी आंग्रेची होती परंतु चंद्रसेन जाधव यांच्या प्रभावाने ते ताराराणीच्या पक्षास सामील झाले. कान्होजीने शाहूंचे प्रदेश जिंकून घेण्याची तयारी सुरू केली त्यानुसार तुंग, तिकोना, राजमाची, धनकड हे किल्ले जिंकून घेतले आणि साताऱ्यावर आक्रमणाची तयारी सुरू केली. छत्रपती शाहूंनी कान्होजी आंग्रेचा पराभव करण्यासाठी म्हणून आपले पेशवे बहिरोपंत पिंगळे यांना कान्होजीवर पाठवले त्यांच्यासोबत निळो बल्लाळ यांना पाठवले. लोहगडावरून मोहिमेचे नियोजन करत असताना कान्होजीने अचानक हल्ला करून बहिरोपंत आणि निळो बल्लाळ यांना कैद करून लोहगड किल्ला हस्तगत केला. जोमाने सातारा जिंकण्यासाठी तयारी करू लागले त्यामुळे शाहूंसमोर मोठे संकट निर्माण झाले यावेळी बाळाजी विश्वनाथशिवाय दुसरा सक्षम सेनानी शाहुंकडे नव्हता.

**बाळाजीस पेशवेपदाची प्राप्ती :** कान्होजी आंग्रेमुळे राजधानी सातारा संकटात आली तसेच शाहूंचा पेशवा अटकेत गेलेने अशा प्रसंगातुन बाहेर पडण्याचे कौशल्य केवळ बाळाजी विश्वनाथ यांचेकडे आहे असा महत्वाचा सल्ला परशुरामपंत प्रतिनिधी व खंडो बल्लाळ यांनी शाहूंना दिला. तसेच त्यांच्याकडे सेनाकर्तेपद असलेने लष्कराचाही विश्वास बाळाजीवर आहे हे पटवून दिले. त्यामुळे शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांच्यावर कान्होजी आंग्रेच्या बंदोबस्ताची जबाबदारी दिली आणि ती यशस्वी पार पाडल्यानंतर पेशवेपद देण्याचे निश्चित केले परंतु पेशवेपदाची ताकत आणि अधिकार अगोदर प्राप्त झाल्यास कान्होजीसोबत बरोबरीच्या नात्याने बोलणी करता येईल अशी भूमिका मांडलेने आणि शाहू महाराजांना ही भूमिका पटलेने १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पुण्याजवळील मांजरी येथे एक छोटा समारंभ भरवून बाळाजीस पेशवेपदाचे अधिकार आणि हक्क दिले तसेच पुण्याजवळील काही महालांची देशमुखीही त्याचवेळी बाळाजीस दिली. पेशवेपदाची सर्व जबाबदारी आलेने आपल्या दृष्टीने त्यांनी कामगिरी करण्यास सुरवात केली. नवीन पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी शाहू महाराजांना विनंती करून प्रतिनिधीपद परशुरामपंत यांच्याकडे व फडणीसी भानू घराण्याकडे दिली आणि कान्होजी आंग्रेवरील मोहिमेची तयारी सुरू केली.

**कान्होजींची शाहूंविषयी अनुकूल भूमिका :** मुत्सद्दी पेशवा बाळाजी यांनी चार हजार फौजेसह कान्होजीवर मोहीम नियोजित केली. कान्होजीसोबत प्रत्यक्ष युद्ध करण्यापेक्षा सामोपचाराने बोलणी करण्याचे निश्चित केले. त्यामुळे युद्धाची तयारी करत असतानाचा कान्होजीबरोबर पत्रव्यवहार सुरु केला. बाळाजीचा मुद्देसूद आणि तर्कशुद्ध मांडणीमुळे कान्होजी भेटीस तयार झाला. बाळाजी आणि कान्होजीमध्ये पूर्वीपासून स्नेह व घरोबा होता. स्वत: बाळाजींनी कान्होजीस आपण भेटीस येत असल्याचा निरोप दिला. प्रत्यक्ष भेटीस शाहू महाराजांचा मराठा सत्तेवर कसा कायदेशीर अधिकार आहे आणि कान्होजी शाहूंच्या पक्षास मिळणे कसे हितावह आहे हे बाळाजींनी पटवून दिले. याचवेळी कोल्हापुरात सत्तांतर होवून राजसबाई आणि संभाजी दुसरा यांनी सत्ता ताब्यात घेतली. तसेच शाहू महाराजांकडे आल्यास कोणते फायदे होणार हे त्यांना पटवून दिले तसेच इंग्रज, सिध्दी, पोर्तुगीज यांचा कान्होजीच्या सत्तेस असलेला धोका दाखवून छत्रपतींचा खंबीर पाठींबा गरजेचा आहे या सर्व परिस्थितीचा विचार करून बाळाजीच्या प्रस्तावास मान्यता दिली. परिणामी कान्होजी आणि बाळाजी यांची लोणावळ्याजवळ 'वळवण' येथे भेट झाली. बाळाजींनी आदराने कान्होजीस वागवले त्यांचा उचीत आदर-सत्कार केला पुढे कान्होजीच्या आमंत्रणावरून पेशवे बाळाजी कान्होजीच्या भेटीस कुलाब्यास गेले कान्होजीने कुलाबा येथे पेशव्यांचा भव्य सत्कार केला. उभयतांत सखोल बोलणी झाली.

**छत्रपती शाहू आणि कान्होजीमध्ये कुलाब्याचा तह :** पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी शाहू महाराजांच्या वतीने ८ फेब्रुवारी १७१४ रोजी कुलाब्याचा तह झाला या तहानुसार:

१) कान्होजी आंग्रे यांनी शाहू महाराजांचे स्वामित्व मान्य करावे.

२) राजमाची किल्ला सोडून घाटावरील किल्ले छत्रपतींकडे द्यावेत. तळकोकणमधील किल्ल्यांची जबाबदारी छत्रपतींनी आंग्रेकडे द्यावी. लोहगड, तुंग, तिकोना, कोरगड, धनगड किल्ले छत्रपतीकडे राहतील.

३) कान्होजी आंग्रेनी रायगड किल्ला जिंकल्यास त्याची जबाबदारी छत्रपतीकडे द्यावी.

४) थोरातांशी पेशव्यांनी अवक्रिया करू नये.

५) कान्होजीस पूर्वीपासून सुरू असलेला 'सरखेल' किताब शाहू महाराजांनी कायम ठेवला.

६) कान्होजी आंग्रे आणि शाहू महाराजांकडे कैदेत असलेले युद्धकैदी परस्परांना परत करावेत. त्यानुसार बहिरोपंत पिंगळेची मुक्तता झाली.

७) मोहिमा सुरू होण्याच्या आरंभी दसऱ्यानंतर पेशव्यांनी सरखेल यांच्याशी सल्ला-मसलत करावी इंग्रज, पोर्तुगीज, सिद्धी यांच्याशी संघर्ष करून कोकण प्रदेशामधील ठिकाणांना मुक्त करावे.

कोणताही रक्तपात, संघर्ष न होता कान्होजीसारख्या मातब्बर व सामर्थ्यशाली सरदारास मुत्सद्देगिरीने शाहूंच्या पक्षात बाळाजीनी आणले. बाळाजीमुळे शाहू महाराजांचा आत्मविश्वास वाढला आणि बाळाजीवरील विश्वासही दृढ झाला. पेशवा बाळाजींनी शाहू महाराजांना सल्ला दिला कि, कान्होजीस सरखेलपद, मानाची वस्त्रे, कट्यार, शिक्के पाठवावीत त्यानुसार पाठवण्यात आली. कान्होजीस कोकणामधील सत्ताशी संघर्ष करण्यासाठी शाहू महाराजांचा पाठींबा मिळाला. रियासतकार गो. स. सरदेसाई यांच्या मते ''इतके मोठे प्रकरण बंदुकीची एकही गोळी झाडल्याशिवाय सिद्धीस गेलेने बाळाजीची सर्वत्र छाप बसली.''

**मुगल दरबारातील राजकारण व मराठी सत्ता :** मुगल बादशहा बहादूरशाहचा इ.स. १७१२ मध्ये मृत्यू झालेनंतर त्याचा जेष्ठ मुलगा जहांदरशहा बादशहा झाला. परंतु तो अत्यंत दुबळा व अकार्यक्षम असलेने मुगली दरबारात गटा-तटाचे राजकारण सुरू झाले आणि त्यामधून शिया, सुन्नी आणि भारतीय मुस्लिमांचा गट यांच्यात बादशहास ताब्यात ठेवण्याची स्पर्धा सुरू झाली. काही काळ त्याने सत्ता उपभोगल्यानंतर इ.स १७१३ मध्ये मुगल दरबारी राजकारणामधुन सय्यद बंधूनी (सय्यद हसन अली आणि हुसेन अली) बादशहा जहांदरशहा आणि त्याचा पाठीराखा सरदार झुल्फिकारखान यांना ठार केले आणि फरुखसियर यास सय्यद बंधूनी नवा बादशहा केले. दिल्ली दरबारात सय्यद बंधूचे वर्चस्व वाढत गेले नवीन बादशहा फरुखसियरने सय्यद बंधूमधील जेष्ठ सय्यद हसन अली यास वजीर आणि धाकटे बंधू सय्यद हुसेन अली यास सेनापती केले.

मराठ्यांचा बादशाही दरबारामधील राजकारणात प्रवेश होण्यास सय्यद बंधू कारणीभूत होते. यावेळी दक्षिणेतील निजाम-उल-मुल्क हा मराठ्यांचा शत्रू होता. मराठ्यांतील यादवीचा फायदा घेवून अनेक मराठा सरदारांना शाहूंच्या विरोधी फितवले. परंतु निजाम फार काळ दक्षिणेत सुभेदार राहिला नाही. मुगली दरबारामधील फरुखसियर आणि सय्यद बंधू यांच्यात वितुष्ट आलेने सय्यद हुसेन अलीस दक्षिणेत सुभेदार म्हणून पाठवले. बादशाहने मराठ्यांना अंतस्थ पत्रे पाठवून सय्यद हुसेन अलीचा परस्पर काटा काढण्यास सांगितले. हुसेन अलीही आरंभी मराठ्यांचा विरोधक होता परंतु दक्षिण भारतात आल्यानंतर त्यास मराठ्यांच्या वाढत्या ताकतीची कल्पना आली तसेच बादशहा आपणास संपवण्याचा प्रयत्न करत आहे याची जाणीव झाली. त्यामुळे सय्यद हुसेन अलींनी मराठ्यांशी सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. हुसेन अलीने बादशहा विरोधी मदत घेण्याचा विचार करून त्यांच्याशी तहाची बोलणी सुरू केली. मराठ्यांनाही

बादशहाशी सलोख्याचे संबंध हवे होते त्यानुसार हुसेन अलीने शंकराजी मल्हार यांच्या मदतीने इ.स. १७१८ मध्ये शाहू महाराजांशी तह केला. या तहास मुगल बादशहाची मान्यता मिळवून देण्याचे आश्वासन दिले.हा तह घडवून आणण्यात शंकराजी मल्हार याचा मोठा वाटा होता. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात तो काशीहून दिल्लीस गेला होता आणि हुसेन अलीसोबत दक्षिणेत आला होता. त्यांचे हुसेन अलीच्या वतीने शाहूंशी वाटाघाटी करून तहास अंतिम स्वरूप दिले.

**हुसेन अली व शाहू महाराज यांच्यातील करार :** हुसेन अली व शाहू महाराज यांच्यातील करारामधील अटी :

१) छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सर्व प्रदेश किल्ल्यांसहीत छत्रपती शाहू महाराजांना मिळावे.

२) मराठा सरदारांनी नव्याने जिंकलेले खानदेश, विदर्भ, गोंडवन, हैदराबाद, गोंडवन आणि कर्नाटकातील मुलुख स्वराज्यात सामील करण्यात यावेत.

३) दक्षिणेतील सहा सुभ्यातून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार शाहूंना मिळाले

४) चौथाई व सरदेशमुखी अधिकाराच्या बदल्यात १५००० फौज मुगलांच्या मदतीस ठेवावी आणि दक्षिणेतील प्रदेशाचा बंदोबस्त ठेवावा.

५) मराठ्यांनी बादशहास दरवर्षी दहा लाख रुपये खंडणी द्यावी.

६) शाहू महाराजांनी कोल्हापूरच्या संभाजीस उपद्रव देवू नये.

७) बादशहाने शाहू महाराजांच्या मातोश्री येसूबाई, त्यांची पत्नी आणि इतर राजकैद्यांची सुटका करावी.

**बाळाजी विश्वनाथची दिल्ली स्वारी :** छत्रपती शाहू महाराज आणि हुसेन अली यांच्यातील करारास बादशहा फरुखसियरने मान्यता दिली नाही. बादशहाने सय्यद बंधू विरोधी लढण्याची तयारी सुरू केली. त्यासाठी मुरादाबादहून निजाम, पाटण्याहून सरबुलंदखान, गुजरातमधून अजितसिंग या सरदारांना दिल्लीत मदतीस बोलावले. बादशाही फौजा दिल्लीत एक होण्यास सुरवात झाली. सय्यद हसन अलीने आपली सर्व फौज एकत्र करून आपल्या मदतीस दक्षिणेतून हुसेन अलीस बोलावून घेतले यावेळी करारात ठरल्याप्रमाणे सय्यद बंधूस मदत करण्यासाठी स्वत: पेशवा बाळाजी विश्वनाथ नोव्हेंबर १७१८ मध्ये १५,००० फौज घेवून हुसेन अली सोबत दिल्लीस निघाले. बाळाजी सोबत त्यांचा मुलगा बाजीराव, खंडेराव दाभाडे, संताजी आणि राणोजी भोसले, संताजी जाधव, केरोजी, आनंदराव व तुकोजी पवार, पिलाजी जाधव, शेख मिरा, शंकराजी मल्हार, बाळाजी फडणीस, नारो शंकर, चिमणाजी दामोदर, महादेव हिंगणे, बाजी कदम, अंबाजी पुरंदरे असे मातब्बर सरदार होते. मराठा लष्करास खर्चासाठी म्हणून बादशाही तिजोरीतून एक रुपया मिळत असे. बाळाजी काटकसरीने खर्च करून त्यामधील काही रक्कम शिल्लक ठेवत असे. मराठ्यांची व सय्यद बंधूची मोठी फौज दिल्लीच्या दिशेने येत आहे हे पाहून निजाम, सरबुलंदखान, अजितसिंग हे सय्यद बंधूना येवून मिळाले परिस्थिती पाहून बादशहा फरुखसियरने मराठ्यांसोबत झालेल्या करारास मान्यता दिली आणि मराठ्यांनी दिल्ली सोडावी असे सांगितले परंतु येसूबाईची सुटका आणि लिखित सनदा घेतल्याशिवाय बाळाजी

विश्वनाथ यांनी नकार दिला. सय्यद बंधू आणि बादशहा फरुखसियर यांच्यातील वाद विकोपास गेला. यावेळी मुगल विरुद्ध मराठा यांच्यात संघर्ष विकोपास गेला दोन हजार मराठे या युद्धात मारले गेले बादशाहचीही मोठी हानी झाली. बादशहास सय्यद बंधूनी कैद केले आणि नवा बादशहा म्हणून रफिउद्दिन यास घोषित केले. तहात ठरल्याप्रमाणे चौथाई, सरदेशमुखी आणि स्वराज्य अशा तीन सनदा प्राप्त झाल्या. सय्यद बंधूनी बादशहाच्या १३ मार्च १७१९ रोजी चौथाईची सनद व २५ मार्च १७१९ रोजी सरदेशमुखीची सनद दिली तसेच राजमाता येसूबाई आणि इतर राजपरिवारास मुक्त केले. मार्च १७१९ मध्ये बाळाजीनी आपल्या फौज व राजपरिवारासह दिल्ली सोडली आणि दक्षिणेस येण्यास निघाले. ४ जुलै १७१९ रोजी ते साताऱ्यात पोहोचले. शाहू महाराजांनी पेशवा बाळाजी विश्वनाथाचे मोठे स्वागत केले. त्यास पाच महालांचे सरदेशमुखीचे वतन बक्षीस म्हणून दिले. शाहू महाराज आणि राजमाता येसूबाई यांची बारा वर्षानंतर भेट झाली. बाळाजीची ही दिल्ली मोहीम प्रचंड यशस्वी ठरली दक्षिणेतील सनदा, येसूबाई तसेच तीस लाख रुपये पेशवा बाळाजीने बादशहाकडून प्राप्त करून छत्रपती शाहू महाराजांच्या खजिन्यात दिलेने मराठ्यांची आर्थिक बाजू भक्कम झाली. मराठ्यांचे अधिकृत छत्रपती म्हणून शाहू महाराजांना मान्यता मिळाली. मराठ्यांच्या इतिहासात बाळाजीच्या दिल्ली स्वारीस मोठे महत्व आहे. भविष्यातील मराठ्यांच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाले तसेच दिल्लीच्या बादशाहीचे कमकुवत स्वरूप समजले. मराठ्यांना आपल्या सामर्थ्यांची जाणीव होवून यापुढे आक्रमक पवित्रा मराठ्यांनी स्विकारला. दिल्ली व बादशाहीविषयीची अकारण भीती नष्ट झाली. प्रचंड मोठा लाभ झाला. प्रदीर्घ काळानंतर येसूबाईची सुटका झाली. एकूणच मराठ्यांचा संपूर्ण हिंदुस्तानात दरारा वाढला.

**सनदाचे महत्व:** बाळाजीने बादशहाकडून प्राप्त केलेल्या सनदांमुळे छत्रपती शाहूंना शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा कायदेशीर हक्क आणि अधिकार मिळाला. दक्षिणेतील मुगलांच्या प्रदेशामधून चौथाई व सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार प्राप्त झाले. यामुळे छत्रपती शाहू महाराज सनदशील राज्यकर्ते बनले. मुगलांच्या दृष्टीने कोल्हापूरचे संभाजी आणि साताऱ्याचे शाहू महाराज यांच्यात शाहू महाराज हेच स्वराज्याचे वारसदार आहेत हे सिद्ध झाले. चौथाई व सरदेशमुखीमुळे मराठ्यांच्या उत्पन्नात मोठी भर पडली. परंतु काही इतिहासकारांच्या मते यामुळे शाहू महाराज मुगलांचे मांडलिक बनले. त्यामुळे निजामाने शाहू महाराजांना स्वतंत्र्य राज्यकर्ता म्हणून मान्यता दिली नाही. त्यांनी स्वतंत्र राज्यकर्ता म्हणून स्वत:ची नाणीही पाडली नाहीत. शिवाय मराठा सरदार व पेशव्यांना कायम ''दिल्लीची पातशाही रक्षून राज्यविस्तार साधावा'' असा आदेश दिला होता. मराठ्यांच्या उपलब्ध लष्करी सामर्थ्याच्या जोरावर मुगलांशी खुला संघर्ष करणे अशक्य आहे याची जाणीव बाळाजी व शाहू महाराज यांना होती. चौथाई व सरदेशमुखीच्या सनदांमुळे दक्षिण भारतामधील पस्तीस टक्के वसुली करण्याचा अधिकार मराठ्यांना मिळाला. मुगली प्रदेशात विनाअडथळा फिरणे मराठ्यांना शक्य झाले.एकाद्या सुभेदाराने कर देण्यास नकार दिल्यास त्याच्यावर हल्ला करून कर वसुलीचे अधिकार मिळाले. परंतु नाममात्र मुगलांचे स्वामित्व झुगारून देण्याचा अखेरपर्यंत मराठ्यांनी प्रयत्न केला नाही.

**मराठा राज्यमंडळ स्थापनेची पार्श्वभूमी :** स्वराज संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्यानंतर संभाजी महाराजांनी मुगलांशी तीव्र संघर्ष केला. परंतु दुर्दैवाने संभाजी महाराज पकडले गेले आणि त्यांना हौतात्म्य पत्करावे लागले त्यानंतर बिकट परिस्थितीत राजाराम महाराज छत्रपती झाले. बाल शाहू व महाराणी येसूबाई मुगलांचे कैदी बनले. परंतु कोणत्याही परिस्थितीत मोगलांपुढे शरणागती पत्करायची नाही या निर्धाराने येसूबाई, राजाराम महाराज आणि मराठा मुत्सद्दी मंडळीनी संघर्ष केला. दक्षिणेतील दूरच्या जिंजीच्या प्रदेशात राजाराम महाराजांनी स्वराज्याचा कारभार पुन्हा नव्याने सुरू केला. मुगलांना दूरवर प्रदेशात आक्रमण करणे व कारवाई करणे अशक्य झाले. महाराष्ट्रात रामचंद्रपंत अमात्य यांच्या नेतृत्वाखाली मराठे सरदार औरंगजेबा विरोधी लढत होते. लष्करी मोहिमा, लष्करउभारणी यासाठी मोठा खर्च येत होता. त्यावेळी औरंगजेबाने मराठा सरदारांमध्ये फुट पाडण्यासाठी त्यांना जहागिरी देण्याचे आमिष दाखवले त्यास दुर्दैवाने काही सरदार जहागिरीच्या आमिषापोटी सामिल झाले. अशा बदललेल्या राजकीय परिस्थितीत छत्रपती राजाराम महाराज व मराठा मुत्सद्दी मंडळीनी स्वराज रक्षण व मुगलांचे आक्रमण थोपवून ठेवण्यासाठी मराठा सरदारांना जहागीर देण्यास मान्यता देण्यात आली. त्यामध्ये घोरपडे यांना कर्नाटकात वऱ्हाड प्रांत व नागपूरची जबाबदारी भोसलेंवर, बागलाणचा भाग सरलष्कर निंबाळकर, गुजरातचा भाग सेनापती दाभाडेंकडे जबाबदारी देण्यात आली. अशा प्रकारे ज्या त्या भागाची जबाबदारी सामर्थ्यवान सरदारांकडे देवून त्या भागातून मुगलांना हुसकावून लावणे, तो प्रदेश हस्तगत करून तेथे आपली ठाणी निर्माण केली. वतन वाचवण्यासाठी मराठा सरदारांनी आपणास दिलेला प्रदेश, जहागिरी प्राणपणाने लढवल्या आणि आपली भक्कम ठाणी निर्माण केली.छत्रपती राजाराम महाराजांचे वतन विषयक धोरण स्वराज्य रक्षणासाठी उपयोगी ठरले. राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईंनी हे धोरण पुढे चालू ठेवले. जहागीरदार प्रबळ झाले आणि मुगलांच्या दूरवरच्या प्रदेशावर हल्ले करू लागले. या परिस्थितीत औरंगजेबाच्या मृत्यूनंतर शाहू महाराजांची मुगल कैदेतून सुटका झाली आणि ताराराणी व शाहू महाराज यांच्या यादवी युद्ध सुरू झाले याचा फायदा मराठा जहागिरदारांनी घेवून आपले लष्करी सामर्थ्य वाढवले. परिणामी ताराराणी व शाहू महाराज यांना जहागिरदारांच्या लष्करावर अवलंबून रहावे लागले.

**मराठा राजमंडळाची स्थापना व विस्तार :** छत्रपती शाहू महाराजांनी राज्याभिषेकानंतर अष्टप्रधान मंडळ निर्माण केले परंतु बदलत्या परिस्थितीत या मंडळाचे महत्व कमी होत जावून हे मंडळ केवळ नामधारी बनले. कालानुरूप जहागिरी पद्धत बंद करणे धोक्याचे ठरले असते कदाचित शाहू महाराजांच्या आसनासही धोका निर्माण झाला असता त्यामुळे शाहू महाराज व बाळाजी विश्वनाथ यांनी जहागिरीस अनुकूल प्रशासन निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले. नव्याने उदयास आलेल्या ताज्या दमाच्या सरदारांना त्यांच्या पराक्रमासाठी आणि नवे कर्तृत्व दाखवण्यासाठी नवीन क्षेत्र आवश्यक वाटू लागले या सरदारांमधील स्वतंत्र्य वृत्तीची जोपासना करणे आवश्यक होते आणि त्यामधून मराठी राजसत्तेचा सर्वदूर विस्तार करण्यासाठी योग्य आणि कालानुरूप मार्ग काढण्यासाठी मराठा राजमंडळ वा संयुक्त राज्यसंघाची निर्मिती पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी केली. मराठा सरदारांना त्यांच्याकडे असलेली जहागीरीतून लष्करी खर्च भागवणे, जहागिरीच्या कायमस्वरूपी व्यवस्थापनेस कायमस्वरूपी जहागिरी/सरंजाम देण्याची पद्धत बाळाजींनी सुरू केली. सर्वांनी आपापला

सरंजाम सांभाळून मराठा राज्याचे कार्य करावे अशी यामागील भूमिका होती. परस्पराच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप न करता परस्पर सहकार्य व समन्वयाने कार्य करावे हा मुख्य उद्देश मराठा राजमंडळाचा होता. या प्रदेशामधील महसूल वसुली, संरक्षण, शांतता, सुव्यवस्था ही जबाबदारी संबधित जहागीरदाराची होती यानुसार स्वत: पेशवा बाळाजी विश्वनाथकडे खानदेश व बालाघाटची जबाबदारी,सेनापती दाभाडेकडे गुजरात व बागलाण, सेनासाहेब सुभा भोसलेकडे वऱ्हाड, नागपूर, गोंडवन प्रदेश, निंबाळकर यांच्याकडे गंगथडी व औरंगाबाद, प्रतिनिधीकडे वारणा आणि निरादरम्यानचा प्रदेश आणि बिदर, कान्होजी आंग्रेकडे कोकण किनारपट्टी, फत्तेसिंग भोसलेंकडे कर्नाटकचा भाग व अक्कलकोट, सचिव नारो शंकर पुणे व भोरचा प्रदेश, घोरपडे यांच्याकडे कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील भाग अशी प्रदेशानुसार जबाबदारीचे वाटप केले होते.

जवळपास पंचवीस वर्षाच्या स्वातंत्र्ययुद्धानंतर निर्माण झालेल्या परिस्थितीवर मात करण्यासाठी पेशवा बाळाजींनी निर्माण केलेली उत्कृष्ठ व्यवस्था होती. भविष्यात मराठा राजसत्तेचा मोठ्या प्रमाणात विस्तार होण्यास ही व्यवस्था महत्वाची ठरली. आरंभी स्वदेश, स्वराज्य, स्वधर्म, स्वामीनिष्ठा आणि निस्वार्थी वृत्ती या सरदारांजवळ होती तोपर्यंत मराठा राजमंडळाने असामान्य कामगिरी केली. मराठी राजसत्तेचा विस्तार संपूर्ण भारतात झाला. यावेळी काही अलिखित बाबी ठरवण्यात आल्या. त्यामध्ये सर्व मराठा सरदारांनी ऐक्याने रहावे, सर्वांनी छत्रपतींशी एकनिष्ठ रहावे, मराठ्यांची सत्ता वृद्धींगत करावी, छत्रपतीनी वेळोवेळी दिलेल्या आज्ञा पाळाव्यात, जहागीदारांनी जहागिरीचा हिशेब काटेकोर पाळावा. त्या महसुलाची विभागणी करताना ६६% भाग लष्कराचा खर्च व इतर खर्चासाठी जहागीरदारांनी स्वत: कडे ठेवावा आणि ३४% रक्कम छत्रपतीना द्यावी. परस्परांच्या जहागिरीत हस्तक्षेप करू नये.

शाहू महाराजांनी राजाराम महाराज, ताराराणींच्या काळातील वतने, जहागिरी कायम ठेवल्या. तसेच पराक्रमानुसार नवीन सरदारांना नव्याने जहागिरी दिल्या. नंतर पेशवे प्रबळ झाल्यानंतर त्यांच्या सल्याने छत्रपतींनी काही नवीन सरदारांना नव्या जहागिरी दिल्या. त्यामध्ये गायकवाड यांना बडोदा, होळकर यांना इंदोर, शिंदेना ग्वाल्हेर, पवार यांना धार व देवास या जहागिरी नव्याने देण्यात आल्या. या सर्व सरदारांनी मिळून मराठा राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले. परंतु जोपर्यंत केंद्र सत्ता म्हणजे पेशवा आणि छत्रपती सामर्थ्य शाली होते तोपर्यंत एकसंधपणे या सरदारांनी राज्याचा विस्तार केला. परंतु मध्यवर्ती सत्ता दुर्बल झाल्यानंतर त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण राहिले नाही अनेक सरदार शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती नामधारी बनलेने सरदारनिरंकुश बनले पेशवे व मराठा सरदारांमध्ये संघर्ष होण्यास सुरवात झाली. काही वेळेस परस्परां विरोधीही लढू लागले. त्यामुळे मराठा सरदारांमधील एकी नष्ट होवून मराठी सत्तेच्या ऱ्हासास सुरवात झाली.

**बाळाजीकडून आर्थिक बाबीची पुनरर्चना :** मुगलांकडून प्राप्त दक्षिणेतील प्रदेशाच्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदांमुळे मराठ्यांच्या उत्पन्नात मोठी वाढ घडून आली. याशिवाय स्वराज्यातील प्रदेशातून मिळणारा महसूल हे उत्पन्नाचे साधन होते. सरदेशमुखीद्वारे प्राप्त वतन छत्रपतींच्या खर्चासाठी वापरले जात होते. बाळाजीने मराठा राज्याचे आर्थिक व्यवस्थापन करतानाच स्वराज्याचे २५% उत्पन्न 'राजबाबत'म्हणून राज्याच्या खर्चास दिले जात.याशिवाय 'साहोत्रा' म्हणजे महसूल वसुलाच्या ६% व 'नाडगौड'म्हणजे महसुलाच्या ३% छत्रपतींनी आपल्या मर्जीने कोणासही द्यावेत. उरलेल्या 'मोकासा' म्हणजे ६६% रकमेची

वाटणी विविध सरदारांमध्ये करण्यात आली होती. वर नमूद केल्यानुसार सरदारांना प्रदेश वाटून दिला होता. शाहू महाराज आणि कार्यक्षम पेशवा असेपर्यंत या सर्व सरदारांवर नियंत्रण होते परंतु जेव्हा छत्रपतीची सत्ता कमकुवत झाल्यानंतर आपल्या सरदारांवर अवलंबून रहाण्याची वेळ छत्रपतींवर आली. मराठा सत्तेच्या उत्तर काळात ही परिस्थिती निर्माण झाली तरी मराठा सत्तेच्या आर्थिक नियोजन आणि व्यवस्थेच्या दृष्टीने पेशवा बाळाजी विश्वनाथ यानी केलेली आर्थिक योजना उत्तम होती. महसूल वसुलीबरोबरच साम्राज्याच्या आर्थिक भक्कमपणा साठी हि योजना उपयोगी ठरली.

**कोल्हापूरच्या छ. संभाजीवरील स्वारी व बाळाजीचे निधन:** बाळाजी दिल्लीकडे गेले असताना कोल्हापूरच्या संभाजी महाराजांनी शाहू महाराजांविरोधी कारवाई सुरू केली. त्यामुळे स्वत: शाहू महाराजांनी संभाजीविरोधी मोहीम सुरू केली. बाळाजी सनदा घेवून दिल्लीहून परत आल्यावर शाहू महाराजांनी त्यास संभाजी यांचा बंदोबस्त करण्यासाठी पाठवले. इ.स १७१९ मध्ये कोल्हापूरला बाळाजीने वेढा घातला.मार्च १७२० पर्यंत ही मोहीम चालू राहिली. वारणा किनाऱ्यावरील वडगाव या ठिकाणी पेशवा बाळाजी यांनी संभाजी महाराजांचा पराभव केला. याचवेळी बाळाजी आजारी पडले म्हणून सासवडला परत आले आणि सासवड येथेच २ एप्रिल १७२० रोजी पेशवा बाळाजी विश्वनाथ याचे निधन झाले.

**बाळाजी विश्वनाथ यांच्या कार्याचे मूल्यमापन :** बाळाजी विश्वनाथ यांच्या पेशवेपदाच्या प्राप्तीनंतर मराठ्यांच्या इतिहासात नवीन कालखंडास सुरवात झाली. बचावात्मक असलेले मराठ्यांचे राजकारण हे आक्रमक झाले. केवळ मराठी मुलुखापुरता विचार करण्याऐवजी संपूर्ण हिंदुस्तान कार्यक्षेत्र बनले आणि मराठा राज्याचे साम्राज्यात रुपांतर होण्याच्या प्रक्रियेस आरंभ झाला याचे श्रेय पेशवा बाळाजीस दिले जाते. बाळाजी विश्वनाथ यांनी मराठ्यांच्या इतिहासात केलेला पराक्रम, कार्य अनन्यसाधारण आहे. बाळाजी विश्वनाथ हे स्वयंभू नेतृत्व होते. राज्याचा एक वसुली कारकून ते पेशवा ही त्यांची वाटचाल त्यांच्या अंगभूत गुणामुळे महत्वाची ठरली. एक बुद्धिमान, स्वामीभक्त, शहाणपण, कर्तृत्व, मुत्सद्देगिरी, प्रामाणिकपणा, कष्टाळू वृत्ती, पराक्रम, दूरदृष्टी असलेले ते व्यक्तिमत्व होते. एकाच वेळी कसलेले राजनीतीज्ञ आणि पराक्रमी सेनापती होते. राजनीतीचे धडे रामचंद्रपंत अमात्याकडून तर लष्करी मार्गदर्शन सेनापती धनाजी जाधव यांच्याकडून घेतले होते. विरोधकांशी गोडी-गुलाबीने संवाद साधून आपले साध्य साधण्याची विलक्षण हातोटी त्यांच्याकडे होती.

शाहू महाराजांनी अष्टप्रधान मंडळाचे पुनर्जीवन करण्याचा प्रयत्न केला परंतु मराठा राज्यसंघ ही बदलत्या काळानुसार व्यवस्था बाळाजीने केली आणि नंतर छत्रपती शाहूंनी त्यास मान्यता दिली. अष्टप्रधान मंडळ केवळ सल्लागार पुरते मर्यादित राहून छत्रपतीच्या वतीने संपूर्ण कारभाराची प्रत्यक्ष जबाबदारी पेशव्यांवर आली. सरदार, सरंजामदार कपटनितीचे राजकारण करत असताना आणि विश्वसनीयतेचा अभाव असताना शाहू महाराज यांच्या प्रती निष्ठा व्यक्त करून मराठा राज्यास वैभवाचे दिवस दाखवले अत्यंत कठीण काळात शाहू महाराजांच्या पक्षाची सर्व जबाबदारी घेतली.

बाळाजींनी मुगलांशी करार करून शिवाजी महाराजांचे स्वराज्य पुन्हा प्राप्त केले. दिल्लीहून आणलेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणि मराठा राज्यामंडळाची स्थापना व विस्तार याचे श्रेय बाळाजीस द्यावे लागेल तसेच सतत पंचवीस वर्षे मुगलांशी चाललेल्या स्वातंत्र्ययुद्धामुळे संपूर्ण प्रदेश उधवस्त झाला होता हा प्रदेश पुन्हा संपन्न करण्याचे श्रेय बाळाजीस जाते. बाळाजीचे सहकार्य नसते तर शाहू महाराजांना यादवी युद्धात आपली बाजू सरस करता आली नसती. त्यांची बाजू भक्कम करतानाच ताराराणीच्या पक्षाचे सेनापती धनाजी जाधव आणि मात्तबर कान्होजी आंग्रे यांना छत्रपती शाहू महाराजांच्या पक्षाकडे वळवले तसेच दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर अशा बंडखोर सरदारांना पराभूत केले. दिल्लीचे राजकारण करतानाचा मुगल सुभेदार हुसेन अलीशी करार केला आणि स्वकीय आणि मुगलांवर दबाव आणला अनेक मराठा सामर्थ्यवान सरदारांना एकत्र करून प्रचंड फौजेसह दिल्लीची मोहीम आखली आणि यशस्वी केली. चौथाई व देशमुखीच्या लिखित सनदा प्राप्त करतानाच शाहू महाराजांचा खजिना संपन्न केला. तसेच जवळपास ३० वर्षे मोगलांच्या कैदेत असलेल्या राजमाता येसूबाई आणि राजपरिवाराची सुटका केली. दिल्ली मोहिमेमुळे मुगली सत्तेची भीती नष्ट होवून मराठ्यांचा आत्मविश्वास वाढला. जहागिरी पद्धतीत फारसा बदल न करता मराठा राज्य मंडळाचा पाया घातला. परंतु जहागिरी प्रथेस बाळाजीनी प्रोत्साहन दिल्याची टिका केली जाते परंतु छत्रपती राजाराम महाराजांच्या काळापासून मराठ्यांच्यात सुरू झालेली वतन प्रथा काळानुसार बाळाजींनी कायम ठेवली कारण खुद्द छत्रपती व पेशव्यांचे स्थान अस्थिर असताना शिवकालीन व्यवस्था सुरू करणे अशक्य होते. मराठा सरदारांचे जहागिरीवरील प्रेम पाहूनच मराठा राजमंडळाची स्थापना बाळाजींनी केली. महसुली कार्यात निष्णात असलेल्या बाळाजीने साम्राज्याचे उत्पन्न वाढवण्यास जाणीवपूर्वक प्रयत्न केले. ६६% रक्कम 'मोकासा'द्वारे सरदारांमध्ये वाटून दिली. वसुली व्यवस्था ठरवून त्याची कार्यक्षम अंमलबजावणी करतानाच निर्धन मराठा राज्यास सधन केले.

अनेक इतिहासकारांनी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांच्या कार्याचा गौरव केला आहे. प्रत्यक्ष छत्रपती शाहू महाराजांनी 'एक अतुल पराक्रमी सेवक' असा बाळाजीचा गौरव केला आहे. मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर करण्यास आरंभ करणारा व नवे पर्व सुरू करणारा महान मुत्सद्दी आणि सेनानी म्हणून पेशवा बाळाजी विश्वनाथ मराठ्यांच्या इतिहासात महत्वाचा ठरला.

- **स्वयं अध्याय प्रश्न –२**

**अ) खालील प्रश्नाची एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) बाळाजी विश्वनाथ यांचे मुळ भट घराणे कोणत्या भागामधील होते?

२) बाळाजी विश्वनाथ यांनी कोणत्या बंडखोर सरदारांचा बंदोबस्त केला?

३) ८ फेब्रुवारी १७१४ रोजी कुलाब्याचा तह कोणामध्ये घडून आला?

४) मराठा राज्यमंडळाचा संस्थापक कोणास मानतात?

५) बाळाजी विश्वनाथ यांचा मृत्यू कोठे झाला?

**ब) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१) बाळाजी विश्वनाथ ..... यांच्याकडे वसुली कारकून म्हणून आरंभी कार्यरत होते.

अ) दमाजी थोरात ब) धनाजी जाधव क) तुकोजी भोसले ड) खंडो बल्लाळ

२) सय्यद बंधूपैकी ......... यांच्याशी बाळाजी विश्वनाथ यांनी इ.स १७१८ मध्ये तह केला.

अ) हसन अली ब) हुसेन अली क) अमीन अली ड) मीर अली

३) चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा .......... यांच्यासाठी बाळाजी विश्वनाथ यांनी प्राप्त केल्या.

अ) छत्रपती संभाजी दुसरा ब) छत्रपती राजाराम

क) छत्रपती शहाजी ड) छत्रपती शाहू

४) मराठा राजमंडळाच्या स्थापनेनंतर ......... प्रथा नव्याने प्रस्थापित झाली.

अ) वतन ब) महसूल क) दान ड) व्यवस्थापन

५) बाळाजी विश्वनाथ यांची ............ वरील मोहीम अखेरची ठरली.

अ) रंभाजी निंबाळकर ब) निजाम उल-मुल्क

क) संभाजी दुसरे ड) सय्यद बंधू

## १.३ सारांश

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध संपले. या घटनेनंतर हिंदुस्थानच्या इतिहासास वेगळे वळण मिळाले. मुगल सत्तेच्या ऱ्हासास सुरवात झाली. या संधीचा फायदा मराठ्यांनी घेतला आणि मराठ्यांच्या साम्राज्य विस्तारास आरंभ झाला. परंतु दुर्दैवाने साम्राज्यविस्तारासोबत महाराणी ताराराणी आणि शाहू महाराज यांच्यात यादवी युद्धास आरंभ झाला. औरंगजेबाच्या मृत्युनंतर त्यांच्या वारसांमध्ये सत्तेसाठी संघर्ष सुरू झाला. त्यामुळे राजपुत्र आझमशहाने स्वत: बादशहा घोषित करून आपला भाऊ शहाआलमचा विरोध मोडून काढण्यासाठी त्यास दिल्लीस जावे लागले यावेळी मराठ्यांच्या यादवी युद्ध सुरू होऊन दक्षिणेतील राजकारणापासून आपली सुटका व्हावी या हेतूने कैदेत असलेल्या शाहू महाराजांची सुटका करण्यात आली त्यानंतर महाराणी ताराराणी आणि शाहू महाराज यांच्यात वारसा युद्ध तीव्र झाले. खेडच्या लढाईत ऐनवेळी सेनापती धनाजी जाधव शाहू महाराजांच्या पक्षाकडे गेलेने ताराराणींच्या पक्षाचा पराभव झाला. त्यानंतर सातारा जिंकून घेवून शाहू महाराजांनी राज्याभिषेक करून घेतला. शाहू महाराजांना छत्रपती करण्यात पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचा मोठा वाटा होता. यानंतर ताराराणी यांनी आपला पुत्र दुसरा शिवाजी याचा पन्हाळा येथे राज्याभिषेक करून मराठा राज्यात उभी फुट पडली आणि सातारा व कोल्हापूर या दोन छत्रपतींच्या गाद्या निर्माण झाल्या. पुढे अनेक वर्ष या दोन छत्रपतींमध्ये अंतर्गत संघर्ष सुरू होता. पुढे कोल्हापुरात 'पन्हाळा राज्यक्रांती' होऊन राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई आणि त्यांचा पुत्र दुसरा

संभाजी यांनी राज्य हस्तगत करताना ताराराणी आणि त्यांचा पुत्र दुसरा शिवाजी यांना कैदेत ठेवले. सातारच्या शाहू महाराजांनी समन्वयाची भूमिका घेतानाच १३ एप्रिल १७३१ रोजी कोल्हापूरचे छत्रपती संभाजी दुसरे आणि साताऱ्याचे छत्रपती शाहू यांच्या वारणेचा तह घडून वारणेपासून दक्षिणेचा प्रदेश कोल्हापूर छत्रपतीकडे तर वारणेच्या उत्तरेकडील प्रदेश सातारा छत्रपतीकडे राहील असे निश्चित करण्यात आले. या तहानंतर मराठ्यांच्यातील यादवी युद्धाचा शेवट घडून आला. परंतु मराठी राज्याची हानी या यादवी युद्धामुळे झाली.

मुळचे कोकणामधील श्रीवर्धन येथील भट घराणे हे राजाराम महाराजांच्या काळात घाटावर आले आणि मराठी राज्याच्या सेवेत रुजू झाले. या घराण्यामधील बाळाजी विश्वनाथ यांनी एक महुसली अधिकारी ते सेनाकर्ते,पेशवापर्यंतचा त्यांचा प्रवास अत्यंत महत्वाचा ठरला. त्यांनी सर्वप्रथम अत्यंत कठीण काळात शाहू महाराजांचा पक्ष सावरतानाच अनेक मात्तबर सरदाराना शाहू महाराजांच्या पक्षाकडे वळवले. स्वतंत्र्यवृत्तीच्या सरदारांचे वर्चस्व मोडून काढून मराठा राज्य एका भक्कम पायावर स्थिर केले त्यात दमाजी थोरात, कृष्णराव खटावकर यांना शस्त्रबळावर तर धनाजी जाधव, कान्होजी आंग्रे यांना मुत्सेगिरीने जिंकले. दिल्लीच्या राजकारणात हस्तक्षेप करतानाच बलाढ्य सय्यद बंधूना पाठींबा देवून मराठी राज्यासाठी मुगलांशी करार करून चौथाई आणि देशमुखीचे अधिकार प्राप्त केले व मराठा राज्यास आर्थिक स्थैर्य प्रदान केले. प्रचंड मोठे लष्कर उभे करून मराठा राज्यमंडळाची स्थापना केली. एकूणच स्वराज्याचा पाया विस्तारीत करतानाच मराठा साम्राज्याचा पाया घातला आणि भविष्यात आजच्या अफगाणिस्तान हद्दीवरील ‘अटक’ किल्ल्यावर मराठा जरीपटका फडकला त्याची भक्कम पायाभरणी पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी केली.

### १.४ पारिभाषिक शब्द :

- **यादवी युद्ध :** अंतर्गत संघर्ष
- **तोतया :** बनावट,खोटा
- **भेदनिती :** कुटनिती
- **सनद :** लेखी अधिकार, हक्कविषयक कागद
- **राज्यक्रांती :** राजघराण्याअंतर्गत सत्तेत झालेला बदल, राजघराण्यातील सत्तांतर
- **सेनाकर्ते :** सैन्याचा वास्तव प्रमुख
- **गढी :** छोटा किल्लेवजा टेकडीवरील सरदार, सरमंजारदाराचे निवासस्थान
- **वजीर :** मुख्य प्रधान

## १.५ सरावासाठी स्वाध्याय:

**प्रश्न : अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) मराठ्यांच्या यादवी युद्धाची माहिती देवून त्यामध्ये शाहू महाराज कसे विजयी झाले याची माहिती सांगा.

२) साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज यांचे मराठ्यांच्या इतिहासातील कार्य सांगून महत्व विषद करा.

३) पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचे जीवनचरित्र स्पष्ट करा.

४) बाळाजी विश्वनाथ यांनी मुगलांकडून प्राप्त केलेल्या सनदांचे महत्व सांगून त्याचे मूल्यमापन करा.

**ब) टिपा लिहा.**

१) शाहू महाराजांची सुटका

२) खेडची लढाई

३) वारणेचा तह(१३ एप्रिल १७३१)

४) कुलाब्याचा तह (८ फेब्रुवारी १७१४)

५) हुसेन अली–बाळाजी विश्वनाथ यांच्यातील तह (१७१८)

६) मराठा राज्यमंडळ

७) पन्हाळा राज्यक्रांती

८) चौथाई व सरदेशमुखी अधिकार

## १.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१) सेतू माधवराव पगडी – मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, पुणे, १९६२.

२) जयसिंगराव पवार – मोगल मर्दानी महाराणी ताराबाई, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०२३

३) वा कृ भावे – पेशवेकालीन महाराष्ट्र, पुनर्मुद्रित, इंडियन काऊन्सिल ऑन हिस्टॉरिकल रिसर्च, नवी दिल्ली, १९७६.

४) M G Ranade - Rise of the Maratha Power, Kessinger Publication, 2010.

५) सेतू माधवराव पगडी – मराठे व औरंगजेब, पार्श्व पब्लिकेशन्स, २०२२

६) सेतू माधवराव पगडी – मोगल व मराठे, पार्श्व पब्लिकेशन्स, २०२२


❑❑❑

# घटक २
# पहिले बाजीराव
(Bajirao-I)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ बाजीराव निजाम संबंध

    २.२.२ उत्तरेकडील साम्राज्य विस्तार

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये:

१. पहिले बाजीराव पेशवे यांच्या कार्याची माहिती करून घेता येईल.

२. मराठी सत्ता व निजाम यांच्यातील संबंधांवर प्रकाश टाकता येईल.

३. पहिले बाजीराव पेशवे - निजाम संबंध समजून घेता येतील.

४. पहिले बाजीराव पेशवे यांचे उत्तरेकडील धोरण समजून घेता येईल.

५. मराठी सत्तेचा उत्तरेतील साम्राज्य विस्तार पाहता येईल.

## २.१ प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतंत्र मराठी सत्तेची स्थापना केली होती. मराठी सत्तेची स्थापना ही घटना महाराष्ट्राच्या व देशाच्या इतिहासामध्ये अत्यंत क्रांतिकारक व महत्त्वाची मानली जाते. कारण या घटनेमुळे महाराष्ट्राच्या व देशाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आला. दक्षिणेत मराठी सत्तेच्या सभोवताली असणाऱ्या अनेक शत्रू सत्तांचा सामना करत मराठ्यांनी आपल्या पराक्रमाच्या जोरावर उत्तरेपर्यंत धडक मारली होती. यामध्ये बाळाजी विश्वनाथ यांच्या मृत्यूनंतर पेशवे पदावर आलेल्या पेशवे पहिले

बाजीराव यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे ठरले. त्यांनी दक्षिणेत मराठी सत्तेला वारंवार उपद्रव देणाऱ्या निजामाचा बंदोबस्त केलाच. पण त्याचबरोबर मुगल बादशाला न घाबरता उत्तर भारतावर धडक मारण्याचे धाडस दाखवले. एवढेच नव्हे तर उत्तर भारतातील मोहिमेमध्ये मोठे यश मिळवून मराठी सत्तेचा उत्तरेत साम्राज्यविस्तार केला. छत्रपती शाहू महाराजांच्या नेतृत्वाखाली पहिले बाजीराव पेशवे यांच्या पराक्रमाने उत्तर भारतात ही मराठी सत्तेचा धबधबा निर्माण झाला. त्यामुळेच पहिले बाजीराव पेशवे यांची मराठी सत्तेच्या इतिहासातील कारकीर्द अत्यंत महत्त्वाची ठरते. सदरच्या प्रकरणात आपण पहिले बाजीराव पेशवे यांचे मराठी सत्तेतील योगदान, निजामाचा बंदोबस्त व उत्तरेतील साम्राज्य विस्तार यावर प्रकाश टाकणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१–अ) बाजीराव–निजाम संबंध

बाळाजी विश्वनाथ हे अत्यंत हुशार व कर्तबगार होते. बाळाजींच्या कार्यामुळेच छत्रपती शाहू महाराजांचे आसन स्थिर होऊन मराठा राज्याला सुद्धा स्थिरता प्राप्त झाली होती. बाळाजींच्या मुळे शाहू महाराजांना ताराबाई पक्षावर वर्चस्व मिळवत आले होते. त्यांनी दामाजी थोरात, कृष्णराव खटावकर, कान्होजी आंग्रे यांच्यासारख्या मातब्बर मराठा सरदारांना मुत्सद्देगिरीने जिंकले होते. दिल्लीच्या राजकारणात पराक्रमी व सामर्थ्यवान सय्यद बंधूंना पाठिंबा देऊन बाळाजी विश्वनाथांनी मराठा राज्यासाठी चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा मिळवल्या होत्या. पेशवेपद व सेनापती पद आपणाकडे घेऊन त्यांनी मराठा राज्याची राजकीय व आर्थिक स्थिती भक्कम केली होती. त्यामुळेच त्यांनी पेशवे पदाचे महत्व व लौकिक निश्चितच वाढविला होता. कोल्हापूरच्या संभाजींचा बंदोबस्त करण्याचे कार्य चालू असतानाच सासवड जवळ २ एप्रिल १७२० रोजी बाळाजी विश्वनाथांचा मृत्यू झाला. त्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी बाळाजी विश्वनाथ यांचा मुलगा बाजीराव यास पेशवे पदाची वस्त्रे दिली. पेशवे पहिले बाजीराव यांनी मराठी सत्तेचा विस्तार दक्षिणेबरोबरच उत्तरेतही केला. दिल्ली मोहीम काढून मराठ्यांचा दरारा उत्तर भारतातही निर्माण केला. तर दक्षिणेतील निजाम उल्क मुल्कचा बंदोबस्त करून पश्चिम किनारपट्टीवरील परकीय सत्तांच्या हालचाली रोखून धरण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

**बाजीरावांचा जन्म व बालपण :**

बाळाजी विश्वनाथ व राधाबाई यांच्या पोटी १८ ऑगस्ट १७०० रोजी बाजीराव यांचा जन्म झाला. बाळाजी विश्वनाथांच्या अस्थिर राजकीय काळातच त्यांचे बालपण गेले. बाळाजी विश्वनाथ छत्रपती शाहू महाराजांचे पेशवे झाल्यावर त्यांचा कामाचा व्याप वाढत गेला. त्यामुळे त्यांना बाजीरावांच्या शिक्षणाकडे फारसे लक्ष देता आले नाही. त्या काळात रूढ असणारे संस्कृत, मोडीचे ज्ञान त्यांना मिळाले होते. पुस्तकी शिक्षणामध्ये त्यांची फारशी प्रगती नव्हती पण लष्करी शिक्षणामध्ये ते फारच रममान होत असत. तलवार चालवणे, तिरंदाजी करणे, भाला फेकणे, घोड्यावरून भरधाव रपेठ मारणे यात ते अतिशय तरबेज होते. पिलाजी जाधव व नाथा धुमाळ यांनी त्यांना लष्करी शिक्षण दिले होते.

**बाजीरावांना पेशवे पदाची प्राप्ती (१७२०) :**

धनाजी जाधव यांच्या सारख्या अतिशय मुरब्बी सेनापतीच्या मार्गदर्शनाखाली बाजीरावांच्या व्यक्तिमत्त्वाची उत्तम जडणघडण झाली होती. तालीम, जोर बैठकांमुळे त्यांचे शरीर अतिशय रेखीव कसदार व बलवान बनले होते. कोणताही मस्तवाल घोडा बाजीराव सहज नमवित असत. बाळाजी विश्वनाथ बरोबर बाजीरावांनी वयाच्या १२ व्या वर्षापासूनच मोहिमांमध्ये भाग घेतल्यामुळे त्यांना युद्धातील डावपेच, कूटनीती प्रत्यक्ष अनुभवता आले होते. बाळाजींच्या १७१८ च्या दिल्ली मोहिमेत बाजीरावांना अनेक अनुभव आले होते. मुगल दरबारातील शह काटशहाचे राजकारण, उत्तरेच्या राजकारणातील चढ-उतार व दिल्लीच्या अस्थिर परिस्थितीची जाणीव इत्यादींचे लहानपणीच मिळालेल्या बाळकडू मुळेच पुढील काळात त्यांनी मराठी राज्याचे साम्राज्यात रूपांतर केले.

बाळाजींच्या मृत्युसमयी बाजीरावांचे वय अवघे १९ वर्षांच्या होते. बाळाजी विश्वनाथांनी छत्रपती शाहू महाराजांची अतिशय इमान इतबारे सेवा केली होती. त्याचीच परतफेड म्हणून शाहू महाराजांनी बाजीरावास पेशवे पद देण्याचा निर्णय घेऊन कराड जवळील मसूर येथे १७ एप्रिल १७२० रोजी छत्रपती शाहू महाराजांनी बाजीरावास पेशवे पदाची वस्त्रे दिली. शिवाय बाळाजींची पूर्वीची जाहागीर व सरंजाम देऊ केले. दमाजी थोरात यांची जप्त केलेली जाहागीर व सरंजाम ही बाजीरावांना देऊ केला. तसेच बाजीरावांचा लहान बंधू चिमाजी आप्पास पंडित ही पदवी देऊन सरदारकी बाहाल केली.

**बाजीरावांच्या पेशवे पदास मराठा सरदारांचा विरोध :**

छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारात अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ मुत्सद्दी होते. त्यामधील श्रीपतराव प्रतिनिधी, खंडेराव दाभाडे, आनंदराव सुमंत, कान्होजी भोसले इत्यादी मुत्सद्दी सरदारांना छत्रपती शाहू महाराजांनी पेशवे पदावर बाजीरावाची केलेली निवड आवडली नाही. कारण कालच्या पोराने आपली बरोबरी करावी, आपणावर वर्चस्व गाजवावे हे या मुत्सद्दी सरदारांना खटकू लागले. पैकी बाजीरावांना सर्वात जास्त विरोध श्रीपतराव प्रतिनिधींनी केला. पण बाजीरावांच्या पेशवे पदाच्या उज्वल भवितव्याबद्दल छत्रपती शाहू महाराजांना मोठा आत्मविश्वास होता. ज्येष्ठ सरदारांनी बाजीरावांवर दाखवलेला अविश्वास ही मराठा मंडळातील फुटी ची सुरुवात होती पण ही फूट आणखीनच वाढू नये म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी त्यांना बाजीराव पेशवे पदास पात्र ठरले नाहीत तर त्यास आपण काढून टाकू असे वचन देऊन मराठा सरदारांचा बाजीरावांना होणारा विरोध कमी केला होता.

**बाजीराव पेशव्यांचे धोरण :**

पेशवे पहिले बाजीराव यांनी स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर काळाचे महत्व ओळखून छत्रपती शाहू महाराजांच्या राज्याचे धोरण निश्चित केले. मराठा राज्याचा साम्राज्यविस्तार करण्याचे ठरविले. त्या धोरणानुसार आपल्या उद्दीष्ट पूर्तीसाठी कार्यक्षम फौज उभारली. जुन्या जाणकार सरदारांना न दुखविता साम्राज्यविस्ताराचे धोरण अवलंबले. बाजीराव यांच्या कार्यामध्ये चिमाजी आप्पाची सदैव साथ राहिली. शिवाय मल्हारराव होळकर, पवार बंधू, राणोजी शिंदे, पिलाजी जाधव, पुरंदरे, बोकील, भानू, हिंगणे, पेठे

आदी सरदारांची बाजीरावांना मोठी साथ मिळाली. बाजीरावांच्या युद्ध मोहिमांमध्ये ही सरदार मंडळी खांद्यास खांदा लावून लढली. आपल्या या सरदारांसाठी बाजीरावांनी नवीन प्रदेश जिंकले. महाराष्ट्रामध्ये एक नवीन चैतन्य निर्माण करून उत्तरेकडील प्रदेश काबीज करण्यास सुरुवात केली. कमकुवत झालेले मुघल साम्राज्य व रजपूत मैत्रीचा फायदा घेऊन त्यांनी आपले ध्येय साकार केले.

**दिल्लीच्या राजकारणातील चढ–उतार :**

दिल्लीच्या मुघल सत्तेमध्ये १७१९ पर्यंत अनेक उलथापालथी झाल्या. १७२० मध्ये महमदशहा हा बादशहा झाला. हा बहादूरशहाचा नातू होता. त्याचे मूळचे नाव रोशन अख्तार असे होते. हुसेनअली व हसनअली या सय्यद बंधूंनी फारूखशियर बादशाहास पदच्युत करून महमदशहास गादीवर बसवले होते याच सय्यद बंधूंनी मराठ्यांना चौथाई व सरदेशमुखी चे दक्षिणेकडील सहा सुभ्यांचे अधिकार दिले होते. मुघल तक्तावर आपणच बादशहा बसवू शकतो असा त्यांचा समज होता. सय्यद बंधूंचा राजकारणात वारंवार होणारा हस्तक्षेप महमदशहास पुढे सहन होईनासा झाला म्हणून तो सय्यद बंधूंचा तिरस्कार करू लागला. बादशहा महमदशहाची माता अत्यंत धूर्त व कटकारस्थानी होती. तिने वरकरणी सय्यद बंधूबरोबर स्नेह व सख्य दाखवले पण आतून त्यांचा काटा काढण्यासाठी प्रयत्नशील राहिली. त्यातूनच तिने सय्यद बंधूचा विरोधक निजाम उल्क मूल्क याच्याबरोबर संधान बांधले होते. मुघल दरबारात सय्यद बंधूंच्या विरोधात जो गट निर्माण झाला होता त्याचा प्रमुख निजाम उल्क मुल्क होता. १७१९ च्या उलथापालतीमध्ये सय्यद बंधूंनी त्यास माळव्याची सुभेदारी दिली होती. पण पूर्वी तो दक्षिण सुभेदारीवर होता. सय्यद बंधूंनी निजामाची वारंवार बदली करून त्याला सतावून सोडले होते. त्यामुळे तो सय्यद बंधूंवर चिडून होता.

**निजाम उल्क मुल्क व सय्यद बंधू :**

माळवा प्रदेशात निजामाने मोठे सैन्य जमा केले होते. माळव्याच्या प्रदेशातून मराठ्यांना हाकलून लावण्याकरिता आपण सैन्य जमा करीत आहोत असा खुलासा त्याने सय्यद बंधूंकडे केला होता. पण सय्यद बंधूंचा पाढाव करण्याकरिताच त्याने हे सैन्य जमा केले होते. माळव्यातील निजामाच्या या हालचालींची सय्यद बंधूंना शंका आली. त्यामुळेच त्यांनी निजामाची बदली अकबराबादला केली. निजामाला अकबराबादला रुजू होण्याचे फर्मान मिळताच निजामाने सय्यद बंधूबरोबर लढण्याचे ठरवले. माळव्यातील सैन्यासह तो सिंरोजवरून दक्षिणेकडे निघाला. त्याने नर्मदा नदी ओलांडली व आशिरगडचा किल्ला व बहरानपूर शहर काबीज केले. निजामाने पुढील काळात संपूर्ण खानदेश प्रांत काबीज केला व सय्यद बंधू विरोधात बंड सुरू केले. निजामाच्या या हालचाली मागे बादशाह महमदशहा होता. महमदशहाला मनापासून सय्यद बंधूंचा पाढाव व्हावा व त्यांच्या त्रासातून आपली मुक्तता व्हावी असे वाटत होते. कारण तशा आशयाची पत्रे महमदशहाने निजाम उल मुल्कला पाठवलेली होती.

**खांडव्याच्या लढाई (१७२०) :**

सय्यद बंधूंना निजामाच्या खऱ्या उद्देशाची पूर्ण कल्पना आल्यामुळे निजामाला आवर घालण्यासाठी सय्यद बंधूंनी दिलावर आलीखानास दक्षिणेत पाठवले तर दक्षिणेकडून आलमअली याला निजामावर तुटून

पडण्यास सांगितले. उत्तर व दक्षिण बाजूंकडून मध्येच निजामाला कात्रीत पकडायचे व त्याचा पाडाव करायचा अशे धोरण सय्यद बंधूंनी आखले होते. पण निजाम हा अतिशय धूर्त, शूर व चाणाक्ष होता. त्याने दिलावर अलीखान व आलम अली हे एकत्र येण्यापूर्वी एक एकास गाठून पराभूत करण्याचे धोरण आखले. दक्षिणेकडून येणाऱ्या आलम अलीची वाट न पाहता उतावळ्या दिलावर अलीखानाने १९ जून १७२० रोजी निजामावर हल्ला चढविला. हीच ती इतिहास प्रसिद्ध खांडव्याची लढाई होय. या लढाईत दिलावर अलीखान मारला गेला. निजामाला मोठा विजय मिळाला. याचवेळी आलम अली दक्षिणेकडून सैन्यासह बुऱ्हानपूर येथे दाखल झाला. खांडव्याच्या विजयामुळे निजामाचा आत्मविश्वास वाढला होता. तेव्हा निजाम उल्क मुल्क आपल्या सैन्यासह बुऱ्हानपुरकडे रवाना झाला.

**बाळापुरची लढाई (१० ऑगस्ट १७२०)**

आलम अली व निजाम या दोघांनीही मराठ्यांची मदत मागितली पण यावेळी मराठे तटस्थ राहिले. यावेळी पावसाळा सुरू झाला होता त्यामुळे युद्धाचा धोका पत्करू नये असा सल्ला आलम अलीकडील जेष्ठांनी दिला. मात्र या सल्ल्याकडे दुर्लक्ष करून आलम अलीने निजामाबरोबर युद्धाचा निर्णय घेतला. त्यानुसार दोन्ही सैन्यांची भेट पूर्णा नदीच्या तीरावरील बाळापुर येथे पडली. त्यांच्यात घनघोर युद्ध झाले. लढाईच्या धामधुमीत आलम अली मारला गेला त्यामुळे त्याचे सैन्य पळून गेले. निजामाला मोठा विजय मिळाला. आलम अलीचे युद्धसहित्य निजामाला मिळाले. तर काही सरदार निजामाकडे आले. बाळापुरची ही लढाई म्हणजे एका अर्थाने सय्यद बंधूंच्या नाशाची सुरुवात तर दक्षिणेमध्ये निजामी सत्तेची मूहुर्तमेढ होती. खांडवा व बाळापूरच्या लढाईतील विजयाने निजामाचा दक्षिणेत उदय झाला. निजामाच्या उदयाने दक्षिणेतील राजकारणाला नवीन कलाटणी मिळाली. त्याचा मराठा राजकारणावर ही परिणाम होऊन मराठ्यांना निजामाची दखल घ्यावी लागली.

**सय्यद बंधूंचा शेवट :**

दिलावरअली खान व आलमअली यांचा झालेला पराभव म्हणजे एक प्रकारे सय्यद बंधूंचा शेवटच होता मुगल दरबारातील महमदशहा बादशाह अनेक सरदार सय्यद बंधूंचा काटा काढण्यासाठी टपलेले होते. बादशहाने वर करणी निजामाचा पराभव करण्यासाठी हुसेनअली सह दक्षिणेत जावे व हसन अलीने दिल्लीच्या बंदोबस्तासाठी राहावे अशी योजना आखली. त्यामुळे बादशाह याबरोबर हुसेन अलीस दक्षिणेत जाणे भाग पडले. बादशाह हुसेन अली सह निघाला. सय्यद बंधूंची ताटातूट झाली. बादशहा व हुसेन अली अजमेरच्या रस्त्याने दक्षिणेकडे जात असताना जयपूरच्या पूर्वेस तोडाभिम येते छावणी पडली असतानाच आमिरखान, हैदरकुलीलीखान व सादतखान या तिघांनी ऑक्टोबर १७२० रोजी हुसेन अली चा खून केला. त्यानंतर मधुनच बादशहा दिल्लीकडे परत आला. महमदशहाने आमिरखान हैदरकुलीखान व सादतखान या तिघांना मनसबी व जहागिऱ्या बहाल केल्या. हसनअली ला आपल्या बंधूस विश्वासघाताने ठार मारून टाकल्याची बातमी कळताच तो अतिशय संतापला व त्याने दिल्ली तक्तावर दुसरा बादशहा बसवण्याचे ठरवून महमदशहाशी लढण्याची तयारी केली. त्यानुसार १४ नोव्हेंबर १७२० रोजी यमुना नदीच्या तीरावर हसनपुर

येथे महमदशहा व हसनअली सय्यद यांच्यात मोठी लढाई झाली. या लढाईत हसनअली पराभूत झाला. त्यास कैद करून १७२२ रोजी ठार करण्यात आले. अशाप्रकारे सय्यद बंधूंची दिल्लीतील हुकूमशाही संपुष्टात येऊन मुगल दरबारातील कारकीर्दही संपुष्टात आली.

**निजामाच्या हालचाली :**

सय्यद बंधूंच्या नाशास कारणीभूत झालेल्या निजामाचे दिल्लीत मोठे वजन वाढले होते त्याने मराठ्यांविरोधात हालचाली सुरू केल्या. दक्षिणेत आल्यावर सय्यद बंधूंनी बादशहाकरवी मराठ्यांना दिलेल्या चौथाई व सरदेशमुखीच्या समदा नामंजूर करण्याच्या हालचाली सुरू केल्या. मराठ्यांच्या या हक्काच्या वसुलीस अडथळे आणण्यास सुरुवात केली. शाहू महाराजांप्रमाणेच कोल्हापूरच्या संभाजीस चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करण्याचे अधिकार आहेत असे मत मांडून त्याने मराठा घराण्यात अंतर्गत कलह सुरू करण्याचाही प्रयत्न केला. दरम्यानच्या काळात दिल्लीचा वजीर व निजामाचा नातेवाईक आमिरखान मरण पावला. बादशहाचा वजीर होण्याची पात्रता केवळ निजामामध्येच होती. तेव्हा बादशहाने निजामास वजिरपद स्वीकारण्यासाठी दिल्लीस बोलवले. त्यामुळे निजामाची मनस्थिती द्विधा स्वरूपाची झाली. बादशाहकडून तातडीचे बोलवणे येऊ लागल्याने निजामाने दक्षिणेतील कारभार मुबारीजखानाकडे सोपवून तो २१ ऑक्टोबर १७२१ रोजी दिल्लीकडे जाण्यास निघाला तर १७२२ मध्ये तो दिल्लीस पोहोचला. त्याने १३ फेब्रुवारी १७२२ रोजी मुगल बादशहाचे वजीर पद स्वीकारले. निजामाने बादशाह कडून पुढील काळात दक्षिणेचे सहा सुभे, माळवा व गुजरात हे प्रांत आपल्याकडे घेतले. गुजरात व माळवा प्रदेशातील मराठ्यांच्या हितसंबंधाला निजामाचे हे एक प्रकारचे मोठे आव्हानच होते. पेशवा बाजीरावांनी निजामाच्या या हालचालीस पायबंद घालण्याचे ठरवले. त्यानुसार बाजीराव आपल्या सैन्यासह माळव्यात उतरले यावेळी बाजीराव व निजाम यांच्या युद्ध झाले नाही. पण गुजरात माळवा सरहद्दीवर भेलसा या ठिकाणी दोघांची भेट झाली. प्रत्यक्ष भेटीत काय बोलणे झाले त्याचा तपशील उपलब्ध होत नाही. बाजीरावांच्या भेटीनंतर निजाम दिल्लीला परतला. गुजरात माळवा व दक्षिणेकडील सुभे निजामाच्या ताब्यात गेल्याने बादशाह निजामाच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल शासंक झाला. त्याला निजामाची भीती वाटू लागली. निजाम डोईजड होण्याअगोदरच त्याचे खच्चीकरण करणे आवश्यक वाटू लागले. त्यामुळे बादशहाने निजामाची बदली औंधच्या सुभ्यावर केली. निजामाला बादशहाच्या या कृतीबद्दल मोठा राग आला. त्या रागातच त्याने २७ डिसेंबर १७२३ रोजी वजीर पदाचा राजीनामा दिला व औंध सुभ्यावर रुजू होण्याचे निमित्त करून त्याने सरळ दक्षिणेचा रस्ता धरला. अतिशय वेगाने कूच करून निजाम उज्जैनला पोहोचला. तर दुसरीकडे बादशहाने निजामाचा मुलगा गाजीउद्दिन यास वजीर पद दिले.

**निजाम व मराठे तडजोड :**

बादशहाने निजामाची दक्षिण सुभेदारी मुबारीझखानाकडे दिली व त्यास निजामावर हल्ला करण्यास फर्मान पाठवले. तसेच दुसरे एक फर्मान छत्रपती शाहू महाराजांकडे पाठवून निजामाच्या बंदोबस्तासाठी मदत मागितली. मुघल दरबारातील या गोंधळाचा फायदा घेण्याचे छत्रपती शाहू महाराजांनी ठरवले व आपल्या

काही अटी मुबारीझखानातर्फे बादशाह पुढे ठेवल्या. या अटी बादशाह विशेषता मुबारीझखानास कडक वाटल्या असाव्यात. निजामाच्या बंदोबस्तासाठी बाजीराव साताऱ्याहून निघाले. उत्तर खानदेशातील मराठा फौज बाजीरावांना मिळाली. नर्मदा नदी ओलांडून बाजीराव सिहोर येथे दाखल झाले. यावेळी मुबारीझखानाची द्विधा अवस्था झाली. निजामाबरोबर हात मिळणी करून मराठ्यांचा पाडाव करावा की बादशाही हुकूम मानून निजामाबरोबर लढावे हे त्यास कळेना. तर इकडे निजामालाही एकाच वेळी दोन शत्रूंबरोबर लढणे अशक्य होते. म्हणून त्याने बाजीरावांबरोबर बोलणी सुरू केली. त्यानुसार धार जवळ नालछा येते १८ मे १७२४ रोजी निजाम व पेशवे बाजीराव यांच्यात भेट झाली अनौपचारिक मैत्रीचे बोलणे झाले. इकडे मुबारीझखानाने निजामाशी लढण्याचे ठरवून छत्रपती शाहू महाराजांची मदत मिळवण्याचा प्रयत्न सुरू केला.

**साखरखेड्याची लढाई (३० सप्टेंबर १७२४) :**

निजाम व मुबारीझखान या मुघल सरदारांच्या युद्धात विजय कोणाचा होणार याचा अंदाज बांधता येत नव्हता. त्यामुळे शाहू महाराजांनी २९ जुलै १७२४ रोजी आपल्या सरदारांना व सैन्याला तटस्थ राहणे विषयी कळवले. परंतु बाजीरावांनी मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन पुढे जायचे ठरवले व बुऱ्हानपूर चा सर्व प्रदेश आपल्या कब्जात आणला. तर निजामाने वेगाने कूच करून औरंगाबाद घेतले. तेथील मुबारीझखानाची युद्ध सामग्री निजामाच्या हाती पडली. मुबारीझखानास दिल्लीहून बादशाही मदत येण्यापूर्वी औरंगाबादच्या पूर्वेस ५० मैलांवर असलेल्या पूर्णा नदी काठावर वसलेल्या साखरखेडा येथे गाठले. ३० सप्टेंबर १७२४ रोजी घनघोर लढाई होऊन मुबारीझखान व त्याचे दोन मुलगे मारले गेले. मुबारीझखानाचा खजिना, हत्ती, घोडे, युद्धसाहित्य निजामास मिळाले. निजामाला मोठा विजय प्राप्त झाला. साखरखेड्याचे नाव बदलून त्याने फत्तेखडी असे ठेवले. फत्तेखडी येथील युद्धात बाजीराव ८००० सैनिकांसह उपस्थित होते. छत्रपती शाहू महाराजांच्या मराठी सैन्याने या युद्धात नेमकी कोणती भूमिका घेतली हे स्पष्ट होत नाही. दक्षिण सुभेदार असणाऱ्या मुबारीझखाण्यापेक्षा निजाम बरा म्हणून बाजीरावांची त्यास सहानुभूती होती. फत्तेखडीच्या विजयानंतर निजामाने बाजीरावांची भेट घेऊन त्यांचा मोठा सन्मान केला. अनेक किमती अलंकार जडजवाहिर भेट दिले. शिवाय सात हजारांची मनसब ही दिली. तटस्थ राहण्याबद्दल बाजीरावांना एवढी बक्षीसी मिळाली. चंद्रसेन व रावरंभा निंबाळकर यांचाही त्याने सत्कार केला. मुगल बादशहाला एक पत्र लिहून निजामाने झालेल्या घटनांबद्दल दिलगिरी व्यक्त केली. त्यामुळे बादशहाने पुन्हा निजामास दक्षिण सुभेदारीवर कायम केले. मात्र माळवा व गुजरात हे प्रांत निजामा कडून काढून घेतले व माळव्यावर गिरीधर बहादूर तर गुजरात वर सरबुलंदखान यांची सुभेदार म्हणून नेमणूक केली.

फत्तेखडी येथील लढाई मराठी सत्तेच्या वाटचालीत महत्त्वाची ठरते. निजाम उल्क-मुल्कचे आसफजाही घराणे हैदराबाद येथे कायम झाले. सवता सुभा निर्माण करण्याचा उद्देश सफल झाला. मराठी सत्ता व निजाम यांच्यात सतत संबंध येऊ लागले. निजाम स्वतंत्रपणे तह अगर लढाई करण्यास मोकळा झाला. पुढील काळात तो मराठ्यांच्या विरोधात काही काळ गेला नाही पण योग्य संधीची वाट पाहत राहिला. कर्नाटक सुभ्यावर आपला अधिकार आहे असे तो समजू लागला होता. त्याने उघडपणे बादशाहीची सत्ता जुगारून

दिली नाही पण प्रांतांचा महसूल व हिशोब देण्याची परंपरा मोडीत काढली. निजामाचा कायमचा बंदोबस्त करावयाचा झाल्यास त्यास उत्तरेकडून रसद मिळता कामा नये यासाठी माळवा व गुजरातमध्ये मराठ्यांनी आपली सत्ता निर्माण केली पाहिजे हे बाजीरावांनी ओळखले होते. परंतु त्याआधीच त्यांना कर्नाटकातील घडामोडींकडे लक्ष देणे भाग पडले.

**कर्नाटक प्रांतांवरील मोहिमा :**

तंजावरच्या मराठी राज्याबद्दल छत्रपती शाहू महाराजांना मोठी आत्मीयता वाटत होती. तंजावरचा सरफोजी हा अडचणीत आला होता. तेव्हा त्याला मदत करणे, कर्नाटक प्रांतातील चौथाई व सरदेशमुखीचे हक्क वसूल करणे, सादुल्लाखानापासून तंजावरचे रक्षण करणे, कर्नाटकातील मराठा सरदारांना मदत करून त्यांना मराठा सत्तेच्या राजकीय कक्षेत आणणे, शिवाय निजामाच्या कर्नाटकातील महत्त्वकांक्षेस पायबंद घालने इत्यादी कारणांमुळे कर्नाटक प्रांतांवर मोहिमा काढणे आवश्यक बनले होते. मराठा साम्राज्य उत्तरेत व दक्षिणेत विस्तारित करणे या ध्येयापोटी छत्रपती शाहू महाराजांनी कर्नाटकवर दोन स्वाऱ्या केल्या त्यापैकी पहिली स्वारी म्हणजे चितळदुर्ग व दुसरी स्वारी म्हणजे श्रीरंगपट्टणमची होय.

**चितळदुर्ग ची पहिली मोहीम :**

कर्नाटकातील चितळदुर्ग या पहिल्या महिन्याचे नेतृत्व शाहू महाराजांचे मानसपुत्र अक्कलकोटचे जागीरदार फत्तेसिंह भोसले यांच्याकडे होते. ही मोहीम नोव्हेंबर १७२५ ते मे १७२६ पर्यंत काढण्यात आली होती. फत्तेसिंह भोसलेंसह त्र्यंबकराव दाभाडे, प्रतिनिधी, रघुजी भोसले, सुलतानजी निंबाळकर व पेशवे बाजीराव इत्यादी सहभागी झाले. या मोहिमेत बाजीरावांनी महत्त्वपूर्ण कामगिरी पार पाडली. २० नोव्हेंबर १७२५ रोजी मराठा सैन्याने सातारा येथून कर्नाटकाकडे प्रयाण केले. पुढे मुरारराव घोरपडे मराठा सैन्यास येऊन मिळाले त्यामुळे मराठ्यांची ५० हजारांची फौज झाली. इंदापूर, पंढरपूर वरून विजापूर गुलबर्गा कोपल मार्गे १६ मार्च १७२६ रोजी मराठी फौज चितळदुर्ग येथे पोहोचली. या प्रदेशातील मागील सर्व रकमेची फौजेने वसूल केली. तेथील गेलेली ठाणी परत मिळवली. छत्रपती शाहू महाराजांच्या आज्ञेप्रमाणे मराठा फौजेने सोंधे संस्थानास त्रास दिला नाही. सोंधेकरांनी मराठ्यांना प्रत्येक वर्षी खंडणी देण्याचे मान्य केले त्या बदल्यात मराठ्यांनी सोंधे संस्थानाचे संरक्षण करण्याचे मान्य केले. पण पावसाळा जवळ आल्याने मराठा फौजेने आपली मोहीम आवरती घेतली व गदग मार्गे २२ मे १७२६ रोजी मराठी फौज साताऱ्यास पोहचली.

**श्रीरंगपट्टणची दुसरी मोहिम**

श्रीरंगपट्टणवरील मोहीम ही कर्नाटकातील मराठा फौजेची दुसरी मोहीम होय. मराठा फौज पहिल्या मोहिमेनंतर परत फिरल्यावर निजामाने कर्नाटकच्या प्रदेशात हालचाली सुरू केल्या, कारस्थाने सुरू केली, त्याने लक्ष्मेश्वरावर फोजा पाठवून जुलून जबरदस्ती केली. तेथील जाहीरदाराने छत्रपती शाहू महाराजांकडे मदत मागितली. निजामाच्या हालचालीमुळे शाहू महाराजांना कर्नाटकावर दुसरी मोहीम काढणे आवश्यक ठरले. त्यानुसार २३ ऑक्टोबर १७२६ च्या हिवाळ्यात मराठा फौजेने बाजीरावांच्या नेतृत्वाखाली सातारा सोडून कर्नाटककडे प्रयाण केले. मराठी फौज पश्चिम मार्गाने बेळगाव, बेदनुर मार्गे खंडण्या वसूल करीत ०४

मार्च १७२७ मध्ये श्रीरंगपट्टणमध्ये पोहोचली. मराठी फौजेने अर्काटच्या सादुल्लाखाना बरोबर मैत्रीचा करार करून तंजावरच्या सरफोजी भोसल्याचे स्थान सुरक्षित केले. श्रीरंगपट्टण येथील प्रमुखाने मराठ्यांना मोठी खंडणीची रक्कम दिली. बाजीरावांनी गुत्तीकर मुराराव घोरपडे यास मराठा मंडळात घेतले. याशिवाय सोंधे, लक्ष्मेश्वर, सुरपूर, कनकदुर्ग, चित्रदुर्ग इत्यादी संस्थाने मराठा प्रभावाखाली आणली. छत्रपती शाहू महाराजांचे सरदार कर्नाटकच्या संपन्न प्रदेशात मुलुखगिरीत गुंतले असतानाच निजामाने चंद्रसेन जाधवा मार्फत कोल्हापूरच्या संभाजीस फितविण्यास सुरुवात केली. बाजीरावांच्या विरोधातील सरदारांना फितवून महाराष्ट्राच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. यामुळे छत्रपती शाहू महाराजांनी बाजीरावांना कर्नाटकातून तातडीने परत येणे विषयी कळवले. त्यानुसार बाजीराव एप्रिल १७२७ मध्ये कर्नाटक मोहिमेवरून साताऱ्यास परतले.

**संभाजी व निजाम यांच्या संयुक्त हालचाली :**

निजाम दक्षिणेत स्थिर झाल्यानंतर छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात हालचाली सुरू केल्या सन १७२५ ते १७२७ च्या मराठा फौजेच्या कर्नाटकातील दोन मोहिमा या निजामाला आपल्या प्रदेशावरील मराठा फौजेची आगळीक वाटत होत्या. कारण औरंगजेबाने विजापूर, गोवळकोंडा ही राज्ये जिंकली होती त्यामुळे या प्रदेशावर आपला हक्क आहे असे त्यास वाटत होते तर छत्रपती शाहू महाराजांना चौथाई व सरदेशमुखीच्या समदा मिळाल्यामुळे दक्षिणेत सर्व ठिकाणी आपणास संचार करण्याचा हक्क आहे असे कर्नाटकावरील दोन मोहिमांवरून दिसून येते. पण निजामाचा मात्र याला विरोध होता. कारण चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा सय्यद बंधूंनी दिल्या होत्या. निजामाने कोल्हापूरच्या संभाजी यांच्यामार्फत छत्रपती शाहू महाराजांच्या प्रदेशात कटकारस्थाने सुरू केली, छत्रपती शाहू महाराज व संभाजी यांच्यामधील दुहीचा फायदा घेण्यास सुरुवात केली व ऐवजखान, तुर्कताजखान आणि घियासखान यांना निजामाने चौथाई वसुलीच्या बाबतीत त्रास देण्यासाठी ठेवले. निजामाच्या या सरदारांना चंद्रसेन जाधव, रावरंभा निंबाळकर व उदाजी चव्हाण हे मराठ्यांकडील फुटीर लोक सहाय्य करीत होते. त्यांनीच कोल्हापूरचा संभाजी यांना निजामाजवळ आणले होते. कान्होजी भोसले, सुलतानजी निंबाळकर हे बाजीरावांचे मत्सरी लोक निजामाबरोबर संधान बांधून होते. बाजीराव कर्नाटकातील मोहिमांमध्ये गुंतले असताना संभाजीने तुंगभद्रेपर्यंतचा प्रदेश आपल्या कब्जात आणला. पुढे संभाजी व निजामाने छत्रपती शाहू महाराजांच्या राज्यात लष्करी हालचाली सुरू केल्या. निजामासह संभाजी पुण्यात आले यावेळी मराठा सैन्य कर्नाटकात होते. पुण्यात निजाम संभाजी यांचे संयुक्त सैन्य येताच शाहू महाराजांचे तेथील सरदार, सैनिक पळून गेले. संभाजीने तेथे आपणच छत्रपती म्हणून द्वाही फिरवली. काही किल्ले व ठाणी काबीज केली. मराठा सैन्य, प्रमुख सरदार कर्नाटकात आहेत ही नेमकी वेळ निजामाने साधून मराठा प्रदेश काबीज करण्याचे धोरण अवलंबिले. कोल्हापूरच्या संभाजीच्या सहाय्याने निजामाने मराठ्यांना मोठा शह दिला व छत्रपती शाहू महाराजांना अडचणीत आणले.

**बाजीराव–निजाम पालखेडची लढाई (२५ फेब्रुवारी १७२८)**

निजाम–संभाजीच्या संयुक्त हालचालीमुळे छत्रपती शाहू महाराज अडचणीत आले होते. चिमाजी अप्पा छत्रपती शाहू महाराजांना घेऊन पुरंदर किल्ल्यांवरून निजामाचा अत्याचार मराठी मुलखाचा झालेला विनाश

पाहत होते. बाजीराव आपली कर्नाटकातील मोहीम अर्धवट टाकून परत आले त्यावेळी निजाम पुण्यात तळ देऊन बसला होता. बाजीरावांनी निजामाबरोबर गनिमी कावा पद्धतीने लढण्याचे ठरवले. त्यानुसार पुण्यात न जाता बाजीरावांनी निजामाच्या मूलखात हालचाली सुरू केल्या. जालना, शिंदखेड ही ठिकाणी लुटली. वऱ्हाडात शिरून माहूर, मंगळूर व वाशिम लुटले. बाजीरावांनी तापी नदी ओलांडून खानदेशात हालचाली सुरू केल्या. बाजीराव जानेवारी १७२८ मध्ये गुजरात मध्ये घुसले तिथे असलेल्या सरबुलंदखाना बरोबर मैत्री केली. बाजीराव गुजरात मधून परत फिरले व पुन्हा खानदेशात शिरले व निजामाचा प्रदेश उध्वस्त करीत औरंगाबाद कडे निघाले. बाजीरावांनी उत्तरेकडील प्रदेश लुटल्याने निजाम उत्तरेकडे निघाला. या काळात बाजीरावांची निजामाच्या हालचालीवर बारीक नजर होती. आपण बुऱ्हाणपूर जाळून बेचिराख करणार आहोत अशी हुल उठवून निजामास झुकांडी देऊन बाजीरावांनी फसविले. तर इकडे निजाम मोठा लवाजमा घेऊन बुऱ्हानपूरच्या संरक्षणासाठी निघाला. परंतु बाजीरावांनी आपल्याला फसवले आहे हे पाहून तो फार संतापला. निजाम पुन्हा त्वेषाने पुण्यात परत आला. त्याने तळेगाव, नारायणगाव व बारामती इत्यादी ठिकाणे काबीज केली व आपले सैन्य पुण्याजवळ ठेवले तर छत्रपती शाहू महाराजांनी देवजी सोमवंशी व साबाजी निंबाळकर यांना निजामावर पाठवले. बाजीरावांनी गोदावरीच्या पूर्व तीरावरील निजामाचे वैजापूर व गंगापूर परगणे लुटले त्यामुळे निजाम बाजीरावांच्या पाठलागावर निघाला. तो गोदावरीच्या पूर्वेकडून बाजीरावांना आडवा आला व तेथेच दिनांक २५ फेब्रुवारी १७२८ रोजी पैठण औरंगाबादच्या मध्ये पालखेड जवळ निजाम बाजीरावांच्या सापळ्यात सापडला. चोहबाजूंनी मराठ्यांची फौज अशी स्थिती निजामी फौजेची झाली. अन्न व पाणी यांच्याशिवाय निजामी फौज तडफडू लागली. निजामाला आता संपूर्ण शरणागती पत्करल्याशिवाय गत्यंतर राहिले नाही. बाजीरावास शेवटी शरण जाऊन त्याने चंद्रसेन जाधव व ऐवजखाना मार्फत तहाचे बोलणे सुरू केले. त्यातूनच निजाम व बाजीराव यांच्यात ६ मार्च १७२८ रोजी मुंगी– शेवगावचा तह झाला.

**मुंगी–शेवगावचा तह (६ मार्च १७२८)**

मुंगी शेवगावच्या तहातील प्रमुख अटी पुढील प्रमाणे होत्या

१. मुघलांच्या ताब्यातील दक्षिणेकडील सहा सुभ्यांतील सर्व कारभार मराठ्यांच्या हातात सोपवावा. मुगल बादशहाच्या हितसंबंधाचे मराठे रक्षण करतील

२. मराठ्यांना दिलेली चौथाई व सरदेशमुखीची सनद निजामाने मान्य करावी

३. आनंदराव सुमंतास मध्यस्थ समजण्यात येऊ नये

४. निजामाने संभाजीस छत्रपती शाहू महाराजांच्या विरोधात चितविणे बंद करावे

५. निजामाने जिंकलेली पुणे, खेड, बारामती, तळेगाव इत्यादी ठाणी छत्रपती शाहू महाराजांना परत करावित

६. कृष्णा व पंचगंगा नदी दरम्यान मूळ असलेली जहागीर सोडून कृष्णा नदीच्या उत्तर प्रदेशात संभाजीने आपली जहागीर वाढवू नये

७. संभाजीने बेकायदा जमा केलेली रक्कम व खंडणी छत्रपती शाहू महाराजांना परत करावी

८. निजामाने सुलतानजी निंबाळकरास आपल्या अज्ञेत ठेवावे

९. लिंबोणे विभागातील पाच गावे कृष्णाजी, उदाजी व केरोजी या पवार बंधूंना निजामाने द्यावित

१०. शहागडाचे वतन व पाटीलकी ही पिलाची जाधवास पूर्वीप्रमाणे मिळावी.

**पालखेडच्या विजयाचे महत्त्व :**

वरील तहाच्या अटी निजामाने मान्य करून पेशवे बाजीरावांबरोबर समेट घडवून आणला. बाजीरावानी मिळवलेल्या विजयाचे महत्त्व तहातील अटीवरून आपणास दिसून येते. कारण बाजीरावांनी गनिमी काव्याने मिळवलेल्या पालखेड विजयाचे फार मोठे महत्त्व होते. ज्या चौथाई व सरदेशमुखीच्या सनदास निजामाने विरोध केला त्याच गोष्टीस त्याला मान्यता द्यावी लागली होती. पेशवे बाजीरावांचे सामर्थ्य सर्वांना कळून आले. मुगल बादशहाला भारी पडलेला निजाम या विजयामुळे पराभूत झाला. बाजीराव व निजाम यांच्यामधील वयाचे अंतर लक्षात घेता बाजीरावांच्या या विजयाचे महत्त्व जास्तच वाढते. छत्रपती शाहू महाराजांना पदच्युत करून संभाजीला मराठ्यांचा छत्रपती बनवण्याचा कुटील डाव जो निजामाने टाकला होता तो डाव यामुळे फसला गेला. कान्होजी भोसले, उदाजी चव्हाण, चंद्रसेन जाधव या राजद्रोही सरदारांना मोठी चपराक बसली हा या विजयाचा एक महत्त्वाचा भाग होता. तर छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारातील प्रतिनिधी, सुमंत, दाभाडे या महाराजांच्या सरदारांवर बाजीरावांचा मोठा वचक निर्माण झाला. पालखेडच्या विजयाचे सर्वात मोठे यश म्हणजे छत्रपती शाहू महाराजांचा बाजीरावांवरील विश्वास अधिकच वाढला. पेशवे बाजीरावांची युद्ध शैली, गनिमी युद्धनीती यामुळे त्यांचे नाव हिंदुस्थानभर झाले. पालखेडच्या विजयानंतर बाजीरावांनी मराठा सत्तेच्या विस्तारावाढीचे क्षेत्र उत्तरेस आहे हे जाणून आपले लक्ष माळवा व बुंदेलखंडाकडे वळविले. अशाप्रकारे बाजीराव निजाम संबंधांमध्ये पेशवे बाजीरावांनी अत्यंत हुशारीने निजामाचा पुरता बंदोबस्त करून त्याचा मोड केला.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा

१. .......... येथे पेशवे पहिले बाजीराव यांना पेशवे पदाची वस्त्रे देण्यात आले

अ) सातारा ब) मसूर क) कराड ड) कोल्हापूर

२. सय्यद बंधूंच्या नाशास .......... जबाबदार होता

अ) निजाम उल मुल्क ब) मुबारीझखान

क) सरबुलंदखान ड) यापैकी नाही

३. .......... च्या लढाईत निजामाने बाजीरावांपुढे शरणागती पत्करली

अ) खांडवा ब) बाळापूर क) साखरखेड ड) पालखेड

४) बाजीराव व निजाम यांच्यात ..... साली मुंगी शेवगाव चा तह झाला

अ) १७२५ ब) १७२६ क) १७२७ ड) १७२८

५. .......... साली पहिले बाजीराव पेशवे यांचा जन्म झाला

अ) १७००　　　ब) १७०१　　　क) १७०२　　　ड) १७०३

## २.२.२ (ब) उत्तरेकडील साम्राज्य विस्तार

पेशवे पहिले बाजीराव यांनी दक्षिणेबरोबरच उत्तरेत ही मराठी सत्तेचा मोठा साम्राज्यविस्तार केला. दिल्ली मोहीम आखून मराठी सत्तेचा उत्तर हिंदुस्थानात ही मोठा दरारा निर्माण केला. दरबारात विरोध करणाऱ्या मंडळींकडे लक्ष न देता स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर काळाचे महत्व ओळखून छत्रपती शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली मराठी सत्तेच्या विस्ताराच्या धोरणाचा त्यांनी अंगीकार केला. बाळाजी विश्वनाथ यांनी निर्माण केलेल्या राजकीय वलयापासून बाजीरावांनी सुरुवात करून अल्पावधीतच दिल्ली सुद्धा मराठी सत्तेच्या दृष्टिक्षेपात आणली. उत्तरेत मराठी सत्तेचे अनेकांशी हितसंबंध तयार करून मुगल सत्तेवर वचक ठेवण्यात बाजीरावांना मोठे यश मिळवता आले होते. मराठी सत्तेचा उत्तरेतील साम्राज्यविस्तार हा पेशवे पहिले बाजीराव यांच्या अफाट कर्तुत्वाचा, पराक्रमाचा, शौर्याचा, युद्ध नितिचा परिपाक होता. दिल्लीच्या मुघल सत्तेतील अस्थिर परिस्थितीचा फायदा घेऊन बाजीरावांनी उत्तरेतील साम्राज्य विस्ताराच्या माध्यमातून मराठी सत्तेचे साम्राज्यात रूपांतर केल्याचेच दिसून येते.

**माळव्यावर स्वारी :**

निजामाचा पालखेड युद्धात पराभव केल्यानंतर बाजीरावांनी उत्तरेकडे मराठा साम्राज्य विस्तार करण्याचे धोरण निश्चित केले. बाजीरावांचे हे धोरण छत्रपती शाहू महाराजांच्या दरबारातील प्रतिनिधी, सुमंत, भोसले यांना पसंत नव्हते. परंतु पालखेडच्या ऐतिहासिक विजयानंतर छत्रपती शाहू महाराजांची मर्जी बाजीरावांवर बसल्याने उत्तरेकडील साम्राज्य विस्ताराचा मार्ग मोकळा झाला होता. रिकामी झालेली मराठी राज्याची तिजोरी भरणे, दरबारातील वैयक्तिक हेवेदावे अथवा कटकारस्थानापासून दूर राहणे व मराठा राज्य वाढवणे इत्यादी कारणान्वये बाजीराव पेशव्यांनी उत्तरेकडील स्वारी निश्चित केली. बाजीरावांचे धोरण उत्तरेकडील प्रदेशात मराठा राज्य वाढविण्याचे असल्यामुळे त्यांनी १७२२-२३ मध्ये माळव्यात जाऊन मराठी सत्तेचे हितसंबंध दृढ केले होते. मल्हारराव होळकर, उदाजीराव पवार, रानोजी शिंदे यांची इंदोर, धार आणि ग्वाल्हेर येथे मराठा सत्ता केंद्र निर्माण केले. जयपूरचे राज्य मराठ्यांना पाठिंबा देणारे होते. माळव्यात गिरीधर बहादूर हा मुगली एकनिष्ठ सुभेदार होता त्याला तेथे त्याचा चुलत बंधू दयाबहादूर कामांमध्ये मदत करीत असे या दोघांनी बादशाही मदत मिळवून माळव्यातून मराठ्यांना हाकलून लावण्याचा चंग बांधला होता. होळकर व पवार घराण्यांनी त्याला दाद दिली नव्हती. सन १७२७ मध्ये कर्नाटक स्वाऱ्या व १७२८ मध्ये निजामा बरोबरील संघर्ष यामुळे बाजीरावांना माळव्याकडे लक्ष देता आले नव्हते. पण पालखेड युद्धातून मोकळे होताच बाजीराव पेशव्यांनी मराठ्यांचा दिल्लीतील वकील दादाराव भीमसिंग यांच्यामार्फत जयपुर च्या सवाई जयसिंग यांच्याकडे संधान बांधले. जयपूरचा सवाई जयसिंग व माळव्याचा गिरीधरबहादूर यांच्यामध्ये शत्रुत्व होते. त्याने बाजीरावांना उत्तरेकडे यावे असा निरोप दिला त्यामुळे जयसिंग मराठ्यांच्या विरोधात जाणार नाही ही बाब निश्चित झाली. बाजीराव पेशवे संधीची वाटच पाहत होते. ही संधी मिळताच बंधू चिमाजी आप्पासह बाजीरावांनी  माळव्याची मोहीम हाती घेतली.

**आमझेर्याची लढाई (२९ नोव्हेंबर १७२८)**

उत्तरेकडील स्वारी चिमाजी आप्पा व बाजीराव पेशवे यांनी दोन वेगवेगळ्या मार्गाने सुरू केली. चिमाजी अप्पा हा बागलाण खानदेश मार्गे पश्चिम बाजूने माळव्यात शिरला तर बाजीराव पेशवे वऱ्हाड, चांदा देवगड या पूर्वेकडील मार्गाने माळव्याकडे सरकू लागले. चिमाजी आप्पा बरोबर बाजी भीमराव रेडकर, गणपतराव मेहंदळे, नारोशंकर, अंताजी माणकेश्वर आणि गोविंद पंत बुंदेले इत्यादी सरदार बरोबर होते तर पेशवे बाजीरावांबरोबर पिलाची जाधव, सरलष्कर दावलजी सोमवंशी होते. शिवाय उत्तरेकडील पवार, होळकर व शिंदे सामील झाले होते. रस्त्यात पत्रव्यवहाराद्वारे चिमाजी आप्पा व पेशवे बाजीराव परस्परांना आपल्या हालचालींची माहिती कळवीत होते.

माळवा प्रांतात मराठ्यांना अनुकूल परिस्थिती होती. फक्त इंदूरचा नंदलाल मंडलोई हा दोलायमान स्थितीमध्ये होता. माळव्याच्या गिरीधरबहादूर यास मराठे येणार आहेत या पलीकडे फारशी कल्पना नव्हती. चिमाजी आप्पाने जलद गतीने हालचाली करून २९ नोव्हेंबर १७२८ रोजी धार संस्थानाजवळील आमझेरा या ठिकाणी माळव्याचा सुभेदार गिरिधरबहाद्दर यास गाठले. दोघात मोठी लढाई झाली त्यामध्ये गिरीधरबहादूर व त्याचा चुलत बंधू दयाबहाद्दर हे मारले गेले. मुगली सैन्याचा धुवा उडविला. मांडवगड चा किल्ला उदाजी पवार यांनी काबीज केला. या विजयाची बातमी बाजीरावास वाशिम येथे कळाली. या विजयामुळे दोघा बंधूंचे नाव सर्वत्र झाले. या विजयामुळे उत्तरेकडील साम्राज्य विस्ताराचा महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. पुढे चिमाजी आप्पाने उज्जैनला वेडा घातला. माळव्यात सरदारांच्या मार्फत प्रशासन व्यवस्था लावून दिली. सवाई जयसिंग विंध्य प्रदेशातील कोळी लोक नंदलाल मंडलोई यांच्या पाठिंबामुळे मराठ्यांना माळव्यात चांगले बस्थान बसविता आले. चिमाजी आप्पाच्या सैन्याने अनेक लढाया करून माळव्यातील मुघल ठाणेदारांकडून खंडण्या वसूल केल्या. उज्जैन व शिरोज शहरे सोडून सर्व माळवाभर मराठ्यांनी मुघलांना पराभूत केले. याच वेळी बुंदेलखंडावर महमदखान बंगश याने हल्ला केल्याने तेथील प्रमुख राजा छत्रसाल याने बाजीरावांकडे मदतीची याचना केली. त्यामुळे बाजीराव आता छत्रसालच्या मदतीला जाण्यास बुंदेलखंडाकडे निघाले.

**बुंदेलखंडातील घडामोडी :**

हिंदुस्तानच्या उत्तरेकडील प्रदेशात यमुना व नर्मदा नद्यांच्या धुवाबाच्या प्रदेशात बुंदेलखंड विस्तारलेला आहे. हा प्रदेश डोंगराळ व कठीण चढउतारांचा आढळतो. येथे राहणारे रजपूत लोक शूर आणि धाडसी होते. बुंदिले या रजपूत जमातीवरून बुंदेलखंड असे नाव पडले. एकाच वंशातील अनेक लोक येतील विविध प्रदेशांवर राज्य करीत. या प्रदेशात चंपतराय हे छत्रसालचे वडील अतिशय शूर, पराक्रमी व हिंदू धर्माभिमानी होते. मुगल सम्राट जहांगीरच्या मृत्यूनंतर तेथील बुंदेली सरदाराने चंपतरायच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन दिल्लीची सत्ता जुगारून देण्याबाबत प्रयत्न चालू केले. सण १६६१ रोजी चंपतरायच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलाने छत्रसाल याने मुगली चाकरी सुरू केली. त्यानंतर छत्रसाल सोळा वर्षांचा असताना मिर्झा राजा जयसिंग यांच्या सैन्याबरोबर दक्षिणेत आला. तो छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वतंत्र राज्य सत्तेच्या कार्याने अत्यंत प्रभावीत झाला होता. त्याने छत्रपती शिवाजी महाराजांची भीमा नदीकाठी भेट घेतली होती. छत्रसाल

बुंदेलखंडात परत आल्यावर तो आपल्या वडिलांचे अपूर्ण काम पूर्ण करण्याच्या कामाला लागला. छत्रपती शिवाजी महाराजांपासून स्फूर्ती व प्रेरणा घेतली. औरंगजेब दक्षिण स्वारीत गुंतला असताना छत्रसालने बुंदेलखंडात स्वतःचे राज्य स्थापन करण्यात यश मिळवले. बुंदेलखंड मुघलांच्या अलाहाबाद सुभ्यात येत असल्यामुळे तेथील मुघल सभेदार महंमदखान बंगश याने छत्रसालावर आक्रमण केले.

**बाजीरावांची छत्रसालला मदत व बंगशचा पाडाव :**

बुंदेले सरदारांचा बिमोड करण्यासाठी १७२६ ला बादशहाने महमदखान बंगश ची अलाहाबाद सुभेदारीवर नेमणूक केली. त्याने फेब्रुवारी १७२७ मध्ये बुंदेलखंडात हालचाली सुरू केल्या. अनेक ठाणी काबीज केली. छत्रसालचा अनेक ठिकाणी पराभव ही केला. छत्रसालने जून १७२८ मध्ये जैतपूर येथील किल्यामध्ये आश्रय घेतला. महम्मद बंगशने जैतपूर किल्ल्याला वेडा घातला. छत्रसाल महंमद बंगषाच्या कैदेत सापडला. छत्रसालने तेथूनच पत्र पाठवून बाजीरावांकडे मदत मागितली. तेव्हा अत्यंत वेगाने बाजीराव १२ मार्च १७२९ रोजी बुंदेलखंडातील महोबा येथे पोहोचले. याचवेळी छत्रसाल चा मुलगा बाजीरावास येऊन मिळाला. त्याचे दुसरे दिवशी छत्रसालने आपली कैदेतून सुटका करून घेतली. पुढे बाजीरावांची छत्रसालने भेट घेतली व महंमद बंगशाविरोधातील मोहिमेचा आराखडा तयार केला. जैतपूरच्या विजयाच्या धुंदीत बंगश होता. ३० मार्च १७२९ रोजी बाजीरावांनी त्यास गाठले. जैतपूरच्या किल्ल्यास मराठा सैन्याने वेडा घातला. बंगशाची रसद तोडली. मुगली सैन्य उपासमारीने तडफडू लागले. याच वेळी काशीमखान हा आपल्या बापाच्या मदतीला आला. त्यास मराठी सैन्याने जैतपूर किल्ला जवळ पराभूत केले. बंगशास दिल्लीहून कोणतीही मदत मिळाली नाही. अखेरीस त्याने बाजीरावांपुढे शरणागती पत्करली व पुन्हा छत्रसाल यास त्रास देणार नाही असे त्याच्याकडून वचन घेऊन बंगशाला सोडण्यात आले. जैतपुर च्या लढाईत बाजीरावांना उत्तम घोडे, हती व युद्ध साहित्य, संपत्ती मिळाली.

बाजीरावांनी केलेल्या या मोठ्या मदतीबद्दल छत्रसालने कृतज्ञता व्यक्त करून त्यास आपला तिसरा पुत्र मानले. मोठा दरबार भरवून बाजीरावांचा भव्य सत्कार केला. आपली मुले हिरदेश व जगतराज यांचा सांभाळ बाजीरावांनी करावा असे सुचविले. छत्रसालने आपल्या राज्याचे तीन भाग केले पैकी ४२ लाख वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश हिरदेसला, ३६ लाख वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश जगतराजला व तिसरा हिस्सा ३३ लाख वार्षिक उत्पन्नाचा प्रदेश बाजीरावांना दिला. त्यामध्ये काल्पी, सागर झाशी, सिरोंज, कुंच व हरदेनगर इत्यादी महत्त्वाचा प्रदेश होता. मे १७२९ रोजी बाजीराव बुंदेलखंडातून साताऱ्याकडे परत निघाले. छत्रसालाने आपल्या मृत्यूपूर्वी चे मृत्युपत्र केले त्यात वरील बाबींचा समावेश होता. पुढे दोन वर्षांनी छत्रसालचा मृत्यू १७३१ रोजी झाला. पुढे बुंदेलखंडातील प्रदेशाची व्यवस्था चिमाजी आप्पा ने लावली. त्याने या प्रदेशावर गोविंदपंत बुंदेले यांची नेमणूक केली.

- **अंतर्गत यादीवी : कोल्हापूरकर संभाजी**

छत्रपती शाहू महाराज हे मुगल कैदेतून सुटून आल्यापासून ताराबाई यांनी त्यांना विरोध चालू ठेवला होता. त्यातूनच मराठा राज्याच्या दोन स्वतंत्र गाद्या स्थापन झाल्या. राजसबाई व संभाजी यांनी कोल्हापूरची

गादी ताब्यात घेतली पण निजामाच्या कारस्थानास बळी पडून संभाजीने शाहू महाराजांच्या चौथाई व सरदेशमुखी सनदांवर हक्क सांगण्यास सुरवात केली. त्यातूनच संभाजीने १७२५-२६ ला शाहू महाराजांबरोबर संघर्ष केला. संभाजीचा बंदोबस्त करण्यासाठी १७२९ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी शिदोजी थोरात, दावलजी सोमवंशी व रानोजी घोरपडे यांना संभाजी वर पाठवले पुढे शुंरसिंह जाधव व प्रतिनिधीने संभाजीचा सरदार उदाजी चव्हाण यांचा पराभव केला व ताराबाई राजसबाई संभाजीचे कुटुंब भगवंतराव अमात्य तसेच व्यंकटराव घोरपडे यांना पकडले. ताराबाईस साताऱ्याच्या अजिंक्यतारा किल्ल्यावर ठेवले. व्यंकटराव घोरपडे यांची सुटका करण्यात आली. उदाजी चव्हाण शरण आला. त्यानंतर संभाजी छत्रपती शाहू महाराजांना शरण आला. २७ फेब्रुवारी १७३१ रोजी शाहू महाराज व संभाजींची भेट झाली व १३ एप्रिल १७३१ रोजी वारणेचा तह घडून आला त्यानुसार

१. सातारा व कोल्हापूर या राज्याच्या सीमा वारणा नदी राहील.

२. वारणेच्या दक्षिणेकडील प्रदेश तुंगभद्रा नदीपर्यंतचा संभाजी कडे राहील.

३. परकीय संबंध संरक्षण या बाबी छत्रपती शाहू महाराजांकडे राहतील.

४. तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेश दोघांनाही मुलुखगिरीकरिता खुला राहील.

वारणेच्या तहानंतर संभाजींचे राज्य वारणा नदी ते तुंगभद्रा नदीपर्यंत मर्यादित राहिले. बाजीरावांच्या काळात हे प्रयत्न यशस्वी झाल्याने मराठी सत्तेतील अंतर्गत यादवी समाप्त झाली व शाहू महाराजांची प्रतिष्ठाही वाढली. परिणामी दक्षिणेतील मराठ्यांचा गृहकलह संपल्याने पेशवे बाजीरावांना उत्तरेकडील राजकारणात लक्ष घालता आले.

**दाभाडे प्रकरण :**

छत्रपती शाहू महाराजांचा सेनापती खंडेराव दाभाडे १७२९ रोजी मरण पावला त्यानंतर शाहू महाराजांनी त्यांचा मुलगा त्र्यंबकराव दाभाडे यास ८ जानेवारी १७३० रोजी सेनापती पद दिले. बाजीराव पेशवे झाल्यानंतर त्यांनी पेशवेपद व सेनापतीपद ही दोन्ही पदे स्वतःकडे घेतली. छत्रपतींनी गुजरात व खानदेश हे सेनापतीचे कार्यक्षेत्र ठरवून दिले होते. १७२५ पासून पेशव्यांच्या स्वाऱ्या गुजरातमध्ये होऊ लागल्या. गुजरातमध्ये मराठा सत्तेचे पाय रोखण्याचे काम दाभाडे, गायकवाड व कदमबांडे या सरदारांनी केलेले होते. १७३० रोजी चिमाजी आप्पाने गुजरातवर स्वारी करून सरबुलंदखान या गुजरातच्या मुघल सभेदाराकडून त्या प्रांताची चौथाई व सरदेशमुखी चे हक्क घेतले. शाहू महाराजांनी दाभाडे यांना गुजरात हा त्यांचे कार्यक्षेत्र म्हणून दिला असल्याने साहजिकच हे आपल्यावर अतिक्रमण आहे असे दाभाडे सरदारांना वाटले. त्यातच बाजीरावांच्या पालखेड माळवा व बुंदेलखंडातील विजयामुळे दाभाडे बाजीराव यांचा द्वेष करू लागले होते. दाभाडे यांची सुरुवातीला सत्याची बाजू होती पण पुढे त्यांनी बाजीरावांच्या द्वेषातून निजामाकडे संधान बांधले पण याची शाहू महाराजांना खबर लागतात त्र्यंबकरावास आणण्याकरिता आपली माणसे तळेगावात पाठवली परंतु तो आला नाही. दोघांना दरबारात बोलावून भांडण मिटवण्याचा छत्रपती शाहू महाराजांचा प्रयत्न यशस्वी झाला नाही. दाभाडे तळेगावहुन आपल्या फौजेसह गुजरात कडे गेले. त्यांनी तेथून निजामाकडे मदत

मागितली निजामाने मिळालेल्या संधीचा फायदा घेऊन त्र्यंबकरावास मदत करणे, फुटीर मराठा सरदारांना एकत्र करणे व माळव्याचा सुभेदार महंमदखान बंगश यास घेऊन मराठ्यांना पराभूत करणे अशी योजना आखून नर्मदेकडे निघाला. यावेळी बाजीरावांनी निजामाच्या व दाभाडे यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवली. या तिघांना एकत्र येऊ न देता दाभाडे यांचा निकाल लावणे जरुरीचे होते म्हणून १० ऑक्टोबर १७३० रोजी बाजीराव चिमाजी आप्पांसह निघाले. गुजरातचा मुघल सुभेदार अभयसिंह हा नुकताच सुभेदारीवर हजर झालेला होता. निजामाची महत्वकांक्षा अभयसिंहास माहीत असल्यामुळे गुजरात वर निजामाचा डोळा असल्याने अभयसिंहाने सावध पवित्र घेतला. त्याने बाजीरावा बरोबर मैत्री करून मदत करण्याचे मान्य केले

यावेळी निजाम नर्मदेवर पोहचला त्याने महंमद खान बंगशाबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. त्र्यंबकराव दाभाडे पस्तीस हजार सैन्यासह भिल्लापूरच्या मैदानावर लढाईच्या तयारीने उभा होता. लढाईपूर्वी सामोपचाराचा मार्ग बाजीरावांनी अवलंबला परंतु यश आले नाही. १ एप्रिल १७३१ रोजी बाजीराव त्रिंबकराव दाभाडे वर तुटून पडले ही लढाई मोठ्या चुरशीने लढली गेली. लढाईच्या वेळी गोळी लागून त्रिंबकराव खाली पडला. त्याची फौज पळून गेली. बाजीरावांना मोठा विजय मिळाला. पेशवे बाजीरावांच्या आयुष्यातील दाभाडे प्रकरण ही घटना गंभीर होती. कारण मराठा सरदारात फूट पाडून निजामाने बाजीरावास एकटे पाडण्यात यश मिळवले होते. पण अचूक निर्णय क्षमता, दूरदृष्टी, राजनीति, मोठी तडफ याच्या जोरावर बाजीरावांनी निजामाचे कारस्थान उधळून लावले. यानंतर त्याला मराठ्यांच्या मधील दुहीचा फायदा कधीच घेता आला नाही. उत्तरेकडील मराठ्यांच्या यशस्वी विजयी हालचाली हाताशपणे पहाण्यापलीकडे तो काहीही करू शकत नव्हता. छत्रपती शाहू महाराजांनी पुढील काळात त्र्यंबकरावांचा बंधू यशवंतराव यास सेनापती म्हणून नेमले. तरी त्र्यंबकराव ची आई उमाबाई ही पेशव्यांशी असलेले वैर विसरली नाही. छत्रपतींनी उमाबाईस सातारला आणून तिचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला. गुजरातमध्ये दाभाडे घराणे मागे पडून गायकवाड यांचे घराणे पुढे आले. अशा रीतीने दाभाडे प्रकरणाचा निकाल लागला.

**बाजीराव–निजाम भेट (१७३२)**

गुजरात, माळवा व बुंदेलखंडातील मराठ्यांच्या हालचालीस कसा पायबंद घालावा हे मुघल बादशहाला समजनासे झाले तेव्हा सवाई जयसिंग, मिरबक्षी खानदौरान यांनी बादशहाला सल्ला दिला की, मराठ्यांबरोबर मैत्रीचे संबंध ठेवून मुघल साम्राज्याचे पतन थांबवावे. पण हा सल्ला बादशहाला पटला नाही. माळव्यात मल्हारराव होळकर, रानोजी शिंदे यांच्याबरोबरच्या संघर्षामध्ये तेथील सुभेदार महमद खान बंगश अपयशी होत आहे असे दिसताच मुगल बादशहाने १७३२ रोजी जयसिंगास माळव्याच्या सुभेदारीवर पाठविले. उत्तरेत अशा प्रकारे हालचाली होत असताना दक्षिणेमध्ये निजाम बाजीरावांच्या भेटीसाठी धडपडत होता. बाजीरावांनी त्र्यंबकराव दाभाड्यांवर जो विजय मिळवला तेव्हापासून निजामाने नमते घेण्यास सुरुवात केली. आपण एकमेकांचे शेजारी असून आपल्यामध्ये कायम संघर्ष चालू असणे ही गोष्ट योग्य नाही याची त्याला जाणीव झाली. निजामाच्या वारंवारच्या अर्ज विनंतीमुळे छत्रपतींच्या आग्रहाखातर २७ डिसेंबर १७३२ रोजी लातूर जवळ रोहेरामेश्वर येथे बाजीरावांनी निजामाची भेट घेतली. निजामाने बाजीरावांचे मोठे स्वागत

केले. झालेल्या या गुप्त भेटीत मोठी चर्चा झाली व दक्षिणेत मराठा सरदारांनी चौथाई व सरदेशमुखी शिवाय निजामाला त्रास देऊ नये, मराठ्यांच्या उत्तरेकडील साम्राज्य विस्तारास निजामाने आडकाठी आणू नये, उत्तर मोहिमांवेळी निजामाने मराठ्यांना खानदेशातून जाऊ द्यावे, मराठ्यांनी खानदेशातून जाताना लूटालूट, पिकांची नासाडी करू नये यासारख्या गोष्टी ठरल्या.

**माळव्यातील मराठ्यांच्या हालचाली (१७३३ ते १७३६)**

जयसिंगाने मराठ्यांना माळव्यातून हाकलून लावण्याचा चंग बांधला होता. त्यांनी मराठ्यांविरोधात रजपूत संघ निर्माण केला. चिमाजी आप्पाचे सलोख्याचे प्रयत्न निष्फळ ठरले. जयसिंगाचे आव्हान चिमाजी आप्पांनी स्वीकारले व युद्धाची तयारी केली. आनंदराव पवार या मराठा सेनानी ने अचानक हल्ला करून जयसिंगाला घेरले. मुगल बादशहाची मदत त्याला मिळाली नाही १७३३ साली त्याचा पराभव झाला. वसूल केलेल्या रकमे शिवाय जयसिंगाने आणखी सहा लाख रुपये देऊन आपली सुटका करून घेतली. पुढील काळात बादशहाने खानदौरान व वजीर कामरूद्दीनखान यांच्या नेतृत्वाखाली दोन मोहिमा मराठ्यांविरोधात पाठविल्या. मुगल सैन्याची संख्या दोन लाख होती तर महाराष्ट्रातून पेशवे बाजीराव व पिलाजी जाधव माळव्याकडे निघाले. होळकर, शिंदे मराठा माळवा प्रांतात होते. त्यांनी मारवाड, मेवाड, जयपुर पर्यंत प्रदेश जिंकला. मराठ्यांनी गनिमी कावा युद्ध पद्धतीने मुघलांना हैराण करून सोडले. २४ मार्च १७३५ रोजी मुगलांनी मराठ्यांना २२ लाख रुपये खंडणी दिली. वीस हजार मराठा सैनिकांनी दोन लाख सैन्य असणाऱ्या मुघलांवर अद्वितीय स्वरूपाचा मोठा विजय मिळविला. बुंदी, अजमेर, रुपनगर व मेडता इत्यादी शहरांमधून मराठ्यांनी मोठी रक्कम वसूल केली. तर उदयपूरच्या रानाने बाजीरावांची भेट घेऊन आपल्या दरबारात सत्कार करून प्रतिवर्षी चौथाईची रक्कम दीड लाख रुपये देण्याचे कबूल केले. याच वर्षी मुगल बादशहाने वजीर कामरूद्दिनखान, खानदौरान व सादरखान या तिघांना मराठा सैन्याचा समाचार घेण्यासाठी पाठवले या फौजेची तयारी होण्यापूर्वीच चिमाजी अप्पाने बुंदेलखंड पार करून कुरा, इटावा व काल्पी जिंकले. मराठ्यांच्या लष्करी ताकतीचा अंदाज आल्याने जयसिंगाने बादशहास माळव्याची सनद बाजीरावांना देऊन टाकावी अशी विनंती केली. ४ मार्च १७३६ रोजी जयसिंगाने मनोलपूर येथे बाजीरावांची भेट घेतली. मुगल बादशहाच्या संमतीने त्याने बाजीरावांना जयपूर सुभ्या मधून प्रतिवर्षी पाच लाख रुपये देण्याचे कबूल केले. तसेच माळवा व गुजरात प्रांतांच्या सनदा मिळवून देण्याचे आश्वासनही दिले. पुढे बादशहाने वेगळ्याच अटी मराठ्यांना कळविल्या त्या अटी तून मराठा-रजपूत संघर्ष लावून देण्याची मुघल बादशहाची योजना होती हे ओळखून बाजीरावांनी सदर अटी अमान्य केल्या व आपल्या काही अटी मुघलांकडे सादर केल्या पण या महत्त्वाच्या अटी मुगल बादशहाने मान्य केल्या नाहीत. तेव्हा शस्त्रबळावर त्या मागण्या मान्य करून घेणे बाजीरावांना भाग होते. त्यातूनच त्यांनी दिल्लीवर स्वारी करण्याची योजना आखली.

**बाजीराव पेशव्यांची दिल्लीवर स्वारी (१७३७)**

पेशवे पहिले बाजीरावांनी ८०००० फौजेसह नोव्हेंबर १७३६ मध्ये ऐतिहासिक दिल्ली मोहिमेस सुरुवात केली. अतिशय जलद गतीने बाजीराव भेलशास पोहोचले. तेथे त्यांनी होळकर, शिंदे यांच्याशी चर्चा करून

पुढील हालचालींची दिशा निश्चित केली. मराठा सरदारांना कामगिरी वाटून दिली. आपल्या हालचालीसाठी नर्मदा ते यमुना नद्यांच्या दुवाबाचा प्रदेश निश्चित केला. मुगल बादशहाने युद्धाची तयारी केली होती. वजीर कामरूद्दिनखान, खानदौरान, मीरहुसेनखान, सादतखान, शिवशिंगराजा इत्यादी मुघल सुभेदार, अधिकारी बादशाच्या सेवेसाठी आपापली फौज घेऊन तयार होते. बादशहाने निजामासही बोलाविले होते परंतु त्यास मराठा सैन्याने वऱ्हाडात गुंतवून ठेवले. मुघल फौजांची तयारी लक्षात घेऊन पेशवे बाजीरावांनी आपल्या लष्करामधील अवजड सामान छत्रसाल चा मुलगा जगतराज यांच्याकडे ठेवले. चंबळ खोऱ्यातील भदावरच्या राजा अनुराधसिंह यांनी बाजीरावांना विरोध केला. दोघात अटेर येथे युद्ध झाले त्यात अनुराधसिंहाचा पराभव झाला. त्याने वीस लाख रुपये व दहा हत्ती देऊन तह केला. या युद्धानंतर बाजीरावाने मल्हारराव होळकर व पिलाजी जाधव यांना नर्मदा व यमुदेच्या  दुआबात पाठवले. तेथील सुपिक प्रदेश मराठा सैन्याने उध्वस्त केला. इतमादपूर व फिरोजपुर शहरे लुटून मराठे आग्र्याजवळ पोहोचले. मराठा सैन्याच्या या हालचालीमुळे इटावा येथून सादतखान वेगाने येऊन त्याने मल्हारावांच्या सैन्यावर आकस्मित हल्ला केला. या हल्ल्यात अनेक मराठा सैनिक कामी आले. सादत खानाच्या तडाख्यातून वाचलेले होळकरांचे सैन्य मार्च १७३७ मध्ये कोटला येथे बाजीरावांच्या सैन्यास येऊन मिळाले.

मार्च १७३७ च्या अखेरीस सादतखान, महंमदखान बंगश व खानदौरान यांच्या फौजा आग्र्याजवळ एकत्र आल्या. बाजीरावांनी दिल्ली आसपासची उपनगरे जाळून टाकण्याचा बेत केला. दहा दिवसांचे अंतर बाजीरावांनी केवळ दोन दिवसातच कापले. यावेळी बादशाही फौजा गाफील होत्या. त्याचा फायदा घेऊन बाजीरावांनी थेट दिल्लीवरच धडक मारली. २८ मार्च १७३७ रोजी उपनगरामध्ये लूटा लूट केली ही लूटालुट दोन दिवस चालली. बाजीरावांच्या दिल्लीवरील धडकेने बादशहाने आगरा येथे पळून जाण्याची तयारी केली. बादशहाने राजधानीचे रक्षण करण्याकरिता घाई करून एक सैन्य तुकडी बाजीरावांवर पाठवली. शिंदे, होळकर व पवार यांनी या तुकडीला पराभूत केले. यात मुघलांचे मीरहसन कोका शिवसिंहराजा मारले गेले. या घटनेमुळे मुघल बादशाच्या मनात बाजीरावांबद्दल मोठी भीती निर्माण झाली. आग्र्याजवळ असलेल्या सादतखानास दिल्लीवर मराठा सैन्याने आक्रमण केले आहे ही बातमी समजताच तो द्वेषाने दिल्लीकडे निघाला. मुगल सैन्य एकत्र येण्यापूर्वीच बाजीरावांनी ३१ मार्च १७३७ रोजी दिल्ली सोडली. मुघल सैन्यास बाजीरावांचा पाठलाग करणे जमले नाही. मुघल दरबारातील तुरानी सरदारांचे मत चुकीचे होते. तर जयसिंग व खानदौरान यांचे मत मराठ्यांशी मैत्री संपादन करणे हेच हिताचे आहे असे होते हे मुघल बादशहाला कळून चुकले. मुगल बादशहाला सिंहासनावरून दूर सारून त्या सिंहासनावर बसण्याची छत्रपती शाहू महाराजांची मानसिक तयारी नव्हती कारण बादशाही बद्दल वाटणाऱ्या आदरामुळे बादशाही वाचली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या हिंदूपदपातशाही बद्दलच्या संकल्पनेला छत्रपती शाहू महाराज आणि बाजीराव पूर्णपणे विसरले. दिल्लीच्या वेशीजवळ जाऊनही पेशवे बाजीरावांची स्थिती महाभारतातील अर्जुनासारखी झाली. हे सांगताना इतिहासकार शेजवलकर असे म्हणतात की, मुगल बादशहाला मराठ्यांचे अस्तित्व दाखवण्यासाठी दिल्लीचे पुरे जाळावयास जो बाजीराव दिल्लीच्या जवळ मुगलांची तीन सैन्ये चुकवून जातो तो तिथे पोचल्यावर अर्जुनाप्रमाणे कुंठीत होताना दिसतो. तेथे गेल्यावर सुचते की, पुऱ्यास आगी देऊन खाक शहर करावे, त्यास

दिल्ली महास्थळ, बादशाह बरबाद झालीयास फायदा नाही. संधी मिळूनही बाजीरावांनी दिल्लीचे तक्त खालसा केले नाही. या पाठीमागे पातशाही रक्षावी या छत्रपती शाहू महाराजांच्या धोरणाचा एक भाग असावा असे इतिहासकार म्हणतात.

**भोपाळची लढाई व निजामाचा पराभव (१७३८)**

बाजीरावांनी दिल्लीवर धडक मारल्याने मुगल दरबारातील कोणत्याही उमराव, सरदारात बाजीरावांना प्रतिकार करण्याचे कौशल्य नव्हते. परिणामी बादशहाने दक्षिणेतून निजामाला परत दिल्लीला बोलावून घेतले. १७३७ च्या जुलैमध्ये निजाम दिल्लीत पोहोचला त्याचे बादशहाने मोठे स्वागत केले. आपल्या दरबारातील श्रेष्ठ उमराव म्हणून त्याचा गौरव करून त्यास आसफजहाँ ही पदवी दिली. मराठ्यांचा नाश करण्यासाठी मुघल बादशहाने निजामास एक कोटी रुपये व पाच सुभ्यांचा कारभार दिला. तसेच निजामपुत्र गाजिउद्दीन यास आग्रा व माळवा यांची सुभेदारी देऊ केली.

उत्तरेकडील मुगल बादशाच्या हालचाली पेशवे बाजीरावांच्या कानावर येत होत्या. अशा काळात पश्चिम किनारपट्टीवर मराठा पोर्तुगीज संघर्ष चालू झाला होता. अशा बिकट स्थितीत ८० हजारांची फौज गोळा करून बाजीरावांनी ऑक्टोबर महिन्यात उत्तरेकडे कूच केली. निजाम पुत्र नाशीरजंग हा दक्षिणेतून लष्करासह आपल्या पित्याच्या मदतीला निघाला. या नाशीरजंगाची वाट अडवून धरण्यासाठी बाजीरावांनी चिमाजी आप्पास तापी नदीच्या काठी वारणगाव येथे ठेवले. निजाम ३०००० फौजेसह मोठा तोफखाना घेऊन दिल्लीहुन बुंदेलखंडाकडे निघाला. त्याने बुंदेलखंड जिंकले. यावेळी मराठी फौजेने गनिमी कावा युद्ध पद्धतीचा अवलंब करून निजामाला त्याच्या सैन्यासह बाजीरावांच्या जाळ्यात आणून सोडले. मराठी फौजे जवळ अवजड युद्ध साहित्य नसल्याने जलद हालचाली करणे शक्य झाले तर निजामाची पंचायत झाली. अवजड तोफखान्यामुळे त्यास जलद हालचाली करता आल्या नाहीत. गनिमी काव्याने हैराण झालेल्या निजामाने भोपाळ शहरात छावणी टाकली. छावणीसाठी निजामाने सुरक्षित जागा निवडली छावणीच्या बरोबर मागे किल्ला, बाजूला मोठे तळे आणि समोर एक लहान नदी. परंतु ही बंदिस्त जागाच त्याच्या पराभवास कारणीभूत ठरली. निजाम हल्ला करू शकत नाही हे पाहून बाजीरावांनी निजामाची रसद बंद केली. निजामाला बाहेरून मदत देण्याचा प्रयत्न संफदरजंग व कोट्याचा राजा यांनी केला परंतु होळकर व पवार यांनी त्यांचा बंदोबस्त केला. निजामाची स्थिती मोठी नाजूक झाली. मुगल लष्कराची उपासमार होऊ लागली. छावणी सोडून तोफखाण्यावर भिस्त ठेवून निजाम बाहेर पडला परंतु दिवसाकाठी चार-पाच मैलांचीच मजल होऊ लागली. मराठी सैन्याने त्यास पुरते हैरान करून सोडले. अशा स्थितीमध्ये आपला पुत्र नाशीरजंग हा बुऱ्हाणपूर पर्यंतही पोहचू शकलेला नाही हे कळतच निजामाचा आतापर्यंतचा धीर सुटला आणि तो बाजीरावास शरण गेला.

**दुराई सराईचा तह (१७३८)**

जानेवारी १७३८ रोजी दुराई-सराई येथे तह घडून आला यातील महत्त्वाची कलमे पुढील प्रमाणे होती.

१. मुगल बादशाच्या सहीशिक्क्यानिशी माळव्याची सनद निजामाने मिळवून द्यावी

२.  नर्मदा-यमुना नद्यांच्या दुआबाच्या प्रदेशातील वसुलीच्या सनदा मिळवून द्याव्यात

३.  मुगल बादशाच्या खजिन्यातून मराठ्यांना ५० लाख रुपये द्यावेत

बादशहा निजामाकडे आपला संरक्षक म्हणून पाहत होता पण त्याच निजामाचा असा दारून पराभव पहाणे बादशाच्या नशिबी आले. मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा वाढली, दरारा वाढला, दबदबा वाढला. पण निजामी सत्ता पूर्णपणे नष्ट करण्याची ही आणखी एक संधी बाजीरावांनी वाया घालवली. शाहू महाराजांच्या धोरणामुळे निजामाला वारंवार जीवदान मिळाले. पालखेड, भोपाळ येथील विजयामुळे बाजीरावांचे नाव सर्व हिंदुस्थानावर झाले. भोपाळ विजय बाजीरावांच्या साम्राज्यविस्तार धोरणाचा मोठा विजय होता. भोपळ्याच्या युद्धात बाजीरावांनी असामान्य युद्ध कौशल्य दाखवले यासंदर्भात डॉ. दिघे असे लिहितात की, भोपाळचा विजय हा पेशवे बाजीरावांच्या जीवनातील सर्वोच्च बिंदू होता. या विजयाने मराठा सैनिकांचे युद्ध श्रेष्ठत्व सिद्ध होऊन नवीन साम्राज्यवादी मोठ्या सत्तेचा उदय झाला. तर डॉ. सिन्हा लिहितात की, हा विजय बाजीरावांच्या एकूण कामगिरीचा मानबिंदू असून त्यांच्या साम्राज्यवादी धोरणाच्या परिपक्वतेचा निदर्शक होता.

**नादिरशहाची स्वारी (१७३९)**

१७३६ मध्ये नादिरशहा इराणच्या गादीवर अरुढ झाला. तो अफगाणिस्तानच्या काही प्रांतांतून बंडखोर इराणी जनतेला त्रास देत असे. त्यावेळी मुगल बादशाहीच्या प्रदेशात अफगाणिस्तानचा काही प्रदेश येत असे. इराण व अफगाणिस्तानच्या सीमेवरील बंडांमुळे नादीरशहा अस्वस्थ होत असे तर मुगल बादशहाला आपल्या वायव्यकडील सरहद्दी बाबत काही काळजी वाटत नव्हती. काबूलधील मुगल सुभेदार अकार्यक्षम व भ्रष्टाचारी होता. इराणमधील गुन्हेगारांना काबुलमध्ये आसरा व साह्य मिळते अशी नादिरशहाची तक्रार होती. परंतु मुगल बादशहाने या तक्रारीकडे कधीही लक्ष दिले नाही. तेव्हा आपल्या तक्रारीकडे मुघल बादशाह लक्ष देत नाही असे दिसताच नादिरशहाने मुगल बादशाह व त्याचे बदसल्लागार यांना शिक्षा करण्यासाठी हिंदुस्तान वर स्वारी केली. नादिरशहाने प्रथम अफगाणिस्तान वर हल्ला केला. कंदहार काबीज केले. १७३८ च्या जून मध्ये काबुलचा मुघल सुभेदार नाशीरखानाचा पराभव केला. त्यानंतर नादीरशहाणे मुगल बादशहाकडे आपला वकील पाठवून सीमेवरील बंडखोराचा बंदोबस्त करावा अशी विनंती केली परंतु त्याकडे मुगल दरबाराने लक्ष दिले नाही. त्यात निजाम व सादतखानाच्या आमंत्रणामुळे जोर चढून नादिरशहा पुढे सरकला. त्याने पेशावर व अटक ही शहरे जिंकली व लाहोरवर स्वारी केली. मुगल सभेदार इकारियाखान याचा पराभव करून १२ जानेवारी १७३९ रोजी लाहोर जिंकले. १८ जानेवारीस मुगल बादशहा जागा झाला. त्याने सैन्याची जमवाजमव करून दिल्लीपासून ८० मैलांवर असणाऱ्या कर्नाल या ठिकाणी छावणी टाकली.

लाहोर मध्ये विश्रांती घेऊन नादिरशहा पुढे निघाला. ५ फेब्रुवारीला सरहिंद जिंकून घेतले तर १३ फेब्रुवारीस मुघल सैन्याने इराणी सैन्यावर हल्ला केला. घनघोर युद्ध झाले यात मुगलांचा पराभव झाला. प्रचंड सैन्य मारले गेले. खाणदौरान मारला गेला तर सादतखान जखमी होऊन कैद झाला. मुगलांकडील १०० सरदार व ३०००० सैन्य कापले गेले. नादिरशहा बरोबरील युद्धात निजामाने भाग घेतला नाही. साधतखानाकडून नादिरशहाणे मुगल संपत्तीची माहिती मिळवली. पुढे तहाची बोलणी सुरू झाली. ५० लाख

रुपये घेऊन इराणला परत जाण्याचे नादिरशहाने कबूल केले होते. पण दरम्यान खानदौरान मेल्यामुळे मिरबक्षी पद रिकामे झाले त्या पदावर बादशहाने निजामास बसविले. सादतखान या पदावर टपून बसलेला होता. परंतु ते पद निजामास मिळाल्यामुळे तो निजाम व बादशाह यांचा द्वेष करू लागला. त्याने त्यांचा सूड घ्यावयाचा असे मनात ठरवले. सादतखानाने नादिरशहास सांगितले की, ५० लाख रुपये घेऊन जाण्यापेक्षा दिल्लीस गेला तर २० कोटी रुपये मिळतील. परंतु या कामात आपणास निजामाचा विरोध होईल. तोही लबाड, फुकटा, तत्त्वज्ञानी आहे. सादतखानाच्या २० कोटींच्या चेतावणीमुळे नादिरशाने बादशहाच्या छावणीला वेडा टाकला. निजामाला बोलावून कैद केले. वीस कोटी रुपये दिल्यास तुला सोडतो असे सांगितले. त्यानंतर मुगल बादशहाला नजर कैदेत ठेवून त्याची छावणी लूटली. मुगल बादशाह कामरूद्दीनखान व निजाम यांना कैद करून दिल्लीकडे प्रयाण केले. ७ मार्च १७३९ रोजी नादीरशहा दिल्लीत आला व दिल्ली जिंकली. सादतखानाला वीस कोटी रुपये आणून दे नाहीतर तुला ठार मारतो अशी धमकी दिली या धमकीमुळे सादतखान हादरला आपण टाकलेला डाव आपल्यावरच उलटल्याने त्याने विष प्राशन केले.

इराणचा नादिरशहा १० मार्च १७३९ रोजी दिल्ली सिंहासनावर बसला. त्याने दिल्लीत अत्याचार सुरू केला. व्यापारी, रहिवासी, मुघल सैनिक, अधिकारी यांच्या कत्तली झाल्या, लूट, जाळपोळ व बलात्काराचे सत्र सुरू झाले. नादिरशहाणे वजीर कामरूद्दिनखाना कडून एक कोटी रुपये वसूल केले. नादीरशहाने केलेल्या कत्तलीत ३० हजार लोक मारले गेले. मुगल बादशहाने केलेल्या दयायाचनेमुळेच कत्तल थांबवण्यात आली. दिल्लीत ५७ दिवस वास्तव्य करून शेवटी नादीरशहा इराणकडे निघून गेला. त्याने जाताना येथे केलेली लूट बरोबर नेली. रोकड व साहित्य मिळून जवळ जवळ १०० कोटींची लूट इराणला नेली. तत्पूर्वी त्याने मुगल बादशाहास पुन्हा गादीवर बसवले होते. इराणच्या शहाचा येथे कायम वास्तव्य करण्याचा इरादा नव्हता तर संपत्ती मिळवणे हाच या स्वारीचा मूळ हेतू होता असे दिसते. या स्वारीने मुघल सत्ता दुबळी आहे हे दाखवून दिले. यावेळी पेशवे बाजीराव पोर्तुगीजांबरोबर लढण्यात गुंतले होते. पण उत्तरेच्या प्रदेशात इराणच्या नादीरशहाने घातलेला गोंधळ कानावर येताच ते वसईची मोहीम चिमाजी अप्पांवर सोपवून उत्तरेकडे त्वेषाने निघाले. परंतु वाटेत बुऱ्हानपूरजवळ नादिरशहा परत फिरल्याचे त्यांना कळाले त्यामुळे नादिरशहाच्या बंदोबस्ताचे कार्य अपूर्ण राहिले. छत्रपती शाहू महाराजांनी नादीरशहाच्या स्वारी वेळी स्वीकारलेले धोरण चुकीचे होते. त्या धोरणावर इतिहासकार शेजवलकर यांनी कठोर टीका केली आहे की, छत्रपती शाहूंना यातील सूक्ष्म भेद करण्या इतके डोकेच नव्हते असे इतिहासावरून दिसते. जेव्हा कमी बुद्धीचा दुबळा व भित्रा माणूस गादीवर येतो तेव्हा पेशवाई सारखा गोंधळ त्यातून निर्माण होतो. शक्तीने व साहसाने बलाढ्य असलेले मराठे वस्तूता प्रभुच असावयाचे पण कायदेशीर दृष्ट्या प्रभु न होण्याचा निश्चय त्यांनी केला. या त्यांच्या धोरणामुळे पेशवाईत अनेक भानगडी निर्माण झाल्या व मराठ्यांचे राजकारण नासले हे इतिहासामुळे स्पष्ट होते.

दिल्लीच्या मुगल बादशहाला गादीवरून दूर करून शाहू महाराजांना दिल्लीच्या गादीवर बसविणे बाजीराव व त्यांच्या सहकाऱ्यांना शक्य होते. परंतु मुगल बादशहाच्या अडचणीच्या प्रसंगी सहाय्यास जाईन असे वचन औरंगजेब बादशाला शाहू महाराजांनी दिल्याने मुघल साम्राज्याची भव्य इमारत कायमची नष्ट करणे शाहू

महाराजांच्या मनात नव्हते. मुगल छावणीत बालपण ते तरुणपणापर्यंत त्यांचे वास्तव्य राहिल्याने त्यांच्यावर मुगल संस्कार झाल्याने मुगल सत्तेबाबत मनात एक प्रकारचा आदरभाव झाल्याने बादशाह अथवा बादशाही सुभेदार पूर्णपणे नष्ट करणे शाहू महाराजांच्या दृष्टीने दुःखदायी गोष्ट होती. त्यामुळे स्वतः छत्रपतींनाच दिल्ली सिंहासन नको होते तिथे इतर मराठ्यांच्या इच्छांना काहीच अर्थ नव्हता.

**नासिरजंगाचा पाडाव :**

मुंगी शेवगावच्या तहातील काही अटींची निजामा कडून पूर्तता झाली नव्हती. निजाम दिल्लीत होता तर त्याच्या दक्षिणेकडील प्रदेशाची व्यवस्था मुलगा नाशिरजंगकडे होती. नाशिरजंग ने पेशव्यांच्या प्रदेशात येऊन लुटालुट केली होती. या कारणामुळे बाजीरावांनी नाशिरजंगवर आक्रमण केले. चिमाजी अप्पा व बाजीरावांनी नाशिरजंगचा सतत पाठलाग केल्याने शेवटी त्याला औरंगाबाद मध्ये आश्रय घ्यावा लागला. नाशिरजंगाची रसद तोडली. परिणामी उपासमारीने नाशिरजंग शरण आला. त्यांने नर्मदेच्या दक्षिणेकडील हंडिया व खारगाव हे दोन जिल्हे बाजीरावांना दिले. अशा रीतीने बाजीरावांची ही स्वारी यशस्वी ठरली. परंतु ही स्वारी आपली शेवटची ठरेल असे बाजीरावांना त्यावेळी कधीच वाटले नव्हते. पुढे बाजीराव या नवीन प्रदेशाचा ताबा घेण्यासाठी उत्तरेकडे निघून गेले.

**बाजीराव पेशव्यांचा मृत्यू (२८ एप्रिल १७४०)**

बाजीराव पेशवे उत्तरेकडे जाण्यापूर्वी त्यांनी चिमाजी आप्पास पुण्याला पाठवले. आपला अंत काळ जवळ आला आहे याची बाजीरावांना जरा सुद्धा कल्पना नव्हती. बाजीराव मस्तानी प्रेमप्रकरणामुळे पेशवे कुटुंबात कलह सुरू झाला होता. त्यातच तत्कालीन कर्मठ समाजाने तेल ओतण्याचे काम केले. त्यामुळे चिमाजी व नानासाहेब यांनी मस्तानीला कैदैत टाकले होते. उत्तरेस गेलेल्या बाजीराव यांची वार्ता बरेच दिवस चिमाजीस कळाली नव्हती. त्यामुळे तोही अस्वस्थ झाला होता. चिमाजीने नानासाहेबास मस्तानीला कैदीतून मुक्त करावे अशी विनंती केली होती. आपल्या प्राणाप्रिय मस्तानीला आपण सोडवू शकत नाही याचेच बाजीरावास अति दुःख झाले. कारण बाजीरावास हा मोठा मानसिक धक्का होता. नवीन जहागीरची पहाणी चालू असतानाच त्यांना ताप येण्यास सुरुवात झाली व त्या तापामध्येच दिनांक २८ एप्रिल १७४० रोजी नर्मदेच्या नदीकाठी रावेर या ठिकाणी बाजीरावांचा मृत्यू झाला. मृत्यू समयी पत्नी काशीबाई व मुलगा जनार्दन हे उपस्थित होते. पेशवे बाजीरावांचा शेवट अतिशय शोकजनक मानला जातो. पुण्याला मस्तानीच्या वाड्यात ही बातमी समजताच या धक्क्यामुळे तिचा सुद्धा अंत झाला. तिने आत्महत्या केली की काय हे समजायला मार्ग नाही. पण बाजीरावांच्या या दुर्दैवी मृत्युने मराठ्यांच्या इतिहासातील एक झंझावती पर्व संपले असेच म्हणावे लागते.

अशाप्रकारे पेशवे पहिले बाजीरावांची कारकीर्द मराठी सत्तेच्या इतिहासात अजरामर झाली. बाजीरावांच्या कारकीर्दीत हिंदुस्थानच्या नकाशाचे स्वरूपच पालटले गेले. कारण केंद्रीय राजकारणाचा बिंदू दिल्लीकडून सातारा-पुण्याकडे सरकला होता एवढे महत्त्व बाजीरावांनी मराठा राज्यास प्राप्त करून दिले. बाजीरावांच्या पराक्रमामुळे व विस्तारवादी धोरणामुळे मराठी सत्तेचा मोठा साम्राज्यविस्तार झाला. दक्षिणेत

मराठी सत्ता सर्व बाजूंनी सुरक्षित ठेवतानाच त्यांनी निजामाचा पुरता बंदोबस्त तर केलाच पण मराठी सत्तेचा उत्तरेतही मोठा विस्तार केला. त्यांच्या कार्याविषयी इतिहासकार ग्रँड डफ म्हणतो की, बाजीरावांजवळ साम्राज्य विस्ताराच्या योजना पूर्ण करण्याकरिता सुपीक डोके होते व त्या योजना अमलात आणण्याकरिता पराक्रमी हात होते. तर इतिहासकार दिघे यांनी लिहिलेल्या बाजीराव आणि मराठ्यांचा साम्राज्य विस्तार या ग्रंथात बाजीरावांची भरभरून स्तुती केलेली आढळते. बाजीराव पेशव्यांच्या कार्याविषयी सर यदुनाथ सरकार असे लिहीतात की, पालखेड युद्ध, भोपाळ विजय, महम्मद बंगशावरील विजय, अथवा दिल्लीवरील स्वारीं मधून त्यांच्या नेतृत्वगुणांची साक्ष पटते. शत्रू पक्षाची कोंडी करणे, आडमार्गाने येऊन त्याला चकित करणे यात ते श्रेष्ठ होते. त्यांनी मराठा इतिहासात आपल्या पराक्रमाने एक युग निर्माण केले. यावरून पहिले बाजीराव पेशवे यांच्या कार्याची व मराठी सत्तेस दिलेल्या योगदानाची कल्पना येते.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

अ) योग्य पर्याय निवडून खालील रिकाम्या जागा भरा

१. बुंदेलखंडात बाजीरावांनी .......... यास मदत केली

अ) छत्रसाल ब) सवाई जयसिंग क) राणोजी शिंदे ड) चंपत राय

२. पेशवे बाजीराव यांनी .......... मध्ये दिल्लीवर स्वारी केली

अ) १७३६ ब) १७३७ क) १७३८ ड) १७३९

३. .......... साली पहिले बाजीराव पेशवे यांचा मृत्यू झाला

अ) १७३० ब) १७३५ क) १७४० ड) १७४५

४. इराणच्या नादीरशहाने .......... साली हिंदुस्थानवर स्वारी केली

अ) १७ ३६ ब) १७३७ क) १७३८ ड)१७३९

५. .......... येथे पहिले बाजीराव पेशवे यांचा मृत्यू झाला

अ) रावेर ब) राधानगरी क) राजगड ड) रायबाग

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. चौथाई– उत्पन्नाचा चौथा हिस्सा

२. सरदेशमुखी– उत्पन्नाचा दहावा हिस्सा

३. पेशवा– मुख्य प्रधान

४. सय्यद बंधू– हुसेनअली व हसनअली

५. दुआब –दोन नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश

६. चितळदुर्ग– चित्रदुर्ग

७. तह/ करार –समजोता

८. दरारा – वचक, दबदबा

९. गनिमी कावा– युद्ध पद्धती

१०. पातशाही –मुगल सत्ता

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न क्र.१ ची उत्तरे

१- ब. मसूर
२- अ. निजाम उल्क मुल्क
३- ड. पालखेड
४- ड. १७२८
५- अ. १७००

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१- अ. छत्रसाल
२- ब. १७३७
३- क. १७४०
४- ड. १७३९
५- अ. रावेर

## २.५ सारांश

मुगल केदेतून छत्रपती शाहू महाराजांची सुटका झाल्यानंतर शाहू महाराज व ताराबाई यांच्यात यादवी युद्ध घडून आले. त्यातूनच पुढे बाळाची विश्वनाथ यांचा मराठी सत्तेचा पेशवा म्हणून उदय झाला. १७२० मध्ये बाळाजी विश्वनाथाच्या मृत्यूनंतर त्यांचा मुलगा पहिला बाजीराव यांना छत्रपती शाहू महाराजांना पेशवाईची वस्त्रे देऊन विश्वास दाखविला. दरबारातील अनेक जाणकार मंडळींचा बाजीरावाच्या पेशवे पदास विरोध असतानाही छत्रपती शाहू महाराजांनी आपल्यावर दाखवलेला विश्वास पेशवे पहिले बाजीराव यांनी आपल्या कृतीने व महत्त्वपूर्ण योगदानाने सार्थ ठरविला. पेशवे बाजीराव पहिले हे उत्कृष्ट सेनापती होते, युद्ध कलेत निपुण होते, गनिमी कावा युद्ध पद्धतीत तरबेज होते, अतुल पराक्रमी होते, धाडसी होते आणि मुत्सद्दीही होते. त्यामुळेच त्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाखाली ताज्या दामाची फौज उभा करून मराठी सत्तेच्या बंडखोर सरदारांना व शत्रूंना वाटणीवर आणले. दक्षिणेच्या राजकारणात मराठी सत्तेला सतत उपद्रव देणाऱ्या निजामाचा दारुण पराभव करून पूर्ण बंदोबस्त केला. शिवाय परकीय सत्तांची आक्रमणे रोखून धरली. एवढेच नव्हे तर उत्तरेत मराठी सत्तेचा विस्तार करण्याच्या धोरणाचा स्वीकार करून मराठी सत्तेचा उत्तरेत मोठा विस्तार करून मराठी सत्तेचे साम्राज्यात रूपांतर केले. उत्तरेतील मुगल बादशावर मोठा दरारा निर्माण केला. ऐतिहासिक पालखेडचे युद्ध, भोपाळ वरील विजय, महंमद बंगशवरील विजय, दिल्ली वरील स्वारी यासारख्या विविध मोहिमांमधून पहिले बाजीराव पेशवे यांच्या नेतृत्व गुणाची, पराक्रमाची, कार्याची आणि महत्वपूर्ण योगदानाची साक्ष पटते.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१. पालखेडचे युद्ध
२. राजा छत्रसाल
३. सय्यद बंधू
४. मुंगी शेवगावचा तह
५. कर्नाटक मोहिमा

ब) दीर्घोत्तरी प्रश्न सोडवा

१. पेशवे पहिले बाजीराव व निजाम संबंधाची माहिती द्या

२. पेशवे पहिले बाजीराव यांच्या उत्तरेकडील धोरणावर चर्चा करा

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. डॉ. आप्पासाहेब पवार, ताराबाई कालीन कागदपत्रे खंड एक-दोन-तीन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७०.

२. गो. स. सरदेसाई, मराठी रियासत, खंड १ ते ८, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, २०१७.

३. स. मा गर्गे, करवीर रियासत, मराठी देशा फौंडेशन, कोल्हापूर, २०१७.

४. प्र. न. देशपांडे, मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस, पुणे, २००१.

५. जयसिंगराव पवार, मोगल मर्दानी महाराणी ताराबाई, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर, २०२३.

६. M.G. Ranade, Rise of The Maratha power, Kessinger Publication, 2010.

७. वि.का. राजवाडे (संपादक) मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ ते २२, चितळे प्रेस, पुणे, १९२३.


❑❑❑

## घटक ३
# बाळाजी बाजीराव व पानिपतचे तिसरे युद्ध (१७६१)

(Balaji Bajirao and the third battle of Panipat, 1761)

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ बाळाजी बाजीराव यांच्या उत्तरेकडील मोहिमा

 ३.२.२ पानिपतची तिसरी लढाई (१७६१)

३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्ट्ये

१. बाळाजी बाजीराव यांची माहिती समजून घेता येईल.

२. बाळाजी बाजीराव यांच्या उत्तरेकडील मोहिमांवर प्रकाश टाकता येईल.

३. बाळाजी बाजीराव यांच्या कार्यावर प्रकाश टाकता येईल.

४. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची कारणे समजून घेता येतील.

५. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे परिणाम समजून घेता येतील.

## ३.१ प्रास्ताविक

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात स्थापन केलेल्या स्वतंत्र मराठी स्वराज्याला विशेष महत्त्व आहे. तर पुढे मराठी सत्तेचे कारभारी पेशवे बनल्यामुळे पेशवे काळासही अनन्यसाधारण महत्व असल्याचे दिसून येते. पेशवेकाळ हा मराठी राज्याच्या विस्ताराचा काळ मानला जात असून पेशव्यांनी मराठ्यांची राजधानी म्हणून पुणे या शहराचा पाया घातला. त्यांच्या राज्यकारभाराचा महाराष्ट्राच्या विशेषता मराठी सत्तेच्या सर्वांगीण जीवनावरती विशेष परिणाम झाला, सर्वसाधारणपणे १७१३ ते १८१८ हा मराठी सत्तेच्या इतिहासात पेशवाईचा कालखंड मानला जातो. या कालखंडात अनेक पेशव्यांनी आपली कर्तबगारी,

पराक्रम, शौर्य व दूरदृष्टी दाखवली. मराठी सत्तेचा मोठा विस्तार केला. शिवाय उत्तर भारतात ही धबधबा निर्माण केला. पेशवे पहिले बाजीराव यांच्यानंतर पेशवे पदाच्या गादीवर आलेले बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांनी प्रारंभीच्या कालखंडात मनगटी बळाचा वापर करण्यापेक्षा बुद्धीच्यातुर्याच्या जोरावर आपली राजवट दैदीप्यमान केली. एवढेच नव्हे तर खऱ्या अर्थाने मराठी सत्तेचा झेंडा अटकेपार पोहोचवला. दक्षिणेकडील निजाम, हैदर अली, नबाब, परकीय सत्ता यांचा बंदोबस्त केला. चौथाई व सरदेशमुखी वसूल करून मराठी सत्तेतील विविध सुधारणा, लष्कर व संरक्षण यावरती लक्ष केंद्रित केले. पेशवे नानासाहेब हे मराठी सत्तेच्या इतिहासामध्ये राजकारण धुरंदर आणि उत्तम प्रशासक म्हणून ओळखले जातात. पण १७४० ते १७६१ या त्यांच्या कालखंडात नानांनी शेवटच्या टप्प्यात उत्तरेकडे अनेक मोहिमा काढून स्वराज्याचा विस्तार केला खरा पण दुर्दैवाने त्यातूनच ऐतिहासिक पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची पार्श्वभूमी तयार झाली. आणि १७६१ मध्ये पानिपत येथे झालेल्या अहमदशाह अब्दाली व मराठे यांच्यातील पानिपतच्या तिसऱ्या लढाईत पेशव्यांच्या नेतृत्वात मराठी सत्तेचा दारुण पराभव झाला. ही लढाई मराठी सत्तेच्या वाटचालीवर दीर्घकालीन परिणाम करणारी ठरल्यामुळे मराठी सत्तेच्या इतिहासात पानिपतच्या तिसऱ्या लढाईला महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसून येते. म्हणूनच सदर प्रकरणात आपण बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब यांच्या विशेषतः उत्तरेकडील मोहिमा आणि पानिपतचे तिसरी युद्ध यावर प्रकाश टाकणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

**बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे :**

२८ एप्रिल, १७४० रोजी नर्मदेकाठी रावेर येथे बाजीराव पेशव्यांचा मृत्यू झाला. यानंतर शाहू महाराजांनी बाजीरावांचा मुलगा बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब यांना पेशवाईची वस्त्रे २५ जून, १७४० रोजी बहाल केली. ते अत्यंत कुशाग्र बुद्धीचे, व्यवहारचतुर, मनमिळाऊ, निगर्वी अशा स्वभावाचे होते. पेशवेपद प्राप्तीच्या वेळी दरबारातील बाबूजी नाईक बारामतीकर, रघूजी भोसले, श्रीपतराव प्रतिनिधी अशा सरदारांनी नानासाहेबांच्या पेशवेपदाला विरोध केला. परंतु शाहू महाराजांनी या विरोधाचा विचार न करता नानासाहेबांना पेशवाईची वस्त्रे दिली. नानासाहेबांच्या पुढे अनेक प्रश्न उभे होते. त्याचबरोबर मराठी सत्तेचा राज्यविस्तार करणे हे त्यांचे मुख्य ध्येय होते. यासाठी आवश्यक अशी पावले उचलणे गरजेचे होते. त्या दृष्टीने विचार करून नानासाहेबांनी अटकेपर्यंत मराठ्यांच्या सैन्याची मजल मारली. माळव्याची सुभेदारी मिळविणे हेही महत्त्वाचे होते. नादिरशहाच्या स्वारीमुळे उत्तरेत मराठ्यांचा दबदबा कमी झालेला होता तो बाळाजींस पुन्हा निर्माण करावयाचा होता. दक्षिणेच्या राजकारणात निजामाची हालचाल सुरू झाली होती. त्यामुळे निजामाचा बंदोबस्त करून दक्षिणेत मराठी सत्तेचा विस्तार करावयाचा होता. पश्चिम किनारपट्टीवर सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्या हालचालींना पायबंद घालणे आवश्यक असून त्यासाठी बाळाजींना प्रयत्न करावे लागणार होते. मराठ्यांचे आरमार प्रमुख कान्होजी आंग्रे याच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलात वाटणी होऊनही वाद मिटला नाही. आंग्रे घराण्यातील वाद विकोपाला गेला. त्याचा बंदोबस्त करणे गरजेचे होते. अशा महत्त्वाच्या राजकीय उद्दिष्टांशिवाय मराठी राज्याची आर्थिक स्थिती नाजूक होती. त्यात सुधारणा

घडवून आणणे, यांसारखे महत्त्वाचे प्रश्न नानासाहेब पेशव्यांच्या पुढे होते. त्यांनी या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला.

**नानासाहेबांचा पूर्ववृत्तांत :**

लढवय्या बाजीराव पेशव्यांस बाळाजी, रघुनाथराव व समशेरबहाद्दूर (मस्तानीपुत्र) अशी तीन अपत्ये होती. १२ डिसेंबर, १७२१ रोजी बाळाजींचा जन्म झाला. बाजीरावांच्या मृत्यूच्या वेळी ते आंग्रे बंधूंचा तंटा मिटविण्यासाठी कोकणात गेले होते. त्याच वेळी शाहू महाराजांनी २५ जून, १७४० रोजी बाळाजींस पेशवाईची वस्त्रे दिली. त्या वेळी त्यांचे वय १९ वर्षांचे होते. त्यानंतर थोड्याच काळात बाजीरावांच्या यशाचा मुख्य भागीदार चिमाजी आप्पा यांचे निधन झाले. चिमाजी आप्पांच्या देखरेखीखाली बाळाजींचे शिक्षण झाले होते. लहानपणापासूनच त्यांना राजकारणातील बारकाव्यांची माहिती मिळत होती. वडिलांच्या राजकारणाचा त्यांना अनुभव होता. अनेक युद्ध मोहिमांमध्ये ते दाखल झाले होते. शाहू महाराज, मातब्बर सरदार यांचा त्यांना लहानपणापासूनच परिचय होता. प्रेमळ स्वभाव, आनंदी वृत्ती आणि कुशाग्रबुद्धी या त्यांच्या अंगभूत गुणांमुळे अनेकांची मने त्यांनी जिंकलेली होती. असे असले तरी बाजीरावांचे खंबीर नेतृत्व आणि शौर्य या बाबींची त्यांच्यात उणीव होती. मात्र त्यांच्यात व्यवहायचातुर्य व मुत्सद्दीपणा हे गुण होते. त्यांनी युद्ध मोहिमांवर न जाता मुत्सद्दीपणानेच त्या जिंकल्या.

नानासाहेबांच्या पेशवेपदास रघूजी भोसले व बाबूजी नाईक यांचा विरोध होता. रघूजी भोसल्यांनी शाहू महाराजांपुढे बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या नावाचा प्रस्ताव पेशवेपदासाठी ठेवला. याचे मुख्य कारण म्हणजे बाबूजी नाईक हा रघूजीचा मित्र होता. रघूजीचे शाहू महाराजांशी नात्याचे संबंध होते. शाहू महाराजांची पत्नी सगुणाबाई हिची बहीण रघूजीस दिलेली होती. शाहू महाराजांना संतान नसल्यामुळे रघूजीस आपल्या मुलास सातारच्या राजघराण्यात दत्तक घ्यावे असे वाटत होते. या कामगिरीसाठी त्यांना आपल्या बाजूचा पेशवा असणे गरजेचे वाटत होते. बाबूजी नाईक सावकार असल्यामुळे राज्यावरील कर्जाचे तो निवारण करील असेही त्यास वाटत होते. मात्र शाहू महाराजांना वंशपरंपरागत हक्काची कल्पना मान्य होती, त्याच तत्त्वाच्या आधारे त्यांनी बाळाजींस पेशवेपदाची सूत्रे दिली. त्या वेळी त्यांचे वय १९ वर्षांचे होते. त्यांचा मुतालीक म्हणून म्हादोबा पुरंदरे यांची नियुक्ती केली. बाळाजींच्या कारकिर्दीचे दोन भाग पाडले जातात. पहिल्या भागात पेशवेपदाच्या प्राप्तीपासून शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंतच्या म्हणजेच १७४० ते १७४९ पर्यंतच्या राजकारणाचा समावेश होतो. दुसऱ्या भागात १७५० पासून म्हणजे रामराजे महाराजांच्या कारकिर्दीपासून नानासाहेबांच्या मृत्यूपर्यंत म्हणजे १७६१पर्यंतचा समावेश होतो. यात प्रामुख्याने पानिपतचा युद्धसंग्राम ही महत्त्वाची घटना आहे. बाळाजींची कारकीर्द २१ वर्षांची झाली. त्यात ज्या अनेक घडामोडी घडल्या त्याचा वृत्तांत आपणास समजावून घ्यावयाचा आहे.

**कोल्हापूरच्या संभाजीशी गुप्त खलबते :**

बाळाजी पेशव्यांच्या कारकिर्दीचा आरंभ एका महत्त्वपूर्ण घटनेने सुरू झाला. आणि ती घटना म्हणजे कोल्हापूर आणि सातारा या मराठ्यांच्या दोन राज्यांच्या एकीचा केलेला प्रयत्न होय. शाहू महाराजांना संतती

नसल्यामुळे सातारच्या गादीच्या वारसाचा प्रश्न निर्माण होणार होता. रघूजी भोसल्याने त्या अनुषंगाने प्रयत्न सुरू केले होते परंतु त्याच्या मर्जीतील व्यक्तीला पेशवेपद मिळू न शकल्यामुळे त्याच्या प्रयत्नाला खीळ बसली होती. त्यामुळे कोल्हापूरच्या संभाजींकडेच सर्वांचे लक्ष केंद्रित झाले होते. त्याच अनुषंगाने संभाजी २ जून, १७४० ते २० मार्च, १७४१ या काळात सातारला शाहू महाराजांच्या भेटीसाठी सातारा मुक्कामी होते. मात्र शाहू महाराज व संभाजी यांचे फारसे सख्य नव्हते. त्याचप्रमाणे संभाजीस शाहू महाराजांच्या पश्चात गादीवर बसविण्याची कल्पना रुचणार नव्हती. म्हणून नानासाहेबांनी अत्यंत धूर्तपणे संभाजींबरोबर गुप्त खलबते केली. वारणेच्या तहानुसार मराठी राज्याची झालेली शकले त्यांनी एकत्र करण्याचा प्रस्ताव संभाजींपुढे ठेवला. शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर दोन्ही राज्यांचे विलीनीकरण करून संभाजींस राजपद देण्याचे ठरविण्यात आले. हा त्यांच्यातील गुप्त करार पुढे नऊ वर्षे गुप्त राहिला. यावरून पेशव्यांच्या गुप्त राजनीतीची कल्पना येते. मात्र कालओघात परिस्थिती बदलली. ताराबाईंनी राजारामास शाहू महाराजांचा वारस म्हणून पुढे केले. परिस्थतीच्या रेट्यामुळे पेशव्यांचा गुप्त करार फलद्रूप झाला नाही. मात्र त्याला यश आले नाही म्हणून त्याचे महत्त्व कमी होत नाही. मराठी राज्यात ऐक्य साधण्याचा पेशव्यांचा प्रयत्न अत्यंत योग्य मानावा लागेल.

**बाळाजींचे अर्थकारणाविषयीचे धोरण**

छत्रपती शिवाजी महाराजांपासूनच स्वराज्याला आर्थिक अडचणी भेडसावत होत्या. अर्थकारण हेच राज्याच्या स्थैर्याचे मुख्य सूत्र होते. त्यानंतरच्या काळातील सततच्या संघर्षामुळे अर्थकारणाकडे फारसे लक्ष देता आले नाही. बाजीरावांनी स्वराज्याला साम्राज्याचे स्वरूप प्राप्त करून दिले मात्र कर्जाचा फार मोठा डोंगरही निर्माण झाला. त्या कर्जाचे उत्तरदायित्व नानासाहेब पेशव्यांकडे आले. अनेक सावकारांकडून कर्ज घेतलेले होते. या सावकारांत ब्रह्मेंद्रस्वामी, बाबूजी नाईक यांसारखी मंडळी होती. बाबूजीस पेशवाई न मिळाल्यामुळे त्याने पैशाची मागणी सुरू केली. यातच भर म्हणजे युद्ध मोहिमांसाठीही पैशाची गरज होतीच. या पैशाच्या निकडीसाठी त्यांनी कौशल्याने मार्ग शोधला. यापैशाच्या उभारणीसाठी त्यांनी शाहू महाराजांकडून उत्पन्नासाठी नवीन प्रदेश मिळविले. पोर्तुगिजांकडून मिळविलेला साष्टी, वसई वगैरे प्रदेश आणि गुजरात सोडून नर्मदा नदीच्या उत्तरेकडील प्रदेशातून खंडणी वसूल करण्याचा अधिकार स्वतःच्या नावे मिळविला. उत्तर हिंदुस्थानातील पैशाचा ओघ महाराष्ट्राकडे वळविण्याचा विचार त्यांनी केला. त्यांच्या ठिकाणी व्यवहारचातुर्य असल्यामुळे त्यांनी आर्थिक व्यवहारांवर नियंत्रण निर्माण केले. त्यांनी जमाखर्च स्वतः तपासावयास सुरुवात केली. महसूल वेळच्यावेळी भरला जाईल याची काळजी घेतली. सरदारांच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यासाठी फडणीस खाते सुरू केले. त्याद्वारे सरदारांवर वचक निर्माण केला. त्याद्वारे राज्याच्या उत्पन्नवाढीसाठी प्रयत्न सुरू केले. युद्धानंतर केल्या जाणाऱ्या तहाकडे ते व्यवहारिक दृष्टिकोणातून पाहात असत. शत्रूंना कायमचे जेरबंद करण्यासाठी त्यांच्यावर जास्तीतजास्त खंडणी आकारत असत. मात्र काही वेळी त्यांच्या या धोरणात अतिरेक होत असे. प्रसंगातून निभावून निघण्यासाठी शत्रूपक्ष हवी तेवढी रक्कम देण्याचे कबूल करत, मात्र पुन्हा तो आपले उद्योग वेगळ्या मार्गाने चालूच ठेवत असे. परिणामस्वरूप मराठ्यांच्या शत्रूचा बाळाजींस पूर्ण बंदोबस्त करणे जमले नाही. याचा पुढे मराठी सत्तेला फटका बसला.

त्यांनी वेगवेगळ्या मार्गांनी पैसा मिळवून राज्यावरील कर्ज फेडले. तसेच राज्याची आर्थिक घडी सावरण्याचा प्रयत्न केला.

### ३.२.१ बाळाजींच्या उत्तर मोहीमा

#### बाळाजींची पहिली उत्तर मोहीम (१७४१)

बाजीराव पेशव्यांनी उत्तर हिंदुस्थानवर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचे उद्दिष्ट ठरविलेले होते, मात्र अकाली निधनामुळे ते शक्य झाले नाही. हे मराठ्यांचे अपूर्ण राहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी उत्तरेकडे मोहिमा काढण्याचे बाळाजींनी निश्चित केले. माळवा मराठ्यांना मिळाला होता. मात्र माळव्याची सनद मिळावयाची होती. तसेच बादशाहीत निजामाचा प्रभाव कमी झालेला होता. वजीर सफदरजंग, रोहिले आणि अलीवर्दीखान यांसारखे सुभेदार प्रबळ बनले होते. परिणामस्वरूप बादशहा नामधारी झाला होता. अशा परिस्थितीत उत्तरेत जाऊन रजपुतांच्या साहाय्याने आपले वर्चस्व उत्तरेकडे निर्माण करावे असा महत्त्वाकांक्षी विचार नानासाहेबांनी केलेला होता. या अनुषंगाने विचार करण्यासाठी दिल्ली दरबारातील महादेव भट, हिंगणे यास पुण्याला बोलावून घेतले. शिंदे, होळकर, जाधव यांसारखी मातब्बर सरदार मंडळीही पुण्यात दाखल झाली. सर्वांची उत्तरेकडील राजकारणाविषयी खलबते झाली. त्यानुसार उत्तर भारताचे धोरण निश्चित करण्यात आले. त्या अनुषंगाने उत्तरेत पेशव्यांनी स्वतः जाऊन पाहणी करावी, जयसिंगाची भेट घेऊन रजपुतांशी मैत्री संपादन करणे, माळव्याची सनद बादशहाकडून घेणे आणि निजामाच्या कूटनीतीस शह देणे अशा उद्देशाने उत्तर मोहीम हाती घेण्यात आली. सर्वदूर असलेल्या फौजेची जमवाजमव करून सोबत चिमाजी आप्पाला घेऊन बाळाजींनी नोव्हेंबर, १७४० मध्ये उत्तरेचा रस्ता धरला. यादरम्यान १७ डिसेंबर, १७४० रोजी चिमाजी आप्पाचा मृत्यू झाला. दोन कर्तबगार बंधूंचा एकाच वर्षी अस्त झाला.

दरम्यानच्या काळात निजाम-उल्-मुल्कची बादशाहीतील स्थिती अत्यंत गंभीर झालेली होती. त्याची धरसोड वृत्ती आणि त्याने नादिरशहाबरोबर केलेल्या कटकारस्थानामुळे बादशहाचे त्याचेविषयीचे मत कलुषित झाले होते. परिणामी, बादशहाची त्याच्यावर वक्रदृष्टी निर्माण झाली होती. या संधीचा फायदा त्याचा मुलगा नासिरजंग याने घेतला. त्याने सत्तेसाठी पित्याविरुद्ध बंड केले. परिणामी, ऑगस्ट, १७४० मध्ये निजाम दिल्ली सोडून मुलाच्या बंदोबस्तासाठी दक्षिणेकडे निघाला. पितापुत्रांनी पेशव्यांकडे मदतीची मागणी केली. बाळजींस योग्य अशीच संधी मिळाली. उत्तरेतील राजकारणासाठी निजामाने अडथळे निर्माण करू नयेत याचा विचार करून बाळाजींनी त्याला मदत करण्याचे ठरविले. निजामाने पूर्णा नदीच्या काळी एदलाबाद येथे १७ जानेवारी, १७४१ रोजी नानासाहेबांची भेट घेतली. त्यात पेशव्यांनी निजामाला नासिरजंगाचे बंड मोडून काढण्यासाठी मदत करण्याचे आश्वासन दिले. मात्र माळव्याच्या सनदेबाबत निश्चित काहीच आश्वासन दिले नाही. त्यानंतर पेशवे माळव्याकडे निघून गेले. हीच त्यांची पहिली उत्तरेकडील स्वारी होय.

माळव्यातील पेशव्यांच्या आगमनाअगोदरच शिंदे, होळकर या मराठा सरदारांनी त्या विभागातील एक एक ठाणी घेण्यास सुरुवात केली. ५ जानेवारी, १७४१ रोजी मल्हारराव होळकरांनी धार जिंकून माळव्याचे

प्रवेशद्वार उघडले. पुढे मराठ्यांनी बांदे, देवरी आदी ठाणी काबीज केली. बाळाजी स्वतः सिरोज, भेलसा मार्गे खंडण्या वसूल करीत १२ मे रोजी धोलपूर येथे दाखल झाले. तेथे सवाई जयसिंगाची व त्यांची भेट झाली. उभयतांत चर्चा होऊन खालीलप्रमाणे करार झाला. त्यानुसार–

१. सवाई जयसिंगाने पंधरा लाख रुपये पेशव्यांस खर्चासाठी द्यावेत.

२. माळव्याची सनद बादशहाकडून जयसिंगाने मिळवून द्यावी.

३. उभयतांनी एकमेकांस साहाय्य करावे.

या करारामुळे निजामाच्या पेशव्यांविरुद्धच्या हालचालींना शह बसला. त्याने पुढे मृत्यूपर्यंत पेशव्यांस त्रास दिला नाही. जयसिंगाने बादशहाबरोबर सल्लामसलत करून ७ जुलैला माळव्याची सनद पेशव्यांना दिली. त्या अनुषंगाने मराठ्यांना माळव्याचे मुलकी व फौजदारी हक्क प्राप्त झाले. या सनदेत मराठ्यांवर काही अटी घालण्यातआल्या. त्यानुसार –

१. मराठ्यांनी बादशाही प्रदेशावर हल्ला करू नये.

२. पेशव्यांनी आपला अधिकारी दिल्ली दरबारी ठेवावा.

३. गरजेनुसार बादशहाच्या मदतीसाठी मराठ्यांनी फौज द्यावी.

अशा प्रकारे मराठ्यांना माळव्याच्या चौथाईची सनद मिळाली. या उत्तर मोहिमेमुळे बाळाजींची प्रतिष्ठा वाढली. ही नानासाहेबांची महत्त्वाची कामगिरी मानली जाते.

**बाळाजींची दुसरी उत्तर मोहीम (१७४२)**

पुण्यात परतल्यानंतर पेशव्यांनी शाहू महाराजांची साताऱ्यात भेट घेतली. उत्तरेकडील वृत्तांत कथन केला. उभयतांत उत्तर भारतातील धोरणांबाबत चर्चा झाली. त्या वेळी बुंदेलखंडाविषयी चर्चा झाली. मात्र तेथेच मराठ्यांचा प्रभाव थांबून चालणार नाही त्याहीपुढे तो वाढला पाहिजे अशी चर्चा झाली. त्या अनुषंगाने बाळाजींनी उत्तर भारतातील दुसऱ्या मोहिमेस मान्यता मिळविली. त्या मोहिमेसाठी त्यांनी मोठी तयारी केली. बुंदेलखंड लष्करीदृष्ट्या महत्त्वाचा असल्यामुळे तेथे मराठ्यांचे वर्चस्व निर्माण करणे गरजेचे होते. या वर्चस्वामुळे माळव्याला सुरक्षितता मिळणार होती. त्याचबरोबर त्याच्या पलीकडील दुआबाच्या (गंगा–यमुना नद्यांमधील प्रदेश) प्रदेशात मराठ्यांना हालचाली करणे सुलभ पडणार होते. तसेच उत्तर भारतातील मथुरा, अलाहाबाद, बनारस, गया ही हिंदूंची पवित्र क्षेत्रे वर्चस्वाखाली आणण्याचा हेतू पेशव्यांनी मनाशी बाळगला होता. अनेक मातब्बर सरदारांना बरोबर घेऊन पेशव्यांनी १७४१ च्या डिसेंबरमध्ये फौजेसह पुणे सोडले व उत्तरेच्या मोहिमेवर निघाले. या मोहिमेच्या वृत्तांतापूर्वी आपणास येथे रघूजी भोसले व बाळाजी यांच्या संघर्षाची माहिती घेणे गरजेचे आहे.

**रघूजी भोसले–बाळाजी संघर्ष:**

शिवाजी महाराजांच्या फौजेतील एक कर्तबगार शिलेदार परसोजी भोसले हा होय. मराठ्यांच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या वेळी राजाराम महाराजांनी जी मुलूखगिरीची योजना आखली त्यानुसार त्याने वऱ्हाड आणि

गोंडवनी विभागात मुलूखगिरी केली. त्याच्या कार्यामुळेच राजाराम महाराजांनी त्याला 'सरसेनासुभा' हे पद बहाल केले. त्याचबरोबर वऱ्हाड प्रदेशाची चौबाई-सरदेशमुखी वसूल करण्याचे अधिकार दिले. शाहू महाराजांच्या कारकिर्दीतही त्यांच्याकडे हे अधिकार कायम राहिले. परसोजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा कान्होजी याला सरसेनासुभा हे पद मिळाले. मात्र त्याचे पुतणे रघूजी व राणोजी यांच्यात वतनाची विभागणी झाली. १७३० मध्ये कान्होजीचा मृत्यू झाला. त्यानंतर रघुजी भोसले सरसेनासुभा झाला. तो कर्तबगार होता. त्याने मराठी राज्याचा विस्तार गोंडवनात केला. शाहू महाराजांच्या आज्ञेनुसार तो फत्तेसिंग गायकवाडासह मोहिमेवर गेला. त्याने या मोहिमेत मोठा पराक्रम करून त्रिचन्नापल्लीचा किल्ला जिंकला. अर्काटच्या नबाबाचा जावई चंदासाहेब याला अटक केली. त्याने बंगालच्या नबाबाची राजधानी मुर्शिदाबाद लुटली, पुढे त्याने ओरिसा जिंकून पाटण्यापर्यंत मजल मारली. या सर्व पराक्रमामुळे रघूजीचा दबदबा सर्वत्र निर्माण झाला. यामुळेच १७३८ च्या दरम्यान रघूजीने शाहू महाराजांकडून बुंदेलखंड, अलाहाबाद, पाटणा, ढाका, बिहार, लखनौ हे प्रदेश आपले कार्यक्षेत्र म्हणून सनद मिळवून घेतली होती. त्याचे दरबारात मोठे वजन होते, त्यातच तो महाराजांचा नातलग होता. त्यामुळे त्याचे स्थान बळकट झाले होते.

बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीपासूनच रघूजीचे त्यांच्याशी सख्य नव्हते. रघूजीने नागपूर येथे आपले मुख्य ठाणे निर्माण केले. ते साताऱ्यापासून फार दूर असल्यामुळे मध्यवर्ती सत्तेच्या नियंत्रणापासून बाजूलाच होते. बाजीरावांच्या बुदेलखंडातील हस्तक्षेपामुळे रापूजी व पेशवे बांचे सलोख्याचे संबंध राहिले नाहीत. भोपाळच्या युद्धाच्या वेळी शाहू महाराजांनी आज्ञा करूनही तो बाजीरावांच्या मदतीला गेला नव्हता. पुढे नानासाहेबांच्या कारकिर्दीत या विरोधाला अधिकच धार चढली. बाजीरावांच्या मृत्यूनंतर रघुजीने बाबूजी नाईक बारामतीकर यास पेशवेपद द्यावे असा आग्रह धरला. यामागे त्याचा स्वार्थी हेतू होता. आपल्या मुलाला शाहू महाराजानंतर राजपद मिळावे हा उद्देश होता. तो अत्यंत महत्त्वाकांक्षी होता, मात्र त्याचा आग्रह शाहू महाराजांनी मान्य केला नाही. परिणामस्वरूप त्याच्या मनात पेशव्यांबद्दल हेवा वाटत राहिला. त्यातच बाजीराव पेशव्यांचे उत्तर भारतातील विस्ताराचे धोरण बाळाजींनी स्वीकारल्यामुळे बुंदेलखंडातील त्यांचा हस्तक्षेप हा रघूजीस आपल्या प्रदेशात हस्तक्षेप आहे असे वाटू लागले. पहिल्या उत्तर मोहिमेच्या वेळी रघूजी बंगाल प्रांतात हल्ले करत होता. दिल्ली दरबाराकडे ज्या वेळी बाळाजींनी बंगाल, पाटणा वगैरे प्रदेशाच्या चौथाईच्या हक्काची मागणी केली. त्या वेळी दिल्ली दरबाराने त्यास रघुजीचा बंदोबस्त करावा अशी विनंती केली. त्यामुळे रघूजी व बाळाजी यांच्यातील संघर्ष अटळ झाला.

**बंगाल जिंकण्याचा रघुजी भोसले यांचा प्रयत्न:**

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर मुघल सत्ता उत्तराधिकारी कर्तबगार नसल्यामुळे खिळखिळी झाली. त्याचा फायदा प्रांतिक सुभेदारांनी घेऊन त्यांनी आपले स्वतंत्रअस्तित्व निर्माण करण्यास सुरुवात केली. निजामाने दक्षिणेत आपला सवतासुभा निर्माण केला. कर्नाटक आणि बंगालमध्ये त्याचीच पुनरावृत्ती होऊ घातली. पूर्वी बंगाल सुभ्याखाली ओरिसा आणि बिहार येत होते. या सुभ्याचे मुख्य ठिकाण मुर्शिदाबाद हे होते. हा सुभा संपन्न होता. या बंगाल सुभ्यावर १७३९ मध्ये सूजाखानाच्या मृत्यूनंतर सर्फराजखान सुभेदार बनला. त्याच्यात राज्यकारभाराची जाण नसल्यामुळे तेथे गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या संधीचा

फायदा महत्त्वाकांक्षी अलीवर्दीखानाने घेतला. त्याने १७४० मध्ये मुर्शिदाबादवर हल्ला करून बंगालची सुभेदारी मिळविली. तो अत्यंत कावेबाज होता. त्याने बादशहास मोठी रक्कम देऊन स्वतःच्या सुभेदारीस मान्यता मिळविली. अलीवर्दीखान अत्यंत धूर्त होता. त्याने आपल्या विरोधकांना अनेक सवलती देऊन आपल्या बाजूला वळवून घेतले. मात्र ओरिसाचा नायब सुभेदार मीर हबीब हा त्याचा कट्टर विरोधक होता. त्याच्यावर हल्ला करून त्याला ओरिसातून हुसकावून लावले. याचा बदला घेण्याच्या उद्देशाने मीर हबीब याने रघुजी भोसलेची मदत मागितली. या संघर्षाचा फायदा घेण्याचा रघूजीने विचार केला. बंगाल प्रांतात आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास ही योग्य संधी आहे हे जाणून त्याने हालचाली करण्यास सुरुवात केली. कर्नाटकातून नागपुरात परत आल्यानंतर बंगाल व ओरिसावर मोहीम आखण्याची योजना तयार केली. त्याने या कामगिरीवर आपला दिवाण भास्करराम याची नियुक्ती केली. सन १७४१ मध्ये फौजेसह भास्कराम बंगाल मोहिमेवर निघाला.

भास्करराम याने रामगडमार्गे प्रवास करून रांचीच्या पूर्वेकडील प्रदेश लुटला. १७४२ मध्ये बरद्वान येथे त्याने अलीवर्दीखानास गाठले. त्याच्याभोवती वेढा टाकून अवतीभोवतीचा प्रदेश उध्वस्त केला. परिणामस्वरूप खानाची फार मोठी कोडी झाली. या वेळी खानाने भास्करराम याचेकडे सुटकेसाठी प्रयत्न सुरू केले. भास्कररामने मोठी खंडणी मागितली. खानाने ती देण्यास नकार देऊन तो रात्रीच्या वेळी तेथून निसटला. भास्करराम यास या वेळी मीर हबीबची मदत मिळत होती. त्याने तत्काळ खानाचा पाठलाग करून त्याला गाठले. त्याने मोठ्या मुश्किलीने आपली सुटका करून घेतली. भास्कररामने पुढे मीर हबीबच्या मदतीने खानाचे मुख्य ठिकाण मुर्शिदाबाद जिंकून घेतले. पुढे त्याने हुबळी, मदीनापूर, बातासोर आदी ठाणी जिंकून घेऊन बंगालवर वर्चस्व निर्माण केले. त्याने कटवा येथे आपले मुख्य लष्करी केंद्र निर्माण केले. बंगालमधील वेगवेगळ्या विभागांत फौज ठेवावी लागल्यामुळे आघाडीची फौज विखुरली गेली. त्यामुळे, रघूजीकडे जादा फौजेची मागणी केली. या संधीचा धूर्त अलीवर्दीखानाने फायदा उठविला. १७४२ मध्ये दुर्गापूजा उत्सवाचा फायदा त्याने घेतला. मराठ्यांच्या छावणीवर त्याने रात्री अचानक हल्ला केला. परिणामस्वरूप मराठ्यांनी तेथून पळ काढला. छत्तीसगडच्या जंगलातून मार्गक्रमण करून भास्करराम नागपूरला परत आला. मागे बंगालमधील मराठ्यांनी निर्माण केलेली ठाणी लवकरच विस्कळीत झाली. यामुळे बंगाल जिंकण्याचा रघूजीचा पहिला प्रयोग अयशस्वी झाला. मात्र रघूजीने बंगालवर स्वतः जाण्याचे ठरविले. याच वेळी पेशवे बुंदेलखंडात होते. बंगाल सुभ्याच्या चौचाईसंबंधी बादशाहीबरोबर वाटाघाटी चालू होत्या. रघूजी बंगाल मोहिमेवर जाण्यापूर्वी पेशव्यांचे काय मत आहे हे अजमाविण्यासाठी गया येथे गेला. परंतु पेशव्यांचा काय विचार आहे हे त्यास समजले नाही.

**नानासाहेबांची दुसरी उत्तर मोहीम:**

पेशव्यांनी मोठ्या फौजेसह अनेक मातब्बर सरदार घेऊन डिसेंबर, १७४१ मध्ये पुणे सोडले. सोबत पिलाजी जाधव, महादेव पुरंदरे, पटवर्धन यांसारखे प्रमुख सरदार बरोबर होते. त्यांना वाटेत शिंदे, होळकर येऊन मिळाले. मराठ्यांच्या फौजेच्या भीतीने रस्त्यावरील प्रदेश त्यांच्या ताब्यात मिळाला. ते खानदेशमार्गे माळव्यात गेले. तेथून नर्मदा खोऱ्यातील गढ़ा व मंडल ही ठाणी त्यांनी काबीज केली. या वेळी रघूजी

पेशव्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवून होता. त्याने शाहू महाराजांकडे पेशव्याच्या हालचालीविषयी तक्रार केली. परंतु काही उपयोग झाला नाही. परिणामी, रघूजीने दमाजी गायकवाड याला पश्चिमेकडून माळव्यावर आक्रमण करण्यास पाठवून दिले. परंतु पेशव्यांनी त्याचा पराभव केला. त्यानंतर पेशवे बुंदेलखंडात दाखल झाले. ओर्छा या ठिकाणी बीरसींगदेव हा बुंदेला राजा राज्यकारभार करीत होता. तेथून जवळच झाशीचा महत्त्वपूर्ण किल्ला होता. पेशव्यांनी जोत्याजी शिंदे यास बीरसींगदेव याच्याकडे खंडणीसाठी पाठविले. मात्र त्याने त्याची टाळाटाळ केली. एका रात्री त्याने मराठी फौजेवर हल्ला केला. जोत्याजी शिंदे तेथे कामी आला. पेशव्यांनी नारोशंकर यास पाठवून ओर्छावर हल्ला केला. बीरसींगदेव याला कैद केले. शेवटी बीरसींगदेव याने मोठी रक्कम व झाशीचे ठाणे मराठ्यांना देऊन स्वतःची सुटका करून घेतली. झाशी या ठिकाणी नारोशंकरची नियुक्ती केली. त्याने किल्ल्याच्या पायथ्याला शहर बसविले, ते मराठ्यांचे उत्तरेकडील महत्त्वाचे ठाणे झाले. त्यानंतर पेशवे ओर्छानजीक तळ देऊन बंगालमधील भास्कररामाच्या हालबालीवर लक्ष केंद्रित करून राहिले.

भास्कररामाच्या पराभवाची माहिती रघूजीस मिळताच त्याने बंगाल स्वारीवर जाण्याचे ठरविले. मात्र त्याचे लक्ष पेशव्यांच्या धोरणावर व हालचालीवर केंद्रित झालेले होते. बंगालचा सुभेदार अलीवर्दीखान हा फार धूर्त होता. सद्यःस्थितीत रघूजी किंवा पेशवे या दोघांपैकी एकाची तरी स्वारी बंगालवर होणार हे जाणून होता. त्याने बादशहास या वेळी जर मदत मिळाली नाही तर बंगालला मुकावे लागेल असे कळविले. शत्रूवरील या संकटाचा फायदा पेशव्यांना घेता आला नाही. त्यांनी रघूजीला बंगाल घेण्यासाठी मदत करण्याऐवजी बादशहास माळवा, बुंदेलखंड व अलाहाबाद या प्रदेशाची चौथाई दिली तर आपण मदतीस तयार आहे असे कळविले. बादशहाने संकटाचे गांभीर्य ओळखूनपेशव्यांचे म्हणणे मान्य करून त्यांना अलीवर्दीखानास बंगालमध्ये मदत करावी असे कळविले. रघूजी या वेळी बंगालमध्ये होता. पेशवे बुंदेलखंड सोडून अलाहाबाद, बनारस मार्गे गया येथे दाखल झाले. येथे रघूजीने पेशव्यांची भेट घेतली. परंतु उभयतांत कोणत्याही मुद्यावर निर्णायक चर्चा झाली नाही व समेटही झाला नाही. परिणामी, रघूजी कटव्याच्या छावणीकडे गेला. पेशव्यांनी मुर्शिदाबादकडे कूच करून प्लासी येथे अलीवर्दीखानाची मार्च, १७४३ मध्ये भेट घेतली. त्या उभयंतात खालीलप्रमाणे करार घडून आला.

१. अलीवर्दीखानाने पेशव्यांच्या फौजेच्या खर्चासाठी २२ लाख रुपये द्यावेत.

२. शाहू महाराजांना बंगालची चौथाई दरवर्षी द्यावी.

३. दोघांनी बंगालमध्ये रघूजीचा बंदोबस्त करावा.

उभयतांतील झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने पेशव्यांनी रघूजीवर चाल केली. एप्रिल, १७४३ रोजी पाचेटनजीक बेंदू खिंडीत रघूजीच्या पिछाडीवर पेशव्यांच्या सैन्याने हल्ला केला. रघूजीचे थोडेफार त्यात नुकसान झाले. मात्र रघूजी नागपूरकडे निघून गेला आणि पेशवे रघूजीचा पाठलाग न करता गयेकडे निघून गेले.

बंगाल मोहिमेदरम्यान पेशव्यांनी अलीवर्दीखानास मदत करून मोठी चूक केली असे इतिहासकारांचे मत आहे. मराठ्यांच्या दुहीचा फायदा इतरांना झाला. मराठा मंडळाची उभारणी परस्परांच्या सहकार्याने झालेली

होती. मात्र या मोहिमेत पेशव्यांनी हा संकेत बाजूला ठेवला. परिणामस्वरूप बंगालवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले नाही. त्यामुळे इंग्रजांनी तो प्रदेश पुढील काळात आपल्या घशात घातला. या संदर्भात शेजवलकर म्हणतात, ''नानासाहेबांचा बंगालमधील उद्योग म्हणजे शुद्ध मत्सर व दुष्टपणा आहे. रघूजीने कर्नाटक किंवा पूर्वेस बंगालमध्ये मराठ्यांचे राज्य वाढविण्याचा उद्योग आरंभला तर त्याच्या मार्गात आडवे पडणे हा शुद्ध मत्सरीपणा व दुष्टपणा म्हटला पाहिजे............ रघूजी गर्वाने वागत होता असेही पुराव्यावरून म्हणता येत नाही. तो आरंभी महाराजांकडे तक्रारी करताना आढळतो. पेशव्यांची भेट घेऊन सलूख राखू इच्छतो. पण नानासाहेबांना रघूजीपेक्षा बादशहाची मोहब्बत जास्त. रघूजी हलका झाला तर त्याला इष्ट आणि त्यासाठी आधीच्या सुभेदाराला अन्यायाने मारून स्वतः सुभेदार झालेल्या अलीवर्दीखानास जगविण्याची त्याची तयारी.'' रघूजी व पेशवे यांच्यातील या संघर्षातून जर तर अशा काही बाबी उपस्थित होतात. मात्र जेवढी नानासाहेबांच्या मुत्सद्देगिरीची तारीफ केली जाते त्याहीपेक्षा या प्रकरणातून मराठ्यांच्या राजकीय नीतिमत्तेचे प्रदर्शन उघड झाले.

**रघुजी–नानासाहेब सलोखा:**

शाहू महाराजांनी रघूजी व नानासाहेब यांच्यातील संघर्षांवर आपले लक्ष केंद्रितकेले. त्यांनी दोघांनाही साताऱ्याला बोलावून घेतले (१७४३), उभयतांत शाहू महाराजांच्या मध्यस्थीने चर्चा घडून आली. त्यातून एक मध्यम मार्ग निश्चित करण्यात आला. त्यानुसार नानासाहेबांनी बंगालवरील आपला हक्क सोडून दिला. रघूजीचे कार्यक्षेत्र वऱ्हाडपासून कटक, बंगाल, लखनौ हा प्रदेश म्हणून मान्य केला. या प्रदेशाच्या सीमेच्या पलीकडील म्हणजेच अजमेर, आग्रा, प्रयाग व माळवा हा प्रदेश पेशव्यांचे कार्यक्षेत्र म्हणून रघूजीने मान्यता दिली. तडजोडीने उभयतांतील संघर्ष निकालात काढला गेला, या तडजोडीचे दोघांनीही शेवटपर्यंत पालन केले. मात्र हा करार मराठा मंडळाच्या दृष्टीने घातक ठरला. मराठा सरदारात स्वकेंद्रित वृत्तीस चालना मिळाली.

**भास्कररामांची हत्या:**

नानासाहेब पेशव्यांच्या बरोबर समेट झाल्यानंतर रघूजी नागपूरला दाखल झाला. त्याने बंगालमध्ये अर्धवट राहिलेले कार्य तडीस नेण्याचे निश्चित केले. यासाठी फेब्रुवारी, १७४४ मध्ये भास्करामाकडे मोठी फौज देऊन त्याला बंगालमध्ये पाठविले. भास्कररामाने ओरिसाच्या मीर हबीबची मदत घेऊन अलीवर्दीखानास कोंडीत पकडण्याचा प्रयत्न सुरू केला. त्याने अलीवर्दीखानाकडे बंगालच्या चौथाईची मागणी केली. बंगालमधील अंतर्गत अडचणीमुळे खान भयंकर अडचणीत होता. त्यामुळे मराठ्यांच्या विरोधात युद्धभूमीवर उभे राहणे अवघड आहे हे त्याला पूर्ण माहीत होते. सैनिकांचे पगार थकलेले होते. यावर त्याच्या डोक्यात कृष्णकारस्थानी योजना आली. वरकरणी भास्कररामाशी समेटाची बोलणी करण्यासाठी त्याला भेटीसाठी बोलावून घ्यावयाचे व विश्वासघाताने ठार करण्याची योजना त्याने आखली. मुस्ताफाखानाकरवी त्याने भास्कररामाला भेटीचे आमंत्रण दिले. याप्रसंगी मीर हबीबला अलीवर्दीखानाच्या भेटीविषयी शंका आली. त्याने भास्करामास भेटीस जाऊ नये, खान कपटी आहे असे सांगितले. परंतु त्याने

ऐकले नाही. दोघांनीही भेटीच्या वेळी सुरक्षिततेसाठी शपथा घेतल्या. भेटीसाठी ३० मार्च, १७४४ हा दिवस निश्चित करण्यात आला. तसेच मंकाराचे मैदान हे ठिकाण भेटीसाठी निश्चित केले. खानाने मारेकऱ्याकरवी भास्करराम व त्याच्या २२ सहकाऱ्यांची हत्या केली. या घटनेमुळे मराठी फौज नागपूरला परत आली. भास्कररामाच्या हत्येमुळे रघुजीस फार दुःख वाटले.

या घटनेनंतर थोड्याच दिवसांत अलीबदर्दीखानाच्या सेनाधिकाऱ्यांनी त्याच्याविरुद्ध बंड केले. या अस्थिरतेची माहिती मुस्तफाखानाने रघूजीस देऊन ताबडतोब बंगालमध्ये येण्याची विनंती केली. खानाच्या या अडचणीचा फायदा घेऊन भास्कररामाच्या हत्येचा सूड घेण्यासाठी रघूजीने फेब्रुवारी, १७४५ मध्ये बंगालची मोहीम स्वतः हाती घेतली. त्याने ओरिसामार्गे कटक घेतले. तेथून अलीवर्दीखानाकडे भास्करामाच्या हत्येबद्दलदंड म्हणून तीन कोटी रुपयांची मागणी केली. पावसाळ्यानंतर काही धावपळीच्या लढाया उभयतांत झाल्या. दरम्यान अलीवर्दीखानाने सेनाधिकाऱ्यांची मनधरणी करून मराठ्यांविरुद्ध लढण्यास तयार केले. डिसेंबर, १७४५ मध्ये उभयतांत मुर्शिदाबादजवळ लढाई झाली. त्यात रघूजीचा पराभव झाला. परिणामी, रघूजीने ओरिसात मीर हबीबजवळ तीन हजार फौज ठेवली आणि तो नागपूरला परतला. याच वेळी पेशव्यांनी अलीवर्दीखानाकडे बादशहाकडून मिळालेल्या सनदेप्रमाणे बंगालच्या चौथाईची मागणी केली.

रघूजीने यानंतर आपला पुत्र जानोजी यास सैन्यासह १७४६ मध्ये बंगालवर पाठविले. जानोजी व मीर हबीबने अलीवर्दीखानास बरद्वान येथे गाठले. तेथे खानाचा पराभव केला. मात्र या पराभवामुळे खचून न जाता खानाने पुन्हा जोरदार तयारी करून जानोजीवर हल्ला केला. त्याला पराभूत केले. १७४७ मध्ये तो परत नागपूरला आला. मात्र या वेळी उरलेली मराठी फौज व मीर हबीब ओरिसातून गनिमी कावा युद्ध पद्धतीचा अवलंब करून लढत राहिले. जानोजी परत बंगालमध्ये गेला. याच दरम्यान शाहू महाराजांनी रघूजीकडे मुधोजी या मुलाची दत्तक म्हणून मागणी केली. सातारच्या या राजकारणामुळे रघूजीस १७४७ मध्ये साताऱ्यास जावे लागले.

ओरिसात मराठ्यांनी चांगलाच जोर धरला. कटकमधून ते बंगालवर सतत मोहिमा काढू लागले. या वेळी साबाजी हा रघूजीचा पुत्र ओरिसात दाखल झाला. त्यामुळे मराठी फौजेला चांगले पाठबळ मिळाले. मराठ्यांच्या या वाढत्या प्रभावामुळे अलीवर्दीखान हैराण झाला. शेवटी कंटाळून त्याने मराठ्यांशी मार्च, १७५१ मध्ये खालीलप्रमाणे तह केला. त्यानुसार –

१. बंगालची चौथाई म्हणून रघूजीस खानाने प्रतिवर्षी १२ लाख रुपये द्यावेत.

२. मीर हबीबला ओरिसाचा उपसुभेदार म्हणून मान्यता दिली.

३. कटकपर्यंत म्हणजेच सुवर्णरेखा नदीपर्यंतचा प्रदेश मराठ्यांचा म्हणून मान्यता खानाने दिली.

४. मराठ्यांनी बंगाल, बिहारवर स्वाऱ्या करू नयेत.

अशा प्रकारे बंगालवर मराठ्यांचे वर्चस्व निर्माण झाले. रघूजीचे प्रारंभापासूनच्या प्रयत्नाचे ते फल होते. मात्र नानासाहेब आणि रघूजी यांच्यातील संघर्षांमुळे बंगाल प्रांत पूर्णतः मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला नाही. दरम्यान १७५५ मध्ये रघूजीचा मृत्यू झाला. याच सुमारास बंगालमध्ये इंग्रजांनी हस्तक्षेप करण्यास

सुरुवात केली. रघूजीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांत गृहकलह सुरू झाला. पेशव्यांनी दौलतीची वाटणी करून संघर्ष संपविण्याचा प्रयत्न केला. मात्र भोसल्यांची सत्ता कमकुवतच राहिली. रघूजीच्या मुलांत त्यांची राजकारणातील ध्येयधोरणे अंगीकारण्याची कुवत नव्हती. रघूजीच्या मृत्यूमुळे मराठी सत्तेचे फार मोठे नुकसान झाले. इंग्रजांनी १७५७ मध्ये प्लामीच्या लढाईत बंगालच्या सुभेदाराचा पराभव करून इंग्रजी सत्तेचा भारतात पाया घातला.

रघूजी भोसलेच्या कार्याचा आढावा घेताना सरदेसाई लिहितात की, ''नागपूरचे राज्य रघूजीने उभारले. तेथील गौड राजास जिंकून त्या नगरास राजधानीचे स्वरूप प्राप्त करूर दिले. वऱ्हाडपासून उत्तरेस नर्मदा व पूर्वेस भागीरथीपर्यंतचा पूर्व समुद्रास लागलेला विस्तृत प्रदेश जिंकून त्याची व्यवस्था ठेवली. हे एवढे प्रचंड कार्य व त्यातील नानाविध योजना मनात आणल्या म्हणजे पेशवाईच्या काळात रघुजीचा पराक्रम उठावदार दिसतो. रणसंग्राम, राज्यव्यवस्था व मुत्सद्दी शहाणपण अशा तीनही गुणांत ती प्रवीण होता, राज्यनिर्मितीस लागणारा गुणसमुच्चय रघूजी इतका दुसऱ्याच्या ठिकाणी क्वचितच आढळतो.''

रघूजी भोसलेच्या कर्तृत्वाबद्दल सरदेसाई लिहितात, ''कर्नाटकात त्रिचनापल्ली जिंकून रघूजीने चंदासाहेबास पकडून बरोबर आणले हा त्याचा सर्वांत मोठा पराक्रम होय. यानंतर त्याने बंगालचे क्षेत्र स्वीकारले आणि त्यात दहा वर्षे अत्यंत कष्ट घेतले. पण अनेक कारणांनी त्याचा हा विजय पहिल्या कर्नाटकातील विजयाइतका ठळक बनला नाही. सन १७५० पासून इंग्रज-फ्रेंचांनी हिंदी राजकारणात प्रवेश केला, तो कोणत्याही हिंदी माणसाच्या आवाक्याबाहेरचा होता. तथापि, ओरिसा प्रांत कायमचा जिंकून रघूजीने बंगाल-बिहारवर चौथाई लागू केली हा काही सामान्य विजय नव्हे. माळवा दिल्लीकडील प्रदेशात पेशवे, शिंदे-होळकर यांनी पराक्रम गाजविले. तशाचं तोडीचा पराक्रम रघूजीचा होता. स्वतःच्या बुद्धिकौशल्याने पूर्व हिंदच्या समृद्ध मुगल सत्तेला दहा वर्षेपावेतो तोंड देऊन शेवटी आपला शह त्या प्रदेशावर बसविला आणि त्यासाठी फौजा उभारून शेकडो कुटुंबांकडून कामे करून घेतली. यातच रपूजीची योग्यता स्पष्ट होते.''

**नानासाहेबांची तिसरी उत्तर मोहीम (१७४४ ते १७४५):**

सन १७४४ मध्ये नानासाहेबांनी उत्तर हिंदुस्थानची तिसरी मोहीम काढली, याचे मुख्य कारण म्हणजे बुंदेल प्रमुखांना मराठ्यांचे चौथाई वसुलीचे हक्क मान्य नव्हते. त्यामुळे त्यांनी मराठ्यांच्या चौथाई वसुली अधिकाऱ्यांच्या कामात अडवळे आणण्यास सुरुवात केली. त्यातून एका वसुली अधिकाऱ्यास प्राणास मुकावे लागले. या भागात सुरक्षितता निर्माण करण्यासाठी नानासाहेबांनी झाशी आणि सागर या ठिकाणी मराठ्यांची कायमची लष्करी ठाणी उभारली. याच वेळी राणोजी शिंदे यांनी यारमहंमदखानाशी निकराची झुंज देऊन १७४५ मध्ये भेलसा जिंकून घेतले, तेथून पुढे भेलसा हे माळव्यातीलप्रमुख केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे नानासाहेब बुंदेलखंडात गेले. दतीया, चंदेरी, जोतपूर, कालिंजर व पन्ना येथील सत्ताधीशांचा मराठी सत्तेला होणारा विरोध मोडून काढण्याची जबाबदारी शिंदे-होळकर यांच्यावर सोपवून ऑगस्ट, १७४५ मध्ये नानासाहेब पुण्यात परतले.

**नानासाहेबांची चौथी आणि शेवटची उत्तर मोहीम (१७४८) :**

उत्तर भारतात मराठी सत्तेचा साम्राज्यविस्तार होण्यास हिंदू धर्मीय रजपुतांचा पाठिंबा अत्यंत आवश्यक आहे हे बाळाजी विश्वनाथांनी ओळखले होते. त्यामुळेच त्यांनी रजपुतांबरोबर सलोख्याचे धोरण चालू ठेवले. याच रजपुतांच्या पाठिंब्यावर बाजीरावांनी आपला उत्तरेत दबदबा निर्माण केला. याच रजपूत घोरणानुसार नानासाहेब पेशव्यांनी धोलपूर येथे सवाई जयसिंगाची भेट घेऊन सलोखा प्रस्थापित केला होता. मात्र त्यांना वेगवेगळ्या कारणांमुळे रजपुतांशी सलोखा पुढील काळात कायमस्वरूपी टिकविता आला नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे शाहू महाराज यांच्यावर असलेले कर्ज होय. या कर्जाच्या फेडीसाठी पैशाची निकड भासत होती. त्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला. परिणामी, मराठ्यांनी रजपुतांच्या अंतर्गत प्रश्नातही हस्तक्षेप सुरू केला. यामुळे उत्तरेकडे रजपूत मराठ्यांचे पुढील काळात कट्टर शत्रू बनले.

जयपूर गादी प्रकरणामध्ये तडजोड घडवून आणण्याच्या उद्देशाने नानासाहेबांनी उत्तरेत जाण्याचा निर्णय घेतला. ३ ऑक्टोबर, १७४३ मध्ये जयपूरचा सत्ताधीश सवाई जयसिंग मृत्यू पावला. त्याला ईश्वरसिंग व माधोसिंग अशी दोन मुले होती. थोरल्या मुलाने म्हणजे ईश्वरसिंगाने या वेळी सत्ता हाती घेऊन बादशहाची मान्यता मिळविली. मात्र या प्रकरणाला एक वेगळीच झालर होती. माधोसिंगाची माता उदयपूरच्या घराण्यातील कन्या असल्यामुळे रजपूत प्रमुखांनी १७१० मध्ये केलेल्या 'पुष्कर' करारानुसार राज्याचा वारस उदयपूर घराण्यातील मातेच्या मुलास मिळावा असे ठरले होते. त्यामुळेच माधोसिंगाने जयपूरच्या गादीवर आपला हक्क सांगितला, मात्र हा दावा ईश्वरसिंगाने मान्य केला नाही. त्यामुळे उदयपूरच्या राज्याने माधोसिंगास पाठिंबा देऊन युद्धाची तयारी ठेवली.

उदयपूरच्या राजाने जयपूरवर हल्ला केला. या वेळी ईश्वरसिंगाने निकराने प्रतिकार केला. दोन महिने उभयतांत अनेक लढाया झाल्या. परिणामस्वरूप ईश्वरसिंगाने माधोसिंगास काही परगणे देण्याचे मान्य केले. परंतु माधोसिंगाने अर्ध्या राज्याची मागणी रेटून धरली. या वेळी ईश्वरसिंगाने शिंदे, होळकर यांना तीन लाख रुपये देऊन मदत मिळविली. त्यांनी माधोसिंगाचा पराभव केला. दरम्यान १७४५ मध्ये राणोजीमृत्यू पावला. त्याची सत्ता मुलगा जयाप्पाकडे गेली. मात्र जयाप्पा व होळकरांच्यात पूर्वीसारखे ऐक्य टिकले नाही. त्यांच्यातील फुटीचा फायदा माधोसिंगाने घेण्याचे ठरविले, त्याने मल्हाररावांना ६५ लाख रुपये देऊन आपल्या बाजूला वळविले. तसाच मार्ग पत्करून ईश्वरसिंगाने जयाप्पाची मदत मिळविली. स्वार्थापोटी मराठी सरदारांत रजपूत प्रकरणात दुही निर्माण झाली. मार्च, १७४७ मध्ये माधोसिंग व ईश्वरसिंग यांच्यात राजमहालजवळ युद्ध झाले. त्यात ईश्वरसिंग विजयी झाला. या युद्धानंतरही उभयतांतील संघर्ष संपला नाही, दोन्ही पक्षांनी पेशव्यांकडे मदतीची याचना केली. होळकरांनी जयाप्पा विरुद्धही पेशव्यांकडे तक्रार केली. त्यामुळेच पेशव्यांनी १७४८ मध्ये सैन्यासह जयपूरला जाण्याचा निर्णय घेतला. याच मोहिमेला 'नेवाई' मोहीम असेही म्हणतात. शिंदे, होळकरातील वाद मिटविणे आणि शाहू महाराजांचे कर्ज निवारण्यासाठी पैसा मिळविणे हा त्यातील मुख्य उद्देश होता. नानासाहेब दिल्लीत पोहोचण्यापूर्वीच शहाजादा अहमदशहा याने मनूपुरच्या लढाईत अब्दालीचा पराभव करून त्याला हुसकावून लावले. दिल्लीमध्ये नानासाहेब बादशहाची भेट घेऊन जयपूरकडे गेले. माधोसिंगाने नेवाई येथे पेशव्यांची भेट घेतली (मे, १७४८), उभयतांत वाटाघाटी

होऊन ईश्वरसिंगाने माधोसिंगास चार जिल्हे द्यावेत अशी तडजोड झाली. त्यानंतर नानासाहेब जुलै, १७४८ मध्ये पुण्यात परतले. परतण्यापूर्वी वाटेवर धारला पेशवे गेले. यशवंतराव पवार यांना मांडवगड,सोनगड हे किल्ले देऊन धारची जबाबदारी त्याच्याकडे सोपविली. पेशव्यांच्या प्रयाणानंतर मल्हारराव होळकरांनी ईश्वरसिंगाकडे तहातील अटीच्या पूर्ततेसाठी तगादा लावला. यादवी युद्धामुळे ईश्वरसिंगाचा खजिना रिक्त झाला होता. त्याचप्रमाणे राजकारणचातुर्य त्याच्यात नसल्यामुळे तो अडचणीत आला. मल्हारराव फौजेसह जयपूरवर चालून गेले. त्यात ईश्वरसिंगाचा पराभव झाला. उद्विग्न मनः स्थितीत त्याने आत्महत्या केली. माधोसिंगास गादीवर बसवून मराठ्यांनी थकलेली खंडणी व युद्धखर्चासाठी १/४ जयपूरची मागणी केली. या घटनांमुळे व मराठ्यांच्या अवास्तव मागण्यांमुळे रजपुतांच्यात असंतोष निर्माण झाला. ते मराठ्यांविरुद्ध सुडाने पेटून उठले. उद्विग्न अवस्थेत माधोसिंगाने शिंदे-होळकर यांना मेजवानीसाठी बोलावून मराठी फौजेची कत्तल केली. त्यामुळे शिंदे, होळकरांनी रजपुतांविषयी मनात राग धरला. याचे फलित म्हणजे पानिपत युद्धाच्या वेळी मराठ्यांना रजपुतांचे सहकार्य मिळू शकले नाही.

**जोधपूरमध्ये जयाप्पा शिंदेचा हस्तक्षेप:**

सन १७४९ मध्ये जोधपूर प्रमुख अभयसिंग मृत्यू पावला. त्याच्यानंतर त्याचा मुलगा रामसिंग सत्तेवर यावयास हवा होता. परंतु अभयसिंगाचा बंधू बख्तसिंग याने स्वतःच ती गादी बळकावली, परिणामी, रामसिंगाने आपल्या हक्कासाठी जयाप्पा शिंदे याची मदत मागितली. जयाप्पाने १७५२ च्या मे महिन्यात अजमेरवर हल्ला केला.शहराची मोठ्या प्रमाणात लुटालूट केली. मात्र बख्तसिंगने तोफखान्याच्या साहाय्याने ज्याप्पास हुसकावून लावले. थोड्याच अवधीत बख्तसिंगाचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याचा मुलगा विजयसिंग सत्तेवर आला.

सन १७५४ मध्ये जयाप्पाने रामसिंगाची बाजू घेऊन विजयसिंगाविरुद्ध मोहीम उघडली. त्याने किशनगड घेऊन अजमेरजवळ दाखल झाला. तो मेडत्यात दाखल झाला. राठोड व मराठे यांच्यात तुंबळ युद्ध झाले. जयाप्पाने रजपुतांच्यातील भाऊबंदकीचा फायदा घेऊन फूट पाडली. जयाप्पाचा विजय झाला. मात्र विजयसिंग नागोर ठाण्याच्या आश्रयाने युद्ध खेळू लागला. दरम्यान जयाप्पाने अजमेरचा किल्ला जिंकला. झालोरचे ठाणे रामसिंगाने मिळविले. त्यानंतर त्याने जोधपूरला वेढा घातला. परिणामी, विजयसिंगाच्या फौजेचे रसदीविना हाल होऊ लागले. त्यामुळे त्याने जयाप्पाबरोबर बोलणी सुरू केली. जयाप्पाने ५० लाख रुपयांची खंडणी मागितली. विजयसिंगाने एक कपटी कारस्थान रचले. जुलै, १७५५ मध्ये त्याने आपला वकील विजयभारती गोसावी यास जयाप्पाच्या भेटीस पाठविले. त्याने योग्य संधीचा फायदा घेऊन जयाप्पाचा खून केला. मराठ्यांनी वकिलास व त्याच्या साथीदारांना ठार केले.

जयाप्पाच्या खुनामुळे शिंदे बंधू सुडाने पेटून उठले. त्यांनी राठोडांच्या विरुद्ध हालचाली सुरू केल्या. यशवंतराव पवार, समशेरबहाद्दर इत्यादी सरदार सैन्यासह जोधपूरवर वेगवेगळ्या बाजूने चालून आले. विजयसिंह त्यामुळे हैराण झाला. त्याने दत्ताजी शिंदेबरोबर तह मान्य केला. त्यान्वये रामसिंगास अर्धे राज्य, युद्धाचा खर्च म्हणून ५० लाख रुपये द्यावे तर अजमेर शिंदे यांना द्यावे. जोधपूर प्रकरणात जयाप्पासारखा

कर्तृत्ववान सेनापती कामी आला. मराठ्यांच्या उत्तरेकडील हस्तक्षेपामुळे त्यांच्याविषयी द्वेषाचे वातावरण तयार झाले. तसेच शिंदे, होळकर यांच्यात दुही निर्माण झाली. त्याची किंमत पानिपतावर मोजावी लागली.

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

योग्य पर्याय निवडून पुढील रिकाम्या जागा भरा

१. ............ साली शाहू महाराजांनी नानासाहेबास पेशवे पदाची वस्त्रे दिली

अ) १७४० ब) १७४१ क) १७४२ ड) १७४३

२. रघुजी भोसले यांचे ............हे कार्यक्षेत्र होते

अ) ग्वाल्हेर ब) धार क) पंजाब ड) बंगाल

३. ............साली बाळाजींनी दुसरी उत्तर मोहीम हाती घेतली.

अ) १७४० ब) १७४१ क) १७४२ ड) १७४३

४. रघुजी भोसले यांनी ............येथे आपले मुख्य ठाणे केले

अ) नागपूर ब) पंढरपूर क) कोल्हापूर ड) सोलापूर

५. मराठी सत्तेच्या विस्तारासाठी नानासाहेबांनी उत्तरेत ............ मोहिमा काढल्या

अ) दोन ब) तीन क) चार ड) पाच

**३.२.२.२ पानिपतचे तिसरे युद्ध (१७६१)**

मराठ्यांच्या इतिहासात १४ जानेवारी, १७६१ रोजी झालेल्या पानिपतच्या तिसचा युद्धास अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. देशातील सर्वोच्च स्थानी असणाऱ्या मुगल सत्तेची अंतर्गत व बाहा शत्रूपासून संरक्षणाची मराठ्यांनी घेतलेली जबाबदारी वा पार्श्वभूमीवर देशावर चाल करून आलेल्या परकीय आक्रमक अहमदशहा अब्दालीस देशाबाहेर पिटाळून लावण्यासाठी मराठ्यांची धडपड आणि यामधून घडून आला पानिपतचा रणसंग्राम! या रणसंग्रामात विजयाचा शिरपेच मराठ्यांच्या मस्तकी मिळण्याचे भाग्य नियतीस मंजूर नसले तरी राष्ट्राभिमान जपणाऱ्या मराठ्यांना हा रणसंग्राम गौरवास्पद आहे.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासात पानिपतच्या रणमैदानावर तीन मोठी युद्धे झाली. १५२६ मध्ये बाबर आणि इब्राहिमखान लोदी यांच्यात पानिपतचे पहिले युद्ध होऊन बाबराच्या विजयाने भारतात इस्लामी सत्तेची स्थापना झाली. १५५६ मध्ये अकबर आणि आदिलशहा सूर व त्याचा प्रधान हेमचंद्र (हिमू) यांच्यात पानिपतचे दुसरे युद्ध झाले. यात अकबराचा विजय झाला. पानिपतचे तिसरे युद्ध १७६१ मध्ये अफगाणचा सत्ताधीश अहमदशहा अब्दाली व मुघल साम्राज्याचे रक्षणकर्ते मराठे यांच्यात घडून आले. पानिपतच्या रणमैदानाला महाभारतापासूनचा इतिहास आहे. कौरव-पांडवांमध्ये कुरुक्षेत्रावर झालेले युद्ध पानिपत परिसरातच लढले गेले. युद्ध टाळण्यासाठी युधिष्ठिराने दुर्योधनाकडे ज्या पाच गावांची मागणी केली त्यामध्ये

पानिपत, बागपत, सोनपत, इंद्रपत आणि तलपत या गावांचा समावेश होतो. पानिपतला राजकीय, लष्करी व भौगोलिक पार्श्वभूमी लाभली आहे. लाहोर-दिल्ली मार्गावरील हे महत्त्वपूर्ण ठिकाण आहे. एका बाजूस उंच डोंगराची रांग तर दुसऱ्या बाजूस यमुना नदी व मध्यभागी विस्तीर्ण रेताड मैदान यामुळे या मैदानास ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

१८ व्या शतकाच्या पूर्वार्धात मराठी सत्तेचा झपाट्याने विस्तार झाला. मराठ्यांच्या घोड्यांनी अटकेपार दौड केली. कर्तबगार मराठा सरदारांची एक पिढी उदयास आली. मराठ्यांच्या वाढत्या सामर्थ्याची दखल मुघल सत्तेलाही घ्यावी लागली. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाने उत्तरोत्तर विस्तारित झालेल्या मराठा सत्तेला जबरदस्त हादरा बसला.

**पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची कारणे**

**१. मराठ्यांचा उत्तरेतील साम्राज्यविस्तार :** छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. बलाढ्य सत्तांशी संघर्ष करत स्वराज्य वाढविले. महाराष्ट्राबाहेरही जिंजी, वेल्लोर, तंजावर इत्यादी प्रांतांत स्वराज्य विस्तारित झाले. स्वराज्य देशभर विस्तारित व्हावे ही महाराजांची इच्छा होती. बाळाजी विश्वनाथांनी मराठा मंडळाची स्थापना केली. पहिल्या बाजीरावांच्या कालखंडात मराठ्यांनी उत्तर भारतात प्रदेशविस्तार करून आपला दबदबा निर्माण केला. मराठ्यांच्या उत्तरेतील प्रदेशविस्ताराने तेथील स्थानिक सत्ताधीश दुखावले गेले. जाट, रजपूत, रोहिले, बुदेले यांना उत्तरेतील मराठ्यांचे वर्चस्व नकोसे वाटू लागले. मराठ्यांशी त्यांचा संघर्ष होऊ लागला आणि यामधून पानिपत युद्धाकडे वाटचाल सुरू झाली.

**२. पंजाबच्या मालकीचा प्रश्न:** पंजाबचा प्रदेश सुपीक व मोक्याचा होता. त्यामुळे मुगल बादशहाने या प्रदेशाच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था ठेवली होती. १७२४ मध्ये जन्मलेला अहमदशहा अब्दाली वयाच्या १३ व्या वर्षी नादिरशहाच्या सेवेत आला. १७३९ च्या नादिरशहाच्या हिंदुस्थानावरील स्वारीच्या वेळी अब्दाली हजर होता. नादिरशहाने या स्वारीच्या वेळी सिंधू नदीपलीकडील मुलूख आपल्या राज्यास जोडला. अब्दालीने पंजाबचा सधन प्रदेश जवळून पाहिला तेव्हापासून या प्रदेशाविषयी त्याच्या मनात आसक्ती निर्माण झाली होती. इ. स. १७४७ ला नादिरशहाच्या खुनानंतर अहमदशहा अब्दालीने अफगाण टोळ्यांचे ऐक्य घडवून काबूल, कंदहार, पेशावर इत्यादी प्रदेश ताब्यात घेऊन अफगाणिस्तानमध्ये आपली सत्ता निर्माण केली. यानंतर अब्दालीने पंजाबच्या सुपीक प्रांतावर आपले वर्चस्व निर्माण करण्यासाठी जानेवारी, १७४८ मध्ये हिंदुस्थानवर आक्रमण केले.

**३. अहमदशहा अब्दालीच्या स्वाऱ्या:** अफगाणिस्तानची सत्ता हस्तगत केल्यानंतर अहमदशहा अब्दालीने १७४८ ते १७६१ या कालखंडात हिंदुस्थानावर पाच वेळा स्वाऱ्या केल्या. पाचव्या स्वारीच्या वेळी पानिपतचा रणसंग्राम घडून आला.

**पहिली स्वारी :** मुगल बादशहा मुहमदशहाने झकारियाखान यास पंजाबची सुभेदारी दिली होती. जुलै, १७४५ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या याह्याखान व शहानवाझखान या दोन मुलांमध्ये सत्तेसाठी

संघर्ष सुरू झाला. याह्याखानाने आपला सासरा वजीर कमरुद्दीनखान व मेहुणा मीरमन्नू यांचे साहाय्य मिळविले. यामुळे शहानबाझखानाने आदिनाबेगमार्फत अब्दालीशी संधान साधले.

अब्दालीला हिंदुस्थानवर स्वारी करण्यासाठी निमित्तच हवे होते. हे निमित्त साधून जानेवारी, १७४८ मध्ये अब्दालीने हिंदुस्थानवर स्वारी केली. २० जानेवारी, १७४८ रोजी लाहोर मिळविण्यात त्यास यश मिळाले. यानंतर अब्दाली दिल्लीच्या रोखाने चालू लागला. अब्दालीला रोखण्यासाठी मुगल वजीर कमरुद्दीन, सफदरजंग, मिरमन्नू व जयपूरचा ईश्वरसिंग याच्या फौजा चालून गेल्या. सरहिंदपासून दहा मैलांवर मनुपूर येथे २१ मार्च, १७४८ रोजी उभयतांत युद्ध होऊन अब्दालीचा पराभव झाला. त्यास मायदेशी परतावे लागले. या युद्धात मुघलांचा विजय झाला मात्र अब्दालीच्या तोफेचा गोळा लागून बजीर कमरुद्दीन ठार झाला.

अब्दालीचा पराभव करून दिल्लीकडे परतत असताना शहाजादा अहमदशहा यास २८ एप्रिल, १७४८ रोजी वडील बादशहा मुहमदशहाच्या मृत्यूची बातमी समजली. त्याने स्वतःस दिल्लीचा बादशहा म्हणून घोषित केले. सफदरजंगाची वजीर म्हणून नियुक्ती केली. अलाहाबाद व अयोध्या प्रांताची सुभेदारी सफदरजंगाकडे होती. आग्रा प्रांतावर सुरजमल जाटाचे वर्चस्व होते. तर मराठ्यांनी बंगाल, बिहार, ओरिसा प्रांतांतून चौथाईचे अधिकार मिळविले होते. पुढील काळामध्ये बादशहा व वजीर सफदरजंग बांच्यातील संघर्ष उफाळून आला. मुगल सत्तेच्या दुर्बलपणामुळे पंजाबसारख्या सरहद्दीवरील प्रांतावर अब्दालीने आपला प्रभाव निर्माण केला.

**दुसरी स्वारी:** इ. स. १७४९ मध्ये अब्दालीने हिंदुस्थानवर दुसरी स्वारी केली. बझिराबादजवळ अब्दालीस रोखून धरण्याचा प्रयत्न मीरमन्नूने केला. मात्र त्यास दिल्लीहून कोणतीही मदत मिळू शकली नाही. नाइलाज होऊन त्याने अब्दालीबरोबर तह केला व युद्ध बांबविले. दोघांत झालेल्या तहानुसार मीरमन्नूने अब्दालीला रोख १० हजार रुपये नजराणा दिला तसेच पंजाबच्या उत्तरेकडील चार जिल्ह्यांचे वार्षिक उत्पन्न देण्याचे कबूल केले. अशा प्रकारे पंजाब प्रांतावर आपले वर्चस्व निर्माण करून अहमदशहा अब्दाली मायदेशी निघून गेला.

**तिसरी स्वारी :** इ. स. १७५१ च्या अखेरीस अहमदशहा अब्दालीने हिंदुस्थानवर तिसरी स्वारी केली. बादशहाने दिल्लीचा बचाव करण्यासाठी व अब्दालीचा बंदोबस्त करण्यासाठी सफदरजंगास तातडीने दिल्लीस बोलाविले. यामुळे रोहिले पठाणांविरुद्ध सुरू असणारा संघर्ष अर्धवट सोडून सफदरजंगास दिल्लीला जावे लागले. सफदरजंग दिल्लीचा बचाव करू शकेल अशी परिस्थिती नव्हती. त्याची संपूर्ण भिस्त मराठ्यांवर होती. या पूर्वीच मराठ्यांनी पठाणांपासून सफदरजंगाचे संरक्षण केले होते. इतकेच नव्हे तर सफदरजंग व रोहिले यांच्यात 'लखनौ करार' घडवून आणला होता. या करारामुळे सफदरजंगाबरोबरच मराठ्यांचाही फायदा झाला होता. गंगा-यमुना दुआबाचा प्रदेश त्यांना मिळाला होता.

मराठ्यांची मदत घेतल्याशिवाय अब्दालीचा पाडाव करता येणार नाही हे ओळखून सफदरजंगाने १७५२ मध्ये मराठ्यांशी करार केला व त्यानंतर सफदरजंग व मराठे दिल्लीला येऊन धडकले. परंतु तत्पूर्वीच मुघल

बादशहाने आपला प्रतिनिधी अब्दालीकडे पाठवून त्याच्याशी तह केला व या तहानुसार संपूर्ण पंजाब प्रांत अब्दालीस देण्याचे मान्य केले. यामुळे सफदरजंग व मराठे दोघांचीही निराशा झाली. अब्दालीस हाकलून लावण्याची एक नामी संधी मराठ्यांना गमवावी लागली.

**४. मुघल मराठा तह/१७५२ ची मोठी सनद:** अहमदशहा अब्दालीच्या तावडीतून पंजाब प्रांताची सुटका करण्यासाठी मुघल बादशहाला मराठ्यांची मदत घ्यावी लागली. ज्या मुघल साम्राज्याने मराठी राज्य नष्ट करण्यासाठी दीर्घकाळ लढा दिला, निकराचे प्रयत्न केले त्या मुघलांना अंतर्गत व बाह्य शत्रूपासून संरक्षणासाठी मराठ्यांची गरज पडावी हे आश्चर्यजनक होते. यावरूनच मुघल सत्तेच्या दुर्बलतेची व मराठ्यांच्या सामर्थ्याची आपणास जाणीव होते. १७५२ च्या तहातील प्रमुख तरतुदी खालीलप्रमाणे

१. मुघल साम्राज्याचे अंतर्गत आणि बाहा शत्रूपासून संरक्षण करण्याची जबाबदारी मराठ्यांकडे राहील.

२. त्यासाठी मुघलांनी मराठ्यांना वार्षिक ५० लक्ष रुपये द्यावेत.

३. आग्रा व अजमेरची सुभेदारी पेशव्यांना देण्यात यावी.

४. पंजाब, सिंध व गंगा-यमुनेच्या दुआबातून मराठ्यांना चौथाई वसूल करण्याचा अधिकार असावा.

मुघलांचा वजीर सफदरजंग आणि पेशवे यांच्यामध्ये वरील करार घडून आला. या तहानुसार सफदरजंग, शिंदे, होळकरांच्या फौजा दिल्लीत दाखल झाल्या. बादशहाने सफदरजंगाकरवी झालेल्या मोगल मराठा करारावर शिक्कामोर्तब करण्याचे नाकारले. मराठे मुगलांकडून ५० लाख मिळाल्याशिवाय दिल्लीतून परत जाण्यास तयार नव्हते. शेवटी ३० लाख मुगलांनी मराठ्यांना देऊ केले. त्यानंतर मराठी फौजा दक्षिणेकडे निघाल्या. उत्तरेच्या राजकारणात मराठ्यांचा प्रभाव वाढला. दिल्लीपती बादशाहीच्या संरक्षणाची जबाबदारी मराठ्यांवर आल्याने १७६१ मध्ये दिल्लीवर चालून आलेल्या अब्दालील परतवण्यासाठी मराठे पानिपतावर आले.

**५. दिल्लीमधील राजकीय घडामोडी:** दिल्लीचा बादशहा आणि वजीर सफदरजंग यांच्यातील तणाव वाढत गेला. शेवटी बादशहाने १३ मे, १७५३ रोजी सफदरजंगास वजीरपदावरून काढून टाकले. बादशहा व सफदरजंग यांच्यात तणाव निर्माण झाला. सुरजमल जाटाने सफदरजंगाची बाजू घेतली तर मराठ्यांनी १७५२ च्या करारानुसारबादशाही रक्षणाची जबाबदारी स्वीकारली. १७ ऑक्टोबर, १७५४ रोजी सफदरजंग मत्यू पावला. त्याचा मुलगा शुजाउद्दौला सत्तेसाठी धडपडत होता. बादशहाने माजी बजीर कमरुद्दीन याचा पुत्र इंतिजामउद्दौला याची वजीरपदावर नियुक्ती केली होती. मात्र दिल्ली दरबाराची सूत्रे निजामाचा नातू व गाजीउद्दीनचा पुत्र मीर शहाबुद्दीन ऊर्फ धाकटा गाजीउद्दीन याच्या हाती होती. तो बादशहाचा मीरबक्षी होता.

वरील सर्व घडामोडी घडत असताना उत्तरेतील राजकारणाची जबाबदारी बापूजी हिंगणे व अंताजी माणकेश्वर यांसारख्या दुय्यम मराठी सरदारांवर होती. त्यांना ही परिस्थिती योग्यरित्या हाताळता आली नाही. अंताजी माणकेश्वर पेशव्यांस लिहितो, ''आमचा जीव लहान आणि यंदाची चाकरी आम्हावरी केवढी भारी। हे चाकरी उभयता सरदारांनी करावी, ते सेवकांनी केली.''

६. **रघुनाथरावाची उत्तरेतील पहिली स्वारी :** उत्तरेतील राजकारणाची गुंतागुंत सोडविण्यासाठी नानासाहेब पेशव्यांनी आपला भाऊ रघुनाथरावाची नियुक्ती केली. या वेळी रघुनाथरावाचे वय केवळ १७ वर्षांचे होते. रघुनाथरावाच्या मदतीसाठी अनुभवी सरदार म्हणून जयाप्पा शिंदे व मल्हारराव होळकर यांची नियुक्ती करण्यात आली होती. रघुनाथरावाने सप्टेंबर, १७५३ मध्ये नर्मदा ओलांडली व रजपुतांकडून खंडणी वसूल करीत, दिल्लीच्या दिशेने मार्गक्रमण केले. दरम्यानच्या काळात बादशहा व मीरबक्षी गाजीउद्दीन यांच्यात वितुष्ट आले. बादशहाने रघुनाथरावास मदतीसाठी बोलाविले, तर गाजीउद्दीनने मल्हाररावास लाच देऊन आपल्या बाजूस ओढले. गाजीउद्दीन आणि जाट यांच्यात वैमनस्य निर्माण झाले होते. तसेच बादशहाविरोधी असणाऱ्या वजिराला सुरजमल जाटाने मदत केल्याने त्याचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी बादशहा व गाजीउद्दीन यांनी मदत घेतली व मराठ्यांना आग्रा-अजमेरची सुभेदारी देऊ केली.

जाट ही हिंदूधर्मीय जात होय. दिल्लीच्या दक्षिणेस व यमुनेच्या पश्चिमेस त्यांचे वस्तीस्थान होते. औरंगजेबाच्या कालखंडात त्यांनी स्वातंत्र्ययुद्ध पुकारून स्वतंत्र राज्याची निर्मिती केली होती. सुरजमल हा पराक्रमी जाट राजा होय. खरे पाहता तो मराठ्यांचा मित्र होता. परंतु पैशाच्या लोभापायी रघुनाथराव व मल्हारराव यांनी त्याच्याशी शत्रुत्व स्वीकारले.

**कुंभेरीचा लढा :** रघुनाथरावाने सुरजमल जाटाकडे एक कोटी रुपयांची मागणी केली. सुरजमलने ४० लाख रुपये देऊ केले पण अदूरदर्शी रघुनाथरावाने त्याचा स्वीकार न करता जाटांशी लढण्याची तयारी सुरू केली. सुरजमलने कुंभेरी किल्ल्याचा आश्रय घेतला, मराठ्यांनी या किल्ल्यास वेढा दिला व किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला. संघर्ष सुरू असतानाच मल्हारराव होळकराचा पुत्र खंडेराव जाटांच्या तोफेचा गोळा लागून ठार झाला. खंडेरावाच्या मृत्यूमुळे मल्हाररावाचा राग अनावर झाला. 'सुरजमलचाशिरच्छेद करून कुंभेरीची माती यमुनेत टाकीन तरच जन्माला आल्याचे सार्थक, नाहीतर प्राणत्याग करीन' अशी कडवी शपथ मल्हाररावाने घेतली. जाट मराठा संघषनि उग्र स्वरूप धारण केले. आता आपली धडगत नाही हे ओळखून जाटांनी जयाप्पा शिंदेच्या मध्यस्थीने १८ मे, १७५४ रोजी तह घडवून आणला. जाटांनी मराठ्धांना ३० लाख रुपये दिले. मात्र ही गोष्ट मल्हाररावास आवडली नाही. शिंदे-होळकर यांच्यात वितुष्ट निर्माण झाले व पुढील काळात ते बाढतच गेले.

**७. दिल्लीमधील क्रांती व मराठ्यांचे राजकारण:** बादशहा अहमदशहा व गाजीउद्दीन यांच्यात वितुष्ट निर्माण होऊन लष्करी हालचाली सुरू झाल्या. मल्हारराव होळकर व गाजीउद्दीनचे चांगलेच सूत जमले होते. गाजीउद्दीनने बादशहाच्या राजवाड्यास वेढा दिला यातून आपला बचाव करण्यासाठी बादशहा व वजीर निसटले व सिकंद्राबादला छावणी करून राहिले. मल्हारराव आपल्यावर चालून येत असल्याचे बादशहास समजल्याने त्याने आपल्या जनानखान्यासह खजिना बरोबर घेऊन दिल्लीकडे पलायन केले. मात्र मल्हाररावाच्या फौजेने दि. २५ मे, १७५४ रोजी छावणीवर व जनानखान्यावर छापा घालून लूट केली. या घटनेमुळे उत्तर हिंदुस्थानात मराठ्यांची नाचक्की झाली. बादशहा व वजीर जीव मुठीत घेऊन दिल्लीस पोहोचले. पुन्हा बादशहा व गाजीउद्दीन यांच्यातील संघर्ष उफाळून आला. यातून मार्ग काढण्यासाठी बादशहाने गाजीउद्दीनला शरण जाऊन त्यास बजिरी देऊ केली. वजीर पदाची प्राप्ती होताच गाजीउद्दीनने

बादशहा अहमदशहा यास पदच्युत केले व बहादूरशहाचा नातू आलमगीर दुसरा यास गादीवर बसविले, तर अहमदशहा व उधमबाई यांचे हाल करून त्यांना ठार मारण्यात आले.

आलमगीर दुसरा याचे सर्व आयुष्य कैदखान्यात गेल्यामुळे मुत्सद्देगिरी, शौर्य, धाडस याचा त्याच्याकडे अभाव होता. त्याने आपले पणजोबा औरंगजेबाचे नाव (आलमगीर दुसरा) धारण केले असले तरी पणजोबाजवळ असणारी कर्तबगारी त्याच्या ठिकाणी नव्हती. विलासाची चटक लागून त्यातच तो मश्गूल झाला. गाजीउद्दीन कारस्थानी होता. परंतु मोडकळीस आलेल्या बादशाहीस सावरण्याची क्षमता त्याच्याजवळ नव्हती. वजिराचा दबदबा नष्ट झाला होता. एकदा तर त्याच्या सैनिकांनी पगारासाठी त्याचे कपडे फाडून त्यास रस्त्यावर आणले, एवढेच नव्हे तर त्याच्या जनानखान्यात जाऊन स्त्रियांची अब्रूही लुटली. अशा प्रकारे बादशाही कारभार अत्यंत हीन पातळीस गेला होता.

दिल्लीतील क्रांती रघुनाथराव व होळकरांच्या पाठिंब्यामुळे गाजीउद्दीनला शक्य झाली होती. क्रांतीनंतर रघुनाथरावाने गाजीउद्दीनकडे पैशाचा तगादा लावला. नादिरशहा व अहमदशहा यांच्या लुटीने व बादशहा अहमदशहा याच्या उधळपट्टीने बादशाहीखजिना रिकामा झाला होता. मुगली सुम्यातून बसूल येत नव्हता, घोडी उपासमारीने मरू लागली होती. खुद्द बादशहालाही नमाजासाठी पायीच मशिदीत जावे लागत होते. मात्र मराठे खंडणीसाठी हटून बसले होते. गाजीउद्दीनने १० लाख रुपयांची खंडणी राघोबास दिली व उर्वरित पैशासाठी अंतर्वेदीचा प्रदेश तारण दिला. रघुनाथरावाने विठ्ठल शिवदेवकरवी ग्वाल्हेर व गोहद येथील जाट सत्तांचा पराभव करून ही दोन्ही ठिकाणे आपल्या ताब्यात घेतली. मात्र उत्तरेत मराठा सत्ता स्थिर करण्याकडे रघुनाथरावाने लक्ष दिले नाही. उलट, मोहिमेतील आवश्यक बाब म्हणून तीर्थयात्रा करीत, पुण्य संपादत ऑगस्ट, १७५५ मध्ये ते पुण्यात आले. याबाबत सरदेसाई म्हणतात, 'रघुनाथरावाने या स्वारीत तीर्थक्षेत्रांचे पुण्य पैदा करण्यापलीकडे या बहाद्दराने अन्य काही विशिष्ट कामगिरी केल्याचे दिसून येत नाही.'

### ८. अब्दालीची दिल्लीवरील चौथी स्वारी : क्रौर्य आणि अत्याचारांचा कहर :

पंजाबचा मुगल सुभेदार मीरमन्नू ३ नोव्हेंबर, १७५३ रोजी लाहोर येथे मरण पावला. यानंतर त्याची पत्नी मुगलानी बेगमने पंजाबचा कारभार आपल्या हाती घेतला. वजीर गाजीउद्दीनला पंजाबचा कारभार मुगलानी बेगमाच्या हाती असणे योग्य वाटले नाही. त्याने बेगमला कैद करून दिल्लीस आणले व पंजाबचा सुभेदार म्हणून आदिनाबेगची नियुक्ती केली. बादशाही दरबारातील गाजीउद्दीनचा द्वेष करणाऱ्या मलिका जमानीने मुगलानी बेगमला मदत केली व या स्त्रियांनी कारस्थान करून अहमदशहा अब्दालीला भारतावर स्वारी करण्यासाठी निमंत्रित केले.

गंगा-यमुनेच्या दुआबातील सत्ताधीश नजीबखान रोहिला यांस दिल्ली दरबारात मराठे व जाटांचे वर्चस्व असणे मान्य नव्हते. मराठ्यांच्या उत्तरेतील वर्चस्वाला आळा बसावा, आपणास वजीरपदाची प्राप्ती व्हावी व अब्दालीच्या सत्तेच्या माध्यमातून दिल्लीत इस्लाम धर्माचे रक्षण व्हावे यासाठी त्याने अफगाणचा सत्ताधीश अहमदशहा अब्दालीस भारतावर स्वारी करण्याचे आमंत्रण दिले.

अब्दाली नोव्हेंबर, १७५६ मध्ये भारतावर चौथ्यांदा चालून आला. पंजाबचा सुभेदार आदिनाबेगचा त्याने पराभव केला. जानेवारी, १७५७ मध्ये अब्दालीने दिल्लीत प्रवेश केला व दिल्लीतील जनतेवर भयंकर स्वरूपाचे अन्याय अत्याचार केले. लोक भीतिपोटी दिल्ली सोडून पळून जाऊ लागले. अब्दालीने २ कोटी रुपये व सरहिंदच्या प्रदेशाची मागणी केली. मात्र गाजीउद्दीन ती पूर्ण करू शकला नाही. यामुळे अब्दालीने आपल्या ३० हजार फौजेनिशी दिल्लीवर हल्ला चढविला. बादशहाने राजवाडा सोडून सामान्य वस्तीत पळ काढला. नजीबखान रोहिला ससैन्य अब्दालीस मिळाला. अब्दालीने २८ जानेवारी ते २० फेब्रुवारी, १७५७ पर्यंत दिल्लीची यथेच्छ लूट केली. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करण्यात आले. बादशाही जनानखान्यातील स्त्रिया व मुलीही यांस अपवाद राहिल्या नाहीत. बादशाही जनानखाना व खजिन्याची माहिती पुरविणाऱ्या मुगलानी बेगमला अब्दालीने 'सुलताना मिर्झा' अशी बिरुदावली दिली. मात्र पंजाब प्रांत मिळविण्याची तिची आशा अब्दालीने जाणीवपूर्वक टाळली. दिल्लीची लूट सुरु असतानाच अब्दालीने आपल्या सैन्याची एक तुकडी पाठवून मथुरा, वृंदावन ही हिंदूंची पवित्र तीर्थक्षेत्रे उद्ध्वस्त केली.

अब्दालीच्या या आक्रमणावेळी अंताजी माणकेश्वराने मराठी फौजेनिशी विरोध केला होता. पण बलाढ्य फौजेपुढे त्याचा निभाव लागला नाही. सुरजमल जाटाने आपल्या प्रदेशात अब्दालीस प्रखर विरोध केला. त्यामुळे त्याच्या प्रदेशास लुटीची झळ पोहोचली नाही. उन्हाळ्याचे दिवस अमानुष कत्तलीमुळे यमुना दूषित झाली. साथीच्या रोगाचा फैलाव झाला. अब्दालीचे शेकडो सैनिक मरू लागले. यामुळे अब्दालीने आपली मोहीम आटोपती घेतली. कोट्यवधी रुपयांची संपत्ती व सुंदर स्त्रियांना बरोबर घेऊन अब्दाली मायदेशी निघाला. जातेवेळी त्याने आलमगीर बादशहास पुन्हा दिल्लीच्या तख्तावर बसविले. गाजीउद्दीन यास वजीरपदी व नजीबखानास मीरबक्षी पदी नियुक्त करून एप्रिलमध्ये अब्दाली अफगाणला निघून गेला.

**९. रघुनाथरावाची दुसरी स्वारी:** अहमदशहा अब्दालीच्या स्वारीचे वृत्त अंताजी माणकेश्वराने नानासाहेब पेशव्यांना कळविले. नानांनी रघुनाथरावास प्रचंड फौजेसह उत्तरेच्या मोहिमेवर पाठविले. अब्दालीच्या आक्रमणाचे गांभीर्य लक्षात न घेता रघुनाथरावाने दोन महिने रजपूत राजांकडून खंडण्या बसूल करण्यात घालविले. मे, १७५७ मध्ये रघुनाथराव मल्हाररावासह दुआबाच्या प्रदेशात आला. इटवा, शुकोहाबाद, सिकंदराबाद इत्यादी ठिकाणे पुन्हा ताब्यात घेतली. वजीर गाजीउद्दीनने रघुनाथरावास साहाय्य केले. यानंतर रघुनाथरावाने नजीबखानाच्या ताब्यात असणाऱ्या अंतर्वेदीत प्रवेश केला. विठ्ठल शिवदेव या पराक्रमी सरदाराने दिल्ली काबीज केली व नजीबखानास कैद केले. दिल्लीच्या राजकारणात मराठ्यांविरुद्ध सतत कारस्थाने करणारा नजीबखान मराठ्यांच्या ताब्यात आला. अशा प्रसंगी नजीबखानाने मल्हाररावाकडे आर्जव केला. 'मी तुमचा धर्मपुत्र आहे, कसेही करून माझा बचाव करावा मी तुमचे उपकार विसरणार नाही.' कारस्थानी नजीबखानाच्या सुटकेसाठी मल्हाररावाने रघुनाथरावाकडे हट्ट धरला. राघोबास नाही म्हणण्याची छाती झाली नाही. अंताजी माणकेश्वर, विठ्ठल शिवदेव इत्यादींनी कारस्थानी नजीबखानची सुटका केल्यास भविष्यकाळातील धोक्याची जाणीव करून दिली होती. पण अदूरदर्शी रघुनाथरावाने नजीबास मुक्त केले. हाच नजीबखान सापासारखा उलटून पानिपतास व मराठ्यांच्या नाशास कारणीभूत ठरला.

रघुनाथरावाने बादशहा आलमगीरला सिंहासनावर बसविले. वजीरपद गाजीउद्दीनकडे ता मीरबक्षी अहमदखान बंगशाकडे देण्यात आली. यानंतर रघुनाथरावाने नजीबखानाच्या ताब्यातील अंतर्वेदीचा मुलूख काबीज करण्यासाठी फौज पाठविली व ऑक्टोबर, १७५७ मध्ये पंजाबच्या मोहिमेवर कूच केले.

**मराठे अटकेपार :** दसऱ्याच्या मुहूर्तावर २२ ऑक्टोबर, १७५७ रोजी रघुनाथरावाने पंजाबच्या मोहिमेस प्रयाण केले. वाटेमध्ये कुंजपुरा सर केला. मार्च, १७५८ मध्ये रघुनाबराव सरहिंदला आला. पंजाबचा मोगल सुभेदार आदिनाबेग मराठ्यांस मिळाला. अब्दालीच्या स्वाऱ्यामुळे त्रस्त झालेल्या शिखांनी मराठ्यांना मदत केली. रघुनाथरावाने सरहिंदचा ताबा घेतला व अब्दुस्समदखान व जंगबाजखान या अब्दालीच्या सरदारांना कैद केले. यानंतर मराठा सरदार मानाजी पायगुडेने लाहोरवर हल्ला केला. मराठ्यांपुढे आपला निभाव लागणार नाही हे ओळखून पंजाबचा कारभार पाहणारा अब्दालीचा मुलगा तैमूरशहा व सरदार जहानखान यांनी अफगाणिस्तानकडे पळ काढला. अटकेपर्यंत झेंडा फडकविण्याचा अभूतपूर्व पराक्रम मराठ्यांच्या हातून घडला. अशा प्रकारे मथुरेपासून लाहोरपर्यंतचा प्रदेश मराठ्यांच्या वर्चस्वाखाली आला. नानासाहेब पेशव्यांनी रघुनाथरावास जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावून पुण्यास बोलाविले. दक्षिणेकडे जाण्यापूर्वी रघुनाथरावाने लाहोर व मुलतानचा प्रदेश आदिनाबेगकडे सोपविला. त्या बदल्यात बार्षिक ७५ लाख रुपये देण्याचे त्याने मान्य केले. साबाजी शिंदे, तुकोजी होळकर, रायाजी सुखदेव इत्यादी सरदारांकडे उत्तरेची जबाबदारी सोपविली. मराठ्यांनी पंजाब घेतल्यामुळे अब्दालीच्या आक्रमणाचा धोका दिसत असताना या प्रांताच्या संरक्षणाची व्यवस्था करणे आवश्यक होते. पण तसे न झाल्याने पानिपतच्या अरिष्टास मराठ्यांना सामोरे जावे लागले.

**१०. दत्ताजी शिंदेची उत्तरेकडे रवानगी:** रघुनाथरावास दक्षिणेत बोलाविल्यानंतर नानासाहेब पेशव्यांनी दत्ताजी व जनकोजी शिंदे यांची उत्तरेच्या मोहिमेवर रवानगी केली. पेशव्यांनी त्यांच्यावर नजीबखानाचा बंदोबस्त करावा, लाहोरचा बंदोबस्त करावा, हिंदू तीर्थक्षेत्रे सोडवावी व बंगालपर्यंत मोहिमा काढून एक कोट रुपये वसूल करावेत इत्यादी जबाबदाऱ्या सोपविल्या. दक्षिणेत जात असतानाचा रघुनाथरावाने दत्ताजीस नजीबखानाचा बंदोबस्त करणे आवश्यक असल्याचे सांगितले. जे काम मालकास जमले राही ते सेवकाने करावे या चुकीच्या धोरणाचा रघुनाथरावाने अवलंब केला.

दत्ताजीने वजीर व बादशहा यांच्यातील भांडणे सोडविण्यात तीन महिने खर्ची घातले, त्यानंतर त्याने पंजाबचा बंदोबस्त केला, आदिनाबेगच्या मुलाकडून खंडणी बसूल केली व बंदोबस्तासाठी शिंदेस दहा हजार फौजेनिशी ठेवूनजून, १७५९ मध्ये अंतर्वेदीत प्रवेश केला. नजीबखानाला नष्ट करणे हा दत्ताजीचा हेतू होता. प्रथमतः दत्ताजीने पूर्व हिंदुस्थान जिंकण्याचे ठरविले. त्यासाठी गंगा नदीवर पुलाची आवश्यकता होती. नजीबखानाने सदर पूल बांधण्याची जबाबदारी स्वीकारली तो शुक्रतालवर आला. पुलाच्या कामात मुद्दामहून दिरंगाई सुरू केली व मराठ्यांच्या नाशासाठी शुजाउद्दौला व अब्दाली यांच्याशी संधान साधले. शुक्रतालचा पूल तयार होताच नजीबने त्यावर ताबा मिळविला. परिणामतः दत्ताजीने नजीबखानाच्या छावणीवर हल्ला केला. दोन महिने उभय सैन्यात चकमकी घडत राहिल्या.

**११. अब्दालीची पाचवी स्वारी आणि शुक्रतालची लढाई :** अब्दालीस नजीबखार रोहिल्याकडून भारतावर स्वारी करण्याचे आमंत्रण मिळाले. पंजाब मराठ्यांच्या ताब्यात गेल्यामुळे अब्दाली चिडून होता. जुलै, १७५९ मध्ये अब्दालीने जहानखानास लाहोरवर पाठविले. साबाजी शिंदेने त्याचा पराभव केला. झालेल्या युद्धात जहानखान जखमी झाला, त्याचा मुलगा मारला गेला. दोन हजार सैनिक ठार झाले. यामुळे संतप्त झालेल्या अब्दालीने नोव्हेंबर, १७५९ मध्ये लाहोरवर हल्ला केला. हजारो मराठे मारले गेले. साबाजीने माघार घेतली व तो शुक्रतालवर दत्ताजीस येऊन मिळाला.

पंजाब अब्दालीच्या ताब्यात गेला. दरम्यानच्या काळात दिल्लीमध्ये अभूतपूर्व घटना घडली. वजीर गाजीउद्दीनने बादशहाचा खून केला व कामबक्षच्या नातवास बादशहापदी बसविले. बादशहाच्या खुनामुळे उत्तर भारतात खळबळ उडाली. दिल्लीतील अस्थिर परिस्थितीचा फायदा उठविण्यासाठी अब्दाली दिल्लीच्या रोखाने चालू लागला. दत्ताजीने शुक्रतालचा वेढा उठविला व दिल्लीच्या रक्षणासाठी तो निघाला. अब्दालीने यमुना पार केली. सहारणपुराजवळ नजीबखान अब्दालीस मिळाला. अहमदखान बंगश अब्दालीच्या गोटात सामील झाला. तैमूरशहा चाळीस हजार फौजेनिशी अंबाल्यात येऊन धडकला. दत्ताजी व खुद्द पेशव्यांनीही मल्हारराव होळकरास मदतीबद्दल खलिता पाठविला. मात्र आपण माधोसिंगाचे पारिपत्य करत असल्याचे सांगून मल्हारराव राजपुतान्यातच घुटमळत राहिला.

यमुनेच्या पश्चिम तीरावर दिल्लीपासून अवघ्या दहा मैल अंतरावर असणाऱ्या बरारी घाटावर दत्ताजीने छावणी उभी केली. थोड्या अंतरावर जानकोजी तळ ठोकून होता तर नदी उतारावर साबाजी शिंदे दक्ष होता. इतर मराठा सरदार येईपर्यंत वाट न पाहता दिल्लीपर्यंत माघार घ्यावी असा सल्ला दत्ताजीस अनेकांनी दिला. परंतु स्वाभिमानी दत्ताजीने माघार घेतली नाही. बायका-मुले, जडजवाहीर रेवाडीस पाठवून अब्दालीच्या पारिपत्यासाठी त्याने बरारी घाटावर तळ ठोकला. १० जानेवारी, १७६० रोजी नजीबखानाने यमुना पार करून साबाजीवर हल्ला चढविला. मराठ्यांनी हजारो रोहिल्यांना कंठस्नान घातले. रोहिल्यांच्या बंदूकधारी फौजेमुळे मराठे मारले जात असल्याची बातमी मिळताच दत्ताजी तत्परतेने साबाजीच्या मदतीस आला. प्रचंड धुमश्चक्री झाली. प्रेतांचे खच पडले, रोहिले माघार घेऊन नदीपलीकडे होऊ लागले, इतक्यात यशवंतराव जगदाळे पडल्याचे दत्ताजीस समजले, त्याचे प्रेत काढण्यासाठी दत्ताजी पुढे सरकला. याच वेळी दत्ताजीस गोळी लागून तो खाली पडला. जखमी दत्ताजीस शत्रू सैन्याने वेढा दिला. कुत्बशहा त्वरेने पुढे झाला. त्याने घायाळ दत्ताजीस सवाल केला, 'क्यों पटेलजी अब क्या करोगे?' मरणाच्या दारात उभ्या असणाऱ्या दत्ताजीने बाणेदारपणे उत्तर दिले, 'बचेंगे तो और भी लडेंगे !' कुत्बशहा पुढे सरसावला. त्याने दत्ताजीचे शीर कापले व अब्दालीपुढे नजर केले. दरम्यान जानकोजी जखमी झाला. मराठ्यांनी त्यास त्वरेने हलवून कोटपुतळीवर नेले. दत्ताजी ठार झाल्यामुळे मराठा सैन्य उधळले. १४ जानेवारीस जानकोजीसह सर्व जण कोटपुतळी येथे एकत्र आले. बरारी घाटाच्या युद्धामुळे मराठे मोठ्या संख्येने मारले गेले नसले तरी दत्ताजीसारख्या पराक्रमी सेनानीच्या मृत्यूमुळे उत्तरेतील मराठ्यांच्या वर्चस्वाला धक्का बसला.

बरारी घाटाच्या युद्धानंतर अब्दालीने दिल्लीचा ताबा घेतला. संपत्तीसाठी दिल्लीची प्रचंड लूट करण्यात आली. दत्ताजीच्या मदतीसाठी निघालेला मल्हारराव कोटपुतळी येथे जानकोजी शिंदे यास येऊन मिळाला.

दोघांनी संयुक्तपणे गनिमी कावा तंत्राने अब्दालीचा सरदार जहानखान व नजीबखान विरुद्ध लढा दिला मात्र त्यांच्या गनिमी कावा तंत्रास यश आले नाही.

**१२. सदाशिवरावभाऊ यांची उत्तरेकडे रवानगी:** दत्ताजीच्या मृत्यूची वार्ता महाराष्ट्रात पोहोचताच महाराष्ट्रभर संतापाची लाट उसळली. पंजाब व दुआबातील मराठ्यांच्या वर्चस्वाला अब्दालीमुळे धक्का बसला. या गोष्टीची नानासाहेबांनी गांभीर्याने दखल घेतली. अब्दालीचे पारिपत्य करण्यासाठी व उत्तरेत मराठ्यांचे पुन्हा बर्चस्व निर्माण करण्यासाठी उदगीरच्या विजयाचा शिल्पकार सदाशिवरावभाऊ ऊर्फ भाऊसाहेब यांची नियुक्ती करण्यात आली. भाऊसाहेब या वेळी पटदूर मुक्कामी होते. नानासाहेबांनी त्यांच्यासोबत आपला पुत्र विश्वासराव व ताज्या दमाची पंचवीस हजारची फौज दिली. तसेच भाऊंच्या बरोबर यशवंतराव पवार, बळवंतराव मेहेंदळे, विठ्ठल शिवदेव, समशेर बहादूर, दमाजी गायकवाड, अंताजी माणकेश्वर, नाना फडणीस इत्यादी सरदारांना देण्यात आले. इब्राहिमखान गारदीचा उत्कृष्ट प्रतीचा तोफखाना नऊ हजार गारांसह बरोबर होता. मार्च, १७६० मध्ये भाऊसाहेब पन्नास हजार सैन्यासह उत्तरेच्या मोहिमेवर निघाले. वाटेमध्ये मराठा लष्कराची अनेक पथके येऊन मिळाली. मल्हारराव होळकर भाऊसाहेब दिल्ली वाटेवर असताना त्यांना येऊन मिळाले. सुरजमल जाटानेही रघुनाथरावानेकेलेल्या छळास विसरून मराठ्यांना साथ दिली. रजपुतांनी मात्र संधिसाधूपणाची भूमिका घेत 'तुमचा व अब्दालीचा कजिया निकालात येईपर्यंत आम्ही कोणत्याच पक्षास मिळाणा नाही.' असे भाऊसाहेबांना सुनावले. सफदरजंगाचा मुलगा शुजाउद्दौलाचा ओडा मराठ्यांकडे होता, त्याच्या मनातील चलबिचल ओळखून नजीबखानाने शुजाच्या धार्मिक भावनेस हात घातला. यामुळे द्विधा मनःस्थितीत असणारा शुजाउद्दौला चार हजार निवडक सैन्यानिशी अब्दालीच्या गोटात सामील झाला.

१४ जुलै, १७६० रोजी भाऊसाहेब आग्र्यास आले. यमुना काठच्या मथुरा, वृंदावन या तीर्थक्षेत्रांचे पुण्य श्रावणमासात पदरी पाडून घेण्यासाठी भाऊसाहेबांनी व्रत-वैकल्ले केली. बायका-मुले, भटजी, याज्ञिक, पुराणिक या मंडळींना हा पुण्य संपादनाचा योग पुन्हा येणार नव्हता. या बिनलढाऊ लोकांमुळे ऐतिहासिक भाषेत बाजारबुणग्यांच्या मोठ्या संख्येमुळे लष्करावर प्रचंड ताण पडला. त्यामुळे त्यांच्या हालचालींना मर्यादा पडल्या. याविषयी शेजवलकर म्हणतात, ''ज्या वेळी अब्दालीसारखा हजार मैलांचा टापू नादिरशहाबरोबर तुडवलेला अफगाण शिवाजीच्या पद्धतीने स्वाऱ्या चालवीत होता, त्या वेळी शिवाजीचे मराठे मोगली पद्धतीने मोहिमा चालवू लागले होते. बरोबर सर्व सुखसोई, बाजार, चैनीच्या वस्तु, धार्मिक विधी चालविण्याची साधने, करमणुकीच्या गोष्टी, बायका-मुले असे लटांबळ बाळगून ही स्वारी चालली होती.''

१ ऑगस्ट, १७६० रोजी सदाशिवराव भाऊंनी अब्दालीचा सरदार याकुबअल्लीखान बाचा पराभव करून दिल्लीचा ताबा घेतला. यामुळे मराठ्यांच्यात चैतन्य संचारले तर अब्दालीस चिंतेने ग्रासले. दिल्ली घेईपर्यंत सुरजमल जाट मराठ्यांसोबत होता. दिल्ली विजयानंतर दिल्लीचा कारभार त्याच्याकडे न दिल्यामुळे मराठ्यांवर नाराज होऊन तो आपल्या मुलखात निघून गेला. दिल्ली घेतल्यानंतर भाऊसाहेब सव्वादोन महिने येथेच तळ ठोकून राहिले. बाजारबुणग्यांची संख्या फुगत चालली होती. अंतर्वेदीतून मराठ्यांना रसद पुरवठा करणाऱ्या गोबिंदपंत बुंदेल्यांचा प्रदेश उद्ध्वस्त झाल्याने नाइलाज झाला होता. दक्षिणेतून पैशाची कुमक येत

नव्हती. शुजाउद्दौलाची मदत मिळविण्यात मराठ्यांना यश आले नाही. अब्दालीशी वाटाघाटी होऊ शकल्या नाहीत. मराठ्यांपुढे निर्माण झालेल्या या बिकट प्रसंगाचे चित्र पत्रामधून व्यक्त करताना नाना फडणीस म्हणतात, ''आपली फौज भारीच आहे, परंतु पोटास नाही, घोडी दाना खावयास विसरली, माणसास अन्न मिळता कठीण दिवस, इतकेच मात्र संकट आहे. त्याची तजवीज महालकरियांकडील ऐवज येईल, तेव्हा फौजेस पोटास मिळेल. कर्ज तो कोठे मिळत नाही. फौज आपली भारीच आहे. महिनाभरात यमुनेचे पाणी उतरेल. लढाई मातब्बर व्हावी, असा विचार दिसतो. अब्दालीमध्ये दम दिसतो. आपली फौज एकदिल आहे.श्रीमंताचे प्रारब्ध थोर आहे. सर्व अरिशे बारतील.'' मराठ्यांपुढे अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. या नैराश्येतून मार्ग काढण्यासाठी भाऊसाहेबांनी दिल्लीच्या टंचाई किल्ल्यातील दिवाण-इ-खासच्या छताची चांदी काढून नऊ लक्ष रुपये उभे केले व महिनाभराची आपली अडचण दूर केली.

**कुंजपुऱ्याचा विजय : १७ ऑक्टोबर, १७६०**

दिल्लीच्या उत्तरेस ७८ मैलांबर यमुना नदीच्या काठी कुंजपुरा हे अब्दालीचे महत्वाचे ठाणे होते. अब्दालीने अन्नधान्य व युद्धसामग्री येथे साठविल्याची माहिती भाऊसाहेबांनासमजली. त्यांनी आपल्या फौजेसह कुंजपुऱ्याकडे कूच केले. किल्ल्याच्या संरक्षणार्थ व्यवस्था नजीबखानाचा भाऊ नजीबतखान याचेकडे होती. त्याच्या मदतीस कुत्वरयता व अब्दुल समदखान होते. इब्राहिमखानाच्या तोफखान्याने किल्ल्याच्या तटाला भगदड पाडले. मराठ्यांनी किल्ल्यात प्रवेश केला. दहा हजार पठाणांना कंठस्थान घालण्यात आले. अब्दुल समदखान व नजीबतखान यांना मराठ्यांनी ठार केले. दत्ताजीचे शीर कापणारा कुत्बशहा मराठ्यांच्या हाती सापडला. मराठ्यांनी त्याचा शिरच्छेद करून त्याचे शीर भाल्यावर खोचून सर्वत्र फिरविले व दत्ताजीच्या मृत्यूचा बदला घेतला. किल्ला मराठ्यांच्या ताब्यात येताच किल्ल्यामधील दहा लाखांचे सामान व रोख साडेदहा लाख अशी प्रचंड संपत्ती मराठ्यांच्या हाती पडली. भाऊसाहेबांच्या स्वारीतील हा आनंदाचा सर्वोच्च क्षण ठरला.

**पानिपतची छावणी**

कुंजपुऱ्यावरील पराभवामुळे अब्दालीचा संताप अनावर झाला. त्याने आपल्या सैन्याचा तळ हलविला. मराठ्यांवर हल्ला करण्यासाठी यमुना पार करणे आवश्यक होते. अब्दाली स्वतः पूर्व काठाने उतार तपासत ससैन्य उत्तरेकडे सरकू लागला. दिल्लीपासून उत्तरेस वीस मैल अंतरावर बागपतजवळ नदी पात्र रुंद असल्याने उतार सापडला. अब्दालीने यमुना पार करण्यासाठी आपल्या सैन्यास आदेश दिला. मराठ्यांची छावणी नदीपलीकडे नसतानाही गिलचे नदी पार करण्यास धजेनात. शेवटी अब्दालीने आपल्या सैन्याला चेव यावा म्हणून अल्लाची करुणा भाकली 'अल्लाने कौल दिला आहे मी चाललो, छाती असेल त्याने माझ्या पाठोपाठ यावे.' असे आवाहन करून स्वतःचा घोडा पाण्यात घातला. अब्दालीच्या सैन्याला यमुनापार होण्यास २३ ते २५ ऑक्टोबर असे तीन दिवस लागले.

अब्दाली एवढ्या तत्परतेने यमुना पार करेल हे भाऊसाहेबांच्या स्वप्नीही नव्हते. अब्दालीस यमुना पार करण्यास पंधरा दिवस तरी लागतील या अवधीत त्याच्यावर धसरावे म्हणून भाऊंनी आपला रोख

पानिपतावरून बागपतकडे वळविला. परंतु अब्दालीने अत्यंत जलद हालचाली करून भाऊसाहेबांना धक्का दिला. भाऊंना पानिपतवरच थांबणे योग्य वाटले. आपल्या सैन्य तळाभोवती खंदक खणून भाऊ पानिपतवरच अडकून राहिले. अब्दालीने पानिपतावरील मराठ्यांच्या छावणीपासून सात मैल दक्षिणेकडे आपल्या सैन्याचा तळ दिला. मराठ्यांच्या दक्षिणेकडे जाण्याच्या मार्गावर अब्दाली तर अब्दालीच्या उत्तरेकडे-मायदेशी जाण्याच्या मार्गावर मराठे असा परस्परांनी एकमेकांचा मार्ग अडविला. भाऊसाहेबांस सुरुवातीची परिस्थती अत्यंत अनुकूल होती अशा परिस्थितीत अब्दालीवर हल्ला झाला असता तर भाऊंना विजय प्राप्त करता आला असता. याबाबत शेजवलकर म्हणतात, ''मराठ्यांनी स्वतः हल्ला न करण्यास कारणीभूत होणारी काही खास अडचण होती व ती म्हणजे मुख्यतः त्यांनी अदूरदर्शीपणाने बरोबर आणलेले व नंतर जवळ बाळगलेले बायकामुलांचे, भटाभिक्षुकांचे व एकंदरीत बिनलढाऊ माणसांचे (बाजारबुणग्यांचे) लटांबळ होय. ही माणसे मरू नयेत, सुरक्षित राहावीत, म्हणून सैन्यास धाडस मारावे लागले.''

मराठे व अब्दाली पानिपतच्या रणमैदानावर समोरासमोर छावण्या करून परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. अधूनमधून छोट्या-मोठ्या चकमकी घडत होत्या. २२ नोव्हेंबर रोजी जानकोजी शिंदेने अब्दालीचा वजीर सहावलीखानावर हल्ला केला व वजिराचे एक हजार सैन्य ठार केले. ७ डिसेंबरला नजीबखानाने मराठ्यांवर अचानक हल्ला केला. बळवंतराव मेहेंदळे व इब्राहिमखान यांनी प्रतिहल्ला करून तीन हजार रोहिल्यांना कंठस्थान घातले. परंतु या लढाईत बळवंतराव मेहेंदळेसारखा पराक्रमी सेनानी मराठ्यांना गमवावा लागला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मराठ्यांना रसद पुरविण्याचे काम पार पाडणाऱ्या गोविंदपंत बुंदेलेवर नजीबखानाने अताईखान व करीमदादखान यांना पाच हजार सैन्यानिशी पाठविले. त्यांनी १६ डिसेंबरला नारोशंकर या मराठा सेनानीचा पराभव केला. २० डिसेंबरला रसद घेऊन चाललेल्या गोविंदपंतावर रोहिल्यांनी अचानक हल्ला केला यात गोविंदपंतांना गोळी लागून ते मृत्युमुखी पडले. उत्तरेत तीस वर्षे मराठ्यांची पाठराखण करणाऱ्या गोविंदपंताच्या मृत्यूमुळे मराठ्यांना धक्का बसला.

गोविंदपंताच्या मृत्यूमुळे मराठ्यांपुढे रसदीचा प्रश्न निर्माण झाला. अंतर्वेदीतून मराठ्यांना मिळणारी रसद बंद झाली. अब्दालीने चारी दिशा रोखून मराठ्यांची रसद तोडली. मराठ्यांची पेशव्यांना पाठविलेली पत्रेही मध्येच अडविली जाऊ लागली. सैन्यावर उपासमारीची वेळ आली, घोडी चाऱ्याविना तडफडू लागली. यातून मार्ग काढण्यासाठी भाऊंनी जवळ असणारी सोन्याचांदीची नाणी मोडली. पंधरा दिवसात तेही संपले. उपासमारीने माणसे व जनावरे मरू लागली. ही विदारक परिस्थिती विश्वासराव नानासाहेबांना कळविताना म्हणतात, ''गिलचाचा पेच भारी पडला आहे. आम्हासारखे पुत्र आपणास आहेत व होतील. पण भाऊंसारखा बंधू मिळणार नाही. प्रसंगी येऊन मदत करावी. रसदीचा प्रश्न गंभीर बनला होता. अन्नाविना तडफडून मरण्यापेक्षा शत्रूशी दोन हात करून मेलेले बरे अशी सर्वांचीच भावना होती. १० जानेवारी, १७६१ रोजी मराठ्यांनी मकर संक्रांतीचा सण साजरा केला. भाऊसाहेबांनी १३ जानेवारी, १७६१ रोजी सेनानींची बैठक घेतली व १४ जानेवारीस शत्रूवर हल्ला करण्याचे निश्चित करण्यात आले.

**पानिपतचा रणसंग्राम : १४ जानेवारी**

मराठे व अब्दाली यांनी पानिपतावर छावणी केल्यापासून उभयतांमध्ये जवळपासदोन महिने छोट्या-मोठ्या चकमकी होत राहिल्या. १४ जानेवारीस पहाटेपासूनच मराठ्यांनी युद्ध तयारीस सुरुवात केली. असेल ते अन्न सेवन करून या निर्वाणीच्या क्षणास सामोरे जाण्यास सर्व जण सज्ज झाले. भाऊंनी आपल्या सैन्याची रचना लंबगोलाकार केली. आघाडीस इब्राहिमखानाचा तोफखाना व गारदी पायदळाची नऊ पथके ठेवण्यात आली. उजव्या बाजूस दमाजी गायकवाड व विठ्ठल शिवदेव यांचे घोडदल ठेवण्यात आले. मध्यभागी भाऊसाहेब, विश्वासराव यांची हुजुरातीची फौज होती. हुजुरातीच्या उजवीकडे समशेरबहादूर, यशवंतराव पवार, अंताजी माणकेश्वर, संताजी बाघ, सखोजी जाधव, नाना पुरंदरे यांचे घोडदल होते. हुजुरातीच्या पाठीमागे स्त्रिया, मुले, बिनलढाऊ लोक असून त्यापाठीमागे जानकोजी शिंदे व मल्हारराव होळकर यांच्या संरक्षक तुकड्या ठेवण्यात आल्या होत्या. अब्दालीने आपली सैन्यरचना अर्धगोलाकार केली होती. गोलाच्या मध्यभागी वजीर शहावलीखान याचे घोडदळ होते. उजवीकडे बरखुरादखान व अमीरबेगच्या पायदळाची रचना होती. त्याला लागूनच दुदेखान, अहमदखान, हफिजरहमत अहमदखान बंगश यांचे पायदळ ठेवण्यात आले होते. वजिराच्या डावीकडे शुजाउद्दौला व नजीबखान यांची पथके होती. सैन्याच्या पिछाडीवर अब्दाली आपल्या राखीव तुकडीसह लष्करी हालचालींवर लक्ष ठेवून होता.

१४ जानेवारी, १७६१ रोजी सकाळी नऊ वाजता युद्धास प्रारंभ झाला. इब्राहिमखानाच्या तोफा शत्रू सैन्यावर आग ओकू लागल्या. इब्राहिमखानाने नऊ हजार रोहिले कापून काढले. रोहिल्यांच्या सैन्यास खिंडार पडताच गोलाच्या लढाईचे तंत्र न समजल्याने विठ्ठल शिवदेव व दमाजी गायकवाडांचे घोडदळ पुढे सरकले. यामुळे तोफांच्या माऱ्याला मराठा सैनिकच बळी पडू लागल्याने इब्राहिमखानास तोफांचा मारा थांबवावा लागला. यामुळे रोहिल्यांना सावरण्यास संधी मिळाली.

वजीर शहावलीखान व मराठ्यांच्या आघाडीच्या फौजेमध्ये प्रचंड धुमश्चक्री सुरू झाली. अताईखानासह त्याच्या तीन हजार फौजेस मराठ्यांनी कापून काढले. वजिराच्या फौजेला खिंडार पडले. अशा प्रसंगी अब्दालीने वजिराच्या मदतीस दहा हजारांची तुकडी पाठविली. भाऊसाहेब, विश्वासराव, समशेरबहादूर, यशवंतराव पवार, संताजी बाघ, जानकोजी शिंदे, मानाजी पायगुडे व इब्राहिमखान गारदी इत्यादी सरदारांनी पराक्रमाची शर्थ केली. प्राण पणास लावून लढणाऱ्या मराठ्यांपुढे वजिराच्या फौजेचा पराभव झाला. ही बातमी अब्दालीस समजताच त्यास धक्का बसला, आपल्या जनानखान्यातील स्त्रियांना चपळ घोड्यावर बसवून त्यांच्या पलायनाची त्याने तयारी केली होती. या घटनेवरून अब्दालीलाही आपण वशस्वी होऊ याची खात्री नव्हती हे निश्चित होते. मराठ्यांच्या प्रचंड हल्ल्यामुळे पंधरा हजार गिलचे नामर्द होऊन रणांगणातून पळ काढू लागले. अशा प्रसंगी अब्दालीने आपले खास पथक पाठवून त्यांना माघारी कळविले व त्यांना रणमैदानावर उभे करण्यात आले. दुपारी दोनपर्यंत मराठ्यांची सरसी होती. मोठ्या निर्धाराने ते शत्रूसैन्याचा मुकाबला करत होते. या अटीतटीच्या लढतीमध्ये अब्दालीने आपली राखीव फौज पुढे आणली. त्याचा उष्ट्र तोफखाना मराठ्यांवर आग ओकू लागला. ही धुमश्चक्री सुरू असतानाच विश्वासरावास गोळी लागून तो ठार झाला. विश्वासराव पडल्याचे समजताच मराठ्यांना प्रबंड धक्का बसला.

आपला निभाव लागणार नाही असे समजून काही मातब्बर मराठा सरदारांनी रणांगण सोडून पळ काढला. 'उत्तम प्रकारे गाठ पडली तरी झुंज द्यावी नाहीतर पळोन जावे' या पद्धतीचा होळकरांनी अवलंब केला. मल्हाररावाप्रमाणेच दमाजी गायकवाड, विठ्ठल शिवदेव, नाना पुरंदरे इत्यादी सेनानींनी भ्याडपणाने रणांगणातून पलायन केले.

विश्वासराव पडल्याचे दिसताच भाऊसाहेबांना धक्का बसला. त्यांनी विश्वासरावास उचलून अंबारीत ठेवले. आपल्या पिछाडीस असणाऱ्या लोकांनी पलायन केल्याचे त्यांच्या लक्षात आले. मराठी राज्याचे एकनिष्ठ सेवक समजल्या जाणाऱ्या सेनानींच्या पलायनामुळे भाऊसाहेबांना प्रचंड धक्का बसला. दुःख, क्रोध व संताप यांनी बेभान होऊन भाऊसाहेबांनी शत्रूवर हल्ला चढविला. या वेळी सुमारे दोन तास भीषण रणकंदन घडून आले. भाऊंसोबत असणारे तुकोजी शिंदे भाऊसाहेबांना कळवळून म्हणाले, 'महाराज क्षात्रधर्माची शर्थ झाली! याज उपर निघावे हे उत्तम. यावर भाऊसाहेब म्हणाले, 'आता कोणीकडे जावे? काय तोंड दाखवावे. क्षात्रधर्माची शर्थ करत पानिपतावरील या मराठ्यांच्या सेनापतीने वीरमरण स्वीकारले. अंबारीत भाऊसाहेब दिसत नाहीत हे लक्षात येताच मराठ्यांचे नीतिधैर्य खचले, ते रणांगण सोडून पळू लागले. काशीराजच्या मतानुसार, 'मराठ्यांची फौज कापरासारखी एकाएकी नाहीशी झाली. मैदानावर कोणी राहिले नाही. ठिकठिकाणी प्रेतांच्या राशी पडल्या होत्या.'

रणमैदानावरून पळणाऱ्या मराठी सैनिकांचा व बाजारबुणग्यांचा अफगाण सेनेने चाळीस मैलांपर्यंत पाठलाग केला व प्रचंड कत्तल केली. वीस हजार स्त्रियांना गुलाम बनविण्यात आले. भाऊसाहेब, विश्वासराव, यशवंतराव पवार, तुकोजी शिंदे, संताजी बाघ, मानाजी पायगुडे इत्यादी सेनानी ठार झाले. जानकोजी शिंदे व इब्राहिमखान यांना पकडण्यात येऊन त्यांना ठार मारण्यात आले. इब्राहिमखानाची चामडी सोलण्यात आली त्यावर मीठ चोळून जखमा चिघळवून देऊन हालहाल करून त्यास ठार मारण्यात आले. पकडलेल्या अनेकांना रांगेत उभे करण्यात येऊन खेळ म्हणून तलवारीने त्यांची सपासप डोकी उडविण्यात आली.

**पानिपत युद्धाचे परिणाम–**

पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे मराठ्यांच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासावर दूरगामी परिणाम घडून आले. काही इतिहासकार पानिपतामुळे मराठ्यांना जबरदस्त धक्का बसला व त्यातून ते सावरू शकले नाहीत असे मानतात तर काही इतिहासकारांच्या मतानुसार, या युद्धाचा मराठ्यांच्या इतिहासावर फारसा गंभीर परिणाम झाला नाही. जदुनाथ सरकार म्हणतात, ''१७६१ च्या पानिपत युद्धाने मराठ्यांना जबरदस्त धक्का बसला. त्यातून मराठी सत्ता सावरू शकली नाही. त्यातच त्यांचा अपकर्ष झाला.'' एल्फिन्स्टन म्हणतो, ''पानिपतात मराठ्यांचा जसा सर्वांगीण आणि पूर्ण पराभव झाला तसा क्वचित कोणाचा झाला असेल. यामुळे मराठ्यांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या पराभवाच्या धक्क्यातून पेशवा व त्याचे मराठा राज्य कधीच सावरू शकले नाही.''

वरील विचाराहून वेगळे विचार मांडताना डॉ. एस. एन. सेन म्हणतात, ''पानिपतात मराठ्यांचा पराभव झाला आणि त्यामुळे मराठ्यांचा सर्वनाश झाला असे मत व्यक्त करणे धाडसाचे ठरेल. पानिपतच्या पराभवामुळे फार तर मराठ्यांच्या विस्तारवादाला आळा बसला असे म्हणता येईल.'' सरदेसाई म्हणतात, ''पानिपतावर मराठे संपले नसून त्यानंतर मराठा सत्तेचा उत्कर्षच होत गेला.'' इतिहासकरांच्या या मतांचा विचार करता असे दिसून येते की, पानिपत युद्धाचा मराठ्यांना जबरदस्त धक्का बसला मात्र पानिपतामुळे मराठा सत्ता संपुष्टात आली नाही. माधवराव पेशवे, नाना-महादजी यांनी पानिपतचा कलंक पुसून मराठा सत्तेस पुनश्च वैभव मिळवून दिले. इतिहासप्रसिद्ध पानिपतच्या युद्धाचे परिणाम खालीलप्रमाणे -

**१. प्रचंड मनुष्यहानी :** पानिपतच्या संहाराची बातमी नानासाहेबांना एका सांकेतिक भाषेत देण्यात आली तो संदेश असा होता. ''दोन मोती गळाली (भाऊसाहेब, विश्वासराव), सत्तावीस मोहरा हरपल्या, रुपये खुर्दा किती खर्ची पडला याची गणतीच नाही.'' सरदेसाई यांच्या मते, पानिपतावर पाऊण लाख माणसे मारली गेली असावीत. तर शेजवलकरांच्या मते, पानिपतावर दोन लाख माणसे मारली गेली असावीत. पानिपतावरील मनुष्यहानीबाबत जदुनाथ सरकार म्हणतात, ''महाराष्ट्रात असे एकहीघर नव्हते की ज्या घरातून पानिपतच्या लढाईत कोणी मृत झाले नाही. महाराष्ट्रातील एक पिढीच्या पिढी गारद झाली.''

**२. मातब्बर सेनानींचा मृत्यू :** पानिपताच्या रणमैदानावर भाऊसाहेब, विश्वासराव या पेशवे घराण्यातील कर्त्या व्यक्ती ठार झाल्या. त्याचबरोबर इब्राहिमखान गारदी. यशवंतराव पवार, जानकोजी शिंदे, तुकोजी शिंदे, बळवंतराव मेहेंदळे, संताजी वाघ इत्यादी बलाढ्य सरदार मृत्युमुखी पडले. समशेरबहादूर व अंताजी माणकेश्वर युद्धात जखमी होऊन पळत असता वाटेतच मृत्युमुखी पडले. मराठ्यांची एवढी प्रचंड हानी बापूर्वी कधीही झाली नव्हती.

**३. नानासाहेबांचा मृत्यू:** पानिपतावर मराठ्यांची कर्ती पिढी कामी आली. बुद्धानंतर अब्दाली मायदेशी निघून गेला असला तरी उत्तरेतील राज्यकारभाराची विस्कटलेली घडी मराठ्यांना नीट बसविता आली नाही. यामुळे दिल्लीतील राज्यकारभारात नजीबची लुडबुड वाढली. अब्दालीला पिटाळून लावल्यानंतर उत्तरेतील राज्यकारभाराची व्यवस्था लावण्यासाठी नानासाहेब पेशवे स्वतः झांशीच्या जवळ पछोरपर्यंत पोहोचले होते. तेथे पानिपतच्या प्रचंड संहाराची वार्ता समजताच नानासाहेबांना धक्का बसला. भाऊसाहेब, विश्वास मारले गेल्याने नानासाहेबांच्या मनावर आघात होऊन त्यातच ते खंगत गेले व २३ जून, १७६१ रोजी पुण्यातील पर्वतीवर त्यांचा अंत झाला. पेशवे घराण्यातील कर्तबगार माणसांचा अंत झाल्याने सत्तालोलुप राघोबाचा उदय झाला.

**४. मराठ्यांच्या अजिंक्यपणास तडा:** उत्तर भारतात मराठ्यांनी आपला दबदबा निर्माण केला होता. अटकेपर्यंत विजयी पताका फडकावून आपल्या तलवारीचा धाक निर्माण केला होता. मुगल सत्तेने अंतर्गत व बाह्य शत्रूपासून आपल्या संरक्षणासाठी मराठ्यांची मदत घेतली होती. पानिपत युद्धापर्यंत मराठा सत्तेची चढती कमान होती. 'मराठे म्हणजे यश' असा सिद्धांत रूढ झाला होता. पानिपतमुळे मराठ्यांच्या अजिंक्यपणास तडा गेला.

**५. मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाला धक्का:** पानिपतापूर्वी चाळीस वर्षांच्या वाटचालीत उत्तर भारतात मराठ्यांनी आपल्या सत्तेचा प्रचंड विस्तार केला. अटकपासून कटकपर्यंत मराठ्यांची घोडी दौड करू लागली. भारतातील सर्वांत बलाढ्य सत्ता म्हणून मराठ्यांनी स्थान मिळविले. मातब्बर मराठा सरदारांनी आपल्या सत्तेचा दबदबा कायम राखला. पानिपतच्या पराभवाने मराठ्यांच्या राजकीय वर्चस्वाला प्रचंड धक्का बसला. डॉ. ए. एल. श्रीवास्तव म्हणतात, ''पानिपतच्या पराभवाने संपूर्ण देशावर प्रभुत्व स्थापन करण्याचे मराठ्यांचे स्वप्न नष्ट झाले.''

**६. मराठ्यांचे प्रचंड नुकसान:** पानिपतच्या संहाराबाबत असे म्हटले जाते की, 'लाख बांगडी पानिपतावर फुटली.' महाराष्ट्राच्या घराघरातील कर्ता पुरुष पानिपतावर कामी आला. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या युद्धात महाराष्ट्रातील लाख स्त्रिया विधवा झाल्या. लढाईच्या रात्री (१४ जानेवारी) मध्यरात्रीपर्यंत चांदणे असल्याने पळून जाणाऱ्या हजारो लोकांना ठार मारण्यात आले. २० हजार स्त्री-पुरुषांना अब्दालीने गुलाम केले. मराठ्यांच्या पराभवामुळे त्यांचा अवजड तोफखाना, उरली सुरली घोडी, इतर सामान-सुमान अब्दालीच्या हाती लागले. सुमारे पाच कोटींची मालमत्ता अब्दालीने हस्तगत केली. थोडक्यात, पानिपतावर मराठा सत्तेची प्रचंड जीवित व वित्त हानी झाली.

**७. मोगल सत्ता दुर्बल बनली:** पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांबरोबर मुगल सत्तेचेही प्रचंड नुकसान झाले. मुगल बादशहाने दिल्लीहून पळ काढला. इ. स. १७६१ ते १७७२ या काळात बादशहाने दिल्लीमध्ये प्रवेश केला नाही. या कालखंडात कारस्थानी नजीबखान रोहिल्याच्या हाती दिल्लीची सत्ता होती. पानिपतानंतर मोगल सत्तेची इभ्रत नाहीशी होऊन बादशहा दुसऱ्याच्या हातचे बाहुले बनला.

**८. ब्रिटिश सत्तेचा मार्ग मोकळा झाला:** पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला. मुगल सत्ताही दुर्बल झाली. यामुळे भारताच्या इतिहासात राजकीय पोकळी निर्माण झाली. पानिपतावर हार-जीत झालेल्या मराठे व अब्दालीला या युद्धाचा फायदा झाला नाही. दोन्ही सत्तांचे प्रचंड नुकसान झाले आणि ही बाब इंग्रजांच्या पथ्यावर पडली. उत्तर भारतात निर्माण झालेली राजकीय पोकळी इंग्रजांनी भरून काढली. इंग्रजांचा आत्मविश्वास वाढीस लागला. १७५७ च्या सुमारास बंगालमध्ये ब्रिटिश आपल्या सत्तेचा पाया घालत होते. अशा कालखंडात मराठे पानिपतात गुंतले होते. पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाल्याने ब्रिटिशांना प्रबळ स्पर्धक उरला नाही. त्यांचा सत्ताविस्ताराचा मार्ग मोकळा झाला.

**९. शीख सत्तेचा उदय:** पानिपतपूर्वी अत्यंत सधन असणाऱ्या पंजाब प्रांतासाठी अब्दाली, मराठे, आदिनाबेग व शीख यांच्यात सत्तास्पर्धा होती. पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाल्याने त्यांनी पुन्हा पंजाबकडे लक्ष दिले नाही. अब्दाली युद्धात विजयी झाला असला तरी त्यालाही युद्धाची जबर किंमत मोजावी लागली होती. पानिपतानंतर तो मायदेशी गेला पुन्हा भारतीय राजकारणात सक्रिय झाला नाही. यामुळे पंजाबमध्ये शीख सत्तेचा उदय घडून आला.

**१०. दक्षिणेत हैदरअलीचा उदय:** पानिपतच्या युद्धापूर्वी उत्तरेप्रमाणेच दक्षिणेकडेही मराठ्यांनी सत्ताविस्तार केला होता. कर्नाटकचा बराच प्रदेश मराठ्यांकडे होता. पानिपतावर मराठ्यांचा पराभव होताच

त्यांच्या शत्रूनी उचल खाल्ली. पश्चिम किनारपट्टीवर जंजिऱ्याच्या सिद्दींच्या कारवाया सुरू झाल्या. हैद्राबादच्या निजामाने उदगिरीच्या युद्धात मराठ्यांना दिलेले प्रदेश पुन्हा मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. पानिपतानंतर जवळजवळ चार वर्षेमराठे दक्षिणेकडे लक्ष देऊ शकले नाहीत याचा फायदा घेऊन हैदरने म्हैसूरचे राज्य आपल्या हाती घेतले.

**११. रघुनाथरावाचा उदय:** पानिपतावर सदाशिवराव, विश्वासराव मारले गेले तर पानिपतच्या धक्क्याने नानासाहेबांचा अंत झाला. यामुळे नानासाहेबांचा पुत्र माधवराव वयाच्या अवध्या सोळाव्या वर्षी पेशवेपदावर आला. तो अत्यंत कुशाग्र बुद्धीचा, मुत्सद्दी व कर्तबगार होता. याच कालखंडात रघुनाथरावाची सत्तालोलुपता वाढीस लागली. रघुनाथरावाला (काकांना) आवर घालण्यात माधवराव पेशव्यांची बरीच शक्ती बाया गेली. पानिपतामुळे पेशवे घराण्यातील कर्तबगार पुरुष मृत्यू पावल्याने रघुनाथरावाचा उदय झाला व त्याच्या उदयाने मराठा सत्तेचे प्रचंड नुकसान झाले.

**१२. पानिपतचा रणसंग्राम मराठ्यांना अभिमानास्पद व कीर्तिस्पद :** परकीय आक्रमकाविरुद्ध व देशरक्षणासाठी मराठ्यांनी दिलेल्या लढ्यात ते जरी अपयशी झाले असले तरी त्यामुळे मराठ्यांची शान वाढली आहे. सरदेसाई म्हणतात, ''पानिपतचा रणसंग्राम मराठ्यांची कीर्ती यावच्चंद्र दिवाकरौ उज्ज्वल राखणारा आहे.'' तर मेजर इव्हॅन्स बेल म्हणतात, ''पानिपतची लढाईसुद्धा मराठ्यांना अभिमानास्पद व कीर्तिस्पद अशीच घटना समजली पाहिजे. मराठे सर्व हिंदी लोकांसाठी व हिंदुस्थान या ध्येयासाठी लढले. परंतु दिल्ली, अयोध्या व दक्षिणेतील प्रबळ मुसलमान सत्ताधीश मात्र या वेळी कारस्थाने करीत आपल्या चैनीत दंग होऊन एका बाजूस बसले आणि मराठ्यांचा युद्धात पराभव झाला, तरी विजयी अफगाण जे यानंतर एकदा परत गेले ते हिंदी राजकारणात ढवळाढवळ करण्यासाठी पुन्हा कधीही आले नाहीत.''

मराठ्यांच्या अतुलनीय पराक्रमाने खुद्द अब्दालीही प्रभावित झाला होता. तो जयपूरच्या राजाला लिहितो, ''आमच्या शत्रूनेसुद्धा त्या दिवशी स्वतःला नामांकित करून सोडले, इतक्या उत्कटतेने ते लढले की, तसे लढणे कोणाच्याही शक्तीबाहेरचे होते. आमच्या त्या निधड्या छातीच्या रक्त वाहणाऱ्या शत्रूनीही आपल्या कामात कसूर केली नाही. हेच काय, पण अत्यंत महनीय व कीर्तिस्पद अशी कृत्ये रणांगणात करून दाखविली.''

**१३. उत्तरेतील राजकारणात पोकळी निर्माण झाली:** पानिपतावरील पराभवामुळे मराठ्यांचे पाऊल आत आले. मराठ्यांच्या सामर्थ्यावर अवलंबून असणारी मुगल सत्ता पंगू झाली. नजीबखानाने दिल्लीचे राजकारण आपल्या हाती घेतले पण ते पेलण्याची कुवत त्याच्या अंगी नव्हती. शुजाउद्दौलाकडेही ती कुवत नव्हती. तसेच जाट व रजपूत यांची मर्यादित शक्ती लक्षात घेता उत्तरेतील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली. धूर्त ब्रिटिशांनी याचा फायदा घेऊन आपल्या सत्तेचा विस्तार केला.

**१४. अब्दाली पुन्हा भारतावर चाल करून आला नाही:** प्रचंड आर्थिक प्राप्तीच्या उद्देशाने अब्दाली भारतावर पाचव्यांदा चाल करून आला होता. या वेळी त्याचा अपेक्षाभंग झाला. पानिपतावर त्यास विजय मिळाला असला तरी त्याचे सैनिक मोठ्या प्रमाणावर मारले गेले होते. मराठ्यांबरोबरच्या संघर्षात त्यास

जबर किंमत मोजावी लागली. मार्च, १७६१ मध्ये अब्दाली दिल्ली सोडून अफगाणला निघून गेला. तो पुन्हा भारतीय राजकारणात पडला नाही. एवढेच नव्हे तर १७६७ मध्ये शिखांनी पंजाब प्रांतही त्याच्याकडून हिरावून घेतला.

**१५. पानिपतावर मराठे संपले नाहीत :** पानिपत युद्धामुळे मराठ्यांच्या सत्तेला प्रचंड धक्का बसला. उत्तरेतील त्यांचे वर्चस्व काही काळ संपुष्टात आले. हे वर्चस्व पुन्हा निर्माण करण्यात माधवराव पेशवे, नाना-महादजींना यश मिळाले. मराठे पानिपतावर संपले नाहीत हे या कर्तबगार सेनानींनी दाखवून दिले. याबाबत गो. स. सरदेसाई म्हणतात, ''पानितपच्या पराभवामुळे उत्तर हिंदुस्थानातील मराठ्यांची सत्ता पार धुळीस मिळाली किंवा भारतातील मराठा सत्तेचा पायाच उखडला गेला ही समजूत चुकीची आहे. पानितपच्या युद्धात मनुष्यहानी मोठ्या प्रमाणावर घडून आली असली तरी पानिपतानंतर मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्षच होत गेला. तो दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धापर्यंत टिकून होता.''

पानिपत युद्धासंबंधी इतिहासकारांच्या प्रतिक्रिया

१. "Rise and Fall of the Maratha Empire" या ग्रंथामध्ये श्री. नाडकर्णी म्हणतात, "It was a triumph of the principle, India For the Indians." (पानिपतचा पराभव हा मराठ्यांचा नैतिक विजय होता.)

२. रॉलिन्सन पानिपतबद्दल म्हणतात, ''विशिष्ट परिस्थितीचा विचार करता इतिहासातील एखादा पराजय विजयाइतकाच समाधानकारक म्हणावा लागेल. मराठ्यांच्या सर्व इतिहासात त्यांच्या फौजेने राष्ट्रातील सर्वोत्तम शिलेदारासह पानिपतच्या घनघोर रणक्षेत्रात आपल्या देशाच्या व धर्माच्या वैऱ्यांशी जे मरण पत्करले त्याहून जास्त गौरवास्पद मरण इतिहासात क्वचितच नोंदले गेले असेल.''

३. रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''भारतातील तिसऱ्या शक्तीला इंग्रजांना ह्यामुळे मार्ग मोकळा झाला. प्लासीच्या युद्धाने इंग्रजी सत्तेचे भारतात बीजारोपण केले असेल तर पानिपतच्या युद्धाने, ह्या बीजातून महावृक्षाची निर्मिती झाली.''

४. डॉ. श्रीवास्तव म्हणतात, ''पानिपतचे युद्ध निर्णायक झाले. मराठी सेना आणि तिचे पुढारी ह्याचां सर्वनाश झाला होता. शिवाय पानिपतानंतर अब्दाली भारतात राहिला नाही. उत्तर भारतातील पंजाब, सिंघ, दिल्ली प्रांतावर मुगलांचे प्रभुत्व पुन्हा प्रस्थापित झाले होते. त्यानंतर मराठ्यांनी तो प्रदेश घेण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. सारांश, पानिपतच्या पराभवाने संपूर्ण देशावर प्रभुत्व स्थापन करण्याचे मराठ्यांचे मधुर स्वप्न नष्ट झाले.''

५. प्रा. टी. एस. शेजवलकर पानिपतबाबत म्हणतात, ''मराठ्यांनी पाचशे वर्षेइस्लामी वरवंट्याखाली पिसल्या जाणाऱ्या हिंदू प्रजेत अस्मिता जागृत करून तिला ताठ मानेने जगण्यास शिकविले. भारतातील इतर प्रांतांत हे लोण पोहोचू शकले नाही. हीच मराठ्यांच्या इतिहासाची खरीखुरी शोकांतिका होय, पानिपतचा पराभव नव्हे.''

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा

१. .... साली पानिपतचे तिसरे युद्ध झाले.

अ) १७६० ब) १७६१ क) १७६२ ड) १७६३

२. ..... हे पानिपतवर मराठ्यांचे सेनापती होते.

अ) रघुनाथराव ब) रघुजी भोसले क) नानासाहेब ड) सदाशिवराव

३. अहमदशहा अब्दालीने हिंदुस्तानवर .... वेळा स्वाऱ्या केल्या.

अ) पाच ब) सहा क) सात ड) आठ

४. १७६१ रोजी पुण्यातील .... येथे नानासाहेबांचा अंत झाला.

अ) शनिवारवाडा ब) पर्वती क) कात्रज ड) लाल महाल

५. ... यांच्या मते पानिपतच्या पराभवाने संपूर्ण देशावर प्रभुत्व स्थापन करण्याचे मराठ्यांचे स्वप्न नष्ट झाले.

अ) सरदेसाई ब) शेजवलकर क) श्रीवास्तव ड) ग्रँट डफ

## ३.३ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. पेशवा –मुख्य प्रधान

२. बाळाजी बाजीराव –नानासाहेब

३. दुआब – गंगा यमुना नद्यांमधील प्रदेश

४. सलोखा – दिलजमाई /समिट

५. सुपिक – उत्तम/उत्कृष्ट

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न क्र.१ ची उत्तरे

१. अ. १७४० २. ड. बंगाल ३. क. १७४२ ४. अ. नागपूर ५. क. चार

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१. ब. १७६१ २. ड. सदाशिवराव ३. अ. पाच ४. ब. पर्वती ५. क. श्रीवास्तव

## ३.५ सारांश

पेशवे पहिले बाजीराव यांच्या नंतर मराठी सत्तेच्या पेशवे पदावरती आलेल्या बाळाजी बाजीराव उर्फ आनासाहेबांनी मराठी सत्तेला महत्त्वपूर्ण योगदान दिले. छत्रपती शाहू महाराजांचा प्रारंभी विश्वास संपादन करून मराठी सत्तेचा नवलौकिक वाढविला. निजामाचा बंदोबस्त करून उत्तरेत रघुनाथ राव, शिंदे, होळकर यांच्या मदतीने मराठ्यांचे वर्चस्व निर्माण केले. पण १७४९ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या मृत्यूनंतर नानासाहेबांच्या कारकीर्दीचा दुसरा टप्पा सुरू होतो. याच काळात राजधानी साताऱ्याचे महत्त्व कमी होऊन पुणे हीच पेशव्यांची तथा मराठी सत्तेची राजधानी बनली. शिवाय पेशवे नानासाहेब हेच मराठी सत्तेचे सर्वेसर्वा बनले. तर सातारचे छत्रपती हे नामधारीच राहिले. नानासाहेब पेशव्यांची कारकीर्द उत्तरेच्या राजकारणामुळे गाजली. त्यातूनच त्यांनी प्रारंभी उत्तरेच्या राजकारणाची जबाबदारी आपले बंधू रघुनाथराव दादा यांच्याकडे देऊन त्यांच्या मदतीस शिंदे होळकर यांच्यासारखे मातब्बर सरदार दिले. परिणामी मराठी हे किंगमेकर बनले होते परंतु नानासाहेबांच्या कारकीर्दीतील दुसरी बाजू म्हणजे त्यांनी केलेला साम्राज्य विस्तार व त्यासाठीच काढलेल्या उत्तरेतील विविध मोहिमां यामुळे उत्तरेतील बिघडलेले राजकारण होय. त्यांच्या काही अविवेकी निर्णयामुळे उत्तर भारतातील परिस्थिती बिघडून मराठ्यांच्या विरोधात गेली. एकेकाळी उत्तर भारतातील अनेक मराठी सत्तेचे मित्र घटक आता मराठ्यांचे वैरी झाले. त्यातूनच अहमदशहा अबदालीस हिंदुस्तानवर स्वारी करण्याची संधी मिळाली. आणि मराठी सत्तेला जबरदस्त हादरा देणाऱ्या पानिपतच्या तिसऱ्या लढाईची पार्श्वभूमी तयार झाली. या लढाईत मराठी सत्तेचे फार मोठे नुकसान झाले. परिणामी पुढील काळातील काही पेशव्यांनी मराठी सत्ता सावरण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी पानिपत वरील पराभव एवढा मोठा होता की, मराठी सत्तेला पूर्वीसारखे वैभवशाली दिवस घेणे शक्य झाले नाही. एवढेच नव्हे तर याच पराभवाच्या धक्क्यातून पेशवे नानासाहेबांचे पर्वती येथे दुःखद निधन ही झाले. त्यामुळेच पानिपतच्या तिसऱ्या युद्धाला मराठी सत्तेच्या इतिहासात महत्त्वपूर्ण स्थान असून पानिपतच्या युद्धातील पराभवाने मराठी सत्तेच्या अस्ताचा जणू पायाच घातला गेला. एकूणच पेशवे नानासाहेबांच्या कारकीर्दीत एका बाजूला मराठी सत्ता अटकेपार गेली होती तर दुसऱ्या बाजूला पाणीपतवर मोठी हार सुद्धा झाली होती हे विसरता येणार नाही. अशा संमिश्र पार्श्वभूमीवर नानासाहेब पेशवे उर्फ बाळाजी बाजीराव यांच्या कारकीर्दीचा आढावा घेता येतो.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१. रघुजी भोसले

२. अहमदशाह अब्दाली

३. नानासाहेबांची चौथी उत्तर मोहीम

४. पानिपतचे तिसरे युद्ध

५. नानासाहेब व रघुजी भोसले संबंध

ब) दीर्घोत्तरी प्रश्न

१. नानासाहेब पेशव्यांच्या उत्तरेकडील मोहिमांची माहिती द्या

२. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाची कारणे सांगा

३. पानिपतच्या तिसऱ्या लढाईचे परिणाम विशद करा

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. वि.का. राजवाडे, (संपा) मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १ ते २२, चितळे प्रेस, पुणे, १९२३.

२. प्र. न. देशपांडे, मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लीकेशन हाऊस, पुणे, २००१.

३. गो. स सरदेसाई, मराठी रियासत, खंड १ ते ८, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, २०१७.

४. M. G. Ranade, Rise of the Maratha power, Kessinger Publication, 2010.

५. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे, मराठ्यांचा इतिहास भाग १ ते ३, कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे, २०१४.

६. त्र्यं. श शेजवलकर, पानिपत १७६१, राजहंस प्रकाशन, २०२४.

७. त्र्यं. श. शेजवलकर, निजाम पेशवे संबंध, डायमंड प्रकाशन.

८. आठवले सासवडकर, मराठी सत्तेचा विकास आणि र्हास, साधना प्रकाशन, पुणे, १९७४.

❑❑❑

# घटक ४
# पानिपतनंतरचे पुनरुज्जीवन
(Post-Panipat Revival)

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ पेशवे माधवराव पहिले

  ४.२.२ बारभाई मंडळ/कारस्थान

४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- पेशवा माधवराव पहिले यांनी मराठा साम्राज्य वाढीसाठी व संवर्धनासाठी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- पेशवा माधवराव पहिले व राघोबादादा यांच्यामधील सत्तासंघर्ष याची माहिती मिळेल.
- मराठा साम्राज्यातील बारभाई कारस्थान याविषयी सविस्तर माहिती मिळेल.
- बारभाई मंडळाची उत्पत्ती व स्थापनेची माहिती मिळेल.
- बारभाई मंडळ व राघोबादादा यांच्यामधील संघर्षाची माहिती मिळेल.
- बारभाई मंडळातील सरदारांनी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.

## ४.१ प्रास्ताविक :

मराठे व अहमदशहा अब्दाली यांच्यामध्ये १४ जानेवारी १७६१ रोजी पानिपतचे तिसरे युद्ध झाले. उत्तरेत झालेल्या या पानिपतच्या युद्धात मराठा सत्तेचा पराभव झाला. या पराभवामुळे मराठा सत्तेची मोठी हानी झाली. मराठ्यांची एक संपूर्ण पिढी युद्धात कामी आली. अनेक कर्तबगार सरदार व मोठ्या प्रमाणात सैन्य रणांगणावर मृत्युमुखी पडल्यामुळे लष्करी सामर्थ्य कमी झाले. परिणामी  मराठा स्वराज्यात एक मोठी

पोकळी निर्माण झाली. पानिपत युद्धातील पराभवाच्या धक्क्याने पेशवे नानासाहेब यांचे २३ जून १७६१ रोजी निधन झाले. नानासाहेबांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र माधवराव हे पेशवा बनले. त्यांच्यावर मराठा साम्राज्याचे पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी होती ती त्यांनी योग्यरित्या सांभाळली.

पेशवा माधवराव यांच्या अकाली मृत्युनंतर महत्वाकांक्षी राघोबादादा यांनी मराठा साम्राज्याचे पेशवापद स्वत:कडे घेतले व ते पेशवा बनले. राघोबादादाची ही कृती मराठा मंडळातील सरदारांना पसंत पडली नाही. परिणामी राघोबादादा यांच्या विरोधात दरबारातील मंडळी एकत्र आले व बारभाई कारस्थान अथवा मंडळ आकारास आले. या बारभाई करस्थानाचे नेतृत्व सखारामबापू बोकील यांच्याकडे होते. पेशवा राघोबादादा व बारभाई मंडळ यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात संघर्ष झाला.

सदर प्रकरणामध्ये पेशवा माधवराव यांचे कार्य, राघोबादादा यांची विविध कारस्थाने व बारभाई मंडळाची भूमिका याचा आढावा घेण्यात आला आहे.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ पेशवे माधवराव पहिले

मराठेशाहीतील चौथे पेशवे माधवराव यांचा जन्म १६ फेब्रुवारी १७४५ रोजी सावनूर (धारवाड जिल्हा) येथे झाला. कर्तबगार पेशवा म्हणून माधवराव पेशवे यांना ओळखले जाते. बाळाजी बाजीराव उर्फ नानासाहेब व गोपिकाबाई यांचे ते द्वितीय पुत्र होते. माधवराव यांचे थोरले बंधु विश्वासराव यांचा पानिपतच्या युद्धात मृत्यु झाला. काही दिवसातच पेशवे नानासाहेब यांचे निधन झाले. नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युनंतर २० जुलै १७६१ रोजी सातारच्या छत्रपतींकडून माधवराव यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली. माधवराव पेशवे यांचे वय लहान असल्यामुळे त्यांचे चुलते राघोबादादा ऊर्फ रघुनाथराव हे प्रथम काही कालखंड राज्यकारभार पहात होते.

पानिपत युद्धातील पराभव व नानाशाहेब पेशवे यांच्या मृत्युमुळे मराठा साम्राज्यामध्ये राजकीय अनागोंदी आणि अराजकाता मोठ्या प्रमाणात होती. उत्तर भारतातील मराठ्यांचा प्रभाव कमी झाला होता आणि सत्तेची पोकळी निर्माण झाली होती. मराठ्यांना आपला उत्तरेकडील प्रदेश सोडून दक्षिण भारतात येणे भाग पडले होते. अहमदशाह अब्दालीचे पानिपत युद्धात जिंकूनही मोठे नुकसान झाले होते. परिणामी आपल्या सैन्यासह तो अफगाणिस्तानात परतला. याचा फायदा परकीय सत्ता घेऊ इच्छित होत्या. आशा परिस्थितीत मराठा साम्राज्याचे झालेले नुकसान भरून काढण्याची व मराठा साम्राज्यास पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्याची जबाबदारी  माधवराव पेशवे यांच्यावर होती.

**१. पेशवे माधवराव–राघोबा संघर्ष : पेशवा माधवराव आणि मराठा राजवटीचे पुनरुज्जीवन**

रघुनाथराव, यांना अनेकदा इतिहासात राघोबा म्हणून संबोधले जाते. रघुनाथराव यांच्यामुळे मराठा साम्राज्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. वैयक्तिक महत्त्वाकांक्षा आणि दूरदृष्टीचा अभाव अशा रघुनाथरावांच्या कृतीमुळे मराठा हिताला मोठा धक्का बसला. निजामाबरोबरच्या युद्धाप्रसंगी निजामाचा

निर्णायक पराभव करण्याची सुवर्णसंधी मारठ्यांना आली होती. या युद्धाचे नेतृत्व राघोबादादा यांच्याकडे होते. त्यांनी स्व:ताच्या स्वार्थासाठी निजामाबरोबर तह केला व युद्ध थांबवले. राघोबादादाच्या या निर्णयामुळे पेशवे माधवरावांशी दुरावा निर्माण झाला. मराठा साम्राज्याच्या व्यापक हिताच्या विरोधात घेतलेल्या या निर्णयामुळे माधवराव, जानोजी भोसले आणि गोपाळराव पटवर्धन यांसारख्या महत्त्वाच्या व्यक्ती दुरावल्या आणि नेतृत्वातील तणाव आणखी वाढला.

निजामाविरुद्धच्या अयशस्वी मोहिमेनंतर माधवराव आणि रघुनाथराव यांनी हैदरअलीच्या वाढत्या धोक्याचा सामना करण्याच्या उद्देशाने कर्नाटकात लष्करी मोहीम सुरू केली. निजामाप्रमाणेच हैदरअलीनेही पानिपतयेथील पराभवानंतर मराठ्यांच्या कमकुवत अवस्थेचा फायदा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र या मोहिमेदरम्यान माधवराव आणि रघुनाथराव यांच्यातील मतभेद समोर आल्याने रघुनाथराव हे मोहीम अर्धवट सोडून पुण्याला परतले. माधवरावांनी काकांच्या रागाला न जुमानता ही मोहीम सुरूच ठेवली. जून १७६२ पर्यंत तुंगभद्रा नदीच्या परिसरातील प्रदेशावर मराठ्यांचे नियंत्रण प्रस्थापित केले.

पुण्याला परतल्यावर रघुनाथरावांनी समर्थकांना एकत्र करून आपली सत्ता बळकट करण्यास सुरुवात केली. विशेष म्हणजे बलाढ्य मराठा सरदार मल्हारराव होळकर यांनी उघडपणे रघुनाथरावांची बाजू घेतली. त्याला प्रत्युत्तर म्हणून माधवरावांनी मिरजेतील पटवर्धन व इतर प्रभावशाली सरदारांची निष्ठा संपादन करून पेशवे घराण्यातील तीव्र संघर्षाची मुहूर्तमेढ रोवली. ऐक्य महत्त्वाचे असताना या अंतर्गत कलहामुळे मराठा राज्य अस्थिर होण्याचा धोका निर्माण झाला होता.

विभाजित मराठा नेतृत्वाच्या संभाव्य परिणामांची जाणीव असलेल्या माधवरावांनी रघुनाथरावांशी सामंजस्य साधण्याचे अनेक प्रयत्न केले. मात्र, रघुनाथरावांनी १० लाख रुपयांच्या महसुली वाट्याची मागणी केली. माधवरावांनी सदरची मागणी फेटाळून लावली. अशी मागणी मान्य केल्यास राज्य कमकुवत होऊन आपले भवितव्य धोक्यात येईल, अशी भीती त्यांना होती. यावेळी धोका वाटून रघुनाथरावांनी पुण्यातून पळ काढला आणि नाशिकजवळील विंचूर येथे आश्रय घेतला, तेथे त्यांनी विठ्ठल शिवदेव, आबा पुरंदरे आणि नारोशंकर यांचा पाठींबा मिळवला. शिवाय जानोजी भोसले व निजामाने रघुनाथरावांना पाठिंबा दिल्याने संघर्ष अधिक तीव्र झाला.

नोव्हेंबर १७६२ मध्ये रघुनाथरावांनी पन्नास हजारांच्या सैन्यासह पुण्याच्या दिशेने कूच केली. माधवरावांचे सैन्य आणि रघुनाथरावांचे सैन्य यांच्यातील लढाई घोड नदीच्या तीरावर झाली पण ती निष्फळ ठरली. या लढाईनंतरही रघुनाथरावांनी पूर्वीच्या उदगीरच्या लढाईत सदाशिवरावसाहेब यांनी मिळवलेले यश मागे टाकत भरीव संपत्ती आणि सामरिक दृष्ट्या महत्त्वाचा दौलताबाद किल्ला मिळवण्यात यश मिळवले.

रघुनाथरावांनी आपले स्थान भक्कम करण्याचा निर्धार करून अनेक धोरणात्मक पावले उचलत चिंतो विठ्ठल रायरीकर यांची फडणीस आणि सखारामबापूंची कारभारी म्हणून नेमणूक करून सिंहगड किल्ल्यावर बालेकिल्ला प्रस्थापित केला. पुरंदरवर ताबा देऊन त्यांनी बाबा पुरंदरे यांची निष्ठाही मिळवली. त्यानंतर

रघुनाथरावांनी साताऱ्यात छत्रपती रामराजांचा पाठिंबा मागितला, ज्यामुळे त्यांना मिरजेतील पटवर्धनांवर हल्ला चढविणे शक्य झाले आणि त्यांना शरण जाण्यास भाग पाडले.

रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षेमुळे ते कर्नाटक प्रदेशात गेले, तिथे त्यांनी हैदर अलीशी युती करण्याचा प्रयत्न केला. मात्र निजाम आणि नागपूरचे रघुजी भोसले यांच्यातील संभाव्य युतीच्या बातमीमुळे रघुनाथरावांना पुण्याला परतावे लागले. दरम्यान, भीमा नदीच्या पूर्वेकडील मराठा प्रदेश परत मिळावा आणि इतर सवलती मिळाव्यात, या निजामाच्या मागण्यांमुळे मराठा राज्यासमोर नवे संकट उभे राहिले.

रघुनाथरावांचा सत्तेचा अविरत पाठपुरावा आणि राज्याची एकता व ताकद जपण्यासाठी माधवरावांनी केलेले प्रयत्न यामुळे मराठा नेतृत्वातील तीव्र अंतर्गत कलहाचा हा काळ मराठा साम्राज्याचे भवितव्य घडवणार होता. माधवराव आणि रघुनाथराव यांच्यातील संघर्षाने अंतर्गत विभाजन आणि बाह्य धोके या दोन्ही समोर मराठा महासंघाची नाजूकता अधोरेखित केली आणि माधवरावांच्या दृढ निश्चयी नेतृत्वात मराठा सत्तेच्या पुनरुत्थानाचा मार्ग मोकळा केला.

## २. राक्षसभुवनाची लढाई : मराठा इतिहासातील निर्णायक घटना

राक्षसभुवनची लढाई १० ऑगस्ट १७६३ रोजी मराठे व निजाम यांच्यामध्ये झाली. या लढाईत थोरल्या माधवराव पेशव्यांनी निजामाचा दारुण पराभव केला. लाढाईमधे निजामाचे २२ सरदार कैद करण्यात आले होते. साडेतीन शहाण्यांपैकी एक शहाणा विठ्ठल सुंदर यांचा मृत्यु याच लढाई मधे झाला. दिवाण विठ्ठल सुंदर मरण पावल्याने निजाम हताश झाला. पुढे १७६३ च्या सप्टेंबरमध्ये तह होऊन पेशव्यास गेलेला सर्व प्रदेश मिळाला. या युद्धाच्या वेळी रघुनाथारावाने गृहकलह विसरून सहकार्य दिले परंतु पुढे पुनःच दोघामध्ये वितुष्ट निर्माण झाले व माधवरावाने राज्याची सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली.

पानिपतच्या तिसऱ्या लढाईतील विनाशकारी पराभवानंतर मराठा सत्तेच्या पुनरुज्जीवनातील निर्णायक क्षण म्हणून राक्षस भुवनच्या लढाईला मराठा इतिहासात महत्त्वाचे स्थान आहे. पानिपतमधील पराभवानंतर मराठे आपली पूर्वीची ताकद किंवा प्रभाव कधीच परत मिळवू शकणार नाहीत, असा अनेकांचा विश्वास होता. मात्र, राक्षस भुवनातील विजयाने हा समज मोडीत काढला. मराठा संपलेले  नाहीत हे दाखवून दिले. या विजयाने मराठ्यांमध्ये आत्मविश्वास तर निर्माण झालाच, पण गमावलेले वैभव परत मिळवता येईल, अशी नवी उमेदही निर्माण झाली. या पुनरुत्थानाच्या केंद्रस्थानी तरुण पेशवे माधवराव होते, ज्यांचे नेतृत्व आणि सामरिक कौशल्य मराठ्यांच्या यशात महत्त्वाचे होते. या क्षणापर्यंत माधवराव हे त्यांचे काका रघुनाथराव यांच्या पालकत्वाखाली होते. मात्र, राक्षस भुवन येथील विजयामुळे या कालखंडाचा अंत झाला, कारण माधवराव स्वत:च एक सक्षम आणि स्वतंत्र नेते म्हणून उदयास आले.

युद्धाची रणनीती स्वायत्तपणे आखण्याची व अंमलात आणण्याची माधवरावांची क्षमता या लढाईने दाखवून दिली, त्यांचे शौर्य व सामरिक कौशल्य दिसून आले. तरुण व गतिमान पेशव्यांच्या नेतृत्वाखाली मराठे प्रबळ पुनरुत्थानासाठी सज्ज झाले होते. या मोहिमेत माधवरावांनी पक्षांतर केलेल्या मराठा सरदारांनी बळ दिलेल्या निजामाच्या सैन्याला केवळ सामोरा जाऊन त्यावर मात केली नाही, तर मराठे आपल्या

भूतकाळातील चुकांपासून शिकले आहेत, हेही दाखवून दिले. राक्षस भुवन येथील विजय हा केवळ लष्करी विजय नव्हता, तर प्रतीकात्मक विजय होता, ज्यामुळे मराठा इतिहासातील एका नव्या टप्प्याची सुरुवात झाली. जिथे ते पुन्हा एकदा भारतीय उपखंडात आपले वर्चस्व प्रस्थापित करतील.

माधवरावांच्या नेतृत्वाखाली मराठा साम्राज्य पानिपतच्या धक्क्यातून सावरत नव्या जोमाने आणि विस्ताराच्या कालखंडाकडे वाटचाल करू लागले. या लढाईमुळे माधवरावांच्या स्वतंत्र कर्तृत्वाच्या मालिकेची सुरुवात झाली आणि संपूर्ण भारतात मराठा सत्ता आणि प्रभाव पुन्हा प्रस्थापित होण्याचा पाया रचला गेला. राक्षस भुवन येथील विजय हा मराठ्यांच्या शाश्वत सामर्थ्याचा आणि चिकाटीचा पुरावा होता, ज्यामुळे त्यांच्या सततच्या संघर्षाचा आणि प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्याचा मार्ग मोकळा झाला.

**३. माधवरावांची कर्नाटकातील मोहीम : दक्षिणेतील धोरणात्मक डावपेच**

पानिपत येथील मराठ्यांच्या पराभवानंतर म्हैसूरच्या हैदरअलीने दक्षिण भारतातील मराठा सत्तेला आव्हान देण्याची संधी साधली. हा धोका ओळखून पेशवे माधवरावांनी हैदरअलीच्या महत्त्वाकांक्षेचा प्रतिकार करण्यासाठी आणि या प्रदेशात मराठा वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी अनेक मोहिमा सुरू केल्या. मराठा इतिहासातील हा अध्याय माधवरावांचे सामरिक सामर्थ्य आणि त्यांनी चालवलेल्या गुंतागुंतीच्या राजकीय घटनांवर प्रकाश टाकतो.

इ.स. १७६३ मध्ये पेशव्याचा निजामाशी संघर्ष सुरू असताना हैदरअलीने बेदनूर व सावनूर व कडप्पा या राज्यांसह परंपरेने मराठा संरक्षणाखाली असलेला प्रदेश काबीज केला. शिवाय हैदरअलीने मुरारराव घोरपडे या महत्त्वपूर्ण मराठा सहकाऱ्याची ठाणी ताब्यात घेतली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून माधवरावांनी हैदरअलीच्या वाढत्या सत्तेला आळा घालण्यासाठी कर्नाटकावर आक्रमण करण्याचे ठरविले.

फेब्रुवारी १७६४ पर्यंत मराठा सैन्य कृष्णा नदीच्या दक्षिणेला सावनूर पर्यंत पोहचले होते. मराठे आणि हैदरअलीच्या सैन्यात झालेल्या सुरुवातीच्या संघर्षाची परिणती ६ नोव्हेंबर १७६४ रोजी धारवाडचा किल्ला काबीज करून मराठ्यांना महत्त्वपूर्ण विजयात झाली. त्यानंतर सावनूरजवळील अन्वतीच्या लढाईत मराठ्यांनी हैदरअलीचा निर्णायक पराभव केला आणि त्याला जवळच्या जंगलात आश्रय घ्यावा लागला. या विजयाने मराठा सैन्याची चपळता व ताकद दाखवून त्यांना कमी लेखता कामा नये, असा स्पष्ट संदेश दिला.

हे यश मिळूनही माधवराव आणि त्यांचे काका रघुनाथराव (राघोबा) यांच्यात सुरू असलेला तणाव दूर करण्यासाठी अन्वती येथील विजयाने फारसे काही साध्य झाले नाही. रघुनाथरावांच्या पुण्यातील सततच्या राजकीय डावपेचांचे पडसाद उमटले. रघुनाथरावांच्या हेतूंनी घाबरलेल्या माधवरावांनी चालू असलेल्या युद्धात त्यांचा सल्ला घेण्याच्या बहाण्याने त्यांना कर्नाटकात बोलावून घेतले. मात्र, रघुनाथराव आल्यावर त्यांनी हैदरअलीशी वाटाघाटी पटकन हाती घेतल्या, त्यामुळे माधवरावांची निराशा स्पष्ट झाली.

३० मार्च १७६५ रोजी रघुनाथरावांच्या मार्गदर्शनाखाली हैदरअलीबरोबर तह झाला. तहाच्या अटी कडक नव्हत्या. हैदरअलीने मराठ्यांना तीस लाख रुपये देण्याचे मान्य केले आणि तुंगभद्रा नदीच्या उत्तरेकडील प्रदेश आपल्या ताब्यात दिला. तसेच सावनूरचे नवाब मुरारराव घोरपडे व इतर मराठा सरदारांना

त्रास देणार नाही, असे आश्वासन दिले. या करारामुळे पुढील तात्कालिक संघर्ष टळला असला, तरी निजामाच्या पूर्वीच्या सौम्य वागणुकीप्रमाणेच हैदर अलीला धोका म्हणून निर्णायकरित्या संपवण्याची संधी गमावली गेली.

१७६५ च्या मोहिमेनंतर माधवराव पुण्याला परतले आणि दक्षिणेकडील प्रदेश अशांततेच्या स्थितीत सोडला. मात्र मराठे, हैदरअली, निजाम आणि इंग्रज यांच्यात दक्षिण भारतावर ताबा मिळवण्यासाठी स्पर्धा सुरूच होती. १७६६ मध्ये माधवरावांनी परस्पर मैत्रीचा तह करून निजामाला निष्प्रभ करण्याचा प्रयत्न केला, जेणेकरून भविष्यात हैदरअलीशी कोणत्याही संघर्षात निजाम तटस्थ राहील.

इ.स. १७६५ च्या अखेरीस माधवरावांनी गोपाळराव पटवर्धन व इतर मराठा सरदारांच्या पाठिंब्याने नव्याने मोहीम सुरू करून कर्नाटकावर आपले लक्ष केंद्रित केले. मराठा सैन्याने सुरापूर, रायपूर आणि मुदगल हे प्रदेश वेगाने काबीज केले, त्यानंतर फेब्रुवारी १७६७ मध्ये शिरा व माडेगिरी हे किल्ले ताब्यात घेतले. मराठ्यांनी बेदनूरच्या राणीलाही मुक्त केले आणि हैदरअलीचे स्थान आणखी कमकुवत केले. केवळ श्रीरंगपट्टण आणि बेदनूर अबाधित राहिल्याने हैदरअलीला माधवरावांशी वाटाघाटी करण्यास भाग पाडले.

दुर्दैवाने रघुनाथरावांच्या राजकीय हस्तक्षेपामुळे पुन्हा एकदा माधवरावांच्या योजनांना खीळ बसली. तोपर्यंत रघुनाथराव पुण्याला परतले होते, तेथे त्यांनी माधवरावांविरुद्ध कारस्थाने सुरूच ठेवली होती. आपल्या अनुपस्थितीत हे कारस्थान वाढेल या भीतीने माधवरावांनी घाईघाईने हैदरअलीशी तह केला आणि पुण्याला परतले. त्यानंतरच्या वर्षांत मराठे आणि हैदरअली यांच्यात सतत शत्रुत्व दिसून आले. इ.स. १७७० मध्ये माधवरावांनी कर्नाटकात आणखी एक मोहीम सुरू केली आणि सावनूरच्या रक्षणासाठी गोपाळराव पटवर्धन यांची नेमणूक केली. आजारपणामुळे माधवराव अनुपस्थित असूनही त्र्यंबकराव पेठे, मुरारराव घोरपडे यांच्यासह त्यांच्या सेनापतींनी लक्षणीय विजय मिळविला. ५ मार्च १७७१ रोजी मराठ्यांनी श्रीरंगपट्टणाजवळील मोती तलावाच्या लढाईत हैदरअलीचा पराभव करून त्याला किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागला.

जून १७७२ मध्ये मराठे व हैदरअली यांच्यात तह झाला. त्याच्या अटींनुसार हैदरअलीने तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेकडील प्रदेशाचा मोठा भाग देऊन मराठ्यांना एकतीस लाख रुपये देण्याचे मान्य केले. या यशानंतरही माधवरावांची तब्येत ढासळत गेली आणि त्या वर्षाच्या अखेरीस त्यांचे निधन झाले, सर्वतोपरी प्रयत्न करूनही हैदरअलीला पूर्णपणे निष्प्रभ करू शकले नाहीत.

कर्नाटकात माधवरावांच्या मोहिमांत विजय आणि आव्हाने दोन्ही होती. त्यांचे सामरिक कौशल्य आणि निर्धार दक्षिणेत मराठा प्रभाव पुन्हा प्रस्थापित करण्यास मदत करू शकले, तरीही अंतर्गत राजकीय कलहामुळे त्यांच्या प्रयत्नांना अनेकदा अडथळे येत असत. असे असले तरी मराठा सत्तेचे पुनरुज्जीवन करणारे आणि हैदरअलीसारख्या बलाढ्य शत्रूंविरुद्ध महत्त्वाचे विजय मिळवून देणारे पेशवे म्हणून माधवरावांचा वारसा निर्विवाद आहे.

## ४. रघुनाथरावांच्या मोहिमा व संघर्ष :

पेशवे माधवरावांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपासूनच रघुनाथराव, ज्यांना राघोबा म्हणूनही ओळखले जाते, ते मराठा राज्याच्या प्रशासनात एक महत्त्वाचा अडथळा ठरले. महत्त्वाकांक्षा आणि सत्तेच्या हव्यासापोटी रघुनाथरावांनी मराठा राज्याच्या विभाजनासाठी सातत्याने आग्रह धरला, ही चाल साम्राज्य कमकुवत करेल हे माधवरावांनी ओळखले. हे चालू असलेले तणाव हाताळण्यासाठी आणि दैनंदिन संघर्ष टाळण्यासाठी माधवरावांनी रघुनाथरावांना उत्तरेकडील मोहिमेवर पाठवण्याचा निर्णय घेतला, या आशेने की अंतरामुळे त्यांचे मतभेद कमी होतील. मात्र, उत्तरेकडील मोहीम रघुनाथरावांसाठी अपयशाची मालिका ठरली. कोणतेही महत्त्वाचे यश मिळवू न शकल्याने रणांगणावरील अपयशामुळे माधवरावांशी त्यांचे नाते आणखी ताणले गेले. निराश होऊन दोषारोप ढकलण्याचा प्रयत्न करणाऱ्या रघुनाथरावांनी माधवरावांच्या नेतृत्वावर जाहीर नाराजी व्यक्त केली आणि आधीच नाजूक असलेले त्यांचे नाते आणखी बिघडले.

त्यांच्या अयशस्वी मोहिमेनंतर रघुनाथरावांनी नाशिकजवळील आनंदवल्ली येथे वास्तव्य केले. रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षा आणि षड्यंत्रांमुळे धोका निर्माण होत राहील, हे लक्षात आल्यावर थेट संघर्ष केल्याशिवाय परिस्थिती बदलणार नाही, हे माधवरावांच्या लक्षात आले. माधवरावांनी मोठी फौज घेऊन आनंदवल्लीकडे कूच केले. माधवरावांच्या निर्णायक कृतीने घाबरलेल्या रघुनाथरावांनी अखेर तोडगा काढण्यास होकार दिला. ३ ऑक्टोबर १७६७ रोजी झालेल्या करारानुसार रघुनाथराव दहा लाखांचे कर्ज घेणार होते, तर पेशवे उत्तरेकडील मोहिमेदरम्यान झालेला २५ लाख रुपयांचा खर्च भागवणार होते.

हा करार होऊनही रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षा शमल्या नव्हत्या. अमृतराव नावाचा मुलगा दत्तक घेऊन पेशव्यांचे शत्रू असलेल्या निजाम, हैदरअली, जानोजी भोसले आणि अगदी इंग्रजांशीही युती करून त्यांनी माधवरावांच्या विरोधात कट रचणे सुरूच ठेवले. माधवरावांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षेला अंतिम धक्का देण्याची वेळ आल्याचे ठरविले.

माधवरावांनी रघुनाथरावांच्या विरोधात मोहीम राबवली आणि त्याचा शेवट धोडपच्या निर्णायक लढाईत झाला. रघुनाथरावाचा पूर्ण पराभव झाला आणि माधवरावांनी त्यांना परत पुण्यात आणले, त्यांना कैदेत ठेवण्यात आले आणि मराठा राजकारणावरील रघुनाथरावांचा थेट प्रभाव संपुष्टात आला.

## ५. जानोजी भोसले यांची मोहीम व सामंजस्य

भोसले हे मराठा सत्तेतील प्रमुख सरदार होते. नागपूर हे त्यांच्या सत्तेचे केंद्र होते. मराठा राज्याच्या विस्तारात त्यांचा मोठा वाटा होता. इ.स.१७०७ मध्ये छत्रपती शाहू महाराजांनी परसोजी भोसले यांना 'सेनासाहेब महाराजांनी सुभा' हे पद देऊन वऱ्हाड-गोंडवन प्रांतावर वंशपरंपरागत अधिकार (सनद) दिली होती. या घराण्यातील कान्होजी भोसले, रघुजी भोसले यानंतर जाणोजी भोसले यांच्याकडे अधिकार आले. भोसले घराणे आणि पेशवे यांच्यातील संबंध तणावपूर्ण होते. मराठा महासंघातील बलाढ्य सरदार म्हणून जानोजी भोसले यांनी अनेकदा पेशवे सत्तेला विरोध केला, पेशव्यांच्या विरोधात सातत्याने षडयंत्र रचले.

पेशव्यांच्या शत्रूंशी जुळवून घेऊन मराठा राज्याची एकजूट आणखी गुंतागुंतीची करण्याचा जानोजींचा इतिहास होता.

रघुनाथरावांनी निर्माण केलेला धोका यशस्वीपणे पेलल्यानंतर माधवरावांनी आपले लक्ष जानोजी भोसलेंकडे वळवले. सत्ता बळकट करण्याचे आणि मराठा सरदारांमध्ये निष्ठा राखण्याचे महत्त्व ओळखले. माधवरावांनी सामरिकदृष्ट्या लष्करी दलांचे व्यवस्थापन करून रामचंद्र गणेशाचे सैन्य उत्तरेकडे पाठवून गोपाळराव पटवर्धनांचे सैन्य विदर्भात पाठवले. माधवरावांनी स्वत: जानोजी भोसले यांच्या ताब्यातील प्रदेशात मोठ्या सैन्याचे नेतृत्व केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून जानोजीने पेशव्यांच्या सैन्याचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न करत गनिमी काव्याचा  अवलंब केला. मात्र माधवरावांच्या सुसंघटित मोहिमेविरुद्ध हे प्रयत्न निष्फळ ठरले.

सततच्या प्रतिकाराची निरर्थकता ओळखून जानोजींनी अखेर पेशव्यापुढे शरणागती पत्करली. माधवरावांनी आपल्या राज्यकर्तृत्वाचे दर्शन घडवत मराठ्यांमधील ऐक्याचे महत्त्व अधोरेखित करून जानोजींच्या राष्ट्रहिताच्या भावनेला आवाहन केले. या दृष्टिकोनामुळे सामंजस्य निर्माण झाले आणि २४ एप्रिल १७६९ रोजी कनकपूरच्या तहावर स्वाक्षरी झाली.

- **कनकपूरच्या तह :**

१. या तहाच्या अटींनुसार जानोजींनी पाच लाख रुपये देण्याचे मान्य केले.

२. जानोजी स्वतंत्रपणे काम करणार नाहीत.

३. परवानगीशिवाय आपले सैन्य वाढविण्याचे नाहीत.

४. राज्याच्या सेवेसाठी पेशव्यांच्या दरबारात हजर राहतील.

शिवाय, जानोजींनी पेशव्यांशी आपली निष्ठा व्यक्त केली आणि अंतर्गत मराठा संबंध स्थिर करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले. या कृतींद्वारे माधवरावांनी एका अत्यंत प्रभावशाली मराठा सरदाराची निष्ठा तर जपलीच, पण तीव्र बाह्य व अंतर्गत आव्हानांच्या काळात मराठा संघाची एकात्मताही बळकट केली.

**६. उत्तरेचे राजकारण :**

१७६१ मध्ये पानिपत येथील भीषण पराभवानंतर उत्तर भारतातील मराठ्यांचा प्रभाव बराच कमी झाला. रजपूत, जाट आणि बुंदेला यांसारख्या स्थानिक राज्यकर्त्यांना मराठा वर्चस्वाविरुद्ध बंड करण्याची संधी मिळाल्याने बुंदेलखंड, राजपुताना आणि माळवा सारख्या प्रदेशांवर एकेकाळी मजबूत असलेली पकड मोडकळीस येऊ लागली. शुजाउद्दौलाने गंगा-यमुना प्रदेशाचा ताबा घेतल्यानंतर अंतर्गत बंडखोरीबरोबरच बाह्य धोके निर्माण झाले आणि रोहिल्लांनी इटावा पासून हरिद्वारपर्यंतचा प्रदेश ताब्यात घेतला. ही आव्हाने असतानाही उत्तरेतील मराठा सरदारांनी आपला प्रभाव कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.

पानिपतनंतर मल्हारराव होळकर उत्तरेतील अग्रगण्य मराठा सेनापती म्हणून उदयास आले. मात्र, जयपूरच्या माधोसिंगासारखे प्रबळ शत्रू मराठ्यांशी तीव्र वैर बाळगून असल्याने परिस्थिती बिकट होती. प्रतिकूल परिस्थिती असतानाही मल्हारराव होळकरांनी २९ नोव्हेंबर १७६१ रोजी कोटाजवळील मंगरूळच्या लढाईत माधोसिंगाचा पराभव करून महत्त्वपूर्ण विजय मिळवला. असे असले तरी मराठ्यांना उत्तरेकडे आपले लक्ष फार काळ टिकवता आले नाही, कारण मल्हाररावांना इतर महत्त्वाच्या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी दक्षिणेकडे बोलावले गेले. यामुळे इंग्रजांना बंगालवरील आपली पकड मजबूत करता आली आणि उत्तर भारतातील मराठ्यांचा प्रभाव आणखी कमी झाला.

ऑक्टोबर १७६४ मध्ये बक्सरची लढाई या प्रदेशाच्या राजकारणातील एक निर्णायक क्षण ठरली. इंग्रजांनी अयोध्येचा शुजाउद्दौला आणि मुघल सम्राट शाहआलम दुसरा यांचा निर्णायक पराभव करून उत्तर भारतात सत्तेची मोठी पोकळी निर्माण केली. त्याला प्रत्युत्तर म्हणून शुजाउद्दौलाने मल्हारराव होळकरांचा आश्रय घेतला, पुन्हा संघटित होऊन इंग्रजांच्या प्रगतीचा प्रतिकार करण्याच्या अपेक्षेने. मात्र ३ मे १७६५ रोजी कोराची लढाई जिंकून उत्तरेतील आपले वर्चस्व अधिक बळकट करणाऱ्या इंग्रजांना शुजाउद्दौला व मल्हारराव होळकर यांच्या संयुक्त फौजेची बरोबरी झाली नाही.

गंभीर परिस्थिती ओळखून रघुनाथराव (राघोबा) १७६५ च्या उत्तरार्धात मराठा प्रभाव परत मिळवण्याच्या आशेने उत्तरेकडे मोहिमेवर निघाले. एप्रिल १७६६ पर्यंत त्यांच्यासोबत महादजी शिंदे, मल्हारराव होळकर यांसारखे प्रमुख मराठा नेते सामील झाले. तथापि, रघुनाथरावांना गोहादचा जाट राजा छत्तरसिंग आणि त्याचा सहकारी भरतपूरचा जवाहिरसिंग यासह स्थानिक राज्यकर्त्यांच्या महत्त्वपूर्ण विरोधाला सामोरे जावे लागले. मराठ्यांच्या दुर्दैवाने २० मे १७६६ रोजी मल्हारराव होळकर यांचे निधन झाले आणि त्यांची स्थिती अधिकच कमकुवत झाली.

रघुनाथराव निर्णायक विजय मिळवण्यात अपयशी ठरल्याने गोहद किल्ल्याचा मराठ्यांचा वेढा संपुष्टात आला. गोहद शासकाने १५ लाख रुपयांची खंडणी दिल्यानंतर अखेर महादजी शिंदे यांनी वाटाघाटी करून घेराव उठवला. त्यानंतर रघुनाथरावांनी जवाहिरसिंगाच्या रक्षणासाठी धौलपूरकडे आपले लक्ष वळवले, परंतु अहमदशाह अब्दाली पंजाबला परतल्याच्या बातमीने त्यांना अकाली मोहीम सोडावी लागली. दीड वर्षांहून अधिक काळ चाललेली रघुनाथरावांची उत्तरेकडील मोहीम अपयशी ठरल्याने ते प्रचंड कर्जबाजारी झाले आणि त्यांच्या प्रतिष्ठेचे धक्का पोहचला.

इ.स. १७६७ मध्ये रघुनाथराव दक्षिणेला माळव्याला गेले, तेथे त्यांनी अहिल्याबाई होळकरांचा मुलगा मालेराव याच्या नुकत्याच झालेल्या मृत्यूचा आर्थिक फायद्यासाठी तिच्या प्रदेशावर हल्ला करून गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, या योजनेमुळे मोठी निराशा पदरी आली. अखेर रघुनाथरावांनी ही कल्पना सोडून मालेरावांच्या निधनाचा शोक व्यक्त करून पुण्याला परतले.

रघुनाथरावांच्या अयशस्वी उत्तर मोहिमेचे दीर्घ परिणाम होते. रघुनाथरावांच्या माघारीमुळे उत्साहित झालेल्या जवाहिरसिंगाने १७६७ मध्ये बुंदेलखंडवर स्वारी करून कालपीपर्यंतचा प्रदेश काबीज केला आणि

मराठा सरदारांना या प्रदेशातून हाकलून लावले. त्याला प्रत्युत्तर म्हणून पेशवे माधवरावांनी १७६९ मध्ये रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांना उत्तरेकडे पाठवून महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांच्याशी हातमिळवणी केली. त्यांनी मिळून जाटांचा यशस्वी पराभव करून या भागात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले.

मराठ्यांची नवी ताकद ओळखून प्रमुख रोहिल्ला नेते नजीब खान यांनी संघर्ष टाळण्याच्या आशेने तुकोजी होळकरयांच्याशी युती करण्याचा प्रयत्न केला. महादजी शिंदे यांचा रोहिल्लांशी कोणत्याही वाटाघाटीला विरोध असूनही रामचंद्र गणेश यांनी नजीबखान यांच्याशी युती करून गंगा-यमुना दुआबमध्ये मराठा प्रभाव मिळविण्याचा निर्णय घेतला. मात्र नजीबखानने नवाब बंगश यांच्याशी गुपचूप युती करून मराठ्यांना जाळ्यात अडकवण्याचा प्रयत्न केला. आपल्या भूतकाळातील अनुभवांपासून सावध झालेल्या मराठ्यांनी नजीबखानचा डाव हाणून पाडला आणि त्याचा मुलगा झबेताखान याला पकडून यमुना नदी ओलांडली.

नजीबखानच्या आकस्मिक मृत्यूमुळे रोहिल्ला आणखी अस्थिर झाले आणि मराठ्यांना गंगा-यमुना प्रदेशावर आपले नियंत्रण बळकट करता आले. तुकोजी होळकरांच्या मदतीने झबेताखान पळून गेला असला तरी मराठ्यांनी झबेताखान व अहमदखान या दोघांचा पराभव करून आपले वर्चस्व भक्कम केले.

१० फेब्रुवारी १७७१ रोजी महादजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठा सैन्याने विजयीपणे दिल्लीकडे कूच केली आणि शाहआलम दुसरा याला मुघल गादीवर बसवले. अलाहाबादमध्ये इंग्रजांच्या संरक्षणाखाली असलेल्या मुघल बादशहाच्या पुनर्वसनाच्या या कृतीमुळे मराठ्यांच्या प्रतिष्ठेत लक्षणीय वाढ झाली. त्यानंतर महादजी शिंदे यांनी रोहिल्ला छावण्यांवर केलेले हल्ले आणि त्यांच्या प्रदेशांची लूट यामुळे उत्तरेत मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. या प्रयत्नांतून महादजी शिंदे एक बलाढ्य नेता म्हणून उदयास आले आणि पानिपतनंतर प्रचंड नुकसान झालेली मराठा प्रतिष्ठा अखेर पूर्वपदावर आली.

### ७. पेशवे माधवरावांचा मृत्यू व वारसा

बारा वर्षांच्या अथक संघर्षामुळे गंभीर परिणाम झालेल्या पेशवे माधवरावांची तब्येत क्षयरोगाने खालावली. १८ नोव्हेंबर १७७२ रोजी पुण्याजवळील थेऊर येथे त्यांचे निधन झाले. तुलनेने अकरा वर्षांची कारकीर्द कमी असूनही माधवरावांचे मराठा साम्राज्यातील योगदान मोठे होते. पानिपतसंकटापेक्षा माधवरावांचा अकाली मृत्यू मराठी राज्यासाठी अधिक घातक होता, असे मत ग्रँट डफ यांनी व्यक्त केले आहे.

निर्भयता, आदर आणि मुत्सद्दी कौशल्य या गुणांचे दर्शन घडवणारे माधवराव हे एक अपवादात्मक पेशवे होते. त्याच्या कारकिर्दीत लक्षणीय सुधारणा आणि पुनर्प्राप्ती झाली. पानिपत येथे झालेल्या नुकसानीनंतर त्यांनी मराठा साम्राज्याचे पुनरुज्जीवन केले आणि त्याची प्रतिष्ठा व प्रभाव पुन्हा प्रस्थापित केला. मराठा वर्चस्व पुन्हा प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या हरिपंत फडके, गोपाळराव

पटवर्धन, नाना फडणीस, महादजी शिंदे, त्र्यंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, गोविंद शिवराम, रामशास्त्री प्रभुणे आणि विसाजी कृष्णा अशा प्रबळ मराठा नेत्यांची नवी पिढी माधवरावांनी जोपासली.

माधवरावांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाला नव्या नैतिक व नैतिक चौकटीने नवसंजीवनी मिळाली. रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारख्या निःपक्षपाती न्यायाधीशांवर न्याय देणे, वेश्याव्यवसायावर बंदी घालणे, लष्करी व सरकारी विभागांतील आळस व निष्काळजीपणा दूर करण्याचे काम त्यांनी सोपवले. साम्राज्याचे संरक्षण बळकट करण्यासाठी त्याने दारुगोळा कारखानेही स्थापन केले. अशा विलक्षण नेत्याचे अकाली निधन होणे हे मराठा राष्ट्राचे दुःखद नुकसान आहे.

**सारांश**

तिसऱ्या पानिपतच्या लढाईतील पराभवानंतर मराठ्यांच्या अखिल भारतीय वर्चस्वात लक्षणीय घसरण झाली आणि त्यांच्या दुबळ्या  अवस्थेचा फायदा शत्रूंनी घेतला. मात्र, माधवरावांच्या नेतृत्वाने झपाट्याने दिशा बदलली. त्याने निजाम आणि हैदरचा पराभव केला, मुघल बादशहाला उत्तरेकडे गादीवर बसवले आणि विरोधकांना मागे हटवले. मराठे पराभूत झालेले नाहीत आणि पुन्हा एकदा आपल्या पूर्वीच्या वैभवाने चमकू शकतात, हे माधवरावांनी या कृतीतून दाखवून दिले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–१**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

१. पानिपतचे तिसरे युद्ध ............. रोजी झाले.

अ) १४ जानेवारी १७६१ ब) १४ मार्च १७६३ क) १४ मे १७६४ ड) १४ एप्रिल १७६२

२. नानासाहेब पेशवे यांच्या मृत्युनंतर २० जुलै १७६१ रोजी सातारच्या छत्रपतींकडून ............. यांना पेशवाईची वस्त्रे मिळाली.

अ) नारायणराव ब) माधवराव क) बाजीराव ड) यापैकी नाही

३. दिवाण विठ्ठल सुंदर हा ............. याच्या पदरी नोकरीस होता.

अ) हैदर ब) मराठे क) निजाम ड) भोसले

४. १० औगस्ट १७६३ रोजी राक्षसभुवनची लढाई ............. यांच्यामध्ये झाली.

अ) मराठे व निजाम ब) मराठे व इंगज क) मराठे व हैदर ड) मराठे व फ्रेंच

५. इ.स.१७०७ मध्ये छत्रपती शाहूंनी ............. यांना 'सेनासाहेब सुभा' हे पद दिले.

अ) परसोजी भोसले ब) महादाजी शिंदे ब) माल्हारराव होळकर ड) पटवर्धन

### ४.२.२ बारभाईचे कारस्थान

**१. प्रास्ताविक**

थोरले माधवराव पेशवे यांनी मराठा साम्राज्याची पानिपत युद्धमुळे झालेली हानी भरून काढली. मात्र त्यांना अल्प आयुष्य लाभले. माधवराव पेशवे यांच्या निधनानंतर नारायणराव यांना पेशवेपद मिळाले. पेशवे माधवरावांच्या निधनानंतरही रघुनाथरावांना पेशवे पद देण्यात आले नाही. परिणामी नारायणरावाविरोधात त्यांनी षडयंत्र रचले. तुळाजी पवार यांच्या मध्यस्थीने सुमेरसिंग गारदी यास नारायणरावांना पकडून कैदेत टाकण्याचे लेखी आदेश राघोबादादा यांनी दिले. मात्र, आनंदीबाईंनी आदेश बदलून 'ध' चा 'मा' असे केला. गारदयांनी नारायणरावांना राघोबादादा समोरच ठार मारले. नारायणरावांच्या हत्येमुळे मराठा साम्राज्यावर आणखी एक गंभीर संकट उभे राहिले. रघुनाथरावांनी सत्ता हाती घेतली. पेशवे बनल्यानंतर रघुनाथराव यांनी कर्नाटकात आपली मोहीम आखली. रघुनाथराव पेशवे कर्नाटक मोहीमेवर गेले असतानाच पुणे दरबारामध्ये रघुनाथराव यांच्या विरोधात बारभाई कारस्थान आकारास आले.

**२. बारभाई कारस्थान/मंडळाची निर्मिती :**

रघुनाथराव पेशवे कर्नाटकातील मोहिमेवर गेल्याने मिळालेल्या संधीचा फायदा घेत नाना फडणीस, सखारामबापू बोकील आणि पुणे दरबारातील इतर प्रमुख मुत्सद्दी यांनी रघुनाथरावांना पेशव्यापदावरून हटवण्याचा कट रचला. ही घटना बारभाई कारस्थान म्हणून ओळखली जाते.

बारभाई मंडळात सखाराम बापू, नाना फडणीस, त्र्यंबकराव पेठे, बाबाजी नाईक, हरिपंत फडके, मोरोबा फडणीस, रस्ते, पटवर्धन, मालोजी घोरपडे, भवनराव प्रतिनिधी, महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर यांच्यासह बारा प्रमुख नेत्यांचा समावेश होता. बारभाई मंडळाचे प्रमुखपद सखाराम बापू बोकील यांना देण्यात आले होते. रघुनाथरावांना पदच्युत करून नारायणरावांच्या विधवा पत्नी गंगाबाई या त्यावेळी गरोदर होत्या, त्यांच्या सुरक्षितत ठिकाणी ठेवण्याची त्यांची योजना होती. जर तिने मुलाला जन्म दिला तर ते त्याच्या नावाने राज्य करतील. अन्यथा समशेर बहादूरचा मुलगा व पहिला बाजीरावाचा नातू अली बहादूर याला पेशवे म्हणून नेमण्याची त्यांची योजना होती.

बारभाई कारस्थान कळताच रघुनाथराव प्रचंड व्यथित झाले. त्यांनी अचानक कर्नाटकची मोहीम संपवली आणि घाईघाईने पुण्याला परतले. मात्र, पंढरपूरमार्गे जाताना कासेगाव येथे त्र्यंबकराव पेठे यांच्या फौजेशी त्यांचा सामना झाला, तेथे पेठे जखमी झाले आणि नंतर त्यांचा मृत्यू झाला. दरम्यान, हरिपंत फडके यांनी साताऱ्यातील रघुनाथरावांच्या विरोधात धोरणात्मक हालचाली केल्या आणि भोसले व निजाम या दोघांचाही पाठिंबा मिळवला. वाढत्या विरोधाला तोंड देत रघुनाथराव उत्तरेकडे पळून गेले.

१८ एप्रिल १७७४ रोजी गंगाबाईंनी एका मुलाला जन्म दिला, त्याचे नाव सवाई माधवराव असे ठेवण्यात आले. अवघ्या ४० दिवसाच्या सवाई माधवरावाला पेशवे पदाची वस्त्रे देण्यात आली. अजूनही पाठिंब्यासाठी आतुर असलेल्या रघुनाथरावांनी महादजी शिंदे आणि तुकोजी होळकर यांची निष्ठा संपादन करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या विनंतीकडे दुर्लक्ष झाले. दुसरा कोणताही पर्याय शिल्लक न राहिल्याने

त्यांनी मदतीसाठी इंग्रजांकडे धाव घेतली आणि त्यामुळे इंग्रजांना मराठा प्रशासनात हस्तक्षेप करण्याची संधी मिळाली.

- **सुरतचा तह**

रघुनाथरावांनी (राघोबा) इंग्रजांचा आश्रय घेतल्यानंतर त्यांनी ६ मार्च १७७५ रोजी त्यांच्याशी तह करण्यास होकार दिला. सुरतच्या तहाच्या अटी खालीलप्रमाणे होत्या.

१. इंग्रज रघुनाथरावांना लष्करी मदत करायचे.

२. या सैन्याचा खर्च भागवण्यासाठी रघुनाथराव इंग्रजांना दरमहा दीड लाख रुपये देत असत.

३. तसेच सहा लाख रुपये किमतीचे रत्नदागिने ते ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीकडे सुरक्षा म्हणून जमा करायचे.

४. त्या बदल्यात रघुनाथरावांनी वसई, साष्टी, मुंबईजवळील सर्व बेटे तसेच गुजरातमधील जांबुसर व ओलपाड इंग्रजांच्या ताब्यात देण्याचे मान्य केले.

मात्र राघोबाच्या मदतीसाठी इंग्रज सैन्य आल्याने हरिपंत फडके यांच्या सैन्याशी संघर्ष झाला. त्यानंतरची लढाई अनिर्णित राहिली आणि कोणत्याही पक्षाला निर्णायक विजय मिळवता आला नाही.

- **पुरंदरचा तह**

मुंबईच्या गव्हर्नरने मराठ्यांविरुद्ध सुरू केलेल्या युद्धावर गव्हर्नर जनरल वॉरेन हेस्टिंग्ज नाराज होते. पूर्वपरवानगी न घेता मुंबईच्या गव्हर्नरने स्वतंत्रपणे काम केल्याने हेस्टिंग्जला हस्तक्षेप करावा लागला. नव्या तडजोडीसाठी हेस्टिंग्जने कर्नल ॲप्टनला पुण्याला पाठवले. चर्चेनंतर १ मार्च १७७६ रोजी पुरंदरचा तह झाला. या करारातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

१. साष्टी आणि ठाणे इंग्रजांच्या ताब्यात राहणार होते.

२. इंग्रजांनी केलेल्या मदतीचा मोबदला म्हणून रघुनाथरावांना ८२ लाख रुपये देण्याचे मराठ्यांनी मान्य केले.

३. रघुनाथराव राजकीय जीवनातून कायमचे माघार घेतील, या अटीवर पेशवे रघुनाथरावांना वर्षाला ३ लाख ८७ हजार रुपये पेन्शन देणार होते.

४. इंग्रजांना गुजरातमधील मराठ्यांकडून ताब्यात घेतलेले प्रदेश कायम ठेवण्याची मुभा देण्यात आली.

५. इंग्रजांना रघुनाथरावांना आश्रय देण्यास मनाई होती.

हा करार घाईघाईने करण्यात आला. इंग्रज व मराठे यांच्यातील अंतर्गत तणाव दूर करण्यात तो अपयशी ठरला.

- **वडगावची लढाई (१६ जानेवारी १७७९)**

पुरंदरचा तह मुंबईच्या गव्हर्नरला पटला नाही. त्यांनी या निर्णयाविरोधात लंडनच्या संचालक मंडळाकडे दाद मागितली. करारानुसार रघुनाथराव पेशव्यांच्या स्वाधीन करण्यास नकार देत, गव्हर्नरच्या अवहेलनेमुळे ब्रिटिश साम्राज्याला, म्हणजे अमेरिकन वसाहतींच्या स्वातंत्र्याला मोठा धक्का बसला.

या पराभवातून सावरण्यासाठी वॉरेन हेस्टिंग्जने मराठ्यांविरुद्ध नव्याने युद्धाचे आदेश दिले. नोव्हेंबर १७७८ मध्ये रघुनाथराव कर्नल एगर्टन यांच्या नेतृत्वाखालील ब्रिटिश सैन्याच्या नेतृत्वाखाली पुण्याकडे निघाले. मराठ्यांना मात्र या कारवाईचा अंदाज आला आणि त्यांनी तळेगावजवळ इंग्रज सैन्याची नाकेबंदी केली. त्यांना वडगावला माघार घ्यावी लागली. त्यानंतर १६ जानेवारी १७७९ रोजी वडगावच्या लढाईत मराठ्यांनी इंग्रज सैन्याचा निर्णायक पराभव करून त्यांना शरणागती पत्करावी लागली.

त्यानंतरच्या करारातील अटींनुसार इंग्रज रघुनाथरावांना पेशव्यांच्या स्वाधीन करतील आणि त्यांनी पूर्वी मराठ्यांकडून ताब्यात घेतलेले साष्टी, ठाणे व गुजरात चे प्रदेश परत करतील. मात्र, वॉरेन हेस्टिंग्ज या निर्णयावर  असमाधानी होते. त्यांनी तडजोड स्वीकारण्यास नकार दिला. संघर्ष सुरूच ठेवण्याचा निर्धार करून त्याने जनरल गोडार्डला गुजरात प्रांतावर हल्ला करण्याचे आदेश दिले. दरम्यान, मराठ्यांच्या ताब्यात असलेला रघुनाथराव पळून जाण्यात यशस्वी झाला आणि सुरतला पळून गेल्याने परिस्थिती अधिकच चिघळली.

- **आघाडीची स्थापना :**

पुरंदरचा तह फेटाळल्यानंतर इंग्रजांनी मराठ्यांविरुद्ध आपले युद्ध पुन्हा सुरू केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून नाना फडणीस यांनी इंग्रजांच्या आक्रमणाला प्रतिकार  करण्यासाठी अखिल भारतीय आघाडी स्थापन केली. या आघाडीत पेशवे, निजाम, हैदरअली आणि भोसले यांचा समावेश होता, जे एका समान  शत्रूविरुद्ध एकवटले होते.

मराठ्यांनी महाराष्ट्र व गुजरातमध्ये इंग्रजांना गुंतवून ठेवण्याची रणनीती होती, तर हैदरअलीने दक्षिण कर्नाटकातील ब्रिटिश प्रदेशांवर आक्रमण केले. निजामपूर्व किनाऱ्यावरील इंग्रजांच्या अधिपत्याखाली लपलेल्या प्रदेशांना लक्ष्य करणार होता आणि भोसलेंना ब्रिटिशांच्या नियंत्रणाखालील प्रदेश काबीज करण्यासाठी बंगालमध्ये जाण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. मात्र इंग्रजांनी निजाम आणि नागपूरकर भोसले यांना हे काम सोडून देण्यास राजी करून ही युती कमकुवत करण्यात यश मिळवले.

या धक्क्यांनंतरही मराठ्यांनी महादजी शिंदे व तुकोजी होळकर यांच्या नेतृत्वाखाली इंग्रज सैन्याचा मुकाबला करण्यासाठी गनिमी काव्याने लढण्याचे ठरविले. जनरल गोडार्ड यांनी फत्तेसिंगराव गायकवाड यांच्या मदतीने गुजरातमधील मराठा प्रदेशावर आक्रमण सुरू केले. त्याला प्रत्युत्तर म्हणून शिंदे व होळकर यांनी गनिमी कावा युद्धाचा वापर करून इंग्रजांना मोठा धक्का दिला. मराठ्यांनी मुंबईच्या आजूबाजूच्या इंग्रज

सैन्याचे प्रचंड नुकसान केले, त्यामुळे त्यांना गुजरातमधील आपली मोहीम सोडून मुंबईच्या रक्षणावर लक्ष केंद्रित करावे लागले.

मराठ्यांनी गनिमी कावा युद्धाचा वापर केल्याने इंग्रजांना आश्चर्याचा धक्का बसला आणि महादजी शिंदे यांच्या नेतृत्वामुळे गुजरातमधून इंग्रज सैन्याची हकालपट्टी झाली. इंग्रजांचे झालेले प्रचंड नुकसान आणि अपमान यामुळे त्यांनी युद्ध थांबवले. वाटाघाटी सुरू झाल्या आणि १७ मे १७८२ रोजी सालबाईच्या तहावर स्वाक्षरी झाली आणि शत्रुत्वाचा अंत झाला.

- **सालबाईचा तह :**

१७ मे १७८२ रोजी झालेल्या सालबाईच्या तहातील  खालीलप्रमाणे अटी होत्या.

१. ब्रिटिशांच्या ताब्यात राहिलेला वसई वगळता त्यांनी ताब्यात घेतलेला प्रदेश मराठ्यांना परत देण्याचे ब्रिटिशांनी मान्य केले.

२. साष्टी आणि मुंबईच्या आजूबाजूची छोटी बेटे ब्रिटिशांच्या ताब्यात राहणार होती.

३. इंग्रजांनी  गुजरातमध्ये काबीज केलेला प्रदेश मराठ्यांना परत करायचा.

४. रघुनाथरावांना मराठ्यांच्या स्वाधीन करायचे होते. त्या बदल्यात मराठे त्यांना दरमहा १,००,००० रुपये पेन्शन देतील  आणि त्यांच्या वैयक्तिक खर्चासाठी अतिरिक्त २५,००० रुपयांची तरतूद केली जाईल.

हैदरअलीने इंग्रजांकडून ताब्यात घेतलेला प्रदेश परत मिळवण्याचा मराठ्यांचा प्रयत्न होता.पेशव्यांनी इंग्रजांना पूर्वीप्रमाणेच व्यापारी सवलती देण्याचे मान्य केले आणि इंग्रज व पोर्तुगीज वगळता इतर युरोपियन व्यापाऱ्यांना मराठा प्रदेशात काम करण्यापासून रोखायचे होते.

सालबाईच्या तहाने इंग्रजांनी मराठा प्रदेशात किंवा अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याचे परिणाम अधोरेखित केले. मात्र, यामुळे ठाणे व साष्टीवरील इंग्रजांचे नियंत्रण ही पक्के झाले, हे नुकसान मराठ्यांना स्वीकारावे लागले. या करारामुळे महादजी शिंदे यांचे महत्त्व आणि प्रभाव वाढला, कारण यामुळे त्यांना उत्तर भारतात आपले स्थान बळकट करता आले. या करारानुसार इंग्रजांनी मराठ्यांना दिल्लीच्या राजकारणात ढवळाढवळ करणार नाही, असे आश्वासन दिले. या सामरिक विजयामुळे महादजी शिंदे यांना सत्ता बळकट करता आली आणि उत्तरेतील मराठ्यांच प्रभाव अधिक दृढ झाला.आपले वर्चस्व प्रस्थापित करणारे महादजी शिंदे १८ डिसेंबर १७९४ रोजी कोपरगाव येथे मृत्यूपर्यंत मराठा राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत राहिले

- **सारांश :**

उत्तर पेशवाईतील पेशव्याचे स्थान बळकावण्याचा रघुनाथरावांचा अन्यायकारक प्रयत्न रोखण्याच्या प्राथमिक उद्देशाने स्थापन झालेले बारभाई मंडळ ही मराठा नेत्यांची व मुत्सद्द्यांची आघाडी होती. रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षेला तोंड देण्यासाठी आणि मराठा साम्राज्याच्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी

सुरुवातीला या गटाचे आयोजन करण्यात आले होते. नारायणरावांच्या गरोदर विधवा पत्नी गंगाबाई यांना पेशवे राज्याची नाममात्र प्रमुख म्हणून मान्यता देणे, मूल दत्तक घेणे, मुलाला जन्म देणे या हेतूने व त्यांच्या नावावर राज्य करण्याचा निर्णय हा त्यांच्या रणनीतीचा केंद्रबिंदू होता. बारभाई कारस्थान म्हणून ओळखली जाणारी ही धोरणात्मक चाल पेशव्यांच्या नावाने प्रशासनावर प्रभावीपणे नियंत्रण ठेवणाऱ्या नाना फडणवीससारख्या प्रभावशाली व्यक्तींनी घडवून आणली होती.

बारभाई मंडळाच्या प्रयत्नांमुळे रघुनाथरावांचे पेशवाई बळकावण्याचे प्रयत्न हाणून पाडले गेले आणि शेवटी त्यांना गटापुढे शरणागती पत्करावी लागली. पुरंदरच्या तहानंतर रघुनाथरावांना कोपरगाव व आनंदवल्ली सारख्या ठिकाणी वास्तव्य करून नंतर सुरत, मुंबई व भावनगर येथे इंग्रजांच्या संरक्षणाखाली आश्रय घ्यावा लागला. मराठा राजकीय क्षेत्रापासून दुरावलेल्या रघुनाथरावांचे अखेर कोपरगावजवळ आजारपणामुळे निधन झाले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न–२**

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

१. बारभाई मंडळाचे प्रमुखपद ............. यांना देण्यात आले होते.

अ) सखाराम बापू ब) नाना फडणीस क) त्र्यंबकराव पेठे ड) हरिपंत फडके

२. सवाई माधवराव यांचा जन्म............. रोजी झाला.

अ) १९ एप्रिल १७७४ ब) १० एप्रिल १७७४ क) १८ एप्रिल १७७४ ड) २० एप्रिल १७७४

३. वाडगावची लढाई ............. रोजी झाली.

अ) १६ जानेवारी १७७३ ब) १६ जानेवारी १७७९

क) १६ जानेवारी १७७२ ड) १६ जानेवारी १७७८

४. सालबाईचा तह ............. यांच्या मध्ये झाला.

अ) मराठे व निजाम ब) मराठे व इंगज क) मराठे व हैदर ड) मराठे व फ्रेंच

५. सुरतचा तह ............. यांच्या मध्ये झाला.

अ) राघोबादादा व निजाम ब) राघोबादादा व इंगज

क) राघोबादादा व हैदर ड) राघोबादादा व फ्रेंच

## ४.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **अनागोंदी कारभार :**

अनागोंदी हे विजयानगरकालीन तुंगभद्रानदीच्या तीरावर वसलेले शहर होते. अशी एक कथा सांगतात की येथील एक राजा आपणाला सार्वभौम म्हणवून सर्व पृथ्वीचा वसूल आपल्या खाती जमेस धरून, मग निरनिराळया देशांच्या नांवानी हिशेबात लिही व अशा रीतीनें स्वत:ची करमणूक करून घेई. यावरून अनागोंदीचा जमाखर्च म्हणजे फाजील हिशोब असा अर्थ पडला. त्याचप्रमाणे अनागोंदी कारभार म्हणजे अंदाधुंदी असा अर्थ प्रचलित झाला.

- **साडेतीन शहाणे :**

पेशवाईमध्ये चार असामान्य व्यक्तिमत्त्वांनी आपली छाप त्या काळावर उमटवली. त्यांना साडेतीन शहाणे असं नाव मिळालं. या चार जणांमध्ये सखारामपंत बोकील, देवाजीपंत चोरघडे, विठ्ठल सुंदर आणि नाना फडणवीस यांचा समावेश होतो. बोकील, चोरघडे आणि विठ्ठल सुंदर हे मुत्सद्दी तर होतेच पण ते योद्धेही होते त्यामुळे त्यांना पूर्ण शहाणे म्हणत. तर नाना फडणवीस हे फक्त मुत्सद्दी असल्यामुळे त्यांना अर्धे शहाणे म्हटले जाते.

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

१. अ) १४ जानेवारी १७६१    २. ब) माधवराव    ३. क) निजाम

४. अ) मराठे व निजाम    ५. अ) परसोजी भोसले

- स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २

खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

१. अ) सखाराम बापू    २. क) १८ एप्रिल १७७४    ३. ब) १६ जानेवारी १७७९

४. ब) मराठे व इंगज    ५.ब) राघोबादादा व इंगज

## ४.५ सारांश

पानिपत युद्धानंतर निर्माण झालेली राजकीय पोकळी भरून काढण्याचे काम माधवराव पेशवे यांनी केले. माधवरावांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी सोपवलेल्या रघुनाथरावांनी प्रामाणिकपणे सहकार्य केले

असते तर परिस्थिती अधिक योग्य पद्धतीने हाताळता आली असती. मात्र, रघुनाथरावांच्या महत्त्वाकांक्षेमुळे मराठा साम्राज्याची मोठ्या प्रमाणात हानी झाली. रघुनाथराव पेशवे बनल्यानंतर बारभाई कारस्थान आकारास आले. बारभाई कारस्थानाचा मराठा साम्राज्यावर मोठा परिणाम झाला. रघुनाथरावांना एकटे पाडून आणि त्यांच्या महत्त्वाकांक्षेला आळा घालून या षड्यंत्राने सुरुवातीला पेशव्यांच्या राजवटीची एकात्मता जपली. मात्र, रघुनाथरावांनी सत्तेच्या शोधात इंग्रजांची मदत घेण्याच्या निर्णयामुळे मराठा राजकारणात इंग्रजांच्या हस्तक्षेपाची दारे नकळत खुली झाली. परकीय पाठिंब्यावरील या अवलंबित्वामुळे शेवटी मराठा साम्राज्य कमकुवत झाले आणि त्याची सत्ता व प्रभाव हळूहळू कमी होण्यास हातभार लागला. बारभाई मंडळाने आपल्या तात्कालिक उद्दिष्टांमध्ये यश मिळवले असले, तरी मराठा इतिहासाची भावी वाटचाल घडविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय :

अ) टिपा लिहा.

१) पेशवे माधवराव पहिले

२) पेशवे माधवराव-राघोबा संघर्ष

३) राक्षसभुवनाची लढाई

४) जानोजी भोसले

५) बारभाई कारस्थान/ मंडळाची निर्मिती

६) सुरतचा तह ६ मार्च १७७५

७) सालबाईचा तह १७ मे १७८२

ब) खालील प्रश्नाची सविस्तर उत्तरे लिहा.

१) पेशवे माधवरावांनी मराठा सत्तेचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केलेल्या कार्याचे वर्णन करा.

२) माधवराव पेशव्यांच्या कार्याची माहिती देऊन मराठ्यांच्या इतिहासातील माधवरावांचे स्थान स्पष्ट करा.

३) मराठ्यांच्या इतिहासातील बारभाई मंडळाची कामगिरी स्पष्ट करा.

४) बारभाई मंडळ व राघोबादादा यांच्यातील संघर्षाची सविस्तर माहिती लिहा.

## ४.७ संदर्भ ग्रंथ


१) Banergee, A. C. Peshwa Madhav Rao I, Calcutta, 1943.

२) Majumdar, R. C. Maratha Supremacy, Bombay, 1977.

३) कोंडेकर, ए. वाय., मराठ्यांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००४

४) कुलकर्णी ए. आर., खरे जी. एच. 'मराठ्यांचा इतिहास' खंड ३, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्माण मंडळ, पुणे येथील कॉन्टिनेंटल प्रकाशन.

५) खोबरेकर, वि. ग., मराठ्यांचा इतिहास, मराठा कालखंड- भाग-२, पेशवेकाल, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ, मुंबई, २००६

६) सरदेसाई जी. एस., 'मराठी संस्थान' खंड १ ते ८ लोकप्रिय प्रकाशने, मुंबई.

७) चेंदवणकर, सदानंद, माधवराव पेशवा, मुंबई, १९६५.

१) सरदेसाई, गो. स. मराठी रियासत, मध्यविभाग ४, पुणे, १९२९.

❑❑❑

## घटक १

# करवीर राज्य

### अ) संभाजी दुसरे, ब) महाराणी जिजाबाई, क) शिवाजी दुसरे

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ संभाजी दुसरे

१.२.२ महाराणी जिजाबाई

१.२.३ शिवाजी दुसरे

१.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे:

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- करवीर राज्याविषयी सविस्तर माहिती मिळेल.
- छत्रपती संभाजी दुसरे यांच्याविषयी सविस्तर माहिती मिळेल.
- करवीर राज्याच्या इतिहासातील महाराणी जिजाबाई यांच्या कार्याविषयी सविस्तर माहिती मिळेल.
- करवीरचे छत्रपती शिवाजी दुसरे यांच्याविषयी सविस्तर माहिती मिळेल.

## १.१ प्रास्ताविक

करवीर राज्य हे मराठा साम्राज्यातील दक्षिणेतील एक महत्वाचे संस्थान होते. करवीर राज्याच्या इतिहासात छत्रपती संभाजी दुसरे, जिजाबाई, आणि छत्रपती शिवाजी दुसरे यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. छत्रपती संभाजी दुसरे (१६९८-१७६०) यांनी १७१४ मध्ये राजकीय सत्तांतर करून करवीर गादीवर

हक्क मिळवला. राजदरबारातील महत्त्वाच्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी राज्यकारभाराचा प्रारंभ केला. मात्र राजकीय कार्यात त्यांना अनेक घडामोडींना सामोरे जावे लागले. अनेक राजकीय संघर्षांना तोंड दिले. त्यांच्या या सत्ताकाळातील विविध घटनांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराणी जिजाबाई, छत्रपती संभाजी दुसरे यांच्या पत्नी होत. त्यांचे कार्य देखील अत्यंत महत्त्वाचे आहे. राज्यकारभारातील त्यांची प्रभावी भूमिका आणि निर्णयांमुळे त्यांनी राज्यकारभार व्यवस्थितपणे चालविला. जिजाबाईंच्या नेतृत्वामुळे राज्यातील विविध आव्हानांचे यशस्वीपणे निराकरण झाले.

छत्रपती शिवाजी दुसरे यांनी करवीर राज्याच्या गादीसाठी महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडली. त्यांच्या कार्यकाळातील संघर्ष आणि धोरणांमुळे करवीर राज्याच्या राजकीय आणि सांस्कृतिक स्थितीवर महत्त्वाचा प्रभाव पडला.

या घटकात आपण छत्रपती संभाजी दुसरे, महाराणी जिजाबाई आणि छत्रपती शिवाजी दुसरे या तिन्ही ऐतिहासिक व्यक्तींच्या जीवनातील आणि कार्यातील महत्वपूर्ण घटना व त्यांची राज्यकारभारातील धोरणे, संघर्ष, आणि सांस्कृतिक कार्य यांचा आढावा घेतला आहे. करवीर राज्याच्या ऐतिहासिक व सांस्कृतिक माहितीचा आढावा घेण्यात आला आहे.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ छत्रपती संभाजी दुसरे

**प्रास्ताविक**

छत्रपती संभाजी दुसरे (२३ मे १६९८–२० डिसेंबर १७६०) हे करवीर राज्याचे एक महत्त्वाचे राजकर्ते होते. संभाजी दुसरे यांचे बालपण महाराणी ताराबाई यांच्या देखरेखीखाली गेले. त्यांनी लहान वयातच राज्यकारभार पाहण्यास सुरुवात केली. त्यांनी १७१४ ते १७६० या कालावधीत करवीरच्या राजगादीचा राज्यकारभार पाहिला.

राजसबाई आणि संभाजी दुसरे यांनी १७१४ मध्ये सत्तांतर करून करवीर गादी मिळवली. त्यांनी ताराबाई आणि त्यांचा पुत्र शिवाजी यांना पन्हाळा येथे कैद केले. या घटनेमुळे संभाजी दुसरे यांनी राज्यकारभारात आपली भूमिका दृढ केली. त्यांचा सुरुवातीचा राजकीय संघर्ष, विशेषत: शाहू महाराजांशी झालेल्या लढाया या त्यांच्या राजकीय निर्णयांची गती आणि प्रभाव स्पष्ट करतात. इ.स.१७२५ च्या करारात राज्यविभागणीची प्रक्रिया कशी पार पडली आणि वारणेच्या तहानंतर त्यांच्या राज्याची स्वायत्तता कशी सुनिश्चित झाली हे त्यांच्या राजकीय कार्याचे महत्त्वाचे घटक आहेत.

छत्रपती संभाजी दुसरे यांनी आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये, इ.स.१७३६ मध्ये डच व्यापारी कंपनीशी केलेल्या करारामुळे करवीर राज्याच्या आर्थिक स्थितीला उत्तेजन मिळाले. सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यांमध्ये त्यांनी अंबाबाई मंदिराचा जीर्णोद्धार केला आणि धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श ठेवला. शेवटच्या काळात, त्यांनी राज्यकारभारातील सहभाग कमी केला. त्यांच्या निधनानंतर महाराणी जिजाबाई यांनी

राज्यकारभाराचे उत्तरदायित्व घेतले. छत्रपती संभाजी दुसरे यांच्या जीवन आणि कार्यास इतिहासात एक अद्वितीय स्थान आहे.

## १. जन्म आणि बालपण

छत्रपती संभाजी दुसरे यांचा जन्म २३ मे १६९८ रोजी विशाळगड येथे छत्रपती राजाराम महाराज आणि राजसबाई यांच्या पोटी झाला. त्यांचे बालपण अत्यंत खडतर परिस्थितीत गेले. त्यांच्या वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाला राजकारणातील ताणतणावांमुळे अनेक संकटांचा सामना करावा लागला. विशेषत: छत्रपती संभाजींचे बालपण महाराणी ताराबाई यांच्या कडक देखरेखीखाली गेले. त्यांना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची संधी मिळाली नाही. कारण ताराबाई स्वतः खूप महत्त्वाकांक्षी होत्या. त्यांनी स्वतःचा पुत्र छत्रपती शिवाजी दुसरे यांना गादीवर बसवून आपले अधिकार प्रस्थापित केले होते.

ताराबाई यांच्या या वर्चस्वामुळे छत्रपती संभाजींचे बालपण तणावपूर्ण गेले. या परिस्थितीत छत्रपती संभाजींनी ताराबाईंच्याकडून राजकीय डावपेच शिकून घेतले. बालपणीच संघर्षाचे वातावरण पाहिल्यामुळे त्यांच्यात राजकारणातील मुत्सद्देगिरी आणि धाडस निर्माण झाले. छत्रपती संभाजींनी ताराबाईंच्या या कडक दृष्टिकोनाचा पुढील काळात त्यांच्या सत्ताकारणातील विविध निर्णयांमध्ये प्रभाव पडल्याचे दिसते. ताराबाईच्या नजरकैदेत असूनही, छत्रपती संभाजींनी आपली बुद्धिमत्ता आणि क्षमतांचा विकास केला. ज्यामुळे ते पुढे करवीरच्या गादीवर बसण्यास सक्षम ठरले. त्यांचा हा राजकीय अनुभव, बालपणातील संघर्ष आणि ताराबाईंच्या कडक शिस्तीमुळे संभाजी पुढे एक बलाढ्य आणि हुशार शासक म्हणून उदयास आले.

## २. करवीर गादीवर दावा (१७१४)

छत्रपती संभाजींच्या जीवनातील १७१४ हे वर्ष अत्यंत महत्त्वाचे होते. कारण यावर्षी त्यांनी आणि त्यांच्या आई राजसबाई यांनी करवीर गादीवर आपला हक्क प्रस्थापित केला. छत्रपती संभाजींचे वडील राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर, ताराबाई यांनी आपला पुत्र छत्रपती शिवाजी दुसरे यांच्या नावाने सत्ता हातात घेतली होती आणि करवीर राज्यावर आपली सत्ता मजबूत केली होती. यामुळे छत्रपती संभाजी आणि त्यांच्या आई राजसबाई यांना सत्तेपासून दूर ठेवले गेले होते. पण राजसबाई या कर्तबगार आणि मुत्सद्दी स्वभावाच्या होत्या. त्यांनी योग्य वेळ पाहून सत्तांतराची योजना आखली.

इ.स.१७१४ मध्ये, छत्रपती संभाजी आणि राजसबाई यांनी एका योजनाबद्ध पद्धतीने सत्तांतर घडवून आणले. त्यांनी ताराबाई आणि छत्रपती शिवाजी यांना पन्हाळगडावर कैद केले आणि करवीरची गादी आपल्या हातात घेतली. या सत्तांतराने करवीरच्या राजकारणात मोठा बदल घडवून आणला. ताराबाईंचे वर्चस्व संपले आणि छत्रपती संभाजींना करवीरच्या गादीवर बसण्याची संधी मिळाली. त्या वेळी छत्रपती संभाजी केवळ १६ वर्षांचे होते. पण त्यांच्या आई राजसबाई यांच्या चाणाक्ष मार्गदर्शनाखाली त्यांनी सत्ता काबीज केली होती.

### ३. राज्यकारभाराची सुरुवात

छत्रपती संभाजींनी केवळ १६ वर्षांचे असताना करवीरच्या गादीवर विराजमान होऊन राज्यकारभाराची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. अत्यंत तरुण वयातच सत्ताधीश होणे ही मोठी जबाबदारी होती. त्यावेळी त्यांच्याकडे राज्यकारभाराचा फारसा अनुभव नव्हता. त्यांची आई राजसबाई आणि राज्यातील अनुभवी सरदारांच्या मार्गदर्शनामुळे त्यांनी हळूहळू कारभार शिकायला सुरुवात केली.

रामचंद्रपंत अमात्य, दमाजी थोरात, उदाजी चव्हाण हे तज्ज्ञ आणि अनुभवी सरदार राज्यकारभारात त्यांचे प्रमुख मार्गदर्शक होते. रामचंद्रपंत अमात्य हे राजकारणातील मुत्सद्दी आणि चाणाक्ष व्यक्तिमत्त्व होते. ज्यांनी शिवाजी महाराज आणि राजाराम महाराजांच्या काळातही महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्यांच्या ज्ञानाने आणि अनुभवाने छत्रपती संभाजींना योग्य सल्ला आणि मार्गदर्शन मिळाले. दमाजी थोरात आणि उदाजी चव्हाण हेही राज्यातील शक्तिशाली सरदार होते. ज्यांनी संभाजींना सैन्यव्यवस्थापन, राजकीय डावपेच, आणि धोरणात्मक निर्णय घेण्याची शिकवण दिली.

महाराणी राजसबाईंचे देखील राज्यकारभारात मोठे योगदान होते. त्या संभाजींना सतत योग्य सल्ला देत आणि त्यांच्या निर्णयांमध्ये मोलाचे मार्गदर्शन करत. या अनुभवी व्यक्तींच्या मार्गदर्शनामुळे संभाजींनी आपल्या तरुण वयातच राज्यकारभाराची जबाबदारी योग्य प्रकारे हाताळण्यास सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात संभाजींनी अधिकाऱ्यांच्या मदतीने राज्याच्या प्रशासनाला स्थिरता आणली आणि करवीरचे राज्य भक्कम केले. पुढील काळात त्यांनी स्वतंत्रपणे आणि यशस्वीपणे राज्यकारभार सांभाळला.

### ४. सुरुवातीचे राजकीय संबंध आणि संघर्ष

- **निजामाशी मैत्री**

छत्रपती संभाजींनी राज्यकारभाराच्या सुरुवातीला राजकीय स्थैर्य आणि सत्ता बळकट करण्यासाठी विविध धोरणे अवलंबली. त्यापैकी एक महत्त्वाचे पाऊल म्हणजे निजामाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करणे. निजाम हा तेव्हा दक्षिण भारतातील एक प्रभावशाली सत्ताधीश होता. त्याच्याशी मैत्री निर्माण केल्याने छत्रपती संभाजींना राजकीय स्थैर्य मिळाले. निजामाशी संबंध सुधारल्यामुळे छत्रपती संभाजींना साताऱ्याच्या छत्रपती शाहू महाराजांपासून होणारा धोका कमी झाला. त्यांना आपले राज्य अधिक बळकट करण्यासाठी वेळ मिळाला.

- **पोर्तुगीजांशी करार**

छत्रपती संभाजींनी निजामाशी मैत्री प्रस्तापित केल्यावर लगेचच पोर्तुगीजांशीही १७१६ साली एक महत्त्वाचा करार केला. या करारानुसार गोव्याच्या पोर्तुगीजांकडून त्यांनी युद्धसाहित्य खरेदी करण्याचे ठरविले. तोफा, दारूगोळा, बंदुका यांसारखे अत्याधुनिक युद्धसाहित्य खरेदी करण्याची परवानगी या कराराद्वारे मिळाली. यामुळे छत्रपती संभाजींची सैन्यशक्ती अधिक बळकट झाली. पोर्तुगीजांकडून मिळालेल्या आधुनिक शस्त्रसामग्रीमुळे त्यांच्या सैन्याची ताकद वाढली. जी त्यांना पुढील काळात शाहू महाराजांसह इतर प्रतिस्पर्ध्यांशी लढाई करताना उपयुक्त ठरली.

निजामाशी मैत्री आणि पोर्तुगीजांशी करार केल्यामुळे छत्रपती संभाजींनी राज्यकारभारात सुरुवातीच्या काळातच राजनैतिक आणि लष्करी बळ कमावले. या धोरणात्मक निर्णयांमुळे त्यांना त्यांच्या राज्याच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक तो आधार मिळाला. यामुळे त्यांना शाहू महाराजांच्या हल्ल्यांचा सामना करण्यास सज्ज होण्यास मदत झाली आणि त्यांची सत्ता स्थिर झाली.

### ५. सातारा छत्रपती शाहू महाराजांशी संघर्ष

- **वडगावची लढाई**

साताऱ्याचे छत्रपती शाहू महाराज आणि करवीरचे छत्रपती संभाजी यांच्यातील संघर्षाने मराठा साम्राज्याच्या दोन स्वतंत्र गाद्यांची निर्मिती झाली. शाहू महाराजांनी छत्रपती संभाजींविरुद्ध सुरू केलेले राजकीय आणि लष्करी आव्हान अनेक लढायांमध्ये रुपांतरीत झाले. या संघर्षामुळे करवीर आणि सातारा या दोन मराठा गादींमध्ये सतत तणाव आणि स्पर्धा निर्माण झाली.

वडगावची लढाई हा या संघर्षातील महत्त्वाचा टप्पा ठरला. या लढाईत शाहू महाराजांनी छत्रपती संभाजींवर विजय मिळवला. त्यामुळे सातारा गादीचे वर्चस्व कायम राहिले. वडगावच्या पराभवानंतर छत्रपती संभाजींना त्यांची सत्ता आणि प्रभाव पुन्हा निर्माण करण्यासाठी अधिक धोरणात्मक प्रयत्न करावे लागले.

- **बहे (उरूण-इस्लामपूर)ची लढाई**

संघर्षाच्या पुढील टप्प्यात, १७२० साली बहे (उरूण-इस्लामपूर) ची लढाई लढली गेली. त्या लढाईत शाहू महाराजांचे पेशवा बाळाजी विश्वनाथ यांनी छत्रपती संभाजींवर निर्णायक विजय मिळवला. इस्लामपूर जवळच्या कृष्णेकाठी बहे येथे झालेल्या लढाईत छत्रपती संभाजींचा प्रचंड पराभव झाला. बाळाजी विश्वनाथ यांच्या रणनीतीने आणि सैन्यशक्तीने छत्रपती संभाजींना माघार घ्यावी लागली आणि पन्हाळगडावर परतावे लागले.

बहे (उरूण-इस्लामपूर) च्या लढाईत झालेला पराभव छत्रपती संभाजींसाठी मोठा धक्का ठरला. त्यांना या पराभवाने केवळ लष्करी नुकसानच झाले नाही, तर त्यांच्या नेतृत्वाच्या क्षमतेवरही प्रश्नचिन्ह उभे राहिले. या लढाईतून छत्रपती संभाजींनी बरेच धडे घेतले. पुढील काळात त्यांनी सातारा गादीशी अधिक कूटनीतीने संबंध राखण्याचा प्रयत्न केला.

या संघर्षाने करवीर आणि सातारा गादींमधील तणाव वाढवला, ज्यामुळे मराठा साम्राज्याच्या दोन भागांमधील राजकीय विभाजन स्पष्ट झाले.

- **इ.स.१७२५ चा करार**

इस. १७२५ सालचा करार हा करवीरचे छत्रपती संभाजी दुसरे आणि सातारचे छत्रपती शाहू महाराज यांच्यातील राजकीय तणाव कमी करण्यासाठी केलेला महत्त्वपूर्ण करार होता. हा करार मराठा साम्राज्यातील दोन स्वतंत्र गादींमधील संघर्ष आणि सत्ता-संपत्तीच्या विभागणीसाठी केला गेला. या करारामुळे मराठा साम्राज्यातील सत्ता एकत्र आणण्यासाठी केलेल्या प्रयत्नांमध्ये मोठी भूमिका बजावली. तरी पुढेही काही अडचणी राहिल्या.

१) **कराराची पार्श्वभूमी**

छत्रपती संभाजी दुसरे आणि शाहू महाराज यांच्यातील दीर्घकालीन संघर्ष होता. छत्रपती संभाजी दुसरे हे छत्रपती राजाराम आणि राजसबाई यांचे पुत्र होते. ज्यांनी करवीरची गादी मिळवली होती. दुसरीकडे, शाहू महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे नातू होते, ज्यांनी साताऱ्याची गादी मिळवली होती. दोघांनाही छत्रपती पदाचा वारसा असल्यामुळे सत्ता बळकटीसाठी सतत संघर्ष होत राहिला.

शाहू महाराजांनी मराठा साम्राज्याची सत्ता साताऱ्यातून अधिकाधिक केंद्रीत केली होती. तर छत्रपती संभाजी दुसरे  यांनी दक्षिणेकडील भागात आपली सत्ता टिकवून ठेवली होती. शाहू महाराजांच्या सरदारांनी सातत्याने करवीरच्या सरदारांवर हल्ले केले. त्याला छत्रपती संभाजींनीही प्रत्युत्तर दिले. या संघर्षांमुळे मराठा साम्राज्याच्या दोन्ही गादींमध्ये तणाव वाढत गेला. यातून या कराराचा जन्म झाला.

२) **कराराचे कारण**

दोन्ही छत्रपतींना त्यांच्या प्रांतांमध्ये वाढत्या तणावामुळे राजकीय अस्थिरतेचा सामना करावा लागला. शाहू महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठा साम्राज्य एकीकडे उत्तरेकडे मुघलांशी संघर्ष करत होते. तर दुसरीकडे छत्रपती संभाजी दुसरे, निजाम आणि इतर दक्षिणेकडील शक्तींशी संघर्ष करत होते. या राजकीय अस्थिरतेमुळे दोन्ही गादींनी एकमेकांशी संघर्ष टाळण्यासाठी आपापल्या सीमांचे विभाजन करून करार करण्याचा निर्णय घेतला.

शाहू महाराजांची सत्ता सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात हळूहळू बळकट होत गेली होती. त्यांची लष्करी ताकद आणि धोरणात्मक क्षमता उत्तम होत्या. त्यामुळे त्यांना एकीकडे मुघल साम्राज्य आणि दुसरीकडे छत्रपती संभाजी दुसरे या प्रतिस्पर्ध्यांशी सामना करावा लागला. या परिस्थितीत राजकीय स्थैर्य मिळविण्यासाठी राज्याची विभागणी हा एकमेव पर्याय उरला होता.

३) **कराराचे स्वरूप**

इ.स.१७२५ च्या करारानुसार, करवीर गादीचे संभाजी दुसरे यांच्याकडे राज्याच्या दक्षिणेकडील सर्व किल्ले आणि ठाणी देण्यात आली. यामध्ये तेथे असलेले किल्ले, जसे पन्हाळा, विशाळगड, आणि इतर काही महत्त्वपूर्ण ठाणी यांचा समावेश होता. या किल्ल्यांचा महत्त्वाचा लष्करी आणि राजकीय वापर छत्रपती संभाजी दुसरे करवीर गादीच्या भक्कमतेसाठी करू शकले.

दुसरीकडे, मिरज आणि विजापूर प्रांत, जे आर्थिक आणि लष्करी दृष्ट्या महत्त्वाचे होते, हे शाहू महाराजांच्या अखत्यारीत आले. विजापूर हा तेव्हा दक्षिणेतला महत्त्वाचा प्रांत होता, ज्यावर मुगल आक्रमणांच्या काळातही कब्जा मिळविणे महत्त्वाचे होते. मिरज हा स्थानिक राजकारणातील महत्वाचा भूभाग असल्यामुळे शाहूंनी हा प्रांत स्वतःच्या अखत्यारीत ठेवण्याचा निर्णय घेतला.

### ४) कराराचे परिणाम

या करारामुळे दोन्ही गादींमध्ये तात्पुरती शांतता निर्माण झाली. छत्रपती संभाजी दुसरे आणि शाहू महाराजांनी आपापल्या सत्ता क्षेत्रांचा विस्तार आणि राजकीय धोरणे निश्चित केली. या करारामुळे मराठा साम्राज्याच्या दोन भागांमध्ये स्पष्ट सीमारेषा आखण्यात आल्या. ज्यामुळे दोघांनाही आपापल्या क्षेत्रात स्वतंत्रपणे राज्यकारभार करण्याची संधी मिळाली. तथापि, हा करार कायमस्वरूपी शांतता निर्माण करण्यात अपयशी ठरला. मराठा साम्राज्याच्या विविध भागांमध्ये असलेली सत्ता आणि संपत्ती यामुळे संघर्ष पुढील काळातही सुरू राहिला. शिवाय, शाहू महाराज आणि छत्रपती संभाजी दुसरे यांच्यातील लष्करी आणि राजकीय मतभेद कायम राहिले.

- **राज्यविभागणीचे फायदे**

**१. राजकीय स्थैर्य:** या करारामुळे मराठा साम्राज्याच्या दोन्ही गादींमध्ये तात्पुरत्या स्वरुपात का होईना स्थैर्य निर्माण झाले. दोन्ही गाद्यानी आपल्या-आपल्या क्षेत्रांवर नियंत्रण ठेवून राजकीय धोरणे निश्चित केली.

**२. सैन्यशक्तीचे विभाजन:** संभाजी दुसरे आणि शाहू महाराज यांच्यातील संघर्ष कमी झाल्यामुळे लष्कराच्या ताकदीचे विभाजन होऊन मराठा साम्राज्याचे लष्करी सामर्थ्य वाढले. दोन्ही गादींनी आपापल्या क्षेत्रात सैन्यशक्ती विकसित करण्यावर अधिक लक्ष केंद्रित केले.

**३. आर्थिक विकास:** मिरज आणि विजापूर प्रांतांवर शाहू महाराजांच्या नियंत्रणामुळे त्या प्रदेशांतील आर्थिक विकासाला चालना मिळाली. तिथले व्यापारी केंद्रे आणि शेतकरी समाज अधिक समृद्ध झाले. दक्षिणेकडील किल्ल्यांवर नियंत्रण असल्यामुळे छत्रपती संभाजी दुसरे यांनी आपल्या आर्थिक धोरणांना अधिक मजबूत केले.

- **राज्यविभागणीच्या मर्यादा**

**१. तात्पुरती शांतता:** हा करार फक्त तात्पुरती शांतता निर्माण करू शकला. छत्रपती संभाजी दुसरे आणि शाहू महाराज यांच्यातील संघर्ष पूर्णपणे मिटला नाही. या करारानंतरही दोन्ही गाद्यांमध्ये राजकीय आणि लष्करी तणाव कायम राहिला.

**२. स्वातंत्र्याचा प्रश्न**: या करारामुळे करवीर आणि सातारा या दोन गाद्यांमध्ये स्वातंत्र्य आणि सत्ता-केंद्रिकरणाचा प्रश्न निर्माण झाला. छत्रपती संभाजी दुसरे यांनी करवीर गादीचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्यासाठी संघर्ष केला, तर शाहू महाराजांनी साताऱ्यातून मराठा साम्राज्याचे केंद्रीकरण करण्याचे प्रयत्न केले.

**३. परकीय व स्वकीय संबंध:** करारानंतरही मराठा साम्राज्याच्या विविध भागांमध्ये परकीय व स्वकीय सत्ताबरोबरील संबंधांमध्ये तणाव राहिला. निजाम, मुघल, आणि पोर्तुगीज या इतर सत्तांशी संबंध ठेवताना मराठा साम्राज्याच्या दोन्ही गाद्यांना आपापले हितसंबंध जपावे लागले.

## ५) करारानंतरची परिस्थिती

इ.स.१७२५ चा करार हा मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा होता. छत्रपती संभाजी दुसरे आणि शाहू महाराज यांच्यातील राजकीय तणाव आणि लष्करी संघर्ष कमी करण्यासाठी हा करार महत्त्वाचा ठरला. राज्यविभागणीमुळे मराठा साम्राज्याच्या दोन्ही गादींमध्ये तात्पुरती शांतता निर्माण झाली. पण हा करार स्थायी शांतता निर्माण करण्यात अपयशी ठरला.

इ.स.१७२५ च्या करारानंतर काही काळासाठी मराठा साम्राज्यात शांतता निर्माण झाली असली, तरी पुढील काही वर्षांत छत्रपती संभाजी दुसरे आणि शाहू महाराजांमध्ये पुन्हा संघर्ष सुरू झाला. करारानंतरही दोन्ही गाद्यांनी एकमेकांच्या प्रदेशात हल्ले केले. विशेषतः दक्षिणेकडील किल्ल्यांवरुन तणाव वाढत गेला.

इ.स.१७३० च्या वारणाकाठच्या लढाईत श्रीनिवासराव प्रतिनिधी यांनी छत्रपती संभाजींचा पराभव केला आणि त्यांचा सर्व सरंजाम लुटला. यानंतर १७३१ साली वारणेचा इतिहास प्रसिद्ध तह झाला. ज्यात करवीरच्या स्वतंत्र राज्यास शाहू महाराजांनी मान्यता दिली. या तहाने दोन्ही राज्यांच्या सीमा निश्चित झाल्या. पण तरीही मराठा साम्राज्याचे दोन भाग सतत तणावाखाली होते.

- **वारणेचा तह (१७३१)**

वारणेचा तह (१७३१) हा मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि निर्णायक टप्पा होता. या तहामुळे करवीर (कोल्हापूर) गादीला अधिकृत मान्यता मिळाली. ज्यामुळे छत्रपती संभाजी दुसरे यांना त्यांच्या राज्याचा स्वतंत्रपणे कारभार करण्याची संधी मिळाली. यामुळे शाहू महाराजांच्या सातारा गादीपासून करवीरचे राज्य राजकीय दृष्ट्या स्वायत्त बनले.

## १) तहाची पार्श्वभूमी

वारणेच्या तहापूर्वीच्या दशकात करवीर आणि सातारा गादींमधील संघर्ष सातत्याने वाढत गेला होता. छत्रपती संभाजी दुसरे यांनी १७१४ मध्ये करवीरची गादी मिळवल्यावर शाहू महाराजांशी राजकीय आणि लष्करी तणाव वाढला. इ.स.१७२५ च्या करारानंतर काही काळासाठी तणाव कमी झाला होता. पण त्या कराराने कायमस्वरूपी शांतता आणली नाही. दक्षिणेकडील किल्ल्यांवरील ताबा आणि संपत्तीवरून सतत संघर्ष होत राहिला. १७३० साली श्रीनिवासराव प्रतिनिधी यांनी कोल्हापूर राज्यावर हल्ला केला आणि छत्रपती संभाजी दुसरे यांचा पराभव केला. यानंतर, राज्याची स्थिरता राखण्यासाठी दोन्ही बाजूंनी तहाची आवश्यकता भासू लागली.

## २) तहाची मुख्य कारणे

१. **शाहू महाराजांचे धोरण:** शाहू महाराजांनी सातारा गादीचे केंद्रीकरण करण्यासाठी अनेक प्रयत्न केले. त्यांनी कोल्हापूरच्या गादीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. परंतु छत्रपती संभाजी दुसरे यांनी त्याला विरोध केला. छत्रपती संभाजींनी स्वतःचे स्वतंत्र राज्य टिकवून ठेवण्यासाठी अनेक लढाया लढल्या, ज्यामुळे

दोन गादींमध्ये सतत संघर्ष सुरू राहिला. अखेर शाहू महाराजांना करवीरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देणे भाग पडले. कारण त्यांना उत्तरेत मुघल आणि निजाम यांच्याशीही सामना करावा लागत होता.

२. **करवीरच्या स्वायत्ततेची मागणी:** छत्रपती संभाजी दुसरे यांना करवीर राज्याचे स्वातंत्र्य हवे होते. साताऱ्याच्या अधिपत्याखाली राहणे त्यांच्या गादीसाठी एक प्रकारे कमीपणाचे होते. त्यांनी अनेक लष्करी मोहिमा आणि राजकीय डावपेच वापरून आपली सत्ता मजबूत केली होती. ज्यामुळे ते स्वायत्तता मिळवण्यासाठी योग्य स्थितीत आले होते.

३. **मराठा साम्राज्याचा विस्तार:** शाहू महाराजांची सत्ता साताऱ्यातून वाढत होती. पण त्यांना उत्तरेतील मुघल, निजाम, आणि पोर्तुगीज यांच्याशीही संघर्ष करावा लागत होता. करवीरवरील लढाईने शाहूंच्या सैन्यशक्तीचे विभाजन होऊ लागले. त्यामुळे ते छत्रपती संभाजी दुसरे यांच्याशी तह करण्यास तयार झाले. ज्यामुळे त्यांना इतर आघाड्यांवर लक्ष केंद्रित करता आले.

### ३) वारणेचा तह

१७३१ साली झालेला वारणेचा तह हा करवीर आणि सातारा गादींमधील संघर्षामध्ये शांतता आणणारा करार होता. या तहात शाहू महाराजांनी करवीरच्या स्वतंत्र राज्यास मान्यता दिली. हा निर्णय केवळ राजकीय नव्हे तर लष्करी आणि सामाजिक दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण होता.

**१. स्वतंत्र राज्याला मान्यता:** या तहानुसार शाहू महाराजांनी छत्रपती संभाजी दुसरे यांच्या करवीर राज्याच्या स्वायत्ततेला अधिकृत मान्यता दिली. या मान्यतेमुळे करवीर राज्याला स्वतंत्र राज्य म्हणून ओळख मिळाली आणि राज्याच्या सीमारेषा निश्चित करण्यात आल्या. शाहू महाराजांच्या नियंत्रणाखाली राहिलेल्या सातारा गादीपासून करवीरचे राज्य वेगळे झाले.

**२. सीमांचे विभाजन:** तहानुसार दोन्ही राज्यांच्या सीमांचे विभाजन झाले. करवीर गादीला दक्षिणेकडील किल्ले आणि ठाणी मिळाली, ज्यात पन्हाळा, विशाळगड यांसारखे महत्त्वाचे किल्ले होते. दुसरीकडे, शाहू महाराजांनी उत्तरेकडील प्रांतांवर आपले नियंत्रण राखले. वारणा नदी दोन्ही राज्याची सिमारेषा ठरली. या सीमारेषेमुळे दोन गादींमधील संघर्षाची शक्यता कमी झाली.

**३. लष्करी आघाडीवर शांतता:** तहानंतर दोन्ही गादींनी एकमेकांवर लष्करी हल्ले करणे थांबवले. छत्रपती संभाजी दुसरे यांना त्यांच्या राज्यातील किल्ल्यांचा आणि लष्कराचा कारभार स्वतंत्रपणे करण्याची मुभा मिळाली. शाहू महाराजांना उत्तरेत मुगल आणि निजाम यांच्याशी संघर्षावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची संधी मिळाली.

### ४) तहाचे परिणाम

वारणेचा तह हा मराठा साम्राज्याच्या इतिहासातील एक निर्णायक टप्पा होता. ज्यामुळे दोन स्वतंत्र गादींमधील तणाव कमी झाला आणि राज्याचा कारभार अधिक सुव्यवस्थित झाला. या तहामुळे पुढील काही वर्षे करवीर आणि सातारा गादींमध्ये शांतता टिकून राहिली.

**१. राजकीय स्थिरता:** या तहामुळे करवीर राज्याचे स्वतंत्र अस्तित्व अधिकृत झाले. छत्रपती संभाजी दुसरे यांनी या स्वायत्ततेचा फायदा घेऊन आपले राज्य अधिक स्थिर केले. त्यांनी राज्यातील प्रशासन, न्यायव्यवस्था आणि लष्करशक्ती मजबूत केली.

**२. लष्करी ताकदीचा विकास:** छत्रपती संभाजी दुसरे यांनी तहानंतर आपल्या राज्यात लष्करताकद वाढवली. दक्षिणेकडील किल्ल्यांचा वापर करून त्यांनी आपल्या राज्याच्या सीमांचे संरक्षण केले आणि शाहू महाराजांशी असलेला तणाव कमी झाला. यामुळे त्यांना त्यांच्या राज्यात लष्करी ताकदीचा विकास करण्याची मुभा मिळाली.

**३. सामाजिक आणि आर्थिक विकास:** तहानंतर छत्रपती संभाजी दुसरे यांनी आपल्या राज्यात सामाजिक आणि आर्थिक विकास केला. त्यांनी राज्यातील शेतकरी, व्यापारी, आणि इतर समाजघटकांसाठी योजना आखल्या. ज्यामुळे राज्याचा आर्थिक विकास झाला.

**४. मराठा साम्राज्याच्या राजकीय शक्तीचे विभाजन:** वारणेच्या तहामुळे मराठा साम्राज्याच्या दोन गादींमध्ये सत्ता-विभाजन झाले. शाहू महाराजांनी उत्तरेकडील प्रांतांवर अधिक नियंत्रण ठेवले, तर छत्रपती संभाजी दुसरे यांनी दक्षिणेकडील प्रांतांवर आपले प्रभुत्व कायम ठेवले. यामुळे मराठा साम्राज्याची एकात्मता काहीशी धोक्यात आली, पण एकाचवेळी दोन गादींच्या अस्तित्वाला मान्यता मिळाली.

**५) मर्यादा**

वारणेच्या तहाने स्थिरता आणली असली तरी त्याच्या काही मर्यादा देखील होत्या.

**१. तात्पुरता प्रभाव:** हा तह फक्त तात्पुरता परिणामकारक ठरला. पुढील काही वर्षांत मराठा साम्राज्याच्या दोन्ही गादींमधील संघर्ष पुन्हा वाढला. शाहू महाराजांनी उत्तरेतील लढाईत लक्ष घातल्यामुळे दक्षिणेकडील सत्तेवर त्यांचा प्रभाव कमी झाला.

**२. सत्तेचे विभाजन:** दोन गादींमधील सत्तेचे विभाजन मराठा साम्राज्याच्या केंद्रीकरणासाठी अडथळा ठरला. शाहू महाराजांच्या एकत्रित मराठा साम्राज्याच्या संकल्पनेला हा तह एक प्रकारे धक्का होता.

**६. डच कंपनीशी करार (इ.स.१७३६)**

इ.स.१७३६ साली छत्रपती संभाजी दुसरे यांनी डच (नेदरलँड्स) व्यापारी कंपनीशी केलेला करार हा करवीर राज्याच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा होता. या कराराद्वारे डच कंपनीला मालवण बंदरानजीक वखार बांधण्याची परवानगी देण्यात आली.ज्यामुळे करवीर राज्याचा परदेशी व्यापाराशी संबंध प्रस्थापित झाला आणि आर्थिकदृष्ट्या राज्य अधिक स्थिर झाले.

**१. कराराची पार्श्वभूमी**

करवीरच्या राज्यकारभारात छत्रपती संभाजी दुसरे यांचा मुख्य उद्देश राज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याचा होता. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठा साम्राज्याचे परकीय व्यापारी कंपन्यांशी संबंध

वाढले होते. इंग्रज, फ्रेंच, आणि डच या प्रमुख यूरोपीय शक्तींनी भारतीय किनारपट्टीवर व्यापाराचे जाळे पसरवले होते. मालवण बंदर हे करवीरच्या किनारपट्टीवरील एक महत्त्वाचे बंदर होते. जिथून परदेशी व्यापार आणि नौकानयन चालत होते. या बंदरावर आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांसाठी योग्य सोयीसुविधा उभारण्याचा निर्णय घेऊन छत्रपती संभाजींनी इ.स.१७३६ साली डच कंपनीशी करार केला.

**२. कराराचे प्रमुख मुद्दे**

१) **वखार बांधण्याची परवानगी:** या कराराच्या मुख्य अटींनुसार, डच व्यापारी कंपनीला मालवण बंदरानजीक वखार बांधण्याची परवानगी देण्यात आली. या वखारीत डच व्यापारी आपला माल साठवून ठेवू शकत होते. तसेच येथे व्यापारासाठी आवश्यक असलेल्या गोष्टींची देवाणघेवाण केली जात होती.

२) **व्यापाराला प्रोत्साहन:** करारामुळे करवीर राज्याचा परदेशी व्यापाराशी संबंध प्रस्थापित झाला. डच कंपनीने आपल्या व्यापारी जहाजांद्वारे मालवण बंदराचा वापर सुरू केला. ज्यामुळे करवीर राज्याला आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंधांचा फायदा झाला.

३) **मालवण बंदराचे महत्त्व:** मालवण बंदराचे भौगोलिक स्थान आणि व्यापार सुलभता लक्षात घेता. डच कंपनीने येथे आपले व्यापाराचे केंद्र उभारले. हे बंदर कोकण किनारपट्टीवरील महत्त्वाच्या बंदरांपैकी एक होते. ज्यामुळे डच व्यापाऱ्यांना पश्चिम किनारपट्टीवरील इतर बंदरांशी जोडलेले राहणे शक्य झाले.

**३. कराराचे उद्देश**

**१. आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना :** कराराचा मुख्य उद्देश करवीर राज्याच्या व्यापारी क्षमतेत वाढ करणे हा होता. डच व्यापाऱ्यांशी संबंध प्रस्थापित केल्यामुळे छत्रपती संभाजींनी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत करवीर राज्याला प्रवेश मिळवून दिला. या करारामुळे विदेशी मालाची आयात-निर्यात सुलभ झाली.

**२. आर्थिक समृद्धी :** आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे करवीर राज्याची आर्थिक स्थिती सुधारली. डच व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात चांदी, सोने, मसाले, कापड, आणि इतर महत्त्वाचे वस्त्रांचे व्यापार चालवले. ज्याचा फायदा करवीर राज्याच्या खजिन्याला झाला. बंदरावर व्यापारी उलाढालीमुळे महसूल वाढला. ज्यामुळे राज्याची अर्थव्यवस्था मजबूत झाली.

**३. लष्करी फायदा:** याच काळात, मराठा साम्राज्य समुद्री सामर्थ्य वाढवण्याचा प्रयत्न करत होते. डचांसारख्या प्रगत नौकानयन तंत्रज्ञान असलेल्या राष्ट्रांशी संबंध ठेवून छत्रपती संभाजींनी समुद्री लष्करशक्ती वाढवण्यासही प्रोत्साहन दिले. डच व्यापाऱ्यांकडून शस्त्रास्त्र खरेदी आणि नौकानयन तंत्रज्ञानाची माहिती मिळवली गेली. ज्याचा फायदा भविष्यात करवीरच्या नौदलाला झाला.

**४. कराराचे परिणाम**

**१) करवीर राज्याची आर्थिक स्थिती सुधारली:** डच कंपनीशी केलेल्या करारामुळे करवीर राज्याची आर्थिक स्थिती अधिकाधिक मजबूत झाली. बंदरावरून होणाऱ्या व्यापारामुळे खजिन्यात मोठ्या प्रमाणात उत्पन्न जमा झाले. ज्याचा वापर राज्यातील विविध योजना आणि विकासकामांसाठी करता आला.

**२) विदेशी व्यापाराचा विकास:** हा करार केवळ आर्थिक दृष्टिकोनातूनच नव्हे, तर सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वपूर्ण होता. डच व्यापाऱ्यांच्या आगमनामुळे करवीर राज्यात नवीन प्रकारच्या वस्त्र, तंत्रज्ञान, आणि संस्कृतीचे आगमन झाले. राज्यात विदेशी वस्त्रांचा व्यापार वाढला आणि यामुळे व्यापारी वर्गाचा विकास झाला.

**३) लष्करशक्तीचा विकास:** डच व्यापाऱ्यांकडून मिळणारे शस्त्रास्त्र, तंत्रज्ञान, आणि जहाजे यामुळे करवीर राज्याची नौदलशक्ती अधिक सक्षम झाली. समुद्री व्यापारामुळे राज्याला जहाजबांधणीसाठी लागणारे तंत्रज्ञान आणि साधने मिळाली. ज्यामुळे राज्याने आपली समुद्री सत्ता अधिक मजबूत केली.

**४) आंतरराष्ट्रीय संबंधांचे जाळे:** या कराराद्वारे छत्रपती संभाजींनी फक्त डच कंपनीशीच नव्हे, तर इतर विदेशी राष्ट्रांशीही संबंध प्रस्थापित करण्याची पायाभरणी केली. डच व्यापाऱ्यांशी चांगले संबंध ठेवल्यामुळे इतर यूरोपीय शक्तींशीही संबंध वाढण्याची शक्यता निर्माण झाली.

### ५. मर्यादा आणि अडचणी

**१) विदेशी प्रभाव:** या करारामुळे विदेशी व्यापारी कंपन्यांचा करवीर राज्यात प्रवेश झाला. डच व्यापाऱ्यांचा आर्थिक आणि राजकीय प्रभाव राज्याच्या अंतर्गत गोष्टींवर वाढू लागला. ज्यामुळे राज्याच्या स्वायत्ततेला काही प्रमाणात धोका निर्माण झाला.

**२) प्रतिस्पर्धी शक्तींशी संघर्ष:** डच कंपनीशी संबंध प्रस्थापित केल्यामुळे इतर यूरोपीय शक्ती जसे की इंग्रज आणि फ्रेंच यांच्याशीही संघर्षाची शक्यता वाढली. या परकीय व्यापारी कंपन्या नेहमीच एकमेकांशी व्यापारावर वर्चस्व मिळवण्यासाठी संघर्ष करत होत्या. ज्यामुळे स्थानिक राजवटींना अडचणींना सामोरे जावे लागले.

इ.स.१७३६ साली डच कंपनीशी झालेला करार हा करवीर राज्याच्या इतिहासात आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. छत्रपती संभाजी दुसरे यांच्या दूरदृष्टीमुळे हा करार यशस्वी झाला आणि करवीर राज्याच्या आर्थिक स्थितीला चालना मिळाली. आंतरराष्ट्रीय व्यापार, आर्थिक विकास, आणि नौदलशक्तीच्या वाढीसाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरला.

### ७. सांस्कृतिक आणि धार्मिक कार्य

छत्रपती संभाजी दुसरे, करवीर राज्याचे शासक, हे धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्टीकोनातून महत्त्वपूर्ण कार्य करणारे राज्यकर्ता होते. त्यांनी विविध धार्मिक स्थळांच्या जीर्णोद्धाराच्या कामात भाग घेतला आणि धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श निर्माण केला. याशिवाय, त्यांनी धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनातून हिंदू मंदिरांप्रमाणे मशिदींनाही इनामे दिली. जे त्यांच्या धार्मिक सहिष्णुतेचे प्रतीक आहे.

### १) अंबाबाई मंदिराचा जीर्णोद्धार

छत्रपती संभाजी दुसरे यांनी करवीर राज्याच्या धार्मिकतेस महत्त्व दिले आणि त्या अनुषंगाने अनेक धार्मिक स्थळांचे जीर्णोद्धार केला. त्यात विशेषतः अंबाबाई मंदिराच्या जीर्णोद्धाराचा समावेश आहे. अंबाबाई

मंदिर हे करवीर राज्यातील एक प्रमुख धार्मिक केंद्र होते. ज्याला श्रद्धास्थान आणि धार्मिक अनुष्ठानांचे केंद्र मानले जात असे.

औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीदरम्यान, या मंदिराचे नुकसान झाले होते. तसेच अंबाबाईची मूळ मूर्ती संकटात आली होती. छत्रपती संभाजी दुसरे यांनी या मंदिराचा जीणोद्धार करून त्याच्या वैभवाचे पुनरुत्थान केले. हे कार्य केल्यामुळे, त्यांच्या समकालीन लोकांना आणि भावी पिढ्यांना धार्मिक स्थळाची सुरक्षा आणि महत्त्व कळले. अंबाबाई मंदिराच्या जीर्णोद्धारासह, छत्रपती संभाजी दुसरे यांनी लोकांमध्ये एक नवा आत्मविश्वास आणि श्रद्धा निर्माण केली.

### २) हिंदू मंदिरांना आणि मशिदींना इनामे

छत्रपती संभाजी दुसरे यांनी धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श ठेवून विविध धार्मिक स्थळांना इनामे दिली. हिंदू मंदिरांसह, मशिदींनाही त्यांनी याच प्रकारे इनामे दिली.

- **हिंदू मंदिरांना इनामे:** त्यांनी आपल्या राज्यातील विविध हिंदू मंदिरांना इनामे दिली. या इनामांत मंदिरांच्या रोजच्या कारभारासाठी आवश्यक बाबी आणि आर्थिक मदत समाविष्ट होती. यामुळे मंदिरांची आर्थिक स्थिती मजबूत झाली आणि धार्मिक अनुष्ठानांचे नियमितपणे पालन करणे सुलभ झाले.
- **मशिदींना इनामे:** धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श ठेवून, छत्रपती संभाजी दुसरे यांनी मुसलमान समुदायाच्या धार्मिक स्थळांना देखील इनामे दिली. या इनामांत मशिदीच्या देखभालीसाठी आवश्यक साधने, जागा आणि आर्थिक मदतीचा समावेश होता. यामुळे मुसलमान समुदायातील धार्मिक कार्य आणि पूजा अर्चा नियमितपणे पार पाडता आल्या.

### ३) धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श

छत्रपती संभाजी दुसरे यांनी धार्मिक सहिष्णुतेचा आदर्श ठेवला. त्यांच्या राज्यात विविध धार्मिक समुदायांमध्ये शांतता आणि सहकार्याचे वातावरण निर्माण केले. त्यांनी हिंदू आणि मुसलमान धर्मियांसाठी समान वागणूक ठेवून एकात्मतेचे उदाहरण प्रस्तुत केले. सामाजिक सौहार्द आणि धार्मिक सहिष्णुतेच्या माध्यमातून, छत्रपती संभाजी दुसरे यांनी राज्यातील विविध धार्मिक समुदायांमध्ये एकत्रिततेचा आणि समन्वयाचा संदेश दिला. त्यांनी त्यांच्या राज्यात धर्माची भिती न ठेवता, सर्व धर्मांच्या स्थळांना समान सन्मान दिला, ज्यामुळे धर्मनिरपेक्ष दृष्टिकोनाचा आदर्श प्रस्थापित झाला.

संभाजी दुसरे यांचे धार्मिक कार्य आणि सांस्कृतिक योगदान त्यांच्या राज्यकारभारात एक महत्वाचे अंग होते. त्यांनी मंदिरांचा जीर्णोद्धार करून धार्मिक स्थळांचे महत्त्व पुनः प्राप्त केले आणि धर्मनिरपेक्षतेचे महत्व दर्शवले. हिंदू मंदिरांप्रमाणे मुसलमान मशिदींनाही इनामे देऊन त्यांनी आपल्या धार्मिक सहिष्णुतेचे एक आदर्श उदाहरण ठरवले. त्यांच्या या कार्यामुळे, करवीर राज्यात धार्मिक आणि सांस्कृतिक समृद्धीला चालना मिळाली, आणि राज्याच्या सामाजिक एकात्मतेला बळ मिळाले.

## ८. शेवटचा काळ आणि निधन

छत्रपती संभाजी दुसरे यांच्या राज्यकारभाराचे शेवटचे दिवस अत्यंत निराशाजनक होते. त्यांची आरोग्य आणि मानसिक स्थिती या काळात खूपच बदलली होती. ज्यामुळे त्यांनी राज्यकारभारातून लक्ष काढण्याचा निर्णय घेतला. हे बदल आणि त्यानंतरच्या घटनांमुळे छत्रपती संभाजींचे अंतकालीन वर्षे त्यांच्या राजकीय कारभाराच्या इतिहासात महत्वाची ठरली.

- **राज्यकारभारातून माघार (इ.स.१७५०–५१)**

छत्रपती संभाजी दुसरे यांनी इ.स.१७५०–५१च्या आसपास राज्यकारभारातून लक्ष काढले आणि आपला सक्रिय सहभाग कमी केला. छत्रपती संभाजी दुसरे यांनी आपली राजकीय जबाबदारी त्यांच्या पत्नी महाराणी जिजाबाई यांच्यावर सोपवली. महाराणी जिजाबाईनी राज्यकारभाराची जबाबदारी घेतल्यामुळे, छत्रपती संभाजी दुसरे यांनी प्रशासनात कमी सहभाग घेतला.

- **निधन**

छत्रपती संभाजी दुसरे यांचे निधन २० डिसेंबर १७६० रोजी टोप संभापूर येथे झाले. त्यांच्या निधनानंतर, महाराणी जिजाबाई यांनी राज्यकारभार चालवला. त्यांच्या मृत्यूनंतर, त्यांच्या पत्नीने त्यांचे कार्य कायम राखण्यासाठी आणि राज्यातील स्थैर्य कायम ठेवण्यासाठी प्रचंड प्रयत्न केले.

छत्रपती संभाजी दुसरे यांचे निधन म्हणजे करवीर राज्याच्या इतिहासात एक महत्त्वाचा टप्पा होता. त्यांच्या निधनानंतर, जिजाबाईंनी दत्तक मुलाला राज्याचे व्यवस्थापन चालवण्यासाठी नेमले, जेणेकरून राज्याची व्यवस्था सुरळीत राहील. छत्रपती संभाजी दुसरे यांचे जीवन आणि कार्याला करवीर राज्याच्या इतिहासात एक महत्त्वाचे स्थान आहे. त्यांचे कार्य आणि योगदान आजही स्मरणात आहे.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. छत्रपती संभाजी दुसरे यांचा जन्म २३ मे १६९८ रोजी ............. येथे झाला.

अ. पन्हाळा ब. रायगड क. राजगड ड. विशाळगड

२. .............यांच्या देखरेखीखाली संभाजी दुसरे यांचे बालपण तणावपूर्ण गेले.

अ. ताराबाई ब. सोयराबाई क. पुतळाबाई ड. यापैकी नाही

३. इ.स. ............. मध्ये संभाजी दुसरे आणि राजसबाई यांनी एका योजनाबद्ध कारवाईद्वारे करवीरमध्ये सत्तांतर घडवून आणले.

अ. १७१४ ब. १७२५ क. १७२६ ड. १७२७

४. वडगाव व बहे (उरूण-इस्लामपूर )ची लढाई ............. यांच्यामध्ये झाली.

अ. साताराचे छत्रपती आणि करवीरचे छत्रपती ब. निजाम व करवीरचे छत्रपती

क. करवीरचे छत्रपती व इंग्रज ड. निजाम व साताराचे छत्रपती

५. वारणेचा तह .............. रोजी झाला.

अ. १७३१ ब. १७३५ क. १७३३ ड. १७३८

## १.१.२ महाराणी जिजाबाई

### १. प्रास्ताविक

भारतातील राजकीय व्यवस्थेमध्ये मध्ययुगीन कालखंडामध्ये आपल्या कर्तृत्वाने केवळ करवीर राज्याचीच नव्हे तर सबंध दक्षिणेत आपली राजकीय ओळख निर्माण करण्याचे कार्य महाराणी जिजाबाई यांनी केले. मराठ्यातील यादवीमुळे छत्रपती शाहू महाराजांचे सातारा आणि महाराणी ताराबाईंचे कोल्हापूर असे मराठी साम्राज्याचे दोन राज्यात रूपांतर झाले. इ.स. १७१४ कोल्हापूर राज्यात सत्तांतर घडून आले. महाराणी ताराबाई यांच्याकडून राजाराम महाराजांच्या दुसऱ्या पत्नी राजसबाई यांच्याकडे सत्ता आली. महाराणी राजसबाई आपले पुत्र दुसरे संभाजीराजांच्या नावे राजकारभार केला. यानंतर छत्रपती संभाजी राजांची (करवीर) पत्नी महाराणी जिजाबाई यांनी कोल्हापूरच्या राजगादीचा कारभार छत्रपती संभाजी राजे दुसरे यांच्या कारकिर्दीत आणि त्यांच्या मृत्यूनंतर अतिशय चाणाक्षपणे करून कोल्हापूर राज्याचे सार्वभौमत्व प्रस्थापित केले.

करवीर राज्याचा कारभार कार्यक्षमपणे पाहत असताना महाराणी जिजाबाईंनी सातारचे छत्रपती शाहू महाराज आणि पेशव्यांच्या राजकीय उदय आणि विकासाची प्रक्रिया अनुभवली होती. सातारच्या मराठा राज्याचे साम्राज्य रूपांतर होत असताना जिजाबाईंनी पाहिले होते. पेशव्यांच्या व इतर प्रांतिक जहागीरदार व सरदारांच्या मार्फत कोल्हापूरवर होणाऱ्या आघातानाही अतिशय सक्षमपणे त्यांनी प्रत्युत्तर दिले.

पेशव्याद्वारे करवीर राज्याची नाकेबंदी करणारा प्रत्येक प्रयत्न हाणून पाडण्याची पुरेसे काळजी त्यांनी घेतली. याबरोबरच पश्चिम किनारपट्टीवरील पोर्तुगीज, इंग्रज यांच्या व्यापारी व सागरी हालचालीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. कोल्हापूर आणि सातारा राज्यामध्ये तेढ निर्माण करून आपली पोळी भाजणाऱ्या निजामाशी संयमाने लढा दिला.

स्वकीय आणि परकीय शक्तींचा सामना करत महाराणी जिजाबाईनी कोल्हापूर राज्याचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व अबाधित राखण्याचा प्रयत्न केला. महाराणी जिजाबाईंचे वेगळेपण म्हणजे आपल्या राज्यामध्ये सामाजिक परिवर्तनवादी विचारांची पेरणी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. त्या कालखंडात स्त्रियांच्या अस्तित्वाला, स्वातंत्र्याला सार्वजनिक मान्यता नव्हती. त्या कालखंडामध्ये राजकारण, समाजकारण, प्रशासनामध्ये स्त्रियांचे अस्तित्व त्यांनी निर्माण केले.

मराठ्यांच्या इतिहासातील करवीर घराणेतील दुसरी कर्तबगार स्त्री म्हणून महाराणी जिजाबाई यांच्याकडे पाहिले जाते. राज्याच्या इतिहासात महाराणी ताराबाई नंतर यशस्वी राज्यकारभार करण्यात महाराणी जिजाबाई यांचा सिंहाचा वाटा होता. महाराणी जिजाबाई यांचे राजकारण अतिशय शिस्तबद्ध असण्याबरोबरच त्यांच्या राजकीय दूरदृष्टीने करवीर राज्यापुढे आदर्श निर्माण करून ठेवला. महाराणी जिजाबाईंच्या स्वभावाचे विश्लेषण इतिहासकार वासुदेव शास्त्री खरे यांनी पुढील शब्दांमध्ये केलेले आहे– ''त्यांचा स्वभाव अग्नीप्रमाणे प्रखर असून त्यांची शिक्षा कडक असे. स्वकार्य साधण्यासाठी त्यांस एकदा मार्ग पसंत पडला म्हणजे तो योग्य की अयोग्य हे त्या पहात नसत.''

करवीरचा राज्याचा कारभार कसा करावा. त्याबरोबरच तो कसा चालवावा याबद्दल महाराणी जिजाबाई यांच्या मनामध्ये निश्चित योजना होत्या. त्या आपल्याला महाराणी जिजाबाई यांच्या कार्यकर्तृत्वातून दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज (करवीर)अल्पवयीन असताना त्याबरोबरच छत्रपती संभाजी महाराजांचे सल्लागार म्हणून ही कार्य करत असताना त्यांनी आपल्या नावाचा शिक्का तयार करून घेतला.

शंभू राजस्य भार्यायां जिजादेव्यां धरातले

बालेंदुरिववरद वर्धिष्णु मुद्रा भद्राविराजते

यावरून महाराणी जिजाबाई यांच्या राजकारभाराची प्रचिती येते.

करवीर राज्याच्या इतिहासामध्ये करारी, कष्टाळू आणि महत्त्वाकांक्षी अशी महाराणी जिजाबाईंची ओळख आहे. करवीर राज्याच्या यशस्वी राजकारभार करण्यामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. करवीर राज्य नामशेष होण्याच्या मार्गावर असताना धैर्याने तोंड देऊन १७७३ पर्यंत आपल्या करवीर राज्याला परकीय संकटातून वाचवले. करवीर दत्तक प्रश्न सोडवण्यापासून ते पेशव्यांशी राजकीय समीकरणे घडवून आणण्यापर्यंतच्या करवीरच्या राजकीय इतिहासामध्ये महाराणी जिजाबाई यांची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

छत्रपती शिवाजी दुसरे वयाच्या १९ व्या वर्षी राजकारभाराची प्रत्यक्ष सूत्रे हाती घेतली. तोपर्यंत महाराणी जिजाबाईंनीच करवीर राज्याचा डोलारा सांभाळला. करवीरच्या भावी छत्रपतींचा दत्तक विधानाच्या बाबतीत इतकी गुंतागुंत निर्माण झाली असताना महाराणी जिजाबाईंनी त्यातून तडफदारपणे मार्ग काढून आपल्या पसंतीचा मुलगा दत्तक घेतला. यातून त्यांच्या अंगी असलेला कणखरपणा व निर्भीडपणा दिसून येतो.

### २. महाराणी जिजाबाईंचे पूर्वायुष्य

महाराणी जिजाबाईंच्या जन्मतारखेची नेमकी नोंद मिळत नाही. मात्र वारणा तहाच्या वेळी त्या बारा वर्षाच्या होत्या असा उल्लेख सापडतो. करवीरकर छत्रपती संभाजी महाराजांशी महाराणी जिजाबाई यांचा

विवाह १७२६ मध्ये झाला. महाराणी जिजाबाई या तोरगल जहागिरीचे अधिपती नरसोजी शिंदे यांच्या कन्या होत्या. महाराणी जिजाबाई यांच्या आईचे नाव सीतांबा असे होते.

लहानपणापासून महाराणी जिजाबाई या महत्त्वकांक्षी, साहशी वृत्तीच्या व चौकस बुद्धीच्या होत्या. जिजाबाईंना वडिलांच्या सहवासामध्ये राजकारणाचे धडे मिळत गेले. जिजाबाईंना लहानपणापासूनच मर्दानी खेळाची आवड असल्याने घोड्यावर बसून रपेट करण्यात त्यांनी अगदी लहान वयातच प्राविण्य मिळवले होते.

साहस, पराक्रम व कार्यक्षमता या गोष्टी त्यांनी बालवयातच अंगीकारल्या होत्या. आपल्या घराण्याला साजेशी आणि प्रतिष्ठित राजकीय सत्तेची वैवाहिक संबंध जोडून राजकीय दृष्ट्या सुरक्षित राहण्याची नरसोजी शिंदेंची इच्छा त्यांच्या कार्यक्षमतेमुळे फळाला आली. कारण छत्रपती शाहू व छत्रपती संभाजी यांच्या अंतर्गत संघर्षात तोरगलकर शिंदेंनी कोल्हापूरकर छत्रपती संभाजींना मदत केली. परिणामतः छत्रपती संभाजीचा या घराण्यावर व त्यांच्यातील कर्तबगारीवर विश्वास बसला.

या वैवाहिक संबंधामुळे तोरगलकर शिंदेंना कोल्हापूर दरबारात मानाचे स्थान प्राप्त झाले. त्याबरोबरच महाराणी जिजाबाई या तडफदार असल्यामुळे संभाजी महाराजांवर तात्काळ छाप पडली. परिणामतः इतर राण्यांच्या तुलनेत जिजाबाईंचे एक वेगळे वलय व वर्चस्व निर्माण झाले. छत्रपती संभाजीराजे शिकारीला जाताना जिजाबाईंना सोबत नेत असत. यावरून त्यांच्या कर्तबगारीची जाणीव होते.

१७ फेब्रुवारी १७७३ रोजी महाराणी जिजाबाई पन्हाळ्यावरती निधन पावल्या. जिजाबाईंनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, लष्करी, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात आपले अमूल्य योगदान दिले आहे. त्यांनी आपल्या मृत्यूपर्यंत कोल्हापूर राज्य सांभाळले.

### ३. जिजाबाई– पेशवे संबंध

करवीर घराण्याची सून झाल्यानंतर जिजाबाईंनी आपल्या राजकीय क्षितिजांना विस्तारण्याचे धोरण अंगीकारले. वारणेच्या तहातील कलमांची पूर्तता करण्यासाठी आपल्या पती समवेत साताऱ्यात जाऊन गुप्त करार केला. या भेटीचे राजकीय मर्म जिजाबाईंनी समजून घेतले. आपला राजकीय हेतु साध्य करण्यासाठी पेशव्याबरोबर सलोख्याचे धोरण अंगीकारले पाहिजे याची जाणीव जिजाबाईंना झाली होती. कोल्हापूरच्या गादीचा दर्जा स्वतंत्र टिकवून ठेवायचा असेल तर राजकारणात प्रबळ असलेल्या पेशव्यांशी असणारी आपली भूमिका कायम सजग असली पाहिजे, अशी त्यांची धारणा होती. पेशव्यांशी सलोखा प्रस्थापित केल्याशिवाय आपले राज्य दृढ होणार नाही याची पुरेपूर जाणीव जिजाबाईंना झाली.

सातारा दरबारात पेशव्यांचे वाढते वर्चस्व हे जिजाबाईंसाठी कायम लक्षात राहणारी गोष्ट होती. कोल्हापूरच्या स्वतंत्र गादीचा दर्जा टिकवण्यासाठी महाराणी जिजाबाई कृतिशील आणि जागरूक होत्या. पेशवा– छत्रपती नाते हे सेवक मालकाचे नाही याची जाणीव जिजाबाईंना होती. महाराणी जिजाबाई नेहमी साताऱ्याच्या गादीशी पेशव्यांची असणारी वागणूक यावर बारीक लक्ष ठेवून असत. प्रसंगी पेशव्यावर वचक निर्माण करता येईल का याचीही शहानिशा महाराणी जिजाबाई करत असत. साताऱ्याचे छत्रपती शाहू

महाराजांच्या निधनानंतर महाराणी जिजाबाईंनी करवीरकर छत्रपती संभाजीराजे यांच्या मनात दुसरा पेशवा निर्माण करण्याची कल्पना मांडली.

### १) भाऊसाहेबांस पेशवे पदाची वस्त्रे प्रधान करण्याची खेळी

करवीर राज्याची राजकीय प्रतिमा उंचावणे आणि त्याबरोबरच पेशव्यांच्या वर्चस्वाला शह देऊन फूट पाडणे, त्याशिवाय कोल्हापूर- सातारा संघर्षात करवीर राज्याचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणे यासाठी छत्रपती संभाजी महाराजांच्या मार्फत भाऊसाहेबास पेशवे पदाची वस्त्रे देऊ केली. मात्र नानासाहेबांनी भाऊसाहेबास पेशवे पदाची वस्त्रे स्वीकारण्यापासून परावृत्त केले. अतिशय महत्त्वाकांक्षी असणाऱ्या महाराणी जिजाबाईंनी पेशव्यांच्या राजकीय अस्तित्वालाच धक्का देण्याचा प्रयत्न केला होता. पेशव्यांच्या मनात कोल्हापूर विषयी वचक बसविण्याचा अप्रत्यक्ष प्रयत्न महाराणी जिजाबाई करत होत्या.

महाराणी जिजाबाई यांनी पेशव्यांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित केले असले तरीही जिजाबाईंची राजकारणावरील पकड उत्तरोत्तर वाढतच जाताना दिसून येते. पेशव्यांचे वर्तन प्रामुख्याने साताऱ्याच्या राजकारणाच्या उत्कर्षाशी निगडित होते. पेशव्याने साताऱ्याचे भले करण्यात हयात घालवली. त्यामुळे पेशव्यांचा करवीर राज्याच्या धोरणावर प्रतिकूल परिणाम होईल की काय अशी महाराणी जिजाबाईंना नेहमी शंका होती.

### २) छत्रपती संभाजी महाराजांचे निधन आणि वारसा प्रश्न

आपल्या राजकीय आयुष्याच्या उत्तरार्धात छत्रपती संभाजी महाराज राजकीय निर्णयापासून दूर जाताना दिसून येतात. इ. स. १७६०मध्ये छत्रपती संभाजी महाराज (करवीर) यांचे निधन झाले. परिणामी करवीर राज्याचा वारसा प्रश्न निर्माण झाला. कारण संभाजी महाराजांना मुलगा नव्हता. परिणामी पेशवे करवीर आणि सातारा दोन्ही गाद्यांचे एकत्रिकरण करण्याचा विचार करत होते. जिजाबाईंनी पेशव्यांची करवीर राज्याची लालसा सफल होऊ दिली नाही. पेशव्यांनी करवीर गादीचा वारस म्हणून इचलकरंजीच्या आपल्या पसंतीचा नियुक्त करण्याचा घाट घातला होता.

### ३) महाराणी जिजाबाईंचा मुत्सद्दीपणा

पेशव्यांच्या डावपेचामुळे करवीर राज्यापुढे मोठा पेच प्रसंग निर्माण झाला. महाराणी जिजाबाईंनी न डगमगता दत्तक प्रश्नांची सोडवणूक केली. पेशव्यांच्या विसंगत धोरणाविषयी खंत व्यक्त करण्याबरोबरच महाराणी जिजाबाईंनी करवीर राज्याच्या जप्ती बद्दलच्या पेशव्यांच्या धोरणाचा खरपूस समाचार घेतला.

राज्यावर जप्तीसाठी आलेल्या पेशव्यांच्या सैनिकास माघारी जाण्यासाठी प्रयत्न चालवण्याबरोबरच वाटाघाटीचा देखावा करत अचानक आपली फौज पेशव्यावर पाठवून पेशव्यांच्या फौजेचा सपशेल पराभव केला. परिणामतः या नामुष्कीतून पेशव्यांना महाराणी जिजाबाईंच्या मुत्सद्देगिरीची आणि पराक्रमाची कल्पना आली. शिवाय पेशव्यांना शह देण्यासाठी पेशव्यांचे विरोधक निजाम यांच्याशी मैत्रीचे संधान साधले.

इ.स. १७६१ च्या पानिपत युद्धामध्ये जर मराठ्यांना विजय प्राप्त झाला असता किंवा नानासाहेबांचा मृत्यू झाला नसता तर करवीर राज्याचे दत्तक प्रकरण खूप जड गेले असते. मात्र पानिपत प्रसंगातून पेशवे लवकर सावरले नाहीत. याचाच फायदा चाणाक्ष महाराणी जिजाबाईंनी उचलला. करवीर राज्य व तेथील छत्रपतींचे सार्वभौम अस्तित्व कायम ठेवण्यासाठी करवीर गादीवर वारस नेमला.

कोल्हापूरच्या गादीवर खानवटकर- भोसले या घराण्यातील दत्तक पुत्राला अतिशय योजनाबद्ध पद्धतीने गादीवर बसवले. आपल्या मंत्रिमंडळाशी वारंवार चर्चा करत असताना परकियांच्या व पेशव्यांच्या तसेच त्यांच्या समर्थकांच्या हालचालीवर महाराणी जिजाबाई लक्ष ठेवून होत्या.

**४) दत्तक विधानास पेशव्यांची मान्यता**

कोल्हापूरच्या भावी छत्रपतीच्या दत्तक विधानासाठी जिजाबाईंचा प्रामाणिक हेतू करवीर राज्याचे स्वातंत्र्य व सार्वभौमत्व राखणे हाच होता. जीवाची पर्वा न करता पुणे येथे जाऊन माधवराव पेशव्यांशी चर्चा करून महाराणी जिजाबाईंनी करवीर राज्याचा दत्तक प्रश्न मिटवला.

दत्तक विधान हे महाराणी जिजाबाईंच्या मर्जीनुसारच होणार असून करवीर राज्याचे स्वतंत्र अस्तित्व ठेवण्यासाठी पेशव्यांची पूर्ण संमती आहे. अशा आशयाचा तह महाराणी जिजाबाईंनी पेशव्याकडून करून घेतला. परिणामी जिजाबाईंनी कोल्हापूरच्या गादीसाठी निवडलेला वारसदार आणि जिजाबाईंचे राजकीय डावपेचाचे धोरण पेशवे आणि करवीर दोघांच्याही फायद्याचे ठरले. अन्यथा दोघांनाही हे प्रकरण घातक ठरले असते.

**५) महाराणी जिजाबाईंचे धुरीणत्व**

महाराणी जिजाबाईंनी तडफदारपणे मार्ग काढून पेशव्यांच्या आमिषाला बळी न पडता आपल्या इच्छेप्रमाणे कोल्हापूरचे दत्तक विधान घडवून आणले. जिजाबाईंच्या मुसद्दीपणामुळेच कोल्हापूरचे राज्य टिकून राहिले. त्याचबरोबर करवीर राज्याचे राजकीय अस्तित्व पेशव्याने मान्य केले. परिणामी करवीर राज्याचा विकास स्वतंत्रपणे घडून आला. छत्रपती शाहू महाराजांच्या निधनानंतर सातारा गादीची पेशव्यांनी केलेली अनास्था तशी करवीर गादीची होऊ नये. हा उदात्त हेतू महाराणी जिजाबाईंनी आपल्या राजकीय समीकरणाने अस्तित्वात आणला.

**६) पेशव्यांच्या कारभाऱ्यास ठेवून घेण्यास नकार**

पेशव्याकडून सहाय्यक म्हणून करवीर राज्यात कायमस्वरूपी कारभारी नेमावा असा प्रस्ताव माधवराव पेशव्यांनी महाराणी जिजाबाई समोर मांडला होता. मात्र महाराणी जिजाबाईंनी तो प्रस्ताव नाकारला. अव्यवस्था परवडली पण अधिकाऱ्यांचे प्राबल्य नको असा विचार करून पेशव्यांच्या करवीर राज्यातील कारभारी पदाच्या निर्मितीची मागणी कायमस्वरूपी धुडकावून लावली.

**७) कर्नाटकातील ठाण्यासंदर्भात पेशव्यांशी करार**

महाराणी जिजाबाईंनी आपली राजकीय सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या कालखंडात आणि त्यांच्या मृत्यूनंतर ही कर्नाटकातील आपल्या चिकोडी, मनोली या

ठाण्यावर आपली पकड मजबूत राहावी, यासाठी शेषो नारायण यांच्यामार्फत पेशव्यांशी तीन करार केले. हे तीन करार अनुक्रमे १७६१, १७६३ आणि १७६४ मध्ये केले.

याचा परिणाम म्हणजे पेशव्यांचे सरहद्दीवरील इतर जहागीरदार व सरदार महाराणी जिजाबाई विरुद्ध एकत्र आले. स.मा. गर्गे यांनी या संघर्षाचे विवेचन खालील शब्दात केले आहे, ''एका बाजूला पेशवा जिजाबाईंशी नेतृत्वाचे नाते निर्माण करतो, पण दुसऱ्या बाजूला कोल्हापूरच्या सीमेलगत प्रदेश सरंजाम पटवर्धनांना देऊन पेशवा कोल्हापूरच्या नेतृत्वाच्या नात्याच्या विरोधी वागतो.''

मात्र महाराणी जिजाबाईंनी शेवटपर्यंत या प्रकरणातील आपली चिकाटी सोडली नाही. छत्रपती शिवाजी दुसरा यांनी या प्रांतात वारंवार स्वाऱ्या करून हा प्रदेश करवीर राज्यात जोडण्याचा सातत्याने प्रयत्न केला. छत्रपती संभाजी महाराजांच्या निधनानंतर जिजाबाईंनी अनेक संकटावर मात करून कोल्हापूर राज्याचा कारभार सक्षमपणे सांभाळला.

- **महाराणी जिजाबाईंचे नेतृत्व**

**१) राजप्रतिनिधी – महाराणी जिजाबाई**

महाराणी जिजाबाईंनी छत्रपतींच्या राज्याभिषेकानंतर छत्रपतींच्या नावे कारभार सुरू केला. छत्रपती हे अल्पवयीन असल्यामुळे करवीर राज्याची सूत्रे आपल्या हाती घेऊन 'राजप्रतिनिधी' म्हणून त्या कारभार पाहू लागल्या. परिणामतः करवीर राज्यातील सर्व सूत्रे महाराणी जिजाबाईंकडे आली. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी करवीर राज्याच्या समृद्धीवरच लक्ष केंद्रित केले.

**२) करवीर राज्यांमधील सरदारांकडून निष्ठापत्रे**

कोल्हापूरच्या गादीवर नवीन छत्रपतींची नेमणूक केल्यानंतर नव्या राजवटीच्या शुभारंभाचे निमित्त साधून महाराणी जिजाबाईंनी आपल्या राज्यांमधील अष्टप्रधान व सरदारांच्याकडून निष्ठा पत्रे लिहून घेतली. ही निष्ठा पत्रे लिहून घेण्यामागचा जिजाबाईंचा उद्देश म्हणजे करवीर राज्यातील सरदार आपली निष्ठा करवीर राजाप्रती कायम ठेवावी. यातून जिजाबाईंच्या राजकीय चातुर्याची कल्पना येते.

**३) महाराणी जिजाबाईचे सामाजिक उपक्रम**

- **कुणबीणींचा प्रशासनामध्ये समावेश**

महाराणी जिजाबाईंनी करवीर राज्यात जो अभिनव प्रयोग केला, तो प्रयोग म्हणजे कुणबीणींचा प्रशासनामध्ये समावेश होय. यशवंतराव शिंदे यांच्या मदतीने रंगू, गंगु, भागू, नागू आणि लिंबू अशा पाच सुज्ञ कुणबीणींना शिरोळे, आळते, वडगाव, पन्हाळा व इतर ठिकाणी नेमणूक केली.

यावरून महाराणी जिजाबाईंना आपल्या प्रशासनामधील अंतर्गत कारभारावर सूक्ष्म लक्ष केंद्रित करण्याबरोबरच स्त्रिया मधील विश्वासाला प्रोत्साहन दिले. परिणामी हा अभिनव प्रयोग म्हणजे करवीर राज्याच्या परिवर्तनाची नांदी ठरला.

- **करवीर राज्यातील अमानवी प्रथांवर बंदी**

**१. दारू विक्रीवर कठोर नियंत्रण**

करवीर राज्यातील दारू विक्रीवर कठोर नियंत्रण ठेवणे आवश्यक होते. कारण मद्यपानामुळे सार्वजनिक सुरक्षितता आणि आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत होते. जिजाबाईंनी या समस्येवर लक्ष केंद्रित करून चोरून दारू विकणाऱ्यांना आणि मद्यपींना कठोर शिक्षा देण्याचे निर्णय घेतले. यासाठी विशेष समितीची स्थापना करण्यात आली. या समितीने अवैध प्रथांवर कडक कारवाई केली. त्यांनी दारूच्या विक्रीची तपासणी करण्यासाठी आणि मद्यपान करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक प्रभावी यंत्रणा तयार केली.

**२. वेठबिगारी प्रथाविरुद्ध ठोस उपाय**

वेठबिगारी ही एक वाईट प्रथा होती. ज्यामुळे गरीब आणि दुर्बल लोकांचे शोषण होत असे. जिजाबाईंनी या प्रथेला कठोर आळा घालण्यासाठी कडक कायदे लागू केले. वेठबिगारीच्या अंतर्गत असलेल्या लोकांच्या संरक्षणासाठी विशेष तक्रार निवारण यंत्रणा तयार करण्यात आली. या यंत्रणेला तक्रारींचा निपटारा करण्याची आणि बिगारीला कडक शिस्त लावण्याचे अधिकार दिले. यामुळे वेठबिगारीच्या प्रथेच्या निर्मुलनास मदत झाली.

**३. सार्वजनिक जीवनातील अमानवी कृत्यांवर निर्बंध**

सार्वजनिक जीवनात अमानवी कृत्ये समाजाच्या नैतिकतेस हानी पोहोचवतात. जिजाबाईंनी अशा कृत्यांवर कठोर निर्बंध घालण्याचा निर्णय घेतला. सार्वजनिक जागांवर वर्तनाच्या नियमांची अंमलबजावणी करून त्यांनी असभ्य वर्तन करणाऱ्यांवर  कठोर कारवाई केली.

**४. सुधारणा प्रक्रियेत सहकाऱ्यांची भूमिका**

सुधारणा प्रक्रियेत सहकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. जिजाबाईंनी आपल्या सहकाऱ्यांना सुधारणा प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी होण्याचे निर्देश दिले. स्थानिक अधिकाऱ्यांनी कायद्यांच्या अंमलबजावणीसाठी प्रोत्साहन दिले आणि समाजाच्या विविध स्तरांवर काम केले.

**५. समाज कल्याणकारी कार्य**

महाराणी जिजाबाईंनी आपल्या राज्यातील मुलींच्या लग्नासाठी मदत केली. धर्मक्षेत्रे व मंदिर उभारणीसाठी मदत केली. आपल्या सरदारांनी आपल्यावर व्यक्त केलेल्या निष्ठेला जागून त्यांनी सरदारांना बक्षिसांचे वितरण केले. त्यांना इनाम, सनदा दिल्या. पुजाऱ्यांना धर्मकार्यास मदत केली. राज्यामध्ये तळी, तलाव खोदण्यासाठी आर्थिक मदत दिली. यातून जिजाबाईंच्या लोककल्याणकारी कामाची जाणीव आपल्याला होते.

महाराणी जिजाबाई या फक्त सनदा, वतने देऊन गप्प बसल्या नाहीत. तर लोककल्याण हा त्यांच्या राजकारभाराचा केंद्रबिंदू होता. राज्यकारभाराच्या माध्यमातून जिजाबाईंनी सामाजिक, आर्थिक, धार्मिक क्षेत्रातही आपले कर्तृत्व सिद्ध केले.

**४) न्यायव्यवस्था, लष्कर व्यवस्था व चलन व्यवस्थेमध्ये महत्त्वपूर्ण योगदान**

महाराणी जिजाबाई यांनी न्यायदानामध्ये विशेष लक्ष घातले. अनेक पंचांच्या साह्याने निरपेक्षपणे त्या न्यायनिवाडा करत असत. लष्करामध्ये उपद्रव माजवणाऱ्या सरदारावर नियंत्रण ठेवण्यापासून त्यांची हकालपट्टी करण्यापर्यंतची महत्वपूर्ण कामे महाराणी जिजाबाईंनी केली.

- **महाराणी जिजाबाई आणि परकीय सत्तांशी संबंध**

करवीर राज्याची स्थापना झाल्यापासून कोल्हापूरचे संबंध परकीय सत्तेशी येत होते. वेळोवेळी मराठी सत्तेच्या दुर्बलतेचा फायदा ब्रिटिशांनी घेतला. जिजाबाईंच्या राजकीय नेतृत्वाने डच, इंग्रज व पोर्तुगीज या सत्तांशी वेळोवेळी संघर्ष करून करवीर राज्याने अस्तित्व अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला. करवीर राज्यातील अनेक किल्ले व ठाणे यांच्यावर होणाऱ्या परकीयांच्या हल्ल्यांना प्रतिउत्तर देण्याबरोबरच परकीय सत्तेशी सर्व पत्र व्यवहार करून आपल्या राजकीय शक्तीचे प्रदर्शन महाराणी जिजाबाई यांनी केले.

**समारोप**

महाराणी जिजाबाई या स्वभावाने कष्टाळू, जिद्दी आणि महत्त्वकांक्षी असल्यामुळे महाराणी ताराबाई नंतर करवीरचा यशस्वी कारभार करण्यात त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. इ.स. १७४० ते १७६० या वीस वर्षाच्या प्रत्येक कालखंडामध्ये संभाजी महाराजांच्या सल्लागार म्हणून करवीर राज्याची धुरा त्यांनी सांभाळली. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांना बालवयातच दत्तक घेतल्यामुळे जिजाबाईंनीच करवीर राज्याच्या प्रमुख पदाची धुरा अतिशय यशस्वीपणे सांभाळली.

महाराणी जिजाबाई राज्यकारभाराच्या बाबतीत अतिशय कठोर वागत असत. कर्नाटकातील सरदारांना त्यांनी आपल्या राज्यपद्धतीप्रमाणे वागण्यास भाग पाडले. इचलकरंजी, बावडा, कागल, वडगाव येथील सरदारांनी जिजाबाईंच्या कारभारास विरोध केला असता जिजाबाईंनी त्यांची गय केली नाही. कर्नाटकातील मातब्बर सरदार मुरारराव घोरपडे यांना ''हिंदूराव'' ही पदवी देऊन आपल्या राजकारभाराप्रमाणे वर्तन करण्यास भाग पाडले.

इ.स. १७६२ ते १७७९ या कालावधीत महाराणी जिजाबाई यांनी यशस्वीरित्या कोल्हापूर राज्याची पायाभरणी केली. त्या व्यवहार कुशल, कर्तबगार, धाडसी आणि धुर्त असल्यामुळे करवीर राज्यात स्वतंत्र अस्तित्व प्राप्त झाले.

पेशवे दप्तराचे अभ्यासक वासुदेव शास्त्री खरे यांनी जिजाबाईंच्या कार्यकर्तुत्वाचे मोजमाप पुढील शब्दात केले आहे.– ''हल्ली करवीरचे राज्य आहे. त्याची स्थापना करण्याचे सर्व श्रेय जिजाबाईंचे आहे.

त्यांनीच म्हणून हे कार्य सिद्धीस नेले. इतर कोणत्याही पराक्रमाने अथवा चातुर्याने हे राज्य स्थापनेचे काम झाले नसते. त्यांची हिंमत, मसलतीचे धोरण, मनाची दृढता व कुलाभिमान हे गुण वर्णनीय होते''

कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या महाराणी जिजाबाई यांनी खऱ्या अर्थाने करवीर राज्याला अभय दिले. मराठा साम्राज्य सातारा व कोल्हापूर अशा दोन राज्यात विभागल्यानंतर आणि कोल्हापूरचे रक्तशून्य सत्तांतर घडून आल्यानंतर जिजाबाईंनी बुद्धी चातुर्याने ''राणीवास चौथा वाडा'' म्हणून स्वतःचे अस्तित्व निर्माण केले.

अधिकाऱ्यांवर वचक ठेवण्यापासून समाजातील सर्व घटकांना न्याय देण्यापर्यंत, धर्मसत्ता राजसत्तेपासून वेगळी व श्रेष्ठ आहे हे दाखवण्यापासून ते प्रशासनात स्त्रियांचा सहभाग वाढवण्यापर्यंत महाराणी जिजाबाईंनी आपल्या आवडत्या कार्याने १७ फेब्रुवारी १७७३ पर्यंत करवीर राज्याची सेवा केली.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ०२**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. महाराणी जिजाबाई या तोरगल जहागिरीचे अधिपती .............. यांच्या कन्या होत्या.

अ. नरसोजी शिंदे ब. महादजी शिंदे क. दत्ताजी शिंदे ड. यापैकी नाही

२. छत्रपतींच्या राज्याभिषेकानंतर छत्रपतींच्या नावे 'राजप्रतिनिधी' म्हणून .............. यांनी कारभार पहिला.

अ. ताराबाई ब. सोयराबाई क. पुतळाबाई ड. जिजाबाई

३. १७ फेब्रुवारी १७७३ रोजी महाराणी जिजाबाई .............. निधन पावल्या.

अ. पन्हाळा ब. सातारा क. पुणे ड. सांगली

४. महाराणी जिजाबाई यांच्या आईचे नाव..............असे होते.

अ. सीतांबा ब. महाकावती क. जगदंबा ड. यापैकी नाही.

५. मराठ्यांच्या इतिहासातील करवीर घराणेतील दुसरी कर्तबगार स्त्री म्हणून ..............यांच्याकडे पाहिले जाते.

अ. ताराबाई ब. सोयराबाई क. पुतळाबाई ड. जिजाबाई

## १.१.३ छत्रपती शिवाजी दुसरे

### १. प्रास्ताविक–

छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज यांनी औरंगाबाद विरुद्ध लढा देऊन स्वराज्य संरक्षण केले. मात्र २ मार्च १७०० रोजी राजाराम महाराजांचे सिंहगडावर निधन झाले. राजाराम महाराजांच्या पत्नी महाराणी ताराबाई यांनी आपला मुलगा शिवाजी यांची मुंज करून पन्हाळा येथे त्याचा राज्याभिषेक केला. पुढे इ. स. १७१० मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना झाली.

दक्षिणेतील संस्थानांमध्ये कोल्हापूर सर्वात मोठे संस्थान होते. शिवाय नद्यांच्या खोऱ्यामुळे कोल्हापूर राज्याचा हा भाग सुपीक होता. मौर्य, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट, शिलाहार, बहामनी, यादव, आदिलशाहीनंतर मराठा स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांनी १६५९ मध्ये पन्हाळा जिंकून घेतला होता. १७१० मध्ये ताराबाईंनी पन्हाळ्यावर दुसरे मराठी राज्य स्थापन केले.

राजाराम महाराजांच्या पत्नी राजसबाई यांनी कोल्हापूरमध्ये ताराबाई आणि पहिल्या शिवाजींचा विरोध करत आपला मुलगा संभाजी यांना १७१४ मध्ये गादीवर बसवले. ताराबाईंच्या कारकिर्दीच्या कमकुवत होत जाणाऱ्या संधीचा फायदा घेत शिवाजी दुसरे यांना कैद केले. संभाजीच्या कैदेतच ताराबाईंचा मुलगा शिवाजी यांचा मृत्यू झाला. संभाजी महाराज दुसरे यांनी १७१४ ते १७६० पर्यंत जवळजवळ ४६ वर्ष राज्य केले.

- **दत्तक विधान व राज्याभिषेक**

छत्रपती संभाजी महाराज दुसरे निपुत्रिक मरण पावल्यामुळे करवीर राज्याचा प्रश्न निर्माण झाला. करवीर दरबारचा हा दत्तक प्रश्न शहाजी भोसले खानवटकर यांचा मुलगा मानकोजी यांच्या दत्तक विधानाने पूर्ण झाला. दिनांक २२ सप्टेंबर १७६२ रोजी पन्हाळा येथे मानकोजी यांचे ''शिवछत्रपती'' असे नामकरण करून २७ सप्टेंबर १७६२ रोजी विजयादशमीच्या दिवशी शिवछत्रपती यांचा राज्याभिषेक करण्यात आला.

छत्रपती शिवाजी महाराज हे अल्पवयीन असल्यामुळे महाराणी जिजाबाई यांनी करवीर राज्याचे राजकीय निर्णय घेण्यात आपली महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. छत्रपती शिवाजी दुसरे वयाच्या १९व्या वर्षापर्यंत त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे हाती घेतली नव्हती. कारकिर्दीच्या पहिल्या टप्प्यातच अतिशय संघर्षमय जीवन छत्रपतींच्या वाट्याला आले. ह्या कालखंडामध्ये पेशवे, पटवर्धन, सावंतवाडीचे भोसले, निपाणीचे देसाई, आणि इचलकरंजीचे घोरपडे यांच्याशी वेळोवेळी राजकीय अस्तित्वासाठी निकराच्या लढाया द्याव्या लागल्या. अशा पद्धतीने त्यांचे सुरुवातीच्या कालखंडातील राजकीय जीवन हे खूपच अस्थिर स्वरूपाचे राहिले.

छत्रपती शिवाजीराजे दुसरे प्रत्यक्ष राजकारभार हातात घेईपर्यंत महाराणी जिजाबाईंनी सर्वच क्षेत्रात करवीर राज्याबरोबर छत्रपतींचेही संरक्षण केले. आपल्या ३५ वर्षाच्या राजकीय कारकीर्दीत छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, पश्चिम किनारपट्टी व इतर प्रदेशावर आपला दरारा निर्माण करण्याबरोबरच टिपू, हैदरअली आणि पेशवे यांच्याशी उत्तम राजकीय संबंध प्रस्थापित केले.

**छत्रपती शिवाजीराजे दुसरे यांची कामगिरी**

छत्रपती शिवाजी राजे दुसरे यांनी आपल्या कालखंडात अनेक महत्त्वपूर्ण कामे करून करवीर राज्याची राजकीय विस्तार करण्याचे काम केले. त्यांच्या अनेक महत्त्वपूर्ण कामगिरी पैकी काही महत्त्वाची कामगिरी आपण खालील प्रमाणे पाहणार आहोत.

**१. राजधानीचे स्थलांतर–**

राज्यकारभाराची प्रत्यक्ष सूत्रे हाती घेतल्यानंतर छत्रपती शिवाजी दुसरे यांनी आपली राजधानी पन्हाळ्यावरून कोल्हापुरात आणली. राजधानीचे स्थलांतर करण्यामागे महाराजांची खूपच चोखंदळ आणि महत्वपूर्ण राजकीय भूमिका होती.

पेशवे आणि इतर परकीयांच्या करवीर दरबारच्या सीमेवरील कटकटींना आळा घालणे. त्याचबरोबर राज्यकारभाराच्या सोयीसाठी भौगोलिकदृष्ट्या योग्य ठिकाण असल्यामुळे महाराजांनी राजधानीचे ठिकाण पन्हाळ्यावरून कोल्हापुरात स्थलांतरित केले. उत्तरोत्तर पन्हाळा हे ठिकाण अडचणीचे ठरत असल्यामुळे आणि कोल्हापूर हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे तसेच राज्यकारभारासाठी योग्य ठिकाण असल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी या सर्व बाबींचा विचार करून पन्हाळ्यावरून कोल्हापूर येथे राजधानी स्थलांतरित केली.

**२. किल्ल्याची निर्मिती**

राजधानीचे कोल्हापूर येथे स्थलांतर केल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी पहिली महत्त्वाची कामगिरी केली ती म्हणजे भुईकोट किल्ल्याची निर्मिती होय. आपल्या किल्ल्याच्या बांधणी आणि संरक्षणासाठी कुठलीही कसर छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी सोडली नाही. किल्ल्याभोवती खंदक खोदण्यापासून ते किल्ल्याच्या सर्व बाजूंनी वेशी बांधून घेतल्या.

कोल्हापुरातील लोकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटला पाहिजे यासाठी पदमाळे तळे व रंकाळा तलाव म्हणजे कोल्हापूरचे वैभव होय, बांधून घेतले.

**३. वडगावचे युद्ध**

छत्रपती शिवाजी दुसरे हे अठरा वर्षाचे असताना पटवर्धनांच्या बाजूस गेलेल्या भगवानराव प्रतिनिधींनी कोन्हेराव व कानडे यांच्याबरोबर पंधरा हजार फौजेनीशी करवीरवर चाल केली. करवीर छत्रपती दुसरे शिवाजी आणि येसाजी शिंदे यांनी वडगाव येथे झालेल्या युद्धात सहभाग घेतला. या लढाईत करवीरचा पराभव झाला. मात्र दुसरे शिवाजी यामुळे डगमगले नाहीत.

आपल्या राज्याची राजकीय व लष्करी व्यवस्था उत्तरोत्तर सक्षम करण्यात छत्रपतींनी कसलीच कसर सोडली नाही. उलट पेशव्याने महादजी शिंदे सारख्या मुरब्बी सेनापतीच्या नेतृत्वाखाली २५ हजाराची फौज पाठवली होती. पेशव्यांच्या या बलाढ्य सेनेशी निकराची झुंज दिली. करवीरच्या धरतीवर महादजी शिंदे तितकेसे प्रभावी ठरले नाहीत. कारण छत्रपती शिवाजी दुसरे यांच्या करवीर राज्याने महादजींचा जबरदस्त प्रतिकार केला होता. अशा युद्धाच्या परिस्थितीमध्ये छत्रपती शिवाजी दुसरे यांनी महादजी शिंदे यांनी घेतलेली ठाणी परत मिळवण्यासाठी वारंवार हल्ले केले. यावरून करवीर बरोबरच छत्रपती शिवाजी दुसरे उत्तरोत्तर प्रभावी होत चालले होते हे दिसून येते.

इ.स.१७७६ च्या वडगावच्या युद्धात छत्रपतींना युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. परिणामतः छत्रपतींनी स्वावलंबन व स्वानुभव यावर भर दिला. परिणामी करवीरवर येणाऱ्या भावी संकटांना त्यांनी

समर्थपणे तोंड दिले. छत्रपती शिवाजी दुसरे यांच्या अखेरपर्यंत करवीर राज्यास अनेक आक्रमणांना तोंड द्यावे लागले. त्यामध्ये प्रामुख्याने पेशव्यांनी करवीरकरांच्या विरुद्ध अनेक सरदार पाठवले. त्यामुळे पेशवे व कोल्हापूर राज्य यांच्यातील संबंध अधिकच बिघडले. याबरोबरच पुणे दरबारातील गोंधळामुळे पेशव्यांचे सरदार करवीर राज्याभोवती कटकटी वाढवत होते. या कटकटीतून मार्ग काढत छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी करवीर राज्य अबाधित ठेवण्याचा प्रयत्न केला.

**४. पेशव्यांच्या सरदारांशी वैमनस्य**

करवीर राज्याप्रती असलेली निष्ठा इतरांच्या तुलनेत इचलकरंजीकरांकडे फार कमी प्रमाणात दिसून येत असे. करवीर छत्रपतींशी सर्व पेशवे सेवकाच्या नात्यानेच पत्रव्यवहार करीत होते. मात्र पटवर्धन सरदार 'स्वामी', 'धनी' असे न लिहिता पत्र व्यवहारांमध्ये फक्त महाराज असाच उल्लेख करत. यात नम्रता व आदर दिसून येत नसे. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी इचलकरंजी व इतर जहागीरदारांना वेगवेगळ्या प्रसंगांमध्ये आपले अस्तित्व दाखवून आपल्या वर्चस्वाखाली ठेवले.

**५. महादजी शिंदे यांच्याविरुद्ध संघर्ष**

जानेवारी १७७८ मध्ये करवीर राज्याचा बंदोबस्त करण्यासाठी नाना फडणवीस यांनी महादजी शिंदे यांची नेमणूक केली. २५००० फौजेच्या मदतीने महादजी शिंदेने करवीर राज्यास वेढा दिला. फेब्रुवारी १७७८ ते एप्रिल १७७९ या कालावधीत महादजी शिंदे यांच्या फौजेचा करवीरकरांनी समर्थपणे मुकाबला केला. शेवटी करवीरकर मागे हटत नाहीत हे पाहून महादजी शिंदेनी मार्ग बंद करण्याबरोबरच, शहराची पूर्ण रसद थांबवली. परिणामी छत्रपती आणि महादजी शिंदे यांच्यामध्ये तह झाला.

१५ लाख रुपये पेशव्यांना देण्याबरोबरच चिकोडी व मनोली हे दोन तालुके पेशव्यांना देण्याचे करवीरकर छत्रपतींनी मान्य केले. मात्र महादजी शिंदे सारख्या मुरब्बी सेनापतीच्या २५ हजार फौजे बरोबर फेब्रुवारी १७७८ ते एप्रिल १७७९ पर्यंत जे निकराचे युद्ध झाले, छत्रपतींची हिम्मत केवढी होती हेच दिसून येते. याही पुढे जाऊन छत्रपती शिवाजी दुसरे यांनी हा तह झुगारून दिला. तहाच्या अटीही पाळल्या नाहीत. हिंदुस्थानातील राजकारणात महादजी शिंदे यांनी मोठे पराक्रम केले असले तरी करवीरकरंच्या सोबत त्यांचे मोठेपण विशेष जाणवल्याचे दिसत नाही.

**६. कागलवर व इतर प्रदेशावर स्वारी**

आपली ठाणी परत मिळवणे ही छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांच्या मनात इच्छा होती. करवीरच्या ज्या ज्या प्रदेशावर महादजी शिंदेनी वर्चस्व प्रस्थापित केले होते. ते सर्व प्रदेश व ठाणे परत मिळवण्यासाठी छत्रपती शिवाजी दुसरे यांनी वेळोवेळी संघर्ष केला. कागल, यळगुड, चिकोडी, मनोली या ठिकाणी वारंवार हल्ले करून हा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट करून घेण्याचा छत्रपती शिवाजी दुसरे यांनी कसोशीने प्रयत्न केला.

### ७. हैदरअलीशी तह (१९ जून १७७८)

महादजी शिंदे सारखे आक्रमण पुन्हा होऊ नये याची काळजी छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी घेतली. कारण या आक्रमणाची जबर किंमत करवीर राज्याला मोजावी लागली होती. स्वकीयांनी केलेल्या या विरोधामुळे कोल्हापूर राज्याला इतरांची मदत घ्यावीच लागणार, याची जाणीव छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांना होती. परिणामी कोल्हापूर राज्याने १९ जून १७७८ रोजी हैदरअलीशी तह केला. या तहान्वये हैदरअलीने कोल्हापूरला लष्करी मदत पुरवण्याची हमी दिली व त्या बदल्यात कोल्हापूरने हैदर अलीच्या अमलांखालील प्रदेशातून चौथाई गोळा करू नये. ही अट मान्य केली. आपल्या राज्याचे सार्वभौमत्व आबाधीत ठेवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज दुसरे नेहमीच संघर्षशील जीवन जगताना दिसून येतात. मात्र पेशवे आणि हैदर अली यांच्यात तह फेब्रुवारी १७८० मध्ये झाला. त्यामुळे करवीर राज्याचा दक्षिणेकडील एक मित्र कमी झाला.

### ८. पुणे दरबाराशी करार (२२ जानेवारी १७८१ )

छत्रपतींनी पटवर्धन सरदारांचा उपद्रव थांबवण्यासाठी पुणे दरबाराशी २२ जानेवारी १७८१ मध्ये एक करार केला. ज्यात चाळीस कलमे होती. या तहाने चिकोडी व मनोळी तालुके करवीर राज्यात पुन्हा देण्याचे कबूल करण्यात आले. यातून एक गोष्ट पुणे दरबाराने जाणून घेतली, ती म्हणजे करवीरकर छत्रपतींना किरकोळ समजून चालणार नाही. याबरोबरच हैदरअलीनेही छत्रपतींना बारभाईशी सख्य जोडण्याचे आव्हान केले. मात्र दक्षिण भारतामध्ये पेशव्याने हैदरअली बरोबरच करवीर राज्य या प्रमुख सत्ता असून छत्रपती शिवाजी दुसरा हे प्रमुख राज्यकर्ते आहेत हे मान्य करावे लागले. करवीर राज्याच्या विरोधी लढताना सर्व तयारीनिशी उतरावे लागेल याची जाणीव पेशव्यांना झाली.

### ९. सहकाऱ्यांचा सन्मान

छत्रपती शिवाजी दुसरे यांनी आपल्या सहकाऱ्यांचा वेळोवेळी सन्मान केला. एकनिष्ठ सेवा करणाऱ्या सहकाऱ्यांना आकर्षक पदे देण्यापासून ते त्यांच्या सुखदुःखात नेहमीच सहभागी झाले. परिणामतः या सहकाऱ्यांनीही छत्रपतींचा विश्वास खरा करून दाखवला. आपल्या सहकार्याने लष्करात केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल 'सरखवास', 'हिम्मतबहादूर', 'विश्वासराव', 'राजाज्ञा' अशा पदव्याने सन्मानित केले. या सरदारांच्या पाठिंब्यामुळे करवीर राज्याचे उत्तम प्रकारे संरक्षण झाले. करवीर दरबारच्या सहकाऱ्यांमुळेच कोल्हापूर राज्याचा दरारा आणि वचक निर्माण झाला. यामध्ये छत्रपती शिवाजी दुसरे यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

### १०. बावड्याच्या गडकऱ्यांचे बंड

इ.स. १७८४ मध्ये बावड्याच्या गडकऱ्यांनी बंड केले. ही घटना कळताच गुजाजी गायकवाड यांना सोबत घेऊन तसेच ३००० फौजेसह बावड्यावर चाल केली. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी बावड्यास शह देण्याबरोबरच मलकापूरच्या ठाण्यावर चढाई केली. इ.स.१७९१ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज दुसरे

यांनी कापशीकर सेनापती यांच्यावर स्वारी केली. वाडीकरांनी ग्वाल्हेरच्या शिंदेंशी सलगी केल्याची बातमी समजताच सावंतवाडीकरांचे किल्ले व मुलुख मिळवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी नाना फडणविस व पुणे दरबारांच्या दमदाटीच्या पत्रांना भिक घातली नाही.

२७ डिसेंबर १७९३ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी रामचंद्र पटवर्धनांचा पराभव केला. आणि पराभूत पटवर्धनांची सुश्रुषा करून त्यांना सन्मानाने तासगाव येथे पाठवले. मात्र परशुरामभाऊंच्या मदतीने पटवर्धनांच्या तिन्ही पथकातील फौजांनी २८ मार्च १७९४ मध्ये कोल्हापूरवर आक्रमण केले. परंतु परशुरामभाऊ व छत्रपती यांच्यात तह झाला.

कोल्हापूर राज्यावर झालेल्या हल्ल्यात करवीरकर पराभूत झाले. या पराभवाने खचून न जाता छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी तहाच्या अटी तात्पुरत्या मान्य केल्या. हा पराभव धुऊन काढण्यासाठी नव्या जोमाने ते कामाला लागले.

१७५५ ते १७५९ या चार वर्षाच्या कालखंडात पटवर्धनाने करवीरकरांची ठाणी जिंकून घेतली होती. ती परत मिळवण्यासाठी छत्रपतींनी कसोशीने प्रयत्न सुरू केले. भुदरगड जिंकून घेतला. नंतर चिकोडी, मनोळी, हुबळी, तासगाव व जमखंडी ताब्यात घेतले.

पुणे दरबारावर ब्रिटिशांचा फास आवळत असताना छत्रपती शिवाजी दुसरे यांनीही विशेष कामगिरी केली. यातून त्यांचे राजकीय आकलन व कार्य सिद्धता आपल्या लक्षात येते.

**११. गोकाकचा वेढा व हुबळीवर ताबा**

छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी ९ जानेवारी १७९८ रोजी स्वतः गोकाकला वेढा दिला. १७ जानेवारी रोजी अतिशय संपन्न अशा गोकाक शहरावर कोल्हापूरकरांनी ताबा मिळवला.

गोकाकवर विजय मिळवल्यानंतर स्वतः छत्रपती शिवाजी महाराज दुसरे आणि हिम्मतबहादूर यांनी हुबळीला वेढा घातला. यावेळी दोन लक्ष रुपये मिळविले. हुबळीच्या तटाभोवती तीन आठवडे वेढा देऊन समर्थपणे किल्ला हस्तगत केला. पुढची व्यवस्था लावून छत्रपती कोल्हापूरकडे परतले.

कोल्हापूरला परत आल्यानंतर छत्रपतींनी मिरज प्रांत मिळवण्याची योजना आखली. यावरून छत्रपती किती मुत्सद्दी होते हेच सिद्ध होते. करवीर राज्यावर मिरज, सांगली, तासगाव या पटवर्धन घराण्यातील सरदाराने स्वाऱ्या केल्या. पण प्रत्येक स्वारीला प्रत्युत्तर देणे व स्वारी माघारी परतल्यानंतर पुन्हा त्यांच्यावर स्वारी करून त्यांना सळो की पळो करून सोडणे तसेच विरोधकांच्या विरोधकांना आपला मित्र बनवण्याची कूटनीती छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांना अवगत होती.

इ.स. १८०० साली करवीर राज्यावर पेशवे व पटवर्धनाने मिळून खूप मोठे संकट निर्माण केले होते. कोल्हापूरवर प्रत्यक्ष स्वारी करण्याचा घाट घालण्याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांच्यावर लक्ष ठेवून महाराजांना कायमचे संपवण्याचा प्रयत्न केला. मात्र महाराजांनी अत्यंत कुशलतेने सर्व परिस्थितीचा उपयोग करून करवीर राज्यावरचे संकट टाळले. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे हे तितकेच धार्मिक होते.

आपल्या संस्थानातील सर्व धर्माच्या लोकांना अभय देण्याबरोबरच त्यांच्या धार्मिक कार्याला आर्थिक मदत व इनामे देऊन सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक समन्वय प्रस्थापित केला.

पेशव्यांच्या प्रभावातून कोल्हापूर राज्याला वाचवण्यासाठी शेवटपर्यंत छत्रपतींनी प्रयत्न केले. पेशवाईनंतर इंग्रजांचे राज्य आले. तरीसुद्धा इंग्रजांनी करवीर राज्याच्या अस्तित्व मान्य केले. यात छत्रपती शिवाजी दुसरे यांच्या कार्याची ओळख होते. करवीर राज्याच्या आणि छत्रपती शिवाजी दुसरे यांच्यापुढे महाराणी जिजाबाई यांनी आदर्श निर्माण करून ठेवला होता. पेशव्यांचा राज्य विलीनीकरणाचा डाव सफल झाला असता तर छत्रपती शिवाजी दुसरे यांना अमर्यादपणे राज्यसत्ता उपभोक्ता आली नसती.

प्रत्यक्ष राज्यकारभाराची सुत्रे हाती घेतल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी आपल्या स्वकर्तृत्वाने पेशव्याबरोबरच इतर सत्तांना आपल्या राजकीय अस्तित्वाची जाणीव करून दिली. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी पेशव्यांच्या सत्तेची तमा न बाळगता करवीर राज्याचे अस्तित्व टिकवून ठेवले. पेशवाईनंतर इंग्रजी राज्य आले असले तरी कोल्हापूर राज्य ही इंग्रजांच्या नियंत्रणाखाली आले. मात्र करवीर राज्याचे वेगळे अस्तित्व चालू राहिले. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १९४९ साली करवीर राज्य भारतीय संघराज्यात विलीन झाले.

- **स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ०३**

**खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. सन ............. मध्ये कोल्हापूर राज्याची स्थापना झाली.

अ. १७१० ब. १७२० क. १७३० ड. १७४०

२. छत्रपती शिवाजी दुसरे यांनी आपली राजधानी पन्हाळ्यावरून ............. येथे आणली.

अ. कोल्हापुर ब. सातारा क. पुणे ड. सांगली

३. पदमाळे तळे .............येथे आहे.

अ. कोल्हापुर ब. सातारा क. पुणे ड. सांगली

४. ............. मध्ये बावड्याच्या गडकर्यांनी बंड केले.

अ. १७७४ ब. १७२० क. १७८३ ड. १७८४

५. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ............. साली करवीर राज्य भारतीय संघराज्य विलीन झाले.

अ. १९४४ ब. १९४७ क. १९४९ ड. १९४६

## १.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

- **संस्थान** – एक संरचित संस्था किंवा राज्य, विशेषतः राजकीय किंवा सांस्कृतिक संदर्भात.
- **दत्तक विधान** – एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीची वंशानुक्रमे स्थान देण्याची प्रक्रिया किंवा नियम.
- **सार्वभौमत्व** – एक राज्याच्या सर्व अधिकारांची पूर्ण मान्यता.

- **तह** – युद्धा समाप्ती किंवा संघर्ष सोडवण्याच्या वेळेस केला जाणारा एक औपचारिक करार किंवा अटी.
- **कूटनीती** – दुसऱ्या राज्यांशी किंवा संस्थांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी वापरलेली धोरणात्मक योजना.
- **विलीनीकरण** – एक राज्य किंवा संस्थान दुसऱ्या राज्य किंवा संस्थेत सामील होणे.

## १.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१

  खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

  १. ड. विशाळगड  २. अ. ताराबाई  ३. अ. १७१४

  ४. साताराचे छत्रपती आणि करवीरचे छत्रपती  ५ अ. १७३१

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ०२

  खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

  १. अ. नरसोजी शिंदे  २. ड. महाराणी जिजाबाई  ३. अ. पन्हाळा

  ४. अ. सीतांबा  ५. ड. जिजाबाई

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न ०३

  खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

  १. अ, १७१०  २. कोल्हापुर  ३. कोल्हापुर  ४. ड. १७८४

  ५. क. १९४९

## १.५ सारांश

छत्रपती संभाजी दुसरे यांचे जीवन आणि कार्य करवीर राज्याच्या इतिहासात अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा जन्म २३ मे १६९८ रोजी विशाळगड येथे झाला. ताराबाईंच्या राजकीय विचारांचा प्रभाव त्यांच्यावर लहानपणीच पडला, कारण त्यांनी ताराबाईंच्या नजरकैदेत आपले बालपण घालवले. १७१४ साली, राजसबाईंच्या साहाय्याने त्यांनी करवीर गादीवर दावा केला आणि ताराबाई व शिवाजी दुसरे यांना कैद केले. १६ वर्षांच्या वयातच राज्यकारभाराचा प्रारंभ करताना त्यांनी सरदारांचे मार्गदर्शन घेतले.

सुरुवातीला त्यांनी निजामाशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित केले आणि पोर्तुगीजांशी युद्धसाहित्य खरेदीसाठी करार केला, ज्यामुळे त्यांची सैन्यशक्ती वाढली. शाहू महाराजांशी संघर्षाच्या अनेक लढाया झाल्या, परंतु

१७२५ च्या कराराने राज्यविभागणी करण्यात आली, ज्यामुळे तणाव कमी झाला. १७३१ च्या वारणेच्या तहानंतर शाहूंनी करवीरच्या स्वतंत्र राज्यास मान्यता दिली.

संभाजी दुसरे यांनी सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले, जसे की अंबाबाई मंदिराचा जीर्णोद्धार आणि इनामे देणे. त्यांच्या अखेरच्या काळात, त्यांनी राज्यकारभारातून माघार घेतली आणि २० डिसेंबर १७६० रोजी निधन झाले.

महाराणी महाराणी जिजाबाई या कष्टाळू, जिद्दी आणि महत्त्वाकांक्षी स्वभावाच्या होत्या. इ.स. १७१४ ते १७६० दरम्यान संभाजी महाराजांच्या सल्लागार म्हणून आणि छत्रपती शिवाजी दुसरे यांच्या बालवयात करवीर राज्याची धुरा त्यांनी यशस्वीपणे सांभाळली. जिजाबाईंच्या कठोर नेतृत्वामुळे कर्नाटकातील सरदार आणि इतर विरोधकांना त्यांनी आपल्या राज्यपद्धतीला अनुसरून वागण्यास भाग पाडले. मुरारराव घोरपड्यांना ''हिंदूराव'' पदवी देऊन त्यांना आपल्या बाजूला ठेवले. दत्तक प्रकरणामुळे पेशव्यांशी तणाव निर्माण झाला असला तरी त्यांनी इ.स. १७६१ ते १७६४ दरम्यान माधवराव पेशव्यांशी तीन समझोते करून संबंध सुधारले.

नानासाहेब पेशव्यांच्या विलीनीकरणाच्या धोरणाला जिजाबाईंनी यशस्वीरित्या रोखले आणि कोल्हापूरचे स्वतंत्र अस्तित्व जपले. त्यांचे राजकीय चातुर्य आणि धैर्य या काळात प्रकर्षाने दिसून आले. वासुदेव शास्त्री खरे यांनी जिजाबाईंच्या कार्याची प्रशंसा करताना सांगितले की, करवीर राज्याची स्थापना मुख्यतः त्यांच्या कर्तबगारीमुळेच शक्य झाली. धर्मसत्तेचे महत्त्व, प्रशासनात स्त्रियांचा सहभाग आणि न्याय दिला यासारख्या मुद्द्यांवर जिजाबाईंचे योगदान मोठे होते. १७ फेब्रुवारी १७७३ पर्यंत त्यांनी करवीर राज्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडली.

छत्रपती शिवाजी महाराज दुसरे (१७६२-१८१३) यांनी कोल्हापूर राज्याच्या राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांच्या कार्यकाळात राजधानी पन्हाळ्यावरून कोल्हापूर येथे स्थलांतरित केली, ज्यामुळे राज्यकारभार अधिक सोपा झाला. त्यांनी भुईकोट किल्ल्याची निर्मिती केली आणि लोकांसाठी पिण्याच्या पाण्याची समस्या सोडवण्यासाठी तलावांचे बांधकाम केले. तसेच त्यांनी पटवर्धन आणि इतर जहागीरदारांशी संघर्ष करत करवीर राज्याचे संरक्षण केले. महादजी शिंदे यांच्या फौजेशी दोन वर्षे संघर्ष करून त्यांनी १५ लाख रुपयांचा तह केला. पुढे त्यांनी हैदर अलीशी तह करून लष्करी मदत मिळवली. छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांनी आपल्या सहकाऱ्यांचा सन्मान केला आणि त्यांना पदव्या दिल्या, ज्यामुळे त्यांच्या राजवटीत राज्याची मजबुती वाढली. बावड्याच्या गडकऱ्यांच्या बंडाचा सामना करून त्यांनी प्रदेशातील शांतता प्रस्थापित केली. गोकाक, हुबळी आणि इतर भागांवर विजय मिळवत त्यांनी राज्याचा विस्तार केला. त्यांचा कार्यकाळ संघर्षमय असला तरी त्यांनी कोल्हापूर राज्याचे वर्चस्व टिकवून ठेवले आणि त्यांच्या मुत्सद्दीपणामुळे राज्य अबाधित ठेवले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टीपा लिहा

१) इ.स.१७२५ चा करार

२) वारणेचा तह

३) छत्रपती संभाजी दुसरे यांचे सांस्कृतिक व धार्मिक कार्य

४) महाराणी जिजाबाईंचे सामाजिक उपक्रम

५) महादजी शिंदे-दुसरे शिवाजी संघर्ष

६) बावड्याच्या गडकऱ्यांचे बंड

ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) छत्रपती संभाजी यांचे सुरुवातीचे संबंध आणि संघर्ष स्पष्ट करा.

२) महाराणी जिजाबाई आणि पेशवे संबंध स्पष्ट करा.

३) करवीर राज्याच्या आधारवड महाराणी जिजाबाई यांच्या कार्याचा आढावा घ्या.

४) छत्रपती शिवाजी महाराज दुसरे यांच्या कामगिरीचे वर्णन करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ


- सरदेसाई गो. स., मराठी रियासत, खंड ते ८, संपादक- स. मा.गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९०२.
- गर्गे स. मा., करवीर रियासत,( करवीर छत्रपती घराण्याचा इतिहास- इ.स.१७१० ते इ.स.१९४९), प्रकाशक श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, न्यू पॅलेस कोल्हापूर, तिसरी आवृत्ती, जानेवारी २००३.
- पाटील विजयाराणी, महाराणी महाराणी जिजाबाई कोल्हापूर राज्याच्या रक्षणकर्त्या, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, एप्रिल,२०२२.
- श्रीखंडे कमलाकर, करवीर छत्रपती दुसरे शिवाजी, पार्श्व प्रकाशन, कोल्हापूर, ९ डिसेंबर,२०२०.
- अप्पासाहेब पवार (संपा.), जिजाबाईकालीन कागदपत्रे, डॉ. उषा इथापे, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, १९७८.


❑❑❑

# घटक २
# मराठा मंडळ–०१

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्ट्ये
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
    २.२.१ महादजी शिंदे
    २.२.२ मल्हारराव होळकर
    २.२.३ दमाजी गायकवाड
२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ
२.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्ट्ये:

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- मराठा साम्राज्य वाढीसाठी व संवर्धनासाठी मराठा मंडळातील सरदारांनी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- दिल्लीच्या राजकारणातील महादजी शिंदे यांनी बजावलेली भूमिका समजून घेता येईल.
- महादजी शिंदे यांनी इंग्रज व फ्रेंच यांच्या बरोबर केलेली युध्दे, तह व राजनिती याची माहिती मिळेल.
- महादजी शिंदे व नाना फडणविस यांच्यामध्ये वेळोवेळी बदलत गेलेल्या संबधाची माहिती मिळेल.
- महादजी शिंदे व करवीर यांचे संबध व संघर्ष याची माहिती मिळेल.
- मल्हारराव होळकर यांनी उत्तरेत मराठा साम्राज्यवाढीसाठी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- मल्हारराव होळकर यांनी केलेल्या विविध युध्द मोहिमांची माहिती मिळेल.
- दमाजी गायकवाड यांनी मराठा साम्राज्यवाढीसाठी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- दमाजी गायकवाड यांनी केलेल्या विविध युध्द मोहिमांची माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक –

छत्रपती शिवाजी महाराज यांनी मराठा साम्राज्याचा कारभार चालवण्यासाठी अष्टप्रधान मंडळाची स्थापना केली. अष्टप्रधान मंडळातील जवळ जवळ सर्वच सरदारांना युध्द प्रसंगी लढाईसाठी जावे लागत होते. अष्टप्रधान मंडळातील व इतर सरदार यांच्या पदरी सैन्य होते हे सैन्य प्रत्यक्ष छत्रपतींच्या नेतृत्वाखाली स्वराज्यासाठी राबत होते. छत्रपती संभाजी महाराज यांच्या कालखंडातही अशाच प्रकारे राज्यकारभाराची व्यवस्था होती. मात्र छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर स्वराज्यावर मोगलांचे मोठे संकट उभा राहिले. छत्रपती राजाराम महाराज यांनी स्वराज्याची घडी बसवण्याचा प्रयत्न केला. परंतु अल्पावधीतच त्यांचा मृत्यू झाला. छत्रपती संभाजी पुत्र शाहू महाराज यांना कैद करण्यात आली. पुढील कालखंडात महाराणी ताराबाई यांनी स्वराज्याचा कारभार पाहिला. मात्र मोगलांच्या सततच्या आक्रमणामुळे अस्थिरता निर्माण झाली होती. स्वराज्यामध्ये निर्माण झालेल्या अस्थिरतेचा फायदा घेवून मराठा सरदार स्वंतत्रवृत्तीने वागू लागले. या सर्वांना एकत्र आणुन स्वराज्याचा अंमल करणे आव्हानात्मक होते. या सरदारांना परत स्वराज्य विस्ताराच्या कामास लावावे व त्यांना एकत्र ठेवावे या हेतूने वतनदारी पध्दत सुरू करण्यात आली. छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणीच्या कालखंडात वतनदारी पध्दत वाढीस लागली. पुढे त्याचे रूपातंर मराठा मंडळात झाले. मराठा मंडळातील सरदारांनी मोगलांच्या आक्रमणास तोंड दिले तसेच नवीन प्रदेश जिंकून मराठा साम्राज्याचा विस्तार केला. या मराठा मंडळातील सरदारांच्या कार्याचा आढावा सदर प्रकरणामध्ये आपण घेणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ महादजी शिंदे

पानिपतच्या रणसंग्रामानंतर प्रभावहीन झालेल्या मराठा साम्राज्याचे पुनरूज्जीवन करण्याची जबाबदारी पेशवा बनलेल्या माधवराव यांच्यावर आली. पेशवा माधवराव यांनी विस्कटलेली मराठा साम्राज्याची घडी नीट केली. शिंदे, होळकर, पवार यासारखे नवीन सरदार निर्माण केले. शिंदे व होळकर यांनी उत्तर हिंदुस्थानामध्ये मराठा साम्राज्य पुन्हा निर्माण करण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली. शिंदे कुटुंबातील कर्त्या पुरूषांनी मराठा साम्राज्याच्या हितासाठी, संवर्धनासाठी व वाढीसाठी महत्वाची कामगिरी बजावली. विशेषत: महादजी शिंदे यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते.

**१) जन्म व बालपण :**

शिंदे घराण्याचा मूळ पुरुष जनकोजी शिंदे हा होय. सातारा जिल्ह्यातील ‘कन्हेरखेड’ हे शिंद्यांचे मुळगाव होते. महादजी शिंदे यांच्या वडिलांचे नाव सुभेदार राणोजी शिंदे व आईचे नाव चिमाबाई होते. त्यांचा जन्म १७२७ मध्ये झाला. लहानपणापासूनच ते हुशार व प्रगल्भ बुद्धीमत्तेचे होते.

२) **लष्करी शिक्षण :-**

महादजी शिंदे युध्दाकरीता रणांगणावर वयाच्या दहाव्या वर्षापासून वडिलांच्या बरोबर जात होते. वयाच्या दहाव्या वर्षी 'वरात' येथील युध्दामध्ये त्यांनी सहभाग घेतला होता. त्यानंतरच्या अनेक युध्दामध्ये त्यांनी राणोजी, जयाजी, दत्ताजी यांच्या बरोबर भाग घेतला. त्यातूनच त्यांना युध्दनिती, मुत्सद्देगिरी, राजनिती, धैर्य याचे शिक्षण मिळत गेले.

३) **पानिपत युध्दातील सहभाग :-**

महादजी शिंदे यानी पानिपतयुध्दामध्ये सहभाग घेतला होता. पानिपत युध्दात मराठा सैन्य सैरावैरा धावू लागले तेंव्हा महादजी शिंदे यांनीही आपली घोडी पानिपतच्या रणांगणातून परत फिरवली. पानिपतच्या रणागंणातून बाहेर पडत असताना एका रोहिला पठाणाने त्यांचा पाठलाग केला. रोहिला पठाणाची नजर महादजीच्या अंगावर असणाऱ्या किंमती ऐवजावर व त्यांच्या सुंदर घोडीवर होती. घोडीचा पाय खड्ड्यात अडकला व घोडी कोलमडून पडल्यामुळे महादजी खड्ड्यात मूर्च्छा येवून पडले. पठाणाने महादजीच्या पायावर खोलवर वार करून त्यांच्या अंगावरील किंमती ऐवज व घोडी घेवून पळ काढला. त्याच रस्त्याने पेशव्यांच्या फौजेतील भिस्ती राणेखान चालला होता. त्यांने महादजीस ओळखले व त्यास आपल्या बैलावर असणाऱ्या पखालीत घालून पेशव्यांच्या फौजेत आणले. पेशव्यांच्या छावणीत महादजीवर उपचार करण्यात आले. मात्र पायावर खोलवर जखम झाल्यामुळे जन्मभरासाठी महादजी शिंदे यांना अपगंत्व आले. राणेखानचे उपकार महादजी शिंदे कधीही विसरले नाहीत. त्यांनी त्यास आपल्या भावाचा दर्जा, मान, प्रतिष्ठा दिली. त्यास 'भाई' हा किताब दिला व तेंव्हापासून तो भिस्ती राणेखानभाई या नावाने ओळखला जावू लागला.

४) **महादजी शिंदे यानां सरदारकी :-**

महादजी शिंदे यांना पानिपतच्या संग्रामानंतर सरदारकी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. राघोबादादाचा महादजीस सरदारकी बाबत विरोध पत्करावा लागला. महादजी उत्तरेत स्वारीवर गेल्यानंतर राघोबादादानी शिंद्यांच्या वंशातील मानाजी शिंदे-फाकडे यास शिंद्यांची सरदारकी जाहीर केली. मात्र पेशवे माधवराव यांनी पेशवे पदाचा कारभार स्व:ताच्या हाती घेतल्यानंतर महादजी शिंदे यांच्याकडे शिंदे दौलतीचा कारभार व सरदारकी सन १७६९ मध्ये सोपविली. शिंदे दौलतीचा कारभार हाती घेतल्यानंतर महादजीने अनेक मोहिमामध्ये, राजकारभारामध्ये नेत्र दिपक यश संपादन केले.

५) **बारभाईचे कारस्थान :-**

नारायणराव पेशव्यांच्या खुनानंतर राघोबादादा पेशवे बनले. राघोबादादा यांनी पेशवेपदाची जबाबदारी स्विकारल्यानंतर कर्नाटक मोहिम काढली. कर्नाटक मोहिमेवर असताना दरबारामधील कारभारी मंडळी एक होवून राघोबादादास पेशवेपदावरून पदच्युत करण्याच्या कटामध्ये सामील झाले व बारभाई कारस्थान आकारास आले. सखारामबापू बोकिल, नाना फडणविस, हरिपंत फडके, पेठे, मालोजी घोरपडे, पटवर्धन यासारखे अनेक प्रतिष्ठित सरदार बारभाईमध्ये सहभागी झाले होते. सखारामबापू हे बारभाईमध्ये सर्वात

वडीलधारी होते. सर्व मंडळीनी सर्वानुमते बारभाईचे प्रमुखपद सखारामबापूस दिले. बारभाई मंडळीनी राघोबादादाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी महादजी शिंदे यांच्यावर सोपवली होती व ती महादजी शिंदे यांनी चोख पार पाडल्याचे दिसून येते.

**६) सदाशिवभाऊंच्या तोतयाचा बंदोबस्त :-**

पानिपत युध्दानंतर सदाशिवभाऊंचा तोतया निर्माण झाला होता. सदाशिवभाऊ यांच्या मृत्यूबाबत अगोदरच वाद होता व त्यातच या तोतयाने भर घातली. सदाशिवभाऊ यांची पत्नी पार्वतीबाई यांना हा तोतया खरोखरच आपला नवरा कशावरून नसेल असे वांरवार वाटत असे. या तोतयाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी नाना फडणविस व सखारामबापू यांनी महादजी शिंदे यांच्यावर टाकली. महादजी शिंदे यांनी आपल्या सैन्यानिशी कोकणात असणाऱ्या तोतयावर आक्रमण केले व रघुजी आंग्रेच्या सहाय्याने तोतयाचा बिमोड केला.

**७) मोरोबादादा फडणविस यांचे कारस्थानचा बंदोबस्त :-**

नाना फडणविसाचे चुलत भाऊ मोरोबा फडणविस यांनी पुणे दरबारामध्ये नाना फडणविस यांच्या विरोधात कारस्थान केले. त्यास राघोबादादाचा पूर्ण पाठिंबा होता. मोरोबा फडणविसच्या कारस्थानाचा बंदोबस्त करण्याकरीता नाना फडणवीस यांनी महादजी शिंदे यांना सांगितले. यावेळी महादजी शिंदे हे कोल्हापूरच्या मोहिमेवर होते. कोल्हापूरकरांचा बंदोबस्त केल्यानंतर महादजी शिंदे यांनी पुण्यास येवून मोरोबा फडणविस यांचा बंदोबस्त केला. मोरोबा फडणविस यास कैद करून अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवले.

**८) करवीरचा बंदोबस्त :**

करवीरचा बंदोबस्त करण्याकरीता अनेकवेळा पेशव्यांनी फौजा पाठविल्या होत्या. मात्र मराठी फौजाना येत असणारे अपयश पाहून नाना फडणविस यांनी करवीरचे राज्य अंमलाखाली आणण्याकरिता महादजी शिंदे यांची करवीरच्या मोहिमेवर नेमणूक केली.

महादजी शिंदे यांनी ३० हजार फौजेनिशी करवीरास वेढा दिला. छत्रपतींचे कारभारी येसाजी शिंदे हे महादजी शिंदे यांच्या सैन्याचा मुकाबला करत होते. जवळ जवळ तीन महिनेपर्यंत युध्द चालू होते. शेवटी कोल्हापूरची तटबंधी फोडण्याकरीता महादजी शिंदे यांनी पुण्याहून 'महांकाली तोफ' मागविली. महादजी शिंदे यांच्या सैन्याचा मुकाबला करणे अवघड आहे हे ओळखून येसाजी शिंदे यांनी तहाची बोलणी चालू केली व दि. २३ एप्रिल १७७८ रोजी तह केला.

- **महादजी शिंदे व परकीय संबध-**

**१) महादजी शिंदे-इंग्रज संबध:**

मराठा सत्तेचा परकीय सत्तापैकी इंग्रजाबरोबर जास्तीत जास्त संपर्क आला. राघोबादादाकरवी इंग्रजानी मराठयांच्या राज्यकाभारामध्ये प्रवेश केला. इंग्रज वकिल मॉस्टिन याने आपला असिस्टंट चार्लस ब्रोम यास

राघोबादादाकडे पाठवून आपला पाठिंबा असल्याचे सांगितले. परीणामी राघोबादादांने इंग्रजांचा आश्रय घेतला. इंग्रजानी पुण्यावर चालून येण्याकरीता आपली हालचाल सुरू केली. सदरची बातमी नाना फडणवीस यास कळताच त्यांनी इंग्रजाच्या आक्रमणाचा मुकाबला करण्यासाठी महादजी शिंदे यांच्यावर जबाबदारी सोपवली.

महादजी शिंदे यांनी इंग्रजांविरोधात आपली मोहिम उघडली. इंग्रजांच्या विरोधात यावेळी शिंदे, होळकर व रास्ते यांची मिळून चाळीस हजार फौज जमा झाली. भिमराव पानसे यांच्या नेतृत्वाखाली तोफखाना सज्ज ठेवण्यात आला होता. तळेगाव जवळ मोठे युध्द झाले. या युध्दात इंग्रजांनी तोफांचा मारा सुरू केला. प्रत्युत्तरादाखल मराठ्यांनीही तोफाचा मारा केला. तळेगाव मराठ्यांनी जाळून टाकल्यामुळे इंग्रजानी वडगावकडे आपला मोर्चा वळविला. इंग्रज वडगावकडे जात आहेत असे कळताच मराठा सैन्याने आक्रमण केले व झालेल्या युध्दामध्ये इंग्रजांचा पराभव झाला. मराठ्यांच्या हाती इंग्रजांच्या पाच तोफा व इतर साहित्य लागले. शेवटी इंग्रजांनी मराठ्यांच्या बरोबर १७ जानेवारी १७७९ रोजी 'वडगावचा तह' केला व राघोबादादास महादजी शिंदे यांच्या ताब्यात दिले.

राघोबादादास ताब्यात घेतल्यानंतर त्यांना झासीच्या किल्ल्यात कैद करून ठेवावे असे ठरले. मात्र ही बातमी राघोबादादास नर्मदेजवळ आल्यावर गुप्तरित्या कळाली. परिणामी चौंडी महेश्वर जवळ नर्मदा नदीवरील पुलावर पहारेकऱ्यांवर हल्ला करून राघोबादादा निसटले व पुन्हा भडोच येथे इंग्रजास जावून मिळाले. राघोबादादा इंग्रजांना जावून मिळाल्यामुळे इंग्रजानी पुन्हा मराठ्यांच्या बरोबर युध्द करण्याची तयारी चालू केली. महादजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली मराठ्यांचे सैन्य इंग्रजाबरोबर लढले. सिपरी कोलार येथे इंग्रज सैन्याबरोबर मोठी लढाई झाली. अंतिमतः महादजी शिंदे यांनी इंग्रजाबरोबर बोलणी करून 'सालबाईचा तह' घडवून आणला. इंग्रजाकडून अँडरसन व मराठ्याकडून महादजी शिंदे व नाना फडणविस यांनी 'सालबाईचा तह' केला व प्रथम मराठे इंग्रज युध्द थांबले.

उत्तर हिंदुस्थानमध्येही महादजी शिंदे व इंग्रज यांचे संबध आले. दिल्लीचा बादशहा ताब्यात असावा याकरीता इंग्रज अग्रही होते मात्र महादजी शिंदे होते तोपर्यंत त्यांना ते शक्य झाले नाही. ''इंग्रजांचे पारिपत्य करून नाव राहू देणार नाही'' असे महादजी शिंदे म्हणत असत.

**२) महादजी व फ्रेंच संबध :**

मराठा सत्तेचा परकीय सत्तांबरोबर संबध आला. त्यामध्ये फेंचांचाही समावेश होता. उत्तरेमध्ये महादजी शिंदे यांचे बरोबर चंद्रपुरच्या फ्रेंचानी तह केला होता. त्यानुसार –

१. मराठे व फ्रेंच हे एकमेकाचे मित्र राहतील.

२. बंगाल मधील इंग्रजाविरोधातील मोहिमेत मराठा व फ्रेंच बरोबरीने भाग घेतील.

३. भारतामधील फ्रेंच सैन्यास कटक व गुजरातमध्ये जाण्यास महादजी शिंदे मदत व मार्गदर्शन करतील.

४. बंगाल मधील चौथाईवरील हक्क फ्रेंचानी मान्य करावा.

वरील प्रमाणे झालेला तह हा दोन्हीही सत्ताधिशांच्या दृष्टिने महत्त्वपूर्ण होता.

महादजी शिंदे यांनी कवायती फौज उभारली होती. याकरता त्यांना डि-बॉय या फ्रेंच अधिकाऱ्याची मोठ्या प्रमाणात मदत झाली होती. या कवायती फौजेच्या सहायाने त्यांनी अनेक युध्दे जिंकली.

■ **महादजी शिंदे यांचे उत्तरेतील कार्य –**

पानिपतच्या लढाईनंतर उत्तरेतील कमकुवत झालेली मराठ्यांची सत्ता सावरण्याचे कार्य महादजी शिंदे यांनी केले. महादजी शिंदे उत्तरेकडील मराठ्यांच्या राजकारणामध्ये प्रमुख बनले होते.

**१) दोआबात मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित:– १७७०**

महादजी शिंदे यांनी फरूखाबादवर १५ डिसेंबर १७७० रोजी मोहिम आखली. तेथील अहमदखान बंगशला मराठ्यांचा सामना करणे शक्य नव्हते. परिणामी त्यांने पानिपतच्या युध्दानंतर मराठ्यांचा प्रदेश घेतलेला होता. सर्व प्रदेश मराठ्यांना परत दिला. अशाप्रकारे मराठ्यांनी दोआबातील आपला गेलेला प्रदेश परत मिळवला व आपली सत्ता तेथे पुनश्च: स्थापन केली.

**२) झबेताखानाचा बंदोबस्त व रोहिलाखंडावर मराठ्यांचे वर्चस्व :– १७७२**

नजीबखान रोहिला सरदार पानिपत युध्दानंतर दिल्ली दरबारात वजीराचे काम बघात होता. उत्तरेत पानिपतयुध्दानंतर मराठ्यांचे प्रभुत्व पुन्हा वाढविण्यासाठी मराठी फौजा गेल्या. त्यावेळी नजीबखानाचे पारिपत्य करावे असा विचार चालू होता. पानिपतयुध्दानंतर काही वर्षे वजिराचे काम पाहिल्यानंतर आपले वजीराचे काम झबेताखानाकडे सोपवून तो नजीबाबाद या स्वत: वसविलेल्या शहरामध्ये वार्धक्यामुळे रहावयास गेला. मराठा सैन्याने दिल्लीवर आक्रमण करताच झबेताखान दिल्ली सोडून पळून गेला व मराठ्यांनी रोहिलखंडावर आपले वर्चस्व निर्माण केले.

**३) ग्वाल्हेर हस्तगत:– १७८३**

पानिपतयुध्दानंतर मराठ्यांची काही प्रमाणात हानी झाली. उत्तरेतील मराठ्यांचा दबदबा कमी झाला. याचाच फायदा जाटांनी घेवून ग्वाल्हेरचा महत्त्वपूर्ण किल्ला मराठ्यांच्याकडून हस्तगत केला होता. महादजी शिंदे यांनी आपल्या सर्व सैन्यासह ग्वाल्हेरवर स्वारी केली व २१ जुलै १७८३ रोजी ग्वाल्हेर किल्ला आपल्या वर्चस्वाखाली आणला.

**४) गोहद हस्तगत :– १७८४**

गोहदवर सर्वप्रथम राघोबादादाच्या कारकिर्दीमध्ये मराठ्यांनी आक्रमण केले होते. नंतर पुढे गोहदच्या राण्याने मराठ्यांच्या विरोधात बंड केले. गोहदवर महादजी शिंदे यांनी आक्रमण केले व किल्ला हस्तगत केला.

### ५) जहागिरदारांना आपल्या वर्चस्वाखाली आणले :-

महादजी शिंदे इंग्रजाबरोबरच्या युध्दामध्ये गुंतले आहेत, याचा फायदा त्याच्या वर्चस्वाखाली असणाऱ्या उत्तरेकडील लहान लहान जहागिरदारांनी घेतला. सन. १७८२ पर्यंत या सर्व छोट्या राजांचा महादजी शिंदे यांनी बंदोबस्त केला व त्यांना आपल्या वर्चस्वाखाली आणले.

### ६) बादशहा मराठ्यांच्या आश्रयास :-

मराठ्यांना उत्तरेमध्ये बादशहास आपल्या ताब्यात ठेवणे आवश्यक आहे, हे महादजी शिंदे ओळखून होते. मराठ्यांचे सैन्य उत्तरेमध्ये गेले त्यावेळी बादशहा शहाआलम हा ब्रिटिशांच्या ताब्यात होता. बादशहाने आपला सरदार सिराजउद्दौला यास मराठ्यांचे सरदार महादजी शिंदे व गणेश कानडे यांचेकडे मदत करण्याबाबत बोलणी करण्यासाठी पाठविले. मराठ्यांनी बादशहा शहाआलम यास आपल्या अटी प्रथम मान्य करण्याबाबात सांगितले. बादशहाने मराठ्यांच्या सर्व अटी मान्य केल्या. मराठ्यांनी दिल्लीवर आपला ताबा मिळवला व बादशहास आपल्या वर्चस्वाखाली आणले.

### ७) बादशहाकडून मानाच्या पदव्या बहाल :-

महादजी शिंदे यांनी बादशहाच्या मुलखाचा कारभार करावा असे ठरले. परिणामी १ मे १७८५ मध्ये बादशहाने मोठा दरबार भरवून पेशव्यास व पेशव्याच्यांवतीने महादजी शिंदे यांना अनेक पदव्या व अधिकार बहाल केले. महादजी शिंदे यांनी पेशव्यांना बादशहाकडून 'वकिल-ए-मुतालिक', 'अमीर-उल-उमरा', 'मुखत्यारूल-मलिक', 'मदारूल महाल', 'महाराजाधिराज', 'पंडीत प्रधान' अशा विविध पदव्या घेतल्या व पेशव्यांच्यातर्फे स्वत: धारण केल्या. पुढे दक्षिणेत आल्यानंतर त्यांनी त्या सर्व पदव्या २१ जून १७९२ रोजी मोठा दरबार भरवून पेशव्यांना सन्मानपूर्वक बहाल केल्या.

### ८) महादजी शिंदे व रजपूत संबध :-

दि. २१ डिसेबंर १७६७ रोजी जयपूरचा राजा माधवसिंह मरण पावला. त्याच्या काळात मराठे रजपूत संबध सलोख्याचे होते. मात्र पुढे महादजी शिंदे यांच्या कालखंडात मराठा रजपूत संबधामध्ये बिघाड निर्माण झाला. आर्थिक तरतूदीकरीता महादजी शिंदे यांनी रजपूत राजांकडे आपले लक्ष वळविले. हक्काने मिळणारी चौथाई खंडणी रजपूतांकडे महादजी शिंदे यांनी मागितली. ती जास्त असल्याने रजपूतांनी विरोध दर्शविला.

### अ) जयपूरबरोबर संघर्ष (१७८६)

जोधपूर व जयपूरकर हे संघटीतरित्या महादजीस विरोध करण्याच्या दृष्टिने वाटचाल करत होते. सन. १७८५ मध्ये जोधपूर व जयपूर यांचे संबध आणखीनच दृढ झाले याचे कारण म्हणजे विजयासिंगाने जयपूरच्या प्रतापसिंगास आपली मुलगी देवून ऑगस्ट १७८५ वैवाहिक संबध प्रस्थापित केले. महादजी शिंदे यांनी जयपूरच्या राजास आपले आर्थिक संकट सावरण्यासाठी खंडणीसाठी तगादा लावला. जयपूरकरांकडे खंडणी गोळा करण्यासाठी रायाजी पाटील यास पाठवून दिले. रायाजी पाटील व प्रतापसिंग यांच्यामध्ये युध्द होवून रायाजी पाटील याचा पराभव झाला. रायाजी पाटील याचा पराभव झाला आहे असे कळताच महादजी

शिंदे हे १७८६ ला बादशहाच्या सैन्यासह जयपुरात दाखल झाले. महादजी शिंदे यांचा आक्रमक पवित्रा पाहून प्रतापसिंहाने खंडणी देण्याचे मान्य केले व तह केला.

**ब) लालसोटची लढाई :– (१७८९)**

महादजी शिंदे यांच्या विरोधात जोधपूरच्या विजयसिंगाने इतर सत्ताधिशांना एकत्र करून संघ निर्माण केला. त्यामध्ये जयपूरकरांनाही त्यांने सामील केले. विजयसिंगाने युध्दाची तयारी चालविल्यानंतर महादजी शिंदे यांनी आबुंजी इंगळे व इतर सरदारांना बोलावून घेतले. महादजी शिंदे व रजपूत यांच्यामध्ये मोठ्या प्रमाणात लढाई झाली. मराठ्यांचे बरेचसे सैन्य मृत्यूमुखी पडले. परिस्थिती पाहून महादजी शिंदे यांनी लालसोटच्या लढाईत माघार घेतली.

लालसोट येथे महादजी शिंदे यांच्या सैन्याची मोठ्या प्रमाणात हानी झाल्यामुळे दरबारामध्ये मोठा गोंधळ निर्माण झाला. मात्र जून १७८७ पर्यंत महादजी शिंदे परत पूर्वपदावर आले. युध्दात झालेल्या हानीतून सावरले. गुलामकादीरचा बंदोबस्त केला व त्याच्या वर्चस्वातून दिल्लीस मुक्त करून बादशहास पुन्हा अंकित केले.

**क) पाटणची लढाई:– (१७९०)**

दि. २० जून १७९० मध्ये महादजी शिंदेचे सेनापती डि–बॉय व राठोड यांच्यामध्ये पाटणची लढाई झाली. राठोडांनी पराक्रमाची शर्थ केली मात्र त्यांचा पराभव झाला. युध्दामध्ये मराठ्यांचे वर्चस्व पुर्णत: सिध्द झाले असे असले तरी या युध्दामध्ये राठोड पळून जाण्यामध्ये यशस्वी झाले. या युध्दामध्ये मराठ्यांना १०० तोफा, बंदुका, हत्ती व इतर अनेक साहित्य मिळाले.

**ड) मेडत्याची लढाई :– (१७९०)**

पाटणच्या संग्रामामध्ये यश प्राप्त झाल्यानंतर महादजी शिंदे यांनी अजमेर किल्ला ताबात घेण्याकरीता मोहिम राबवली. दि. ११ सप्टेबर १७९० रोजी मराठ्यांनी रजपूतावर आक्रमण केले व विजय संपादन केला. मेडता येथील लढाईमध्ये मराठ्यांनी विजय संपादन केल्यानंतर उभय पक्षामध्ये 'सांभारचा तह' घडून आला.

- **महादजी शिंदे व नाना फडणविस संबंध:**

महादजी शिंदे व नाना फडणविस यांनी पानिपत युध्दात मराठ्यांची झालेली हानी भरून काढण्याचे काम केले. नाना फडणविस यांनी दक्षिणेमध्ये उत्तमरितीने राज्यकारभाराची घडी बसवली तर उत्तर हिंदुस्थानामध्ये मराठ्यांचे गेलेले वैभव तलवारीच्या जोरावर महादजी शिंदे यांनी पुन्हा मिळवले. सुरूवातीस या दोघामध्ये चांगले संबध होते ही बाब मराठा साम्राज्याच्या हिताची ठरली. मात्र शेवट पर्यंत या दोघांचे संबध मैत्रीपूर्ण राहीले नाहीत. महादजी शिंदे पुण्यास आल्यास आपले महत्व कमी होईल अशी नाना फडणविस यांना भिती वाटत होती.

महादजी शिंदे लष्कर व पैसा यादृष्टिने बलशाली झाले आहेत. दक्षिणेत आल्यानंतर दक्षिणेचा कारभार ते आपल्या हातामध्ये घेतील व आपणास राज्यकारभारामध्ये स्थान राहणार नाही याची भिती नाना फडणविस यांना वाटत होती. याकरीता त्यांनी इतर सरदारांना पत्रे पाठविली. इंग्रजांची मदत मिळविण्याचाही प्रयत्न केला. बादशहाने दिलेल्या पदव्या स्विकारण्यावरूनही वाद निर्माण झाला. मात्र प्रत्यक्षात दक्षिणेत आल्यानंतर महादजी शिंदे यांनी आपला हुजऱ्याचा धर्म सोडला नाही. पेशवा व नाना फडणवीस यांच्याबरोबर नम्रतापूर्ववक वर्तन केले.

■ **महादजी शिंदे यांची अखेर :**

महादजी शिंदे यांनी उत्तरेमध्ये १२ वर्षे राज्यकारभार केला या कालावधीमध्ये ते उत्तरेमध्ये सर्वेसर्वा होते. दक्षिणेत आल्यानंतर त्यांनी पुण्याजवळ वानवडी येथे आपली छावणी टाकली होती. मात्र उत्तरेतून पुण्यात आलेनंतर प्रवास व सतत केलेली युध्दे यामुळे त्यांची तब्येत बिघडली. आजारी असतांनाच दि. १२ फेब्रुवारी १७९४ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

■ **महादजी शिंदे यांचे विविध पैलू/गुण :-**

पानिपत युध्दामध्ये गेलेली मराठ्यांची प्रतिष्ठा पुन्हा प्राप्त करून मुगल बादशहास महादजी शिंदे यांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले. महादजी शिंदे यांचे मुल्यमापन करत असताना खालील पैलू दिसून येतात.

१. **स्वभाव :-**

महादजी शिंदे हे मृदू स्वभावाचे होते त्यामुळे ते अनेकांना आवडत असत. त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात संपत्ती होती तरीही त्यांची राहणी साधीच होती. ते आपला हुजऱ्याचा धर्म कधीच विसरले नाहीत.

२. **धार्मिक सहिष्णुवृत्ती :-**

महादजी शिंदे धार्मिक वृत्तीचे होते. त्यांची कृष्णावर भक्ती होती. ईश्वराच्या भजनात ते बराच वेळ घालवत असत. ते धार्मिक सहिष्णुवृत्तीचे होते. त्यांचे गुरू हिंदु बरोबरच मुसलमानांचे पीर, साधु, संत हे ही असलेले दिसून येतात. वारकरी पंथातले संत मल्लाप्पा वास्कर हे त्यांचे गुरू होते. तसेच मन्सूरशहा हे त्यांचे मुस्लिम गुरू होते.

३. **शिक्षण :-**

महादजी शिंदे हे शिकलेले होते. तत्कालिन युध्दजन्य परिस्थीतीमध्येही त्यांनी मराठी बरोबरच फारशी, उर्दू भाषा अवगत करून घेतली होती.

४. **लेखन :-**

महादजी शिंदे हे कवी होते त्यांनी अनेक पदे रचली होती. 'माधव' या नावाने अनेक अभंग रचलेले दिसून येतात. त्यांनी 'माधवविलास' या नावाचा काव्य ग्रंथ लिहीला.

**५. प्रशासन :-**

महादजी शिंदे हे राज्य जिंकल्यानंतर त्या राज्याची व्यवस्था चोखपणे लावत असत. राज्यात शांतता राहण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करत असत व प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष देत असत. राज्याच्या हिशोबाबाबत ते दक्ष होते.

**६. युध्दनिती व सैन्यव्यवस्था :-**

युध्दनितीमध्ये महादजी शिंदे यांनी नेहमीच वेगवेगळे प्रयोग केले. सैन्यातील डामडौलपणा व गबाळेपणा नाहीसा केला. डि-बॉय या फ्रेंच अधिकाऱ्याच्या सहाय्याने त्यानी कवायती लष्करी फलटणी तयार केल्या. दारूगोळा व तोफा ओतण्याचा कारखाना आग्रा येथे चालू केला व त्याच्यावर सँगस्टर हा परदेशी तज्ञ अधिकारी नेमला होता.

**७. परकीय धोरण :-**

महादजी शिंदे यांनी वॉरन हेस्टिंग्ज होता तोपर्यंत इंग्रजाविषयी मैत्रीचे धोरण ठेवले. नंतर मात्र त्यांनी इंग्रजांना भारतातून घालवून देण्याच्या दृष्टिने प्रयत्न केला. फ्रेंचाबरोबर तटस्थ धोरण स्विकारल्याचे दिसून येते.

**८. गुणांचा चाहता :-**

महादजी शिंदे हे गुणांचा चाहता होते. त्यांच्या कारकिर्दीमध्ये अनेक अधिकाऱ्यांचा उदय झाला. डि-बॉय, लखबादादा, राणेखान, जगूबापू, अप्पा खंडेराव, अंबुजी इंगळे, जिवबादादा वगैरे मंडळीतील गुण त्यांनी ओळखले व त्यांना आपल्या पदरी ठेवले.

**९. संगीताची आवड :-**

महादजी शिंदे यांना संगीताचीही आवड होती. त्यांच्या पदरी बीवकर महंमद जमान सारखे सुरेख व उत्तमरितीने वाद्ये वाजवणारे संगीतकार होते.

**१०. शहर सुधारणा करण्याकडे कल :-**

महादजी शिंदे यांनी उज्जैन येथे राहण्यास गेल्यानंतर तेथे राजवाडे व आवश्यक त्या सोयी सुविधासह ते शहर सुधारलेले दिसून येते. कर्नल मॅलेट याबाबत प्रशंसा करताना दिसतो.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ०१**

- **खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.**

१. शिंदे घराण्याचे मूळ गाव कन्हेरखेड ............ जिल्ह्यात आहे.

अ. सातारा ब. पुणे क. मुंबई ड. अहमदनगर

२. महादजी शिंदे यांनी वयाच्या १० वर्षी ......... येथिल युध्दात सहभाग घेतला होता.

अ. लालसोट        ब. वरात        क. सालबाई        ड. पानिपत

३. महादजी शिंदे यांनी राणेखान यास ......... हा किताब दिला होता.

अ. पंडितराव        ब. सरसेनासुभा        क. भाई        ड. यापैकी नाही

४. बारभाई मंडळाचे प्रमुखपद ......... ........ यांना देण्यात आले होते.

अ. सखारामबापू बोकिल        ब. हरिपंत फडके

क. मालोजी घोरपडे        ड. नाना फडणविस

५. महादजी शिंदे यांनी करवीर मोहिमेकरीता 'महाकांली तोफ' ............ येथून मागवली होती.

अ. सातारा        ब. पुणे        क. सांगली        ड. अहमदनगर

### २.२.२ मल्हारराव होळकर

पानिपतच्या रणसंग्रामाअगोदर व नंतर मराठा साम्राज्याचा विस्तार व पुनरूज्जीवन करण्यामध्ये मल्हारराव होळकर यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते. शिंदे, होळकर, पवार यासारखे नवीन सरदार माधवराव पेशवे यांच्या कालखंडात निर्माण केले. शिंदे व होळकर यांनी उत्तर हिंदुस्थानामध्ये मराठा साम्राज्य पुन:र्निर्माण करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. मराठा साम्राज्याच्या जडणघडणीमध्ये मल्हारराव होळकर यांचे कार्य महत्त्वपूर्ण होते त्याचा आढावा पुढील प्रमाणे-

**१. जन्म व बालपण :**

मल्हारराव होळकर यांचा जन्म १६ मार्च १६९३ रोजी पुणे जिल्ह्यातील जेजुरीजवळील 'होळ' या गावी झाला. त्याच्या वडिलांचे नाव खंडुजी विरकर व आईचे नाव जिवाई विरकर असे होते. होळ यागावावरून त्यांचे होळकर असे नाव पडले. मल्हारराव लहान असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांनतर त्यांच्या आई आपल्या मुलाचा सांभाळ करण्याकरीता माहेरी येवून राहिल्या. मामा भोजराज बारगळ यांच्या घरी मल्हारराव मोठे झाले.

**२. लष्करी शिक्षण :**

मल्हारराव होळकर लहानपणी मामाच्या मेंढ्या राखण्याचे काम करत होते. थोडे मोठे झाल्यानंतर ते घोडे राखण्याचे काम करू लागले. घोडे राखण्यासाठी गेल्यानंतर ते घोड्यावर बसून घोडेस्वारी करू लागले व त्यामध्ये ते पटाईत झाले. भोजराज बारगळ यांनी मल्हारराव यांना भालाफेक, तलवारबाजी, दांडपट्टा चालवणे इत्यादीचे शिक्षण दिले. युध्दकलेत तरबेज झालेनंतर मामांने त्यांना कदमबांडे यांच्या सैन्यात बारगीर म्हणून नोकरीस लावले. स्वकृतृत्वावर पुढे ते सैन्यात शिलेदार बनले. सन. १७१८ मध्ये बाळाजी विश्वनाथ यांच्या स्वारीच्यावेळी त्यांच्या पदरी असणाऱ्या पांढरे सरदाराच्या सैन्यात मल्हारराव २५ स्वार घेवून सहभागी झाले. उत्तरेत माळव्यामध्ये झालेल्या विविध युध्दात त्यांनी आपली कर्तबगारी सिध्द केली. माळव्यातूनच त्यांनी आपले राजकारण सुरू केले.

### ३. बढवणीच्या संस्थानिकांकडे नोकरी:

मामा भोजराज बारगळ व कदमबांडे यांच्या संमतीने मल्हारराव यांनी बडवनीचा शासक मोहनसिंग यांचे पदरी नोकरी पत्करली. बडवणी संस्थानाच्या संरक्षणाची जबाबदारी त्यांच्यावर सोपविलेली होती. मोहनसिंग व बाजीराव पेशवे यांचे संबध दुरावले होते. पेशव्यांनी बढवणी संस्थानाविरोधात मोहिम हाती घेतली व बढवणीला वेढा दिला. सुमारे दीड हजार फौजेनिशी मल्हाररावांनी पेशव्याच्या फौजेस प्रखर विरोध केला. मात्र पेशवेंच्याप्रती असणारी त्यांची ओढ लपून राहीली नाही त्यांनी पुढाकार घेऊन पेशव्यांचे वर्चस्व राखून दोन्ही पक्षास मान्य होईल, असा तह घडवून आणला. त्यानुसार दोघांतील मतभेद मिटविले.

### ४. पेशव्यांच्या लष्करात प्रवेश:–

मल्हारराव होळकरांनी बढवणी येथील युध्दात केलेला पराक्रम व तह करतांना दाखविलेली हुशारी पाहुन स्वत: बाजीराव पेशव्यांना मल्हारराव होळकर आपल्या सैन्यांत असावेत असे वाटू लागले. तेव्हा त्यांनी मल्हाररावास पत्र पाठवून आपला मनोदय कळविला. मल्हारराव होळकरांनी याबाबत आपण माझे मामा भोजराज बारगळ यांना विचारावे. त्यांनी होकार दिल्यास मी आपल्या पदरी नोकरीस येतो असे कळविले. पेशव्यांनी मल्हाररावाच्या मामांस याबाबत कळविले त्यांनी होकार देताच मल्हारराव पेशव्यांच्या सैन्यात दाखल झाले. स्वत: तलवारीच्या जोरावर त्यांनी पेशव्यांच्या दरबारात मानाचे स्थान व वचक निर्माण केला होता.

### ५. सांरगपूरचे युध्द :

सन १७२३ मध्ये मल्हारराव होळकर बारा हजार सैन्यानिशी माळव्याच्या मोहिमेमध्ये सहभागी झाले होते. माळव्यामध्ये गिरधर बहादूर याच्या जाचास तेथील सरदार व जमिनदार कंटाळले होते. धारच्या दिशेने जात असताना मल्हारराव व गिरधर बहादूर यांच्या सैन्याची भेट झाली. उभयंतामध्ये युध्द झाले या युध्दात मल्हारराव होळकर यांचा विजय झाला. यावेळी चिमाजी आप्पाही हजर होते. यानंतर माळव्यामध्ये मराठ्यांचा प्रभाव वाढला व निजामाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांची नियुक्ती पेशव्यांनी केली.

### ६. साखरखर्डाची लढाई :

भोगावती नदीच्या काठी साखरखर्डा येथे ०१ ऑक्टोबर १७२४ मध्ये मुबारिझखान व मराठे यांच्यामध्ये युध्द झाले. युध्दात मराठ्यांचा विजय झाला. या युध्दामध्ये मराठ्यांच्या वतीने मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे यांनी महत्वाची भूमीका पार पाडली होती.

### ७. पालखेडचे युध्द:

पालखेड याठिकाणी निजाम व मराठे यांच्यामध्ये मार्च १७२८ मध्ये युध्द झाले. या युध्दामध्ये मराठ्यांनी निजामाच्या फौजांना घेरले व निजामाच्या फौजेची रसद पुर्णत: बंद केली. गनिमीकावा युध्द पध्दतीमुळे निजाम हैराण झाला होता. शेवटी निजामाचा पराभव झाला. या युध्दात मल्हारराव होळकर यांनी मोठा पराक्रम केला. यायुध्दानंतर मल्हारराव होळकर हे पेशवे बाजीराव यांच्या खास मर्जीतले बनले.

### ८. अमझेरा व तिरालाचे युध्द:

गिरधर बहादूर याचे बरोबर सारंगपूरचे युध्द झाले होते यामध्ये गिरीधर बहाद्दूरचा पराभव झाला होता. या मागील युध्दाचा राग मनात धरून स्थानिक सरदारांना त्रास त्याने देण्यास सुरुवात केली होती. तसेच मराठ्यांच्या फौजेचा उत्तरेत जाण्याचा मार्ग अडविण्याची तयारी चालविली होती. गिरधर बहाद्दूर व मराठा फौज यांची अमझेरा व तिराली येथे भेट झाली. उभयंतामध्ये २९ नोव्हेंबर १७२८ मध्ये युध्द घडून आले. या झालेल्या युध्दामध्ये गिरधर बहाद्दूर मारला गेला. मराठ्यांचा विजय झाला या युध्दात मल्हारराव होळकर व उदाजी पवार यांनी मोठा पराक्रम केला होता.

### ९. मंदसौरचे युध्द व सवाई जयसिंग याचा बंदोबस्त :

इ.स.१७३३ मध्ये सवाई जयसिंग व मराठे यांच्या सैन्यात लढाई झाली. मंदसौर येथे सवाई जयसिंह व मराठे यांच्या दोन्ही फौजा एकत्र आल्या व झालेल्या युध्दात होळकरांनी व शिंदेनी मोठा पराक्रम केला. सवाई जयसिंहाने आपली पिछेहाट होत आहे हे ओळखून मुगल बादशहास मदतीसाठी निरोप पाठविला. मुगल बादशहा सवाई जयसिंगाच्या मदतीला येण्यासाठी निघाला. बादशहा येणार असे कळल्यानंतर जयसिंगाने पुन्हा बंद केलेले युध्द चालू केले. मात्र मराठा फौजेपुढे त्याचा टिकाव लागला नाही. सवाई जयसिंहाचा पराभव झाला व दि. ०५ मार्च १७३३ रोजी दोन्ही पक्षांमध्ये तह झाला. या तहानुसार सहा लक्ष रुपये होळकरांना द्यावेत व चौथाईच्या मोबदल्यामध्ये जमा केलेल्या खंडण्या होळकरांनी परत कराव्यात असे ठरले. या युद्धानंतर संपूर्ण माळवा मराठांच्या ताब्यात आला मराठ्यांचे वर्चस्व वाढले.

### १०. बुंदी प्रकरण :

मराठा इतिहासामध्ये राजपुतांच्या बाबतीमध्ये घडलेली हि सर्वात महत्त्वाची घटना होय. सवाई जयसिंग यांनी त्याच्या राज्याच्या शेजारी असणारे बुंदीचे राज्य ताब्यात घेतले. बुधासिंग हा तेथील राजा गादीवर बसला होता. त्यास त्याने पदच्युत केले व आपल्या मर्जीतील दलिलसिंग हाडा यास गादीवर बसवले. तसेच त्याने दलिलसिंग हाडास आपली मुलगी देऊन जावई बनवले होते. बुधासिंग याने मराठ्यांच्याकडे मदत मागितली. मराठ्यांचे छत्रपती शाहू महाराज यांनी सन १७३३ मध्ये मल्हाराव होळकर व शिंदे यांना बुंदी प्रकरणात लक्ष घालण्यास सांगितले. दि. २२ एप्रिल १७३४ मध्ये होळकरांनी राणोजी शिंदेसह बुंदीवर आक्रमण केले. यामध्ये मराठ्यांचा विजय झाला. याप्रसंगी बुधासिंगच्या राणीने मल्हारराव होळकरास आपला भाऊ मानून त्यांना राखी बांधली व बुधासिंग पुन्हा बुंदी राज्याचा राजा बनला.

### ११. मुगलाशी संघर्ष:

आर्थिक प्राप्तीसाठी मराठ्यांनी उत्तरेमध्ये अनेक मोहिमा काढल्या. मराठ्यांच्या होणाऱ्या या वाढत्या मोहिमामुळे मुगल बादशहा यास मराठ्यांचा बंदोबस्त करावा असे वाटू लागले. मराठ्यांचा पराभव करण्याकरीता त्यांने तयारी चालवली. मात्र मोगलांच्या बरोबर मराठ्यांचे वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या युद्धामध्ये मराठ्यांची सरशी झाली. गनिमीकावा युद्ध पद्धतीचा वापर करून मल्हारराव होळकर, शिंदे व इतर

सरदारांनी मोठा पराक्रम केला. उत्तर भारतामध्ये पेशवा बाजीराव यांनी मोहीम काढली. या मोहिमेच्या वेळी मल्हारराव होळकर व शिंदे यांच्या सहभागामुळे ही मोहीम यशस्वी झालेली दिसते.

**१२. भोपाळचे युद्ध :**

निजामाबरोबर १७३८ मध्ये भोपाळचे युद्ध झाले. या युद्धामध्ये निजामाची चहुबाजूने रसद बंद करण्यात आली. युद्धामध्ये मराठ्यांनी विजय मिळवला व ७ जानेवारी १७३८ रोजी दुराई-सराईचा तह झाला. या तहानुसार या युद्धाचा संपूर्ण खर्च मराठ्यांना मिळाला. तसेच माळवा प्रदेशाची सुभेदारी, नर्मदा व चंबळ खोऱ्यातील प्रदेश मराठ्यांना मिळाला. या युद्धात मल्हाराव होळकर व शिंदे यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली.

**१३. तारापूरची मोहीम-**

मराठा प्रदेशावर पोर्तुगीजांनी आक्रमण करून तो प्रदेश आपल्या ताब्यात घेतला होता. तो परत मिळवणे व पोर्तुगीजांचा बंदोबस्त करणे याकरिता बाजीरावांनी सन १७३८ मध्ये मल्हाराव होळकर यांची ठाणे या ठिकाणी नेमणूक केली. पोर्तुगीजांचा बंदोबस्त करण्याकरिता मराठ्यांनी २४ जानेवारी १७३९ रोजी तारापूरवर हल्ला केला. तारापूरच्या युद्धात मल्हारराव होळकर यांनी सहभाग घेतला होता. या युद्धात पोर्तुगीज सेनापती लुई ओझोज मारला गेला व तारापूर मराठ्यांनी जिंकून घेतले.

**१४. गोदावरीचे युद्ध-**

निजामाचा मुलगा नासिरजंग हा मराठ्यांना विरोध करत होता. पेशव्यांनी नासिरजंगचा बंदोबस्त करण्याकरीता मोहिम आखली. सन १७३९ मध्ये नासिरजंग व मराठे यांच्यामध्ये युध्द झाले. गोदावरी या ठिकाणी झालेल्या युध्दात मराठ्यांनी विजय मिळवला. यावेळी पेशव्यांच्या बरोबर मल्हारराव होळकर व राणोजी शिंदे हे सरदार होते.

**१५. कुंभेरीचे युद्ध :**

मुगल सम्राट व वजीर सफदरजंग यांच्यामध्ये संबंध बिघडले. वजिराने मुगल सम्राटास विरोध केला. या उभयंतामधील संघर्षामध्ये सुरजमल जाट यांने सफदरजंग यास मदत केली. मुगल सम्राटाने या संदर्भामध्ये मराठ्यांच्याकडे मदत मागितली. मराठ्यांनी मुगल सम्राटास मदत करण्याचे आश्वासन दिले. उत्तरेत असणाऱ्या मराठा सैन्याने कुंभेरीकडे आपला मोर्चा वळवला. कुंभेरी येथे सुरजमल जाट याचे वास्तव्य होते. दि. १६ जानेवारी १७५४ रोजी कुंभेरी किल्ल्याला रघुनाथराव व मल्हारराव होळकर यांनी वेढा दिला. मराठ्यांच्या आक्रमक धोरणापुढे आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून सुरजमलने आपला वकील मराठ्यांच्या मागण्या काय आहेत हे जाणून घेण्याकरिता पाठवला. मराठ्यांनी आपल्या मागण्या सांगितल्या. मात्र मराठ्यांच्या मागण्या सुरजमल जाट यास मान्य नव्हत्या. सुरजमल जाट यास आपल्या मागण्या मान्य नाहीत हे समजताच मराठ्यांनी कुंभेरीस दिलेला वेढा आवळला. कुंभेरीच्या आसपासचा प्रदेश हा रेताड असल्यामुळे लांब पल्याच्या तोफा आवश्यक होत्या. सदर तोफा मराठ्यांनी मुगल सम्राटाकडून मागविल्या. किल्ल्यावरून तोफेचे गोळे येत होते त्यापासून बचाव करण्याकरीता खंदक खोदण्याचे काम चालू होते. लांब

पल्ल्याच्या तोफा येईपर्यंत खंदक खोदण्याचे कामाची व खंदकाची पाहणी करण्याकरिता मल्हारराव होळकर यांचे पुत्र खंडेराव होळकर गेले असता तोफेचा गोळा लागून त्यांचा मृत्यू झाला. ही बातमी मल्हारराव यांना कळतात त्यांना प्रचंड दु:ख झाले. सुरजमल जाट याचा शिरच्छेद केल्याशिवाय मी गप्प बसणार नाही अशी त्यांनी वल्गना केली. ही बातमी सुरजमल यास कळताच तो घाबरला व त्यांनी शिंदे यांच्या करवी तह करण्याचा प्रस्ताव पाठवला. उभयंतामध्ये तह झाला. मात्र शिंद्यांनी तह घडवून आणला त्यामुळे शिंदे व होळकर यांच्यामध्ये या युध्दानंतर दरी निर्माण झाल्याचे दिसून येते.

**१६. पंजाबची मोहीम:**

आदिनबेग हा पंजाबचा शासक होता. पंजाब प्रांतामध्ये अफगाणी सैन्याचा हस्तक्षेप वाढला होता. अफगाणी सैन्याचा बंदोबस्त करावा याकरता आदिनबेग यानी मल्हारराव होळकर यांची मदत मागितली. मल्हारराव होळकर यांनी पंजाबची मोहीम हाती घेतली. मल्हारराव व राघोबादादा यांनी लाहोर मध्ये १७५८ मध्ये आक्रमण केले. मराठा सैन्य आल्याचे पाहताच अफगाणांनी आपल्या बचावासाठी काबुलकडे पळ काढला. पंजाब मोहिमेमध्ये मराठ्यांनी नजीबखान रोहिला याचा पराभव केला. नजीबखानास पकडण्यात आले. त्यावेळी नजीबखानास मारून टाकावे असे मराठा सरदारांचे मत होते. मात्र मल्हारराव होळकर यांनी नजीबखानास धर्मपुत्र मांनले व त्यास जाऊ दिले. या नजीबखानाने पुढे पानिपतचा रणसंग्राम घडवून आणला.

**१७. पानिपतचे युध्द:**

पानिपतचे युध्द दि. १४ जानेवारी १७६१ रोजी घडून आले. पानिपत युध्दामुळे मराठ्यांची मोठ्या प्रमाणात हानी झाली. या युध्दामध्ये इतर सरदाराबरोबर मल्हारराव होळकरही सहभागी झाले होते. प्रत्यक्ष युध्दादिवशी मल्हारराव सायंकाळपर्यंत रणमैदानावरच झुंजत होते. सदाशिवभाऊ व इतर सरदार निकराने लढत होते. मल्हाररावानी आपला सरदार संताजी वाघ यास सदाशिवभाऊच्या मदतीसाठी ससैन्य पाठवले होते. सदाशिवभाऊंच्या आदेशाने पार्वतीबाई व मराठ्यांच्या काबील्याच्या संरक्षणाची जबाबदारी मल्हारराव होळकर यांनी पार पाडली व ते रणमैदानातून माघारी फिरले.

**१८. पानिपतयुध्दानंतर मल्हारराव होळकर यांची कामगिरी:**

पानिपत युध्दानंतर मराठा सत्ता सावरण्यासाठी मल्हारराव होळकर यांचे कार्य महत्वपूर्ण होते. पानिपत युध्दात मराठ्यांचा पराभव झाल्यामुळे मराठ्यांचे प्रतिस्पर्धी शत्रू यांनी आपले डोके वर काढले. यामध्ये जाट, बुंदेले, रजपूत यांचा प्रामुख्याने समावेश होता. उत्तेरत माधोसिंग यांने मराठ्यांच्या विरोधात इतरांना बरोबर घेवून आघाडी उघडली होती. यासर्वांचा बंदोबस्त करण्यामध्ये मल्हारराव होळकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सन १७६३ मधील राक्षसभुवनच्या लढाईत माधवरावांसोबत निजामाचा पराभव करून पानिपतच्या पराभवाने खचलेल्या मराठा मंडळास संजीवनी दिली.

एकुणच मल्हारराव होळकर यांनी त्यांच्या आयुष्यात लहानमोठ्या एकूण बावन्न लढायांमध्ये भाग घेतला. मल्हारराव होळकर हे स्वाभिमानी, धाडसी व शूर होते. युद्धकला, राजकारण आणि राज्यकारभार

यामध्ये हुशार व चाणाक्ष होते. माळव्यातील आपल्या मांडलिक राजांशी त्यांचे स्नेहपूर्ण संबंध होते. बाळाजी बाजीराव व त्यानंतरचे पेशवेमाधवराव आणि दादासाहेब मल्हाररावांना पित्यासमान मान देत असत. मल्हारराव होळकर यांचा मृत्यू २० मे १७६६ रोजी झाला.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०२**

- **खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पूर्ण करा.**

१. सुभेदार मल्हारराव होळकर यांचा जन्म............... जिल्ह्यातील 'होळ' या गावी झाला.

अ. पुणे ब. सातारा क. सांगली ड. कोल्हापूर

२. बडवणीचा शासक ............ हा होता.

अ. रामसिंग ब. मोहनसिंग क.जयसिंग ड. गिरधर बहाद्दूर

३. निजाम व मराठे यांच्यामध्ये मार्च १७२८ ........... युध्द झाले.

अ. खर्डाचे ब. पालखेडचे क. मंदसौरचे ड. सारंगपूरचे

४. बुंदी राज्याचा .......... हा राजा होता.

अ. बुधासिंग ब. सवाई जयसिंह क. रामसिंग ड. उदयसिंग

५. तिसरे पानिपतचे युध्द ........... मध्ये घडून आले.

अ. १४ जानेवारी १७६१ ब. १४ फेब्रुवारी १७६१

क. १४ मार्च १७६१ ड. १४ एप्रिल १७६१

## २.२.३ दमाजी गायकवाड

मराठा साम्राज्याचा विस्तार महाराष्ट्राबाहेरही मोठ्या प्रमाणात झाला याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मराठा सरदारांनी सत्तेचा केलेला विस्तार होय. महाराष्ट्राबाहेर गुजरातमध्ये प्रामुख्याने दाभाडे व गायकवाड या सरदारांनी मराठी सत्तेचा विस्तार केला. गायकवाड घराणे हे महाराष्ट्रामध्ये पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील भरे गावचे होय. दमाजी गायकवाड यांच्या कारकिर्दीत खऱ्या अर्थाने गायकवाड घराणे नावारुपास आले. त्यांनी गुजरातमध्ये मराठा सत्तेचा प्रामुख्याने विस्तार केला.

**१. बालपण व शिक्षण :**

दमाजी गायकवाड यांच्या वडिलांचे नाव पिलाजी गायकवाड होय. दमाजी यांचे बालपण दावडी व सोनगड या ठिकाणी गेले. दमाजीचे वडील पिलाजी हे दाभाडे सरदारांच्या पदरी लष्करात कार्यरत होते. बालपणापासूनच दमाजी यांना युद्धतंत्र व इतर आवश्यक शिक्षण दिले गेले. घोडेस्वारी, मल्लविद्या, तलवार चालवणे, भाला फेकणे यामध्ये दमाजी गायकवाड यांना तरबेज करण्यात आले होते. दमाजी गायकवाड यांना मोडी लिपी व गुजराती भाषा याचे ज्ञान अवगत होते. गुजरातचा सुभेदार अभयसिंग यांनी घातपात करून

१७३२ ला पिलाजी गायकवाड यांचा खून घडवून आणला. परिणामी लहान वयातच दमाजी गायकवाड यांच्यावर फौजेची जबाबदारी येऊन पडली व ती त्यांनी अतिशय सक्षमपणे पार पाडली.

**२. अभयसिंगाचा बंदोबस्त :**

पिलाजी गायकवाड यांचा मृत्यू झाल्यानंतर गुजरातचा सुभेदार अभयसिंग यास मराठ्यांचे वर्चस्व गुजरात मधील कमी होईल असे वाटत होते. मात्र पिलाजी गायकवाड यांच्या मृत्यूनंतर मराठा फौजा संतापाने एकत्र आल्या. पिलाजींच्या मृत्यूचा बदला घेण्याकरिता त्यांनी तयारी केली. अहमदाबाद हे गुजरातच्या सुभेदाराचे मुख्य लष्करी ठाणे होते. दमाजी व उमाबाई दाभाडे यांनी अहमदाबादच्या चारी बाजूने वेढा दिला. अहमदाबादच्या आसपासच्या प्रदेशांमध्ये मराठी फौजानी मोठ्या प्रमाणात जाळपोळ व लुटालूट केली. अभयसिंग हा जोधपूरचा असल्याने जोधपूरच्या परिसरामध्येही मराठ्यांच्या एका तुकडीने आक्रमण केले. दोन्ही आघाडीवर आक्रमण करून अभयसिंगास जेरीस आणले. अहमदाबाद व जोधपुर परिसरातील मराठ्यांचा जोरदार हल्ल्यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे ओळखून अभयसिंगाने मराठ्यांच्या बरोबर तह केला. चौथाई व सरदेशमुखी विनाअट दयावी तसेच अहमदाबादच्या खजिन्यातून ८० हजार द्यावे इत्यादी अटी अभयसिंगाने मान्य केल्या. या युध्दामध्ये दमाजी गायकवाड यांचे महत्व वाढले.

**३. बडोदा शहरावर ताबा:**

पिलाजी गायकवाड यांच्या मृत्यूनंतर अभयसिंगाने बडोदा शहरावर आक्रमण करून ते आपल्या ताब्यात घेतले. बडोदा शहर ताब्यातून गेल्यामुळे दमाजीस मोठा धक्का बसला. बडोदा पुन्हा मिळवण्यासाठी सन १७३४ मध्ये दमाजीने बडोद्यावर हल्ला केला. बडोद्यामधील स्थानिक लोकांचा दमाजीस पाठिंबा होता. झालेल्या युध्दामध्ये बडोद्याचा मोगल प्रशासक शेरखानबाबी याचा पराभव करून दमाजींनी बडोद्यावर आपले वर्चस्व निर्माण केले. बडोदा हे गायकवाडांचे मुख्य लष्करी ठाणे बनले.

**४. आनंद मोगरीची लढाई**

मराठा सरदार कंठाजी कदमबांडे यास गुजरात मध्ये आपला विस्तार करावयाचा होता. पिलाजी गायकवाड यांच्या मृत्यूनंतर त्यास ही संधी प्राप्त झाली. सन. १७३५ मध्ये कंठाजीने आपली फौज घेऊन गुजरात मधील खेडा या भागात आक्रमण केले. गुजरात मधील काही प्रदेशात चौथाई व सरदेशमुखीची वसुली सुरू केली. ही बातमी दमाजीचा प्रतिनिधी रंगोजी यास कळताच त्यांनी त्यास विरोध केला. मात्र कंठाजीचा विरोध करणे याकरिता फौजेची आवश्यकता होती हे ओळखून त्याने दमाजीस निरोप पाठविला. दमाजी आपल्या फौजेनिशी महाराष्ट्रातून गुजरात मध्ये तत्परतेने गेला. कंठाजी कदमबांडे व दमाजी यांच्या फौजेचा मुकाबला आनंद मोगरी या ठिकाणी झाला. आनंद मोगरी येथे झालेल्या युद्धात दमाजीचा विजय झाला. दमाजी गायकवाड यांच्या दृष्टीने हा विजय खूप महत्त्वाचा होता.

**५. अहमदाबादची स्वारी:**

गुजरात मधील अहमदाबाद हे महत्त्वाचे शहर होते. अहमदाबाद शहराचा प्रमुख रतनसिंग होता. मात्र मोमीनखान यास अहमदाबादची सुभेदारी हवी होती. या संघर्षामध्ये दमाजीने मोमीनखान यास आपला

पाठिंबा दर्शविला. दमाजी व मोमीनखान यांच्यामध्ये करार घडून आला. या करारानुसार गुजरात मधील चौथाई वसुलीचा अधिकार दमाजीस मिळणार होता. मोमीनखान यास दमाजी मदत करणार आहे ही बातमी रतनसिंग भंडारी यास कळाली त्यावेळी त्याने त्या दोघांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न केला. रतनसिंगने दमाजीस अर्ध्या गुजरातचा महसूल देण्याचा प्रस्ताव दिला व त्याबदल्यात आपणास मदत करावी असे सांगितले. दमाजीने मोमीनखान यास हा प्रस्ताव दाखविला. मोमीनखान यांना इच्छा नसतानाही तो प्रस्ताव मान्य करावा लागला. दमाजीने अहमदाबाद शहरावर आक्रमण केले. तोफाचा मारा करून अहमदाबाद शहराची तटबंदी पाडण्यात आली. मराठा फौजानी अहमदाबाद मध्ये प्रवेश केला. अहमदाबादवर ताबा मिळाल्यानंतर मोमीनखान हा सुभेदार बनला. दमाजीस अर्ध्या गुजरातचा ताबा मिळाला राजकीय दृष्टीने ही घटना खूप महत्त्वाची होती. यानंतर दमाजीचे गुजरात मध्ये महत्त्व वाढतच गेले.

**६. भडोचवर स्वारी –**

गुजरातमधील भडोच बंदर हे व्यापाराच्या दृष्टीने महत्त्वाचे बंदर होते. भडोच बंदर आपल्या ताब्यात असावे याकरता भारतीय तसेच परकीय सत्ताधीश प्रयत्नशील होते. भडोच शहरातून जकातीचा हिस्सा गायकवाडांना मिळत होता. पिलाजी गायकवाड यांच्या मृत्यूनंतर भडोच शहरातून मिळणारा जकातीमधील उत्पन्नातील हिस्सा गायकवाडांना मिळणे बंद झाला होता. सन १७४१ मध्ये दमाजीने भडोचवर आक्रमण केले व शहरास वेढा दिला. दमाजीस विरोध करणे आपणास शक्य नाही हे ओळखून भडोच शहरातील राजाने दमाजीस वेढा उठवण्याबाबत निजामाकरवी विनंती केली व ठरल्याप्रमाणे जकातीचा उत्पन्नातील हिस्सा दमाजीस देण्याचे मान्य केले.

**७. काठेवाड मधील स्वारी:**

काठेवाड गुजरात मधील एक महत्त्वाचा भाग होता. काठेवाड मध्ये एकूण २९२ संस्थाने होती. संस्थानातील जमीनदार स्वतंत्रपणे कारभार करत होते. दमाजीने काठेवाडवर स्वारी केली. मराठी फौजा खंडणी वसुलीसाठी गुजरात मध्ये फिरू लागल्यानंतर त्यांचा काठेवाड बरोबर संबंध आला. दमाजीने काठेवाड मधील जमीनदारांना कर देण्यास सांगितले. दमाजीस विरोध करणे काठेवाडमधील जमीनदारांना शक्य नव्हते कारण त्यांच्यामध्ये एकी नव्हती. सर्व जमीनदार दमाजीस कर देवू लागले. दमाजी काठेवाड मधील जमीनदाराकडून कर गोळा करू लागल्यामुळे गुजरात मध्ये एक पराक्रमी सरदार म्हणून दमाजीची ओळख निर्माण झाली.

**८. सुरतवर स्वारी**

सुरत हे गुजरातधील सधन शहर होते. मुघल सरदार तेगबेघखान याने सुरतची ठाणेदारी आपणास मिळावी याकरिता प्रयत्न चालू केले होते. मुगल बादशाहास नजरांना पाठवून तेगबेघखान स्वत: सुरतचा ठाणेदार बनला. सुरतचा ठाणेदार बनताच त्याने मोगलांचे वर्चस्व झुगारून दिले. पिलाजी गायकवाड यांच्या कालखंडापासून सुरतच्या आसपासच्या प्रदेशातून मराठे कर गोळा करत असत. दमाजी गायकवाड यांनी तेगबेघखान यास खंडणीबाबत सांगितले. दमाजीचा प्रतिकार करणे आपणास शक्य नाही हे ओळखून

तेगबेघखान याने दमाजी बरोबर चौथाईचा करार केला. त्यानुसार सुरतच्या प्रदेशातून कर गोळा करण्याचे अधिकार दमाजीस मिळाले.

### ९. दमाजी गायकवाड व पेशवा संबंध

दमाजी गायकवाड यांचे गुजरात मधील कार्य अभ्यासत असताना त्यांचे पेशव्याबरोबर संबंध कशाप्रकारे होते हे पाहणे गरजेचे आहे. गायकवाड हे दाभाडे यांच्या पदरी प्रथम नोकरीस होते. पुढे कर्तबगारीवर ते गुजरातचे मराठा सरदार आणि सेनापती बनले. सन १७३१ मध्ये पेशवे बाजीरावांविरुद्ध बंड केल्यामुळे त्रिंबकराव दाभाडे यांना मारण्यात आले. त्रिंबकरावच्या मृत्यूनंतर पेशव्यांनी दाभाड्यांना त्यांची पदवी आणि प्रदेश गुजरातमध्ये कायम ठेवण्याची परवानगी दिली. गुजरातमधील उत्पन्नाचा अर्धा हिस्सा मराठा छत्रपतींच्या खजिन्यात जमा करावा या अटीवर त्यांचे अल्पवयीन भाऊ यशवंतराव दाभाडे यांची सेनापती म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या आई उमाबाई दाभाडे यांना कार्यकारी अधिकारी म्हणून नेमणूक केली. लष्करी सत्ता दमाजीकडे होती परिणामी दमाजीचे वर्चस्व वाढत गेले.

उमाबाईं दाभाडे यांनी सुरुवातीला पेशवा बाजीरावांशी सलोख्याचे संबध निर्माण केले मात्र त्यांच्या मनात आपल्या मुलाची हत्या केल्याबद्दल पेशव्यांविरुद्ध द्वेष कायम होता. बाजीरावाच्या मृत्यूनंतर तिने नवीन पेशवे बाळाजी बाजीराव यांच्याकडे विनंती केली की, दाभाड्यांना महसूल उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा दयावा लागतो त्या करातून मुक्त करावे. पेशव्यांनी दाभाडयांच्या या विनंतीस नकार दिला. उमाबाईने पेशव्याविरुद्ध बंड केले. मराठा साम्राज्यामध्ये गादी वारसावरून सुरू असलेल्या छत्रपती शाहू महाराज व ताराबाई संघर्षामध्ये त्यांनी ताराबाईंची बाजू घेतली. बाळाजी बाजीराव मुगल स्वारीवर निघाले तेव्हा उमाबाईने ताराबाईच्या समर्थनासाठी १५,००० सैन्यासह दमाजी गायकवाड यास पाठवले. पेशव्यांच्या आदेशानुसार हरी दामोदर यांने दमाजी गायकवाड यांच्यावर हल्ला केला मात्र या हल्ल्यात दमाजीने त्याचा पराभव केला.

दमाजी गायकवाड यांचा बंदोबस्त करण्यासाठी पेशवाईचे निष्ठावंत त्रिंबकराव पुरंदरे यांची पुण्याहून नेमणूक पेशव्यानी केली. बळवंतराव मेहेंदळे, बापूजी रेठरेकर, महिपतराव कवडे यांनाही त्यांच्याबरोबर देण्यात आले. त्रिंबकराव, बळवंतराव मेहेंदळे, बापूजी रेठरेकर, महिपतराव कवडे यांच्या फौजा खानदेशात पोहचल्या. बहादूरपूर याठिकाणी तापी नदीच्या तिरावर उभय सैन्याची लढाई झाली. लढाईत दमाजीने पेशव्यांच्या सैन्याचा पराभव केला व ते पुण्यास निघाले. पराभव होवूनही पेशव्यांच्या सैन्याने दमाजीचा पाठलाग चालू केला. १२ मार्च १७५१ रोजी दमाजी साताऱ्याजवळ पोहचला. त्यांनी आपल्या सैन्याची छावणी वेण्णा नदीच्या काठावर वाल्हे व म्हसवे याठिकाणी ठेवली. पेशव्यांच्या सैन्याची छावणी वडुथ याठिकाणी होती. पेशव्यांच्या सैन्याने दमाजीच्या सैन्यावर हल्ला केला दमाजीस मोठ्या नुकसानीसह माघार घ्यावी लागली. त्रिंबकरावांनी त्याचा पाठलाग सुरूच ठेवला आणि शेवटी कृष्णा नदीच्या खोऱ्यात अडकवले. दरम्यान, पेशवे मुगल स्वारीतून परतले, आणि त्रिंबकरावांना सामील झाले. पेशव्यांच्या सैन्यापुढे आपला टिकाव लागणार नाही हे दमाजीने ओळखले. दमाजीस युध्द थांबवावे लागले आणि शांतता कराराच्या अटींवर चर्चा करण्यासाठी पेशव्यांना भेटावे लागले. पेशव्यांनी युद्ध नुकसानभरपाई पोटी मोठी

रक्कम व गुजरातच्या अर्ध्या प्रदेशाची मागणी केली. दमाजीने आपण उमाबाईच्यांवतीने लढत असून मला सही करता येणार नाही व हा करार उमाबाई यांच्या बरोबर करावा असे सांगितले. मात्र ३० एप्रिल १७५१ रोजी, पुरंदरे व विंचूरकर यांनी संध्याकाळी दमाजीच्या छावणीवर अचानक हल्ला केला. दमाजीची छावणी उधवस्त केली. अचानक झालेल्या हल्यामुळे दमाजीस काहीच करता आले नाही त्याने कोणताही प्रतिकार न करता आत्मसमर्पण केले.

मे १७५१ मध्ये पेशव्यांनी दमाजी गायकवाड आणि त्यांच्या नातेवाईकांना अटक करून पुण्याला पाठवले. दाभाडेंनाही काही काळानंतर अटक करण्यात आली. दाभाड्यांच्या जहागीर व पदव्या काढून घेण्यात आल्या. पुण्यात यशवंतराव दाभाडे यांच्या वतीने पेशव्यांनी दमाजीवर अर्धा गुजरात सोडण्यासाठी वारंवार दबाव आणला. दमाजीने नकार दिला. १९ जुलै १७५१ रोजी पेशव्यांनी त्याला आणि त्याचा दिवाण रामचंद्र बसवंत यांना कडक बंदिवासात ठेवले. १४ नोव्हेंबर रोजी त्यांनी त्यांना लोहगडच्या बंदिवासात पाठवले. काही दिवसातच रामचंद्र बसवंत पळून जाण्यात यशस्वी झाला आणि गुजरातला पोहोचला. सोनगढ किल्ल्यावर तो दमाजीच्या नातेवाईकांना भेटला. पेशव्यांनी दमाजीला लोहगडावर लोखंडी साखळदंडात बांधले होते. दरम्यान पेशव्यांनी रघुनाथराव यांच्या नेतृत्वाखाली फौज गुजरातला पाठवली. रघुनाथरावांनी सुरतमधून महसूल वसूल केला, परंतु तापी नदीच्या उत्तरेकडे ते पुढे जाऊ शकले नाहीत. दरम्यान, पेशव्यांना इतर काही लढायांमध्ये माघार घ्यावी लागली होती. तिकडे लक्ष देण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी गायकवाडांशी समेट करण्याचा निर्णय घेतला. ३० मार्च १७५२ रोजी पेशवा व दमाजी गायकवाड यांच्यामध्ये गुजरातच्या वाटणीचा करार घडून आला. या करारानुसार–

१. दमाजी गायकवाड हे गुजरातमधील मराठा सरदार म्हणून काम पाहतील.

२. दमाजीच्या ताब्यात असलेल्या प्रदेशातील अर्धा हिस्सा पेशव्यांना द्यावा.

३. गायकवाडांनी मागील देणे १५ लाख पेशव्याना द्यावेत.

४. दरवर्षी गायकवाडांनी खंडणी म्हणून पेशव्यांना २५ हजार रूपये द्यावेत.

५. दमाजी यापुढे जो प्रदेश जिंकतील त्यातील अर्धा हिस्सा पेशव्यांना द्यावा.

६. पेशव्यांना गरज भासेल त्यावेळी दमाजीने सैन्यासह मदत करावी.

या करारास गुजरातच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे. कारण या करारामुळे गुजरातमधील सर्व सरदार पेशव्यांच्या वर्चस्वाखाली आले.

**१०. पानिपतयुध्दातील कामगिरी:**

पानिपतच्या रणसंग्रामामध्ये दमाजी गायकवाड यांनी सहभाग घेतला होता. पानिपतचे युध्द चालू झाल्यानंतर सुरुवातीस तोफखान्याच्या ठिकाणी इब्राहिमखान गारदीसह त्यांनी सहभाग घेतला होता. विश्वासराव याचा मृत्यू झाला. सदाशिवभाऊ स्वत: घोड्यावर बसून सैन्यामध्ये दिसेनासे झाले. यावेळी दमाजी गायकवाड हे जखमी अवस्थेत होते. मल्हारराव होळकर, विंचूरकर, साबाजी माणकेश्वर, नाना पुरंदरे,

गंगोबा चंद्रचूड यांच्या बरोबर त्यांनी पानिपतचे रणागंण सोडण्याचा निर्णय घेतला. दमाजी जखमी असल्याने त्यांच्या पथकातील लासुरे व पोळ यांनी त्यांना तेथून आपल्या पाठीवरून बाहेर काढले.

पानिपतमधून परत आल्यानंतर त्यांनी गुजरातमध्ये राजकीय घडी योग्यारित्या बसवली. त्याचबरोबर त्यांनी गुजरातमध्ये अनेक लोकोपयोगी कार्य केले. गुजरातमध्ये महसूल व्यवस्थेकरीता इजारा पध्दतीचा वापर केला. शेतीच्या प्रगतीसाठी विशेष लक्ष दिले. धार्मिक दृष्टिने वर्षासने, देणग्या दिल्या. मंदिराचे जिणोध्दार केले. लष्कर व्यवस्थेवर विशेष लक्ष दिले. गुजरातमध्ये स्वतंत्र टांकसाळी सुरू करून स्वतःचे चांदीचे नाणे सुरू केले. अशा पराक्रमी सरदाराचा मृत्यू १८ ऑगस्ट १७६८ मध्ये पाटण येथे झाला.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०३**

- **खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पूर्ण करा.**

१. दमाजी गायकवाड यांचे मुख्य लष्करी ठाणे ........... हे होते.

अ. सुरत    ब. अहमदाबाद    क. बडोदा    ड. काठेवाड

२. आनंद मोघरीची लढाई दमाजी गायकवाड व ............ यांच्यामध्ये झाली.

अ. कंठाजी कदमबांडे    ब.रतनसिंग

क. मोमीनखान    ड. तेगबेगखान

३. काठेवाड ............. या शहराचा महत्वाचा भाग होता.

अ. गुजरात    ब. कोल्हापूर    क. पुणे    ड. सातारा

४. दमाजी गायकवाड यांनी गुजरातमध्ये स्वतंत्र टांकसाळ सुरू करून ............ या धातूचे नाणे पाडले.

अ. चांदीचे    ब. सोन्याचे    क. पितळेचे    ड. लोखंडाचे

५. दमाजी गायकवाड यांने महसूल व्यवस्थेकरीता गुजरात मध्ये ............ या पध्दतीचा वापर केला.

अ. कायमधारा    ब. इजारा    क. महालवारी    ड. रयतवारी

## २.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१. **भिस्ती :** युध्दप्रसंगी रणागंणावर सैन्यास पाणी देण्याचे काम करणाऱ्यास भिस्ती असे म्हटले जात असे.

२. **पखाल :** घोड्यावरून अथवा बैलावरून पाणी वाहून नेण्यासाठी वापरली जाणारी चमडयाची पिशवी.

३. **फाकडा :** युध्दामध्ये अतुलनिय कामगिरी अथव शौर्य गाजवणाऱ्यास ही पदवी दिली जात असे.

४. **तोतया :** चेहऱ्याशी साम्य असणारी दुसरी व्यक्ती.

५. **बारगीर :** म्हणजे सरकारी घोडेस्वार यास घोडयासह सर्व साहित्य सरकारकडून दिले जात असे.

६. **शिलेदार :** म्हणजे ज्याच्याकडे स्वत:चा घोडा व आवश्यक साहीत्य असा सैनिक.

७. **टांकसाळ :** नाणे छापण्याचा कारखाना.

## २.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ०१

  १. अ. सातारा   २. ब. वरात   ३. क. भाई

  ४. अ. सखारामबापू बोकिल   ५. ब. पुणे

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ०२

  १. अ. पुणे   २. ब. मोहनसिंग   ३. ब. पालखेडचे

  ४. अ. बुधासिंग   ५. अ. १४ जानेवारी १७६१

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न - ०३

  १. क. बडोदा   २. अ. कंठाजी कदमबांडे   ३. अ. गुजरात

  ४. अ. चांदीचे   ५.ब. इजारा

## २.५ सारांश

छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणी यांच्या कालखंडात वतनदारी पध्दत वाढीस लागली. वतनदार आपल्या प्रदेशामध्ये मनमानी कारभार करू लागले. या वतनदारांना स्वराज्याच्या कार्यात सहभागी करून घेण्याच्या दृष्टिने मराठा मंडळ अस्तित्वात आले. छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांना प्रदेश विस्ताराच्या कामास लावले. पानिपत युध्दामध्ये मराठ्यांचा पराभव झाल्याने मराठ्यांचे उत्तरेतील वर्चस्व कमी झाले होते. सरदार महादजी शिंदे यांनी उत्तरेतील मराठ्यांचे वर्चस्व व प्रतिष्ठा पुन्हा निर्माण केली. मराठ्यांचा गेलेला प्रदेश परत मिळवला. मल्हारराव होळकर यांनीही उत्तरेमध्ये मराठा साम्राज्य विस्तारामध्ये महत्त्वाची कामगिरी केली. शिंदे, होळकर या सरदारांनी मोठ्या प्रमाणात उत्तरेमध्ये आपला वचक निर्माण केला. गुजरातमध्ये प्रामुख्याने दाभाडे व गायकवाड या सरदारांनी मराठी सत्तेचा विस्तार केला. दमाजी गायकवाड यांच्या कारकिर्दीत खऱ्या अर्थाने गायकवाड घराणे नावारुपास आले. त्यांनी गुजरातमध्ये मराठा सत्तेचा प्रामुख्याने विस्तार केला.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

- टिपा लिहा.

  १. महादजी शिंदे व परकीय संबध

  २. पानिपत युध्दातील महादजी शिंदे यांची कामगिरी

३. महादजी शिंदे व नाना फडणविस संबध

४. महादजी शिंदे यांचे विविध पैलू/गुण

५. मल्हारराव होळकर मुगल संघर्ष

६. कुंभेरीचे युध्द

७. पानिपत युध्दातील मल्हारराव होळकरांचे कार्य

८. दमाजी गायकवाड

९. दमाजी गायकवाड पेशवे संबध

- खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा.

१. मराठा सरदार महादजी शिंदे यांचे मराठा सत्तेतील योगदान स्पष्ट करा.

२. महादजी शिंदे यांचे उत्तरेतील कार्य स्पष्ट करा.

३. मल्हारराव होळकर यांचे मराठा सत्तेतील योगदान स्पष्ट करा.

४. दमाजी गायकवाड यांचे मराठा सत्तेतील योगदान स्पष्ट करा.

## २.७ संदर्भ ग्रंथ


- ठाकूर वा.वा., होळकरशाहीच्या इतिहासाची साधने, भाग-१, होळकर गव्हर्नमेंट प्रेस, इंदूर, १९४४.
- डिस्काळकर द. बा., शिंदेशाहीची राजकारणे, भाग-१, सातारा इतिहास संशोधक मंडळ, १९३४.
- पारसनीस द. ब., महेश्वर दरबारची बातमीपत्रे, भाग-०१ व ०२, १९१०, १९११
- पारसनीस द. ब., हिस्टॉरिकल पेपर्स रिलेटेड टु ग्वाल्हेर स्टेट, भाग-१ ते ०३
- फाळके, आ. भा., शिंदेशाही इतिहासाची साधने, भाग- १, ते ०३, आलीजाह दरबार प्रेस, लष्कर ग्वाल्हेर, १९२९, १९३०, १९३७
- सरदेसाई गो. स., महादजी शिंदे यांची कागदपत्रे, अलिजाह दरबार प्रेस, ग्वाल्हेर, १९३७.
- सरदेसाई गो. स., सिंदीयाज ऑफ ग्वाल्हेर, खंड ०१ व ०२, सातारा इतिहास संशोधक मंडल, सातारा, १९४०
- जोशी शं.पु., मराठ्यांच्या सत्तेचा उत्तरेकडील विस्तार, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९३७
- हवलदार ता. रा., महादजी शिंदे आणि मराठा सत्ता : एक नवीन दृष्टिक्षेप, अप्रकाशित पीएच.डी प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- Sardesai S. G., New History of the Marathas, Phoenix Publication, Vol-II, (1946)
- Watson J.W., History of Gujrat, Bombay Government Central Press, (1876)
- Kulkarni A.R., The Marathas, Diamond Publication, Pune, 2008
- Mujumdar R.C., The Maratha Supremacy, Bharatiya Vidya Bhavan, Bombay, 1977.

❑❑❑

## घटक ३
# मराठा मंडळ–०२

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

- ३.२.१ रघुजी भोसले
- ३.२.२ परशुरामभाऊ पटवर्धन
- ३.२.३ कान्होजी आंग्रे

३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- मराठा साम्राज्य वाढीसाठी व संवर्धनासाठी मराठा मंडळातील सरदारांनी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- छत्रपती शाहू महाराज व रघुजी भोसले यांच्यामधील परस्पर संबधाची माहिती मिळेल.
- दुसरे बाजीराव पेशवे व पटवर्धन संघर्षाची माहिती मिळेल.
- रघुजी भोसले यांनी केलेल्या विविध युध्द मोहिमांची माहिती मिळेल.
- परशुरामभाऊ पटवर्धन यांनी मराठा साम्राज्यवाढीसाठी केलेल्या कार्याची माहिती मिळेल.
- कान्होजी आंग्रे यांनी परकीय सत्ताबरोबर केलेल्या संघर्षाची व विविध युध्द मोहिमांची माहिती मिळेल.

### ३.१ प्रास्ताविक –

छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणी यांच्या कालखंडात वतनदारी पध्दत वाढीस लागली. वतनदार आपल्या वतनात मनमानी करत व वेळ प्रसंगी स्वराज्याची साथ सोडत. या सर्वांना एकत्र आणुन स्वराज्याचा अंमल करणे आव्हानात्मक होते. बाळाजी विश्वनाथ व छत्रपती शाहू महाराज यांनी नवीन संयुक्त राज्यव्यवस्था पुढे आणली. त्यानुसार स्वराज्यातील वेगवेगळा प्रदेश सरदारांना देण्यात आला. सरदारांनी आपणास दिलेल्या भागात कर्तृत्व गाजवावे, लढा द्यावा, नवीन प्रदेश ताब्यात घ्यावा, स्वतंत्र कारभार करावा परंतु त्यातील काही हिस्सा छत्रपतींना दयावा. निष्ठा मराठी राज्याशी ठेवावी अशी ती व्यवस्था होती. या योजनेत काही दोष असले तरी त्या कालखंडात ती उपयुक्त ठरली. सरदारांमधील आपआपसातला संघर्ष काही काळ थांबला. मराठ्यांनी नवीन प्रदेश जिंकून घेतला व मराठा साम्राज्याचा विस्तार झाला. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळापासून चालू असणाऱ्या वतनदारी पध्दतीचे रुपांतर मराठा मंडळात झाले. या मराठा मंडळातील सरदारांच्या कार्याचा आढावा सदर प्रकरणामध्ये आपण घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ रघुजी भोसले

महाराष्ट्रात भोसल्यांची अनेक घराणी अस्तित्वात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कुळ भोसले घराण्यातील होते. नागपूरकर भोसल्यांची शाखा याच घराण्यातील होती. नागपूरकर भोसले घराण्याची शाखा हिंगणीकर म्हणूनही ओळखली जात असे. कारण ते मूळचे पुणे जिल्ह्यातील हिंगणीजवळील बेर्डी येथील होते. हिंगणी बेर्डीचे मुधोजी व रूपाजी हे दोन भाऊ शहाजी राजे भोसले यांचे समकालीन होते. मुधोजी भोसल्यांचा मुलगा परसोजी भोसले यांनी संभाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर राजाराम महाराज गादीवर बसल्यानंतर त्यांना मोलाची मदत केली. राजाराम महाराज यांनी जरी-पटका, 'सेनासाहेबसुभा' ही पदवी देवून परसोजी भोसलेचा सत्कार केला होता.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर इ. स. १७०७ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांची मुगलांच्या कैदेतून सुटका झाली. त्यानंतर दक्षिणेत येत असताना खानदेशात परसोजी भोसले सैन्यासह छत्रपती शाहू महाराजांना येऊन मिळाले. महाराणी ताराबाई व छत्रपती शाहू महाराज यांच्या संघर्षामध्ये त्यांनी छत्रपती शाहूंची बाजू घेतली. शाहूंना छत्रपती पद मिळवून देण्यात त्यांनी मोलाची कामगिरी बजावली. परसोजी यांचा मृत्यू १७०९ साली झाला. त्यांच्यानंतर त्याचा मुलगा कान्होजीकडे वारसाहक्क व सेनासाहेबसुभा हे पद गेले. कान्होजी नंतर रघुजी भोसले यांच्याकडे सेनासाहेबसुभा ही पदवी आली. नागपूरकर भोसले घरण्यातील एक शूर व मुत्सद्दी व्यक्ती म्हणून रघुजी भोसले यांना ओळखले जाते.

**१. जन्म व बालपण:**

रघुजी भोसले यांचा जन्म १६९८ मध्ये सातारा जिल्ह्यातील वाई मधील पांडववाडी येथे झाला. रामाचे रामभक्त रामजीपंत कोल्हटकर यांच्या कृपेने मूल जन्मास आले म्हणून त्यांचे नाव रघुजी असे ठेवण्यात

आले. त्यांच्या वडिलांचे नाव बिंबाजी व आईचे नाव काशीबाई होते. त्यांच्या वडिलांचे लहानपणीच निधन झाले. त्यांच्या आई काशीबाई व आजी बयाबाई यांनी त्यांचा सांभाळ केला.

**२. लष्करी शिक्षण:**

रघुजीस त्यांचे काका कान्होजी भोसले यांनी लष्करी शिक्षण दिले. रघुजी यांनी प्रथम शिलेदार म्हणून काका कान्होजी यांच्या हाताखाली अमरावती येथे काम केले. काकाबरोबर विविध लष्करी कारवायांमध्ये भाग घेतला. सुरुवातीच्या कालखंडात कान्होजींनी रघुजीची काळजी घेतली आणि मार्गदर्शन केले. कारण त्यांना रघुजीस दत्तक घ्यावयाचे होते. परंतु त्यांचा मुलगा रायाजी भोसले याच्या जन्मानंतर रघुजीला दत्तक घेण्याची त्यांची योजना बारगळली व त्यांचे संबंध बिघडले.

**३. सेनासाहेबसुभा किताबाची प्राप्ती :**

छत्रपती शाहू महाराज व पहिले बाजीराव पेशवे यांच्याबरोबर कान्होजी भोसले यांचे संबध फारसे चांगले नव्हते. कान्होजी छत्रपतींना विरोध करत होता. छत्रपती शाहूंनी कान्होजीस त्याच्याकडे असणाऱ्या प्रदेशाचा हिशोब मगितला तसेच त्याच्याकडे असणारी थकबाकी भरण्यास सांगितले. कान्होजीने कोणताही हिशोब दिला नाही उलट तो छत्रपतींना पैसे द्यावे लागतात म्हणून निजामाच्या आश्रयास गेला. परिणामी छत्रपती शाहू महाराजांनी रघूजीस कान्होजीचा बंदोबस्त करण्याकरीता पाठविले. रघुजीने केलेल्या हल्ल्यामध्ये कान्होजीचा सेनापती तुकोजी गुजर मृत्यू पावला. सेनापती तुकोजी गुजर यांच्या मृत्यूने कान्होजी भाम किल्ल्यावरून पळून गेले. रघुजीने सन १७३० मध्ये झालेल्या या युध्दामध्ये कान्होजीचा 'वणी' येथे निर्णायक पराभव केला व त्यास पकडून साताऱ्यास आणले. छत्रपती शाहूंनी त्यास सातारच्या किल्ल्यात कैदेत ठेवले. कान्होजीच्या जागी रघूजीची नेमणूक केली व रघुजीस सेनासाहेबसुभा हा किताब दिला.

**४. देऊर व वऱ्हाडच्या सुभ्याची प्राप्ती:**

छत्रपती शाहू महाराजांनी कोरेगाव तालुक्यातील देऊर हे गाव मोकासा म्हणून रघुजीस दिले त्यामुळे पुढे त्यांना देऊरकर म्हणूनही संबोधण्यात येऊ लागले. छत्रपती शाहू महाराज यांनी वऱ्हाडच्या सुभ्यावर रघुजी भोसले याची नियुक्ती केली. तसेच वऱ्हाड प्रांताचा मोकासाही रघूजीस दिला. वऱ्हाड मधील भाम येथे आपले स्थान स्थिर झाल्यानंतर रघुजीने देवगढ, गढा-मंडले, चांदा व छत्तीसगड या प्रदेशांतील गोंड राज्यांकडे लक्ष दिले.

**५. रघुजी व गोंड राज्ये:**

रघुजीने गोंड राज्यावर आपले नियत्रंण मिळवण्याचा प्रयत्न केला. त्याकरीता त्यांनी आपल्या सैन्यासह भंडारावर आक्रमण केले. यावेळी देवगड येथिल वलीशाह यांने आपला दिवाण रघुनाथसिंग यास रघुजीचा बंदोबस्त करण्याकरीता पाठवले. वैनगंगा येथे झालेल्या युध्दात रघुनाथसिंग याचा पराभव झाला. भंडारा किल्ल्यास रघुजीने वेढा दिला. भंडारा किल्ल्याच्या किल्लेदारांने २२ दिवस प्रतिकार केला मात्र शेवटी त्यांने शरणागती पत्करली.

देवगडमधील अंतर्गत संघर्षात देवगढची राणी रतनकुंवर हिला रघुजी भोसले यांनी सर्वतोपरी मदत केली आणि वलीशाहचा पराभव केला. रतनकुंवरने रघूजीस तिसरा मुलगा मानून आपल्या राज्याचा तिसरा हिस्सा, खर्चास १० लाख रुपये दिले. देवगडचा भाग आपल्या ताब्यात घेवून रघुजीने आपले मुख्यालय भामहून नागपूर येथे हलवले. रघुजीने संपूर्ण गोंडवना जिंकून नागपूर येथे आपली राजधानी स्थापन केली.

**६. कर्नाटक स्वारी:**

औरंगजेब बादशहाच्या मृत्यूनंतर कर्नाटक प्रातांत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. कर्नाटकातील विविध संस्थाने सत्ता विस्तारासाठी आपआपसात लढत होती. तंजावर या मराठ्यांच्या संस्थानामध्ये बेंगलोर, होस्कोट, कोलार, बाळापूर आणि सिरा या परगण्याचा समावेश होता. तंजावर मधून नियमित खंडणी मराठयांना येत नव्हती. उलट नवाबाचे अत्याचार वाढतच चालले होते. नवाबाच्या अत्याचाराने संतापलेल्या छत्रपती शाहूंनी नागपूरचे रघुजी भोंसले आणि अक्कलकोटचे फत्तेसिंह भोंसले यांना अन्यायाचा बंदोबस्त करण्याकरीता कर्नाटक मोहिमेवर पाठविले. कर्नाटक मोहिमेवर असतांना रघुजीने तिरुचिरापल्लीपर्यतचा प्रदेश जिंकून घेतला. यावेळी तंजावरचा कारभार प्रतापसिंह पाहत होता. मात्र तंजावरवर नबाब आक्रमण करू पाहत होता. प्रतापसिंहाने छत्रपती शाहू महाराज यांच्याकडे मदतीसाठी अवाहन केले. यावेळी रघुजी भोसले व फत्तेसिंग यांनी मोठ्या फौजेनिशी आक्रमण केले. अर्काटचा सत्ताधीश नवाब चंद्रासाहेब याची त्रिचनापल्ली घेऊन त्यास कैद केले व साताऱ्यास पाठवून दिले. कर्नूलच्या नवाबाकडून खंडणी वसूल केली. शाहूंचा मानलेला मुलगा फत्तेसिंह भोसले याच्याकडे तंजावरचा कारभार सोपवून ते सातारा येथे आले. तंजावरची मोहिम त्यांनी यशस्वीरित्या पार पाडली. कर्नाटक मोहिमेतील रघुजीचे नेतृत्व व चातुर्य यामुळे मराठा दरबारात रघुजीची प्रतिष्ठा वाढली.

**७. बंगालवर स्वारी:**

रघूजीचा काका कान्होजी भोसले यांनी बंगालमधील ओरिसामध्ये आपला सत्ताविस्तार केला होता. छत्रपती शाहू महाराज यांनी रघुजीस बेरार आणि गोंडवनाची सनद दिली आणि छत्तीसगड, पाटणा, अलाहाबाद आणि मुर्शिदाबाद येथिल चौथाई गोळा करण्याचा अधिकार दिला. बंगालमधील राजकीय परिस्थिती गोंधळाची होती. मुर्शिदाबाद येथील नबाबाच्या अधीन बंगाल, बिहार आणि ओरिसाचा प्रदेश होता. मुर्शिदाबादचा नबाब मुर्सिद कुलीखान १७२७ मध्ये मृत्यू पावला त्यानंतर सर्फराजखान व पुढे अलिवर्दीखान नबाब बनले. रघुजीने बंगालवर स्वारी करून बंगालचा पश्चिम भाग व ओरिसा हे प्रदेश जिंकले. आपला सेनापती भास्करराम कोल्हटकर याच्या नेतृत्वाखाली सैन्य दिले होते. त्यांने बंगाल व आसपासच्या प्रदेशावर स्वारी करून बराचसा प्रदेश ताब्यात घेतला. मुर्शिदाबादपर्यंत अनेकदा स्वारी केली व मोगल सुभेदार अलीवर्दीखान नवाबाकडून खंडणी गोळी केली.

**८. पेशवे व रघुजी भोसले संबध:**

पेशवा पहिला बाजीराव आणि रघुजी यांचे संबंध फारसे सलोख्याचे नव्हते. पुढे बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशव्यांचा तर पेशवेपदाच्या वेळी रघुजी भोसले हे प्रतिस्पर्धीच बनल्याचा समज होता.

छत्रपतींनी रघूजीस नेमून दिलेल्या कार्यक्षेत्रात उभयपक्षी होणारा हस्तक्षेप हे पेशवा व रघूजी यांच्यातील तणावाचे प्रमुख कारण होते. छत्रपती शाहूंनी मोठ्या कौशल्याने रघुजी व पेशवे यांच्यामधील संघर्ष काही काळ मिटवला होता. नानासाहेब पेशव्यांनी रघूजीच्या वाढत्या सत्तेस पायबंद घालण्यासाठी पातशाहा आणि नवाब यांच्याशी संधान बांधून उत्तरेकडे स्वारी केली. तथापि रघुजीचा पराक्रम पाहून नवाबही शरण आला व त्याने तह करून बंगाल–बिहार–ओरिसामधील मराठ्यांचे चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मान्य केले. यामुळे साहजिकच रघूजीचे मध्य–पूर्व भारतात प्रभुत्व प्रस्थापित झाले.

छत्रपती शाहू महाराज यांनी रघुजी आणि पेशवे यांच्यामध्ये ३१ ऑगस्ट १७४३ रोजी सातारा येथे एक करार घडवून आणला. या करारानुसार बेरारपासून कटक, बंगाल आणि लखनौपर्यंतचा सर्व प्रदेश रघुजीला देण्यात आला. पश्चिम बाजूस अजमेर, आग्रा, प्रयाग आणि माळवा पर्यंतचा प्रदेश पेशव्यांना देण्यात आला. उभय पक्षांनी एकमेकाच्या प्रदेशामध्ये कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करू नये असे ठरले होते.

**९. छत्रपती शाहू महाराज व रघुजी संबध:**

रघूजी भोसले धाडसी, महत्त्वाकांक्षी आणि शूर होते. शाहूंना छत्रपती पद मिळवून देण्यामध्ये त्यांचे वडील व त्यांचा सहभाग होता. छत्रपती शाहूंची त्याच्यावर विशेष मर्जी होती. शाहूंनी आपली चुलत मेहुणी सुकाबाई हिच्याबरोबर रघुजीचा विवाह लावून दिला होता. त्यामुळे उभयंतामधील संबध अधिकच दृढ झाले होते. शाहूंनी आपल्या मुलास मृत्यूपूर्वी छत्रपतींच्या गादीवर दत्तक घ्यावे असे रघुजीस वाटत होते. मात्र पेशव्यांचा असणारा विरोध लक्षात घेवून त्यांनी हा प्रश्न अत्यंत कौशल्याने हाताळला आणि रघुजी व नानासाहेब या दोन बलाढ्य व्यक्तींना धूर्तपणे अलग ठेवले. छत्रपती शाहू महाराज यांनी रघुजीस लखनौ, अलाहाबाद, मुर्शिदाबाद, माळवा सुभ्यातील काही प्रदेश, बिहार मधील हाजीपूर आणि पाटणा या प्रमुख मुगल प्रदेशांवर चौथाई आणि मोकासा लावण्याचा अधिकार बहाल केला होता.

बंगालमधील स्वारीनंतर रघूजीच्या हातून विशेष कामगिरी झाली नाही. १४ फेब्रुवारी १७५५ रोजी रघुजीचा मृत्यू झाला. जानोजी, साबाजी, मुधोजी आणि बिंबाजी असे पुत्र होते. त्याच्या इच्छेनुरूप जानोजीकडे सेनासाहेबसुभा हे पद गेले. परंतु नंतर रघूजीच्या मुलांमध्ये भाऊबंदकी माजून नागपुरकरांची सत्ता खिळखिळी होत गेली.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१**

- **खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पूर्ण करा.**

  १. परसोजी भोसले यास 'सरसेनासुभा' ही पदवी .......... यांनी दिली.

  अ. छत्रपती शिवाजी महाराज ब. छत्रपती संभाजी महाराज

  क. छत्रपती राजाराम महाराज ड. महाराणी ताराबाई

  २. रघुजी भोसले यांनी ............. येथे आपले मुख्य लष्करी ठाणे केले.

अ. नागपूर        ब. कोल्हापूर        क. सातारा        ड. पुणे

३. छत्रपती शाहू महाराज यांनी आपल चुलत मेव्हणी ........... बरोबर रघुजीचा विवाह लावून दिला.

अ. सुकाबाई        ब. ताराबाई        क. चिमाबाई        ड. सोयराबाई

४. रघुजी भोसले यांना लष्करी शिक्षण ............ यांनी दिले.

अ. कान्होजी भोसले        ब. लिबांजी भोसले

क. जानोजी भोसले        ड. साबाजी भोसले

५. देवगडची राणी रतनकुंवरने ........... यास आपला तिसरा मुलगा मानले होते.

अ. रघुजी भोसले        ब. परसोजी भोसले

क. लिंबाजी भोसले        ड. कान्होजी भोसले

## ३.२.२ परशुरामभाऊ पटवर्धन

कोकणामधील आनेक घराणी आपले नशीब आजमावण्यासाठी उत्तरेकडे आले. कोकणातून देशावर आलेल्या घराण्यापैकी पटवर्धन हे एक घराणे होते. पटवर्धन घराणे मूळचे रत्नागिरी जिल्ह्यातील कोतवडे गावचे होते. कर्तबगार व पेशव्यांचे निष्ठावान म्हणून ते प्रसिध्द होते. पटवर्धन घराण्याचा मूळ पुरुष हरभट पटवर्धन हे वैदिक ब्राह्मण होते. गणपतीपुळे मधील प्रसिध्द पुरोहित शेंडे यांच्या मुलीबरोबर हरभट पटवर्धन यांचा विवाह झाला. विवाहानंतर जवळ जवळ बारा वर्षे ते गणपतीपुळे येथे वास्तव्यास होते. नोकरीनिमित्त त्यांनी गणपतीपुळे सोडले. कोकणातून देशावर आल्यानंतर कापशीकर घोरपडे घराण्याचे मंत्री नारायण महादेव जोशी यांच्या पदरी कौटुंबिक पुरोहित म्हणून ते काम पाहू लागले. नारायण जोशी यांनी त्यांना इचलकंरजी लगतचा भाग इनाम म्हणून दिला. हरभट पटवर्धन यांना एकूण सात मुले होती त्यापैकी गोविंदपंत, त्रिबंकपंत व रामचंद्रपंत, पटवर्धन हे कर्तबगार होते.

### १. लष्करी शिक्षण :

परशुरामभाऊ पटवर्धन हे रामचंद्र पटवर्धन यांचे पुत्र होते. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यांचे संगोपन त्यांच्या आई आणि काका गोविंदराव पटवर्धन यांनी केले. गोविंदराव पटवर्धन यांनी त्यांना लष्करी शिक्षण दिले.

पटवर्धन सरदार घराणे पेशवे कालखंडात प्रामुख्याने राजकीय पटलावर पुढे आले. पानिपत युद्धानंतर खऱ्या अर्थाने या घराण्याचा विकास झाला. मिरज, कुरुंदवाड व तासगाव ही पटवर्धनांचे प्रमुख सत्ता केंद्र होती. पटवर्धनांचे प्रमुख गोविंदपंत पटवर्धन होते. पटवर्धन सरदारांचा सर्वात मिळून एक पुढारी सरदार असे

व त्याच्याकडे सर्व सरंजामाचे सूत्रे दिली जात असत. पेशवे कालखंडात अखेरच्या कालखंडात परशुरामभाऊ पटवर्धन हे सर्व पटवर्धन फौजेचे प्रमुख म्हणून कार्य करत होते.

नानासाहेब पेशव्यांच्या मृत्यूनंतर माधवराव हे पेशवे झाले. माधवराव पेशवे अल्पवयीन होते त्यामुळे त्यांचे काका राघोबादादा साम्राज्याची धुरा सांभाळत होते. राघोबादादाच्या कारभारास दरबारातील मंडळी कंटाळली होती. मात्र पुढे माधवराव पेशव्यांनी सर्व सत्ता आपल्या हाती घेतली. त्यामुळे राघोबादादा व माधवराव पेशवे यांच्यामध्ये संघर्ष होवू लागला. यावेळी राघोबादादांच्या कारभाराला कंटाळून परशुरामभाऊंनी माधवराव पेशवे यांची बाजू घेतली. परिणामी राघोबादादांने परशुरामभाऊंची सर्व मालमत्ता जप्त केली. मात्र माधवराव पेशवे यांनी निजामाबरोबर झालेल्या राक्षसभुवन येथील लढाई नंतर परशुरामभाऊंना मदत केली. यानंतरच्या अनेक लढायांमध्ये परशुरामभाऊंनी मराठ्यांच्यावतीने महत्त्वाची भूमिका बजावली.

**२. बारभाई प्रकरणात परशुरामभाऊंची भूमिका :**

नारायणराव पेशव्यांच्या मृत्यूनंतर बारभाई प्रकरण घडून आले. दरबारातील महत्वाच्या व्यक्तींनी एकत्र येवून नारायणराव पेशव्याच्या वधानंतर पेशवे बनलेल्या राघोबादादास पेशवे पदावरून पदच्युत केले. यावेळी राघोबादादा कर्नाटक मोहिमेवर होते. बारभाईमधील मंडळीनी सखारामबापू बोकील यांच्याकडे बारभाईचे नेतृत्व दिले. नारायण पेशव्यांची विधवा पत्नी गंगुबाई या गरोदर होत्या त्यांच्या प्रसुती पर्यंत सखारामबापू यांच्या सल्ल्याने कारभार पहावा असे ठरले. राघोबादादा व आनंदीबाई यांच्या पासून गंगुबाईस धोका आहे हे ओळखून त्यास पुरंदर गडावर ठेवण्यात आले. तेथे पुर्णपणे कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. या बंदोबस्ताची व गंगुबाईच्या सुरक्षेची महत्वाची जबाबदारी परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडे होती. या तणावपूर्ण काळात गंगुबाईंच्यापोटी सवाई माधवरावांचा जन्म झाला आणि पुढील पेशवे म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

**३. पटवर्धन व करवीर संघर्ष–**

पटवर्धन व करवीरचे छत्रपती यांच्यात दीर्घकाळ संघर्ष होता. करवीरचे छत्रपती आणि पेशवे यांच्या दुरावलेल्या संबंधामुळे पटवर्धन घराण्याचा पेशव्यांच्या कालखंडामध्ये उत्कर्ष झाला. करवीर छत्रपतीवर नियंत्रण ठेवणे या उद्देशाने पेशव्यांनी पटवर्धन बंधूंना करवीरच्या सीमा भागात जहागिरी दिल्या. करवीरच्या छत्रपतींच्या वर दबाव टाकणे. छत्रपतींच्यावर नजर ठेवणे हे जहागिरी देण्यापाठीमागे महत्त्वाचे कारण होते. पटवर्धन सरदार अत्यंत पराक्रमी व पेशव्याचे अत्यंत विश्वासू एकनिष्ठ सरदार होते. पेशव्यांच्यामुळे पटवर्धन आणि करवीर छत्रपती यांचा राजकीय संघर्ष दीर्घकाळ पहावयास मिळतो.

पेशव्यांच्यावतीने पटवर्धन सरदार करवीरचे छत्रपती बरोबर लढले. पटवर्धनांचे प्रमुख कोन्हेरराव पटवर्धन यांनी वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या लढाईमध्ये करवीरकरांच्यावर मात केली. सन १७७९-९० या दरम्यान करवीर बरोबर झालेल्या संघर्षाचे नेतृत्व परशुरामभाऊ पटवर्धन यांनी केले होते. करवीरचे छत्रपती शिवाजी दुसरे व त्यांचे सहकारी रत्नाकरपंत हे पटवर्धनांच्या प्रदेशावर हल्ले करून हस्तक्षेप करत होते. तेव्हा

सर्व पटवर्धन सरदारांनी परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली कोल्हापूरवर १७८९ मध्ये आक्रमण केले. यावेळी करवीर छत्रपतींचे शिरोळ हे ठाणे पटवर्धन फौजानी आपल्या नियंत्रणाखाली आणले. या संघर्षामध्ये करवीर छत्रपतींचे सरदार येसाजी शिंदे, मानाजी काकडे, सखोजी भोसले या सरदारांचा मोठा पराभव झाला.

परशुरामभाऊ पटवर्धन यांनी १७९२ मध्येही पेशव्यांच्या आदेशांने करवीर विरोधात मोहीम काढली. करवीरच्या प्रदेशावर जबरदस्त हल्ला करून छत्रपतीच्या फौजेचा पराभव केला. करवीर बरोबर तह करून तीन लाख रुपयाची खंडणी वसूल केली. परशुरामभाऊ पटवर्धन व करवीर यांच्यामध्ये १७९९ मध्ये पुन्हा संघर्ष झाला. पट्टणकोडोली येथे झालेल्या या लढाईत परशुरामभाऊ पटवर्धन जखमी झाले व त्यातच त्यांचा १७९९ ला मृत्यू झाला.

**४. कर्नाटकवर स्वारी –**

सन १७८२ मध्ये हैदरअलीच्या मृत्यूनंतर टिपू सुलतान म्हैसूरच्या गादीवर आला. पेशव्यांचे सरदार भावे त्यावेळी कर्नाटक प्रांतात होते. भावेच्यांवर आक्रमण करून टिपूने पेशव्यांचा प्रदेश आपल्या ताब्यात घेतला होता. सन १७८६ मध्ये नाना फडणविस यांनी परशुरामभाऊ पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली टिपू सुलतान विरोधी मोहीम काढली. मोहिमेत त्यांच्याबरोबर अक्कलकोटकर भोसले, मुरारराव घोरपडे, रघुनाथराव पटवर्धन, गणेशपंत बेहरे इत्यादी सरदार होते.

**५. बदामीचा किल्ला हस्तगत–**

परशुरामभाऊ पटवर्धन यांनी टिपू सुलतानवर आक्रमण केले. १५ एप्रिल १७८६ च्या दरम्यान बदामीच्या किल्ल्यावर पटवर्धन सरदारांनी हल्ला करून बदामीचा किल्ला हस्तगत केला. या बदामी किल्ल्याच्या संघर्षात पटवर्धन यांनी मोठा पराक्रम केला होता.

**६. गजेंद्रगडचा किल्ला हस्तगत–**

पटवर्धन फौजांनी टिपूच्या ताब्यातील बदामीचा किल्ला घेतल्यानंतर बदामीच्या आग्नेयेस ३० मैलावर असणाऱ्या गजेंद्रगड किल्ल्यावर आक्रमण केले. गजेंद्रगडचा किल्ला टिपूचा सेवक रजबखान याच्या नियंत्रणाखाली होता. परशुरामभाऊ पटवर्धन यांनी आपल्या फौजा या किल्ल्यावर रवाना केल्या व गजेंद्रगडचा किल्ला जिंकून घेतला. मराठे व टिपूसुलतान यांच्यामध्ये यावेळी गजेंद्रगडचा तह झाला.

**७. धारवाडची मोहीम –**

नाना फडणविस यांनी मार्च १७९१ ला धारवाडची मोहीम परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडे सोपवली. धारवाडचा किल्ला हस्तगत केल्याशिवाय आपल्याकडे टिपू सुलतानाचा पुढील प्रदेश ताब्यात येणार नाही म्हणून धारवाडची मोहीम हाती घेण्यात आली होती. धारवाडचा किल्ला टिपू सुलतानाचा सरदार बदरी जमाल खान याच्या नियंत्रणाखाली होता. पटवर्धन फौजेने धारवाडच्या किल्ल्याला मार्च १७९१ मध्ये वेढा दिला. तोफांचा मोठ्या प्रमाणात मारा करून किल्ल्याचे तट उध्वस्त करून टाकले. एप्रिल १७९१ पर्यत अवघ्या

दोन महिन्यात धारवाडचा किल्ला पटवर्धन फौजांनी आपल्या ताब्यात घेतला. या लढाईमध्ये परशुरामभाऊ पटवर्धन यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**८. श्रीरंगपट्टणची स्वारी –**

सन १७९१ मध्ये पेशवे, निजाम आणि ब्रिटिश फौजांनी एकत्रितरित्या टिपू सुलतान याच्या विरोधात मोहिम काढली. या मोहीमेत पेशवे सरकारच्या वतीने परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडे पटवर्धन फौजेचे नेतृत्व होते. या संघर्षात कुरुंदवाडची फौज रघुनाथराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली सामील झाली होती. या स्वारीचा मुख्य उद्देश खालील प्रमाणे होता.

१. पटवर्धन सरदारांच्या नियंत्रणाखालील बराचसा प्रदेश टिपू सुलतान यांनी घेतला होता तो परत मिळवणे.

२. मोती तलावाच्या लढाईत १७७१ पटवर्धनांचा पराभव झाला होता त्याचा सूड घेणे.

श्रीरंगपट्टण येथे झालेल्या संघर्षात पटवर्धन फौजांनी गावे लुटणे, संपत्ती मिळवणे, जाळपोळ करणे अशी कृत्ये केली. पटवर्धन फौजांनी होळी हुन्नूर, तुमकुर, शिमोगा, चित्रदुर्ग, हसनवेळळूर इत्यादी टिपू सुलतान यांच्या वर्चस्वाखाली असणारा प्रदेश हस्तगत केला.

**९. शृंगेरी मठ लूट प्रकरण–**

टिपू सुलतान व मराठी फौजा यांचा श्रीरंगपट्टण या ठिकाणी संघर्ष झाला. श्रीरंगपट्टण स्वारीत रघुनाथ पटवर्धन यांच्या फौजाही सहभागी होत्या. रघुनाथराव पटवर्धन यांच्या फौजेने वाटेत लागणाऱ्या शृंगेरी मठाची लूट केली. परशुरामभाऊ पटवर्धन यांना ही माहिती होताच त्यांनी रघुनाथराव पटवर्धन यांच्याकडे या घटनेविषयी नाराजी व्यक्त केली. मठाची संपत्ती लुटली आहे ती मठास परत करावी असा आदेश दिला. मात्र रघुनाथराव पटवर्धन यांनी त्यास नकार दिला त्यामुळे इथून पुढे पटवर्धन सरदारांमध्ये आपापसात संघर्ष वाढत गेला.

**१०. दुसरे बाजीराव पेशवे व पटवर्धन संघर्ष–**

सवाई माधवराव पेशवे यांचा मृत्यू १७९५ मध्ये झाला. पेशवेपदाकरीता दुसरा बाजीराव व चिमाजी आप्पा यांच्यामध्ये संघर्ष सुरू झाला. या संघर्षामध्ये नाना फडणविस यांनी चिमाजी आप्पा यांची बाजू घेतली. नाना फडणविस यांना चिमाजी आप्पा यास पेशवे पद द्यावयाचे होते. याचदरम्यान पटवर्धन सरदारांचे नेतृत्व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्याकडे होते. परशुरामभाऊ पटवर्धन यांनी नाना फडणविस यांच्या मताप्रमाणे चिमाजी आप्पा यास पेशवेपद देण्यासाठी सहकार्य केले. मात्र पेशवे पदाच्या या संघर्षामध्ये दुसऱ्या बाजीरावास पेशवेपद मिळाले. परिणामी दुसरा बाजीराव व परशुरामभाऊ पटवर्धन यांच्यात संघर्ष निर्माण झाला. दुसरे बाजीराव पेशवे यांनी पटवर्धनांचा बंदोबस्त करण्यासाठी बापू गोखले यांची नेमणूक केली. बापू गोखले यांनी पटवर्धनाचे सरंजाम जप्त करण्याच्या दृष्टीने मोहिम आखली व परशुरामभाऊ पटवर्धन यांचे सरंजाम जप्त केले. पटवर्धन व इतर सरदारांनी याप्रसंगी आपले सरंजाम जप्त होऊ नये म्हणून

दुसरे बाजीराव पेशवे यांना खंडणी देण्याचे मान्य केले. मोठ्या प्रमाणात खंडणी दुसरे बाजीराव पेशवे यांना दिली व आपले सरंजाम जप्त होण्यापासून वाचवले.

**११. निजामा विरुद्ध मोहीम –**

नाना फडणविस यांनी सन १७९५ मध्ये निजामाविरुद्ध मोहीम हाती घेतली. या मोहिमेचे नेतृत्व पटवर्धन सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांना दिले होते. या मोहिमेचे महत्त्वाचे कारण खालीलप्रमाणे होते –

१. सन १७१८ च्या तहानुसार चौथाई आणि सरदेशमुखी निजामाच्या प्रदेशातून वसूल करणे.

२. निजामाने ठरल्याप्रमाणे बीड परगणा पेशवे सरदार महादजी शिंदे यांना देणे गरजेचे होते मात्र त्यास त्यांनी नकार दिला होता.

३. निजामाची फौज पेशव्यांच्या प्रदेशामध्ये विनाकारण त्रास देत असे त्यांचा बंदोबस्त करणे. या कारणामुळे नाना फडणविस यांनी निजामा विरोधी मोहीम काढली.

परशुरामभाऊ पटवर्धन यांनी निजामाच्या प्रदेशावर आक्रमण केले आणि कर्जत-मिरजगाव मार्गे खर्डापर्यंतचा प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली आणला. खर्डा प्रदेशात घोडेगाव, फकराबाद, धानोरे रत्नापूरच्या आसपासच्या प्रदेशात आपल्या फौजा युद्धाच्या तयारीने उतरवल्या. निजामाची फौज खर्डा गावच्या हद्दीमध्ये युद्धाच्या तयारीने आली. ११ मार्च १७९५ मध्ये पेशव्यांची फौज आणि निजामाची फौज यांच्यामध्ये प्रचंड मोठे युद्ध झाले. या खर्डाच्या लढाईत पटवर्धन फौजांनी मोठा पराक्रम केला. निजामाच्या फौजांनी खर्ड्याच्या रणांगणावरून पळ काढून खर्डाच्या किल्ल्यात आश्रय घेतला. शेवटी पटवर्धन फौजांनी खडर्याचा किल्लाही हस्तगत केला आणि लढाईत निजामाला पराभव पत्करावा लावला. शेवटी निजामाने पटवर्धन सरदारांच्या मदतीने तह केला आणि खर्डाच्या लढाईची समाप्ती झाली. पेशवे व निजाम यांच्यामध्ये तह झाला. या तहानुसार निजामाने ३५ लाख रुपये वसुलीचा प्रेदेश आणि तीन कोटी दहा लाख रुपये रोख देण्याचे वचन दिले. या खड्र्याच्या संघर्षात पटवर्धन सरदारांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**१२. प्रथम इंग्रज मराठा युध्दात सहभाग:**

मराठे व इंग्रज यांच्यामध्ये प्रथम इंग्रज मराठा युद्ध सन. १७७८-७९ मध्ये घडून आले. पुणे येथील तळेगावामध्ये झालेल्या युध्दात ब्रिटिशांचा पराभव झाला. इंग्रज व मराठे यांच्यामध्ये वडगावचा तह झाला. इंग्रजांनी रघुनाथरावांना महादजी शिंदे यांच्या स्वाधीन केले. मात्र काही दिवसातच रघुनाथराव निसटून पुन्हा इंग्रजांस जावून मिळाले. परीणामी इंग्रजांनी मराठ्यांच्यावर आक्रमणाची तयारी चालवली व पुन्हा इंग्रज मराठे युध्द सुरू झाले. मराठा सैन्याबरोबर झालेल्या युध्दात इंग्रजांचा टिकाव लागला नाही. इंग्रजांनी महादजी शिंदे यांच्याकरवी मराठ्यांच्याबरोबर तह केला. पटवर्धनांनी ब्रिटीश सैन्याविरुद्धच्या यासर्व लढायांमध्ये भाग घेवून महत्वाची भूमिका बजावली.

परशुरामभाऊ पटवर्धन यांनी ६० वर्षाच्या कारकिर्दीत अनेक लढायांमध्ये भाग घेतला. त्यांचा मृत्यू सन. १७९९ मध्ये करवीरकरांशी लढताना पट्टणकोडोली येथे झाला. पट्टणकडोली येथे परशुरामभाऊ पटवर्धन यांचा मृत्यू झाला तेथेच त्यांची समाधी बांधण्यात आली आहे.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०२**

- खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पूर्ण करा.

  १. पटवर्धन घराणे मूळचे ............. जिल्ह्यातील कोतवडे गावचे होते.

  अ. रत्नागिरी  ब. सांगली  क. रायगड  ड. कोल्हापूर

  २. पटवर्धन घराण्याचा मूळ पुरुष .......... हे होते.

  अ. गोविंदपंत पटवर्धन  ब. रामचंद्र पटवर्धन

  क. कोन्हेरराव पटवर्धन  ड. हरभट पटवर्धन

  ३. पेशवे राघोबादादा यांच्या पासून पेशवे नारायणराव यांच्या पत्नी गंगुबाईस धोका आहे हे ओळखून त्यास ...........गडावर ठेवण्यात आले.

  अ. रायगड  ब. पुरंदर  क. पन्हाळा  ड. राजगड

  ४. शृंगेरी मठाची लूट ..............यांनी केली होती.

  अ. परशुरामभाऊ पटवर्धन  ब. रघुनाथराव पटवर्धन

  क. कोन्हेरराव पटवर्धन  ड. गोविंदपंत पटवर्धन

  ५. परशुरामभाऊ पटवर्धन यांची समाधी ........... येथे आहे.

  अ. पट्टणकोडोली  ब. श्रीरंगपट्टण  क. बदामी  ड. तळेगाव

### ३.२.३ कान्होजी आंग्रे

मराठा साम्राज्याचा विस्तार होण्यापाठीमागे समुद्रावर मराठयांनी मिळवलेले वर्चस्व ही बाबही कारणीभूत होती. कान्होजी आंग्रे हे मराठा नौदलाचे सेनापती होते. ''समुद्रातला शिवाजी'' (समुद्राचे शिवाजी) म्हणून ते इतिहासात प्रसिद्ध होते. त्यांना सरखेल आंग्रे या नावानेही ओळखले जात होते. मराठा इतिहासात कान्होजी आंग्रे यांचे स्थान महत्त्वाचे आहे. जवळ जवळ चाळीस वर्षे त्यांनी पश्चिम किनाऱ्यावर आपल्या सागरी सामर्थ्याने दहशत निर्माण केली होती.

**१. प्रारंभिक जीवन:**

कान्होजी आंग्रे यांचा जन्म ऑगस्ट १६६९ साली कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यातील हर्णे या गावात झाला. पुणे जिल्ह्यातील काळोसे हे आंग्रे घराण्याचे मूळ गाव होते. संकपाळ हे त्यांचे मूळ आडनाव होते.

काळोसेतील आंगरवाडी येथे त्यांचे वास्तव्य होते त्यावरून त्यांचे आंग्रे हे नाव पडले. कान्होजीचे पूर्वज शहाजीराजे व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदरी सेवेत होते. तुकोजी आंग्रे यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आरमारात २५ सैन्याची सरदारकी होती. सन १६८० मध्ये तुकोजी आंग्रे यांचे निधन झाल्यानंतर कान्होजी आंग्रे यांच्याकडे सर्व सुत्रे आली. कान्होजी यांनी आपल्या कर्तबगारीवर मराठा साम्राज्यात मोठे स्थान मिळवले.

### २. मराठा आरमाराचे प्रमुख:

छत्रपती संभाजी महाराजांच्या काळात कान्होजी आंग्रे हे सुवर्णदुर्ग येथे नोकरीस होते. सुवर्णदुर्गचा किल्लेदार अचलोजी मोहिते हा होता. सन १६८८ मध्ये अचलोजी पैसे घेउन फितुरीने सुवर्णदुर्ग किल्ला सिद्दी कासमकडे देणार होता. सदरची बातमी कान्होजींस कळल्यानंतर त्यांनी सिद्दीविरुद्ध मोहिम आखली. सिद्दी कासमचा कान्होजी पुढे टिकाव लागला नाही. त्यास हार पत्करावी लागली. या युध्दात कान्होजीने मोठा पराक्रम केला. मुगलांच्या आमिष दाखवून कोकणातील किल्ले ताब्यात घेण्याच्या योजनेस कान्होजीने विरोध केला. मोगलांनी ताब्यात घेतलेले किल्ले परत काबीज करण्यास कान्होजींनी सुरुवात केली. इ.स. १६९४ ते १७०४ च्या दरम्यान त्यांनी पश्चिम किनारपट्टीवरील मुगलांकडे गेलेले मराठ्यांचे सर्व किल्ले परत घेतले. कुलाबा जिंकून त्यास आपले प्रमुख ठिकाण केले.

छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्युनंतर रायगड मुगलांच्या ताब्यात गेला. छत्रपती राजाराम महाराजांना जिंजीला जावे लागले. या कालखंडात कान्होजीने कोकण किनारपट्टीवर पराक्रम गाजवला व 'आपण कोकण किनाऱ्याचे राजे' अशी घोषणा केली. कर्तृत्व, पराक्रम आणि निष्ठा याची परंपरा कान्होजीला पूर्वजांकडून लाभलेली होती. तरीही स्वपराक्रमाने, स्वत:चा एक स्वतंत्र ठसा त्यांनी इतिहासात उमटविला. छत्रपती राजाराम महाराजांनी त्यांची ही कामगिरी व पराक्रम लक्षात घेऊन त्यांस मराठी आरमाराचे आधिपत्य देऊन 'सरखेल' हा किताब दिला.

### ३. व्यापारी जहाजावर कर आकारणी:

कान्होजी आंग्रे यांनी सत्ता हाती घेतली तेव्हा त्यांना अनेक शत्रू होते. मुंबईस्थित इंग्रज, गोव्यातील पोर्तुगीज, जंजिरा येथील सिद्दी, वेंगुर्ला येथील डच व वाडीचे सावंत या सत्ताबरोबर त्यांना संघर्ष करावा लागला. कान्होजी आंग्रे यांनी या सर्व सत्तावर आपला वचक निर्माण केला. सन १७१८ मध्ये मुंबईजवळच्या खांदेरी आणि उंदेरी या बेटांवर आपला तळ स्थापन करून मुंबई बंदराच्या प्रवेशद्वाराची नाकेबंदी केली. तसेच ये-जा करणाऱ्या व्यापारी जहाजांकडून त्यांनी कर वसुल करायला आरंभ केला.

### ४. मराठा वारसा संघर्षात कान्होजीची भूमिका:

छत्रपती राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर मराठा साम्राज्याची धूरा महाराणी ताराबाई यांनी सांभाळली. महाराणी ताराबाई यांनी कान्होजींस आपल्या पक्षात सामील करून घेतले. सरखेल हा किताब त्याचेकडेच कायम ठेवला. तसेच त्यास राजमाचीचा किल्ला व भिवंडी प्रांताचा बंदोबस्त पाहण्यास सांगितले. इ.स.

१७०७ मध्ये छत्रपती शाहू महाराज यांची मुगलांच्या कैदेतून सुटका झाली. छत्रपती शाहू महाराज यांनी दक्षिणेत येताच आपण मराठा साम्राज्याचे खरे वारसदार आहोत व सर्व सरदारांनी आपणास येवून भेटावे असे सांगितले. मात्र महाराणी ताराबाई यांनी आपण पडत्या काळात मराठा साम्राज्याचा सांभाळ केला त्यामुळे खऱ्या अर्थाने मराठा साम्राज्यावर हक्क माझ्या मुलाचा आहे असे सांगितले. अशाप्रकारे छत्रपतींच्या गादीबाबत महाराणी ताराबाई व शाहू महाराज यांच्यात वाद निर्माण झाला. यामध्ये कान्होजी महाराणी ताराबाई यांच्या बाजूने राहीले. महाराणी ताराबाई यांच्या पक्षातील एक वजनदार सरदार म्हणून त्यांचे महत्व होते. छत्रपती शाहू महाराज यांनी त्यांचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न केला.

**५. पेशवे बहिरोपंत पिंगळे यास अटक:**

शाहू महाराजांनी सातारची छत्रपतींची गादी मिळाल्यानंतर महाराणी ताराबाईच्या पक्षातील सरदारांचा बंदोबस्त करण्यासाठी मोहिम आखली. शाहू महाराजांनी ताराबाईच्या पक्षातील कान्होजी आंग्रे या प्रबळ सरदाराचा बंदोबस्त करण्याकरीता आपले पेशवे बहिरोपंत पिंगळे यास पाठविले. झालेल्या युध्दात कान्होजीनी पेशव्यांचा पराभव केला व पेशव्यास अटक केली.

**६. बाळाजी विश्वनाथ बरोबर तह:**

छत्रपती शाहू महाराजांनी पेशवे बहिरोपंत पिंगळे यांना कान्होजीनी अटक केल्यानंतर बाळाजी विश्वनाथ यास कान्होजीचा बंदोबस्त करण्याकरीता पाठवले. बाळाजी विश्वनाथ व कान्होजी यांचे पूर्वीचे मैत्रीचे संबंध होते. बाळाजी विश्वनाथ यांनी युध्द न करता कान्होजीबरोबर बोलणे केले व दोघामध्ये तह घडवून आणला. बाळाजी विश्वनाथ यांनी कान्होजींबरोबर सलोखा करून तह केला. या तहानुसार–

१. कान्होजीस जंजिरे व ६ किल्ले द्यावेत.

२. कान्होजींने शाहूचे वर्चस्व मान्य करावे.

३. छत्रपती शाहूंना वर्षास १२,००० रु. कान्होजीने द्यावेत.

४. कान्होजीकडे असणारे सरखेल हे पद कायम करण्यात यावे.

५. कान्होजीस सर्व आरमाराचे आधिपत्य देण्यात यावे.

अशा प्रकारे कान्होजी आंग्रे व छत्रपती शाहू महाराज यांच्यामध्ये तह झाला. तहानंतर कान्होजी शाहूंच्या पक्षात सामील झाले व अखेरपर्यंत निष्ठेने राहिले.

**७. कान्होजीचा परकीय सत्ताबरोबर संघर्ष:**

कान्होजींची सत्ता कोकण किनाऱ्यावर कोट मांडवेपासून त्रावणकोरपर्यंत पसरली. तत्कालीन इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, डच आणि जंजिऱ्याच्या सिद्दी या परकीयांना ही बाब अडचणीची वाटत होती. इंग्रज, डच, पोर्तुगीज व फ्रेंच यांनी कधी स्वतंत्रपणे, तर कधी संयुक्तरित्या कान्होजीच्या प्रदेशावर आक्रमण केले. परंतु

प्रत्येक वेळी त्यांना पराभव पत्करावा लागला. कान्होजी आंग्रे व इंग्रज, पोर्तुगीज या परकीय सत्ता यांच्यामध्ये कोकण किनारपट्टीवर वारंवार संघर्ष घडून येत होता. या संघर्षाचा आढावा खालील प्रमाणे-

- इ.स. १७०२ मध्ये कोचीनमध्ये सहा इंग्रजांसह काही जहाजांवर कान्होजीने ताबा मिळवला.
- इ.स. १७०६ मध्ये जंजिऱ्याच्या सिद्दीवर हल्ला केला व या झालेल्या युध्दात कान्होजीने विजय मिळवला.
- इ.स. १७१० मध्ये ब्रिटिश लढाऊ जहाज गोडोल्फिनशी दोन दिवस कान्होजीच्या सैन्याने झुंज दिली. यामध्ये कान्होजीचा विजय झाला व त्यांनी केनेरी बेटांवर (खांदेरी) कब्जा मिळवला.
- इ.स. १७१२ मध्ये कान्होजींच्या आरमाराने मुंबईचे ब्रिटिश गव्हर्नर विल्यम ऐस्लाबी यांचे खाजगी जहाज पकडले होते. यावेळी कान्होजी आणि इंग्रज यांच्यमध्ये तह झाला. तहानुसार ३०,००० रुपयांच्या खंडणीच्या मोबदल्यात ते जहाज कान्होजीने परत केले.
- इ.स. १७१७ मध्ये ब्रिटिशांनी केनेरी बेटांवर हल्ला केला. कान्होजीने तो परतवून लावला. तसेच इंग्रजाकडून ६०,००० रुपयांची खंडणी वसूल केली.
- चार्लस बून यांची मुंबईच्या गव्हर्नरपदी नेमणूक झाली. त्यांनी कान्होजींना पकडण्यासाठी प्रयत्न केला परंतु त्यांना त्यामध्ये यश मिळाले नाही. कान्होजींनीच १७१८ मध्ये इंग्रजांची तीन व्यापारी जहाजे पकडली. मुंबई बंदराची पूर्ण नाकेबंदी केली व ईस्ट इंडिया कंपनीकडून ८७५० पौंडाची खंडणी वसूल केली.
- १७२० मध्ये इंग्रजांनी कान्होजींच्या विजयदुर्ग किल्यावर हल्ला चढविला. किल्यावर तोफांचा जोरदार मारा केला, पण विजयदुर्गाची तटबंदी ते भेदू शकले नाहीत. हा हल्ला पूर्णपणे अपयशी ठरला. इंग्रजांनी माघार घेतली.
- १७२१ मध्ये व्हायसरॉयने कान्होजीं विरुद्ध इंग्रज व पोर्तुगीज संयुक्त मोहीम काढली. थॉमस मॅथ्यूज यांच्या नेतृत्वाखाली ६००० सैनिक आणि ४ मोठ्या जहाजांचा यामध्ये समावेश होता. कान्होजीनी आपल्या सरदारांच्या सहाय्याने हा हल्ला परतवून लावला.

कान्होजींनी मराठ्यांचे आरमार वृद्धिंगत आणि कार्यक्षम केले. त्यांच्या कारकिर्दीत कोकण किनारपट्टीत इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज या परकीय सत्तांवर मराठ्यांचा वचक होता. कान्होजी आंग्रेंची जहाजे त्रावणकोर कोचीनपासून उत्तरेस सुरत कच्छपर्यंत समुद्रातून निर्विवाद संचार करीत होती.

### ८. कान्होजी आंग्रेचे इतर कार्य:

कान्होजींनी कुलाबा, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग येथे सुधारीत पद्धतीचे जहाज बांधणीचे कारखाने उभारले. त्यांनी जहाजांना सुरक्षिततेची हमी म्हणून काही कर घेऊन परवाने देण्याचा यशस्वी उपक्रम युरोपीय

सत्ताधाऱ्यांप्रमाणे चालू केला. त्यामुळे मराठ्यांचा व्यापार वाढला. पोर्तुगीजांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रनिर्मितीचा कारखाना उभारला.

कान्होजींनी परकीयांनी सुरू केलेल्या धर्म प्रसारास विरोध केला. त्यांच्या प्रभावामुळे धार्मिक आक्रमणास आळा बसला होता. कान्होजी आंग्रे यांनी कोकणातील मंदिरांसह पंढरपूर, आळंदी, जेजुरी, तुळजापूर येथील देवस्थानांना इनाम व रोख देणग्याही दिल्या.

कान्होजी आंग्रे यांनी १७ व्या शतकाच्या अखेरीस अलिबाग या शहराची स्थापना केली. तसेच त्यांनी 'अलिबागी रुपया' या नावाने चांदीची नाणीही चलनात आणली होती.

परकीय आक्रमणाला तोंड देण्यासाठी भारताचा सागरी किनारा स्वराज्यात सुरक्षित ठेवण्यात कान्होजी यशस्वी ठरले. कान्होजीचा प्रतिकार करण्याची शक्ती परकीयांच्यामध्ये नव्हती कारण कान्होजीकडे बलाढ्य आरमार होते.

दिनांक ४ जुलै, १७२९ रोजी सरखेल कान्होजी आंग्रे यांचा मृत्यू झाला. अलिबाग शहरात कान्होजी आंग्रेंची समाधी आहे. मुंबईच्या नेव्हल डकयार्डमध्ये त्यांचा पुतळा उभारण्यात आला आहे.

कान्होजी आंग्रे यांनी महाराष्ट्राची नौदल प्रतिष्ठा अभूतपूर्व उंचीवर नेवून ठेवली. परकीय सत्ता सागरी वर्चस्वासाठी कित्येक वर्षे झगडत होत्या. मात्र त्यांना कान्होजी आंग्रे यांनी दाद लागून दिली नाही. ईस्ट इंडिया कंपनीने मुंबई प्रदेशात आपले वर्चस्व निर्माण केल्यानंतर पन्नास वर्षाहून अधिक काळ बलाढ्य आंग्रे यांचे सागरी वर्चस्व दडपण्याचा प्रयत्न केला परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. कान्होजी आंग्रे यांच्या नावाने १७व्या आणि १८व्या शतकात भारतात सक्रिय असलेल्या सर्व युरोपियन व्यापारी कंपन्यांच्या हृदयात दहशत निर्माण केली होती. पश्चिम किनारपट्टीवरील मच्छिमार समाज ज्यांना समुद्रकिनाऱ्याची संपुर्ण माहिती होती आणि जे जन्मत: नाविक होते त्यांनी मराठा नौदलासाठी मोठे योगदान दिले.

**स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०३**

- खालील रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडा व वाक्य पुर्ण करा.

  १. 'समुद्रातला शिवाजी' म्हणून ............... यांना ओळखले जाते.

  अ. कान्होजी आंग्रे     ब. दमाजी गायकवाड

  क. मल्हारराव होळकर     ड. महादजी शिंदे

  २. मराठा नौदलाचे पहिले सेनापती ............... हे होते.

  अ. मल्हारराव होळकर     ब. दमाजी गायकवाड

  क. कान्होजी आंग्रे     ड. महादजी शिंदे

  ३. कान्होजी आंग्रे यांचा जन्म ............ जिल्हयातील हर्णे या गावात झाला.

अ. पुणे ब. रत्नागिरी क. सिंधुदुर्ग ड. कोल्हापूर

४. .......... हे कान्होजी आंग्रे यांचे प्रमुख लष्करी केंद्र होते.

अ. अलिबाग ब. कुलाबा क. सुवर्णदुर्ग ड. कोल्हापूर

५. कान्होजी आंग्रे यांना 'सरखेल' हा किताब ............ यांनी दिला.

अ. शिवाजी महाराज ब. संभाजी महाराज

क. राजाराम महाराज ड. महाराणी ताराबाई

## ३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१. **चौथाई :** एकूण उत्पन्नातील चौथा हिस्सा.

२. **सरदेशमुखी :** एकूण उत्पन्नातील दहावा हिस्सा

३. **सरखेल :** याचा अर्थ नौदल प्रमुख असा होतो.

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०१

  १. क. छत्रपती राजाराम महाराज २. अ. नागपूर

  ३. अ. सुकाबाई ४. अ. कान्होजी भोसले

  ५. अ. रघुजी भोसले

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०२

  १. अ. रत्नागिरी २. ड. हरभट पटवर्धन

  ३. ब. पुरंदर ४. ब. रघुनाथराव पटवर्धन

  ५. अ. पट्टणकोडोली

- स्वयंअध्ययनासाठी प्रश्न – ०३

  १. अ. कान्होजी आंग्रे २. क. कान्होजी आंग्रे

  ३. ब. रत्नागिरी ४. ब. कुलाबा

  ५. क. राजाराम महाराज

## ३.५ सारांश

मराठा मंडळाच्या स्थापनेनंतर मराठा सरदारांमधील आपआपसातला संघर्ष काही काळ थांबला. मराठा सरदारांनी आपल्या ताब्यातील प्रदेशाची व्याप्ती वाढावी याकरीता युध्द मोहिमा काढल्या. नवीन प्रदेश जिंकून

घेतला व मराठा साम्राज्याचा विस्तार झाला. नागपूरचे भोसले घराणे हे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कुळीतले होते. नागपूरकर भोसल्यांनी नागपूर व आसपासच्या प्रदेशात स्वाऱ्या करून प्रदेश विस्तार केला. रघुजी भोसले यांनी कर्नाटक, बंगाल व गोंड राज्ये येथील प्रदेशावर स्वारी करून प्रदेश विस्तार केला. परशुरामभाऊ पटवर्धन यांनी आपल्या ६० वर्षाच्या कारकिर्दीत अनेक लढायांमध्ये भाग घेतला. कर्नाटक स्वारी, निजामाविरूध्दची स्वारी यामध्ये त्यांनी यश संपादन केले. पटवर्धनांनी करवीरबरोबर दिर्घकाळ संघर्ष केला. कान्होजी आंग्रे यांनी मराठा नौदलाची प्रतिष्ठा वाढवली. परकीय सत्तांवर अंकुष ठेवण्याचे काम त्यांनी केले. सागरी वर्चस्वासाठी परकीय सत्तांबरोबर त्यांचा संघर्ष झाला. मात्र प्रत्येकवेळी त्यांनी त्यांच्यावर वर्चस्व निर्माण केले. १७ व्या आणि १८ व्या शतकात भारतात सक्रिय असलेल्या सर्व युरोपियन व्यापारी कंपन्यांच्या हृदयात कान्होजी आंग्रे यांनी दहशत निर्माण केली होती.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

- टिपा लिहा.
  १. पेशवे रघुजी भोसले संबध
  २. छत्रपती शाहू महाराज रघुजी भोसले संबध
  ३. दुसरे बाजीराव पेशवे व पटवर्धन संघर्ष
  ४. पटवर्धन व करवीर संघर्ष
  ५. श्रीरंगपट्टणची स्वारी १७९१
  ६. कान्होजी आंग्रे व परकीय सत्ता संघर्ष:
  ७. मराठा वारसा संघर्षात कान्होजी आंग्रेची भूमिका
- खालील प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा.
  १. मराठा सत्तेतील रघुजी भोसले यांचे योगदान स्पष्ट करा.
  २. मराठा सत्तेतील परशुरामभाऊ पटवर्धन यांचे योगदान स्पष्ट करा.
  ३. मराठा सत्तेतील कान्होजी आंग्रे यांचे योगदान स्पष्ट करा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ

१. दळवी गो. दा., रघुजी राजे भोसले यांचे चरित्र, नागपूर, १९३१
२. राजवाडे वि.का., मराठा इतिहासाची साधने, खंड-०३
३. आपटे गो. वि., संस्थानिक पटवर्धन घराण्याचा इतिहास, वाई, १९१९
४. गर्गे स. मा., करवीर रियासतीची कागदपत्रे, खंड-०४, न्यु पॅलेस प्रकाशन, कोल्हापूर, १९८२

५. गर्गे स. मा., करवीर रियासत, दुसरी आवृत्ती, श्री शहाजी छत्रपती म्युझियम ट्रस्ट, कोल्हापूर, २००३

६. मराठी विश्वकोष

७. Deshpande Animdh and Mujawar Muphid, Rise and fall of a Brown Water Navy : Sarkhel Kanhoji Angre and Maratha Sea Power on Arabian Sea in the $17^{th}$ and $18^{th}$ Centuries, Akar Books, Delhi, 2021.

८. Surendra Nath Sen, Early Career of Kanhoji Angria and other Papers, University of Calcutta, 1941

९. Sardesai G. S. New History of the Marathas, Vol-II

❑❑❑

## घटक ४
# मराठी सत्तेचा अस्त
(Decline of the Maratha Power)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

  ४.२.१ पेशवा दुसरा बाजीराव

  ४.२.२ दुसरे व तिसरे इंग्रज मराठा युद्ध

  ४.२.३ मराठा संस्थेच्या ऱ्हासाची कारणे

४.३ परिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

१. मराठी सत्तेचे अखेरचे पर्व समजून घेता येईल

२. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीतील घडामोडींवर प्रकाश टाकता येईल

३. दुसरे इंग्रज-मराठा युद्ध समजून घेता येईल

४. तिसरे इंग्रज-मराठा युद्धाची माहिति करून घेता येईल

५. मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणमिमंसा पाहता येईल

## ४.१ प्रस्तावना :

पेशवे सवाई माधवरावांच्या अपघाती मृत्यूने मराठा साम्राज्याच्या अस्तास गती मिळून या वैभवशाली सत्तेचा विनाशाकडे प्रवास सुरू झाला. सवाई माधवरावांनी आपली कर्तबगारी सिद्ध करून दाखवली होती मात्र त्यांच्या मृत्यूनंतर नाना फडणविस व इतर काही मुत्सद्दी यांचा अपवाद वगळता कोणीही मुत्सद्दी मागे उरला नसल्याने व अकर्तृत्वान दुसरे बाजीराव पेशवे यांच्याकडे नेतृत्व गेल्याने मराठी सत्तेच्या अखेरच्या

पर्वात मोठी हानी झाली. पेशवे दुसरे बाजीराव यांच्या अकार्यक्षम व दृष्टिहीन राज्यकारभार व भूमिकेमुळे मराठी सत्तेला मोठे परिणाम भोगावे लागले. त्यातच ब्रिटिशांच्या आश्रयालाच पेशवे गेल्यामुळे ब्रिटिश-मराठा युद्धाने ब्रिटिशांनी मराठी सत्ता खिळखिळी करून टाकली. मराठी सत्तेचा अस्त हा अचानक झालेला नसून किंवा एका कारणाने झालेला नसून त्यासाठी अनेक कारणे कारणीभूत ठरलेली दिसतात. १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धात मराठ्यांची मोठी हानी झाली. एक कर्ती तरुण पिढीच नष्ट झाली. याचा दुरगामी परिणाम म्हणजेच मराठी सत्तेचा अस्त होय. एकेकाळी सभोवतालच्या बलाढ्य शत्रूंच्या छाताडावर वार करून ऐतिहासिक कामगिरीच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या मराठी सत्तेने पुढे संपूर्ण हिंदुस्थानभर आपला दबदबा निर्माण केला होता. पण पुढे जे मराठे दिल्लीच्या बादशाहीचे रक्षण करत होते तेच मराठे पानिपत युद्धात पराभूत झाल्याने आपोआपच मराठ्यांच्या राजकारणाचा अंत जवळ येऊन ठेपला होता. अशावेळी माधवराव सारख्या पेशव्यांनी व काही जाणकार मंडळींनी मराठा राज्याची घडी नीट बसवण्याचा प्रयत्न केला पण त्यांचा तो प्रयत्न व्यर्थ ठरला. कारण कर्तृत्ववान पेशव्यांची वानवा निर्माण झाल्याने व पेशवे पदासाठी संघर्षाची परिसिमा गाठल्याने मराठेशाहीचा डोलारा कोसळू लागला. शिवाय मराठीशाहीचे हस्तांतरण छत्रपतींकडून पेशव्यांकडे झाले होते. त्यातच पेशवे दुसरे बाजीराव यांच्या निष्क्रिय धोरणामुळे ब्रिटिशांनी फायदा घेऊन मराठी सत्तेचा शेवट केला. म्हणूनच सदर प्रकरणात आपण पेशवे दुसरे बाजीराव यांची कारकीर्द, इंग्रज मराठा दुसरे व तिसरे युद्ध आणि मराठी सत्तेचे अखेरचे पर्व तथा मराठी सत्तेचा अस्त यावर प्रकाश टाकणार आहोत.

**४.२ विषय विवेचन**

१७९५ मध्ये सवाई माधवराव पेशव्यांचा मृत्यू झाल्याने व त्यांना अपत्य नसल्याने पेशवे पदाच्या वारशाचा प्रश्न तयार झाला. पण योगायोगाने पेशवे पदावर हक्क सांगणारी तिन्ही राघोबा दादांची मुले होती. यामध्ये बाजीराव व चिमाजी हे औरस पुत्र तर अमृतराव हा दत्तक पुत्र होता. दुर्दैवाने यामध्ये कोणीही आपल्या पूर्वजांचा उज्वल वारसा समृद्धपणे पुढे घेऊन जाणारा कर्तबगार सेनानी नव्हता. राघोबाच्या या सर्व मुलांना राज्यकारभारापासून दूर ठेवण्याची दक्षता नाना फडणविस यांच्यासह अनेक जानकार मंडळींनी घेतली. त्यातूनच पेशवे पदाचा संघर्ष अधिकच टोकाला जाऊन कटकारस्थानांना ऊत आला. या सर्व बिकट परिस्थितीमध्ये मराठी सत्तेचे संरक्षण करण्यासाठी कुशल नेतृत्वाची गरज असतानाच बाजीराव दुसरे यांच्या हातात पेशवे पदाची सूत्रे गेली. परिणामी दुसरे बाजीराव हे अकार्यक्षम असल्याने त्याचे मोठे परिणाम मराठी सत्तेला भोगावे लागले. मराठी सत्तेतील जाणकार मंडळींना बाजीराव दुसरे यांचे धोरण न आवडल्याने त्यांनी पेशव्यांना विरोध केला. परिणामी, अस्थिर झालेले बाजीराव दुसरे इंग्रजांच्या आश्रयाला गेले. खरे तर इंग्रज याच संधीची वाट पाहत होते. इंग्रजांनी या संधीचा फायदा घेऊन बाजीरावांना सहकार्य करण्याचे अमिष दाखवून मराठी सत्ता आतून पोखरून काढली आणि शेवटी वसईच्या तहाने वैभवशाली मराठी सत्ता बाजीरावांच्या हातातून आपल्या हातात घेतली. शेवटी नाईलाजास्तव बाजीराव पेशव्यांनी इंग्रजांशी दोन हात करण्याचा निर्णय घेऊन संघर्षाची तयारी केली पण तोपर्यंत वेळ निघून गेले होती. इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे

त्याचा निभाव लागला नाही परिणामी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेली मराठी सत्ता अखेर १८१८ मध्ये ऱ्हास पावली.

### ४.२.१ (अ) पेशवा दुसरा बाजीराव

राघोबादादाच्या या सर्व मुलांना राज्यकारभारापासून दूर ठेवण्याची दक्षता नाना फडणविसांनी घेतली होती. वारसाचा प्रश्न सोडविण्यासाठी नानांनी पेशव्यांच्या नात्यातील एखादा मुलगा सवाई माधवरावांची पत्नी यशोदाबाईच्या मांडीवर दत्तक देण्याची योजना आखली व कारभार आपल्या हाती राहील हे पाहिले. भट घराण्याचा वारस हयात असताना नानांच्या दत्तक योजनेस शिंदे, भोसले, होळकर या सरदारांनी विरोध दर्शविला. म्हणून नानांनी चिमाजीस पेशवेपदावर बसविण्याची योजना आखली. याच वेळी बाजीरावाचेही पेशवेपदाच्या प्राप्तीसाठी प्रयत्न चालू होते. त्यासाठी अनेक सरदारांशी त्याने संधान साधले.

**चिमाजीस पेशवेपदाची प्राप्ती**

चिमाजीस पेशवेपदावर बसविण्याची योजना ठरविल्यानंतर त्यास पुण्यास आणण्यासाठी १४ फेब्रुवारी, १७९६ रोजी नानांनी परशुरामभाऊंना जुन्नरला पाठविले. बाजीराव व चिमाजी जुन्नरला होते. चिमाजीला परशुरामभाऊंच्या हवाली करण्यास नकार दर्शविला. चिमाजी लहान असल्याने व आपण राघोबाचा थोरला पुत्र असल्याने पेशवेपदावर आपलाच हक्क असल्याचे बाजीरावाने सांगितले. परशुरामभाऊंनी बाजीरावास समजविण्याचा प्रयत्न केला पण बाजीराव त्यास तयार झाला नाही. म्हणून परशुरामभाऊ बाजीराव व चिमाजी या दोघांनाही बरोबर घेऊन ४ मार्च, १७९६ रोजी पुण्यात आले. नाना व इतर मुत्सद्द्यांनी चिमाजीस पेशवेपदी बसविण्याच्या योजनेसाठी बाजीरावाची मनधरणी केली पण बाजीराव त्यास तयार झाला नाही. शेवटी ब्रिटिश वकील मॅलेट, नाना व इतर मुत्सद्द्यांमध्ये वाटाघाटी होऊन बाजीरावास पेशवेपदी बसविण्याचे ठरले. यानुसार झाले गेले विसरून जाण्यास व कारभार नानांकडे ठेवून त्यांच्या सल्ल्याने राज्यकारभार करण्याचे बाजीरावाने मान्य केले. मात्र ही योजना तडीस जाईल असा विश्वास कोणासच वाटत नव्हता. बाजीरावास पेशवेपदी आणण्यास नानांनी पुढाकार घेतल्याने दौलतराव शिंदे अस्वस्थ झाला. कारण बाजीरावाने पेशवेपदी येण्यासाठी दौलतरावाला कोट्यवधी रुपयांची लाच देण्याचे कबूल केले होते. नानांच्या योजनेमुळे दौलतरावास कोट्यवधी रुपयांवर पाणी सोडावे लागणार होते.

नाना व दौलतराव यांच्यातील शत्रुत्वाने उग्र स्वरूप धारण केले. पेशवे दरबारात नानांचे वर्चस्व वाढू नये यासाठी नानांचा विरोधक व शिंद्यांचा कारभारी बाळोबा तात्याने दौलतरावास ससैन्य पुण्यास बोलाविले. जिवाच्या भीतीने नानांनी पुणे सोडले. दौलतराव पुण्यात येताच त्याने बाजीरावाकडे ठरलेल्या रकमेची मागणी केली. बाजीरावाने पैसे देण्यास असमर्थता दर्शविली. बाजीरावाने नानांशी सलगी केल्याचा राग दौलतरावाच्या मनात होताच त्यामुळे त्याने बाजीरावाला कैदेत टाकले. शिंदे, होळकर व परशुरामभाऊ या सरदारांनी सवाई माधवरावांची पत्नी यशोदाबाईच्या ओटीत चिमाजीस घातले. दत्तक विधान पार पडताच छत्रपतींकडून पेशवेपदाची वस्त्रे आणून २ जून, १७९६ रोजी चिमाजीस पेशवेपदी बसविण्यात आले. अशा प्रकारे सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर सात महिन्यांनी चिमाजी पेशवेपदी आले.

**बाजीरावास पेशवेपदाची प्राप्ती**

नाना आणि शिंदे यांच्यातील वैर विकोपास गेले. शिंदेंना शह देण्यासाठी चिमाजीस पेशवेपदावरून काढून टाकण्याचा व बाजीरावास पेशवेपदी बसवून नाना फडणविसांनी आपल्या हाती सत्ता राखण्याचे कारस्थान रचले. या कारस्थानाची सूत्रे महाडहून हालविण्यास त्यांनी सुरुवात केली. म्हणून या योजनेस 'महाड कारस्थान' असे म्हटले जाते. नानांनी आपली योजना तडीस नेण्यासाठी निजाम, टिपू, इंग्रज, सिद्दी इत्यादी मराठ्यांच्या कट्टर शत्रूची मदत मिळविण्याचा प्रयत्न सुरू केला. ज्या नानांनी मराठा राज्य वाचविण्याचा आयुष्यभर कसोशीने प्रयत्न केला, त्यांनीच आपल्या स्वार्थासाठी शत्रूची मदत घेऊन राज्य विनाशाच्या गर्तेत नेले. निजामाशी करार करून खर्ड्याच्या लढाईनुसार त्याच्यावर लादलेला दंड रद्द करण्यात येऊन त्याचे सहाय्य मिळविले. दौलतरावाची लोभी वृत्ती लक्षात घेऊन सहकार्याच्या बदल्यात अहमदनगरचा किल्ला व १० लाख देण्याचे कबूल केले. या कामी सर्जेराव घाटगे यांची मदत घेतली. दौलतरावाने ऑक्टोबर, १७९६ मध्ये पेशवा चिमाजीस कैद केले. यानंतर नाना फडणविसांनी मोठ्या सन्मानाने नोव्हेंबर, १७९६ मध्ये पुण्यात प्रवेश केला आणि ५ डिसेंबर, १७९६ रोजी नाना व दौलतराव शिंदे यांनी बाजीरावास पेशवा म्हणून जाहीर केले.

**नानांच्या नशिबी कैद**

नाना आणि पेशवा दुसरा बाजीराव यांच्यात फार काळ सख्य राहिले नाही. नानांनी कैद केलेले राघोबाचे सर्व सहाय्यक बाजीरावाने मुक्त केले. बाजीराव दौलतराव शिंदेच्या तंत्राप्रमाणे वागू लागला. तुकोजी होळकराच्या मुलांमध्ये वारसासाठी वाद सुरू होता. दौलतराव व बाजीराव यांनी काशीराव या वेडपट पुत्राची बाजू घेऊन होळकरांना शह देण्याचा प्रयत्न सुरू केला. यामुळे शिंदे-होळकर यांच्यातील परंपरागत वैर उफाळून आले. पुण्यामध्ये दौलतरावाचा सासरा सर्जेराव घाटगे याने धुमाकूळ घातला. आंग्र्यांच्या घराण्यातही अंतर्गत कलह वाढीस लागला. मराठा राज्यात अनागोंदीची परिस्थिती निर्माण झाली. पेशवा बाजीरावास नानांची भीती वाटत होती. नाना जिवंत असेपर्यंत दौलतरावाने पुणे सोडू नये, त्याच्या फौजेच्या खर्चासाठी बाजीरावाने दोन कोटी रुपये द्यावेत असे ठरले होते. याच काळात महादजी शिंदेंच्या लक्ष्मीबाई व यमुनाबाई या बायकांनी दौलतरावाविरुद्ध हाती शस्त्र घेतले. कारण दत्तकविधानावेळी देण्यात आलेली आश्वासने न पाळता दौलतराव स्वैर वागू लागला होता. त्या दोघीही दौलतरावास जाब विचारण्यास आल्या असता या दत्तकपुत्राने त्यांना चाबकाने फोडून काढले व मराठ्यांच्या उज्ज्वल कीर्तीला काळिमा फासला. लक्ष्मीबाई व यमुनाबाईंना नानांची चिथावणी असावी असा दौलतरावाचा कयास झाला. त्याच्या मतास बाजीरावाने संमती दिली.दौलतरावाने नानांना भोजनास बोलावून ३१ डिसेंबर, १७९६ रोजी विश्वासघाताने कैद केले व त्यांस अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले.

नानांच्या अटकेनंतर दौलतराव शिंदे व बाजीरावाने अंदाधुंद कारभार केला. सर्जेराव घाटगेने आपली सुंदर मुलगी बायजाबाई दौलतरावास दिल्याने त्याच्या स्वैर वर्तनात वाढ झाली. या सासरे-जावयांनी पुणे व पुण्याच्या परिसराची प्रचंड लूट केली. मराठी जनतेत प्रचंड असंतोष निर्माण झाला. बाजीरावही शिंदे व

घाटगेंच्या दहशतीला कंटाळला त्यांच्या बंदोबस्तासाठी त्याने निजाम व नागपूरकर भोसल्यांशी संधान साधले. याचा सुगावा दौलतरावास लागल्याने त्याने बाजीरावावर वचक बसविण्यासाठी व पैसा मिळविण्यासाठी १४ नोव्हेंबर, १७९८ रोजी नानांची मुक्तता केली. विनाशाच्या खाईतून राज्य सावरण्यासाठी नानांकडे कारभारीपद देण्यात आले. परंतु कैदेत टाकल्यापासून मानी स्वभावाचे नाना मनाने खचले होते. त्यांची प्रकृती ढासळली होती. दिवसेंदिवस मानसिक व शारीरिकदृष्ट्या नाना खचत गेले व १३ मार्च, १८०० रोजी नानांचा शेवट झाला. नारायणरावांच्या हत्येनंतर अंतर्गत यादवीतून मराठा राज्याला बाहेर काढून उत्कर्षाप्रत नेले त्या नानांना आयुष्याच्या अखेरीस अवहेलना सहन करावी लागली. नानानंतर मराठा सत्तेला सावरणारा एकही मुत्सद्दी निर्माण झाला नाही. ''नानांबरोबर मराठेशाहीतील सर्व शहाणपण लयास गेले.'' हे कर्नल पामरचे उद्‌गार नानांनंतर मराठा सत्तेच्या झालेल्या ऱ्हासावरून यथार्थ ठरतात.

**होळकर घराण्यातील वारसाचा प्रश्न**

होळकर घराण्याचे प्रमुख तुकोजी ऑगस्ट, १७९७ मध्ये मृत्यू पावले. तुकोजी होळकरांना काशीराव व मल्हारराव हे दोन औरस पुत्र तर विठोजी व यशवंतराव हे दोन दासीपुत्र होते. पैकी काशीराव हा वेडपट होता. बाजीराव व दौलतरावाने वेडपट काशीरावची बाजू घेऊन होळकर घराण्याचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. परिणामतः मल्हारराव, विठोजी व यशवंतराव यांनी हाती शस्त्र घेतले. दौलतराव शिंदेच्या कूटनीतीला यश येऊन काशीराव त्याच्या मनाप्रमाणे वागू लागला. दौलतराव पेशवा बाजीरावाचा पाठिंबा मिळवून होळकर घराण्याची सत्ता व संपत्ती हस्तगत करेल अशी भीती मल्हारराव (दुसरा) तसेच त्याचे सावत्र बंधू विठोजी व यशवंतराव यांना वाटू लागली. ते सर्व जण भांबुर्ड्यास राहू लागले. या सर्वांनी काशीरावाचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. दौलतरावाला होळकरांच्या हालचालीचा सुगावा लागला. त्याने होळकरांच्या छावणीवर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात मल्हारराव ठार झाला. या हल्ल्यातून विठोजी व यशवंतराव अत्यंत चलाखीने बाहेर पडले.

**यशवंतराव होळकरांचा उदय**

यशवंतराव व विठोजीने दौलतरावाचा सूड घेण्याची शपथ घेतली. यशवंतरावाने जेजुरीस जाऊन कुलस्वामीची पूजा केली. नागपूरला जाऊन रघूजी भोसलेकडे मदतीची अपेक्षा केली. परंतु दौलतराव शिंदे व बाजीरावाने रघूजीस धमकावल्यामुळे त्याने यशवंतरावास मदत करणे तर बाजूलाच उलट त्यास कैदेत टाकले. यशवंतराव मोठ्या चातुर्याने निसटला व धारला पवारांकडे आश्रयास राहिला. दौलतरावाने तेथूनही त्यास हुसकावून लावले. यशवंतराव सुडाने पेटून उठला. अनेक होळकरी सरदार व भिल्लांच्या मदतीने यशवंतरावाने आपली फौज उभी केली. महेश्वर ही होळकरांची राजधानी ताब्यात घेतली व चंबळच्या पलीकडील दौलतरावच्या ताब्यातील अनेक प्रदेश लुटले व मोठी धुमधाम माजविली. उत्तरेतील दौलतीच्या रक्षणासाठी दौलतरावाने डिसेंबर, १८०० मध्ये पुणे सोडले. जातेवेळी बाजीरावावर अंकुश ठेवण्यासाठी आपला सासरा सर्जेराव घाटगेस पुण्यात ठेवले. होळकर सरदारांची लष्करी शक्ती वाढू लागली. यशवंतरावाने तीस हजार घोडदळ व प्रभावी तोफखाना उभा केला. यशवंतरावाचे वर्चस्व पाहून खुद्द त्याचा भाऊ काशीरावही

यशवंतरावाकडे आला. 'शिक्का आमच्या नावाचा चालवून सर्व कारभार आपण पाहावा' असे त्याने यशवंतरावास सांगितले. अशा प्रकारे दौलतरावाचा डाव त्याच्यावरच उलटला होता. अगदी अल्पावधीत यशवंतराव होळकराने आपला दरारा निर्माण केला.

**बाजीरावाकडून विठोजी होळकर हत्तीच्या पायी**

यशवंतराव उत्तरेत प्रदेशामागून प्रदेश लुटत असताना विठोजीने खानदेशपासून कृष्णा नदीपर्यंतच्या प्रदेशात लुटालूट चालवली होती. या होळकर बंधूंनी उत्तरेत शिंद्यांना व दक्षिणेत बाजीरावास जबरदस्त आव्हान निर्माण केले. विठोजीकडे वीस हजार फौज होती. यशवंत रामकृष्ण, बाजीबा हे शिंद्यांचे सरदारही विठोजीस मिळाले होते. विठोजीचा बंदोबस्त करण्यासाठी बाजीरावाने सरदार पानसे, बाळकृष्ण पागे इत्यादी सरदारांना पाठविले. विठोजीने त्यांचा पराभव केला. यानंतर बाजीरावाने बापू गोखले व सरदार पानसे यांना प्रचंड सैन्यानिशी विठोजीवर पाठविले. त्यांनी विठोजीचा पराभव करून त्यास कैद केले. बापू गोखलेने विठोजीस पुण्यास आणून बाजीरावाच्या हवाली केले. पेशवा बाजीरावाने मुख्य कारभारी बाळाजी कुंजर याच्या सल्ल्यानुसार विठोजीस १६ एप्रिल, १८०१ रोजी हत्तीच्या पायी देऊन ठार केले. या घटनेबद्दल वासुदेवशास्त्री खरे म्हणतात, 'अत्यंत नीच दर्जाचा खूनशी सूड' या अविवेकी कृत्याची बातमी यशवंतरावास समजताच त्याचे मस्तक भणभणले. बाजीरावाचा सूड घेण्याची त्याने शपथ घेतली.

**यशवंतराव होळकराची पुण्यावर स्वारी :** विठोजीच्या मृत्यूच्या वेळी यशवंतराव उत्तरेत शिंद्यांशी लढण्यात गुंतला होता. नर्मदेपासून ते उज्जैनपर्यंतचा सर्वप्रदेश त्याने उजाड केला होता. त्याने माळव्यात काढलेल्या मोहिमेत त्यास शामराव महाडीक, फत्तेसिंह माने, भवानीशंकर बक्षी, जिवाजी यशवंत इत्यादी सरदार मिळाले. यशवंतरावाचा आत्मविश्वास दिवसेंदिवस वाढत होता. तरीही त्याने सुरुवातीस बाजीरावाशी सबुरीचे धोरण स्वीकारले होते. मल्हाररावाची पत्नी व मुलगा खंडेराव दौलतरावाच्या कैदेत होते. त्यांची सुटका करून शिंदे-होळकरांमधील वाद मिटवावा अशी विनंती यशवंतरावाने बाजीरावाकडे केली. होळकरांना न्याय मिळावा यासाठी पराशर दादाजी व अहिल्याबाईचा ज्येष्ठ विश्वासू सरदार गोविंदपंत गानू यांनी प्रयत्न केले. परंतु चैन, विलासात मश्गुल असणाऱ्या बाजीरावाला शिंदे-होळकरांमध्ये ऐक्य साधण्याची सुबुद्धी झाली नाही. याउलट, विनाशकाले विपरीत बुद्धी याप्रमाणे पेशवा बाजीरावाकडून होळकर, रास्ते, प्रतिनिधी, पटवर्धन यांच्या जहागिऱ्या जप्त करण्याचे हुकूम सोडण्यात आले. अशा रीतीने बाजीराव-होळकर संबंध विकोपास गेले. यशवंतराव पुण्यावर आक्रमण करण्याची तयारी करू लागला. अशा बिकट प्रसंगी बाजीरावाने दौलतरावास ससैन्य पुण्यास बोलाविले. दौलतराव शिंदेने सदाशिव भास्कर यास निवडक सैन्यानिशी पुण्यास पाठविले. स्वतः जाण्याचे मात्र टाळले. बाजीरावाने संभाव्य धोका ओळखून आपले जडजवाहीर सिंहगडला पोहोचते केले व वेळ पडली तर रायगडकडे पलायन करण्याची तयारी केली. यावरून बाजीरावाने यशवंतरावाची धास्ती घेतली होती हे दिसून येते.

पुण्यावर स्वारी करण्यापूर्वी यशवंतराव होळकराने बाजीरावास कळविले की, ''आपण या राज्याचे धनी आहात आपल्याविरुद्ध शस्त्र धरण्याची माझी अजिबात इच्छा नाही. शिंदे-होळकरांमधील वाद आपण योग्य

न्याय देऊन सोडवावा एवढीच माझी इच्छा आहे. मी शिंद्यांप्रमाणेच तुमचा, मराठा राष्ट्राचा एकनिष्ठ सेवक आहे हे विसरू नका. माझा लढा फक्त शिंद्यांशी आहे. त्यात मला योग्य न्याय द्या म्हणजे माझी कसलीही तक्रार राहणार नाही.'' यशवंतरावाच्या या विनंतीवर केवळ चर्चाच होत राहिली. दुर्दैवाने बाजीरावास दूरदृष्टीचा सल्ला कोणी दिला नाही. अर्थात, यांस नागपूरकर भोसल्यांचा अपवाद होता. बाजीरावाने मुत्सद्देगिरीने होळकरांशी सख्य साधले असते, शिंदे-होळकर यांच्यातील वितुष्ट संपविले असते तर वेगळा इतिहास दिसला असता. बाजीरावाशी सलोखा होणे कठीण आहे असे दिसताच यशवंतरावाने ऑक्टोबर, १८०२ मध्ये पुण्यावर स्वारी केली.

**हडपसरची लढाई (२५ ऑक्टोबर, १८०२) :** यशवंतराव होळकर पुण्यावर चालून येत असतानाच शिंद्यांच्या ताब्यातील अहमदनगरचा किल्ला त्याने जिंकून घेतला व सिद्धटेक, श्रीगोंदा इत्यादी प्रदेशाची लूट केली. २५ ऑक्टोबर, १८०२ रोजी होळकर व बाजीरावाच्या सैन्याची भेट हडपसर येथे झाली. शत्रूने हल्ला केल्यानंतरच आपण त्याच्यावर प्रतिहल्ला करू असा यशवंतरावाने पवित्रा घेतला. आपल्यावर हल्ला होताच यशवंतरावाने मोठ्या त्वेषाने पेशवे व शिंद्यांच्या फौजेचा धुव्वा उडविला. पेशव्यांच्या मदतीस आलेला शिंद्यांचा सरदार सदाशिव भास्कर सहा हजार सैन्यासह ठार झाला, तर यशवंतरावाचे दोन हजार सैनिक मारले गेले. पेशवे-शिंदेंच्या सैन्याने युद्धात आपला निभाव लागणार नाही हे ओळखून यशवंतरावापुढे शरणागती पत्करली.

हडपसरच्या युद्धात आपला पराभव झाल्याने बाजीरावास प्रचंड धक्का बसला. तो भयभीत होऊन पुण्यातून बाहेर पडला व सिंहगडच्या पायथ्याशी डोणजा येथे वास्तव्यास गेला. बाजीरावास पकडणे यशवंतरावास सहज शक्य होते. परंतु यशवंतरावास अजूनही पेशव्यांविषयी आत्मीयता होती. बाजीरावाची उपासमार होऊ नये म्हणून त्यास अन्नधान्य पाठविले. पेशव्यांनी इंग्रजांची मदत घेऊ नये यासाठीही यशवंतरावाने प्रयत्न केले परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.

**बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास:**

हडपसरच्या युद्धात यशवंतरावाकडून पराभूत झाल्याने बाजीरावाने पुणे सोडले व सिंहगडाच्या पायथ्याशी डोणजा येथे आश्रय घेतला. यशवंतरावाने पेशवा बाजीरावास पुण्यात परत येण्याची विनंती केली. सरदार पानसे, पुरंदरे यांनीही होळकरांशी समेटासाठी बाजीरावास सल्ला दिला. तर कारभारी बाळाजी कुंजर, बाळाजीपंत पटवर्धन इत्यादींनी इंग्रजांचा आश्रय घेण्याचा सल्ला दिला. बाळाजी कुंजर म्हणतो, 'इंग्रजांशी सख्य करावे तेच होळकराचे पारिपत्य करू शकतील.' पेशवा बाजीरावाकडे सारासार विचार करून निर्णय घेण्याची क्षमता नव्हती. बाजीरावाने ऑक्टोबरच्या अखेरीस डोणजाहून रायगड जवळ केला व पुढे महाडला जाऊन मदतीसाठी मुंबईच्या गव्हर्नरशी पत्रव्यवहार सुरू केला. यशवंतरावाने बाजीरावास पुण्यात येण्याची विनंती करूनही तो पुण्यात आला नाही. उलट, अनेक सरदार सांगत असतानाही बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास गेला. यामुळे होळकर, भोसले, पटवर्धन व अमृतराव यांनी अमृतरावाच्या मुलास पेशवा करण्याचे

ठरविले व त्यानुसार छत्रपतींकडून पेशवेपदाची वस्त्रे आणण्यात आली व त्याचे नावे यशवंतराव मराठा राज्याचा कारभार पाहू लागला.

बाजीराव १६ डिसेंबर, १८०२ रोजी वसईस पोहोचला. बाजीराव व इंग्रज यांच्यामध्ये वाटाघाटी सुरू झाल्या. इंग्रज मराठा राज्यात घडणाऱ्या बारीकसारीक गोष्टीकडे लक्ष ठेवून होते. ज्या संधीची ते वाट पाहात होते ती संधी त्यांच्याकडे चालून आली होती. इ. स. १७९८ मध्ये गव्हर्नर जनरल म्हणून भारतात आलेल्या लॉर्ड वेलस्लीने भारतीय सत्तांना कमकुवत करण्यासाठी तैनाती फौजेची व्यवस्था केली. फ्रान्समध्ये नेपोलियनच्या उदयामुळे इंग्रज चिंताग्रस्त होते. फ्रेंचांशी जवळचे संबंध असणाऱ्या म्हैसूरच्या टिपूबरोबर ४ मे, १७९९ रोजी इंग्रजांनी श्रीरंगपट्टण येथे युद्ध केले. त्यात त्यास ठार केले व यानंतर इंग्रजांनी हैद्राबादच्या निजामाच्या माथी तैनाती फौज मारली. दक्षिणेत ब्रिटिशांना फक्त मराठा सत्तेचेच आव्हान बाकी होते आणि बाजीराव तर ब्रिटिशांच्या दारी मदतीच्या अपेक्षेने उभा होता.

**वसईचा तह (३१ डिसेंबर, १८०२)**

वसई येथे १६ डिसेंबर, १८०२ रोजी कर्नल क्लोज व पेशवा दुसरा बाजीराव यांची भेट झाली. उभय पक्षात वाटाघाटी होऊन ३१ डिसेंबर, १८०२ रोजी तहनाम्यास अंतिम स्वरूप देण्यात आले. हाच इतिहासप्रसिद्ध वसईचा तह होय. या तहातील कलमे खालीलप्रमाणे-

१. इंग्रजांनी पेशव्यांच्या मुलखाचे संरक्षण करावे.

२. यासाठी सहा हजारची तैनाती फौज पेशव्यांकडे राहील.

३. तैनाती फौजेच्या खर्चासाठी वार्षिक २६ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश इंग्रजांना तोडून द्यावा.

४. एकाचे शत्रू-मित्र हे दुसऱ्याचे शत्रू-मित्र मानले जावेत.

५. मराठ्यांनी आपले परराष्ट्रीय / धोरण इंग्रजांच्या सल्ल्याने आखावे.

६. बाजीरावाने इंग्रजांव्यतिरिक्त कोणत्याही युरोपियन व्यक्तीस नोकरीत ठेवू नये.

७. बाजीराव व इंग्रज परस्परांना लष्करी मदत करतील.

८. बाजीराव व निजाम यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास इंग्रजांचा निर्णय अंतिम राहील.

९. इंग्रज व गायकवाड यांच्यात घडून आलेल्या करारास बाजीरावाने मान्यता बाजीराव-गायकवाड यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यास इंग्रजांचा निर्णय अंतिम राहील.

१०. इंग्रजांच्या परवानगीशिवाय पेशवा बाजीरावाने कोणत्याही राज्याशी युद्ध अगर करार करू नये.

त्याचप्रमाणे तैनाती फौजेच्या घटनेनुसार इंग्रजांना आवश्यकता वाटेल त्या वेळेस तैनाती फौज परत बोलविण्याचा अधिकार इंग्रजांनी आपल्याकडे राखून ठेवला. गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने १८ मार्च, १८०३ रोजी या तहावरती सही केली.

**वसईच्या तहाचे महत्त्व :**

बाजीराव होळकरांकडून पराभूत झाल्याने आपल्या अस्तित्वासाठी इंग्रजांच्या आश्रयास गेला. या पूर्वीच्या पेशव्यांची मराठा सरदारांना बरोबर घेऊन अटकपासून कटकपर्यंत मराठा राज्याचा दबदबा निर्माण केला तर दुसऱ्या बाजीरावाने अनेक सरदारांना दुखावले व त्यांची वतने जप्त केली. होळकरांचा तो द्वेष करत राहिला. हडपसरच्या युद्धात पराभूत होताच तो इंग्रजांकडे गेला व आपल्या सुरक्षिततेच्या बदल्यात २६ लक्ष उत्पन्नाचा प्रदेश इंग्रजांना तोडून दिला. अनेक निर्बंध स्वतःवर लादून घेतले. याबाबत ग्रँट डफ म्हणतो, 'बाजीरावाने स्वातंत्र्याची किंमत देऊन आपल्या देहाचा बचाव विकत घेतला.'

भारतातील प्रबळ सत्ता आपल्या अंकित बनविण्यासाठी लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौजेचा फास भारतीय सत्ताधीशांच्या गळी अडकविला. बाजीरावही यामधून सुटू शकला नाही. वसईच्या तहाने इंग्रजांचा विश्वास दुणावला. जरी या तहानुसार एकाचे शत्रू-मित्र तेच दुसऱ्याचे शत्रू-मित्र असतील असे म्हटले असले तरी मराठे हेच आपले प्रबळ शत्रू आहेत हे इंग्रजांनी पहिल्या इंग्रज-मराठा युद्धाने ओळखले होते. त्यामुळे इंग्रजानी मराठा सत्तेला कमकुवत करण्याची एकही संधी सोडली नाही. वसईचा तह म्हणजे ब्रिटिशांच्या कूटनीतीस आलेले यश होय.

पेशवा म्हणजे राज्याचा कार्यकारी प्रमुख. ज्याने राज्याचे रक्षण करावयाचे त्यानेच अंतर्गत कटकटीपासून स्वतःच्या रक्षणासाठी परकीय सत्तेची मदत घेतली. वसईच्या तहानंतर बाजीराव राज्यकारभाराविषयी बेफिकीर झाला व भोगविलासात आपले जीवन घालवू लागला. वसईच्या तहाचा धोका शिंदे, होळकर, भोसले इत्यादी मराठा सरदारांनी ओळखला. परंतु एकोप्याने इंग्रजांच्या विरोधात उभे राहणे त्यांच्याने जमले नाही. वसईच्या तहामुळेच दुसरे इंग्रज–मराठा युद्ध घडून आले.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ............ हा मराठी सत्येचा शेवटचा पेशवा होय.

अ) पहिला बाजीराव ब) दुसरा बाजीराव क) बाळाजी बाजीराव ड) यापैकी नाही

२. .... दुसरे बाजीराव यांना पेशवे पदाची प्राप्ती झाली.

अ) १७९५ ब) १७९६ क) १७९७ ड) १७९८

३. १८०१ मध्ये बाजीरावाने ............ यास हत्तीच्या पायी देऊन ठार केले.

अ) विठोजी होळकर ब) मल्हार होळकर क) यशवंतराव होळकर ड) यापैकी नाही

४. ..... साली हडपसरची लढाई झाली

अ) १८०२ ब) १८०३ क) १८०४ ड)१८०५

५. .... साली मराठी सत्तेचा अस्त झाला

अ) १८१५ ब) १८१६ क) १८१७ ड)१८१८

## ४.२.२ (ब) दुसरे व तिसरे इंग्रज–मराठा युद्ध

### दुसरे इंग्रज–मराठा युद्ध

बाजीरावाने इंग्रजांबरोबर वसईचा तह केल्याने होळकर, पटवर्धन, भोसले इत्यादी सरदार बिथरले. इंग्रजांना शह देण्याचे त्यांनी ठरविले. बाजीरावास पेशवेपदावरून हाकलण्यासाठी त्यांनी अमृतरावाचा पुत्र विनायक बापू याची निवड करून छत्रपतींकडून त्यास पेशवेपदाची वस्त्रे मिळविली. नवीन पेशव्यांच्या व राज्याच्या दौलतीच्या रक्षणाची जबाबदारी यशवंतराव होळकरांवरती होती. तो ही पैशाच्या अडचणीत होता. ब्रिटिशांच्या संभाव्य आक्रमणास तोंड देण्यासाठी यशवंतराव व अमृतरावाने पुणे व आसपासचा परिसर लुटून ५० लाख रुपये उभे केले. राज्यकर्त्यांनीच लुटीचे तंत्र अवलंबिल्यामुळे बेरड, रामोशी, पेंढारी इत्यादींनी या संधीचा फायदा घेत सर्वत्र लूटमार सुरू केली. सगळीकडे अनागोंदी निर्माण झाली. फौज व पैसा उभा करूनही यशवंतरावाने इंग्रजांबरोबर लढण्याऐवजी पुण्यातून बाहेर पडणे पसंत केले.गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने उत्तरेत लॉर्ड लेक तर दक्षिणेकडे आपला बंधू ऑर्थर वेलस्ली यांच्यावरती ब्रिटिश प्रदेश विस्ताराची जबाबदारी सोपविली. ऑर्थर वेलस्ली ससैन्य पुण्यात आला. यशवंतराव व अमृतराव पुण्याबाहेर पडल्याने विनासायास पुणे त्यांच्या हाती पडले. १३ मे, १८०३ रोजी पुणे शहरावर ब्रिटिश सैन्याचा अंमल बसविला. त्यानंतर कर्नल क्लोज बाजीरावास घेऊन पुण्यास आला. इंग्रजांच्या संरक्षणाखाली बाजीराव पेशवेपदी आरूढ झाला. राज्यकारभाराचा फारसा ताण न राहिल्याने बाजीराव चैन, विलास व ऐशारामामध्ये दिवस कंठू लागला.

बाजीरावाचे पुण्यास आगमन झाले त्या वेळी होळकर चिंचवडला, अमृतराव जुन्नरला तर शिंदे बुऱ्हाणपूरला होते. ब्रिटिशविरोधी आघाडी उघडण्यात त्यांच्यातही मतैक्य होत नव्हते. याच दरम्यान शिंदे, होळकर, भोसले या मराठा सरदारांनी वसईच्या तहास मान्यता द्यावी असे कळविले. याबाबत दौलतराव शिंदेने ब्रिटिशांना सांगितले की, नागपूरकर भोसले व यशवंतराव होळकर यांची भेट होऊन त्यावर चर्चा झाल्याशिवाय आपण त्या तहावर सही करणार नाही. वसईचा तह मान्य असल्याचे वरीलपैकी कोणीही कळविले नाही. ब्रिटिशविरोधी आघाडी उघडण्यासाठी यांच्यात पत्रव्यवहार होत राहिला. ब्रिटिशांनी मोठ्या मुत्सद्देगिरीने शिंदे व होळकर सरदारांमध्ये फूट पाडली व संभाव्य संघर्षात होळकरांना तटस्थ ठेवले.

### शिंदे व भोसले यांचा इंग्रजांकडून पराभव

ब्रिटिशविरोधी युतीतून यशवंराव होळकर यास अलग करण्यात ब्रिटिशांना यश मिळाले. अमृतरावासही पेन्शन देऊन आपल्या बाजूस वळविले. बाजीराव आणि निजाम यांच्याबरोबर तैनाती फौजेचा करार ब्रिटिशांनी केला होता. शिंदे सरदारांनी ब्रिटिशांनी मैत्रीचा पुढे केलेला हात झिडकारला होता. त्यामुळे ब्रिटिशांना याचा राग होता. वसईच्या तहानुसार पेशव्यांच्या राज्य रक्षण्याची जबाबदारी ब्रिटिशांकडे आली होती. अंतर्गत शांततेसाठी व बाजीरावाच्या हितासाठी वसईचा तह मान्य नसणाऱ्या मराठा सरदारांबरोबर युद्ध करणे अपरिहार्य असल्याचे ब्रिटिशांनी दौलतराव शिंदेस कळविले. इंग्रज–मराठा युद्ध अपरिहार्य झाले. नागपूरकर भोसल्यांनी दौलतरावास साथ दिली. शिंदे सरदारांकडे मोठी कवायती फौज होती. उत्तर–दक्षिणेत

त्यांचा दरारा होता. पहिल्या इंग्रज-मराठा युद्धात महादजींच्या कवायती फौजेने इंग्रजांना नामोहरम केले होते. त्यामुळे दौलतराव इंग्रजांना भारी पडेल असा मराठ्यांना विश्वास होता.

ऑर्थर वेलस्लीने शिंद्यांच्या ताब्यात असणाऱ्या अहमदनगरच्या किल्ल्यावर हल्ला केला. या भुईकोट किल्ल्यामध्ये प्रचंड साधनसामग्री होती. परंतु किल्ल्याची व्यवस्था पाहणाऱ्या युरोपियन अधिकाऱ्याने इंग्रजांकडून लाच घेऊन स्वामीद्रोह केल्यामुळे १२ ऑगस्ट, १८०३ रोजी अहमदनगरचा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात आला. २४ ऑगस्टला शिंदे-भोसलेंच्या संयुक्त फौजेबरोबर आसई येथे झालेल्या युद्धात इंग्रजांना विजय मिळाला. त्यानंतर इंग्रजांनी आशिरगड व ब्ऱ्हाणपूर ही महत्त्वाची ठाणी जिंकली. डिसेंबर, १८०३ रोजी आडगावच्या युद्धात इंग्रजांनी शिंदे- भोसलेंच्या संयुक्त फौजेचा धुव्वा उडविला. भोसल्यांनी तर आपला तोफखाना रणांगणावर सोडून पळ काढला. भोसल्यांचा अत्यंत महत्त्वपूर्ण गाविलगडचा किल्ला पडल्याने भोसल्यांना इंग्रजांपुढे तह करण्याशिवाय पर्यायच राहिला नाही. एलिचपूरजवळ देवगाव येथे १७ डिसेंबर, १८०३ रोजी भोसल्यांनी इंग्रजांबरोबर तह करून युद्धामधून माघार घेतली.

- **देवगावचा तह (१७ डिसेंबर, १८०३)**

१. कटक प्रांत समुद्रकिनाऱ्यासह इंग्रजांना देण्यात यावा.

२. वर्धा नदीपर्यंतचा पश्चिम वऱ्हाडचा प्रदेश निजामास देण्यात यावा.

३. भोसल्यांनी मराठा संघामधून अलग व्हावे.

४. इंग्रज रेसिडेंट नागपूर येथे राहील.

५. भोसलेंनी इंग्रजांच्या शत्रूला आपल्या राज्यात नोकरीस ठेवू नये.

६. इतर राज्यांशी इंग्रजांचे झालेले करार भोसलेंनी मान्य करावेत.

दक्षिणेमध्ये शिंदे-भोसलेंचे इंग्रजांबरोबर युद्ध सुरू होते याच काळामध्ये इंग्रज उत्तर भारतातील शिंद्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश मिळविण्यासाठी धडपडत होते. महादजी शिंदेंनी डी बॉयन या फ्रेंच सेनानीच्या नेतृत्वाखाली कवायती फौज निर्माण केली होती. १७९५ मध्ये डी बॉयनच्या निवृत्तीनंतर या सेनेची धुरा पेरॉन या फ्रेंच सेनानीकडे आली. अलिगढ व आग्रा येथे शिंदेंची मुख्य फौज होती. पेरॉनकडे असलेल्या ४५ हजार कवायती फौजेच्या साहाय्याने त्यास इंग्रजांचा पराभव करणे शक्य होते. परंतु पेरॉनने शिंद्यांचा विश्वासघात केल्याने २९ ऑगस्ट, १८०३ रोजी अलिगढ इंग्रजांच्या हाती पडले. ७० लाखांची संपत्ती इंग्रजांना मिळाली. अलिगढ ताब्यात येताच ब्रिटिश सेनापती लेकने दिल्लीवर आक्रमण केले. शिंद्यांचा विरोध मोडून काढत १४ सप्टेंबर, १८०३ रोजी दिल्ली ताब्यात घेतली. दिल्लीचा मोगल बादशहा ब्रिटिशांच्या ताब्यात आला. ब्रिटिशांच्या विस्तारवादी धोरणातील महत्त्वपूर्ण टप्पा पूर्णत्वास गेला होता. दिल्ली घेतल्यानंतर सेनापती लेकने १७ ऑक्टोबर, १८०३ रोजी आग्रा घेण्यात यश मिळविले. येथे २८ लक्ष रुपयांची संपत्ती ब्रिटिशांच्या हाती लागली. उत्तरेतील आपल्या प्रदेश रक्षणासाठी दौलतराव शिंदेने १५ लष्करी तुकड्या रवाना केल्या. या फौजा उत्तरेत पोहोचण्यापूर्वीच शिंद्यांची अनेक लष्करी ठाणी ब्रिटिशांच्या ताब्यात गेली होती. दक्षिणेतून उत्तरेत आलेल्या फौजेने उत्तरेतील उरल्यासुरल्या शिंदेंच्या फौजेला एकत्र करून ब्रिटिशांशी लढा

दिला. तथापि, त्यात त्यांना अपयश आले. शिंदेंच्या ताब्यातील अनेक महत्त्वपूर्ण किल्ले व विस्तीर्ण प्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात आले. मराठा सरदारांनी शिंदेंचा पाडाव झाल्याने जयपूर, जोधपूर, उदयपूर, भरतपूर, कोटा इत्यादी शिंद्यांच्या मांडलिक राजांशी स्वतंत्रपणे करार केले. सरदार शिंदेंच्या पाडावामुळे उत्तर भारतातही सर्वांत बलिष्ठ असणाऱ्या मराठा सत्तेची जागा ब्रिटिशांनी घेतली. शिंदेंना साथ देणाऱ्या भोसलेंनी ब्रिटिशांविरोधी संघर्षातून अंग काढून घेतल्याने शिंदे एकाकी पडले. यामुळे ३० डिसेंबर, १८०३ रोजी शिंदेंनी ब्रिटिशांबरोबर सुर्जी-अंजनगावचा तह केला.

- **सुर्जी-अंजनगावचा तह (३० डिसेंबर, १८०३)**

  १. शिंद्यांनी ब्रिटिशांना गंगा-यमुनेच्या दुआबातील प्रदेश, दिल्ली-आग्ऱ्याचा प्रदेश, बुंदेलखंडाचा काही भाग, गुजरातमधील भडोच जिल्हा तसेच अहमदनगरचा किल्ला आणि गोदावरीचा प्रदेश देण्याचे मान्य केले.

  २. शिंद्यांनी मोगल बादशहावरील आपला अधिकार सोडावा.

  ३. शिंद्यांनी पेशवा, निजाम, गायकवाड व उत्तरेतील सत्ताधीशांवरील आपला अधिकार सोडावा.

  ४. ब्रिटिशांच्या ताब्यात आलेल्या राज्यांचे स्वातंत्र्य शिंदेंनी मान्य करावे.

तैनाती फौजेचा आग्रह इंग्रजांनी दौलतरावाकडे धरला मात्र त्याने तैनाती फौज स्वीकारण्यास नकार दिला. शिंदे-भोसले या मातब्बर मराठा सरदारांचा पाडाव केल्यानंतर इंग्रजांनी आपले लक्ष यशवंतराव होळकरांकडे वळविले.

**इंग्रज-होळकर संघर्ष**

शिंदे-भोसलेंच्या पाडावानंतर यशवंतराव होळकर हा एकमेव मराठा सरदार इंग्रजांना आव्हान वाटत होते. इंग्रजांनी त्याचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. जयपूर राज्याशी ब्रिटिशांनी स्वतंत्रपणे करार केला होता. तर या राज्यामधून चौथाई वसुलीचा आपणास अधिकार आहे असा यशवंतरावाचा दावा होता. ब्रिटिशांनी यास हरकत घेतली. ब्रिटिशांबरोबर युद्ध अपरिहार्य आहे हे ओळखून यशवंतरावाने उत्तरेतील सत्ताधीशांमध्ये एकजूट करण्याचा प्रयत्न केला. यशवंतरावाने जयपूरवर आक्रमण करून लूटमार सुरू केली. गव्हर्नर जनरल लॉर्ड वेलस्लीने एप्रिल, १८०४ मध्ये यशवंतरावांविरुद्ध युद्ध पुकारले.

लॉर्ड वेलस्लीने उत्तरेतून लॉर्ड लेक, दक्षिणेतून ऑर्थर वेलस्ली तर गुजरातेतून कर्नल मॉन्सनला होळकराच्या बंदोबस्तासाठी पाठविले. यशवंतरावानेही प्रचंड सैन्याची उभारणी करून त्याच्यावर चालून येणाऱ्या कर्नल मॉनसनला दोन वेळापराभूत केले. आपला बचाव करण्यासाठी मॉनसनला आठ्यास पलायन करावे लागले. ब्रिटिश सत्तेला याचा धक्का बसला तर यशवंतरावाचा उत्साह द्विगुणीत झाला. त्याने मथुरा जिंकून ८ ऑक्टोबर, १८०४ रोजी दिल्लीवर हल्ला चढविला. दिल्ली यशवंतरावाच्या हाती जाऊ नये म्हणून जनरल लेक ससैन्य दिल्लीला आला. यशवंतरावाने त्यास प्रतिकार न करता दुआबात प्रवेश केला. १७ नोव्हेंबर, १८०४ रोजी फरुखाबाद येथे जनरल लेकने यशवंतरावाचा पराभव केला. यानंतर यशवंतरावाने भरतपूरच्या जाट राजाच्या आश्रयाने इंग्रजांशी लढा सुरू ठेवला. इंग्रजांनी भरतपूरच्या किल्ल्यास वेढा दिला.

परंतु मराठे व जाट यांच्या पराक्रमापुढे इंग्रजांची मात्रा चालली नाही. या मोहिमेत हजारो ब्रिटिश सैनिकांस आपले प्राण गमवावे लागले. हा संघर्ष सुरू असतानाच ब्रिटिशांपुढे आपला निभाव लागणार नाही असे वाटून जाट राजाने ब्रिटिशांशी तह केला. इंग्रजांनी यशवंतरावाचा दक्षिणेतील सर्व मुलूख आपल्या ताब्यात घेतला. बुंदेलखंडही यशवंतरावाच्या हातून गेला होता. मात्र यशवंतरावाने इंग्रजांबरोबरचा लढा अद्यापही थांबविला नव्हता.

इंग्रज–होळकर संघर्षात इंग्रजांची प्रचंड जीवित व वित्त हानी झाली होती. ईस्ट इंडिया कंपनीच्या खजिन्यावर यामुळे ताण पडला होता. लॉर्ड वेलस्लीच्या विस्तारवादी धोरणास शह बसला होता. यामुळे कंपनीच्या संचालकांनी लॉर्ड वेलस्लीला परत बोलाविले व त्याच्या जागेवर शांततावादी लॉर्ड कॉर्नवॉलिसची नियुक्ती केली. त्याने तटस्थतेच्या धोरणाचा अवलंब केला. दरम्यान दौलतराव शिंदेस सुर्जी–अंजनगावचा तह अपमानास्पद वाटू लागला. इंग्रजांशी लढा देण्यासाठी तो यशवंतरावास येऊन मिळाला. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून इंग्रजांनी दौलतरावास ग्वाल्हेर व गोहद देऊ करून यशवंतरावापासून अलग केले. यशवंतराव पुन्हा एकाकी पडला. त्याने भारतीय सत्तांना इंग्रजांविरुद्ध एक होण्याचे आवाहन केले. तथापि, इंग्रजांविरुद्ध त्यास कोणीही साथ दिली नाही. यापुढे इंग्रजांशी एकाकी संघर्ष करणे कठीण आहे हे ओळखून यशवंतरावाने इंग्रजांशी वाटाघाटी करून २४ डिसेंबर, १८०६ रोजी राजघाटचा तह केला.

- **राजघाटचा तह (२४ डिसेंबर, १८०६)**

  १. चंबळ नदीच्या उत्तरेकडील व पश्चिमेकडील प्रदेशावरील अधिकार होळकरांनी सोडावा.

  २. चंबळ नदीच्या दक्षिणेचा तसेच नर्मदा नदीच्या दक्षिणेकडील भागावर होळकरांचे वर्चस्व राहील.

यशवंतराव होळकराने आपल्या कर्तबगारीने श्रेष्ठ स्थान प्राप्त केले. बाजीराव व दौलतरावांशी सामंजस्याने वागण्याचा त्याने अनेक वेळा प्रयत्नही केला. परंतु मराठ्यांतील भाऊबंदकीने मराठेशाहीचा गळा घोटला. इंग्रजांकडून यशवंतरावाचा निर्णायक पराभव झाला नसला तरी इंग्रजांच्या सामर्थ्यापुढे त्यास नमते घ्यावे लागले. राजघाटच्या तहानुसार विस्तीर्ण प्रदेशावर पाणी सोडावे लागले. याचे शल्य यशवंतरावास बोचत राहिले. राजघाटच्या तहाचा बदला घेऊन इंग्रजांचा बीमोड करण्यासाठी यशवंतरावाने भानपुरा येथे तोफा व बंदुका तयार करण्याचा कारखाना काढला. यशवंतराव स्वतः तिथे रात्रंदिवस खपू लागला. पराभवाचा मनावर झालेला आघात, मद्यपान, पुतण्या खंडेरावचे अकाली निधन आणि कारखान्यातील उष्णतेचा मेंदूवर झालेला परिणाम या सर्वांमुळे यशवंतरावाचे मानसिक संतुलन बिघडून त्यास वेड लागले आणि यामधूनच २८ ऑक्टोबर, १८११ रोजी यशवंतरावाचा मृत्यू झाला. यशवंतरावाच्या अकाली मृत्यूमुळे ब्रिटिश सत्तेविरुद्ध प्राणपणाने लढणारा श्रेष्ठ सेनानी मराठा सत्तेस गमवावा लागला.

- **तिसरे इंग्रज–मराठा युद्ध : १८१७–१८१८**

बाजीरावाने पेशवेपद टिकविण्यासाठी इंग्रजांची मदत घेतली. तैनाती फौजेच्या मोबदल्यात बाजीरावाने इंग्रजांना २६ लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख तोडून दिला होता. बाजीरावाचे धोरण अनेक मराठा सरदारांना पटले

नाही. परिणामतः पेशव्यांचे रक्षणकर्ते इंग्रज आणि शिंदे, भोसले, होळकर इत्यादी सरदारांमध्ये संघर्ष झाला. त्यात इंग्रज भारी ठरले. या सरदारांबरोबर इंग्रजांनी स्वतंत्र असे करार केले. इंग्रजांचे अंकित झालेल्या सरदारांचे पेशव्यांशी असणारे संबंध संपुष्टात आले. तथापि, बाजीरावाने वसईच्या तहाची पर्वा न करता लहान-मोठ्या मराठा सरदारांवर आपली हुकुमत गाजविण्याचा प्रयत्न केला. या वेळी महाराष्ट्रात यशवंतराव होळकर, दौलतराव शिंदे, फत्तेसिंग माने, सर्जेराव घाटगे, धोंडी वाघ, त्र्यंबकजी डेंगळे इत्यादी शेकडो पराक्रमी सरदार होते. यांच्याकडून राष्ट्रकार्य करून घेण्याची सुबुद्धी बाजीरावास झाली नाही. याउलट, बाजीरावाच्या कारस्थानी वृत्तीमुळे सरदारांमधील हेवेदावे वाढीस लागले. तारतम्य सुटून सरदारांनी एकमेकांचे प्रदेश लुटण्यास सुरुवात केली. बाजीराव स्वतः यामध्ये आघाडीवर होता.

पेशवा बाजीराव चैन, विलास, ऐशारामात राहू लागला. त्याचा कारभार सदाशिव माणकेश्वर, त्र्यंबकजी डेंगळे, बजाजी नाईक यांसारख्या सामान्य माणसांच्या हाती होता. बाजीरावाभोवती खुशमस्कऱ्यांचा गराडा होता. होमहवन, अनुष्ठाने, ब्राह्मणभोजने यात त्याचा बहुतांश वेळ जाऊ लागला. दिवसेंदिवस बाजीरावची विलासप्रियता वाढत गेली. आपल्या हौसेखातर पुण्यात त्याने अनेक वाडे बांधले. त्या ठिकाणी बाजीरावाचा बहुतेक वेळ सुंदर स्त्रियांच्या सहवासात जाऊ लागला.स्त्रियांना पुरषी पोशाख घालून त्यांच्यावर चवऱ्या ढाळण्यात बाजीराव धन्यता मानू लागला. अनेक नादान दरबारी लोक आपल्या धन्याची (बाजीरावाची) मर्जी सांभाळण्यासाठी आपल्या बायका त्याच्याकडे पाठवू लागले. ज्याच्याकडे मराठा राज्याची कार्यकारी सत्ता ते श्रीमंत पेशवे राज्यकर्त्याचे कर्तव्य विसरून भोगविलासात रममाण झाल्याने मराठा सत्तेचा अंतकाळ जवळ आला.

**बाजीराव व मराठे सरदार**

वसईच्या तहानंतर इंग्रजांच्या संरक्षणाखाली बाजीरावाची मनधरणी सुरू होती. आपल्या चैन-विलासाखातर होणाऱ्या खर्चासाठी त्याने अनेक सरदारांना वेठीस धरले. अनेकांच्या जहागिऱ्या जप्त केल्या. बाजीरावाच्या या धोरणामुळे रास्ते, पटवर्धन, पानसे इत्यादी सरदार दुखावले. बाजीरावाने पैसा उभा करण्यासाठी महसूल अधिकाऱ्यांच्या पदाचा लिलाव करण्याची अभिनव पद्धत सुरू केली. यामधून त्याने पाच कोटी रुपये जमा केले. या पद्धतीमुळे शेतकरी वर्गाच्या हालअपेष्टांना पारावार उरला नाही. पेशव्यांच्या अदूरदर्शी धोरणामुळे राज्यात अनागोंदी सुरू झाली. या परिस्थितीचा फायदा घेऊन रहिमतपूरचा फत्तेसिंग माने व औंधच्या प्रतिनिधीने मोठी धुमधाम माजविली. बापू गोखलेने लष्कराद्वारे त्यांचा बंदोबस्त केला. बाजीरावाने प्रतिनिधीची सर्व दौलत जप्त करून बापू गोखलेस दिली.

वसईच्या तहापासून इ. स. १८११ पर्यंत ब्रिटिश रेसिडेंट म्हणून कर्नल क्लोज बाजीरावाच्या दरबारी होता. बाजीरावाशी त्याने सामंजस्याचे धोरण स्वीकारले होते. फेब्रुवारी, १८११ मध्ये कर्नल क्लोजच्या जागी एल्फिन्स्टन आला. बाजीरावाच्या हस्तक्षेपामुळे असंतुष्ट झालेल्या अनेक सरदारांनी एल्फिन्स्टनकडे धाव घेतली. एल्फिन्स्टनने बाजीरावास पाठीशी घातले नाही. पेशव्याने सरदारांची जहागिरी जप्त करणे, त्यांच्यावर खंडणी लादणे हे गैर असल्याने या सरदारांच्या विरोधात तैनाती फौजेचा वापर एल्फिन्स्टनने होऊ दिला नाही.

पेशवा बाजीराव आणि मराठा सरदार यांच्यातील संघर्षातून मार्ग काढण्यासाठी ब्रिटिश रेसिडेंट एल्फिन्स्टनने पंढरपूर मुक्कामी बाजीरावाकडून १९ जुलै, १८१२ रोजी एक करार लिहून घेतला. तो पंढरपूर करार म्हणून ओळखला जातो.

**पंढरपूर करार :**

१. इंग्रजांच्या परवानगी शिवाय बाजीरावाने सरदारांकडे नवीन मागण्या करू नयेत.

२. सरदारांनी पूर्वीप्रमाणेच बाजीरावाची सेवाचाकरी करावी.

३. इंग्रजांच्या परवानगी शिवाय बाजीरावाने सरदारांचे सरंजाम जप्त करू नयेत.

४. बाजीराव व सरदार यांच्यात संघर्ष उद्भवल्यास इंग्रजांचा निवाडा अंतिम राहील.

५. सरदारांशी परस्पर करार करण्याचा अधिकार इंग्रजांना राहील.

पंढरपूरच्या करारानुसार बाजीरावावर इंग्रजांनी अनेक निर्बंध लादले. तैनाती फौजेचा फास इंग्रजांनी आवळण्यास सुरुवात केल्याने बाजीरावास वसईचा तह करून घोडचूक केल्याचे कळून चुकले. त्याने ब्रिटिशांच्या विरोधात हालचाली करण्यास सुरुवात केली.

**बाजीरावाची लष्करी तयारी :**

बाजीरावाच्या पदरी तैनाती फौज होती. पण इंग्रजांच्या परवानगी शिवाय या फौजेचा वापर करता येत नव्हता. सरदारांवर हुकमत गाजविल्यामुळे रेसिडेंट एल्फिन्स्टनने पंढरपूरचा करार करून बाजीरावावर आणखी निर्बंध लादले. इंग्रजांचे डावपेच बाजीरावाच्या ध्यानी येऊ लागले. आपली स्वतःची फौज असल्याशिवाय आपणास आपला हेतू साध्य करता येणार नाही. म्हणून बाजीरावाने कॅप्टन फोर्ड या इंग्रज अधिकाऱ्याच्या साहाय्याने कवायती फौज उभी केली. या कवायती फौजेने बाजीरावाची आज्ञा पाळण्याची शपथ घेतली. तथापि, बाजीराव इंग्रजांशी एकनिष्ठ असेल तरच ही फौज बाजीरावाची आज्ञा पाळणार होती. दौलतराव शिंदेच्या कवायती फौजेचा प्रमुख पॅरोनचा स्वामीद्रोह बाजीरावास ज्ञात होता. तरीही बाजीराव पुढील काळात इंग्रजांना शह देण्यासाठी इंग्रज सेनानीच्या हाताखाली फौज वाढवू लागला. या फौजेमध्ये मराठी लोकांपेक्षा उत्तरेतील लोकांनाच मोठ्या प्रमाणात समाविष्ट केले होते. बाजीरावाच्या हालचालीवर इंग्रजांची करडी नजर होती. मराठा राज्य बुडविण्याची ते संधी शोधत होते. पेशवे-गायकवाड वादातून ही संधी त्यांना मिळाली.

**पेशवे-गायकवाड वाद व गंगाधरशास्त्रीचा खून:**

गुजरातमध्ये थोरल्या बाजीरावांच्या कालखंडात गायकवाड घराण्याचा उदय झाला. पिलाजी गायकवाड हा या घराण्याचा मूळ पुरुष होय. गुजरात प्रांताच्या मोबदल्यात गायकवाड पेशव्यांना दरसाल २५ लक्ष रुपये खंडणी देत होते. इ. स. १७५३ सालापासून ही रक्कम देण्यात न आल्याने कोट्यवधी रुपयांचे देणे बाकी होते. बाजीरावाने इ. स. १८०४ मध्ये अहमदाबाद परगणा वार्षिक साडेचार लाख रुपयांच्या मोबदल्यात गायकवाडांकडे दिला होता. याबाबत झालेल्या कराराची मुदत १८१४ मध्ये संपत होती. गायकवाडांना ती

वाढवून हवी होती. बाजीरावाचा यास नकार होता. या प्रश्नावरून पेशवे-गायकवाड यांच्यात वाद निर्माण झाला. दोघेही इंग्रजांचे आश्रित असल्याने त्यांनी हा प्रश्न वाटाघाटीने सोडविण्यास सांगितला. त्यानुसार फत्तेसिंग गायकवाडने आपला वकील गंगाधरशास्त्री पटवर्धन यांस पुण्यास पाठविले. गंगाधरशास्त्रीच्या संरक्षणाची जबाबदारी इंग्रजांनी घेतली होती. नाना फडणविसांनी गायकवाडांकडे इ. स. १७९४ मध्ये रावजी पाटील हा कारभारी पाठविला. रावजीसोबतच गंगाधरशास्त्री गायकवाडांकडे आला. आपल्या अक्कल-हुशारीने तो नावारूपास आला. इंग्रजांबरोबर त्याचे सख्य निर्माण झाले. गुजरातमधील इंग्रजांविरोधी हालचालीची बित्तंबातमी तो इंग्रजांना देऊ लागला.

गायकवाडांचा वकील गंगाधरशास्त्री व बाजीरावाचा वकील त्र्यंबकजी डेंगळे यांच्यात दीर्घकाळ वाटाघाटी झाल्या. बाजीरावाने गंगाधरशास्त्रीशी मैत्रीचे संबंध निर्माण केले. 'गायकवाडांनी ७ लाखांचा मुलूख पेशव्यांना तोडून द्यावा आणि त्याच्या बदल्यात पेशवा बाजीरावाने दरवर्षीची खंडणी व मागील थकबाकी सोडून द्यावी.' असा करार ठरला. एवढेच नव्हे तर बाजीरावाच्या मेहुणीचे लग्न गंगाधरशास्त्रीच्या मुलाबरोबर ठरले. गायकवाड व पेशवे यांच्यात झालेल्या कराराची माहिती गंगाधरशास्त्रींनी फत्तेसिंग गायकवाडांना पत्राद्वारे दिली. गायकवाडांनी प्रदेश तोडून देण्यास स्पष्ट नकार दिला. गायकवाडांच्या नकारामुळे बाजीराव आणि शास्त्री यांच्यात बेबनाव निर्माण झाला. करार संपुष्टात आला तसेच लग्नही मोडले. या प्रकरणामुळे बाजीराव पेशव्याचा अवमान झाला. त्र्यंबकजीने धन्याच्या अपमानाचा सूड घेण्याचे ठरविले. गायकवाडांच्या वकिलाच्या इंग्रजांनी जीविताची हमी घेतली आहे. त्याचा आपण खून करीत आहोत या घटनेचा परिणाम काय होईल याचा बाजीराव, त्र्यंबकजीने काडीमात्र विचार केला नाही. शास्त्रींना गोड-गोड बोलून पंढरपूरच्या तीर्थयात्रेस नेले. दि. २० जुलै, १८१५ रोजी गंगाधरशास्त्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन परत जात असताना बाजीराव व त्र्यंबकजीने मारेकरी पाठवून शास्त्रींचा खून केला.

**त्र्यंबकजीची कैद व बाजीरावावर कडक निर्बंध :**

गंगाधरशास्त्रीच्या जीविताची हमी इंग्रजांनी घेतल्याने बाजीरावाविरुद्ध कारवाई करण्याची संधी इंग्रजांना चालून आली. त्यांनी हे प्रकरण तडीस लावण्याचे ठरविले. एल्फिन्स्टनने त्र्यंबकजीस आपल्या ताब्यात देण्याची मागणी बाजीरावाकडे केली. बाजीरावाने त्र्यंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन करण्यास टाळाटाळ केली. एल्फिन्स्टनने बाजीरावास तंबी दिली की, त्र्यंबकजीस आमच्या स्वाधीन करावे, तसे न झाल्यास पेशव्यांशी आमचे सख्य राहणार नाही. त्र्यंबकजीस इंग्रजांच्या हवाली न केल्यास संघर्ष होणार हे आता निश्चित झाले होते. बाजीरावाच्या मनाचा निर्णय होत नव्हता. शेवटी नाईलाजास्तव बाजीरावाने २५ सप्टेंबर, १८१५ रोजी त्र्यंबकजीला इंग्रजांच्या स्वाधीन केले. ज्यासाठी हे सर्व प्रकरण उद्भवले तो गायकवाडांकडील येणे रकमेचा प्रश्न बाजूस पडला.

इंग्रजांनी त्र्यंबकजीस ठाण्याच्या किल्ल्यात मोठ्या बंदोबस्तात ठेवले होते. वर्षभर त्र्यंबकजी येथे होता. १२ सप्टेंबर, १८१६ रोजी मोठ्या कल्पकतेने त्र्यंबकजी कैदेतून निसटला व त्यानंतर त्याने सगळीकडे धामधूम माजविली. गुप्तपणे बाजीरावाचे त्यास साहाय्य मिळत होते. त्र्यंबकजी व बाजीराव यांच्यातील

पत्रव्यवहाराची माहिती इंग्रजांना मिळाली. उभयतांचे पत्रव्यवहारातील काही कागद इंग्रजांच्या हाती पडले. इंग्रज–बाजीराव यांच्यातील तणाव वाढीस लागला. त्र्यंबकजीबद्दल जामीन म्हणून रायगड, पुरंदर, सिंहगड हे किल्ले इंग्रजांनी बाजीरावास धाक दाखवून ताब्यात घेतले. त्र्यंबकजीला पकडण्याबद्दल बाजीरावाने जाहीरनामा प्रसिद्ध केला; मात्र असा बनाव करून बाजीराव शिंदे, होळकर, भोसले इत्यादी सरदारांना एक करण्याचा प्रयत्न कसोशीने करू लागला. बाजीरावाच्या हालचालीची बित्तंबातमी मिळण्याची व्यवस्था एल्फिन्स्टनने करून ठेवली होती.

बहिरी ससाणा एखादे सावज पकडतो व त्याच्या शरीरातून आपल्या आतील बाजूकडील तीक्ष्ण नख्या खुपसतो. सावज ससाण्याच्या तावडीतून निसटण्याचा जसजसा प्रयत्न करू लागते तसतशा ससाण्याच्या नख्या त्याच्या शरीरात खोलवर रुतल्या जातात. बाजीरावाची सावजासारखी अवस्था झाली होती. त्याच्या हालचालीनुसार इंग्रज तैनाती फौजेचा फास आवळत होते. बाजीरावाच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी इंग्रजांनी त्याच्यावर १३ जून, १८१७ रोजी पुण्याचा तह लादला.

- **पुण्याचा तह (१३ जून, १८१७)**

  १. बाजीरावाने मराठा सरदारांवरील आपला अधिकार सोडावा.

  २. बाजीरावाने महाराष्ट्राबाहेरील सर्व प्रदेशांवरील अधिकार सोडून त्यावर इंग्रजांचे वर्चस्व मान्य करावे.

  ३. त्र्यंबकजी डेंगळे हे गंगाधरशास्त्रींचे खुनी आहेत असे जाहीर करून त्यास इंग्रजांच्या हवाली करावे.

  ४. बाजीरावाने कोणत्याही मराठा सरदारांकडे किंवा परकीय सत्तेकडे आपले वकील ठेवू नयेत त्यांचेही वकील पेशव्यांच्या दरबारी राहू नयेत.

  ५. बाजीरावाने आपल्या पदरी असणाऱ्या तैनाती फौजेत वाढ करावी व त्या प्रमाणात इंग्रजांना फौजेच्या खर्चासाठी प्रदेश तोडून द्यावा.

वरील तहानुसार, 'मराठा संघ' मोडीत निघाला. महाराष्ट्राबाहेरील पेशव्यांचे वर्चस्व संपुष्टात येऊन चौतीस लक्ष उत्पन्नाचा मुलूख इंग्रजांच्या ताब्यात गेला. या तहाबद्दल रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''वास्तविक या तहानेच बाजीरावाचे मराठेशाहीतील पुढारीपण जाऊन तो केवळ एक लहानसा संस्थानिक बनला. याच वेळी त्याचे राज्य गेले असे म्हणावयास हरकत नाही.''

**बाजीरावाची निर्णायक लढ्याची तयारी :**

पुण्याच्या तहाने बाजीरावाच्या अस्तित्वाला जबरदस्त धक्का बसला. त्याने इंग्रजांच्या बरोबर निर्णायक लढा देण्याची तयारी सुरू केली. कैदेतून सुटलेला त्र्यंबकजी डेंगळे बाजीरावाच्या मदतीस होताच. दरम्यानच्या काळात इंग्रजांनी पेंढाऱ्यांविरुद्ध मोहीम हाती घेतली होती. भारतीय सत्ताधीशांकडे पेंढाऱ्यांची एक तुकडी असे. एखादा प्रदेश जिंकला रे जिंकला की ही तुकडी लूट करण्याचे काम करीत असे. संस्थानिकांनी

तैनाती फौज स्वीकारल्यामुळे पेंढाऱ्यांवर बेकारीची पाळी आली. त्यांनी सर्व देशभर लूटमार सुरू केली. यामुळे नागरी व्यवस्था कोलमडून पडली. पेंढाऱ्यांविरुद्धच्या कारवाईसाठी इंग्रजांनी संस्थानिकांची मदत घेतली. बाजीरावासही आपली कवायत फौज इंग्रजांकडे द्यावी लागली. पेंढाऱ्यांच्या प्रश्नामुळे बाजीरावास फौज उभी करण्याची संधी मिळाली.

बाजीरावाने बापू गोखले या पराक्रमी सेनानीच्या नेतृत्वाखाली १५ हजारांची फौज उभी केली. सरदार पानसे, पटवर्धन, रास्ते, विंचूरकर इत्यादींना आपलेसे करून त्यांच्या माध्यमातून ३५ हजारांची फौज बाजीरावाने उभी केली. शिंदे, होळकर, भोसले या सरदारांना एक होण्याचे आवाहन बाजीरावाने केले. परंतु बाजीरावाच्या स्वभावाची चांगली माहिती असणाऱ्या या सरदारांनी संभाव्य संघर्षात तटस्थ राहणे पसंत केले. इंग्रज वकिलातीमधील अधिकाऱ्यांना लाच देऊन त्यांच्या हालचालीची माहिती मिळविण्याचा प्रयत्न बाजीरावाने केला. इंग्रजांची फौज फितूर करण्यासाठी यशवंतराव घोरपडेने बाजीरावाकडून ५० हजार रुपये घेतले. फौज फितूर करणे बाजूलाच उलट बाजीरावाचीच बित्तंबातमी एल्फिन्स्टनला कळविली. एल्फिन्स्टन मात्र बाजीरावाचे लोक फितविण्यात यशस्वी ठरला. बाळाजीपंत नातू सातारच्या छत्रपतींचा चिटणीस यांनी बाजीरावाच्या हालचालीची खडान्‌खडा माहिती एल्फिन्स्टनला सांगितली.

बाजीराव इंग्रजांबरोबर लढण्यासाठी निमित्त शोधू लागले. ६ ऑक्टोबर, १८१७ रोजी बाजीराव व एल्फिन्स्टन यांची दसऱ्याच्या निमित्ताने भेट झाली. या वेळी बाजीराव एल्फिन्स्टनला म्हणाला, ''मी मूळ मंत्रावेगळा तुमचे करण्यांनी झालो. जो मी होतो तो आज नाही, तुम्ही कशास पुसता? तुमचे स्नेहाची जोड मात्र केली की जी कला अंगी होती ती दवडून बसलो.'' एल्फिन्स्टनला कळून चुकले की आता बाजीराव अंतिम लढ्याच्या तयारीत आहे. बाजीरावाने आपल्या सरदारांकरवी ५० हजारांची फौज पुण्यात जमा केली. एल्फिन्स्टनने ही फौज दूर पाठवावी असे बाजीरावास कळविले. परंतु बाजीरावाने त्यास नकार दिला. युद्ध आता अटळ झाले.

**खडकीची लढाई व बाजीरावाचे पलायन :**

५ नोव्हेंबर, १८१७ रोजी बाजीरावाचा सेनापती बापू गोखलेने इंग्रज रेसिडेन्सीवर हल्ला चढविला. इंग्रजांची वकिलात पेटवून दिली. यानंतर बापू गोखलेने खडकी येथील ब्रिटिश सैन्य तळावर हल्ला चढविला. खडकीच्या लढाईत बापू गोखलेने मोठा पराक्रम गाजविला. मात्र त्यास योग्य वेळी सैन्याची कुमक मिळाली नाही. त्यामुळे त्यास माघार घ्यावी लागली. खडकीची लढाई पेशवा बाजीराव आपल्या बायकांसह पर्वतीवरील इमारतीच्या खिडकीतून पाहत होता. लढाईच्या दुसऱ्या दिवशी ब्रिटिश सेनानी बूरने मराठ्यांचा पराभव केला. बूरच्या मदतीस येणाऱ्या जनरल स्मिथच्या सैन्यावर बापू गोखलेने अक्कलकोटकर व आपटे या सरदारांनिशी हल्ला चढविला. मात्र इंग्रजांपुढे त्यांचा निभाव लागला नाही. मराठ्यांचा पराभव होताच बाजीरावाने पुण्याहून सासवडला पलायन केले. बिचाऱ्या पेशव्याला पुन्हा आपल्या राजधानीचे दर्शन घडले नाही.

इकडे इंग्रजांनी येरवड्याजवळ असणाऱ्या घोरपडीवर हल्ला करून तेथे मराठ्यांचा पराभव केला. यानंतर मराठ्यांनी १६ नोव्हेंबर, १८१७ रोजी मराठी सत्तेचे केंद्रस्थान असलेला शनिवारवाडा ताब्यात घेतला. दुसऱ्याच दिवशी एल्फिन्स्टन व स्मिथ यांनी बाळाजीपंत नातूकरवी शनिवारवाड्यावर डौलाने फडकणारा मराठ्यांचा भगवा ध्वज खाली घेतला व तेथे आपला युनियन जॅक फडकविला.

**बाजीरावाची शरणागती :**

शनिवारवाडा ताब्यात आल्याने इंग्रजांचा आत्मविश्वास दुणावला. तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात विजय इंग्रजांच्या समीप आला होता. बाजीरावास ताब्यात घेऊन मराठा राज्याची सांगता करणे एवढीच औपचारिकता इंग्रजांच्या दृष्टीने बाकी होती. जनरल स्मिथने २२ नोव्हेंबर, १८१७ रोजी बाजीरावाचा पाठलाग सुरू केला. खडकीच्या लढाईनंतर पुण्याहून सासवडला गेलेल्या बाजीरावाने तेथून पलायनास सुरुवात केली. बाजीराव पुढे व इंग्रज त्याच्या पाठीवर अशी सहा महिने धामधूम सुरू होती. बाजीराव सासवडहून सालपे घाटमार्गे साताऱ्याजवळील माहुलीस आला. येथे छत्रपती प्रतापसिंहांशी त्याची भेट झाली. छत्रपती आणि इंग्रज यांच्यात सलोखा होऊ नये म्हणून बाजीरावाने त्यांना आपल्या बरोबर घेतले. येथे बापू गोखले ससैन्य बाजीरावाच्या मदतीस आला. त्याचबरोबर त्र्यंबकजी डेंगळे व रामोशी लोकही बाजीरावास येऊन मिळाले. यानंतर १ जानेवारी, १८१८ रोजी कोरेगाव येथे इंग्रजांबरोबर त्यांची लढाई झाली. या लढाईत सुरुवातीस बापू गोखले व त्र्यंबकजीने इंग्रजांचा पराभव केला. मात्र इंग्रजांच्या भेदक माऱ्यामुळे त्यांना माघार घ्यावी लागली.

कोरेगावच्या युद्धात पराभव होताच बाजीरावाने कर्नाटकाकडे पलायन केले. घटप्रभा नदी ओलांडून तो पलीकडे गेला. मात्र मद्रासहून जनरल मन्रो ससैन्य येत असल्याचे समजल्याने तो पुन्हा महाराष्ट्रात परत आला. दरम्यानच्या काळात इंग्रजांनी सातारा जिंकले. या वेळी इंग्रजांनी पेशव्यांचे राज्य नष्ट करणार असल्याचे जाहीर केले. मात्र छत्रपती पेशव्यांबरोबर असले तरी त्यांना मराठा राज्याचे प्रमुख म्हणून स्वतंत्र मुलूख तोडून देण्याचे आश्वासन दिले. दि. २० फेब्रुवारी, रोजी पंढरपूरजवळील आष्टी येथे जनरल स्मिथने मराठा फौजेवर हल्ला चढविला. बापू गोखलेने प्राणपणाने लढा दिला. परंतु तो या लढाईत इंग्रजांकडून ठार झाला. सेनापती ठार झाल्याने बाजीरावाचा धीर खचला. त्याने मेण्याचा त्याग केला. जिवाच्या भयाने घोड्यावर आरूढ होऊन उत्तरेकडे पलायन केले. इंग्रज फौजा त्याचा पाठलाग करत होत्याच. नागपूरच्या भोसल्यांकडून बाजीरावास मदतीची आशा होती; परंतु सिताबर्डीच्या लढाईत त्यांना इंग्रजांकडून हार खावी लागली. बाजीराव आशिरगडाकडे निघाला असता नर्मदा नदी परिसरात धोलकोट येथे इंग्रजांनी त्यास घेरले. अगदी असाहाय्य होऊन १ जून, १८१८ रोजी इंग्रजांपुढे बाजीराव शरण गेला. गेल्या सहा महिन्यांपासून बाजीराव पुढे व इंग्रज त्याच्या पाठीवर असे चित्र होते. सासवडपासून सुरू झालेले बाजीरावचे पलायन अखेर धोलकोटला संपले. बाजीरावाच्या या पलायनामुळेच त्यास 'पळपुटा बाजीराव' असे संबोधले जाते.

बाजीराव शरण आल्याने जनरल माल्कमने त्यास वार्षिक ८ लक्ष रुपयांची पेन्शन देऊ केली. या मोबदल्यात आपण दक्षिणेत जाणार नाही, तसेच मी व माझे वारस पेशवेपदावर व मराठी मुलखावर हक्क

सांगणार नाही हे बाजीरावाने कबूल केले. इंग्रजांनी मध्य प्रदेशातील कानपूरजवळ ब्रह्मावर्त येथे बाजीरावास स्थानबद्ध केले. अशा प्रकारे वैभवाप्रत पोहोचलेल्या मराठेशाहीची बाजीरावाच्या नादानपणामुळे इतिश्री झाली.

मराठ्यांची वैभवशाली सत्ता आपल्या हातून नष्ट झाल्याची खंत बाजीरावास वाटली नाही. गमावलेली सत्ता पुन्हा मिळवण्याचा त्याने प्रयत्नही केला नाही. ब्रह्मावर्तास त्याने पाच लग्ने केली. त्याच्या लग्नाच्या एकंदरीत ११ बायका शिवाय प्रीतीमधील किती होत्या हे निश्चित सांगता येणार नाही. ब्रह्मावर्तास सुंदर राजवाडा बांधून बाजीराव भोगविलासात रममाण झाला. बाजीराव महाराष्ट्रातून कायमचा बाहेर गेल्याने मराठी माणसाला दिलासा मिळाला. तथापि, आपली वैभवशाली सत्ता नष्ट झाल्याने प्रत्येक मराठी माणूस हळहळला.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

पुढील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ............. यांनी १८०३ मध्ये ब्रिटिशांबरोबर सुरजी अंजनगाव चा तह केला.

अ) शिंदे ब) होळकर क) फडणवीस ड) भोसले

२. तिसरी इंग्रज मराठा युद्ध ............. या कालावधीत झाले.

अ) १८१५-१६ ब) १८१६ -१७ क) १८१४- १५ ड) १८१७-१८

३. १८१२ रोजी एलफिस्टनने बाजीरावांशी ............. करार केला.

अ) सांगोला ब) राजघाट क) देवगाव ड) पंढरपूर

४. ............. साली ऐतिहासिक पुण्याचा तह झाला.

अ) १८१५ ब) १८१६ क) १८१७ ड) १८१८

५. ............. या पेशव्यास पळपुटा बाजीराव म्हणून ओळखले जाते.

अ) पहिले बाजीराव ब) दुसरे बाजीराव क) बाळाजी बाजीराव ड) यापैकी नाही

### ४.२.३ (क) मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणे

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्याची छत्रपती संभाजी,छत्रपती राजाराम, महाराणी ताराबाई यांनी प्राणपणाने संरक्षण केले. यवनी आक्रमणाला त्यांनी यशस्वी तोंड दिले. पुढे छत्रपती शाहूंच्या कालखंडात सत्तेचा केंद्रबिंदू छत्रपतींकडून प्रधानाकडे सरकू लागला. पहिल्या चार पेशव्यांच्या कालखंडात मराठा सत्तेचा प्रचंड विस्तार झाला. बारभाई मंडळानेही मराठी सत्तेला वैभवाचे दिवस दाखविले. १८ व्या शतकाच्या अखेरीस अनेक कर्त्या पुरुषांचा अंत झाला. दुसरा बाजीराव सत्तेवर आल्यापासून मराठा राज्यात अनागोंदी सुरू झाली. सरदारांमधील हेवेदावे वाढीस लागले. राष्ट्रहित बाजूस पडून स्वार्थ बोकाळला. साम्राज्यविस्ताराची राक्षसी महत्त्वाकांक्षा असणाऱ्या इंग्रजांनी परिस्थितीचा अचूक फायदा उठवत मराठी

सत्तेचा घास घेतला. मराठा सत्तेच्या ऱ्हासास केवळ एकच घटक कारणीभूत नसून अनेक घटक कारणीभूत ठरले आहेत. त्यांचा आढावा खालीलप्रमाणे

**१. शिवशाहीच्या ध्येयधोरणांचा विसर :** छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या माध्यमातून आदर्श राज्याची निर्मिती केली. राज्यकारभारात त्यांनी शिस्त निर्माण केली. महाराष्ट्राला लाभलेल्या भौगोलिक परिस्थितीचा फायदा उठवत त्यांनी 'गनिमी कावा' या तंत्राचा अवलंब केला. परकीय सत्तांचा धोका ओळखून महाराजांनी जलदुर्ग बांधले. प्रचंड आरमार उभारले. लष्करासाठी नियमावली तयार केली. थोडक्यात, महाराजांनी राज्यकारभाराच्या माध्यमातून लोककल्याण साधले. नंतरच्या कालखंडात शिवकालीन आदर्श व शिस्त राहिली नाही. लोककल्याण बाजूस पडून 'वतन' प्रियता वाढीस लागली. नानासाहेबांनी शिवशाही कार्यक्रमाची दखल घेतली पाहिजे हे सांगताना शेजवलकर म्हणतात, 'हे कालमहात्म्य त्या काळी ओळखून नानासाहेबाने शिवशाहीचा कार्यक्रम आखावयास हवा होता.' केवळ नानाच नाही तर अनेक मराठी राज्यकर्ते शिवकालीन आदर्शापासून दूर गेले. त्यामुळे मराठी सत्तेचा हास घडून आला.

**२. इंग्रज–मराठा संघर्ष :** १७ व्या शतकात ब्रिटिशांनी अनेक ठिकाणी आपल्या वखारी निर्माण केल्या. व्यापार करणे व त्या माध्यमातून नफा मिळविणे हा मर्यादित हेतू त्यांच्यासमोर होता. या काळात इंग्रज आणि मराठे यांच्या संस्कृतीत फार मोठी तफावत होती. १८ व्या शतकात युरोपात नवनवीन शोध लागले. औद्योगिक क्रांती झाली. यामध्ये इंग्रज आघाडीवर होते. औद्योगिक क्रांतीमुळे इंग्रजांचा राजकीय, आर्थिक हव्यास वाढीस लागला. शस्त्रास्त्रांमधील प्रगतीमुळे इंग्रजांचा आत्मविश्वास वाढला. आपल्या बुद्धी व संघटन कौशल्याच्या जोरावर इंग्रजांनी मराठ्यांवर मात केली तर सर्व प्रकारची अनुकूलता असतानाही मराठ्यांना आपले राज्य गमवावे लागले.

**३. दुर्बल मध्यवर्ती सत्ता :** शिवाजी महाराजांनी प्रबळ मध्यवर्ती सत्तेची निर्मिती केली. राज्याला मारक असणारी वतन पद्धत त्यांनी रद्द केली. राजाच्या मदतीसाठी अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली. अष्टप्रधानातील पदे वंशपरंपरागत नसून ती योग्यतेनुसार भरली जात. छत्रपती राजारामांनी औरंगजेबाच्या विरोधात सरदारांना उभे करण्यासाठी वतन देण्यास सुरुवात केली. छत्रपती शाहूंनी पेशवे, दाभाडे, भोसले, गायकवाड इत्यादी सरदारांना कार्यक्षेत्र वाटून दिले. केंद्रीय सत्ता जोपर्यंत प्रबळ होती तोपर्यंत वतनदार मध्यवर्ती सत्तेशी प्रामाणिकपणे वागले. मध्यवर्ती सत्तेच्या दुर्बलतेमुळे व मराठ्यांमध्ये अंगभूत असलेल्या स्वतंत्र वृत्तीमुळे मराठा सत्तेचा ऱ्हास झाला. याबाबत न. चि. केळकर म्हणतात, ''प्रबळ मध्यवर्ती सत्तेचा अभाव, स्वतंत्र जहागिरीची हाव, शिस्तबद्ध कवायती सैन्याचा अभाव इत्यादींमुळे मराठेशाहीचा ऱ्हास झाला.''

**४. सरंजामशाही व सरदारांमधील हेवेदावे:** वतनाच्या लोभापायी सरंजामशाहीची वाढ झाली. मराठ्यांची मध्यवर्ती सत्ता जसजशी दुर्बल होत गेली, तसतशी सरंजामशाहीमध्ये वाढ होत गेली. चौथाई सरदेशमुखीच्या वसुलीच्या निमित्ताने अनेक सरदारांना मोगल मुलखात मुलूखगिरीची संधी मिळाली. पेशवे काळात सरदारांकडे मोठमोठ्या फौजा होत्या त्या फौजांच्या खर्चासाठी त्यांना सरंजाम म्हणून मोठमोठे प्रदेश

दिले होते. उत्तर भारतात या मराठा सरदारांनी आपला दरारा निर्माण केला असला तरी मध्यवर्ती सत्तेला त्याचा फारसा फायदा झाला नाही. मध्यवर्ती सत्तेच्या दुर्बलतेमुळे सरंजामदार स्वतंत्रपणे वागू लागले. एवढेच नव्हे तर सरंजामदारांमध्ये असणारी असूया वाढीस लागली. सरंजामदारांमधील वैमनस्यामुळे मराठेशाहीचे प्रचंड नुकसान झाले. शिंदे विरुद्ध होळकर, नानासाहेब विरुद्ध तुळाजी आंग्रे, राघोबा विरुद्ध माधवराव, दौलतराव शिंदे विरुद्ध यशवंतराव होळकर इत्यादी सरदारांमधील वाद प्रसिद्ध आहेत. शिंदे, भोसले, होळकर, पेशवे हे सर्व जण इंग्रजांबरोबर लढले; परंतु एक इंग्रजांशी लढत असता बाकीचे तटस्थ राहिले. इंग्रजांनीही या प्रबळ सरदारांना एकाकी पाडून त्यांना पराभूत केले. प्रबळ सरदारांमध्ये ऐक्य असते तर ते इंग्रजांना पराभूत करू शकले असते. परंतु तसे न झाल्याने मराठेशाहीचा ऱ्हास झाला.

**५. राष्ट्राभिमानाचा अभाव :** १८ व्या शतकात राष्ट्राभिमान ही संकल्पना भारतीयांना ज्ञात नव्हती. वैचारिकदृष्ट्या आपण युरोपियनांच्या मागे होतो. तरीही स्वराज्याविषयी मराठ्यांना नितांत प्रेम होते, अभिमान होता. उत्तर पेशवाई कालखंडात हा अभिमान कमी-कमी होत जाऊन शेवटी लोप पावला. यामुळे स्वराज्याचा विचार बाजूस पडून ते भांडत राहिले. स्वकीयांचा पाडाव करण्यासाठी त्यांनी इंग्रजांची मदत घेतली. इंग्रजांतही मतभेद होते. परंतु ते त्यांनी राष्ट्रकार्याच्या आड कधीही येऊ दिले नाहीत. कलकत्तेकर इंग्रज मुंबईकर इंग्रजांच्या विरोधात कधी लढले नाहीत. संस्थानिकांच्या पदरी असणारी तैनाती फौज संस्थानिकांशी एकनिष्ठ नसून इंग्रजांशी एकनिष्ठ होती. युरोपियनांच्या राष्ट्राभिमानाबद्दल न. चि. केळकर म्हणतात, ''इंग्रज, फ्रेंच हे हिंदुस्थानात परस्परांविरुद्ध लढले, पण स्वकियांविरुद्ध लढले नाहीत. याचा अर्थ त्यांचे परस्पर इमान धर्मनिष्ठ नव्हते तर स्वदेशभक्तिनिष्ठ होते.''

**६. कवायती लष्कराचा अभाव:** महादजी शिंदेंनी कवायती फौजेचे महत्त्व ओळखले व तशी फौज निर्माण करण्यासाठी फ्रेंच सेनानी डी बॉयनची नियुक्ती केली. महादजींच्या यशामध्ये या कवायती फौजेचा मोठा वाटा आहे. महादजींप्रमाणे किती लोकांनी कवायती फौज निर्माण करण्याचा प्रयत्न केला हा महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्रिटिशांची अद्ययावत शस्त्रास्त्रे व कवायती फौज यांचे महत्त्व मराठ्यांना पटले होते. परंतु इंग्रजांच्या याबाबतच्या तंत्राकडे कोणी लक्ष दिले नाही किंवा ते आत्मसात करण्याचा कोणी प्रयत्न केला नाही. याबाबत न. चि. केळकर म्हणतात, ''इंग्रज सहा हजार मैलांवरून हिंदुस्थानात आले. तसे त्यांचे उदाहरण पाहून धाडस करून मराठ्यांना युरोपात जाऊन हिंदुस्थानात उपलब्ध नसणाऱ्या विद्या शिकण्यास स्नेही मिळविण्यास व व्यापार संपादण्यास नको कोणी म्हटले होते?''

**७. अद्ययावत शस्त्रसामग्री व तोफखान्याकडे दुर्लक्ष:** शिवकालापासून मराठ्यांना बंदुका, तोफा, दारूगोळा यासाठी पाश्चात्त्यांवर अवलंबून राहावे लागत होते. पेशवे काळातही याबाबत फारशी प्रगती झाली नाही. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, धातुविज्ञान इत्यादींबाबत पाश्चात्त्यांप्रमाणे भारतीयांना प्रगती करता आली नाही. युद्धामध्ये अवजड तोफखान्यावर मराठ्यांनी भर दिला. त्यामुळे लष्करी हालचालीतील गतिमानता मंदावली. हलक्या व मध्यम आकाराच्या तोफा, उष्ट्रनळे, पिलनळे यावर भर देणे आवश्यक होते. पानिपतावर अब्दालीच्या विजयात त्याच्या उष्ट्र तोफखान्याची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली होती. थोडक्यात, अद्ययावत युद्धसामग्री व तोफखान्याकडे दुर्लक्ष झाल्याने इंग्रजांच्या विरोधात मराठ्यांना हार खावी लागली.

**८. आरमाराकडे दुर्लक्ष:** छत्रपती शिवाजी महाराजांनी सागरी किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आरमार व जलदुर्ग उभारले. महाराजांना भारतीय आरमाराचे जनक मानले जाते. रामचंद्रपंत आपल्या आज्ञापत्रात म्हणतात, ''आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच आहे. ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र याकरिता आरमार अवश्यमेवकरावे.'' शिवकालानंतर आरमाराकडे दुर्लक्ष होत गेले. इ. स. १७२९ मध्ये कान्होजी आंग्रेच्या निधनाने त्यांच्या मानाजी व तुळाजी या दोन मुलांमध्ये आरमारप्रमुख पदावरून वाद सुरू झाला. तुळाजी आणि नानासाहेब पेशवे यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. तुळाजीला शासन करण्यासाठी नानासाहेबांनी इंग्रजांची मदत घेतली व आंग्रेचे आरमार नष्ट केले. आंग्रेचे आरमार म्हणजे मराठा राज्याचे आरमार होते ते नष्ट झाल्याने पश्चिम सागरी किनारपट्टी असुरक्षित झाली व याचा फायदा इंग्रजांनी घेतला.

**९. हेरखात्याकडे दुर्लक्ष :** बहिर्जी नाईक यांच्या नेतृत्वाखाली छत्रपती शिवाजी महाराजांनी हेरखात्याची रचना केली होती. स्वराज्याबरोबर परमुलखातील बित्तंबातमी या खात्याच्या माध्यमातून महाराजांना समजत होती. महाराजांच्या महत्त्वपूर्ण मोहिमेपूर्वी हेरखात्याने त्यांना अचूक माहिती पुरविली होती. पेशवे काळात या खात्याकडे दुर्लक्ष होत गेले. नाना फडणविसांनंतर या खात्याचा कारभार जवळजवळ आटोपलाच. याउलट, इंग्रजांनी आपली गुप्तहेर यंत्रणा कार्यक्षम ठेवली होती. मराठ्यांच्या हालचाली, त्यांचे द्रव्यबळ, सरदारांमधील परस्परसंबंध, त्यांच्यातील हेवेदावे इत्यादींची बिनचूक माहिती इंग्रजांनी मिळविली होती. एल्फिन्स्टनने बाजीरावाभोवतीचे लोकही फितवून ठेवल्याची त्यास साधी कल्पनाही आली नव्हती. तैनाती फौजेच्या स्वीकारानंतर इंग्रजांचा वकीलच पुण्यामध्ये राहू लागला. मराठ्यांच्या ऱ्हासामध्ये त्यांनी हेरखात्याकडे केलेले दुर्लक्ष हे एक महत्त्वपूर्ण कारण आहे.

**१०. लष्करी हालचाली व राजनैतिक डावपेच यामधील पीछेहाट :** जो कमीतकमी सैनिक खर्ची घालून विजय मिळवितो तो श्रेष्ठ सेनापती होय. छत्रपती शिवाजी महाराज, संताजी घोरपडे, पहिला बाजीराव यांनी असे विजय मिळविले. छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्धशास्त्र आणि युद्धकला यांचा अभ्यास केला होता. महाराजांच्या हालचाली अत्यंत जलद असत. तर राजनैतिक डावपेच थक्क करून सोडणारे होते. युद्धतंत्रातील आकस्मिकतेचे तत्त्व (Principle of Surprise), गतिमानतेचे तत्त्व (Principle of Mobility) व बचतीचे तत्त्व (Principle of Economy) यांचा महाराजांनी अभ्यास केला होता.पेशवाई कालखंडात गनिमी कावा तंत्र मागे पडून मैदानी लढायांचा अवलंब करण्यात आला. मात्र मैदानी लढाईमधील विविध तंत्रांचा अभ्यास मराठ्यांनी काळजीपूर्वक केला नाही. नाना महादजींच्या मृत्यूनंतर मराठ्यांची राजकीय पीछेहाट झाली. इंग्रजांनी अभिनव अशा तैनाती फौजेच्या जाळ्यात मराठ्यांना अडकविले.

**११. लष्करात बिनलढाऊ लोकांचा भरणा:** शिवकालीन मराठ्यांचे छावणीतील जीवन अत्यंत साधे होते. मोहिमेवर स्त्रिया व मुलांना घेण्यास मज्जाव होता. लष्कराजवळ कमीतकमी साहित्य असल्यामुळे व त्यांच्या साधेपणामुळे लष्करी हालचाली अत्यंत जलद गतीने होत होत्या. नानासाहेबांच्या कालखंडापासून लष्करातील डामडौल वाढत गेला. बिनलढाऊ लोकांचे प्रमाण बाढले. परीट, शिंपी, चांभार, न्हावी, पखाली या सेवा पुरविणाऱ्या लोकांबरोबरच भालदार, चोपदार, आचारी, शाहीर, तमासगीर, नर्तकी इत्यादी

बिनलढाऊ लोकांचे लष्करी मोहिमांतील प्रमाण वाढले. इतिहासकारांनी या बिनलढाऊ लोकांना 'बाजारबुणगे' असे संबोधले आहे. सदाशिवरावभाऊ पानिपतच्या मोहिमेवर निघाले असता, उत्तरेत हिंदूंची पवित्र तीर्थस्थळे मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांचे पुण्य पदरात पाडून घेण्यासाठी स्त्रियांना बरोबर घेण्याची अनुमती देण्यात आली. त्यामुळे स्त्रिया, दास दासी व इतर बिनलढाऊ लोकांचे प्रमाण वाढले, त्यांच्या संरक्षणाचा भार सैन्यावर पडला यामुळे लष्करी हालचाली मंदावल्या.

**१२. राज्यकारभारात उदासीनता:** राज्यकारभारात वरिष्ठांचा कनिष्ठांवर अंकुश असणे आवश्यक असते; परंतु तसा अंकुश छत्रपती शाहू महाराज पेशव्यांवर ठेवू शकले नाहीत. राज्यप्रमुख छत्रपती असताना पेशव्यांनी आपल्या हाती अधिकार घेतल्याचे अनेक सरदारांना आवडले नाही. त्यातूनच पेशवे दाभाडे, पेशवे-आग्रे इत्यादी संघर्ष निर्माण झाले. शिवकालामध्ये राज्यकारभारात शिस्त होती. सरदारांवर अंकुश होता. प्रांतीय कारभारावर लक्ष होते. शिवाजी महाराज कर्नाटक मोहिमेवर गेले त्या वेळी शेकडो मुलकी अधिकारी त्यांनी आपल्याबरोबर घेतले होते. या मोहिमेत २० लक्ष होन उत्पन्नाचा मुलूख महाराजांच्या ताब्यात आला. त्यांनी या प्रदेशाची कायमस्वरूपी व्यवस्था होण्यासाठी आपल्याकडील अधिकाऱ्यांना तेथे नेमणुका दिल्या. पुढील काळात अशा प्रकारची दक्षता घेण्यात आली नाही. मराठ्यांनी अटकपासून कटकपर्यंत आपले वर्चस्व निर्माण केले. परंतु या प्रदेशाची कायमस्वरूपी व्यवस्था झाली नाही. मराठ्यांची या प्रदेशाकडे पाठ होताच पुन्हा हे प्रदेश त्यांच्या हातून जात असत. या बाबतीत शेजवलकर म्हणतात, ''जिंकलेला मुलूख ताबडतोब ताब्यात घेऊन तेथे आपली राज्ययंत्रणा व्यवस्थित सुरू करणे हे मराठ्यांना ठाऊकच नव्हते..... जेथे मराठ्यांचे सैन्य तेथे तेवढे त्यांचे राज्य, बाकीचा प्रदेश बहुतेक स्वतंत्र अशी स्थिती होती.''

**१३. पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचा आघात:** १४ जानेवारी, १७६१ च्या पानिपतच्या युद्धात अहमदशहा अब्दालीकडून मराठ्यांचा पराभव झाला. मराठ्यांचा उत्तरेतील दबदबा नाहीसा झाला. एक कर्ती पिढी पानिपतावर कामी आली. पानिपतच्या धक्क्यातून मराठे सावरू शकले नाहीत. त्यातच या बलशाली सत्तेचा अस्त झाला असे काही इतिहासकार मानतात, तर काही इतिहासकार या मताशी सहमत नसून ते म्हणतात की, पेशवे थोरले माधवराव, नाना महादजी यांनी पानिपताच्या धक्क्यातून मराठा सत्तेला बाहेर काढत तिला पूर्वीचे वैभव प्राप्त करून दिले. एकंदरीत, पानिपतच्या रणसंग्रामात मराठ्यांचे अनेक नामवंत सेनानी मारले गेले. मराठ्यांचा उत्तरेतील दबदबा नाहीसा होऊन मराठ्यांच्या शत्रूनी डोके वर काढले. प्रामुख्याने पानिपतचे युद्ध इंग्रजांच्या पथ्यावर पडले. याबाबत गो. स. सरदेसाई म्हणतात, ''या युद्धामुळे भारतातील तिसऱ्या शक्तीला अर्थात इंग्रजांना मार्ग मोकळा झाला. प्लासीच्या युद्धाने जर इंग्रजी सत्तेचे भारतात बीजारोपण झाले असेल तर पानिपतच्या युद्धाने या बीजातून महावृक्ष फोफावला.''

**१४. व्यापाराकडे दुर्लक्ष:** मराठ्यांचा राज्य अंतर्गत व्यापार सुरळीतपणे सुरू होता. परंतु देशांतर्गत व परदेशाशी व्यापाराबाबत मराठ्यांनी प्रयत्नही केला नाही. पश्चिम किनारपट्टी त्यांच्या ताब्यात होती. व्यापारसुलभ बंदरे हाती होती. परंतु 'जुने काही मोडू नये व नवे काही करू नये' अशी आपली विचारधारा असल्याने व्यापारवृद्धी झाली नाही. पेशव्यांनी व्यापार उद्योगाकडे व दळणवळणाच्या साधनाकडे फारसे लक्ष

दिले नाही. परिणामतः व्यापारीदृष्ट्या मराठ्यांची पीछेहाट झाली. याउलट, १८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाल्याने कारखानदारी, दळणवळणातील साधने यात प्रचंड प्रगती झाली. इंग्रजांचा व्यापार द्रुतगतीने वाढला. इंग्रज लोक भारतीय व्यापाऱ्यांसारखे केवळ व्यापारावर समाधान मानणारे नव्हते. परिस्थितीचा अचूक फायदा उठवत तराजू बाजूस ठेवून त्यांनी हाती तलवार घेतली.

**१५. आर्थिक दिवाळखोरी:** राज्याची आर्थिक बाजू डबघाईस आल्याने मराठ्यांना त्याची फार मोठी किंमत मोजावी लागली. मराठ्यांचा राज्यविस्तार मोठ्या प्रमाणात झाला. विस्तारित प्रदेशातील चौथाई-सरदेशमुखीचे अधिकार मराठ्यांना मिळाले. परंतु महसूल वसूल कधीच वेळेवर झाला नाही. महसूल वसुलाचे नियोजन योग्य पद्धतीने झाले नाही. कित्येक वर्षांचा महसूल थकीत राहू लागला. एकट्या निजामाकडे तीन कोटी रुपयांची थकबाकी होती. सततच्या युद्ध मोहिमांमुळे पेशव्यांना कर्ज घेण्याशिवाय पर्याय नव्हता. प्रत्येक पेशवा कर्जात अडकलेला होता. थोरल्या माधवरावांच्या मृत्यूसमयी त्यांचेवर २४ लक्ष रुपयांचे कर्ज होते. तर नानासाहेबांच्या काळात राज्यावरील कर्ज दीड कोटीच्या घरात होते. पेशवे कर्ज घेताना अनेक गावांचा महसूल गहाण टाकत असत. पेशव्यांप्रमाणेच अनेक सरदारही कर्जात अडकले होते. युद्ध मोहिमेसाठी सावकारांकडून कर्जे घेण्यात येत होती. दीक्षित, पटवर्धन, अनगळ, बारामतीकर इत्यादी सावकार भरमसाट व्याजदराने कर्ज देत होते. पेशवाईच्या ऱ्हासानंतर ब्रिटिश सरकारने सावकारांचे कर्ज देण्यास नकार दिला. त्यामुळे सावकारांचेही दिवाळे निघाले.

**१६. धर्माचरणाचे स्तोम:** उत्तर पेशवाईत धर्माचरणाचे स्तोम फार माजले. यज्ञ-याग, पूजा-अर्चा, मंत्र-तंत्र यांना उधाण आले. अब्दालीला हिंदुस्थानातून पिटाळून लावण्यासाठी ससैन्य निघालेला सदाशिवरावभाऊ धर्माचरणाच्या विलक्षण मोहात सापडला. धार्मिक स्थळांवर त्यांचा बहुतांश वेळ वाया गेला. दुसऱ्या बाजीरावाच्या कालखंडात तर धर्माचरणाचा कळस झाला. अधिष्ठान, ब्राह्मण भोजन व चैन-विलास यांत बाजीराव अडकून पडला. या कालखंडातील परिस्थितीचे वर्णन करताना शेजवलकर म्हणतात, ''पेशवाईमुळे कर्मकांडाचे निरर्थक स्तोम माजले, ज्यांच्या गायत्री जपाचा राष्ट्राच्या संवर्धनास तिळमात्र उपयोग नाही अशा भट्टमजकुरांची तट्टे फुगली. अर्थात, हिंदुस्थानची नव्या काळाकडे प्रगती होण्याऐवजी अंधश्रद्धा व पुराणाभिमान बोकाळून राष्ट्राची थोडीफार सामाजिक पीछेहाटच झाली असे म्हणावयास जागा आहे.''

**१७. कर्तबगार व्यक्तींना लाभलेले अल्पायुष्य:** कर्तबगार मराठा राज्यकर्त्यांना दीर्घायुष्य लाभले नाही. छत्रपती शिवाजी महाराज ५० वर्षे, पहिले बाजीराव ४० वर्षे, थोरले माधवराव २८ वर्षे आयुष्य जगले. महाराजांच्या अकाली निधनाने औरंगजेबाचे महाराष्ट्रावर आक्रमण झाले. पहिल्या बाजीरावांच्या मृत्यूमुळे निजामाचा पुरता बंदोबस्त झाला नाही. तर थोरल्या माधवरावांच्या अकाली मृत्यूमुळे मराठेशाहीत यादवी निर्माण झाली. रियासतकार सरदेसाई यांच्या मतानुसार, ''कर्तबगार पुरुषांना लाभलेले अल्पायुष्य हे मराठेशाहीच्या ऱ्हासाचे एक प्रमुख कारण होय.''

**१८. नेतृत्वाचा अभाव:** स्वराज्यास सुरुवातीच्या कालखंडात छत्रपती शिवाजी, छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम, महाराणी ताराबाई, संताजी, धनाजी, रामचंद्रपंत अमात्य इत्यादी कर्तबगार नेत्यांचे नेतृत्व

लाभले. छत्रपती शाहूंपासून छत्रपती नामधारी झाले तर पेशवे कार्यकारी प्रमुख बनले. बाळाजी विश्वनाथांपासून ते थोरल्या माधवरावांपर्यंत पेशव्यांच्या माध्यमातून मराठेशाहीस कर्तबगार नेतृत्व मिळाले. माधवरावांच्या मृत्यूनंतर नाना महादजींनी नेतृत्वाची धुरा सांभाळली. त्यांच्यानंतर मराठेशाहीचा राज्यशकट यशस्वीपणे हाताळण्याची कुवत असणारा एकही नेता मिळू न शकल्याने मराठेशाहीचा –हास झाला. याबाबत सरदेसाई म्हणतात, ''सर्वांस धाकात ठेवून सर्वांकडून योग्य कामगिरी करून घेणारा चालक राष्ट्रास मिळाला नाही. हे राज्यनाशाचे आद्य कारण आहे.'' मराठ्यांकडे नेतृत्वाचा अभाव तर इंग्रजांकडे एकाहून एक सरस सेनानी लाभल्याने मराठेशाहीचा ऱ्हास झाला.

**१९. मराठ्यांनी इंग्रजांची घेतलेली मदत:** तुळाजी आंग्रेला शासन करण्यासाठी नानासाहेबाने इंग्रजांची मदत घेतली व आपल्याच आरमाराचा नाश केला. पुढे राघोबाने पेशवेपदाच्या हव्यासापोटी इंग्रजांशी सुरतेचा तह करून त्यांना पुण्यास आणले. यातून पहिले इंग्रज मराठा युद्ध घडून आले. तर राघोबापुत्र दुसऱ्या बाजीरावाने वडिलांच्याच पावलावर पाऊल ठेवून इंग्रजांशी वसईचा तह करून तैनाती फौज स्वीकारली. मराठ्यांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करण्याची संधी इंग्रजांना चालून आली. त्यांनी या संधीचा अचूक फायदा उठवून मराठेशाहीचा घास घेतला. आपला हेतू साध्य करण्यासाठी शत्रूची मदत घेण्यास हरकत नाही. परंतु हेतू साध्य होताच शत्रूला दूर करणे आवश्यक असते. बाजीरावाकडून तसे झाले नाही. इसापनीतीतील कथेप्रमाणे घोड्याने आपल्या शत्रूचा नाश करण्यासाठी मनुष्यास पाठीवर घेतले. परंतु शत्रूचा नाश झाल्यावर घोड्याला मनुष्यास पाठीवरून दूर करता आले नाही. बाजीरावाने इंग्रजांची मदत घेतली व आपले संरक्षण केले खरे पण इंग्रजांचा खोडा बाजीरावास काढता आला नाही.

**२०. मराठ्यांनी विज्ञानाकडे केलेले दुर्लक्ष:** १८ व्या शतकात युरोपात प्रबोधन चळवळ गतिमान होती तर या कालखंडात भारतीय लोक अज्ञान, अंधश्रद्धा, रूढी-परंपरा यामध्ये अडकून पडले होते. इंग्रजांनी व्यापार, कला, विज्ञानात प्रगती केली होती. औद्योगिक क्रांती सर्वप्रथम इंग्लंडमध्ये घडून आली. उद्योग, व्यापार, दळणवळण, शिक्षण इत्यादी क्षेत्रांत इंग्रजांनी अभूतपूर्व प्रगती केली. शस्त्रास्त्रामधील त्यांची प्रगती त्यांच्या यशास कारणीभूत ठरली. हजारो मैलांवरून भारतात आलेल्या इंग्रजांनी येथील समाजाचा त्यांच्या भाषेचा, येथील भौगोलिक व राजकीय स्थितीचा बारकाईने अभ्यास केला. अशा गोष्टी साध्य करणे मराठ्यांकडून झाले नाही. तसा प्रयत्नही त्यांनी केला नाही. हिंदुस्थानवर वर्चस्व गाजवू पाहणाऱ्या मराठ्यांना तोफा- बंदुकांमध्ये स्वावलंबी होता आले नाही. मराठ्यांच्या ऱ्हासाबाबत इतिहासाचार्य राजवाडे म्हणतात, ''मराठ्यांनी विज्ञानाकडे केलेले दुर्लक्ष हे मराठेशाहीच्या नाशाचे प्रमुख कारण होय.''

**२१. इंग्रजांची मुत्सद्देगिरी :** मुत्सद्देगिरीत इंग्रज मराठ्यांपेक्षा वरचढ ठरले. सहा हजार मैलांवरून भारतात व्यापारासाठी आलेल्या इंग्रजांनी येथील परिस्थितीचा अभ्यास करून एक-एक प्रदेश मिळवत आपले साम्राज्य निर्माण केले. साम-दाम-दंड-भेद नीतीचा अवलंब करून इंग्रजांनी मराठेशाहीचा पाडाव केला. इंग्रजांच्या मुत्सद्देगिरीबाबत सरदेसाई म्हणतात, ''मराठ्यांच्या ऱ्हासाचे महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्रजांची मुत्सद्देगिरी होय. वेलस्ली बंधू, पुण्याच्या शिंद्यांकडचे किंवा नागपूरचे इंग्रज रेसिडेंट हे सर्व एकापेक्षा एक इंग्रज अंमलदार मराठ्यांचा पाडाव करण्यास चंग बांधून उभे राहिले. त्यांनी राजकारणाने व अर्थदानाने

आमच्यात फूट पाडली. गुप्त बातम्या मिळविल्या, फितूर केले, जाहीरनामे काढून व नाना प्रकारची लालूच दाखवून लोकमत आपल्या बाजूस वळविले. सरदारांत व सावकारांत आपल्या सत्यवचनाची व व्यापारी देवघेवीची पत हलके हलके वाढविली आणि तितक्याच अंशाने मराठ्यांची पत कमी केली. तसेच सूक्तासूक्त मार्गांनी संधी साधून त्यांनी एक-एक मराठे सरदारांस अलग केले. त्यांची एकजूट होऊ दिली नाही. युक्तीच्या करारांनी त्यास आखडीत नेले.''

**२२. पेशवा दुसरा बाजीराव:** राज्यकर्ता आपल्या कालखंडात घडणाऱ्या बऱ्याबाईट गोष्टीस जबाबदार असतो. यशाचे श्रेय जर आपण एखाद्या राज्यकर्त्यांस देत असू तर त्याच्या कालखंडातील अपयशास त्यालाच जबाबदार धरावे लागते. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात मराठेशाहीचा अस्त झाल्याने तो यास जबाबदार आहे. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर दुसरा बाजीराव पेशवेपदी आला. राज्यकर्त्यास आवश्यक असणारे गुण त्याच्याजवळ नव्हते. सर्वांना बरोबर घेऊन त्यास राज्यकारभार करता आला नाही. त्यांनी नाना फडणविसांना अटक केली. होळकरांच्या अंतर्गत प्रश्नात लक्ष घालून विठोजीस ठार केले. यामुळे यशवंतराव त्यांच्यावर चालून आला. त्याच्याकडून पराभूत होताच बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास जाऊन त्यांच्याशी तैनाती फौजेचा तह केला. ग्रँट डफच्या मतानुसार, ''स्वातंत्र्याची किंमत देऊन बाजीरावाने आपल्या देहाचा बचाव केला.''

बाजीरावाच्या कालखंडात दुसरे इंग्रज-मराठा युद्ध होऊन यांत इंग्रजांनी शिंदे, भोसले, होळकर या एकेकाचा पराभव केला. ज्यांच्या शिरावर मराठेशाहीची मदार होती ते पराभूत झाल्याने मराठ्यांची बाजू लंगडी झाली. इंग्रजांनी बाजीरावाभोवती टाकलेला तैनाती फौजेचा फास आवळला. बाजीरावाने इंग्रजांच्या वर्चस्वातून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. यातून तिसरे इंग्रज-मराठा युद्ध होऊन त्यात बाजीरावाचा पराभव झाला. बाजीरावाने आठ लक्ष रुपये तनख्याच्या मोबदल्यात पेशवेपदावरील आपला अधिकार सोडला. अशा प्रकारे ब्रिटिश सत्तेपुढे मराठ्यांना हार खावी लागली.

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.

१. ............. यांच्या मते प्रबळ मध्यवर्ती सत्तेचा अभाव शिस्तबद्ध कवायती सैन्याचा अभाव यामुळे मराठीशाहीचा अस्त झाला

अ) न.ची केळकर　　ब) रामचंद्र पंत अमात्य

क) शेजवलकर　　ड) यापैकी नाही

२. आरमार म्हणजे स्वतंत्र एक राज्यांगच होय असे ............. म्हणतात.

अ) न.ची केळकर　　ब) रामचंद्रपंत अमात्य　क) शेजवलकर　　ड) जदुनाथ सरकार

३. ............. पानिपतचे तिसरे युद्ध घडून आले.

अ) १७६१　　ब) १७६२　　क) १७६३　　ड) १७६४

४. ............ यांच्या नेतृत्वाखाली शिवाजी महाराजांनी हेर खात्याची रचना केली होती.

अ) नेताजी पालकर ब) प्रतापराव गुजर क) हंबीरराव मोहिते ड) बहिर्जी नाईक

५. ............ यांच्या मते कर्तबगार पुरुषांना लाभलेले अल्पायुष्य हे मराठेशाहीच्या अस्ताचे प्रमुख कारण होय.

अ) रियासतकार सरदेसाई ब) राजवाडे क) शेजवलकर ड) ग्रँट डफ

## ४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. ऱ्हास- अस्त

२. धनी- मालक

३. तह /करार -समझोता, वाटाघाटी

४. निर्बंध - मर्यादा

५. बाजारबुणगे- बिन लढाऊ, बिनकामाचे

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे

१. ब. दुसरा बाजीराव २. ब. १७९६ ३. अ. विठोजी होळकर

४. अ. १८०२ ५. ड. १८१८

स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे

१. अ. शिंदे २. ड. १८१७-१८ ३. ड. पंढरपूर

४. क. १८१७ ५. ब. दुसरा बाजीराव

स्वयं अध्ययन क्रमांक ३ ची उत्तरे

१. अ. न. ची केळकर २. ब. रामचंद्रपंत अमात्य ३. अ. १७६१

४. ड. बहिर्जी नाईक ५. अ. रियासतका सरदेसाई

## ४.५ सारांश

शेकडो वर्षांपासून अन्याय अत्याचाराचे चटके सहन करणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेला स्वतंत्र जीवन जगण्याची नवसंजीवनी देण्यासाठी हिंदवी स्वराज्याची स्थापना छत्रपती शिवाजी महाराजांनी केली होती. याच स्वराज्याची धुरा शिवछत्रपतींच्या नंतर छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराराणी यांनी अतिशय समर्थपणे सांभाळली होती. मराठी सत्ता संपवण्याचा औरंगजेबाने पुरेपूर प्रयत्न करून आपल्या आयुष्याची अत्यंत महत्त्वाची २६ वर्षे दक्षिणेत खर्ची घातली पण त्याला मराठ्यांचे राज्य जिंकता आले नाही. उलट त्यालाच आपला जीव स्वराज्याच्या मातीतच सोडावा लागला. पुढे छत्रपती शाहू

महाराजांच्या कारकिर्दीत कर्तृत्वान पेशव्यांची पिढी निर्माण झाली व पेशव्यांनी मराठी सत्तेचा उत्तरेकडे मोठा विस्तार करून साम्राज्यात रूपांतर केले. परिणामी उत्तरेत मराठ्यांचा दबदबा तयार झाल्याने ते मोगल बादशहाचे संरक्षण करू लागले. त्यातूनच पुढे मराठ्यांनी पराक्रमाच्या जोरावर अटकेपार झेंडा रोवला. परंतु दुर्दैवाने पानिपतच्या तिसऱ्या युद्धातील पराभवानंतर माधवराव पेशव्यांनी मराठा साम्राज्य पुनर्जीवित करण्याचा व सांभाळण्याचा तथा सावरण्याचा प्रयत्न केला पण त्यांना अल्पकाळ मिळाल्याने व पुढे पेशवे पद मिळवण्यासाठी सौदेबाजी सुरू झाल्याने मराठी सत्तेत कटकारस्थानांना ऊत आला. यातूनच महत्त्वकांक्षी व सत्तापीपासू दुसऱ्या बाजीरावाने मराठा सरदारांना एकत्र आणून इंग्रजांना प्रतिकार करून शह द्यायला हवा होता परंतु मराठा सरदारांनाच घाबरून अविवेकी दुसरा बाजीराव इंग्रजांच्या आश्रयास गेला. बरोबर याच संधीचा फायदा ब्रिटिशांनी घेऊन शिंदे, भोसले व होळकरांसारख्या मातब्बर व पराक्रमी सरदारांना फोडा व जोडा या नीतिचा वापर करून शेवटी मराठ्यांची सत्ता संपवण्याचा मार्ग मोकळा केला. याचाच परिणाम म्हणून दुसऱ्या बाजीरावाचा निर्णायक लढाईत पराभव करून सन १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठ्यांचे राज्य जिंकून घेतले.

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

अ) टिपा लिहा

१. वसईचा तह १८०२

२. यशवंतराव होळकर

३. दुसरा बाजीराव

४. दुसरे इंग्रजी मराठा युद्ध

५. हडपसर ची लढाई

ब) दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा

१. मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणे विशद करा

२. दुसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचा आढावा घ्या

३. तिसऱ्या इंग्रज मराठा युद्धाचा आढावा घ्या

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. पवार जयसिंगराव, मराठी साम्राजाचा उदय आणि अस्त, कोल्हापूर, १९९३.

२. सुमन वैद्य, अखेरचा पेशवा, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१५.

३. गो. स सरदेसाई, मराठी रियासत, खंड– १ ते ८, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, २०१७.

४. विकास कदम, मराठी सत्तेचा विस्तार आणि ऱ्हास, एज्युकेशन पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१५.

५. Vaidya S. G, Peshwa bajirao second and the downfall of the Maratha power, Nagpur, 1976.
6. S. N Sen, Anglo Maratha relations 1785-1796, Madras, 1994.
7. Gupta P.C. Bajirao second and East India company, Calcutta, 1964.

❑❑❑